"शब्दगंध शब्दरंग: मराठी साहित्य आणि संस्कृती कला दर्पण"

# नेटभारी

## ई दिवाळी अंक २०१६



# नेटभारी

## ई दिवाळी अंक २०१६

ई प्रकाशन

**नेटभारी ई साहित्य चळवळ**

वेबब्लॉग : www. netbhaari.jimdo.com

ई पत्ता :netbhaari@gmail.com

मोबाईल क्रमांक : +९१ ८९७५०७६४५६

**नेटभारी ई दिवाळी अंक २०१६**
**Netbhaari E Diwali Ank 2016**

**संपादक : शानिल चंद्रकांत पाटील**

**मुखचित्र फोटो : सौ. वृषाली वजरीणकर**
**पुणे**

**अंतर्गत मांडणी व सजावट : शानिल पाटील**

**©netbhaari e sahity chalaval®2016**

**# या ई दिवाळी अंकात समाविष्ट झालेल्या साहित्याचे सर्व हक्क त्या त्या लेखकांकडे सुरक्षित असून त्या साहित्याचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण या नाट्य, चित्रपट किवा इतर रुपांतर करण्यासाठी संबंधित लेखकांची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.**

**प्रकाशन : नेटभारी ई साहित्य चळवळ**

**प्रकाशन दिनांक : ३० ऑक्टोबर २०१६**
**( लक्ष्मी पूजन )**

**# हा ई दिवाळी अंक वाचनासाठी आणि वितरणासाठी विनामूल्य उपलब्ध आहे.**
**# आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.**
**# हा ई दिवाळी अंक वेबसाईटवर किंवा ब्लॉगवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी नेटभारी ई प्रकाशनाची परवानगी घेणे आवश्याक आहे...**

# अंतरंग साहित्यिक

## कथा

१. निलेश बामणे
२. चैत्राली जोगळेकर
३. मनीषा पवार
४. प्रियांका येवले
५. अनिता सावंत
६. योगिता किरण पाखरे
७. वैभव नारायण जोशी
८. अजित करंबेळकर
९. सुरेखा मोंडकर
१०. वैजयंती डांगे
११. मीनाक्षी अडे
१२. समीरबापू गायकवाड
१३. पुष्पलता करंगुटकर
१४. ज्योती अलवनि
१५. विद्या भूतकर
१६. सौ. संतोषी केदार कदम
१७. हासीम नागराल
१८. शीतल जोशी
१९. वृषाली वजरीणकर
२०. संदीप ढाकणे
२१. प्रकाश पाटील
२२. कविता महाजन
२३. प्रा. संदीप रामदासराव मोकळे

## पथनाट्य

१. जयेश शत्रुघ्न मेस्त्री

## लेख

१. वर्षा किडे-कुलकर्णी
२. नागोराव सा. येवतीकर
३. विकास लाड
४. निखील सतीश जगताप
५. सचिन वसंत पाटील
६. सुवर्णविलास
७. बी. एस. एफ
८. धनंजय शंकर पाटील
९. योगिता किरण पाखरे
१०. समीरबापू गायकवाड
११. विद्या भूतकर
१२. समीर जावळे
१३. सौ. संतोषी केदार कदम
१४. गणेशदादा शितोळे
१५. शीतल जोशी
१६. लक्ष्मी देसाई
१७. वृषाली वजरीणकर
१८. निनाद वाघ
१९. अंजली देशमुख घंटेवार
२०. सुनीता सुरेश महाबळ

## कविता

१. वीणा अजित माच्छी
२. घनश्याम बोहाडे
३. स्वाती उदार
४. शशिकांत मा. बाबर
५. मकरंद सुधाकर पाटोळे-कदम
६. वर्षा किडे-कुलकर्णी
७. मुक्त विहारी
८. विक्रम सरक
९. निलेश उजाळ
१०. किरण दिलीपकुमार म्हसकर
११. निलेश कवडे
१२. योगिता किरण पाखरे
१३. निखील जगताप
१४. प्रा. सौ. संगीता भालसिंग
१५. गजानन पवार-पाटील
१६. ऋषिकेश गंगाधरराव देशमुख
१७. विजयकुमार देशपांडे
१८. तुषार कथोरे
१९. स्वप्नील चाफेकर 'प्रीत'
२०. दिलीप पाटील
२१. गणेश म. तावडे
२२. सागर आबनावे

२३. वैभव यशवंत जाधव
२४. अनिकेत स्वामी
२५. प्रशांत गायकवाड
२६. श्री. दिगंबर बापू शिंदे
२७. समाधान गायकवाड
२८. जयदीप एकनाथ विघ्ने
२९. अमोल अलगुडे
३०. शाहीर प्रमोद जगताप
३१. सौ. अस्मिता चव्हाण
३२. सौ. कस्तुरी देवरुखकर
३३. सुजित कदम
३४. अशोक क. गायकवाड
३५. राजेन्द्र जोगदंडे मामा
३६. प्रशांत प्र. पवार
३७. अंकिता साळवी
३८. भगवान निळे
३९. प्रतिभा कांबळे
४०. शानिल चंद्रकांत पाटील
४१. मीनाक्षी अडे
४२. रमेश पां. जाधव
४३. मनीष मालुसरे
४४. गजाभाऊ लोखंडे
४५. पुष्पलता करंगुटकर
४६. सौ. मंगला रोकडे
४७. प्रसन्ना शानभाग
४८. समीरबापू गायकवाड
४९. सौ. संतोषी केदार कदम
५०. वैष्णवी पारसे
५१. अरुण वि. देशपांडे
५२. प्रियांका लक्ष्मण माने
५३. प्रा. कविता डवरे-लाहुडकर
५४. विशाल कन्हेरकर
५५. गणेशदादा शितोळे
५६. प्रियंवदा
५७. सौ. सुवर्णा अरुण कांबळे
५८. वृषाली शिंदे
५९. संजय वि. पाटील
६०. अभिजीत पाटील
६१. संदीप ढाकणे
६२. सौ. निर्मला भयवाळ
६३. शेख नजमा मैनुद्दीन
६४. शीतल जोशी
६५. अमोल अलगुडे
६६. उद्धव भयवाळ
६७. संतोष बोंगाळे
६८. अनामिका – एक मृगजळ
६९. सुनीता सुरेश महाबळ
७०. रावसाहेब जाधव
७१. प्रा. बाळासाहेब बाबुराव हिरे
७२. प्रकाश पाटील
७३. सौ. अनुराधा कृष्णा धामोडे
७४. अमृता पांगे
७५. निनाद वाघ
७६. नागनाथ विठ्ठलराव गायकवाड
७७. किरण प्रकाश बोरकर
७८. अंजली देशमुख घंटेवार
७९. महादेव बी. बुरुटे

## सुविचार

१. सुनीता सुरेश महाबळ

## सुधाकरी

१. प्रा. सौ. संगीता भालसिंग

## चारोळ्या

१. धनंजय शंकर पाटील
२. शानिल चंद्रकांत पाटील
३. किरण प्रकाश बोरकर

## चित्रकलेच्या जगात

१. किरण प्रकाश बोरकर
२. वीणा अजित माच्छी

# मनोगत

आजच्या इंटरनेटच्या ई युगात 'नेटभारी'चा यंदाचा दुसरा ई दिवाळी अंक आज आपणा सर्वांपुढे घेऊन येताना आम्हाला आज अत्यंत आनंद होत आहे.

आजचे हे ई युग आणि त्यात ई पुस्तकांची नांदी मोठ्या प्रमाणात उसळत आहे. इतर भाषेतील ई पुस्तकांना आपली मायमराठी ई पुस्तके हि जोमाने टक्कर देत आहे. अनेक दर्जेदार ई पुस्तके आपल्या मायमराठीच्या उदरातून जन्माला येत आहेत. मराठीच्या संस्कारांनी नटलेल्या या ई पुस्तकांमुळे मराठीचा झेंडा ई जगतात अभिमानाने अटकेपार डौलत आहे. छाती अभिमानाने भरून येईल अशी ई पुस्तके या मरती मातीतून हि निर्माण होत आहे. अगदी नुकतेच वाचनात आलेले एक ई पुस्तक. एका चिमुरडीचे. "निशिगंध". जिल्हा परिषेदेच्या मराठी शाळेत ईयत्ता चौथीमध्ये शिकणार्या "निशा रौदळ"चे. वयाच्या दहाव्या वर्षी एक एक मराठी मुलगी स्वत:चे ई पुस्तक स्वत: तयार करते आणि त्याला जगभरातून दाद मिळते, हि एक अभिमानास्पद गोष्ट आहे. "आम्हाला मिळाले ज्ञान, गुरुजी किती छान" असो कि "आई माझी सुंदर, ती माझा पुरंदर" असे म्हणत आपल्या अंतर्गत कलेने निशाने ई साहित्य क्षेत्राला, आजच्या ई शिलेदारांना तसेच भविष्यात मराठी ई पुस्तकांच्या वाटचालीला नवी उभारी दिली आहे.

नेटभारीचा हा दुसरा ई दिवाळी अंक. अनेकांनी आपले साहित्य आम्हाला मोफत देऊन खूप मोठे सहकार्य केले आहे. त्यांच्या या सहकार्यामुळेच नेटभारी या ई दिवाळी अंकाची आम्ही निर्मिती होऊ शकले. आपले दर्जेदार साहित्य कुठलेही मानधन न घेता विनामुल्य देऊ केले, त्या सर्वांचे आम्ही खरोखरच ऋणी आहोत.

नेटभारी या छोट्याशा सुरवंटाला आपण आपल्या सहकार्याने फुलपाखरू बनण्याची दिशा दिली आहे, त्या बद्दल पुनच्च आभार. हि दिवाळी तुम्हाला सुखाची, समाधानाची, आणि भरभराटीची जावो, हि सदिच्छा.

हा दिवाळी अंक वाचून झाल्यावर आपण आपली प्रतिक्रिया जरूर नोंदवा. काही चुका राहिल्या असतील तर निसंकोचपणे सांगा.
जय महाराष्ट्र...!
***

# महाराष्ट्र गीत

बहु असोत सुंदर संपन्न कीं महा
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा ॥ ध्रु. ॥

गगनभेदि गिरिविण अणु नच तिथे उणे
आकांक्षांपुढति जिथें गगन ठेंगणे
अटकेवरि जेथील तुरंगिं जल पिणे
तेथ अडे काय जलाशय न दांविणे ?
पौरुषासी अटक गमे जेथ दु:सहा ॥ १ ॥

प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरें
सद्भावांचीच भव्य दिव्य आगरें
रत्नां वा मौक्तिकांहि मूल्य मुळी नुरे
रमणीची कूस जिथे नृमणिखनि ठरे
शुद्ध तिचे शीलहि उजळवि गृहा गृहा ॥ २ ॥

नग्न खड्ग करि, उघडे बघुनि मावळे
चतुरंग चमूचेही शौर्य मावळे
दौडत चहुकडुनि जवें स्वार जेथले
भासति शतगुणित जरी असति एकले
यन्नामा परिसुनि रिपु शमितबल अहा ॥ ३ ॥

विक्रम वैराग्य एक जागिं नांदती
जरिपटका भगवा झेंडाहि डोलती
धर्म-राजकारण समवेत चालती
शक्तियुक्ति एकवटुनि कार्य साधिती
पसरे यत्कीर्ति अशी विस्मयावहा ॥ ४ ॥

गीत मराठ्यांचे श्रवणी मुखीं असो
स्फूर्ति दीप्ति धृतिहि देत अंतरी ठसो
वचनिं लेखनीहि मराठी गिरा दिसो
सतत महाराष्ट्रधर्म मर्म मनिं वसो
देह पडो तत्कारणि ही असे स्पृहा ॥ ५ ॥
***

**श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**

**कथा**

# बसस्टॉप

"जवळपास वर्षभर हा माझ्या मागे लागलाय, न चूकता मी यायच्या वेळेवर रोज बस्टॉपवर माझी वाट पाहत उभा असलेला दिसतो. मी बसमध्ये चढले की माझ्या मागून चढातो, मी बस सोडली की तो ही सोडतो, माझ्या गोऱ्या रंगावर आणि मादक शरिरावर भुळलाय आणि काय ? मी चुकून त्याच्या नजरेला नजर दिली तर मुलींसारखी नजर चोरतो. बसमध्ये माझ्या बाजुला येऊन उभा राहिला तर मला त्याचा धक्का लागून मी त्याला काही बोलणार नाही याची पूर्ण काळजी घेतो. बसमध्ये कोण भेटला तर बोलताना मला प्रभावित कराण्यासाठी लाखाच्या वार्ता करतो. कोणी तरी मोठा विद्वान व्यक्ती असल्याचा आव आणतो. एखाद्या चॉकलेट हिरो सारखा दिसणारा, जीन्स, टी-शर्ट परिधान कराणारा, खांद्यापर्यंत केस वाढविलेला, चेहऱ्यावर पावडर थापणारा, दाढी मिश्या न ठेवणारा, सडपातल बांधा असणारा आणि बोलताना अरे! तूरे! करणारा विद्वान कसा असू शकतो? मुर्ख कुठला ! त्याला वाटतय मी त्याच्या प्रेमात पडलेय ! त्याच्या सारखे हजार जण माझ्या मागे लागलेत ! मी त्यांना भिक नाही घातली तर हा किस खेत की मुळी आहे? एक नंबर डरपोक आहे. तस नसत तर हिंमत करून मला काय ते एकदाच विचारून मोकळा झाला असता. रोज बसस्टॉपवर अस तासनतास माझी वाट पाहत उभा राहिला नसता. बघ ! आता माझ्यापासून किती दूर उभा राहून माझ्याकडे एक टक पाहतोय वेड्यासारखा ! अशा भ्याड मुलाच्या मी प्रेमात पडणार शक्य तरी आहे का ? मला जर कोणी याच्या समोर छेडल तर हा मान खाली घालून चुपचाप निघून जाईल. मला कळत नाही माझ्यापेक्षाही सुंदर दिसणार्या मुली स्वतःहून त्याला चिपकण्याचा प्रयत्न का करतात ? त्या बघ ! त्या दोघी कश्या त्याच्या जवळ उभ्या रहिल्यात एक उजविकडे आणि एक डाविकडे बाजूला जागा नाही म्हणून दुसर्या त्या दोघी एक पुढे आणि एक मागे उभी राहिलेय ! आता बघ ! मी बसमध्ये चढल्याखेरीज हा बसमध्ये चढणार नाही आणि तो चढल्याखेरीज त्या चौघी चढणार नाहीत, पाहिलस आज तू माझ्या सोबत आहेस म्हणून रिक्षाने गेला आणि बरोबर त्या दोघींनाही घेऊन गेला. मला नाही कधी म्हणाला रिक्षाने येतेस का ? चल ! कविता आता आपण पण रिक्षाने जाऊया !'' कविताने रिक्षाला हात दाखाविला रिक्षा थांबताच

दोघीही रिक्षात बसताच कविता म्हणाली, "प्रतिभा तू मगापासून ज्याच्याबद्दल बोलत होतीस त्याच नाव तरी तुला माहीत आहे का ? तू ओळखतेस त्याला ? त्यावर प्रतिभा किंचित नाराजीच्या स्वरात म्हणाली,'' "नाही ना ? मला त्याच नावही माहीत नाही आणि मी त्याला ओळखतही नाही ! प्रतिभा तू त्याला ओळखत नसताना त्याच्याबद्दलच तुझ मत कस काय बनवू शकतेस ? मला खात्री आहे उद्या तू जर त्याच्या समोर तुझ्या प्रेमाचा प्रस्ताव मांडलास तर तो नाही म्हणेल ! त्यावर प्रतिभा काविताला म्हणाली तुला वेड लागलय ! अस कस होऊ शकत ? जो गेल्या वर्षभर माझ्या मागे लागलाय त्याच्यासमोर मी स्वतः हून प्रेमाचा प्रस्ताव ठेवल्यानंतरही तो नाही म्हणेल हे कस शक्य आहे ? हे केवळ अशक्यच आहे ? त्यावर कविता आत्मविश्वासाने प्रतिभाला म्हणाली, "लाव पैंज लाव तू उद्याच त्याच्यासमोर प्रेमाचा प्रस्ताव ठेवायचा, त्याने जर तुझा प्रेमाचा प्रस्ताव नाकारला तर तू त्याचा नाद सोडायचा आणि त्याने जर तुझ्या प्रेमाचा स्विकार केला तर मी आयुष्यभर मी तू बोललेल ऐकत राहिन!" प्रतिभान कविताची पैंज मान्य केली आणि रिक्षामधून उतरताच दोघी दोन विरुध्द दिशांना निघून गेल्या.

दुसर्या दिवशी बसस्टॉपवर त्या दोघी एकत्रच आल्या, तो प्रतिभाची वाट पाहत बसस्टॉपवर उभा होता. प्रतिभा हिंमत करून त्याच्या जवळ गेली आणि त्याला म्हणाली, "मला जरा तुझ्याशी बोलायचय जरा बाजुला येता का ? त्याने मानेनेच होकार दिला. ती त्याला बसस्टॉपपासून दूर घेऊन जात म्हणाली,'' मला माहीत आहे की तुझं माझ्यावर प्रेम आहे म्हणूनच तू माझी वाट पाहत बसस्टॉपवर उभा असतो. मला ही तुंम्ही आवडता त्याचा हात हातात घेत ती "आय लव्ह यू" म्हताच तिचा हात हातातून झटकत तो म्हणाला, "बट ! आय हेट यू !" क्षणभर प्रतिभाला काय कराव आणि काय करू नये तेच कळत नव्हत. ती भानावर येईपर्यंत तो रिक्षा पकडून निघूनही गेला. प्रतिभाच्या खांद्यावर कविताचा हात होता. तो हात न उचलताच कविता प्रतिभाला म्हणाली, "प्रतिभा तू पैंज हारलेस आता तुला त्याचा नाद सोडावाच लागेल. आता तू म्हणशिल मला त्याचा नाद कधीही लागला नव्हता ते खर ही आहे पण तो खर्याच तूला आता लागेल !" त्यावर प्रतिभाने

काहीच प्रतिक्रिया दिली नाही. त्याचा विचार करत करतच ती तिच्या घरीही पोहचली. काही केल्या तो तिच्या डोक्यातून जात नव्हता. तो मला नाही म्हणूच कसा शकतो ? हा प्रश्न ती वारंवार स्वत:ला विचारून त्रास करून घेत होती. मनातल्या मनात त्याला शिव्याही देत होती. साला ! दिड दमडीचा ! मला नाही म्हणाला ! गेले वर्षभर माझ्या मागे कुत्र्यासारखा शेपूट हालवत फिरत होता आणि आता ऐन वेळी धोका दिला साल्याने ! त्या कवितासमोर माझा पोपट केला. आता आयुष्यभर त्या कवितासमोर मान खाली घालून उभ राहवं लागणार आहे. पण ! आमच्या शुल्लक पैंजेसाठी कविताने आयुष्यभर माझं ऐकण्याच मान्य केल असल तरी ती जिंकणार याची तिला पूर्ण खात्री असल्याच तिच्या बोलण्यावरून तरी स्पष्ट जाणवत होत. मी हारल्यास तिने माझ्याकडून त्याच्या नादाला न लागण्याच वचन घेतले. याचा अर्थ मी त्याच्या नादाला लागण कविताला मान्य नव्हते. पण का ? कविता तर दिसायला माझ्यापेक्षा सुंदर आहे श्रीमंतही आहे उच्चशिक्षीतही आहे आणि नोकरीलाही चांगली आहे. तिला या सडकछाप माणसामध्ये काय रस असणार ? सांगता येत नाही ! त्याच्या आजुबाजूला घुटमलणा-या पैकी ही ही एक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. माझी आणि तिची मैत्री चार – पाच महिन्यांची मी तरी तिला तशी नीट कोठे ओळखते ? तिने माझ्या नकळत माझ्यासोबत राहूनच तर माझा काटा काढला नाही ना ? प्रतिभाचे डोके काम करेनासे झालयं ! कविता म्हणत होती ते बरोबरच होत वर्षभर मला त्याचा नाद लागला नव्हता पण आता मला त्याचा नाद लागलाय !

यापुढे कवितासोबत त्याच्या बद्दल बोलण पूर्णपणे बंद ! आता तो काय करतो ते पाहू या ! दुसर्या दिवशी त्या दोघी एकत्रच बसस्टॉपवर आल्या पण ! तो दिसला नाही. तो न दिसल्यामुळे प्रतिभा किंचित कासाविस झाली. पण ! कविता समोर काहीच बोलली नाही. घरी गेल्यावर मात्र तिचे मन अधिकच बेचैन झाले. त्याला पाहण्याची तिलाही किती सवय झाली होती हे तिच्या लक्षात आले. ती मनात पुटपुटली त्याचा एखादा फोटो जवळ असता तर किती बर झाले असते. फोटो सोडा आपल्याला तर त्याच साधे नावही माहीत नाही. मी पण किती मुर्ख आहे वर्षभरात त्याच साधे नावही जाणून घेतले नाही. पण ! तसा प्रयत्न आता करावा लागेल. त्याच्या बाजूला ज्या कोंबडया उभ्या असतात त्यातीलच एखादीला पकडून बोलतं करावे लागेल ! त्यानंतर काही दिवसांनी प्रतिभा आणि कविता सोबत असताना तो त्यांना सामोरा आला कविता आणि तो एकमेकांकडे ज्या नजरेने पाहत होते ते पाहता प्रतिभाच्या मनात शंकेची पाल पुन्हा चुकचुकली ! त्या दोघांमध्ये काहीतरी मोठी भानगड आहे हे प्रतिभाने अचूक हेरल आणि त्याच्या बाबतीत थोडा वेगळा मार्ग अवलंबण्याचा तिने निर्णय घेतला.

काही दिवसानंतर जेंव्हा तो प्रतिभाला बसस्टॉपवर एकटाच उभा असताना दिसला तेंव्हा त्याला पुन्हा बाजुला घेत प्रतिभा म्हणली, “मला माफ कर ! माझाच काहीतरी गैरसमज झाला असेल, मला माफ करा प्लीज !” त्यावर तो किंचित हसत म्हणाला, “ठिक आहे प्रतिभा !” त्यावर प्रतिभा म्हणाली, “तुला माझ नाव माहीत आहे ?” त्यावर तो म्हणाला, “तुझच काय तुझ्या घरातील सर्वांचीच नावे मला माहीत आहेत. तुझ्या मोठ्या भावाचे, बहीणीचे, आई-वडीलांची सर्वांची नावे मला माहीत आहेत.” त्यावर प्रतिभा चटकन म्हणाली, “पण! मला तुझ नाव माहीत नाही.” “माझ नाव विजय जाधव” त्याने तिच्या हातात एक विझीटींग कार्ड दिलं ज्यावरून तो पत्रकार आणि लेखक असल्याच लक्षात येत होत. त्याच नाव कळताच त्याचे अनेक लेख तिने वर्तमानपत्रात वाचल्याचे प्रतिभाच्या लक्षात आले. तो तिच्याशी बोलत होता या संधीचा फायदा उचलत तिने त्याची शक्य तेवढी सर्व माहीती काढून घेण्याचा प्रयत्न केला. तो निघून गेल्यावरही प्रतिभा बसस्टॉपवर थांबली कारण तिला कविताला गाठायचे होते. कविता बसस्टॉपवर येताच प्रतिभा तिला म्हणाली, “त्याच नाव विजय जाधव आहे तो एक चांगला पत्रकार आणि लेखक आहे. चेहर्यावरून वाटत नाही ना तो लेखक असेल अस ?” त्यावर रागावून कविता म्हणाली, “चेहर्यावरून तो काहीच वाटत नसला तरी त्याच्या चेहर्यामागेच दडलं असेल बरच काही कदाचित !” त्यादिवशी प्रतिभाने विजयने तिला दिलेल्या कार्डवरील मोबाईल नंबर आपल्या मोबाईलवरून लावण्याचा प्रयत्न केला पण तो नंबर अस्तित्वातच नव्हता. आता त्याच निदान नाव तरी कळल्याचा आनंद प्रतिभाच्या चेहर्यावर झळकत होता. पण ! आता प्रतिभाच्या मनात एक नवीन प्रश्न निर्माण झाला, “त्याच माझ्यावर प्रेम नव्हतं तर तो माझ्या मागे का लागला

होता ? प्रतिभाला आता या प्रश्नाच उत्तर शोधायच होत. पण कस ? आता तो पुन्हा भेटेल तेंव्हा त्याला स्पष्टच विचारू की!.

त्यानंतर काही दिवसानी विजय एकटाच बसस्टॉपवर उभा होता. त्या संधीचा फायदा उचलत प्रतिभा हळूच त्याच्या बाजूला जाऊन उभी राहीली आणि गोड आवाजात म्हणाली,'' राग येणार नसेल तर एक विचारू ? त्यावर त्याने मानेनेच होकार देताच ती म्हणाली,'' तुला माझ्यात काही रस नव्हता तर मग माझ्या मागे का लागला होतात ? त्यावर विजय म्हणाला,'' माझ्या कथेला एक नवीन नायिका ह्वी होती . तुझी मी माझ्या कथेची नवीन नायिका म्हणून निवड केली होती. तुझ चालणं, बोलणं, हसणं, रूसणं, लाजणं आणि रडणं ही सारच मला माझ्या नायिकेत उतरवावयाच होत म्हणून ! तुंम्ही कथा ही लिहता ? हो शाळेत असल्यापासून ! फक्त लिहता की प्रकाशितही करता ? राज्यस्तरीय कथास्पर्धांमध्ये माझ्या कथांना अनेक बक्षीस मिळालेत. प्रतिभाला क्षणभर काय बोलाव आणि काय नाही तेच कळत नव्हत. पण स्वतःला सावरत प्रतिभा म्ह्णाली, “मग! भेटली का तुला तुझ्या कथेतील नायिका माझ्यात ? त्यावर विजय म्हणाला,' जिला एक वर्षात एक माणूस ओळखता येत नाही तर ती लोकांच्या मनात काय चाललय हे कस काय ओळाखणार ? लोकांच्या वेदना ज्याला क्षणात ओळखता येतात तोच खरा माणूस. एखाद्याची वेदना कळायला जर डॉक्टरला एक वर्ष लागला तर डॉक्टरला कदाचित त्याच्यावर उपचार करण्याची गरजच भासणार नाही. मी तुझ्या मागे वेडा झालोय हे पाहताना तुला आनंद होत होता ना ? एक असूरी आनंद ज्यामुळे तू मला खेळण समजून माझ्या भावनांशी खेळण्याचा प्रयत्न करत होतीस. मी तुझ्यासाठी रोज खर्च करत असलेल्या तासांची किंमत तुला माहीत नव्हती. ती जर तुला माहीत असती तर तुला कळल असत मी तुझ्यावर काय उधळलय ते ? इतक्यात बस येताच तो तिला बाय करून निघून गेल्यावर प्रतिभा स्वतःशिच म्हणाली,'' आता कळतय कविता का म्हणाली की त्याच्या नादाला लागू नकोस ? आता कळतय त्याच्या भोवती भिरभिरणार्याह त्या फुलपाखरांच रहस्य ! प्रतिभाला स्वतःचाच अधिका अधिक राग येत होता. पण ! आता तिचा अहंकार अभिमान थोडा- थोडा दूर होऊ लागला होता. विजयच्या वेळेची किंमत प्रतिभाला कळू लागली होती. विजयने तिच्यासाठी जो वेळ खर्च केला होता त्या वेळेत तो कित्येकांच्या वेदनेला वाचा फोडू शकत होता. त्यांच्य वेदना जगापर्यंत पोहचवू शकत होता. त्यांच्या वेदनेवर औषध शोधू शकत होता. तिच्यासाठी त्याने खर्च केलेल्या वेळेची किंमत अमूल्य होती हे तिच्या लक्षात आल होत आणि आता तर तिला खरोखरच त्याचा नाद लागला होता.

रविवारचा दिवस होता. प्रतिभा जूनी पुस्तके चाळत होती, ज्यात तिच्या दादाची ही बरीच जूनी पुस्तके होती. त्या पुस्तकात तिला एक गोष्टीच जुनं पुस्तक सापडल. विक्रम-वेताळाच्या गोष्टीच ते पुस्तक होत. त्या पुस्तकात तिला एक जुना फोटोही सापडला त्या फोटोत तिच्या दादासोबत जो मुलगा होता तो हुबेहुब विजयसारखा दिसत होता. पण एकदा खात्री करून घ्यावी म्ह्णून ती तो फोटो आपल्या दादाकडे घेऊन गेली त्याला तो दाखवत तिने त्याला प्रश्न विचारला,''दादा या फोटोत हा तुझ्याबरोबर मुलगा कोण आहे ? त्यावर तिचा दादा तिला म्ह्णाला,'' हा माझा जिवलग आणि शाळेय मित्र विजय जाधव आहे. आता हा एक मोठा लेखक झालाय बर ! बरीच वर्षे झाली मला भेटला नाही. प्रवासात दिसला होता एक दोनदा पण आमची भेट नाही झाली. आता तो मला ओळख दाखवेल की नाही देव जाणे ! शाळेत असताना आंम्ही दोघे एकाच बाकावर बसायचो, एकत्रच डबा खायचो त्याची आणि माझी मैत्री कधीच एकमेकांना काही देण्या- घेण्या पुरती मर्यादित नव्हती. वर्गातील सर्वात शांत विद्यार्थी म्ह्णून त्याची ख्याती होती. वर्गात तो इतका साधा वागत असे की कोणी त्याच्या एका गालावर चापट मारली तर त्याने दुसरा गाल पुढे करावा इतका. पण त्याचात तो साधेपणा त्याच्या स्वभावामुळे आलेला नव्हता तो आला होता त्याच्या गरीबीमुळे. तो इतका गरीब होता की त्याला कदाचित दोन वेळेच जेवणही पोटभर मिळत नसावं. पण त्याने आपल्या गरीबीचं भांडवल कधीच केल नाही. परिस्थितीशी झगडत नेहमीच त्याने तिच्यावर स्वार होण्याचाच प्रयत्न केला. मी त्याच्या या प्रयत्नांचा शाळेतील एकमेव साक्षीदार होतो कदाचित तेंव्हा. त्याच्या त्या वेळच्या खडतर जीवनावरही एखाद पुस्तक लिहल जावू शकत इतक! कदाचित त्याने तस ते लिहलही असेल. असो माझा आणि त्याचा संबंध आंम्ही शाळेत असेपर्यंतच आला. शाळा

संपल्यानंतर त्याच्या आयुष्यात आणखी काय काय घडल असेल याची तर मी कल्पनाही करू शकत नाही. शाळेच्या शेवटच्या दिवशी मी जबरदस्तीने त्याच्या सोबत हा फोटो काढला होता. हा फाटो मी जपून ठेवला पण त्याने कदाचित ठेवलाही नसेल कारण शाळा संपल्यानंतर तो माझ्या संपर्कात कधीच आला नाही. तो मोठा लेखक वगैरे झालाय हे ही मला तेंव्हा माहीत जेंव्हा त्याच्या एका पुस्तक प्रकाशना संदर्भातील बातमी मी टी.व्ही वर पाहिली.

पंचवीस एक वर्षापूर्वी विजय आणि मी एकाच सरकारी शाळेत तिसर्या इयत्तेत शिकत होता. त्यावेळचा एक प्रसंग आठवून मला आजही हसू येत. आमच्या त्या शाळेपासून पंदरा मिनिटाच्या अंतरावर असणार्या झोपडपट्टीत विजय त्यावेळी रहात होता. पण झोपडपट्टीत रहात असतानाही त्यावेळी विजयच्या वडिलांची आर्थिक स्थिती उत्तम होती. त्यामुळे विजय शाळेत येताना इतर मुलांच्या तुलनेत जरा जास्तच रूबाबात येत असे. त्याचा तो रूबाब आजही कमी झालेला नाही म्हजे त्याने तो कधीच कमी होऊ दिला नाही. पहिली – दुसरीला तो ज्या शाळेत शिकत होता त्या शाळेच्या मुख्याध्यापिकाच त्याच्या वडिलांच्या खास परिचयाच्या होत्या आणि त्याकाळी त्या शाळेची शिस्त फारच कडक होती. पण त्या शाळेत जाण्यासाठी बसने प्रवास करावा लागत असे तो टाळण्यासाठी नाईलाजाने त्याने या नवीन शाळेत प्रवेश घेतला होता. विजयला वर्गात शांत आणि शिस्तीत राहण्याची जणू सवयच जडलेली होती. पण तो कितीही शांत दिसत असला तरी स्वभावता शांत अजिबातच नव्हता. या नवीन शाळेत बहूतेक मुलं खोडकर होती. त्यामुळे इतर मुलांच्या तुलनेत विजय किंचित वेगळाच होता.

आमच्याच वर्गात विनिता नावाची एक जाड-जुड, गोरी-गोमटी, गोड आवाज असणारी पण चपळ आणि निडर मुलगी होती. ती या शाळेत जूनी आणि हुशार असल्यामुळे बाईनी तिला वर्गप्रमुख केल होत. ती वर्गप्रमुख असल्यामुळे वर्गातील सर्वच मुल तिला घाबरून रहात असत. त्याचा कदाचित तिला गर्व झालेला असावा. वर्गात तिच्या मित्रांचा एक घोळकाही होता. ती त्या घोळक्याची प्रमुख होती. त्या शाळेत दुपारच्या जेवनाच्या सुट्टीत डबा खाऊन झाल्यावर सर्व मुलं डबा धुण्यासाठी आणि पाणी पिण्यासाठी शाळेतील सार्वजनिक नळावर जात. पण विजय जात नसे तो त्याचा सवयीचा भाग होता. तो रोजच शाळेत येताना त्याच्या सोबत एक मोठी पाण्याची बाटली आणत असे. एक दिवस काय झाले विनिता आणि तिच्या घोळक्याने दुपारच्या सुट्टीत डबा खाऊन झाल्यावर शाळेतील सार्वजनिक नळावर न जाता विजयची पाण्याची बाटली त्याला न विचारताच हिसकावून घेतली आणि त्यातील पाणी पिऊन ती रिकामी झाल्यावर त्याच्या समोरच आदळली. त्या गोष्टीचा विजयला भयंकर राग आला तो शाळेची शिस्त मोडू शकत नव्हता आणि त्यांना शिक्षाही करू शकत नव्हता. त्यामुळे नाईलाजाने तो दप्तर काखेला लावून रडत - रडत सरळ त्याच्या घरीच निघून गेला. त्याला आचानक रडत घरी आलेल पाहून त्याच्या आईला आश्चर्य वाटल कारण शाळेतून मधल्या सुट्टीत घरी येण त्याला माहीतच नव्हत. आईने रडत शाळेतून मधल्या सुट्टीतच घरी येण्याच कारण विचारल असता त्याने झालेला सर्व प्रकार कथन केला.

विजयची आई स्वतः अशिक्षित असली तरी ती आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत प्रचंड आग्रही होती. विजयची आई विजयला पुन्हा शाळेत घेऊन आली. त्यावेळी कांबळे आडनावाच्या शिक्षिका आमच्या वर्ग शिक्षिका होत्या. त्यांच्या मुलाच नावही विजयच होत आणि तो ही विजयच्याच वयाचा होता. त्याचबरोबर विजय हुशारही होता त्यामुळे सहाजिकच त्या बाईच्या मनात त्याच्याबद्दल ओलावा होता. विजयच्या आईने तक्रार केल्याबरोबर बाईनी प्रतिभाला जागेवर उभ केल आणि विचारल तू याच्या बाटलीतील पाणी प्यायलीस ? विनिताने मानेनेच होकार दिल्यावर बाईनी तिला हात पुढे करायला सांगून तिच्या नाजुक हातावर चार-पाच फटके मारले आणि पुन्हा असं न करण्याची समज दिली त्यानंतर आमच्या वर्गातील कोणीच कधीच विजयच्या वाटेला गेल नाही. पट्टीचा मार बसल्यामुळे यापूर्वी कधीही मार न खाल्लेल्या विनिताला काही केल्या रडू आवरत नव्हत. तिला अखंड रडताना पाहून विजयचा राग शांत झाला पण राग शांत झाल्यानंतर तिला रडताना पाहून त्याच्यातला हळवा माणूस अचानक जागा झाला आणि आपण तक्रार केल्यामुळे तिला इतका मार बसला आपण तक्रार केलीच नसती तर आपल्याला हे टाळता आलं असत. असा विचार तो स्वतःशीच करू लागला. विजय लहानपणापासूनचा स्वभाव होता. त्याने

केलेली चूक जर त्याच्या लक्षात आली तर त्या चूकीबद्दल तो स्वतःच स्वतःला शिक्षा करून घेत असे. आजही त्याचा तो स्वभाव बदललेला नसावा. विनिताला एका मुलीला आपल्यामुळे त्रास झाला याची शिक्षा म्हणून विजयने शाळेत असे पर्यंत वर्गातील एकाही मुलीशी कधीच मैत्री केली नाही. आजही जगाला त्याची शाळेतील फक्त एकच मैत्रिण माहीत आहे ती म्हणजे विनिता... त्यानंतर विजय आणि विनिता यांच्या नात्याने काय वळण घेतल ते त्यांनाच माहित पण या सर्व प्रकारामुळेच आंम्ही सर्व मुल मात्र त्याचे मित्र झालो होतो. विजय सहसा कोणाशी बोलत नसे पण जर चुकून कोणी त्याला बोलता केला तर तो त्याचा गुलाम होत असे. विजयचा एक विशेष गुण होता निदान शाळेत असे पर्यंत तरी तो कधीच खोट बोलत नसे. त्याने जर एखादी चुकी केलीच तर त्याची शिक्षा भोगण्यासही तो नेहमीच तत्पर असे. तो चित्रकार, वकील अथवा इंजिनिअर झाला असता तर मला त्याचे अजिबात आश्चर्य वाटले नसते पण लेखक झाला याचे नक्कीच आश्चर्य वाटते आहे. त्यावर प्रतिभाने का ? असा प्रश्न विचारताच प्रतिभाचा दादा म्हणाला,'' तो तिसरीत असतानाही उत्तम चित्रे काढत असे, गणितात तो भयंकर हुशार होता आणि विज्ञान त्याचा आवडता विषय होता. शाळेत असताना. चौथीत आंम्ही आताच्या नावाजलेल्या गुरूकुल या शाळेत प्रवेश घेतला तेंव्हा आमच्या चौथीच्या वर्गशिक्षीका देवरे मॅडम त्याच्या बाबांच्या परिचयाच्या होत्या. त्यामुळे त्यांचे त्याच्याकडे विशेष लक्ष असे. त्यावेळी त्याने या खाजगी शाळेत प्रवेश घेतला अर्थात त्यावेळची त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती बरी होती. चौथी, पाचवीत असताना त्याचा वर्गात दहाच्या आतच नंबर आला होता. पण सहावीला गेल्यावर तो असामान्य आणि इतरांपेक्षा वेगळा असल्याची लक्षणे दिसू लागली होती ते त्यावेळी कोणी हेरल होत की नाही ते देवच जाणे. आंम्ही सहावीत असताना विजय वर्गात दरवाजा जवळच्या पहिल्या बाकावर पहिला बसायचा आणि पलिकडील शेवटच्या रांगेतील पहिल्या बाकावर विनिता बसायची. विनिता आणि विजय या दोघांमध्ये एक अदृष्य स्पर्धा चालत असे. त्या दोघांचीही एकमेकांच्या प्रगतीवर हालचालींवर बारीक नजर असे. त्यावेळच्या आमच्या वर्ग शिक्षिका सावंत मॅडम होत्या. त्यांचा हसरा चेहरा आजही आठविला तरी प्रसन्न झाल्यासारखं वाटत. आज त्या शाळेचे जे मुख्याध्यापक आहेत त्यांच्याशी त्यांच लग्न झाल्याच मागे कधी तरी कळल होत. ते मुख्याध्यापकच तेंव्हा ते त्या शाळेत इंग्रजीचे शिक्षक होते. त्यांनी काही कामा निमित्त विजयला वर्गाबाहेर बोलावल त्यावेळी मधल्या सुट्टीनंतरचा सावंत मॅडमचा पहिला तास सुरू होता. दुसर्‍या एका शिक्षकांनीच बोलावल म्हणून गडबडीत विजय मॅडमची परवानगी न काढताच वर्गाच्या बाहेर गेला . माघारी आल्यावर सावंत मॅडमनी विजयला परवानगी न काढता वर्गाबाहेर गेल्याबद्दल शिक्षा म्हणून हातावर पट्टीने दोन-चार फटके मारले. त्याच्या आयुष्यात ती त्याला शाळेत मिळालेली पहिली आणि शेवटचीच शिक्षा होती कदाचित. त्या फटक्यांच्या वेदना त्याच्या हाताला नाही तर सरळ मनालाच जाणवत होत्या कदाचित. त्याच्या रडण्याचा आवाज येत नव्हता पण त्याच्या डोळ्यातून घळाघळा वाहणार्‍या अश्रूंनी त्याचा शर्ट मात्र ओला झाला होता. त्यानंतर आलेल्या शिक्षकांनी त्याला रडण्याचे कारण विचारले असता तो काहीच बोलला नाही शेवटच्या तासाला सावंत मॅडम पुन्हा वर्गात आल्या तेंव्हा त्याला रडताना पाहून सावंत मॅडमनाही आश्चर्य वाटल त्यांनी त्याला जवळ बोलावल आणि आपल्या हातातील रूमालाने त्यांनी त्याचे डोळे फुसले आणि त्याच्या पाटीवरून प्रेमाने हात फिरवत त्याला शांत केले. त्यानंतर त्याचे रडणे थांबले. त्याच दिवशी तो सावंत मॅडमचा विशेष आवडता विद्यार्थी ठरला आणि लवकरच तो खूप हुशार असल्याचेही मॅडमच्या लक्षात आले. आमच्या इंग्रजीच्या शिक्षकांनी आंम्हाला एकदा इंग्रजी शब्द पाट करून यायला सांगितले होते. वर्गातील सर्वात हुशार विद्यार्थ्यांचेही शब्द पाठ नव्हते. त्याला त्याबद्दल शिक्षकांनी चार-पाच फटकेही मारले असे दहा बारा हुशार विद्यार्थ्यांनी मार खाल्यावर सरांच लक्ष बेफीकीर असलेल्या विजयवर गेल. त्यांनी त्याला उभ केल आणि शब्द विचारले त्यावर तो पोपटासारखा बोलल्यावर त्या सरांना आश्चर्य वाटल आणि आपण वर्गातील एक हुशार विद्यार्थी शोधल्याचा त्यांना साक्षात्कारही झाला. त्या शिक्षकांना माहित नव्हत विजय हा नेहमी सर्वसामान्य विद्यार्थ्यांमध्येच रमणारा असामान्य विद्यार्थी होता. त्यांनी लगेच त्याच्यावर वर्गातील मुलांचा इंग्रजीचा गृहपाठ तपासण्याची जबाबदारी टाकली ती त्याने मनापासून कधीच पार पाडली नाही. आंम्हाला एक मराठी विषय शिकवायला शिक्षक होते त्यांनी आंम्हाला इंग्रजीसारखे मराठी जलद कसे लिहायचे ते शिकविले पण ते आत्मसात फक्त विजयनेच केले

असावे कारण त्यानंतर त्याने लिहलेले त्याच्या व्यतिरीक्त कोणालाच वाचता येत नसे, अर्थात तसे तो तेच लिहीत असे जे इतरांनी वाचाव अशी त्याची इच्छा नसे. मी आता ही खात्रीने सांगू शकतो त्याने हाताने लिहलेले तो कोणाला वचायलाही देत नसणार. त्यांचे अक्षर बर्याछपैकी वळदार आणि ज्याला सुंदर म्ह्णता येईल असं होत, पण त्याने जलद लिहण्याची सवयच कायम ठेवली कदाचित आपल्याला भविष्यात लेखक व्हायचय हे त्याने तेंव्हाच मनाशी पक्क करून टाकल होत. आमच्या शाळेतील हिंदीचे शिक्षक एक अजब रसायन होते ते एखादा प्रश्न विचारायचे आणि एखादया विद्यार्थ्यांला त्या प्रश्नाच उत्तर नाही आले तर त्या प्रश्नाचे बरोबर उत्तर देणार्याए विद्यार्थ्यांला ते त्या उत्तर न आलेल्या विद्यार्थ्यांच्या कानाखाली चापट मारायला लावत असत. एकदा काय झाल त्यांनी आंम्हाला एका म्हणीचा वाक्यात उपयोग करायला सांगितला विनितापासून सुरूवात झाली हा ! हा म्ह्णता जवळ जवळ अक्का वर्ग उभा राहिला मी विजयला म्ह्णालो,'' तुला येत असेल तर मला सांग पण त्याने मलाही सांगितले नाही. मी विचार केला अक्का वर्ग उभा राहिला तर सर कोणालाच शिक्षा करणार नाहीत आणि केलीच तर सर्वांनाच मार बसला म्ह्णून कोणाला वाईटही वाटणार नाही. शेवटच्या बॉलवर सिक्सर मारण्याचा विजयचा स्वभाव मला माहित होता पण तेंव्हा अस काही होईल याची मला शक्यता कमीच वाटत होती. पण त्याने त्याच्या स्वभावानूसार सिक्सर मारलाच त्या म्ह्णीचा वाक्यात उपयोग करून सांगितलाच. मला वाटत आंम्हाला माहीत नसल तरी तेंव्हाही विजयच आवांतर वाचन होत असावं मग काय विजयने माझ्यासह वर्गातील सर्व मुलांचे गाल लाल केले आणि मुलींना ते झेपणार नाही म्ह्णून सरांनी स्वतः त्यांच्या हातावर दोन- दोन फटके मारले त्यानंतर तसा योग कोणाच्याच वाट्याला आला नाही काहींना आला पण विजयच्या कानाखाली मारण्याची संधी त्याने कोणाला कधीच दिली नाही. तुला आश्चर्य वाटेल पण भूगोळात विजयला कधी-कधी पैकीच्या पैकी गुण मिळायचे. त्यावर्षी वर्गात सहावीला विजयचा तिसरा नंबर आला तो ही काही गुणांच्या फरकामुळे.

आंम्ही सातवीला गेलो आणि विजयचे आयुष्यच बदलले. त्याच्या आयुष्यात अचानक काळोख पसरू लागला. त्याच आयुष्यात अचानक दुःखाच सावट पसरताना दिसू लागल आणि त्याच्या आयुष्यातील खडतर प्रवासाला सुरूवात झाली. त्याने आपल दुःख नेहमीच स्वतःपुरतच मर्यादीत ठेवल. त्याचा राग त्याने आपल्या आजुबाजूच्या लोकांवर कधीच काढला नाही. इतरापासून आपली दैनीय अवस्था लपविण्याचा त्याचा अट्टहास त्याला आनंदापासून अधिकच दूर घेऊन गेला आणि मग तो आपल्याच एका वेगळ्या आंम्हाला अनोळखी असणार्या् जगात रमू लागला. शाळेबाहेरील त्याच्या जगात कोण होत ते आंम्हाला माहीत नव्हत. मी त्याचा एकूलता एक मित्र असतानाही तो मला कधी ही त्याच्या घरी घेऊन गेला नाही की स्वतः कधी आपल्या घरी आला नाही. त्याच जगण आमच्या सगळ्यापेक्षा वेगळ होत. त्याला त्याच्या आयुष्यात कोणाची मद्त घेण मान्यच नव्हत जणू काही त्याचाच जन्म जगाच्या मदतीसाठी झालेला असावा. फक्त आर्थिक बाबतीत सोडल तर इतर कोणत्याही बाबतीत त्याची मदत कोणी मागावी आणि त्याने नाही म्हटल्याच मला आठवत नाही. त्याला चित्र काढायला आवडायचं हे जगजाहीरच होत. कित्येकदा तर मी त्याच्या नकळत त्याने काढलेली चित्रे वर्गातील मुलांना दाखवायचो. वर्गातील दोन मुली सोडल्या तर बाकी मुली त्याच्यापासून दूरच असायच्या त्या दोन मुलीही त्याच्या मानलेल्या बहिणी होत्या. मुलींपासून दूर राहण्याचा त्याचा स्वभावाच झाला होता. त्या दोघीही त्याच्या मानलेल्या बहिणी होत्या इतर मुली त्या दोघींच्या माध्यमातूनच त्याच्याकडून आपली कामे करवून घेत असत. त्याची शाळेची फी नेहमीच उशिरा भरली जायची ते ही शिक्षकांनी फी साठी तगादा लावल्यावर ! तो शळेच्या पिकनीकला कधीच आला नाही. शाळेतील कोणत्याच स्पर्धेत त्याने कधीच भाग घेतला नाही. म्ह्णूनच त्याची हुशारी तेंव्हा दडून राहिली. सहावीपर्यंत वर्गात एक दिवसही गैरहजर न राहणारा विजय सहावीनंतर आठवडा आठवडाभर शाळेत गैरहजर राहू लागला. शिक्षकांनी विचारल तर सांगत असे मी आजारी होतो शिक्षकांनाही ते खरेच वाटे पण त्याच काळात मी त्याला अनवानी वडिलांसोबत कांदे- बटाटे विकताना पाहिलेले असायचे. त्याबद्दल मी त्याला कधीच काही विचारले नाही. तरी ही त्याचा परिणाम त्याच्या अभ्यासावर होताना दिसत नव्हता. तो वर्गातील हुशार विद्यार्थीच होता पण कदाचित त्याने स्वतःच स्वतःला हुशार विद्यार्थ्यांच्या स्पर्धेतून बाजूला

केल होत. शाळेय अभ्यासातील यशा-अपयशाशी त्याला कदाचित फारस देण-घेण राहिल नव्हंत. आपली आर्थिक स्थिती सुधारण्याच्या वेडाने त्याला झपाटलेले होते. ओले कडधान्य, नारळ, अंडी, कांदे – बटाटे विकता -विकता त्याने दहावीची परिक्षा दिली दहावीला त्याला चौसष्ठ टक्के गुण मिळाले. तेंव्हा त्याला त्या गूणांच्या आधारावर कोणत्याही शाखेत प्रवेश मिळणे शक्य होते. त्यानंतर तो अचानक गायबच झाला त्यानंतर तो काय करतो ? कसलाच थांग पत्ता लागत नव्हता. जेंव्हा लागला तेंव्हा आमच्या सगळ्यांपेक्षा वेगळ्या जगात तो रमला होता. ज्या जगात प्रवेश करण्याची आंम्ही कल्पनाही करू शकत नव्हतो. आज त्याच्या अस्तित्वाची लाखो लोक दखल घेतात. वर्तमानपत्रात पहिल्या पानावर त्याचे फोटो झळकतात. आज त्याला आमचा मित्र म्हवून घ्यायला आंम्हाला अभिमान वाटतो पण आज त्याला आंम्हाला आपला मित्र म्हवून घ्यायला आवडेल का ? कदाचित नाही ? म्हूनच त्याने आमच्या संपर्कात पुन्हा येण्याचा कधीच स्वतःहून प्रयत्न केला नाही. दे तो फोटो माझ्याकडे मी सांभाळून ठेवतो म्हणताच , प्रतिभाने तो फोटो मनात नसतानाही दादाच्या अर्थात प्रणयच्या हातात दिला. त्या फोटोकडे पाहत प्रणय म्हाला. निदान हा फोटो इतरांना दाखवून मला म्हता तरी येईल की विजय माझा खूप जवळचा मित्र आहे.

प्रतिभाची वाट पाहत विजयच बसस्टॅापवर थांबण आता थांबल होत. विजय प्रतिभाला आता दिसतही नव्हता. पण आता प्रतिभाला त्याच्यापर्यंत पोहचण अवघड नव्हत कारण विजय आता कोठेही असला तरी त्याच्यापर्यंत पोहचण तिला सहज शक्य होत. प्रतिभाने पस्तकाच्या दुकानातून विजयचा एक कवितासंग्रह विकत घेतला. त्याच्यावर त्याचा पत्ता आणि मोबाईल नंबरही छापलेला होता. तिच्या मनात विजयबद्दल प्रेम होत की नाही ते तिला निटस कळत नव्हत पण ती त्याच्याबद्दल जाणून घेण्यास प्रचंड उत्साही होती. तो आपल्या दादाचा मित्र आहे हे कळल्यावर आपण अर्धी लढाई न लढताच जिंकली असही प्रतिभाला नराहून वाटत होत. प्रतिभाने हिंमत करून विजयला फोन केला आणि म्हाली,'' हॅलो मी प्रतिभा चव्हाण बोलतेय मला तुम्हाला भेटायचय. काही खास काम आहे का ? या विजयच्या प्रश्नाला उत्तर देत ती म्हणाली,''सहजच तुमची इच्छा असेल तर. त्यावर विजय तिला म्हाला, उद्या सकाळी १० वाजता माझ्या ऑफीसात ये मी पत्ता तुला एस.एम.एस. करतो आणि त्याने मोबाइल कट केला. प्रतिभाच्या मोबाईलवर आलेला विजयचा ऑफीसचा पत्ता तिला माहित होता. ठरल्या प्रमाणे प्रतिभा त्याला भेटायला त्याच्या ऑफिसात गेली. ऑफिसात पाऊल ठेवताच विजय त्या ऑफिसात बॉस आहे हे तिच्या लक्षात आले. विजयच्या कॅबिनमध्ये जाण्यापूर्वी तिने दरवाजा ठोठावला ! समोर आराम खुर्चीत बसलेल्या विजयचा थाट एखादया मोठ्या बिझनेसमॅनसारखा होता. त्याने प्रतिभाला समोरच्या खूर्चीत बसण्याची विनंती केली. ती बसताच त्याने फोन करून दोन कप कॉफी मागविली प्रतिभा काही बोलण्यापूर्वीच त्याने प्रतिभाला प्रश्न केला ? प्रणय कसा आहे ? त्याची बायको मुल कशी आहेत ? तुझी ताई सोनल कशी आहे ? आई-बाबा गावीच असतात ना ? की सध्या इकडेच राहायला आलेत ? तुझी वहिणी दिसलेली एक- दोनदा प्रवासात पण बहुदा मला ती प्रणयचा मित्र म्हून ओळखत नसावी. इतक्यात! विजयला कोणाचा तरी फोन आला त्याचा पारा अचानक चढला आणि एखाद्या मोठ्या बिझनेसमनसारखाच तो तावातावाने बोलू लागला तेंव्हा त्याच्यातला लेखक लोप पावल्यासारखा दिसत होता. त्याच्या नजरेत इतकी आग होती की त्या आगीनेच एखादा भस्मसात व्हावा. प्रतिभाला तर आता त्याची भितीच वाटू लागली होती. फोन कट करताच त्याच्या चेहर्यावर पुन्हा शांत निर्मळ हसू उमटल होत. त्याने प्रतिभाला सहज प्रश्न केला माझ्याशी तुला काही तरी बोलायच होत ना ? त्यावर प्रतिभा म्हाली,'' मला कालच दादा कडून कळल की तू दादाचा मित्र आहेस ? त्याने तुझ्याबद्दल बरच काही सांगितल ते ऐकल्यावर तुझ्याशी बोलाव अस वाटल इतकच. अचानक प्रतिभाची नजर विजयने हातावर रेखाटलेल्या नागाच्या चित्रावर स्थिरावली. तू ही एकच चित्र नेहमीच हातावर का रेखाटतोस ? त्यावर विजय म्हाला माझ्यातील चित्रकाराला जिवंत ठेवण्यासाठी. विजयने एका वाक्यात उत्तर दिल्यावर काय बोलावं ते प्रतिभाला सुचतच नव्हत म्हून ती म्हाली, दादा म्हत होता तू एक चांगला चित्रकारही आहेस मग तू स्वतःच काढलेले एखादे चित्र फ्रेम करून तुझ्या कॅबिनमध्ये का लावल नाहीस ? त्यावर विजय म्हाला,'' माझ्यातील चित्रकार आजही जीवंत आहे पण जागा नाही. माझ्यातील प्रियकरासारखा ! माझ्यातील प्रियकर जसा कोणाला दिसत नाही तसाच माझ्यातील चित्रकारही

कोणाला दिसावा अशी माझी इच्छा नाही. तू प्रणयची बहिण असल्यामुळे तुझ्याबद्दल माझ्या मनात आदर आहे. तुझ्याशी चर्चा मी तुझ्यासाठी नाही तर प्रणयच्या मैत्रीखातर करतोय. त्याला वाटत असेल की मी त्याला विसरलोय पण तस नाही भर रस्त्यातही त्याने मला माझ्या नावाने हाक मारली असती तर धावत जावून मी त्याला मिठी मारली असती. तो त्याच्या आयुष्यात आणि मी माझ्या आयुष्यात सुखी असताना उगाच कशाला एकमेकांच्या आयुष्यात ढवळा ढवळ करायची. तुझ्या जीवनातही मला ढवळा- ढवळ करायची नव्हती. पण ती कविता ढवळे मध्येच टपकली आणि तुझ्या डोक्यात तिने नको – नको ते भरवल. म्हणजे तू कविताला ओळखतोस ? त्या दिवशी मी विचारल तेंव्हा माझ्याशी खोट का बोललास ? तरी मला शंका होतीच की तुंम्ही दोघे एकमेकांना ओळखत असाल म्हणून ! तुमच्यात नक्की कोणत्या प्रकारच नात होतं ? मला जाणून घ्यायला आवडेल. त्यावर विजय म्हणाला ऐरवी हे मी कोणालाच सांगितल नसत पण तू प्रणयची बहिण आहेस आणि मलाही तुला आता माझी मैत्रिण मानायला काही हरकत नाही याची खात्री पटल्यामुळेच सांगतो. शाळेत मी कसा होतो वगैरे बद्दल प्रणयने तुला सारं सांगितल असेलच त्यामुळे त्याच्या खोळात न जाता जे प्रणयलाही माहित नाही ते मी तुला सांगणार आहे. दहाविला मला चौसष्ठ टक्के गुण मिळाले. त्यावेळची आमच्या घरची आर्थिक स्थिती फारच बिकट होती. अगदी खाण्या- पिण्याचेही वांदे होते असं म्हटल तरी चालेल. प्रणय तुला म्हणाला असेल मी त्याला ही माझ्या घरी कधीच घेऊन गेलो नाही. कसं घेऊन जाणार ? मी जेथे राहत होतो त्याला घर म्हणावं की नाही हा माझ्यासाठी एक प्रश्न होता. घराच्या चारही भिंतीचा प्लास्टर निघालेला, खालचा कोबा जागोजागी तुटलेला, छप्पर मध्येच वाकलेल, त्याला आधार म्हणून मधोमध उभा केलेला खांब . घरात टेबल, खूर्ची, कपाट तर सोडाच साधी चटईही नव्हती. घरी कोणी आलाच तर त्याच्यासाठी गोड-धोड काय करणार ? तेंव्हा आम्हीच चटनी- भाकरीलाही महाग झालो होतो. आंम्ही म्हणजे मी आमचे आई-वडिल, माझे दोन भाऊ आणि एक बहिण. मी जेंव्हा १० वी पास झालो तेंव्हा मी १६ वर्षांचा होतो. त्यावेळी मी माझ्या कुटूंबचा आर्थिक भार माझ्या खांद्यावर घेण्याचा निर्णय घेतला आणि एका अभियांत्रिकी कारखाण्यात कामाला राहिलो. त्या कारखाण्यात तेंव्हा मला ३० रूपये रोज मिळायचा. पण मागच्या चार वर्षात भोगलेल्या सर्व हाल आपेष्टांचा त्या कारखाण्यात पाऊल ठेवताच अंत झाला होता. आजही आठवितो मला तो दिवस जेंव्हा मी पहिल्यांदा त्या कारखाण्यात पाऊल ठेवलं होत. त्यापूर्वी एका रात्र महाविद्यालयात प्रवेश घेतला होता त्याबद्दलही त्या कारखाण्याच्या मालकाला ही सांगितल होत. त्या कारखान्यात लेथ मशिन , कटींग मशिन, मिलींग मशिन, शेपिंग मशिन ड्रिलिंग मशिन, इनग्रेविंग मशिन, होत्या. शाळेत असताना गणित आणि विज्ञान हे माझे आवडते विषय त्यामुळे या यंत्रात मी रमणार याची मला खात्री होती. कारखाण्यात झाडू मारण्यापासून माझ्या कामाची सुरूवात झाली. त्यामुळे मी आजही म्हणतो ईश्वराने माझ्याकडून सारे काही हेरावून घेतले तरी मी उपाशी मरणार नाही कारण मला झाडू मारता येते. झाडू मारणे हे कमीपणाचे काम नाही हे मी त्या कारखान्यात शिकलो. त्या कारखाण्यात माझ्या सोबत काम करणारे सारेच कामगार खुप प्रेमळ होते त्यांनी माझ्या बर्याच चुका पोटात घातल्या होत्या त्याबदल्यात मी ही त्यांना बरीच मदत करायचो. गुरू आपल्या शिक्षाला बावन्नावा हात शिकवित नाही असं म्हणतात पण या क्षेत्रातील माझ्या गुरूंनी मला बावन्नावा हातही शिकविला. त्यांच्या जीवनभराचा अनुभव माझ्या सोबत वाटला. त्यांच्यामुळेच यंत्रावर स्वार कसं व्हायच ते मी शिकलो. त्याचबरोबर कसलीच तमा न बाळगता सांभाळता रात्र-दिवस काम कसे करायचे हे मी त्यांच्याकडून शिकलो. त्या कारखाण्यात काम करता-करता माझं रात्र महाविद्यालयातील शिक्षणही सुरू होत. बारावीला मला दोन विषयात अपयश आलं आणि मी शिक्षणाला राम राम ठोकला. पण माझं वाचन लेखण सुरूच होत त्यात मी खंड पडू दिला नाही. माझ विचार करण आणि ते विचार लिहून काढण सुरूच हेत. एका नामांकित वर्तमानपत्रात माझी पत्रे माझी मते, माझे विचार प्रकाशित होऊ लागले. मी लिहलेली एक कविता एका वर्तमानपत्रात प्रकाशित झाली आणि त्यानंतर माझ कविता लेखण सुरू झाल जे आजही अव्याहतपणे सुरूच आहे. कथा मी लिहायचो पण वर्षाला एक-दोनच त्याही नामांकीत दिवाळी अंकात प्रकाशित व्हायच्या. माझे लिखाण प्रकाशित करण्यासाठी मला कधीच धावपळ करावी लागली नाही. कारखाण्यात पाऊल ठेवताच मी लेखक राहत नसे आणि कारखाण्यातून बाहेर पडल्यावर मी कामगार नसे. असे दुहेरी जीवन मी जवळपास दहा-एक वर्षे जगलो या दरम्यान कविता माझ्या

आयुष्यात आली होती. माझ्यासाठी ती माझ्या स्वप्नातील परीसारखी होती. ती एका राजकुमाराच्या शोधात असावी कदाचित ! पण मी मात्र त्यावेळी कफल्लक कारखाण्यात रोजंदारीवर काम करणारा एक सामान्य कामगार होतो आणि ती पदवीधर गोरीपान गालावर तीळ असणारी करड्या केसांची श्रीमंत घरात लहानाची मोठी झालेली एक राजकुमारी होती. चार-पाच वर्षापूर्वी आता काही महिन्यांपूर्वी मी तुझी वाट पाहत बसस्टॉपवर थांबायचो तशीच तिची ही वाट पाहत थांबायचो एक तास नाही एकदा तर चक्क तीन तास तिची वाट पाहत थांबलो होतो. काल परवा तू जस मला वेड्यात काढल होतस तसं तिनही काढल होत. तिने विचार केला हया कारखाण्यात काम कारणा-या मामुली तरूणाच्या का प्रेमात पडावं ? पण तेंव्हाही माझ्या मागेपुढे घुटमळणार्या मुलींची संख्या कमी नव्हती. हे ती जाणून होती. मी तिच्यासाठी बसस्टॉपवर थांबतो हे तिच्या लक्षात आलं होत पण तिला त्याची फिकर नव्हती. मला वाटत तिने कदाचित मनात ठरवूनच टाकल होत की मी जेंव्हा हिंमत करून तिला प्रेमाबद्दल विचारेन तेंव्हाच हयाच काय करायचं ते पाहू. कारखाण्या बाहेरच्या जगात मला खुप मानसन्मान होता, तो मी कोणत्याही परिस्थितीत हिच्यासाठी गमावू शकत नव्हतो. कारखाण्याबाहेरच्या जगात मी एक असामान्य व्यक्ती होतो. ती मला आवडायची पण माझ्या मनात तिच्याबद्दल अजिबातच शारिरीक आकर्षण नव्हत. तिच्या सौंदर्यापेक्षाही तिच्या स्वभावाने मला भुरळ घातली होती. पण नंतर तिचा वास्तविक स्वभाव जस जसा उलगडत गेला तसतशी ती माझ्या मनातून उतरू लागली... आज तू जशी माझ्या बद्दल जाणून घेण्यास उत्सूक आहेस तशी ती ही उत्सूक आहे. पण तिच्यात आणि तुझ्यात एक महत्वाचा फरक आहे तो म्हजे तू माझ्या मित्राची बहिण आहेस. पूर्वी मी जशी तिची वाट पाहत उभा राहायचो तशी तुझी ही वाट पाहत मी उभा राहतो हे कळल्यावर तिने विचार केला की मी तिच्यासमोर माझ्या प्रेमाचा प्रस्ताव मांडला नाही म्हणजे मी तुझ्यासमोरही माझ्या प्रेमाचा प्रस्ताव मांडणार नाही. तिने तेंव्हा जर माझ्या समोर तिच्या माझ्यावरील प्रेमाचा चुकून प्रस्ताव मांडला असता तर माझं उत्तर काय असेल याचा अंदाज बांधण्यासाठी उत्सूक असणार्या तिने तुला पुढे केल. पण मी तुला ओळखतो हे तिला माहित नव्हत. आज मी जो कोणी आहे त्याच तिला आकर्षण आहे. मला माझ्यावर मी कोणीही नसताना प्रेम करणारं कोणी तरी हवं होत. मी काही नसतानाही माझ्यावर जिवापाड प्रेम करणार्याही बर्याच होत्या. त्यामुळे मी कविता सारखीच्या प्रेमाचा स्विकार करून त्यांच्यावर नकळत अन्याय करून त्यांच्या माझ्यावरील प्रेमाचा अपमान नाही करू शकत.

कविताने आपला बकरा केला याचा प्रतिभाला भयंकर राग आला होता. पण त्याचवेळी प्रतिभाने दुसर्या बाजूने ही विचार केला जे झालं ते बरंच झालं. नाहीतर विजयशी आपली ओळख अशी नव्याने कधीच झाली नसती. त्याबद्दल कविताचे आभारच मानायला हवेत. अचानक विचार करता - करता प्रतिभाची नजर भिंतीवरील घड्यालाकडे गेली दुपारचे बारा वाजले होते. जेवनाची वेळ झाली होती ती विजयला म्हाली,'' चल विजय ! मी निघते परत येईन कधीतरी तुला भेटायला पुन्हा. त्यावर विजय प्रतिभाला म्हाला,'' मी येतो ना ! तुला सोडायला बसस्टॉपर्यंत. त्यावर प्रतिभाने गालात मंद स्मित करताच तो ही निघाला तिच्यासोबत. त्याच्या सोबत चालताना प्रतिभाला स्वतःचाच अभिमान वाटत होता. हे असं वाटणं आयुष्यात खूप महत्वाच असत. त्याच्या सोबत चालताना तिची मान ताट होती. तिच्यावर कसलच दडपण नव्हत. चालता- चालता प्रतिभाच्या मनात विचार आला,'' आता पाच मिनिटे चालताना विजयने जशी आपल्याला सोबत दिली तशी सोबत त्याने आपल्याला आयुष्यभर दिली तर···

नेहमी सारखी प्रतिभा बसची वाट पाहत बसस्टॉपवर उभी होती इतक्यात तिची एक सोनल नावाची मैत्रिण त्याच बसस्टॉपवर आली. हात वगैरे मिळवून झाल्यावर तिने सरळ प्रतिभाला प्रश्न केला,'' तू त्या विजय जाधवला कशी काय ओळखतेस ? काल मी पाहिल तुला त्याच्या सोबत गप्पा मारताना. त्यावर प्रतिभा म्हाली,'' तो माझ्या दादाचा मित्र आहे. त्यावर सोनल म्हाली असं का ! तू त्याचा प्रेम नावाचा कथा संग्रह वाचलास का ? काय भन्नाट कथा लिहल्या आहेत त्यात त्याने, मला तर खूपच आवडल्या मला की नाही त्या पुस्तकावर त्याची सही घ्यायची होती. मला तर वाटत त्या कथा संग्रहातील पंदरा कथा त्याने पंदरा जणींवर लिहल्या असतील. पुस्तकाच्या सुरूवातीला मनोगतात लिहलय की कथा काल्पनिक आहेत पण त्या वाचल्यावर तस

अजिबातच वाटत नाही. मला खात्री आहे त्या कथा काल्पनिक नसणार ए ! तू खात्री करून घे ना आणि प्लीज या पुस्तकावर माझ्यासाठी त्याची सही घेऊन ठेव. आपण पुन्हा येथेच भेटू तेंव्हा मला हे पुस्तक परत दे हा ! माझा मोबाईल नंबर तर आहेच ना तुझ्याकडे ! म्हणून सोनल निघून गेल्यावर प्रतिभा काही वेळ तिथेच बसस्टॉपवर स्वतः शिच विचार करत उभी राहिली. घरी गेल्यावर तिने तो कथा संग्रह प्रणयच्या हातात देत ती त्याला म्हणाली,'' हे घे तुझ्या मित्रचं पुस्तक माझ्या मैत्रिणीकडून घेतलय वाचायला. ते पुस्तक पाहून प्रणयला खूपच आनंद झाला, प्रतिभाच्या घरातील जवळ - जवळ सर्वांनी त्या पुस्तकावरून नजर फिरवली सर्वांनाच ते पुस्तक खूपच आवडले. सर्वांनी त्या पुस्तकाची तोंड भरून स्तुती केली. प्रतिभाने झोपण्यापुर्वी ते पुस्तक प्रणय कडून वाचायला घेतल. विजयने लिहलेल्या प्रत्येक कथेतील नायिकेत ती स्वतःला शोधण्याचा प्रयत्न करू लागली. एखादा प्रियकर आपल्या प्रेयसीवर इतक प्रेम करूच कसा शकतो तेच तिला कळत नव्हतं. कोणावर तरी प्रेम केल्याखेरीज हे असं इतक सुंदर प्रेमावर लिहण केवळ अशक्य ! म्हणजे सोनल बोलत होती ते खर असणार का ? तिच्या आयुष्यात पहिल्यांदा तिने कोणतही पुस्तक संपूर्ण एका दमात वाचल होत. प्रेमात हे असही होऊ शकत हे तिला नव्यानेच उमगल होत. त्याच्याच दुसर्या दिवशी ते पस्तक सोबत घेऊन प्रतिभा विजयच्या कार्यालयात अचानक धडकली. त्यावेळी विजय त्याच्या सहकार्यां सोबत चर्चा करीत होता. तिला समोरच्या खूर्चीत डोळ्यानेच बसायला सांगून हाताच्या बोटांनी पाच मिनिटे थांबायला सांगितले. चर्चा संपवून त्याचे सहकारी बहेर गेल्यावर विजयने प्रतिभाला त्याच्या समोरच्या खूर्चीत बसायला सांगितले. खूर्चीत बसताच प्रतिभाने विजयचा कथा संग्रह विजयच्या समोर ठेवत ती त्याला म्हाली,'' माझी एक मैत्रिण आहे सोनल मोरे तिला यावर तुझी सही हवी आहे. त्या पुस्तकावर विजयने सोनल मोरे हिस सस्नेह भेट लिहून त्याखाली सही केली. आणि सही करून ते पुस्तक पुन्हा प्रतिभाच्या हातात देत तो म्हाला, तू वाचलस का हे पुस्तक ? त्यावर प्रतिभा किंचित रागाने हो म्हटल्यावर विजयने फोन करून थंडा मागविला तो येताच प्रतिभाला म्हाला थंडा घ्या ! म्हजे तुमचा राग थोडा थंड होईल. तुला कसं माहित मला राग आला आहे ते ? त्यावर विजय म्हाला,'' तुला राग आला आहे हे तुझा चेहराच सांगतोय ! तुला हे पस्तक वाचल्यावर राग आला नसता तर मला आश्चर्य वाटल असत. आता तुझ्या डोक्यात असंख्य प्रश्नांच काहूर माजल असेल. काही प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी तू बेचैन झाली असशिल. घाबरू नकोस मी तुझ्या सर्वच्या सर्व प्रश्नांची समाधान कारक उत्तरे देईन. त्यावर प्रतिभा गालातल्या गालात गोड हसली आणि विजयला म्हाली,'' सोनलला वाटत की या पुस्तकातील सर्वच्या सर्व कथा वास्तविक आहेत आणि या कथा लिहणार्या,च्या आयुष्यात या कथांमधील सर्व नायिका येऊन गेलेल्या असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यावर विजय म्हाला,'' तुझी मैत्रिण सोनल म्हाली,'' तशी माझी दहा – पंधरा प्रेमप्रकरणे असली तर तुला काय फरक पडतो ? मी तर तुझा फक्त मित्र आहे प्रियकर नाही ना ? त्यावर प्रतिभा म्हाली,'' तू जरी माझं प्रेम नाकारल असलस तरी मी तुझा तो नकार अजून स्विकारलेला नाही. तेंव्हा विजय म्हाला,'' मी तेंव्हा तुला नकार का दिला याच स्पष्टीकरण मला वाटत मी तुला दिलयं. त्यावर प्रतिभाने मानेनेच होकार दिला. त्या कथा संग्रहाविषयी प्रतिभाला स्पष्टीकरण देत विजय म्हणाला,'' हे बघ प्रतिभा आपल्या सभोवताली वावरणारी माणसे आणि त्यांच्या मध्ये होणारा संवाद आणि त्यांच्या आयुष्यात घडणार्या घटनामुळे त्यांच्या आयुष्यात त्या घटनेचे उमटणारे पडसाद यांची मिळुन कथा होत असते. कोणत्याही कथेचा जन्म तुझ्या- माझ्या अगदी रस्त्यावरच्या भिकार्यांच्या आयुष्यात ही होत असतो . पण ती कथा प्रत्यक्षात आकारात येताना जो पाहतो आणि ती कागदावर उतरवतो तो कथा लेखक असतो. प्रत्येक काल्पनिक कथाही वास्तवाचचं प्रतिबिंब असत. जो कथा लेखक कथेतील पात्र स्वतः जगतो तेंव्हा त्याची कथा वाचकांना वाचताना वास्तववादी वाटते. मी ही तेच करतो माझ्या आयुष्यातील सभोवतालच्या व्यक्तींच्या आयुष्यात घडलेले प्रेम प्रसंग, प्रेम प्रकरणे, प्रेम भंग माझ्या कथेच खाद्य ठरत. मला सांग तुझ्या मैत्रिणींच्या म्हण्या प्रमाणे जर मी खरोखरच इतक्या जणींच्या प्रेमात पडलो असतो तर आता पर्यंत अविवाहीत राहिलो असतो का ? तुझी वाट पाहत ! हे ऐकून न ऐकल्यासारख करत प्रतिभा म्हाली,'' काय म्हालास आता ! मी नीट ऐकल नाही. त्यावर विजय काही नाही म्हटल्यावर ही प्रतिभाच्या मनात आनंदाचे लाडू फूटत होते. पण स्वतःला आवरत ती विजयला म्हाली,'' माझ्या सोबत जरा खरेदिला येतोस का ? उद्या दादाच्या

मुलाचा वाढदिवस आहे त्याच्यासाठी एक भेट घ्यायची आहे ! त्यावर विजय ठिक आहे म्हणताच, प्रतिभाला खूप आनंद झाला त्याने आपल्या एका सहकार्यायला बोलावून त्याच्याकडे ऑफीसच्या गाडीची चावी मागितली,'' विजयकडे गाडीही आहे याचे प्रतिभाला आश्चर्य वाटले. कारण विजय ती गाडी स्वतः कधीच वापरत नसे. स्वतः बसने प्रवास करीत असे. खरेदी झाल्यावर त्याने गाडीने प्रतिभाला घरापर्यंत सोडले असता प्रतिभा विजयला म्हणाली ,'' घरी बोलावले असते पण दादाला अजून माहीत नाही की मी तुला ओळखते ते. त्यावर विजय गोड हसला. दुसर्या दिवशी प्रणयच्या मुलाच्या वाढदिवसाच्या दिवशी विजय अचानक प्रतिभाच्या घरी टपकल्यावर प्रतिभाच्या पायाखालची जमीनच सरकली. विजयला पाहताच प्रणय धावत पुढे गेला आणि त्याने विजयला आपल्या मिठीत भरून घेतल. प्रतिभासह सर्वांशी त्याने त्याची ओळख करून दिली. प्रतिभाने त्याच्या हातात सरबत देताना त्याने हळूच तिचा हात पकडला. क्षणभर ती घाबरली पण नंतर सावरली कोण पाहत नाही असं दिसल्यावर. वाढदिवसाला आलेले जवळ - जवळ सर्वच जण विजयशी गप्पा मारण्यास उत्सूक होते. त्यामुळे प्रतिभाला त्याच्याशी बोलताच येत नव्हते. सर्व पाहुणे मंडळी जेवून निघून गेल्यावर प्रणय आणि विजय जेवायला बसल्यावर प्रतिभाची वहिणी विजयला म्हणाली, आई-बाबा आणि निलम आणि बाकी सगळे कसे आहेत ? निलम मध्ये एकदा रस्त्यात भेटली होती सोबत तिचा मुलगाही होता. प्रतिभाला आपल्य वहिणी आणि विजय यांच्या दरम्यानच्या बोलण्यातून वेगळाच सुर ऐकू येत होता. प्रतिभा विजयला कोशिंबीर वाढणार तोच ती प्रतिभाला म्हणाली,'' त्याल कोशिंबीर नको वाढू त्याला नाही आवडत आणि कोबीची भाजीही नको वाढू ! भात नावाला वाढ ! इतक्या सुचना ऐकल्यावर प्रतिभाच्या लक्षात आले की आपली वहिणी विजयला अगोदर पासूनच ओळखते आणि फक्त ओळखत नाही तर चांगली ओळखते. इतकी चांगली की तिला त्याच्या खाण्या-पिण्याच्याही सर्व सवयी माहीत आहेत. जेवन वगैरे झाल्यावर प्रणयने विजयला प्रश्न केला,'' काय मग विजय लग्न कधी करतोयस ? कोणी लेखिका भेटली की नाही ? तुझ्या कथेतील सर्व नायिका लग्न करून मोकळ्या झाल्या की काय ? त्यावर मनिषा प्रतिभाची वहिनी प्रणयला रागावत म्हणाली,'' तुंम्ही ना काही ही बोलता, तो तसा नाही. मी त्याला तुमच्याहून चांगल ओळखते. विजय जायला निघताच प्रणय त्या ला सोडायला गाडी पर्यंत जाणार होता या दरम्यान प्रतिभाने त्याला हाताच्या खूनेने फोन करायला सांगितले होते ते मनिषाने पाहिले. विजय निघून जाताच मनिषाने प्रतिभाला बाजूला घेतले आणि तिला प्रश्न केला तू विजयला ओळखतेस ना ? त्यावर प्रतिभा नाही ! म्हणताच मनिषा तिला म्हणाली,'' खोट बोलू नकोस मी तू त्याला हाताच्या खूनेने फोन करायला सांगताना पाहिलयं ! इतकयात फोन वाजल्यावर प्रतिभाने फोन कानाला लावला आणि हू ! करून कट केला आणि मनिषाला ती म्हणाली, हो ! मी विजयला ओळखते आणि माझं त्याच्यावर प्रेम आहे. ते ऐकल्यावर मनिषा प्रतिभाला मिठी मारत म्हणाली,'' तुला मानल पाहिजे शेवटी तू पाषाणालाही पाझर फोडलसं ! माझ्या दादाला प्रेमात पाडलस ! आज मला खूप आनंद झाला आहे. इतका की मी शब्दात व्यक्त करू शकत नाही. आता मी माझ्या हक्काच्या घरात पाऊल ठेऊ शकते. त्यावर प्रतिभा चक्रावून मनिषाला म्हणाली,'' हे काय चाललय वहिनी ? मला समजेल अशा भाषेत काही सांगशिल का प्लीज,'' त्यावर स्वतःला सावरत मनिषा प्रतिभाल म्हणाली,'' विजय माझा चुलत भाऊ आहे आंम्ही लहानाचे मोठे एकत्रच झालो माझ्या कडून त्याच्या खूप अपेक्षा होत्या पण मी तुझ्या दादाच्या प्रेमात पडले आणि तो माझ्यापासून दुरावला आमच्यात कडाक्याच भांडण झाल रागाच्या भरात मी त्याला म्हणाले,'' आता तू जेंव्हा कोणाच्यातरी प्रेमात पडून लग्न करशिल आणि मला स्वतःहून आपल्या घरी बोलावशील तेंव्हाच मी आपल्या घरात पाऊल ठेवीन. पण त्यावेळी मला माहित नव्हत की प्रणय विजयचा जिवलग मित्र आहे ते. आंम्ही कोर्टात जावून लग्न केल आमच्या लग्नलाही तो आला नव्हता. त्यानंतर आंम्ही सतत एकमेकांना टाळतच राहिलो. त्याच्याबद्दल मी प्रणयलाही कधीच काही सांगितल नाही. इतक्यात तेथे प्रणय आल्यावर दोघींच्याही डोळ्यातील अश्रू पाहून विजय म्हणाला,'' आज नंणद आणि वहिणीच प्रेम इतक ओतू का जातय ? त्यावर प्रतिभा प्रणयला म्हणाली दादा तुला माहित आहे का ! विजय वहिणीचा भाऊ आहे ! म्हणजे तुझा मेव्हुणा आहे. त्यावर चेहर्यातवर कोणताही भाव न आणता प्रणय म्हाला ,'' हो मला माहित आहे आणि विजयलाही ते माहित आहे म्हणूनच तो मनिषाच्या बाबतीत इतका निर्धास्त होता पण मनिषाला वाटत होत की तो तिला विसरला पण तस नव्हत तो बाहेरून नेहमीच तिची माहिती

मिळवित होता आंम्हाला कधीही गरज भासली असती तर तो नक्कीच धावून आला असता. हे जर मला माहित नसत तर आपल्या मित्राच्या आवडी-निवडी आपल्या बायकोला माहित आहेत हे कळल्यावर मला राग नसता का आला ? आपल्या लग्नापूर्वी तुमच्या दोघात झालेल्या भांडणाबद्दल मला माहित होत म्हूनच मी त्याला कधीच आपल्या घरापर्यंत येवू दिल नाही. मला हे ही माहित आहे की प्रतिभा त्याच्या प्रेमात पड्लेली आहे. नाहीतर मी आजही त्याला आग्रह करून घरी बोलावल नसत. ज्या दिवशी प्रतिभा विजयच्या कथेच पुस्तक वाचायला घरी घेऊन आली त्याच दिवशी प्रतिभाच्या खोलीची लाईट रात्रभर चालू होती. बोर्डाच्या परिक्षेलाही रात्रभर जागून अभ्यास न करणारी माझी बहिणी एक कथेच पस्तक रात्रभर जागून का वाचेल ? तुंम्ही विचारल का त्याबद्दल त्याला ? या मनिषाला प्रश्नाला उत्तर देत विजय म्हणाला,'' मी मुद्दामच नाही विचारल ! त्यालाही कळूदे प्रेमात पडल्यावर काय काय होत आणि काय काय कराव लागत ते ? हे ऐकल्यावर प्रतिभा लाजून आपल्या खोलीत निघून गेल्यावर मनिषाने प्रणयला आपल्या मिठीत घेतल आणि तिने आपल्या बर्या च वर्षापासून डोळ्यात साचलेल्या अश्रूंना बाहेर पडायला वाट मोकळी करून दिली.

त्यानंतर एका रविवारी प्रतिभा विजयला एका बागेत भेटली. बोलता - बोलता तिने विजयला अगदी सहज प्रश्न केला,'' मी प्रणयची तुझ्या मित्राची बहिणीची आणि तुझ्या लाडक्या बहिणीची लाडकी ननंद नसते तर तर तू माझ्या प्रेमाचा स्विकार केला असतास ? त्यावर विजय थोडा वेळ शांत बसला आणि विचार करून म्हाला,'' कदाचित नसता केला. याचा अर्थ तुझे माझ्यावर प्रेम नाही ? फक्त नात्यांच्या दबावाखाली तू माझ्य प्रेमाचा स्विकार केलास ? प्रेमाच्या बाबतीत तडजोड केलीस ? प्रतिभाच्या या प्रश्नांच्या भडिमाराला उत्तर देत विजय तिला म्हणाला,'' तुझं तरी माझ्यावर प्रेम कोठे होत ? माझ्याबद्दल सर्व काही जाणून – उमजून घेतल्यावरच तू माझ्याकडे आकर्षित झालीस ना ? या आकर्षणालाच जर तू प्रेम म्ह्त असशिल तर माझं तुझ्यावर प्रेम आहे. मग ! लोक प्रेमात जे आत्महत्या करतात ते काय असत ? या प्रतिभाच्या आणखी एका प्रश्नाला उत्तर देत विजय म्हाला,'' मनिषाच्या आणि तुझ्या दादाच्या प्रेमाला माझा कधीच विरोध नव्हता पण आमच्या घरच्यांचा होता म्हून तिने विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, तो यशस्वी झाला नाही पण जर यशस्वी झाला असता तर याचा विचार प्रेमात आंधल्या झालेल्या तिने तेंव्हा केलेला नव्हता. मला नेमका त्याचा भंयकर राग आला होता. तिच्या मुर्खपणामुळे कदाचित आंम्ही आणि प्रणयही तिला गमावून बसला असता. त्या रागाच्या भरातच आमच्यात भांडण झालं आणि ती दुरावली माझ्या पासून ती आता पर्यंत ! म्हून माझं तिच्यावरील प्रेम कमी झालेलं नव्हत. प्रेमासाठी आत्महत्या करणारे आणि त्यांना तस करण्यास प्रवृत्त करणारे काय साध्य करतात तेच कळत नाही म्हून मी मनिषाला मोकळ सोडल. मला व्यक्तीशः अस वाटत की प्रेम वगैरे नावाची कोणतीच गोष्ट या जगात अस्तित्वातच नाही हा सारा मेंदुचा खेळ आहे. आपल्यासाठी कोणत्याही गोष्टीशी तडजोड करणारी प्रसंगी आपल्यासाठी जीवाचं बलिदान ही दयायला तयार असणारी व्यक्ती आपल्यावर प्रेम करते असं आपण मानतो. सहवासाने शारीरिक आकर्षणातून प्रेम निर्माण होते. कधी – कधी संस्कार नीती-मूल्ये यांच्यावरही मात करून प्रेम मानसाला काही गोष्टी करायला भाग पाडते, ज्यातून निर्माण होतात अनैतिक संबंध. स्वतः ला गंगेपेक्षाही पवित्र मानणारे कित्येक ढोंगी मी पाहिले आहेत, ज्यांनी आपल्या भुतकाळात असंख्य चुका केलेल्या होत्या पण आज समाजात साधू असल्याचा आव आणत होते. आज एका कुशीतून उटले की लगेच दुसर्यात कुशीत विसावणारे मी कित्येक आपल्या आजूबाजूला पाहत आहे. आता तू माझी बायको होणार आहेस त्यामुळे माझ्या भुतकाळा विषयी माझ्या कुटूंबाविषयी तुला सर्व माहिती असणे गरजेचे आहे. आज जेंव्हा तू माझ्याकडे पाहतेस तेंव्हा तुला दिसतो एक इतरांपेक्षा वेगळा असामान्य माणूस. प्रणय कडून तुझ्या वहिणी कडून तुला जे कळल असेल त्यापेक्षाही भयंकर परिस्थितीतून मी गेलेलो आहे. माझ्या जन्माला कारण असणार्याअ माझ्या आई- वडिलांचा जन्म कोकणातील एका छोट्याश्या खेड्यात झाला होता. त्यावेळी म्हजे तीस-चाळीस वर्षापूर्वी कोकणातील घरे दगड – मातीची असत. त्यावेळी सातवी पर्यंतची शाळा गावात आणि त्यापुढची शाळा तालुक्याच्या ठिकाणी असे. त्यावेळी गावातील गरीब लोकांच्या मुलांना तालूक्याच्या ठिकाणी शिकायला जाणे आर्थिक दृष्ट्या शक्य होत नसे त्यामुळे त्यांना सातवीला शिक्षण सोडावी लागत असे, त्यानंतर ते विद्यार्थी पोटापाण्यासाठी मुंबईचा रस्ता धरत. आमचे वडील

सातवी पर्यंत शिकले, सातवीला असे पर्यंत त्यांनी वर्गात पहिला नंबर कधीच सोडला नाही आणि आंम्हाला तो कधी धरताच आला नाही आंम्ही फार - फार तिसर्यान नंबर पर्यंत मजल मारली. आमची आई तिला शाळेच्या पहिल्याच दिवशी शिक्षकांनी मारल म्हून शाळेतच गेली नाही आणि अशिक्षीत राहिली पण नंतर कधी तरी आपण अशिक्षीत राहिल्याची खंत तिच्या मनात निर्माण झाली असावी. म्हून सुरूवातीला आमच्या शिक्षणाबाबत ती फारच आग्रही होती पण नंतर परिस्थितीपुढे तिलाही गुडगे टेकावे लागलेच. आमच्या आई - बाबांचा प्रेमविवाह झाला होता ते ही आंम्हाला कित्येक वर्षानंतर इकडचे - तिकडचे संदर्भ जोडल्यानंतर कळले होते. त्याबद्दल चर्चा करावी इतके मैत्रिपूर्ण संबंध आमचे आमच्या आई-वडिलांसोबत कधीच नव्हते. बाबा कामानिमित्त सुरूवातीला मुंबईला आल्यानंतर एका महिन्यात जवळ पास वीस –एक हॉटेलात त्यांनी काम केले त्यानंतर एका होलसेलच्या लिंबाच्या दुकानात ते स्थिरावले. त्यांना लोक लिंबूवाले शेट म्हून ओळखू लागले. स्वतःला शेट म्हवून घेताना त्यांना तेंव्हा अभिमान वाटायचा पण नंतर काही वर्षांनी शेट कायमचा निघून गेला आणि वालेच्या पुढे वस्तूंची नावे बदलत राहिली. माझा जन्म झाला तेंव्हा मी मांजराच्या पिल्लासारखा छोटासा होतो. माझ्या अंगावर दाट केस होते. मी जगेन की नाही याबद्लही बर्यायच लोकांच्या मनात शंका होती. मी इतका किरकोळ बांध्याचा होतो की मी कधी धष्ट-पुष्ट होईन की नाही याबद्ल ही लोकांच्या मनात शंका होती. माझ्या आईने माझ्या अंगाला चण्याच्या डाळीचे पीट लावून लावून माझ्या अंगावरील केस विरळ केले. मी खुप सडपातल असल्यामुळे त्यावेळी कित्येक जण मला सुकड्या म्हायचे त्याचा मला कधीच राग येत नसे मी सुकड्या या शब्दाला माझं टोपणनाव म्हूनच स्विकारल होत. आजही माझ्या अंगावर दाट केस आहेत. मी एक दोन वर्षाचा असताना आई सोबत नदीवर गेलो होतो आणि खेळता खेळता नदीच्या पाण्यासोबत वाहून जाणार होतो तेंव्हा जवळच कपडे धुणार्याो काही तरूणींना मला वाहत जाताना पाहिल आणि वाचविले त्यांचे माझ्यावर अनंत उपकारच आहेत त्यामुळेच कदाचित मला पाण्याची भिती वाटत असावी. माझ्या नंतर माझ्या धाकट्या भावाचा अजयचा जन्म झाला तो लहान असतानाच त्याला पोलिओची लागण झाली आणि तो कायमचा अपंग झाला. आमच्या आईच आणि आमच्या आजीच पटत नसल्या कारणाने बाबा आंम्हा सर्वांना मुंबईला घेऊन आले ते कायमचेच. त्यांनंतरही आंम्ही मी पहिलीला असताना गावी राहायला गेलो होतो पण एकाद महिन्यातच पुन्हा मुंबईला आलो होतो. त्यानंतर निदान मी तरी पूर्णपणे मुंबईकर झालो त्यानंतर मी गावचा रस्ता विसरलो तो कायमचाच. त्यानंतर माझ्या धाकट्या भावाचा महेशचा आणि धाकट्या बहिणीचा निलमचा जन्म झाला. आमच्या बहिणीचा जन्म हा अपघात नव्हता तर आमच्या घरात एकही मुलगी नव्हती आणि आमच्या बाबांना एक मुलगी हवी होती मुलगा-मुलगी भेद न मानण्याची परंपरा आमच्या घरात तेंव्हाच सुरू झाली होती. आमच्या लहानपणी आमच्या बाबांकडे पैशाची काही कमी नव्हती त्यामुळे आंम्ही सर्व भावंडानी खाजगी शाळेत प्रवेश घेतला होता. मी सातवीला गेलो आणि आमच्या कुटूंबाचे ग्रह फिरले बाबांचा लिबांचा व्यवसाय बंद केला डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढत गेला आणि त्यात भर म्हून त्यांचे दारूचे व्यसन बळावले आणि आणि आमच्या वाढ्त्या वयाबरोबरच्या वाढ्त्या गरजा त्यानंतरच्या चार वर्षात आंम्ही जे भोगल त्याला खरोखरच भोग म्हता येईल. त्या चार वर्षात आंम्हा भावंडांना एकही नवीन पोषाख विकत घेता आला नाही. छोटी – मोठी कामे करून आंम्ही भावंडानी आमच्या शिक्षणाचा खर्च भागविण्याचा प्रयत्न केला. एक-एक किलो तांदुळ विकत आणून तो भात फक्त तिकट मसाला आणि मिठात मिसलून खाल्ला. भात असेल तर चपाती नाही, चपाती असेल तर भाजी नाही आणि भाजी असेल तर डाळ नाही अशा परिस्थितीत चार वर्षे काढली. पण कधीही पैशासाठी कोणाकडे हात पसरले नाहीत आमच्या त्या परिस्थितीचा फायदा घेणारे, आमच्या त्या परिस्थितीमुळे आमचा अपमान करणारे ही बरेच भेटले पण ! माझा अपमान करणार्याक एकालाही मी माफ केल नाही. कोणासमोर हात पसरण आमच्या आईच्या आणि आमच्याही स्वभावात नव्हत. आमचा जन्मच जणू लोकांना देण्यासाठी झाला होता. त्याचा प्रत्यय मला आजही येतो. माझ्याकडे काही नसतानाही माझ्याकडे काही तरी मागण्यासाठी लोकांचे हात पसरलेले असतात. कधी ही घराबाहेर न पडलेली माझी आई आमच्या कुटूंबाची विस्कटलेली आर्थिक स्थिती सावरण्यासाठी घराबाहेर पडली एका कारखाण्यात नोकरी करू लागली. त्यानंतर आंम्हाला थोड बळ मिळालं त्यानंतर मी ही शिक्षण अर्धवट सोडून नोकरीला राहिलो आणि आमच्या कुटूंबाची

आर्थिक स्थिती झपाट्याने सुधरू लागली. निलम आणि मनिषा जाणत्या होईपर्यंत आमच्या कुटूंबाची आर्थिक स्थिती पूर्णपणे बदललेली होती त्यामुळे आमच्या गरीबीची झळ त्यांना कधीच पोहचली नाही. त्या चार वर्षात मी माझ्या बाबासोबत गाडीवर कांदे – बटाटे, नारळ, विकले बुर्जी –पाव विकला आणखी काय काय विकल आता आठवत ही नाही. त्यावेळी आमच्या शाळेतील कोणी पाहिल तर काय वाटायच हे मी शब्दातही व्यक्त करू शकत नाही . पण कालांतराने मी त्याचा स्विकार केला आणि स्वतःला या सर्व गोष्टींना सामोर जाण्यास सज्ज केल आज मला मलकटले कपडे घालून अक्की मुंबई फिरायला सांगितली तरी मी फिरेन. आज मी कितीही महागातले कपडे घातले तरी त्यांना जपण्यासाठी मी प्रयत्नशील नसतो. आजही मला हाताला लागतील ते कपडे मी अंगावर चढवतो. आपली आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून नोकरी करीत असतानाही आमची आई आमच्यावर चांगले संस्कार करायला विसरली नाही. आमचे बाबा दारू प्यायचे पण आमच्या समोर कधीच प्यायचे नाहीत आणि आंम्हाला कधीच दारू विकतही आणायला सांगत नसत. त्यांच व्यसन हे मानसिक त्रासातून बळावल होत. पुढे बाबांना कोणी महापुरूष भेटला की त्यांना साक्षात्कार झाला त्यांनी दारू प्यायची सोडली आईनेही माझ्या भावंडाच्या खाण्या-पिण्याची होणारी अबाळ पाहून नोकरी सोडली मी आणि काही वर्षातच मी माझ्या भावंडाच्या साथीने आमच्या कुटूंबाची आर्थिक स्थिती बर्या पैकी सुधारली. मला अजयला पदवीधर करून त्याला त्याच्या स्वतःच्या पायावर उभं करायच होत महेशने आपला मार्ग स्वतःच निवडला होता. त्याचा प्रवास पैशाच्या दिशेने योग्यप्रकारे सुरू होता बाबा बर्यागपैकी कमावू लागले होते. आता आमच्याकडे पैशाची कमी नव्हती. पण या सगळ्यात आमच्या कुटूंबातील लोकांचा एकमेकांशी मोकळा संवाद कधीच झालाच नव्हता. सारेच आप आपल्या मार्गावर चालत होते. निलमला ती शिकेल तेवढ शिकविण्याच माझं स्वप्न होत पण ते स्वप्न तिने प्रेमविवाह करून धुळीला मिळविल. मनिषाच्या बाबतीत केलेली चुक आंम्ही तिच्या बाबतीत केली नाही. तिच्या योग्य पद्धतीने धुमधडाक्यात लग्न लावून दिल. महेशच आमच्याच नात्यातील एका मुलीसोबत प्रेमप्रकरण होत म्हणून त्यांना ही मी लग्नाचा मार्ग मोकळा करून दिला. मला खरं म्हणजे लग्नात फारसा रसच नव्हता आणि आजही नाही...मी लग्न करीत नसल्यामुळे लोक आप- आपल्या परिने विचार करीत असतात... उदा. मी लग्न का करीत नाही ? माझ्या आयुष्यात मला आवडावी अशी मुलगी कधीच आली नाही का ? मला लग्नच करायच नाही का ? नाही तर का ? मी षंढ तर नाही ना ? इतपर्यंत सारेच पश्न तू ही मला विचारायला हवे होतेस. त्यावर प्रतिभा हसून म्हाली,''या सर्व प्रश्नांची उत्तरे मला तुझ्या साहित्यात मिळालेत, तू काहीही म्हालास तरी सोनलला जे वाटत होत त्यात तथ्य होत. मला पुर्ण खात्री आहे तुझ्या प्रत्येक कथेतीला नायिका कधीना कधी तुझ्या आयुष्यात काही काळासाठी का होईना डोकावून गेलेली आहे. तिला देण्यासाठी तुझ्याकडे वेळ नव्हता म्हण अथवा त्यावेळी तिच्यापेक्षाही अधिक महत्वाच आणखी काही तरी तुला खुणावत होत म्हण. असामान्य व्यक्ती होण हे तुझ स्वप्न होत तुझा जन्मच त्यासाठी झाला आहे याची तुला खात्री होती. तू तुझ्या आयुष्यातील प्रत्येक पाऊल विचार करूनच टाकलस, तुझ्या कथेतील नायिकांनी नायकासमोर त्यांच प्रेम व्यक्त करताच नायकाने त्यांच्या प्रेमाचा स्वि कार केल्याच लिहून तू तुझ्या कथेचा शेवट केलास पण वास्तवात तू मात्र त्या सर्वजणींचा अपेक्षा भंग केलास. त्यांपैकी एकीचीही तुझ्यासमोर तिच्या प्रेमाचा प्रस्ताव मांडण्याची हिंमत झाली नाही. तुझ्यात असं काय आहे ज्यामुळे लोक तुझ्याशी बोलताना घाबरतात हे कोड मला आजही उलगडत नाही. त्या सर्वजणींनी तुझ्यासमोर प्रेमाचा प्रस्ताव मांडून तुझ्या पासून कायमचं दूर जाण्यापेक्षा दुसरा जोडीदार निवडून कायम तुझ्या मनाजवळ राहण्याचा मार्ग स्विकारला. कदाचित तू त्यांच्या ह्द्यात् अढल स्थान निर्माण केल होतस. त्यापैकी कोणाचाही गैरफायदा घेण तुला शक्य होत पण तू तस केल नाहीस. उलट त्या सर्वजणींना निस्वार्थीपणे मदतच करीत राहिलास. लग्न करून लोक फक्त शरीराने एकत्र येतात तू त्यांच्याशी मनाने जोडला गेलेला होतास. तुझ्या काही दिवसांच्या सहवासाने तू मला हवा हवासा वाटत असावास तर तुझ्या सोबत कित्येक वर्षे घालविलेल्या तुझ्या प्रेमात पडल्या नसत्या तर मला नवळ वाटल असत. तुझा जन्म नक्की कोणत्या कार्यासाठी झालाय हे तुला माहित आहे म्हणून तू भरकटत नाहीस. आपल्या विचारांपासून विचलीत होत नाहीस. तू माझ्या प्रेमाचा स्विकार केलास ते मी तुझ्या मित्राची बहिण आहे म्हणून नाही तर मी तुझ्या ध्येयापर्यंत पोहचण्याची शिडी आहे म्हणून. तू इतकी वर्षे त्या शिडीच्याच

शोधात होतास आता तुझा तो शोध संपलाय कदाचित...विजय गालात मंद स्मित करत तिच्यासह बगीच्याच्या बाहेर पडला. एके दिवशी प्रतिभा भेटायला येणार म्हणून विजय एकटाच त्याच्या कार्यालयात विचार करीत बसला होता. विचार करता करता तो त्याच्या भुतकाळात डोकावू लागला. आपल्या खडतर आयुष्यातही आनंदाचे विनोदाचे क्षणही बरेच आले होते. आपल आयुष्य अगदीच वाया गेल असही म्हणता येणार नाही. शाळेत विनिताला कबडी खेळताना पहायला किती मजा यायची सर्वांना वाटायच माझा आणि तिचा छत्तीसचा आकडा आहे कारण त्यावेळी आंम्ही तिसरीत असताना कांबळे बाईनी विनिताला मारल्यावर ती खूप रडली पण शाळा सुटल्यानंतर जे झाल ते कोणालाच माहित नव्हत. त्या दिवशी शाळा सुटल्यावर विनिताच्या आणि माझ्या आईची भेट झाली. त्या दोघींच्या बर्यापैकी ओळख निघाल्यावर त्या दोघींनी आम्हा दोघांना पुन्हा न भांडण्याचा सल्ला दिला तो आंम्ही कायम पाळला. तिच्या मनात माझ्याविषयी काय होत नव्हत मला माहित नाही पण ती मला आवडायची आज तिची लग्न होऊन तिला दोन पोर झाली तरी ही आवडते तिची आठवण आजही मला उल्हासित करते. माझ्या आयुष्यातील पहिली मुलगी होती जिच्या मी प्रेमात पडलो होतो. तिच्यावर लिहलेली माझी पहिलीच कविता एका वर्तमानपत्रात प्रकाशित झाली आणि माझ्या कविता लिखाणाला सुरूवात झाली माझ्या लिखाणाची सुरूवातच मी तिच्या नावाने केली असं म्हणायला काही हरकत नाही. माझ्यातील लेखकाला तिने जन्माला घातला होता. एका वर्तमानपत्रात व्हॅलेन्टाईन डे च्या निमित्ताने तरूणांकडून आपल्या प्रेम भावना व्यक्त करणार्या कविता मागविल्या होत्या तेंव्हा मी पहिल्यांदा कविता लिहण्याचा प्रयत्न केला त्या कवितेच्या सुरूवातीला वर प्रिय विनिता असं लिहलेल होत आणि शेवटी तुझा विजय त्यामुळे ती कविता माझी होती हे तेंव्हा कोणाच्याही लक्षात आले नाही. ती कविता ज्या वर्तमान पत्रात प्रकाशित झाली होती ते वर्तमानपत्र मी कोणालाच दाखविले नाही आणि त्याचे कात्रणही माझ्याकडे जपून ठेवले नाही. पुढे तिच कविता मी त्यात काही बद्ल करून माझ्या एका कावितासंग्रहात प्रकाशितही केली. मी शाळेत असताना मी तयार केलेल्या शुभेच्छा पत्रांच्या मधोमध व्ही लिहीत असे सर्वांना वाटे तो व्ही फॉर विजय होता पण तो व्ही फॉर विनिता असायचा. शाळा संपली आणि माझं तिच्यावरील प्रेमही संपल. पुढे अपघाताने आम्ही भेटलो पण तो पर्यंत माझ्या आणि तिच्या आयुष्यातही बरच काही घडून गेल होत. मी शाळेत असताना जसा साधा भोळा होतो तसा राहिलो नव्हतो. त्यामुळे तेंव्हा ती मला फक्त माझी एक चांगली मैत्रिण म्हणुनच आवडत होती. तेंव्हा ही माझ्या आजुबाजुला असंख्य फुलपाखरे उडत होती. विनिताच्या हुशारी बद्ल मला प्रचंड आदर होता. त्या मुळे आमच्याच सोसायटीत राहणार्या पुजा नावाच्या अत्यंत हुशार मुलीच्या मी प्रेमात पडलो. पुजा फक्त तिच्या नावातच होती, बाकी तिच चालण, बोलण, हसण, लाजण सारंच मादक होत. तिच्याकडून मला जरा जास्तीच्या अपेक्षा होत्या मला वाटत होत की ती तिच्या आयुष्यात एक असामान्य व्यक्ती होईल म्हणून तिच्या भविष्याच ओझ वाहत मी माझं तिच्यावरील प्रेम तिच्यासमोर व्यक्त करण टाळत होतो. तिला देण्यासाठी मी एक प्रेमपत्रही लिहलं होत पण आंम्ही जन्मतः डरपोक मुलींच्या बाबतीत ! म्हणून शेपूट आत घेऊन बसलो आणि मग तेच प्रेमपत्र पुढे एका कथेत वापरल ती कथा एका दिवाळी अंकात प्रकाशित झाली. माझ्यातील कथा लेखकाला जन्मास तिने घातला होता तिच्याही नकळत. त्या पुजाचा चेहरा पाहता यावा म्हणून आमच्या घरापासून दहा- पंधरा मिनिटावर असणार्या विहीरीवर घरात पाण्याने भरलेले हंडे रिकामे करून आंम्ही भरायला घेऊन जायचो. घराजवळील जंगलात एका ओढ्यावर ती कपडे धुवायला जायची म्हणून पावसाळ्यात दर रविवारी आंम्ही ही आमच्या घरातील चादरी धुवायला त्या ओढ्यावर घेऊन जायचो. त्या ओढ्यावर काही महिला अंघोळ ही करायच्या . त्यामुळे राम तेरी गंगा मैली चा सीन आंम्हाला समोर पाहायला मिळायचा पण तो पाहण्यातही आंम्हाला तेंव्हा रस नव्हता आम्हाला रस होता तो कपड्यांना साबन लावता आपल्या चेहरयावर येणारे केस हळुच हाताने वर केल्यावर दिसणारा तिचा गुलाबी चेहरा पाहण्यात. तर पुजाचा नुसता मधूर आवाज जरी कानावर पडल तरी माझं मन तेंव्हा प्रसंन्न व्हायचं. आमच्या सोबत तिच्यासाठी बरेच जण धावले, आमची यशस्वी होण्याची शक्यता जरा जास्त होती पण आंम्हाला तिच्याकडून जे अपेक्षित होत त्या अपेक्षांना तिने पायदळी तुडवल. मला तिला प्रसिध्द झालेल पाहायच होत पण प्रसिध्दी कालांतराने आमच्याच पायाशी घुटमळू लागल्यावर मलाही प्रसिध्दीचा मोह टाळता आला नाही आणि मग प्रसिध्दीची नशा चढू लागल्यावर पुजाच्या प्रेमाची नशा उतरली ती

कायमचीच. आमच्या गरीबीच्या काळात माझ्या प्रेमात पडाली ती अनिषा माझ्या घरापर्यंत पोहचलेली ती माझी पहिली मैत्रिण होती. नाहीतर विनिताही माझ्या घरात कधीच आली नव्हती. अनिषा दिसायला अतिशय सुंदर पुजापेक्षाही, आवाजही गोड, मनमिळावू आणि सतत आनंदी असणारी तरूणी होती. मला माझी मैत्रिण म्हणून ती खुप आवडायची आजही आवडते. मी एक सामान्य माणूस असतो तर तिच्याशी लग्नही केल असत. पण माझ्या ध्येयाच्या मार्गात ती अडचण ठरली असती याची मला खात्री होती त्यामुळे मी लग्न, प्रेम आणि मैत्री यांची कधीच भेसळ होऊ दिली नाही. आज तिच लग्न होऊन ती संसारात रमल्यानंतरही आमची मैत्री कायम आहे. या दरम्यानच कोठेतरी मी माझ्या कथेतील नायिकेच्या सुषमाच्या प्रेमात पडलो. सुषमा एक अजब रसायन होत. तिच्या फक्त नावाने गेली दहा वर्षे मला तिच्याशी जोडून ठेवलय. तिच माझ्याकडे आकर्षित होण याला कदाचित प्रेम म्हणताही येणार नाही. तेंव्हा ती बारावीच्या वर्गात शिकत होती. माझी कामाला जाण्याची आणि तिची क्लासला जाण्याची वेळ एकच होती. आंम्ही दोघ एकाच बसस्टॉपवर उतरायचो, बस मधून उतरल्यावर थोड चालत गेल्यावर ती न चूकता माझ्याकडे मगे वळून पाहायची आणि गालात गोड हसायची, तिच हसण नव्हे तर ती हसल्यावर तिच्या गालाला पडणार्या खळ्या मला खूप आवडायच्या. या दरम्यान तिच्या आणि माझ्या आयुष्यात एक घटना घडली ज्या घटनेमुळे आंम्ही दुरावलो. त्या घटनेवर मी एक कथा लिहली ती एका प्रसिध्द दिवाळी अंकात प्रकाशित झाली. त्यानंतर काही वर्षानंतर मला अपघाताने ती माझ्या एका जिवलग मित्राची बहिण असल्याचे कळले आणि मग मी पुर्णता माघार घेतली, ती कायमचीच ! त्यानंतर मी तिच्या भानगडीत कधीच पडलो नाही. पण माझ्या कथेतील नायिकेच नाव मात्र बर्याचदा सुषमाच असायच कारण ते नाव माझ्यासाठी देणगी ठरत होत. मी माझ्या आयुष्यात सर्वात जास्त वेळ खर्च केला होता तो कवितासाठी ! आता मी तिला विसरण्याचा प्रयत्न करीत होतो पण ती आजही माझा पिच्छा सोडायला तयार होत नव्हती. कवितावर माझं एकतर्फी प्रेम होत पण आमच्यात संवाद कधीच झाला नव्हता. तिने प्रतिभाला माझ्या आयुष्यातून दूर करण्याचा प्रयत्न का केला असावा ? माझ्या बद्द्ल तिच्या मनात अचानक प्रेम का निर्माण झाल असावं की कोणीतरी माझ्या प्रेमात स्वत:हून पडलय हे पाहून तिचा अहंकार दुखावला असावा ? ती प्रतिभा सोबत जशी वागली तसा तिचा स्वभाव खचितच नव्हता. माझ्याकडून कधीच कोणावर जाणन बुजून अन्याय झाला नाही. मग मी कवितावर तरी अन्याय कसा करू शकतो. माझ्या बद्द्ल तिच्या मनात काही असेल नसेल पण एकदा चर्चा करून सार स्वच्छ करायलाच हं असा विचार विजय करीतच होता इतक्यात् प्रतिभा आल्यावर तो तिच्यासह खरेदीला निघून गेला.

एक दिवस बसस्टॉपवर विजयला कविता दिसली असता तो तिच्या जवळ गेला तो बोलण्या पूर्वीच कविता त्याला म्हाली, “अभिनंदन ! प्रतिभा आणि तुझ लग्न ठरल्याबद्द्ल . हिंमत करून मला कधी का नाही विचारलस की माझं तुझ्यावर प्रेम आहे की नाही ? त्यावर विजय तिला म्हाला,'' मी तुला विचारायला घाबरत नव्हतो ! मी घाबरत होतो तो मी मिळविलेल्या नावाला माझ्या निष्कलंक चारित्र्याला ! ते गमवायला मी कोणासाठीही तयार नव्हतो. तू का नाही विचारलस ? विजयने प्रश्न करताच कविता म्हाली,'' मी विचारल असत तर तुला माझ्या चारित्र्याबद्दल शंका आली असती अशी मला भिती वाटत होती. तू माझ्या गोर्या रंगाला आणि माझ्या तारूण्यावर फिदा झाला आहेस असं ही मला वाटत होत पण नंतर तुझ्या आजुबाजुला घुटमळणार्या कित्येकजणी पाहिल्या आणि माझं मत बदलत गेल. सुरूवातीला तू जे बोलायचास त्या मला थापा वाटायच्या तुझ्या राहण्यात आणि बोलण्यात खूप तफावत होती म्हणजे तुझं राहण चित्रपटातील नायकासारखं आणि बोलण एखाद्या साधूसारखं ! तुझ्यावर त्या तरूणी लट्टू का होत असत ते कोड मला आजही उलगडत नाही, कदाचित ते तुलाही उलगडलेले नसावं. सुरूवातीला मला वाटत होत तुला माझ्या सोबत फक्त टाईमपास करण्यातच रस असावा. पण नंतर जस जसा तू मला कळत गेलास तस तशी मी तुझ्या प्रेमात डुंबत गेले. पण हे सर्व कळेपर्यंत वेळ निघून गेली होती आणि तू प्रतिभाच्या प्रेमात पडला होतास. मी माझ्या परीने प्रतिभाला तुझ्या आयुष्यातून दूर करण्याचा प्रयत्न केला होता. पण तो फसला. त्यावर विजय म्हणाला,'' माझ्या हृद्यात आजही तुझ्यासाठी जागा मोकळी आहे पण् आता माझ्यावर माझा नाही तर प्रतिभाचा अधिकार आहे. माझ्या मनात आता तुझ्या बद्दल कसलाच किंतु परंतू नाही आयुष्याच्या कोणत्याही वळणावर

जर आपण पुन्हा समोर आलो तर मी तुला नक्कीच ओळख दाखवेन अनोळखी होणार नाही हा माझा तुला शब्द आहे. त्यावर कविता विजयला म्हाली तू तुझ्या आयुष्यात इतरांच्या सुखासाठी असंख्य गोष्टींचा त्याग केलास ! आज मी तुझ्या आणि प्रतिभाच्या प्रेमासाठी माझ्या तुझ्यावरील प्रेमाचा त्याग करते. कविता डोळ्यात आलेले अश्रू फुसत जाताना प्रतिभाने लांबूनच पाहिले आणि विजयच्या जवळ येताच ती विजयला म्हाली,'' काय म्हत होती तुझी माजी प्रेमिका ? काही नाही ! आपल्या भावी आयुष्यासाठी आपल्याला शुभेच्छा देत होती. त्यावर किंचित रागावत प्रतिभा म्हाली,'' माझ्या नशिबाचा हेवा आणखी किती जणिंना वाटणार आहे देव जाणे ? मला तर वाटत लग्नानंतर पहिल्यांदा मला तुझीच नजर काढावी लागेल. कविताने केलेल्या या विनोदावर कवितासह विजयही मनमुराद हसला...

***

**निलेश बामण**

**कविता**

## प्रार्थना

(वांझ स्त्रीचे मागणे)

( चाल-- खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे)

माझ्या प्राक्तनाची कथा
माझ्या सारखीची व्यथा ॥धृ॥
आई नाही होता आलं
समाजानं दूर लोटलं
घातलं ज्यानं जन्माला, माझा विचार ना केला॥१॥
निदान एकदा तरी
हलू दे पाळणा घरी
हेच मागणं माझं, नको राहू देऊ तू वांझ ॥२॥
काय झाला असा गुन्हा
फुटू दे मला आता पान्हा
फुलू दे बाग अंगणी, खेळू दे खेळ रंगणी॥३॥
माझ्या प्राक्तनाची कथा
माझ्या सारखीची व्यथा (२)

***

**सौ. वीणा अजित माच्छी**
**घोलवड, ता. डहाणू.**
**मोबाईल क्रमांक : ९४२३९२२२२३**

**कथा**

## प्रिय, आई

### (गर्भातल्या बाळाचे आईला पत्र)

तुला गोड गोड पापा... अस म्हणू की गाल फुगवून रुसून बसू... का भोकाड पसरून रडू काहीच कळत नाहीए. तुझा खूप राग हि येतोय मला आणि कीव हि वाटतेय. तुझ्या मनाविरुद्ध घडणारया गोष्टी सहन करण्याच्या तुझ्या शांत स्वभावाचा खरच खूप त्रास होतोय मला,तुला अस हतबल झालेले पाहिलं कि एकाक्षणी वाटत स्वतःहूनच या तुझ्या गर्भाच्या उबदार घरट्यातून उडून जाव.तुला मला जोडणाऱ्या नाळेचा फास गळ्याभोवती आवळावा आणि तुला ह्या कोंडीतून मुक्त कराव.पण दुसऱ्याच क्षणी बाळासाठी व्याकुळ झालेला तुझा चेहरा मला दिसतो. कस समजावू ग तुला तेच कळत नाहीये तुझ्या या छकुलीला .

का सहन करतेस ग हा अन्याय, तुला तुझ मत नाहीये का,तुलाही माझखरच ओझ वाटू लागलय का,का मी मुलगी म्हणून माझ्याबद्दल तुला विश्वास वाटत नाहीये का, सांग ना खर कारण , का तुलाही बाकीच्या लोकांसारख मुलगाच हवा आहे.आई सांगशील मला खर काय आहे तुझ्या मनात ते.

आई खरच मी तुला त्रास नाही देणार ,तुझ सगळ ऐकेन, युला माझा अभिमान वाटला पाहिजे अस घडवेन मी स्वतःला,अगदी तुमच्या म्हातारपणीही तुमची काळजी घेईन तुम्हाला एकात नाही सोडणार , अगदी तुझी शपथ घेऊन सांगते आहे हे मी तुला, आणि मी तुझी खोटी शपथ घेणे शक्यच नाही.तू आणि मी एकाच आहोत मी तुझ्याच शरीराचा एक भाग आहे ना मग तू नसलीस तर माझ अस्तित्व या जगात येण्यापुर्वीच नष्ट होईल.

ए आई, हे पत्र वाचताना तुला खूप रडू येतंय ना तुझे हुंदके जाणवताहेत मला, पण मी तरी काय करू ग हे सार मी फक्त तुलाच सांगू शकते ना, तू हि एक स्त्री आहेस. तू तुझ्या आईच्या गर्भात असताना तुझ्या आईने तुला जन्म देण नाकारलं असत तर तुला कस वाटलं असत, हे सुंदर जग

तुझ्या दृष्टीस तरी पडल असत का, आई एकदा नीट विचार कर, हे मी फक्त माझ्यासाठी नाही सांगत आहे तर माझ्यासारख्या कितीतरी नकोश्या आईच्या गर्भात रुजत आहेत,ह्या वेलीला उखडून टाकण्यासाठी कितीतरी अघोरी प्रकार केले जातात, विषारी खतपाणी गाळून मारायचाही प्रयत्न होतो हे तुलाही चांगलच माहित आहे. या मध्ये बाळा बरोबर आईचा हि जीव धोक्यात येऊ शकतो याचा कोणीच का ग विचार करत नाही.पण तू यांच्यातली एक होऊ नकोस ना. हे अस घडताना पाहिलं कि हे तुझ गर्भरुपी घरट्यात अंधारकोठडी असल्याचा भास होतो मला. जीव घुसमटतो ग इथे त्याक्षणी माझा.

या सगळ्या दुर्दैवी प्रकारात काही नकोश्या खरच या न पाहिलेल्या जगाचा निरोप घेतात तर काही माझ्यासारख्या चिवट असत्तात, ज्या जगण्यासाठी धडपडणाऱ्या, आईबाबांच्या प्रेमासाठी आसुसलेल्या, मला माहित आहे हे सार वाचून तू खूप अस्वस्थ झाली आहेस, खूप रडत आहेस त्या अश्रूंच्या आडून तुला माझे शब्द हि येत नाहीएत ना, पण आई आता डोळे पूस, हि रडण्याची नाही तर ठामपणे निर्णय घेण्याची वेळ आहे. मी स्वार्थी नाहीये, तुझ्याच रक्तामासावर वाढणार तुझच बाळ आहे. हे मी तुझ्याच भल्यासाठीच सांगतेय, माझ्यावर रागवू नकोस हं. मला माहित आहे तुझ बाबांवर खूप प्रेम आहे. त्यांचे मन जपण्याचा तू आटोकाट प्रयत्न करतेस, तुला त्याना नकार देण तुला जमत नाही. पण प्रत्येक वेळी हे योग्य नाही ना, तूझ बाबा आणि आजीआजोबांसमोर काहीही चालत नाही. पण म्हणून तू तुझ्या मनाविरुद्ध निर्णय का घेत आहेस, का माझा जन्माला येण्याचा हक्क नाकारत आहेस, असाच करायचं होत तर मला देवबाप्पाच्या घरून कशाला बोलावालस ग तुझ्या या गर्भरुपी घरट्यात, तिथे खूप आनंदात होते मी, का ओढ लावलीस मला या तुमच्या जगात येण्याची सांगशील का मला एकदाच तुझ्याकडे याचे उत्तर आहे का.. नाही ना.

आई तू सगळ विसरलीस का ग.. याच उत्तर मीच देते कि तू सगळ काही विसरली आहेस, तस नसत तर मला जगवण्यासाठी तू जीवाचा आकांत केला असतास, पण तू तर मला मारायला निघालीस आणि तू मला मारणारच असशील तर आज मला तुला सगळ्याची आठवण करून द्यावीच लागेल तुला माझ्या मनातल सगळ एकावेच लागेल.हि माझी शेवटची इच्छा समज. आठवताहेत का तुला ते दिवस, तुमच्या लग्नाचा बारावा वाढदिवस होता, सगळेजण अजूनही तुमच्या गोड बातमीची वात पहात होते तसतशी तू बेचैन होत होतीस, तू नातेवाइकांना हि टाळू लागली होतीस. बाबांना ह्या सगळ्याचा फारसा फरक पडत नव्हता कारण मुल झाल नाही म्हणजे स्त्रीमधेच काहीतरी दोष असणार असेच अनेकांना वाटते तशीच या घरातल्या सगळ्यांची होती अगदी बाबांची सुद्धा. आजी आजोबा खूप नाराज होते. पण स्पष्टपणे बोलण्याचे धाडस कोणीच करत नव्हते कारण तू दिसायला सुंदर, हुशार, सुगरण, सगळ्यांना सांभाळून घेणारी अशी असल्याने तुला नावे ठेवण्याचा प्रश्नच येत नव्हता... तू दिवसभर खूप आनंदात असायचीस पण रोज रात्री अश्रुनी उशी भिजायची, हे दुखः माझ्याच नशिबी का असा मनातल्या मनात देवाला जाब विचारायचीस, बाबा तुझी समजूत काढायचे, आपण बाळ दत्तक घेऊया मी माझ्या आई बाबाना त्यासाठी तयार करेन असही तुला सुचवायचे, ते अस म्हणताच तुझा चेहराच बदलायचा,कारण हि कल्पना हि तू सहन नाही करू शकायचीस. खर तर त्यात वाईट काहीच नव्हते पण तुला ते पटत नव्हते. देवधर्म, पूजाअर्चा जपतप सगळ काही तू मनापासून करत होतीस. पण कसलाच उपयोग होत नव्हता.

अशातच एकदा तुझ्या जिवलग मैत्रीणीच्या मुलीचा पाचवा वाढदिवस त्यांनी एका अनाथाश्रमात करायचे ठरवले होते. तिने खूप आग्रहाने तुम्हाला दोघांना बोलावले होते, खरतर तुझ्या मनात तिथे जायची अजिबात इच्छा नव्हती. पण तूझ्या मैत्रिणीला नाराज करणे तुला अशक्य होते.म्हणून तू त्या वाढदिवसाला गेलीस.तिथे खूप आनंदी वातावरण होते. तिथे खूप गोड निरागस बाळे होती, सगळेजण वाढदिवसाचा आनंद लुटत होते, पण तू मात्र खूप अस्वस्थ झाली होतीस. त्या मुलांना आई नाही आणि तुला बाळ नाही अशी विचित्र परीस्ठीती तिथे होती. त्या मुलांना बघून अनाथ मुलांबद्दलची तुझ्या मनातली अढी थोडी कमी झाली होती तरीही त्यांना दत्तक घ्यायचा विचार तुला पटत नव्हता. तेथील अगदी लहान दुपट्यात गुंडाळलेली बाळे, त्यांचे इवलुसे हात पाय, नाजूक जीवणी, काळेभोर जावळ पाहून तुझ्यातली आई जागी झाली, एखादी आई इतक सुंदर

बाळ कस सोडू शकते या प्रश्नाने तू शहारलीस, बैचेन झालीस आणि हे सार सहन न होऊन तू बाबांच्या खांद्यावर डोक ठेवून ढसाढसा रडलीस... हे सार इतक्या पटकन घडल कि बाबांनाही तुझी समजूत कशी काढावी हे कळेना. तुम्ही तिथून निघताना एक अनामिक हुरहूर तुझ्या मनाला लागून राहिली होती. त्या अनाथाश्रमातील बाळाला जवळ घ्याव अस क्षणभर तुला वाटून हि तास करण्यास तुझ मन धजावल नाही, पण त्या क्षणापासून तुझ्यात काहीतरी बदल होत होता, तुझ्या आईच्या प्रेमाला पान्हा फुटला होता हे मात्र खर होत.

या गोष्टीला एक दोन महिने झाले असतील पण ती बाळे काही तुझ्या नजरेसमोरून जात नव्हती, ती तुझ्या स्वप्नातही येत होती,आणि अशातच एके दिवशी सकाळी उठल्यावर तुला खूप मळमळायला लागल चक्कर येतेय कि काय अस वाटू लागल तुला वाटलं पित्ताचा त्रास असेल. आराम केला कि बर वाटेल पण नंतरही तुला सतत कोरड्या उलट्या होऊ लागल्या, हे आजीच्या लक्षात येताच तिने तुला डॉक्टरांकडे जाऊन यायला सांगितलं. पण हि लक्षण कसली आहेत हे आजीच्या चाणाक्ष नजरेला शंका आली होती. संध्याकाळी तू आणि बाबा डॉक्टरां कडे गेलात.. त्यांनी तुला तपासल्यावर बाबांना हि आत मध्ये बोलावलं त्यावेळी तू खूप घाबरली होतीस, आपल्याला काही मोठा आजार तर नसेल ना झाला या काळजीने तू अस्वस्थ होतीस. त्याचक्षणी डॉक्टरांचे तुम्हा दोघांचे अभिनंदन तुम्ही आता आई बाबा होणार आहात हे शब्द तुझ्या कानावर पडताच तुझा विश्वासच बसत नव्हता.तुला काय बोलावे सुचत नव्हते तू एका तपानंतर आई होणार होतीस हे सगळ मी अनुभवत होते कारण तुझ्या गर्भात मी वाढत होते, तुला आईपणाचा अनुभव देण्यासाठी देवबाप्पाने माझी निवड केली होती. तुझा आनंद मला कळत होता. घरी येताच हि बातमी तुम्ही आजीआजोबांना सांगितलीत आता नातवंड येणार म्हणून ते हि खुश झाले होते. तुम्ही दोघे त्यांच्या पाया पडताच आजी म्हणाली. चला आता माझी इच्छा पूर्ण होणार वंशाला दिवा मिळणार आपल्या घराण्याच नाव लावणारा मुलगा जन्माला येणार.

हे सार एकताच तू आणि बाबांनी एकमेकांकडे पाहिलं. बाबाही लगेच म्हणाले मलाही मुलगाच हवा मी खूप स्वप्न बघितली आहेत त्याच्यासाठी आता ती पूर्ण होणार, हे सार एकून तुझा चेहरा कावराबावरा झाला हे सार तुला अनपेक्षित होत, तू सहजपणे बोलून गेलीस आणि आपल्याला मुलगी झाली तर हे एकताच आजी आणि बाबांनी तुझ्याकडे रागाने एक कटाक्ष टाकला जणू काही तू हे विचारून गुन्हाच केला होतास. मुलगी होण शक्यच नाही आपल्याला गेल्या सात पिढ्यात या घरात मुलगी जन्माला आली नाही म्हणजे आपल बाळ हि नक्की मुलगाच असणार. पण तू शंका काढलीच आहेस तर खात्री करून घेऊया लवकरच जरी कायद्याने बंदी असली तरी काही ठिकाणी अजूनही हे सांगितले जाते.आणि काही दिवसातच बाबा तुला त्यांच्या एका डॉ मित्राकडे घेऊन गेले तुला हे सार असह्य होत होत कारण तुला फक्त बाळ हव होत तुमच्या रक्तामांसाच मग ते मुलगा किंवा मुलगी असल तरी तू त्याला खूप प्रेम देणार होतीस पण... हे सार बाबाना समजावूनही त्याना कळत नव्हत, खूप वर्षांनी होणारया बाळापेक्षा ते कोण आहे हे त्यांच्या दृष्टीने महत्वाचे होते. आणि तुझ्या गर्भात मुलीचां गर्भ वाढतोय हे एकताच त्यांचे तुझ्याशी वागणेच बदलले, आजीनेही तुझ्याशी अबोला धरला जणू काही तू खूप मोठी चूक केली होतीस असेच ते तुला वागवत होते.

अशा अवघडलेल्या परिस्थितीत तुझ्याही मनात नकारात्मक विचार येणे साहजिकच होते, तू खूप गोंधळलीस, तुला कुणालाच गमवायच नव्हत, पण जर या घरात केवळ मुलगी म्हणून आपल्या बाळाला प्रेम मिळणार नसेल ते नाकारलं जाणार असेल तर त्याला या जगात तरी कशासाठी येऊ द्यायचे असा विचार हि तुझ्या मनात डोकावत होता, इकडे आड आणि तिकडे विहीर अशी तुझी अवस्था झाली होती. तुझ्या जीवाची घालमेल होतेय. तुला हे सार आजही सहन होत नाहीये. हे मला सार तुझ्या गर्भात मला जाणवतंय म्हणूनच तुला निर्णय घ्यायला मदत व्हावी म्हणून हे पत्र मी तुला लिहील.

आई, तू माझा तुझ्या गर्भात नऊ महिने सांभाळ करून मला जन्म देशील का नाही मला माहित नाही, पण एकदाच माझी शेवटची इच्छा म्हणून माझ्या सांगण्याचा विचार कर... तू आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी आहेस, स्वबळावर माझा सांभाळ करू शकतेस. आपण दोघी एकमेकीना साथ देऊया, कारण माझा जीव घेऊन तू मला विसरू शकशील

का... आयुष्यभर ते दुखः तुला बोचत राहील.आणि तुझे अश्रू पुसायला मी नसेन तिथे, कितीही हाक मारलीस तरी तुझा आवाज माझ्यापर्यंत पोचणार नाही. मला तू हवी आहेस...पण तुला मी हवी आहे का नाही मला कळत नाहीये. आई माझ तुझ्या मातीत रुजण्याला तुम्ही दोघेही कारण असलात तरीही निर्णय तूच घ्यायचा आहेस आणि योग्य तो निर्णय तू घेशीलच.....

तुझ्या मायेच्या कुशीत निजायचय मला
तुझ अंगाईगीत ऐकायचय मला
आई अशी हाक तुला मारायची आहे मला
स्त्री जन्माच सार्थक करायच आहे मला
तुझी आई व्हायचं आहे मला
तूच देऊ शकतेस जीवदान तुझ्या या छकुलीला
तुझ्या निर्णयाची अधिरतेने वाट पहाणारी..

तुझीच लाडकी..... छकुली

**ता.क. आई मी तुला जरा जास्त बोलले असले तर रागावू नकोस ह माझ्यावर, हे सगळ तुला लिहिल्यावर माझ्या जीवाची घुसमट आता थांबली आहे, खूप हलक हलक वाटतंय,का माहित नाही पण या तुझ्या क्षणी माझ्या छोट्याश्या घरट्यात या क्षणी खूप सुरक्षित वाटतंय.आता तुझा एक गोडगोड पापा घ्यावासा वाटतोय...**

***

**चैत्राली जोगळेकर**

## *मराठी विचारधन*

तुमचा आजचा संघर्ष
तुमचे उद्याचे सामर्थ्य
**निर्माण करतो**
त्यामुळे
विचार बदला आणि बदला तुमचे आयुष्य !

***

**संग्रहित**

**कथा**

# *सासुबाईचे भावी सुनेस पत्र*

**प्रिय सुनबाईस (होणाऱ्या)**
अनेक आशिर्वाद

हळदीच्या सोनपावलांनी गृहप्रवेशाची स्वप्न जितके तू बघत आहेस तितकेच स्वप्न मी ही बघत आहे. मला माहित आहे तुझ्या मनाचा गोंधळ उडालेला आहे. मनात साक्षंकता आहे, बावरलेली आहेस. तुझी ही अवस्था बघुन मी एकदम ३० वर्ष मागे गेले. मी ही अशीच धास्तावलेली होते. काकणंभर जास्तच. त्यामुळे मला तुझी अवघडलेली अवस्था नक्कीच समजते गं !

तूला एक सांगू का ? आपण आपली माहेरची नाती सोडतो आहोत, घर सोडतो आहोत असा विचारच करू नकोस. उलट असा विचार कर की मी आता माझ्या आवडत्या व्यक्ती बरोबर मला हवे तसे माझे आयुष्य नव्याने सुरू करीत आहे. मग बघ तुला कसे वाटते ते, माहेर कधीच तुटत नसतं ग ! पण मोठं झाल्यावर प्रत्येकालाच आपला सहचर व त्याच्या सोबतच सहजीवन हव असतं म्हणून आपण फक्त वेगळं होत असतो एवढंच.

मला कल्पना आहे की, मी एक २५ वर्षाचे झाड माझ्या अंगणात लावण्याचा प्रत्यत्न करत आहे. त्यामुळे सुरूवातीला त्या झाडाची कितीही काळजी घेतली, कितीही जपलं तरी ते मलुलं राहणार आहे. कारण त्याची पाळेमुळे तिथे खोलवर रूजलेली आहेत ना. काहीही हरकत नाही मी वाट बघायला तयार आहे.

सुरूवातीला सुनेचा ओढा तिच्या माहेरी अपेक्षितच असतो. मला वाटते सुना माहेरी फक्त सासरच्या लोकांच्या कागाळ्या करायला जातातच असे नाही तर कदाचित त्यांना आपण सासरी किती सुखी आहोत, सगळे आपली किती काळजी घेतात कौतुक करतात हे देखील सांगायचे असते. त्यामुळे खुष होणाऱ्या आईवडिलांचे चेहरे

बघायचे असतात. त्यामुळे मनात येईल तेव्हा आईकडे जाता येईल ना? हा प्रश्नच उद्भवत नाही गं.

तू जशी भावी संसाराची स्वप्ने बघितली असतील तशाच मी ही काही गोष्टी मनाशी ठरविल्या आहेत. सुरूवातीला मला संसारात ज्या काही अडीअडचणी आल्या, काही तडजोडी कराव्या लागल्या तशा तुला कराव्या लागू नये याची मी काळजी घेतली आहे. काही कारणामुळे मला जे मिळाले नाही ते तुला सहज उपलब्ध व्हावे याची मी खबरदारी घेतली आहे. तरीही आयुष्यात कठीण प्रसंग येतच असतात ना गं ! कठीण प्रसंगातच आपला खरा कस लागत असतो ते नक्की. सुखात तर सगळेच सहभागी असतात.

मी जरी एवढा सगळा विचार करत असते तरी आपल्यात वाद, विसंवाद होणारच नाही असे नाही. भांडणे जरी झाली तरी पोटात माया हवी. भांडणात दुष्टावा नको. गैरसमज झाले तरी नक्की काय खुपतयं हे आपण एकमेकींना नक्कीच स्पष्टपणे सांगूया. सासू सुनेचं नातं म्हणजे 'विळा भोपळ्याचे सख्य' असे आपल्या नात्यात होता कामा नये. सासू जरी झाले तरीही मी ही माणूसच आहे ना? आणि मी नेहमीच बरोबर असेन असेही नाही. झाल्या चुक्या मनमोकळयापणाने मान्य केल्या तर आला प्रसंग नक्कीच निभावला जाईल. काही झाले तरी आपल्यात संवाद हवा. मला वाटते जेव्हा संवाद संपतो तेव्हा नाते ही संपते.

मुलांच्या शाळेच्या शिबिरात एकदा मला प्रश्न विचारला होता की तुमचा मुलगा कोण व्हावा असे तुम्हाला वाटते? यावर मी उत्तर दिले की मी स्वत: शिक्षित आहे. त्यामुळे पोटापाण्यासाठी माझा मुलगा नक्कीच इंजिनिअर, डॉक्टर किंवा वकिल होईल पण मला वाटते की, त्याने आदर्श पती व पिता व्हावे. आदर्श पुत्र तर तो आहेच. मला कुटुंब व्यवस्था व नाते संबंध खूप महत्वाचे वाटतात कारण त्यामुळेच माणसाचे व्यक्तीमत्व फुलते, खुलते व तो संस्काराने समृद्ध होतो असे मला वाटते. पुरूष असो व स्त्री दोघेही नातेसंबंधाने समृद्ध असावी म्हणजे ती परिपूर्ण व समाधानी असतात. पुरूषाच्या जीवनात त्याच्या आई इतकेच त्याच्या पत्नीचे अस्तित्व ही तितकेच महत्वाचे असते. तसेच बहिण मावशी, आत्या, मैत्रीण या नात्याचीही आवश्यकता असतेच ना ! नात्याची किंमत आयुष्यात खूप मोठी आहे गं ! उत्तम सहचर तुमच्या आयुष्याचे सोने करतो तर निवड चुकली तर तुमचे आयुष्य नरकमय होते. हे म्हणजे असे आहे की, प्रवासात जर तुमचा सहप्रवासी व तुमची आवड निवड सारखीच असली की तो प्रवास म्हणजे सुरेल संगिताची जमलेली मैफीलच वाटतो व कधी संपतो ते देखील कळत नाही. अगदी असेच आयुष्याचेही आहे.

पण कधी माझा मुलगा हताश झाला, त्याला उदासवाणे वाटले व त्याने कधी माझ्या मांडीवर डोके टेकवले तर तू वाईट वाटून घेऊ नकोस हा तुझा पराजय आहे असे चुकूनसुद्धा मनात आणू नकोस. अगं, आई हे नात असच आहे की आपण कितीही मोठे झालो असलो तरी आई समोर लहान व्हावेसे वाटतेच नां. बस एवढंच समजून घेशील ना? आई व बायको यात तुला कोण आवडते? असा प्रश्नच चुकीचा आहे. त्या दोघी आपल्या जागी श्रेष्ठच आहे. त्यांच्यात तुलना होऊ शकत नाही.

लग्नाचे सुरूवातीचे दिवस म्हणजे नात्यांच्या बांधणीचे दिवस, हे दिवस खूप महत्वाचे असतात गं ! सगळ्यांसाठीच. ती वीण एकदा घट्ट झाली ना तर मग काळजी मिटते बघ! म्हणजे बघ, इमारत बांधत असताना जसा तिचा पाया महत्वाचा असतो तसाच लग्नाच्या सुरूवातीचा काळ, नंतर मग कितीही वादळवारे आले तरी इमारत भक्कम उभीच असते बघ.

आता राहिला प्रश्न व्रत, वैकल्ये, उपासतापास, परंपरा या विषयी. माझ्या मते व्रत वैकल्ये, उपासतापास हे नातेसंबंध दृढ करण्यासाठी असतात. घरातील परंपरा पाळून उपास करून मी ही तुमच्यातील एक आहे, मला तुमच्याबद्दल काहीतरी वाटते हे सांगायचे असते. तर सण वार परंपरा या कुटुंबाला शिस्त लावण्याचे काम करतात. नियमांनुसार वागण्याचे शिकवितात. आपण ह्या सर्वातील मर्म जाणून घेतले व स्वयंशिस्त ठेवली तर मग वेगळ अस काही करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. मग नवऱ्यासाठी उपास, वडाला फेरे घालण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. वडाला फेरे घालून नवऱ्या आयुष्य वाढत नसते. तर

त्यासाठी त्याच्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे असते हे एकदा कळले की मग हातभर हिरव्या बांगडया, व गळाभर काळे मणी नाही घातलेस तरी चालतील.

तुझी नोकरी व तुझे करियर कधीच दुय्यम मानले जाणार नाही. कारण मला तुझी प्रगती झालेली बघायची आहे. स्वयंपाकाची तुला विशेष आवड नाही हे मला माहित आहे. पण तरीही प्रत्येक स्त्री पुरूषाला स्वयंपाक हा करता आलाच पाहिजे असे मला वाटते. ही पण काळाची गरजच आहे. तुम्हाला तुमचे उदरभरणं करता आलेच पाहिजे. सतत बाहेरचे खाल्यामुळे आज तरूण वयातच मुलांना अनेक गंभीर आजाराना तोंड द्यावे लागत आहे. तू ही उद्याची माता आहेस. तुमच्यातीलच सत्व घेवून तुमचे मुल येणार आहे तेव्हा त्याला द्यायला तरी तुमच्याकडे काहीतरी हवे ना गं ! तरच ते सुदृढ होईल.

मुलींना हल्ली रांधा वाढा उष्टी काढा नको असतं. म्हणून लग्नच टाळतात. पण जरी तुम्ही माहेरीच राहिलात तरी हे टळणार आहे का? आपण एकदा मोठे झालो की हे सर्व अपरिहार्यच असते गं ! मग त्याच्याशीच दोन हात करूयाना. एवढं काही अवघड नाही गं ते! आपणच हे अवघड करतो!

शेवटचा एक सल्ला तुझ्यासाठी आणि माझ्यासाठी पण, आपल्या अवतीभोवती अनेक लोकं, नातेवाईक, मित्र मैत्रिणी आपल्याला अनेक सल्ले देत असतात. जेणेकरून आपले एकमेकींबद्दलचे मत कलुशीत होत असते. आपण एकमेकींशी कसे वागावे असे जणू तेच ठरवत असतात व त्याप्रमाणे सल्ले ही देत असतात. पण आपल्या जवळ सारासार विवेक बुद्धी आहे त्यामुळे त्यांचे सल्ले किती मनावर घ्यायचे हे आपण ठरवायचे व आपल्या मार्गातील काटे आपणच दूर करायचे.

मला तुझ्या रूपाने एक सखी मिळाली आहे मनातलं बोलायला. मुलीची कमतरता तू भरून काढणार आहेस. एक नवथर तरूणीचे सुगृहिणीत रूपांतर होणार आहे. अंगणात लावलेल्या झाडाला बहर येणार आहे. ते फळाफुलांनी लगडलेलं मला बघायचं आहे. त्याच्या आश्रयाला आलेल्या पक्षांचा कलरव मला ऐकायचा आहे. त्याच्या सावलीत बसलेल्या पांथस्थाचा निवांतपणा मला अनुभवायचा आहे.

तुझ्या कुंकवाने भरलेल्या पावलांनी उंबरठ्यावरचे माप ओलांडताना मला तुला बघायचे आहे. तुझी आतुरतेने वाट पहात असणारी.

**तुझीच आई**

**(होणारी)**

***

**मनीषा पवार**

**चारोळ्या**

## चारोळ्या

नयन शोधिशी तुजला,
मन वेडे कावरे-बावरे.
धुंद वेडावल्या मनाला,
हाकेची साद तू घाल रे.
***

नयनांची अबोल भाषा,
तूच मनाची अभिलाषा.
तुजियात गुंतलेल्या ह्रदयाची,
हीच ती प्रेमळ स्वप्नरूपी आशा.
***

पहावे तिकडे नीरस शांतता होती,
हीच ती वादळापूर्वीची पहाट होती.
तुटलेल्या स्वप्नांच्या राशी मधली,
हीच ती,जीवघेणी सुनामी लाट होती.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhanjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**कथा**

# आयुष्याची सांज...

गाडी सुरु झाली आणि आजी आजोबानी बाहेर उभ्या असलेल्या एका दाम्पत्याला हात हलवून निरोप दिला, खाली उभे असलेले जोडपे नाजरेआड होईपर्यंत आजी डोळे किलकिले करत हात हलवत होत्या जणू काही तरी रहात होत त्याचं. गाडीने गती घेतली आणि मागच मागेच राहील. आता प्रवास सुरु झाला तो एका नव्या मुक्कामाचा. थोडावेळ ते दोघेही कसल्याशा विचारात होते अगदी अनोळखी असल्यासारखे पण काही मिनिटांतच त्यांची तंद्रि भंग झाली आणि ते एकमेकांशी बोलायला लागले, न राहवून मी विचारले मुलगा आणि सुन होते का? होय! आजोबा सामाधानाने उत्तरले, आणि माझ्या चेहर्यावरचे अगणित प्रश्न अनुभवाने पंढर्या झालेल्या त्या भुवई खालच्या डोळ्यांनी समजून घेतले. कुठल्याश्या आत्मियतेने त्यांनी माझ्याशी बोलायला सुरुवात केली.

माझे लहानपण एका खेड्यात गेले, घरची परिस्तीति तशी जेमतेमच, शिक्षणाने शहाणपण येत गेले आणि तसतशी व्यक्तिमत्वात् सुधारणा झाली, त्यावेळीही हेच ठरवल होत की पैसे कमावून श्रीमंत होण्यापेक्षा आयुष्य सामाधानाने जगता येईल अस काहीतरी करायच, आणि हो हे करत असताना कर्तव्यात मात्र कसूर नाही करायची, सुदैवाने तस घडतही गेल, योग्य वयात योग्य व्यक्ती जोडीदार म्हणून लाभली आणि आजही सत्यनारायनाच्या पुजेला बसुन माझ्या प्रत्येक शब्दाला री ओढावी तशी साथ मला ही देतिये. आजवरच्या आयुष्यात मी तिला भौतिक सुख किती दिलय ते माहीत नाही, पण सहचारिणी म्हणून मी नेहमीच तिला सन्मानाने वागविलि अर्थात तीनेही कधीच गैरफायदा घेतला नाही त्याचा.

संसार बहरत गेला, नविन जबाबदार्या आणि आव्हाने घेत जगायला आवश्यक ते सगळ करत गेलो. मुलाच्या शिक्षणात त्याच्या गरजांमधे कधी काही कमी पडु दिले नाही, त्याला सुशिक्षित, सुसंस्कारी बनवला आणि त्याला त्याच्या आयुष्यात खर्या अर्थाने जिथवर आमची सोबत गरजेची होती तिथवर ती दिली, त्याचे लग्न झाले सुन सुशिल, कर्तबगार आणि गृहकर्तव्यदक्ष मिळाली आमची साधना सफल झाली.

मला हे ऐकून फारच समाधान वाटले, आजच्या युगातही अस काही असत हे पाहुन वेगळच समाधान वाटल. मी आजोबाना विचारल चार दिवस गावाला निघालात का तुम्ही? आजोबानी दीर्घ श्वास घेतला आणि म्हणाले, नाही, आम्ही वृद्धाश्रमात निघालोय!. मी क्षणात सुन्न, चेहरा अनेक प्रश्नचिन्हांनि भरलेला. पण आजोबा आता तर तुम्हाला त्यांची खरी गरज आहे, या वयात तुम्ही एकटे...?? एकटे कुठे आम्ही दोघे आजही सोबत आहोत, आणि मुलाला जन्म दिला तो काही आमची म्हातारपनीची काठी म्हणून नाही तर आम्हाला आमचा संसार फुलवायचा होता म्हणून आम्ही आई बाप झालो, पण म्हणून आमच ओझ वाटेल अस आम्हाला काही करायचे नाही, आम्ही आमच आयुष्य हव तस जगलो ते त्यानीही जगाव एवढीच अपेक्षा, आणि त्यांच्या आधारावर जगण्यापेक्षा एका नविन जगात जगायला मिळत असेल तर त्यात वाईट काय आहे?

नाती तेव्हाच टिकतात जेव्हा त्याचं ओझ न होता ती सहजपणे फुलतात. वृद्धाश्रमात समवयस्क लोकांसोबत एका वेगळ्याच अनुभवात राहायला मिळते आहे, शिक्षणासाठी आईवडिलांना सोडून वसतिगृहात राहत होतो तसच काहीसा अनुभव आहे हा, आयुष्याची संध्याकाळ खर्या अर्थाने जगत आहोत, काही गोष्टी राहून गेल्या होत्या त्या करतोय, छंद जोपासतोय, प्रकृति सांभाळून जी समाजसेवा करता येईल ती करतोय.... आजोबा त्यांच्या या नव्या पर्वा बद्दल भरभरुन बोलत होते, त्यांचे चष्म्याआडचे डोळे तेजाने चमकत होते. मी मात्र माझ्याच विचारात गढुन गेले होते, इतका वेळचा तो प्रवास मला एक वेगळीच सकारात्मक दिशा दावून गेला. माझा दृष्टिकोण बदलणारे आजोबा आजी मला माझ्या प्रवासात कायमच मार्गदर्शक ठरतील.

***

**प्रियांका येवले**

**कथा**

## रंगात भेटले मी

अलार्म वाजतच होता. सरिताचे आज डोळे उघडेनात. डोळे चुरचुरतायत. बरेच दिवस झोप येत नाही. एक अनामिक हुरहुर लागून राहिलीय. विचित्र अस्वस्थता जाणवतेय. तरी उठलेच पाहिजे. नवर्यासाठी, मुलांसाठी डबा करायचा आहे. तरी बरं रात्रीच कणिक भिजवलीय. भाजी कापून ठेवलीय. मरगळलेल्या मनाला झटकत सरिता उठली. राजेश बेडवर निश्चिंत झोपलाय. हल्ली तोही लक्ष देत नाही आपल्याकडे. आरामात उठतो. मग घाईघाईत डबा घेवून जातो. संध्याकाळी दमलेला असतो. कुठे फिरायला जाऊ तर म्हणतो "तूला काय तू घरीच असतेस. मी दिवसभर काम करून थकतो. कधी घरी येवून झोपतो असे होते. कित्येक दिवसांत साधे चुंबनही घेतले नाही .हु ..कामाचा ताण खुप आहे त्याच्यावर. तसा तो खुप चांगला आहे. स्वतःच्या मनाला ती समजावत राहिली आणि डब्याची तयारी करू लागली .

"अग आई, किती उशीर झालाय. कॉफी दे ना पटकन." प्राचीचा आवाज स्वतःसाठी कॉफी करून घ्यायलाही वेळ नाही हिला. मीच लाडावलीय ना.
" अग आई , माझे सोक्स कुठे आहेत? काय करते तू दिवसभर घरात. वस्तू सापडत नाहीत." झाली निखिलची चिडचिड सुरू. अनेकवेळा सांगितलंय आदल्या दिवशी आपली तयारी करून ठेवा पण नाही. मी आहे ना आयत्यावेळी यांना हातात वस्तू द्यायला. दोघे गेले कॉलेजला. राजेशनेही डबा घेतला आणि निघून गेला. दोन मिनिटे जवळ पण घेतले नाही. का आपली चिडचिड होतेय सारखी काही कळत नाही. हे सगळे रोजचेच रुटीन आहे. हेच जीवन का आपले ? काय हवे आपल्याला आणखी.

घर सांभाळण्यासाठी राजेशने नोकरी करू दिली नाही. आपणही आनंदाने गृहिणीपद स्वीकारले. मग आता काय होतोय हा त्रागा ? कॉफी पीत टीव्हीवर बातम्या लावल्या. एका प्रसिद्ध चित्रकाराच्या चित्रप्रदर्शनाचे दृश्य सुरु होते. सरिता भान हरपून पाहू लागली. वेगवेगळ्या स्त्रियांची भावविभोर चित्रे त्यात होती. विविध रंगछटा.. विलोभनीय ! वा अप्रतिम !

सरिताला कॉलेज चे दिवस आठवले. चित्रकला स्पर्धेत तिच्या निसर्ग चित्राला प्रथम पारितोषिक मिळाले. घरिही चित्र काढत असे. आई म्हणायची, "अग चित्र काढण्यापेक्षा स्वयंपाक चांगला शिकून घे. संसाराला त्याची जास्त गरज आहे. चित्रकला हळूहळू कमी झाली. नंतर संसारात गुरफटून राहिली. चित्रे काढतात येतात हेही विसरून गेली.

असं कसं विसरलो आपण आपली आवड ? राजेश, मुलं त्यांना जे पाहिजे तेज करतात. घरची सगळी जबाबदारी माझ्यावर. त्यात काही चूक झाली तर खापर माझ्यावरच टाकतात. खुप उपेक्षा होतेय. सगळे गृहित धरतात. सरिताच्या डोळ्यातून लाल रंग वाहू लागला.

थकून डोळे मिटले. रंगाच फिरत आहेत डोळ्यांभोवती. लाल, निळा, हिरवा, पिवळा, केशरी, जांभळा. एकात एक रंग मिसळतोय. चक्र तयार होतंय. अहाहा! किती सुंदर हे रंग ! मला हवेत हे रंग. रंगात माझा आनंद आहे. मला खुप खुप चित्रे काढायचीत. आधी सामान आणायला हवे आणि ती लगबगीने खरेदीला गेली. पेपर बोर्ड, कॅनव्हास आणि रंग घेवून आली. प्लेटमध्ये रंग घेवून ती उभे आडवे रंगाचे पट्टे काढू लागली. मनातील घुसमट जणु रंगातून उमटत राहिली. काहीच सुसंगती नाही. २५ वर्षे रंग हातात घेतले नाही. हळूहळू मन हलके होत गेले दुसरा पेपर घेतला. इंद्रधनू साकारले. सप्तरंगात मन न्हावून गेले. नवनिर्मितीचा आनंद डोळ्यांतून वाहू लागला. मनी रंगांवर तरंगत राहिले. स्वतः स्वतःला भेटण्याची ती भावावस्था होती. संध्याकाळ झाली ते कळलेच नाही.

अग काय हा पसारा ? आणि कधीही बेल वाजवतोय ? शेवटी मीच लॅच उघडून आता आलो. सरिता भारावलेलीच होती. राजेशचे लक्ष चित्राकडे गेले. निरभ्र आकाशातील सप्तरंगी इंद्रधनू! " सरिता, अग हे तू काढलेस ? अरे वा ! माझी बायको एवढी कलाकार आहे हे माहित नव्हते. आणि त्याने तिला मिठीत घेतले. सरिताच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. मुले आली. आई काय हा पसारा? आणि जेवण ही नाही बनवले. " हो, नाही बनवले. संध्याकाळी स्वयंपाकात

आजपासून तू मदत करायची "मुलिला दटावलेच जरा आणि निखिल, घर स्वच्छ करायला मदत कर. माझ्या चित्र कलेसाठी मला वेळ हवा. तिघेही अचंभित होवून तिच्याकडे पाहत राहिले. राजेश अनिमिष नेत्रांनी सरिताकडे पाहत होता. सरिताच्या डोळयात एक वेगळेच तेज आलंय जे आजवर कधी दिसले नाही. हे तेज असेच राहिले पाहिजे. फक्त घरकामात डुबवून आपण अन्याय करतोय सरितातवर. आता इथुनपुढे असं नाही होणार तो मनोमन म्हणाला.

" चला रे मुलांनो, आज आईने खुप सुंदर चित्र काढले. त्याबद्दल आपण आज तिघे मिळून स्वयंपाक करू आणि तिला गिफ्ट देवू' आणि तो मुलांना घेऊन स्वयंपाकघरात गेला. सरिता तर रंगांवरच तरंगतेय अजूनही. रंगांनी मनातले किल्मिष दुर केले होते. नकळत गुणगुणू लागली.

"रंगात रंगले मी
रंगात मला भेटले मी
रंगात रंगले मी .

***

**अनिता सावंत**
**मोबाईल क्रमांक : ८८७९०११८९४**

## मराठी विचारधन

आपण महान गोष्टी करू शकत नाही तर, महान मार्गामध्ये लहान गोष्टी करा.

***

**संग्रहित**

## मराठी विचारधन

एखादी **चांगली गोष्ट** मुळीच न करण्यापेक्षा ती कमी प्रमाणात करणे किंवा सावाकाशीने करणे श्रेयस्कर.

***

**संग्रहित**

**कथा**

# आदर्श मैत्रीच एक पत्र

**प्रिय मित्र / मैत्रीण......**

खरच ! सुरवात कुठून करू? तूझ्या त्या गोड हास्यापासून, तूझ्या मनमोकळया, प्रेमळ स्वभावापासून, की सदैव आपुलकी भावना जपणाऱ्या नेत्रांपासून......

“मैत्री” हा दोनच अक्षरी शब्द पण संकटाच्याकाळी सदैव मदतीचा हात, यशात कौतुक अन् शाबासकीची थाप पण तितकेच कठोर शब्द माझ्या चुकीच्या प्रत्येक ठिकाणी देणारी फक्त तूच.... आणि म्हणूनच तूझी साथ लाभल्यापासून पुन्हा कधीही या खाचखळग्यांनी भरलेल्या जीवनात मागे न फिरण्याची शपथच घेतलीय.

तूझ्या सारखी मैत्रीण मिळणं म्हणजे माझं भाग्य व जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत ती सदैव अशीच राहण म्हणजे या जन्माच सार्थक.

तू नसतीस तर? माझ्या या ध्येयाकडे वाटचाल करणाऱ्या अजानतेपणातून जानतेपणा घेणाऱ्या माझ्या या तारूण्यात सुगंध भरण्याच काम कुणी केलं असतं? नाही तर हे फूल कसं बसं फुलुनही कोमेजलेलं व सुगंधीहीन राहील असतं.

तूझ्या सहवासात घालवलेला प्रत्येक दिवस म्हणजे माझ्यासाठी खरोखर मेजवानीच आहे.तू समोर नसतांना तूझ्या आठवणीत घालवलेला दिवस ही अविस्मरनियच! कधी कधी घडणारी आपली प्रेमळपणाची भांडण, कधी कधी राग आल्यानंतर तू धरलेला अबोला पण त्यानंतर लगेचच तूझा येणारा सुंदरसा sms म्हणजे जोरदार पावसानंतर आकाशात आलेलं इंद्रधनुष्य आहे.

माझ्या आजरपणात तू घेतलेली काळजी म्हणजे डॉक्टरने दिलेल्या औषधापेक्षाही गुणकारी आहे. परीक्षेच्या काळात केलेली मदत, अपयशात तू दिलेले प्रोत्साहन व पुन्हा

नव्याने उभे राहण्यासाठी तू निर्माण केलेला विश्वास कसे बरं विसरता येईल?

रक्ताची नाती मला तर दैवाणं मिळाली. काही नाती मी जोडली पण काही न जोड़ताही अपेक्षितच जोडली गेली ती तुझ्याशी मैत्री...

कदाचित सर्वच भावना शब्दात मांडता येत नाही परंतु भावनारूपी शब्दातून निखळ मैत्रीचं अस्तित्व अबाधित टिकून राहत. म्हणूनच या शब्दरूपी भावना आज नकळतपणे मांडत आहे .कारण आंधळ्या प्रेमापेक्षा मैत्रीरूपी प्रेमाच आयुष्य अजरामर आहे. हे मैत्रीरूपी प्रेमाचं नातं अंकुरल तर आहेच व सदैव फुलत राहणार यात शंकाच नाही. कारण ते फूलवणं फक्त तूझ्या आणि माझ्याच हातात आहे.

माझ्या या मैत्रीच्या मंदिराला तुझ्याकडून मिळालेला विश्वासरूपी पाया, प्रेमळरूपी भिंती व आपलेपणाचा कळस आहे म्हणूनच सगळ्यांना हेवा वाटावा व आदर्श निर्माण व्हावा असं काही नक्की आहे. म्हणूनच मी म्हणेन.........

**तूझी मैत्री माझ्यासाठी**
**परमेश्वराचं वरदान आहे.**
**माझ्या जीवनात तूझं स्थान**
**त्याच्याएवढं महान आहे.**
**तूझ्या माझ्या मैत्रित आहे**
**नक्कीच काही खास,**
**तूझी माझी मैत्री म्हणजे**
**दोन जीव एक श्वास.**

खरं तर ह्या भावना कधी थांबणार नाहीत पण म्हणतात ना "मनाचा ब्रेक, उत्तम ब्रेक" म्हणूनच माझ्य शब्दांना पूर्णविराम देते. सदैव खंबीर साथ
**तूझीच मैत्रीण.....**
***

**योगिता किरण पाखले**
**पुणे**
**ई पत्ता : yogitakotkar51@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९२२५७७९४६५८**

कथा

## पाठलाग

‘आपण काय करता ? मी मृत्यू चा पाठलाग करतो ! सहजपणे तो म्हणून गेला पण, सचिन मात्र पुरता गांगरला. म्हणजे काय ? सचिन न विचारल .

तो पुन्हा गूढ हसला, आणि म्हणाला, तुला एक गोष्ट सांगतो !

सचिनने कान टवकारले. तो सांगू लागला. बुर्हाणपूरचा एक जमिनदार होता. रहाणी ही साजेशी. जमिनदार मोठा हौशी होता. त्यान मोठा वाडा बांधला ! राजवाडाच म्हण ना ! न तुटणार्या फुटणार्या विटांचा ! त्यात कारंजी, पुष्करण्या तयार केल्या ! सुंदर बगीचे बांधले ! अवर्णनीय ! त्याचे वैभव पाहून, सारे अचंबित होत असत.

जमिनदार मौठा दानी होता. त्याची पत्नी ही त्याला साजेशी होती रुपवान, गुणवान ! मोठे याग केले, समाराधना केल्या ! एकदिवस एक म्हातारा आला त्याने सांगितले माझ्या मुलाला, दूर्धर आजार झालाय त्याच्यासाठी काहीतरी करा. त्यान पैसे दिले, चांगल्या वैद्याची नेमणूक केली. तरीही तो काळाने नेलाच ! म्हातार्याला शोक अनावर झाला त्यानेही प्राण त्यागला. हा जमिनदार वैद्यावर ओरडला, मूर्ख आहात तूम्ही ! एवढा पैसा ओतला पण यश दिल नाहीत ! आवाक्यात नव्हते तर सांगायच होत ! लौकिक धूळीस मिळवला माझा ! हे ऐकून तिथला भीकारी म्हणाला अरे मृत्यू पैश्याने नाही रोखता येत ! त्यान रागान भीकार्याकडे पाहील. भीकारी हसला म्हणाला अरे प्रत्येकजण पाठलाग करतो मृत्यूचा .! मी ही करतोय आणि सर्वांना वाचवतो म्हणणारा वैद्यही ! हा वैद्य आहे म्हणून किंवा तू जमिनदार आहेस म्हणून मृत्यू थांबणार नाही ! आणि खरच तो वैद्य ही अचानक निधन पावला ! जमिनदाराला कळल त्याच्या कानात भीकार्याचा आवाज घुमला , आणि वैभवाचा त्याग करुन तो मृत्यूला शोधायला निघाला.

सचिन ने विचारल कुठे गेला तो ? मीच तो जमिनदार ! मृत्यूचा पाठलाग करतोय ! पण खर सांगू तोच

करतो सगळ्यांचा पाठलाग ! तो उठला आणि निघाला रस्ता ओलांडताना भरधाव ट्रकने त्याला उडवल, तो गतप्राण झाला. सचिन अविश्वासाने बघत राहीला . त्याच्या कानात शब्द घुमू लागले पाठलाग मृत्यूचा पाठलाग !

***

**वैभव नारायण जोशी**
**अंबरनाथ**
**ई पत्ता : vnjoshi591@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९६०४२८२१३३**

चारोळ्या

## चारोळ्या

पावसाच्या रिमझिम बरसणा-या धारा,
रंगबिरंगी होड्या शोधती किनारा.
बालपणीच्या आठवणींना मिळाला उजाळा न्यारा,
टपटप संगीतमय धुंदीत,धुव्वादार जलधारा.
***

नयनांचा कटाक्ष,
जीव घायाळ करी.
अल्लड अबोल भावांशी,
मनाची हितगुज उरी.
***

पाणावलेल्या डोळ्यात,
जणू विरह वेदना दाटल्या.
घायाळ मनाच्या आशाच,
पार कायमच्या तुटल्या.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhanjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कथा

## चपराक

अहो ! रात्रीचे ११ वाजत आले. आता तरी पोलीसात कळवा. ते शोधून काढतील त्याला. आपण सगळीकडे फोन करून पाहिले. मित्रांकडे देखील चौकशी केली. पण बबलुचा कुठेही ठावठिकाणा लागत नाही.

हं ! मी फोन करण्यासाठी रिसीव्हर उचलला. एवढ्यात बेल वाजली. बायकोने धावत जाऊन दरवाजा उघडला. एक गरीब दिसणारे जोडपे दारात उभे होते. कुठल्या तरी झोपडपट्टीत रहात होते. घरात बसलेले शेजारी पण चक्राउन गेले.

काय पाहिजे तुम्हाला ? दिवस नाही रात्र नाही. केव्हाही भिक मागायला येतात. माझी उच्च मध्यमवर्गीय कॉलर माझ्या बोलण्यात उतरली.

ओ साहेब ! वाईच त्वांड संबाळून बोला. झोपडपट्टीत रातो. गरीब हे पन भिकारी नाय. काय मागायास न्हाई, वाईच देयलाच आलुया. असे म्हणत तीने बबलुला आमच्या समोर ढकलले. घ्या आपल प्वार तेब्यात. जीव द्यायला उभ होत रेल्वे पटरी वर. माझ्या दादल्यान पायल, आनी आनल पकडुनशान त्येला. माझ पोरग बी शिकतुया त्याचेच किलासमंदी. माप करा सायेब. पण दोन थोतरीत बी मारल्या त्येवा. मग इचारल काय झाल सांग. आनी काय सांगू. प्वार कुशीत शिरून ढसाढसा रडल वं ते. रिडु दिल त्येला. शांत झेल्यावर जीवु घातल. मग इचारल काय झाल ? जीव का देयास निघाला ? आनि ते बोलल...

मावशी थांब ! मला सांगु दे. बबलु बोलला. मी सांगतो मी का जीव देणार होतो ते. आई ! बाबा !! माझे हे 10वी चे वर्ष म्हणुन तुम्ही तुमची प्रतिष्ठा पणाला लावली होतीत. मी बोर्डाच्या परिक्षेत ९५ % किंवा जास्त मार्क मिळवावेत म्हणुन निरनिराळे क्लास लावलेत.

सकाळी ५ ते रात्री १२ पर्यंत अभ्यासात गुंतवुन ठेवलेत. अभ्यास, अभ्यास आणि फक्त अभ्यासच. खेळ नाही.

सिनेमा नाही, कसलेच मनोरंजन नाही कि धड झोप नाही. फक्त अभ्यास एके अभ्यासच. कंटाळा आला होता हो मला या अभ्यासाचा.

अहो ! मी असे ही मी ८५-९० टक्के मिळवतोच आहे ना ! मग त्या जास्तीच्या ५-१० टक्यांसाठी का मला वेठीस धरले तूम्ही ? कदाचीत आई सारखा किंवा तुमच्या सारखा खुप नाही शीकु शकणार मी. पण मिळालेल्या मार्कांवर सुध्दा मी मोठा होऊ शकतो ना ! मग का तुमच्या अपेक्षांचं ओझे माझ्यावर लादलेत ?

मला मान्य आहे हे सर्व तूम्ही माझ्या चांगल्यासाठीच करता आहात. मला डॉक्टर किंवा इंजिनिअर करावयाचे आहे. पण त्यामुळे मी किती दडपणाखाली वावरतो आहे हे तुम्हाला समजत का नाही ?

मी जर तुमची अपेक्षा पूर्ण करु शकलो नाही तर ? मी मिळवतो त्यापेक्षा कमी मार्क मिळाले किंवा नापास झालो तर? तुम्हाला किती मनस्ताप होईल याच दडपणाखाली जीव द्यायचा विचार मनात आला. आणि मी या मार्गाकडे वळालो.

आर पोरा ! ते तुझे आई बा हाईत. तुज्या चांगल्या साठीच ते हे करुत होतं. वाईच जास्त होतु. पण तुज आयुषा मंदि काय बी वंगाळ होऊ नये म्हणुनशान केल त्येन्ली हे. तु नापास झालाच तर वाईटच वाटल् त्येस्नी पण तु जीव दिलास तर काय आनंद हुनार हाय का ? किती वाईट वाटल् त्यास्नी. कधी सोताला माप बी नाय करु सकणार ते. याचा ईचार नाय केलास तु. लई वंगाळ वागलास बघ प्वरा. पईल्यांदा त्येंची पाय धरुनशान मापी माग.

आन तुमी वो ! आई बा न त्याच. ओ सायेब ! मोटे सिकलेले ना तुमी. थंडगार हापीसात साहेब न तुमी. धा मानस हाताखाली असतील न व्हो तुमच्या. तुमाला बी समजत नाय. सोताला लई सिकलेले मनताना, आपल्या पोराच मन नाय कळव वो तुमास्नी. थु ! तुमच्या सिकसणावर. आनी ए भवाने ! आय ना तु त्येची. नऊ मईने प्वटात वाढीवलस ना त्येला. तुला सुदिक अक्कल नाय. माया हाय काय नाय. तुमी दोग बी गाव उंडारत असतुया आन पोराला अभ्यासाला जुंपतुया. ते पोरग केवढ तेला अभ्यास केवढा. दोन चार मारक कमी पडले तर काय आभाळ कोसळणार होतु कि काय ?

खर मनाल तर तुमच्या बी दोन कानसुलात हाणायला पाईजे. अवो जरा त्येला, त्येच्या मना परमान वागु दे कि. जरा खेलु दे. फिराया जाऊ दे. शिणुमा बगु दे. मग बगा कसा चांगला अभ्यास करतुया ते. आन मारक बी चांगले मिळवतुया. आवो अभ्यास करायास, झोप बी इयाक वावयास पायजे. मन बी परसन लागतय बगा.

आमच्या दादल्यास दम दिलाय बगा. आपल्या पोराची परिक्सा होई पतुर बेवडा पीऊनशान घरात नाटकं करायची नाय. पोराच्या अभ्यासात डिस्टुरब नाय पायजे. नायतर पायतानान हानीन म्या.

अवो सायेब ! शिकलेली मानस मोप हायत बगा या जगात. त्येला चांगला मानुस बनवा कि. देव काय बी सुदिक कमी पडु देनार नाय बगा त्येला.

सायेब ! चलतुया आमी. आमचे मनात काय वायट नाय बगा. आत बाईर नसत अमच. काय असेल ते त्वंडावर बोलतुया बगा आमी. आवो माझ बी प्वार एवढच हाय बगा. म्हनुनशान जिव तुटला माझा. काय वंगाळ बोललु असल तर माप करा सायेब. संबाळा प्वराला. येतुया आमी. शेजारी देखील निघून गेले. आम्ही दोघांनी बबलुला मिठीत घेतले. आई ! बाबा ! माफ करा मला. मी पुन्हा असे नाही वागणार.

अरे ! बबलु तुच आम्हाला माफ कर. आजुबाजुला बघुन आम्ही आमच्या अपेक्षांचं ओझे तुझ्यावर लादले. पण त्यात तुला चांगले मार्क मिळावेत, चांगल्या कॉलेजात ॲडमिशन मिळावी. उच्च शिक्षण मिळावे हाच हेतू होता रे.

पण नाही ! आता तसे होणार नाही. तु मुक्त आहेस. तुझ्यावर आमचा विश्वास आहे. चांगला अभ्यास करशील व चांगले मार्क मिळवशीलच. तेव्हा उद्यापासुन परिक्षा होई पर्यंत तु सकाळी ६ ते दुपारी १ वाजे पर्यंत अभ्यास. नंतर १ ते ३ पर्यंत जेवण व थोडी विश्रांती. मग ३ ते ६ पर्यंत अभ्यास. मग ६

ते ८ पर्यंत कंपलसरी २ तास तुझ्यासाठी मोकळा ठेवशील. त्यात तु खेळावयास जा, फिरावयास जा टिव्ही बघ. तुला काय हवे ते करशील. मग १० पर्यंत आपण एकत्र जेवायचे. आणि तु मग १०-१०:३० पर्यंत झोपायला जायचे. रात्रीचे जागरण देखील बंद. मग असा अभ्यास करुन कितीही मार्क पडले तरी आम्हाला त्याचा अभिमानच वाटेल.

काय हो ! मी म्हणते आहे ते बरोबर आहे ना. पटतय ना तुम्हाला !! हो हो. पटतय ना. माझ्या तोंडून कसेबसे शब्द बाहेर पडले. बबलु आपल्या रुम मधे झोपायला गेला. आम्ही दोघे आमच्या बेडरूम मधे आलो. मग मी गॅलरीत आलो. एक सिगारेट पेटवली. हि बाजुला कधी येऊन उभी राहिली समजले देखील नाही. अहो ! आता मला समजले कि आपण किती अन्याय करत होतो बबलुवर. बिचारा ! आपल्यासाठी सगळ्या आपल्या ईच्छा मारुन अभ्यास करीत राहिला. So called competition मध्ये बिचारी मुले भरडली जातात. या जगाच्या रॅट रेस मधे आपल्या मुलांच्या बालपणाचा नाहक बळी आपणच देतो.

किती योग्य शब्द वापरला होता हिने. "रॅट रेस" आजकाल शिक्षण हे शिक्षण राहिले नसुन एक रेस झाली आहे. जो जिंकला तो जगला. असाच सर्वांनी समज करुन घेतला आहे. आपणच विचार करायचा कि हे योग्य आहे का? का आपण त्यांचे बालपण हिरावुन घेऊन त्यांना या दुष्टचक्रात ढकलतो ? का आपण परिक्षेचा व रिझल्टचा एवढा बाऊ करतो ? त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे वागु दे. अभ्यासा बरोबर खेळ व मनोरंजन हि हवे. नुसतीच शैक्षणिक सुदृढता नको. त्याच बरोबर शारीरिक व मानसिक पण सुदृढता देखील पाहिजे.

अहो ! चला !! झोपायला जाऊया. आज बऱ्याच दिवसांनी आपल्यालाहि मोकळेपणा मुळे शांत झोप लागेल.

बरोबर बोललिस तु. आज आपण देखिल एका आपणहुन ओढाऊन घेतलेल्या मानसिक तणावातुन मुक्त झालो आहोत.

एवढे शिकलेले आम्ही, पण असे ताळ्यावर येण्यासाठी शेवटी झोपडपट्टीतील एक अनपढ "चपराकच" कामी आली.

***

**अजित करंबेळकर**
**ई पत्ता : ask250560@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८१९४८९४८०**

**कविता**

## *भाकीत*

भाकीत होतं सांगितलं
बळीचं राज्य जाऊन
कलीचं राज्य येईल
बळीच्या स्वप्नातला भारत
कलीच उध्वस्थ करील....
कलीच्या राज्यात पडेल
म्हणे पावसाचा दुष्काळ
सज्जनांच्या माणगुटीवर
बसणार्यांचा होईल सुकाळ..
खोट्याचा होईल प्रसार
खर्यावर जाईल वारं
भ्रष्टाचारी जगात सामान्य
माणसाचं नसेल काही खरं ..
क्षणोक्षणी आजकाल
भाकीताचा प्रत्यय येतोय
रक्ताचे नाते विसरून माणूस
स्वकीयांचे रक्त पितोय...
कोण जाणे पुढे आता
कोणाचं राज्य येईल
तोपर्यंत माणूस इथला
कुठल्या थळास जाईल

***

**घनश्याम बोहाडे**
**बुलडाना**
**ई पत्ता : ghanshyamborhade@rediffmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८३०८४३२६२५**

कथा

## एकटी

अग ! ऐकलेस का ! काल त्या ९ नंबर कडे ७-८ पुरुष आले होते. तिन-चार तास होते म्हणे घरात.अग ! हो ! रात्री १०-१०:३० गेले सगळे. आमच्या ह्यांनी पाहिले ना त्यांना बाहेर पडताना.  हि वाक्ये ऐकुन मी जरा जिन्यात थबकले. माझ्या बद्दलचे बोलणे चालू होते.

कोणीतरी जाब विचारला पाहीजे तिला एकदा. काय हि मेलं थेर. अशा मुळे आपल्या सोसायटिचे नांव खराब  होते. सगळी सज्जन माणसे राहतात म्हण ईथे.  हो ! ग ! आपण सर्व जणी मिळुन विचारु एकदा.

आता मात्र माझा संयम सुटला. दमुन भागुन आले होते. तरी पण याचा सोक्षमोक्ष आज लावायचाच व मी त्याच जोशात पुढे सरकले. काय म्हणताय ! कोणाला विचारायचा आहे जाब मला. काय वाईट वागते हो मी. कधी तुमच्या कडे काही मागायला आले आहे का ? का मेंटेनस चुकविला आहे. का दारु पिऊन धिंगाणा घालते मी. आणि मला नावे ठेवताना आपल्या घरात जरा डोकावुन बघा. म्हणे सगळे सज्जन रहातात ईथे. खाली मुंडी आणि पाताळ धुंडी. आज यांची कुंडलीच मांडायची ठरविले मी.

काकू ! तुमचा नवरा सज्जन आहे ना ! परवा तुमचा नवरा मला विचारत होता. अशी एकटी का रहातेस. हौस नाही. मौज मजा नाही. तुझा वाढदिवस आहे ना चार दिवसांनी. मी तुला हॉटेल मधे पार्टी देतो. हि पण माहेरी गेली आहे. कॅन्डल डिनर घेऊ आपण. म्हटले तुम्हाला कसा माहित माझा वाढदिवस. अग ! एफ.बी. वर पाहिली ना तुझी जन्म तारीख. हा तुमचा सज्जन नवरा. आणि ताई ! तुमचा मुलगा. आठ दिवसां पुर्वी लेडीज बार मधल्या धाडीत पकडला होता पोलीसांनी. तो इंस्पेक्टर माझा कॉलेज मेट होता. सोसायटीचे नांव समजल्यावर मला फोन लाऊन सांगितले. व माझा शेजारी आहे सोडुन द्या हे सांगीतल्यावर फक्त दम देऊन सोडुन दिले. हा सज्जन !! मावशी ! तुमचा मुलगा. कॉलेजला जाताना मला काल सकाळी वाढदिवसाच्या शुभेच्छा व सेंटची बॉटल घेऊन  आला होता आणि ६ ते ९ सिनेमाच्या शोची ऑफर देऊन गेला. काल गेले असते ना त्याच्या बरोबर सिनेमाला, तर आज हे तुम्ही बोलु शकला नसतात. आणि काकु !  दोन विंग सोडुन रहाणारा तुमचा भाऊ ! आठ दिवसांपुर्वि आमच्या मजल्यावरची ट्युब घालवुन,

माझ्या दारा समोर ऊभा होता. पण शेजारच्या कदम काकू माझ्या बरोबर बघुन " हं हं हं ! ट्युब गेली म्हणुन बघायला आलो होतो. " म्हणुन पसार झाला. दोन विंग सोडुन रहाणार्या तुमच्या भावाला आमच्या मजल्यावरची ट्युब गेली आहे हे कसे काय समजले हो ! आता विचारणार का जाब त्याला हं ! म्हणे सज्जन रहातात ईथे. हिच व्याख्या आहे का तुमची सज्जनपणाची.

अहो ! मी ईथे एकटी रहाते. नोकरी करुन माझे आणि गावी माझ्यावर अवलंबून असलेल्या माझ्या वयस्कर आई-वडिलांचे पोट भरते. माझ्या दोन लहान बहिणीचे शिक्षण करते. काय माहिती आहे तुम्हाला माझ्याबद्दल. आपली उचलली जीभ लावली टाळ्याला.

अरे ! तुम्ही पण एक स्त्री आहात. तुम्ही तरी मला समजुन घेतले पाहीजे होते. मला एकटी बघुन आपुलकीने मदत करायची सोडुन मलाच जाब विचारला येताय. मला आता पुढचे बोलवेना. गोळा केलेला सगळा जोश संपत आला होता. एक जोरदार हुंदका बाहेर पडला आणि मी धावतच माझ्या ब्लॉक मधे शिरले. बेडवर पडुन ओक्साबोक्षी रडायला लागले. अर्ध्या तासाने उठले. फ्रेश झाले. कपडे बदलले. जेवण करायची ईच्छाच नव्हती. तशीच बेडवर पडुन विचार करायला लागले.

मला हौस मौज करावीशी वाटत नाही का ? आज माझे वय ३० आहे. योग्य वयात लग्न झाले असते तर  आज दोन मुलांची आई झाले असते मी. मला नाही वाटत का माझा हि संसार असावा. एक-दोन गोजीरवाणी  मुले असावीत. पण या घरच्या जबाबदार्या सांभाळताना नाही मी लग्न करु शकत. आई-वडिल, दोन लहान बहीणींचे शिक्षण, त्यांची लग्ने या सर्व जबाबदार्या मलाच, एका मुला प्रमाणेच पार पाडायच्या आहेत. कोण सांगणार यांना समजावून. एकटी स्त्रि म्हणजे यांना आपली मालमत्ता वाटते. मदत करायच्या

उद्देश्याने जवळीक साधतात. मिळेल तिथे चान्स घ्यायला बघतात.

काल आलेले पण तसलेच. पण ऑफिस मधले असल्याने टाळता पण आले नाही. कोण समजतात हे स्वताला. अबलांचे कैवारी. स्त्री एकटी रहाते समजल्यावर लागले लगेच हुंगायला. मला हे समजत नाही असे वाटते कि काय यांना. घरापर्यंत सोबत काय करतील. पैशाची मदत काय करतील. गोड गोड बोलतात आणि भुलवायचा प्रयत्न करतात.

जाऊ दे ! म्हणुन फेसबुक ओपन केले. बघते तो काय. ७५ वाढदिवसाच्या शुभेच्छा. इनबोक्समधे १५ मेसेजेस. कोणी गिफ्ट घेतल्याचा मेसेज...कोण थिएटर जवळ वाट पाहतोय...कोण हॉटेल बुक करायला तयार...कोणी चोरलेली शायरी केलेली...एकाने तर "असा किती दिवस एकटीने वाढदिवस साजरा करणार, दोघे मिळुन साजरा करु. कायम लक्षात राहिल अशी गिफ्ट देईन". असा द्विअर्थी मेसेज. शी ! ईतकी उबग आली ना मेसेज वाचुन. फेसबूक वर पण एकटी असणारी स्त्री सुरक्षित नाही हेच खरे.

अरे ! स्त्री एकटी रहाते म्हणजे काय तुमच्या मनोरंजनासाठी सदैव अवेलबल आहे कि काय ? का एकटी रहाते ? कुठल्या कारणाने अशी एकटी रहाते ? याचा विचार करा ना ! या लांडग्यांच्या दुनियेत अशी एकटी स्त्रि कशी स्वतःला सांभाळत असेल.

सोसायटी मधे तेच. ऑफिसमधे तेच. फेसबुकवर पण तेच. एकटी स्त्रीया जगात कुठेच सुरक्षित नाही हेच खरे आहे. ऑफिसमध्ये बॉस असलेली स्त्री चालत नाही. पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन नोकरी करणारी स्त्री नको असते. ति पैसा कमविते, पण त्या पैशावर पुरुषी अधिकार. स्त्रीचे गुणगान करताना पुरुषी अहंकार आड येतो. अरे !

वर्षभर स्त्रीचा मान राखा फक्त एक दिवस आमचा मान म्हणुन वुमन्स डे साजरा करु नका. वुमन्स डेला शुभेच्छांचा पाऊस पडतो सगळीकडे. बायकांचे गुणगान होते. पण...

**"नाही मिळत संधी, तो वर साधू**
**मिळाली संधी, कि संधीसाधू"**

आज अशा कितीतरी जणी एकट्या रहात आहेत. कोणी आई-वडिलांना आधारासाठी. कोणी करिअरसाठी. कोण घटस्फ़ोटीता म्हणुन. तर कोणी नवर्याने टाकलेली म्हणुन. कारणे अनेक पण रिझल्ट एकच " एकटी."

***

**अजित करंबेळकर**
**ई पत्ता : ask250560@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८१९४८९४८०**

**चारोळ्या**

## चारोळ्या

आयुष्य म्हणजे जीवनाचा,
खडतर,आडवळणी प्रवास आहे.
“अनुभव” जगण्याला देणारा,
नवचेतना विकास आहे.
***

स्मित हास्याने तुझ्या,
मन घायाळ झाले.
प्रेमरूपी सागरात,
जणू वाहवत गेले.
***

पावसात चिंब भिजताना,
सख्या आठवण तुझी झाली.
अश्रूंनी भरलेल्या माझ्या मनात,
वेदना विरहाची देवूनी गेली.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

लेख

# गुन्हा कुणाचा ... सजा कुणाला

अहो ! माझ्या मुलिचे लग्न आहे हो. त्या साठी मला माझे ठेवलेले पैसे हवे आहेत. आत्ता जर मला ते नाही ते नाही मिळाले तर मी कोणाकडे हात पसरु. हे लग्न मोडेल हो. " "अहो ! हिच्या ऑपरेशन साठी मला पैशाची गरज आहे. मला माझी FD मोडायची आहे."

"अहो काका ! आम्ही नियमा प्रमाणे फक्त ५० हजार देऊ शकतो. ते सुद्धा वरुन ऑर्डर आल्यावर." असे संवाद कुठल्याही बुडालेल्या बँकेत, तेथील क्लार्क व एखादी वयस्कर व्यक्ती यांच्या मधे आपणांस ऐकावयास मिळेल.

आपल्या मुलीच्या लग्नाला म्हणुन त्या बापाने एका सुस्थीतीतील, नावाजलेल्या बँकेत आपले पैसे Fix Deposit मध्ये ठेवलेले असतात. सर्व काही व्यवस्थीत चालु असते. दरवर्षी बँकेचे Deposit वाढत असते. बँक दाखवीत असलेला ऑडिट रिपोर्ट चांगला येत असतो.

अचानक एका दुर्दैवी सकाळी बँक बुडाली असे समजते. बँकेचे सगळे व्यवहार RBI ने ताब्यात घेतले. बँकेच्या व्यवहारा वर निर्बंध आणले. कोणीही आता त्या बँकेतुन पैसे काढु शकत नाही अशी नोटीस लागते.

याला दुर्दैव म्हणायचे, कि अनागोंदी कारभाराचा अजुन एक नमुना म्हणायचा. काही माणसांना Capacity पेक्षा जास्त कर्ज दिले गेले व आता ते recover होत नाही म्हणुन बँक बुडाली.

यात दोषी कोण. सर्वसामान्य माणसाने बँकेवर विश्वास ठेऊन बँकेत पैसा ठेवला म्हणुन तो दोषी...का अशी लोन दिली ती बँक दोषी...का अशा बँकेवर व्यवस्थीत अंकुश न ठेवता आलेली RBI दोषी. कोणाला दोषी ठरविणार.

दोषी कोणीही असला तरी नेहमीप्रमाणे नुकसान झाले सर्वसामान्य माणसाचे. अरे ! सामान्य माणसाला साधे ५० हजाराचे लोन घेताना १७६० कागदपत्रे द्यावी लागतात. पॅन कार्ड... आधार कार्ड... पासपोर्ट... घराची कागदपत्रे... इनकम सर्टिफिकेट... सॅलरी स्लीप.. गॅरेंटर... हजार गोष्टी मागते बँक. मग या बुडविणार्या लोकांची कागदपत्रे काय स्पेशल असतात का ?

दरवर्षी बँक चांगला ऑडिट रिपोर्ट दाखविते. मग कोठल्या निकषांवर हा रिपोर्ट दिला जातो. त्या रिपोर्ट मधे कोठेही काहीच कसे दाखवले जात नाही. मोठे मोठे आकडे दाखवून, सर्वसामान्यांना न समजणार्या अगम्य आकडेवारीत रिपोर्ट दाखवला जातो. प्रत्येक रिपोर्ट मधे वाढता नफा दाखवला जातो. मग दरवर्षी चांगला नफा दाखविणारी बँक अचानक बंद पडण्या एवढी डबघाईला कशी काय येऊ शकते ? हे एक न उलगडलेले कोडे आहे.

लोन घेऊन बुडवून जाणारे, आरामात पैसे बुडवून मजेत जगत असतात आणि गरजेच्या वेळी ऊपयोगी पडावा म्हणुन ठेवलेला आपलाच पैसा सर्वसामान्य माणसाला काढता येत नाही. रिटायर्डमेंट नंतरची तरतुद, मुलिचे लग्न, म्हणुन ठेवलेला पैसा पुर्णपणे अडकून रहातो. काय करायचे त्या वयस्कर जिवांनी. कसे जगायचे या महागाईच्या काळात. औषधपाण्याचा खर्च कसा जमविणार. कश्या पुर्ण करावयाच्या मुलांच्या गरजा. कशी मुलांची लग्ने करावयाची. कधी विचार केला आहे का RBI ने किंवा सरकारने.

आज काही मोठी माणसे काही हजार कोटी कर्जे घेऊन बुडवून आनंदात रहात आहेत आणि लहान माणुस आपलाच पैसा परत कसा मिळेल या विवंचनेत आहे. लहान माणसाचे दोन-चार हप्ते थकले तर लगेच वसुली साठी जप्ती आणतात व वसुली करतात. कारण कर्जापेक्षा जास्त किंमतीची वस्तू त्यांच्या कडे गहाण असते. मग लोन बुडविणार्या मोठ्या माणसांचे काय ? याचाच अर्थ गहाण वस्तूपेक्षा किमती पेक्षा जास्त कर्ज त्यांना दिलेले असते. मग ते कोणी दिले व कुठल्या निकषांवर. याचे उत्तर कोण देणार??

बरं ! आपलेच पैसे परत मिळण्यासाठीची procedure बघा... तुमच्याच पैशातील फक्त ५० हजार तुम्हाला मुलिच्या

लग्नासाठी किवा औषधासाठी मिळतील. त्या साठी तुमचे पॅनकार्ड, रेशनकार्ड, लग्न पत्रिका, हॉल बुकिंग ची पावती, दागिने विकत घेतल्याची पावती, मेडिकल बिल, सर्व रिपोर्ट जोडायचे. असे वेगवेगळ्या कारणासाठी २०-२५ अर्ज जमले कि मग बॅंक RBI कडे पाठविणार. मग RBI त्यावर विचार करणार आणि ओके करुन बॅंकेला पाठविणार. मग बॅंक तुमच्या दुसर्या बॅंकेतील अकौंट मधे ते जमा करणार.त्यासाठी परत दुसर्या बॅंकेचा अकौंट नंबर, IFC कोड व अन्य माहिती घेणार व मगच पैसे जमा करणार.या सर्व कालावधीसाठी ७-८ महिने किंवा त्या पेक्षा जास्त जाणार म्हणजे लग्ना साठी मागीतलेले पैसे नातीच्या किंवा नातवाच्या बारशाला मिळणार (अतिशयोक्ती चा थोडा भाग सोडा)

आता विचार करा ! जर एखाद्या वयस्कर व्यक्तीने आपले पैसे मागीतले व या प्रोसीजर प्रमाणे जर त्याला ८-९ महीन्यानी हे पैसे मिळाणार असतील तर त्याचा त्याला काय उपयोग. कोणाला मुले असतील नसतील अथवा दुर्दैवाने सध्याच्या ट्रेंड प्रमाणे त्यांना बघणारे कोणीही नसेल अशा दुर्दैवी जिवांनी काय करायचे. आणि का म्हणुन त्या स्वाभिमानाने जगणार्यांनी आपला पैसा असताना, मुलांच्या समोर हात पसरायचे. Hospitalisation अथवा अन्य खर्चा साठी जर त्यांना त्यांचेच पैसे योग्य वेळी मिळणार नसतील तर जीव गेल्यावर त्या पैशांचा काय उपयोग. आणि दुर्दैवाने ती व्यक्ती गेल्यावर तर, मागे रहाणार्या व्यक्तीला ते पैसे मिळण्यासाठी अजुन कोर्ट कचेरी चा त्रास. कोणी अन्य नातलग नाही, अन्य वारस नाही हे सिध्द करीत रहा.

कधी करणार सरकार/ RBI या गोष्टीचा विचार. अशा बुडलेल्या बॅंकांची पुर्ण जबाबदारी RBI/ सरकार वरच आहे. तुम्हीच त्यांना बॅंक काढायला/चालवायला परवानगी दिलीत ना ! मग हे पुर्ण पैसे योग्य वेळी परत करायची जबाबदारी पण तुम्हीच घ्यावयास हवी.

शेतकरी लोकाना जसे कर्ज माफी साठी करोडो रुपयांचे पॅकेज देता, तसेच पॅकेज अशा बॅंक बुडलेल्या खातेदराना पण द्या. लबाड जोडीती ईमले माडया, गुणवंताला मात्र झोपड्या

**पतीव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणीहार**
**पतीव्रतेच्या गळ्यात धोंडा, वेश्येला मणीहार "**

किती सार्थ गाणे आहे आजच्या युगात दुसर्याच्य चुकिची सजा का म्हणुन यांनी भोगायची. आयुष्य स्वाभिमाने जगलेले हे Senior Citizen आयुष्याच्या संध्याकाळी असे लाचारीचे जिवन जगणे बरोबर आहे का ???

***

**अजित करंबेळकर**
**ई पत्ता : ask250560@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८१९४८९४८०**

**चारोळ्या**

## चारोळ्या

नयनांची बोलकी भाषा,
प्रिय मिलनाची अभिलाषा.
ओढ घेती मन दाही-दिशा.
प्रीतवेड्या मनाची स्वप्न-आशा.

***

सोडूनी जाता मज एकाकी,
प्रीतबंध मनास वाटला परका.
विरह वेदनेत तुजिया जळताना,
सखे मंद झाल्या तारका.

***

मनात आशारुपी स्वप्नांचे,
गजबजलेले गाव असते.
मोडले कि, मनाचे घूमजाव असते,
आमचं हे असच असते..

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**लेख**

# बा, पांथस्था

बाई... बाई ... बाई.... किती हा उकाडा .... हल्ली बारा ही महिने उकाडा वाढत चाललाय .... न हिवाळ्यात पूर्वीसारखी थंडी जाणवत न पावसाळ्यात पूर्वी सारखा पाऊस..... पूर्वी कसे हाडे गोठवणारी थंडी पडायची....मी ही गोठून जायचे ... पण हल्ली ते स्वप्नच राहिलंय ... .पाऊस ही पडतो मेला नको तेंव्हा ...नाही तर पडतच नाही ....जाम लहरी झालाय.......कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ .....माझ्याच काय संपूर्ण मानवजातीवर, पृथ्विमातेच्या अस्तित्वावर गंभीर परिणाम होतोय की.... .एकूणच वातावरणात प्रचंड उष्मा वाढलाय ...कारण काय तर ग्लोबल वार्मिंग म्हणे ...याला जबाबदार कोण ? निसर्ग की मानव ? प्रश्नाचं उत्तर शोधायला हवं न? दोघेही जबाबदारी घेणार नाहीच ,ती झटकणार अन एकमेकांना दुषणे देत राहणार ...ते जाऊ देत.... तो पहा दुरून एक पांथस्थ येताना दिसतोय.... पायदळच येतोय ... गरीब दिसतोय बिचारा .... नाही तर हल्ली वाहनांशिवाय कुणी कुठे जातच नाही.... .घरोघरी मानसी वाहने वाढलीत .......वाहनांशिवाय घोडंच अडत आमचं...जागचे हलु शकत नाही आम्ही ....जिथे पायी जाऊ शकतात तेथेही ही माणसे बुडाखाली वाहन घेऊनच जाणार.....वाहनांच्या प्रचंड संख्येमुळे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषण अतिशय वाढलंय हे लक्षातच घेत नाहीय हा कृतघ्न मानव ....आणि निसर्गालाच दोष देत बसलाय...हो कृतघ्नच ....नाही तर काय....निसर्गानी त्याला लक्ष लक्ष करांनी अमाप,अनमोल असा देणं दिलंय,समृद्ध केलंय,पण याची जाणीव न ठेवताच तो केवळ ओरबाडत राहिला

निसर्गाला.....आता हेच पहा नं ...माझी आणि माझ्या बंधू भगिनींची स्थिती कशी केविलवाणी झालीय ते .....तो बघा तो पांथस्थ आलाय ....अगदी माझ्या जवळ...खूप दमला,भागलेला दिसतोय बिचारा.......साहजिकच आहे म्हणा....फार लांबचा प्रवास केलेला दिसतोय त्याने ....भुकेला अन तहानलेलाही दिसतोय ....मी न त्याची भूक भागवू शकत न तहान .....फार वाईट स्थिती झालीय माझी......विश्रांती घ्यायला झाडाचा आसरा, सावली शोधतोय बिचारा .....येथून दूर दूरवर एकही झाड आढळत नाही .....मी तरी काय सांगणार त्याला .... खूप आशेने येतोय हो माझ्याकडे पाणी प्यायला....मी कुठल्या तोंडाने सांगू त्याला की बाबा रे मी तुझी तहान भागवायला असमर्थ आहे .....असे विपरीत कधीच घडले नव्हते ......माझ्या असहायतेचा, दुर्बलतेचा प्रचंड राग येतोय ...अनावर दु;ख होतंय .....केवळ मनातल्या मनात चरफाडण्याशिवाय मी काहीही करू शकत नाही आहे ......वृक्षाची शीतल छाया न मिळाल्यामुळे, तहानलेला, भुकेला तो पांथस्थ तडफडतोय, तगमगतोय .....अरेरे....अनेकांप्रमाणे हा ही प्राण सोडणार तर.... इतरांप्रमाणे याचाही बळी जाणार तर..... आजवर शेकडो बळी गेलेत येथे .... मानावाबरोबर गुरे, ढोरे, पक्षी, प्राणी .... कित्येकांनी येथे देह त्यागलाय.......हे दृश्य मला पुन्हा उघड्या डोळ्यांनी बहावे लागणार.....आजवर हेच बघत आलेय...... कधीतरी हे चित्र बदलेल अशी आशा मनी ठेऊन मी ही जगतेय .....जगतेय म्हणण्यापेक्षा रखडतेय.....भूतकाळ आठवत जीवन कंठतेय .....आता माझ्याही सहनशक्तीचा अंत झालाय ......धुगधुगी तेवढी बाकी राहिलीय .......खरेच पूर्वीचा काळ येईल का हो परत? सांगा नं गडे .....अहाहा!!!.....काय रम्य परिसर होता हो हा.....गर्द, घनदाट वनराई, पक्षी, प्राणी, झाडे, पाने फुलांनी बहरलेलं संमृद्ध जंगल ....झुळझुळ वाहणारे ओढे, झरे....त्यावर पाणी भरायला, स्नानाला येणाऱ्या लावण्यवती...... त्यांचे निखळ सौंदर्य आणि मधुर हास्याने हा परिसर भारून जायचा.....अनेक जण या परिसराच्या अन ललनांच्या प्रेमात पडले होते......त्यांच्या प्रेमलीला, रासलीला अन धुंद शृंगार बघताना मला लाजही वाटायची ...तरीही रस घेऊन एखाद दृष्टी टाकायचीच त्या प्रेमी युगलांवर .....बेशरमपणे .......अनेकांच्या प्रेमाची साक्षीदार राहिलेय मी.....जाणार्या येणाऱ्या पाथस्थांची वर्दळ.....त्यांच्या आदळा मुळे जंगलात कसा जिवंतपणा होता ..... पण तो काळ इतिहास जमा झालाय......आता येथे उरलीय केवळ शुष्कता ....माझ्यासारखीच .....माझ्यातील आणि या परिसरातील जीवनरस शोषून घेतला गेलाय..... प्रेतवत, मृतवत झालाय ......विराण वाळवंटात रुपांतर झालंय याचं.....संपूर्ण धरणी मातेचं एका विशाल वाळवंटात रुपांतर व्हायला वेळ लागणार नाही.......संपूर्ण जगाचे इथिओपिया होईल कां अशी भीती वाटायला लागलीय हो.... ................बा पांथस्था,....कृपया, मला माफ कर ....तू कां आलास बाबा इकडे ? तू इकडे

नक्कीच वाट विसरल्याने भटकला असणार......... तू इकडे आलास .....अन स्वतःचा मृत्यू ओढावून घेतलास .....इकडे कुणी फिरकतच नाही रे......कित्येक वर्षांनी तुझ्या रुपात मनुष्य दृष्टीस पडलाय ....एकीकडे तुला पाहून आनंदही झाला अन दुसर्या क्षणी प्रचंड वाईट ही वाटलं.....कारण तुझं काय होणार हे भविष्य मला माहित होतं.....मला क्षमा कर रे ...तुझा मृत्यू मी नाही टाळू शकत.....विधिलिखित हेच असावं.....पण खरं सांगू का पांथस्था, दैवाला, नशिबाला, प्रारब्धाला उगाच दोष देऊन स्वतःची चूक गोंजारण्यात काहीही अर्थ नाहीय ......मानवानेच स्वतःच्या पायावर भला मोठा धोंडा पडून घेतलाय ...एवढा मोठा की त्याच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झालाय ....निसर्गाने एवढं भरभरून दिलेलं असताना ते निगुतीने उपभोगायचं सोडून अति लोभापायी अक्षरशः ओरबडलंय त्याला .....विकासाच्या नावाखाली निसर्गाच्या प्रत्येक कक्षेत,क्षेत्रात ढवळाढवळं केलीय ....निसर्गाचा नैसर्गिक समतोल ढासळवला .....त्याचे चक्र विस्कटून टाकले ....निसर्गावर अंधाधुंद, अनन्वित अत्याचार केलेत ......बेजबाबदार, बेफिकीरीने वागून सगळ्या प्रदूषणाचे गिफ्ट निसर्गाला दिलंय ....भौतिक सुखाच्या मागे लागून यंत्रांचा वारेमाप वापर करून वातावरणातील उष्णता वाढवली ....वन, धन, जल व खनिज संपत्तीची इतपत वाट लावलीत की पुढच्या पिढ्यांना दृष्टीस ही पडणार नाही.....सध्या जी संकटे येत आहेत नं,....पृथ्वीवर, भूकंप, त्सुनामी, पूर, वेगवेगळी वादळे, ज्वालामुखीचे उद्रेक, पूर, भूस्खलन, दरडी कोसळणे, कोरडे, ओले दुष्काळ हे सर्व मानवाच्या अतिरिक्त हस्तक्षेपामुळे...... तरीही त्याचे डोळे उघडत नाही आहेत... त्याच्या विकासाच्या गप्पा सुरूच आहेत......

माझी ही अशी हलाखीची स्थिती होण्याला तोच जबाबदार आहे ....माझ्या साक्षीने कितीतरी संस्कृती फळल्या, फुलल्या ....विकसित झाल्या, बहरल्या, नावारूपाला आल्या ....कितीतरी वर्षे टिकल्यात ......माझ्या भगिनींच्या,बांधवांच्या कर्तृत्वाने किती सुपीक, सुजलाम, सुफलाम समृद्ध परिसर होता हा.....सर्व सुखे पायाशी लोळण घेत होती मानवाच्या .....धन, धान्य, संपत्तीची कमतरता नव्हती ...तृप्त अन समाधानी होता मानव आणि निसर्ग ही...हो निसर्ग ही समाधानी होता कारण त्याच्या कारभारात मानवाची लुडबुड नव्हती .....उलट त्याच्या सहवासात, त्याच्या साथीने, त्याचा योग्य तो आदर करत मर्यादेत अन गरजेपुरताच उपभोग घेत आनंदात जीवन जगत होता मानव.....पण काय अवदसा सुचली त्याला अन विकासाचे भूत त्याच्या डोक्यात शिरलं.....विनाश काले विपरीत बुद्धी .....दुसरं काय? ....अंतराळातील रहस्य उलगडायला चाललेत..... या अनादी अनंत ब्रम्हांडाचा थांग तरी लागला कां यांना?...... काय उजेड पाडणार देव जाणे?......हातचं सोडून पळत्याच्या मागे लागलेत.... त्यांवर, वेगवेगळ्या ग्रहांवर जाण्याच्या गप्पा मारणारे, त्यासाठी अब्जावधी रुपये खर्च करणार्यांनो आधी आपल्या ग्रहाची स्थिती सुधारा ....तुमचा पैसा धरणी मातेसाठी लावा .....नाहीतर परिस्थिती हाताबाहेर जाईल नक्कीच .....इतर ग्रहांप्रमाणे पृथ्वीचे ही विराण वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही, मानवाचा प्रवास हल्ली त्याच दिशेने सुरु आहे...... बा, पांथस्था,....अरे मानवाच्या अश्या बेमुर्वत वागण्याने माझ्या सारख्या अनेकींचे जीवन उध्वस्त केले......जीवनातून उठवलं रे आम्हाला ....माझ्या प्रियकराची तर मी वर्षानुवर्षे झाले भेट घेऊ शकले नाही.....आमच्या मिलनातच माझे समर्पण ठरलेले.....माझ्या जीवनाची इतिकर्तव्यता ठरलेली .....पण या दुष्ट मानवाने ते सुख ही माझ्यापासून हिरावून घेतले.....डोळ्यात प्राण आणून मी वाट पाहतेय रे त्या मिलनाच्या क्षणाची ....पण मला नाही वाटंत या जन्मी तो क्षण येईल ....पुन्हा कोणत्या तरी भगीरथाला अवतार घेऊन यावा लागेल .....त्या भागीराथाची वाट बघतेय रे मी.....येईल कां रे तो ?.....मी आणि माझ्या सारख्या, माझ्यावर अवलंबून असलेल्या अनेक शापित, पिडीत जीवांचा उद्धार करील कां रे तो?..... बा, पांथस्था,....ऐकतो आहेस नं रे तू ? किती तरी वर्षांनी तुझ्या रूपाने मनुष्य प्राणी दिसलाय .....निसर्गाच्या अन माझ्या या दाहक स्थितीला जबाबदार मानावाप्रतीची चीड, संताप बाहेर पडला बघ.....इतके दिवस दाबून ठेवलेल्या भावनांचा उद्रेक झाला रे....तुला पाहून वाट मिळाली माझ्या दुखा;ला.......माझे शब्द तुझ्यापर्यंत पोहचलेत कां रे? अरे, मी कोण बोलतेय हे कळंल का तुला?.....बोल नं रे......कसे कळेल म्हणा तुला.....तूच तर मृत्युपंथाला लागला आहेस.......चल, तुला सांगूनच टाकते......मी आहे जिला जग जीवनदायिनी, जीवनवाहिनी म्हणतात ती नदी ......हो नदीच .....पण माझ्यातील जल संपून शुष्क झालेली अभागी नदी

.........तुझ्यासारखीच मी ही मरणपंथाला टेकलेली ........नदी असुनही तहानलेली.....प्यासी......किती विरोधाभास नं रे?....असो,ते जाउ देत......चल, आपण दोघे ही एकमेकांच्या साक्षीने मृत्यूला आलिंगन देऊ या....आता या पुढे मला कुण्याही मानवाचा असा तडफडत मृत्यू पहावा लागणार नाही.....ऐकतोयस नं?..... निजधामाला गेला वाटतं....... चला,..... त्याच्या पाठोपाठ मी ही निघालेय...... हे पृथ्वीवासियांनो, जमल्यास काळजी घ्या उर्वरित प्राणिमात्रांची ......या धरणी मातेची......ती घ्याल अशी खोटी आशा ठेऊन तुमचा निरोप घेतेय...... नमस्कार........अलविदा.........

***

**वर्षा किडे कुळकर्णी**
**नागपूर -३६**
**ई पत्ता : varshakulkarni73@yahoo.com**
**मोबाईल क्रमांक : ८००७६७२९८३**

**चारोळ्या**

## चारोळ्या

जरी सुकला गुलाब तरी,
मनात त्याचा सुवासिक गंध दरवळतो.
प्रीत तया तुझ्यासंगे,
आठवण प्रेमळ क्षणांची देतो.

***

उरलीच नाही "माणुसकी",
सख्ख्या नात्यांना गेली तडा.
स्वार्थाने बरबटलेल्या जगात,
मदतीचा हाथ मिळेल,
ही तर अपेक्षाच सोडा.

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**लेख**

## हे सुरांनो, चंद्र व्हा.........

आ...आ... आज्जा......आ ...आ....आज्जा .......आजा आजा .... मै हूँ प्यार तेरा........मित्रांनो ,हे गाणे गावूनच त्याला बोलवावं लागतंय, तरीही जागचा ढिम्म हलत नाही ....येणं तर दूरच राहिलं.....असा छळतोय नं बाई मेला....किती वाट पहावी माणसानं... याला काही मर्यादा?.....त्याला मला असा त्रास देण्यात फार मज्जा येत असावी.....पण मला किती त्रास होतो याची काही जाणीवच नाही त्याला..... माझ्या भावनांची कदरच नाही मुळी त्याला.... तो आपल्याच गुर्मीत... तालात.... बेपर्वा.... बेफिकीर... कलंदर... मनमौजी.... इथे माझी जीव जायची पाळी आलीय..... रडकुंडीला आलेय मी... वैतागलेय..... आदळआपट सुरु आहे .... काहीही करून त्याने यावे.... पण त्याचा माझ्या सादेला काही प्रतिसादच नाही ....माझ्या हाका, विनवण्या, सगळ्या हवेत विरून जात आहे..... सगळा एकतर्फीच मामला.. ..... मीच बोलायचं, मीच भेटीसाठी प्रयत्न करायचे ....जसा काही माझंच अडलंय ....याला काही गरजच नाही.....खरंय म्हणा, माझाच अडतं त्याच्याशिवाय.....त्याचा विरह मला असह्य होतो हो...त्याच्या सहाय्याने माझी खूप कामे होतात ....नव्हे तो खूप मदत करतो ...पण....पण जरा अकडूच आहे...ताठा मिरवायची फार सवय ....त्याला माहिताय न त्याच्याशिवाय माझी कामे खोळंबतात ...म्हणून जास्तच त्रासून सोडतो मला....त्याचे सगळे नखरे सहन करते हो....दिवस दिवस .....तासान तास ...त्याच्या वाटे कडे डोळे लावून बसते.....आता येईल, मग येईल....पण कसचे काय ? ....प्रतीक्षा वाया जाते....आठ आठ दिवस,पंधरा पंधरा दिवस याचा पत्ता नसतो......अज्ञातवासात जाते स्वारी एकदम ....मला काहीही न सांगता...न कळवता....तशी गरजच वाटत नाही त्याला....मी मात्र सग्गळं सग्गळं सांगते हो त्याला ..... याचं वागणं असंच .....माझा जीव मात्र काळजीने टांगणीला लागतो.....काळजी करण्याशिवाय माझ्या हाती दुसरं असतं तरी काय? ......देवाला प्रार्थना करते कायम की त्याला लवकरात लवकर धाड म्हणून.....आमची भेट घडू देत.....आणि काही दिवस तरी त्याचं बुड टेकू देत.....हातावर हात देवून अन विरह गीते गात प्रतीक्षा करते मी त्याच्या

आगमनाची.....काय करू आता काही सुचेनासं झालंय बघा....कालीदासाप्रमाणे आषाढातील मेघांना, श्रावणातील सरींना, मेघ मल्हारातील सुरांनाही विनवणी करून झाली माझा निरोप देण्यासाठी....हे सुरांनो चंद्र व्हा .... हे सुरांनो, चंद्र व्हा चांदण्याचे कोष माझ्या प्रियकराला पोचवा ॥ वाट एकाकी तमाची हरवलेल्या मानसाची बरसुनी आकाश ...हे नाट्यगीत तारस्वरात गाऊन झालं......पण सर्व प्रयत्न विफल झालेत.... .मित्रांनो,तुम्ही माझा संदेश पोहचवाल कां हो त्याच्या पर्यंत ....दूत व्हाल माझे?.....व्हा नं जरा....आता तुमच्या मदतीची अपेक्षा आहे हो ...तुम्ही तरी आपल्या मैत्रीला जागा.....तुम्हाला कुठे दिसला ,भेटला तर सांगा जरा त्याला की त्याची प्रिया त्याच्यासाठी किती व्याकूळ झालीय ते... सांगाल नं प्लीज ...... काय म्हणता ? ...कुणाला निरोप द्यायचाय हेच कळले नाही तुम्हाला......अहो,कुणाला काय म्हणून विचारता? ...तुमच्या माझ्या जीवश्च कंठश्च सख्याला हो.........'नेट'रावांना हो......हा हा हा.....

***

**वर्षा किडे कुळकर्णी**

**नागपूर -३६**

**ई पत्ता : varshakulkarni73@yahoo.com**

**मोबाईल क्रमांक : ८००७६७२९८३**

**चारोळ्या**

## चारोळ्या

प्रेमात तुझ्या प्रिया,
देहभान हरपून गेले.
तू नसलास तरी,
मनाने तुझीच रे झाले.

***

**धनंजय शंकर पाटील**

**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**लेख**

## कभी कभी मेरे दिल में ये खयाल आता हैं......

दोस्तो, कभी कभी मेरे दिल में खयाल आता हैं .....के भगवान का मेरे बारे में चुक्याच .....(कृपया आता देव आहे किंवा नाही, आस्तिक-नास्तिकतेचा वाद नको )...तर देव अथवा सुपर power आहे तिने आपल्याला अति सामान्य स्त्री जी कुठल्याही परिस्थितीत निर्विकार राहू शकते असं घडवायला हवं होतं....नको तिला ही मन आणि भावना असतातच की ......मग दगड बनवायला हवं होतं....नको, ते ही नको....त्याला ही पाझर फुटतो म्हणे कधी तरी .....तर मन, हृदय, बुद्धी नसलेलं एखादं यंत्र म्हणून निर्माण करायला हवं होतं.....किती छान झालं असतं नाही ?....मन, हृदय नाही तर कुठल्याच प्रकारच्या भावना नाही ....ताणतणाव नाहीत....त्या अभिव्यक्त करायचा मग प्रश्नच नाही ......बुद्धी नाही तर विचार नाही.....देहबुद्धी नाही.....विकार नाही,वासना नाहीत....एका स्थितप्रज्ञासारखं आयुष्य जगता आलं असतं ......जीवन किती शांततामय व्यतीत करता आलं असतं ......एक अलौकिक शांतता लाभली असती मला .....

..............................अंह फक्त माझ्याच नाही काही सर्वांच्याच बाबतीत,संपूर्ण मानव जातीच्या बाबतीत हे घडलं नंतर आज संपूर्ण जगात, देशादेशात, आपल्या भारतात, समाजात, कुटुंबात जातपात, धर्म, अज्ञान, गरिबी, अत्याचार, भ्रष्टाचार व सत्ता, वासना, शिक्षण, कला, बुद्धीचा ,श्रीमंतीचा माजामुळे,षड्रीपुंच्या ,अतिरेकामुळे जे अराजक माजलंय ते माजलं नसत .....नं युद्धे ,नं दंगली झाल्या असत्या, पूर, भूकंप, सुनामी, ओला- कोरड्या दुष्काळात लाखो बळी गेले नसते, गरिबी मुळे, अन्नपाण्याविना, औषधानविना, उपचाराविना, विजेविना, भरमसाठ कर्जापायी कुणाला जीव गमवावा लागला नसता.............. सगळे कसे गुण्यागोविंदाने, सुखात, मजेत, आनंदात, समाधानात राहिले असते, नं कुणी कुणाच्या अध्यात नं मध्यात.....ना हेवे दावे, ना राग-लोभ, इर्षा-मत्सर .....जो तो आपापल्या नेमून दिलेल्या कामात चोख अन व्यस्त राहिला असता, जगाचं एक सुंदर चित्र निर्माण झालं असतं ....किती सुंदर कल्पना

आहे नाही ही?......कारण यंत्रांना कुठे आल्यात भावना?.....संपूर्ण जग हे एक factory मध्ये परावर्तीत झालं असतं .....त्यावर फक्त देवाचा कंट्रोल राहिला असता ..

......................तसं पाहिलं तर देवासाठी आजचं जगही एक factory च आहे म्हणा ....पण फरक एवढाच की देवाने मानव रुपी यंत्रात प्राण फुंकले .....एक चैतन्य बहाल केलं.....देवाचं जरा चुक्याच ....,नाही कां? ...कारण मानवाला त्याला ८४ दशलक्ष योनी नंतर प्राप्त झालेल्या मनुष्य जन्माचं ना महत्व .....ना त्याला विनासायास लाभलेल्या देहाचं, प्राणांचं, ना मन हृदय, बुद्धीचं महत्व ....ना आपल्या भाग्याचं....हो भाग्याचंच.....कारण मनुष्य जन्म मिळायला भाग्यंच लागतं म्हणे .....पण हे कुठे जाणलंय त्याने ...हे महत्व जर मनुष्याने ओळखलं असतं ना तर आज जगाचं, समाजाचं चित्र खूपच वेगळं असतं ....नाही कां मित्रांनो ? .....अरे हो , बरं आठवलं ....भविष्यात यंत्र मानवाचंच जग राहणार आहे म्हणे ...त्यांचा प्रत्येक क्षेत्रातील वाढता सहभाग बघता.....फार उत्तम होईल माझ्या मते......असेच होऊ दे......पण देवा, बाप्पा तुला एकच कळकळीची विनंती, अन मनापासून प्रार्थना करते की त्यात मात्र पुन्हा प्राण फुंकण्याची, चैतन्य बहाल करण्याची,मन, बुद्धी देण्याची घोडचूक करू नकोस रे बाबा ......ऐकशील ना रे माझं.......?...काय?

***

**वर्षा किडे कुळकर्णी**

**नागपूर -३६**

**ई पत्ता : varshakulkarni73@yahoo.com**

**मोबाईल क्रमांक : ८००७६७२९८३**

## *मराठी विचारधन*

प्रश्न सुटण्यासारखा असेल तर काळजी नका करु,आणितो न सोडवता येणारा असेल तर काळजी करुन काय होणार ? ***

**संग्रहित**

**लेख**

# *शिक्षण का महागले ?*

प्राथमिक शाळेत शिकणा-या मुलांच्या पाठीवरील दप्तरांच्या ओझेबाबत उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले की मुलांच्या पाठीवरील दप्तरांचे ओझे त्यांच्या वजनाच्या १० टक्के इतके असावे त्यापेक्षा जास्त वजनाचे दप्तर आढळून आल्यास शाळांवर आणि त्या शाळा प्रमुखांवर कारवाई करण्याचा ईशारा यानिमित्ताने सरकारने दिला. यापूर्वीसुद्धा मुलांच्या पाठीवरील दप्तराच्या ओझयाबाबत शिक्षणतज्ञ मंडळींनी खूप बोलले आणि लिहिले आहेत मात्र यावर काही कायमचा तोडगा काढण्यात आला नाही. वास्तविक पाहता कोणत्या मुलांच्या पाठीवर दप्तराचे ओझे जास्त असते? सरकारी शाळेत शिकणा-या की खाजगी शाळेत शिकणा-या या बाबीचे निरीक्षण केल्यास आपणांस नक्कीच आढळून येईल की, यात सरकारी शाळेतील मुलांपेक्षा खाजगी शाळेत शिकणा-या मुलांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे जास्त असते. त्या मुलांच्या दप्तरात काय काय असते? प्रत्येक विषयाच्या दोन-दोन पुस्तीका, त्याच विषयांशी संबंधित वही, कंपासपेटी, टिफीन बॉक्स आणि पाण्याची बॉटलया सर्व बाबींचे ओझे त्या लहान मुलांच्या पाठीवर दिसून येते. याउलट सरकारी शाळेतील मुलांच्या दप्तराच्या बाबतीत दिसते. यांच्या दप्तरात यापैकी ब-याच वस्तू नसतात यास कारणे अनेक असू शकतात. मात्र जे पालक आज शिक्षणाच्या बाबतीत जागरूक झाले आहेते ते सरळ सरळ आपल्या पाल्यांना खाजगी शाळांमध्ये प्रवेश देत आहे. घराजवळ सरकारी शाळा असून सुद्धा पालक खाजगी शाळांची निवड करतात आणि सुरू होतो. महागड्या शिक्षणाचा प्रवास, शिक्षण महाग झाले असे म्हणतांना ते का महागले याचाही विचार करणे गरजेचे आहे.

२७-३० वर्षांपूर्वी जेव्हा आम्ही पहिल्या वर्गात प्रवेश घेतला त्यावेळी काय स्थिती होती आमची आजही सल्ला स्पष्ट आठवते. रोजचाच एक ड्रेस अंगावर, हातात खापराची पाटी, खिशात दोन-चार कलम आणि निघाले शाळेला. शाळेत प्रवेश केल्यावर आम्हाला ना कशाचा भय ना कशाची चिंता. सर जे सांगतील ते पाटीवर लिहायचे, सरांना

दाखवायचे, पुसायचे, परत लिहायचे. दिवसातून किती वेळा लिहीला आणि किती वेळा पुसला याची काही गणती नसायची. पाटीसुद्धा विकत घ्यायचे नाही. घरातील ताई-भाऊची पाटी वापरण्यास मिळायची. पुस्तकेसुद्धा जुनीच, गणवेश नावाची वस्तू काय असते ते माहीतच नव्हते. पायाला तर साधे चप्पल सुद्धा भेटायचे नाही तर सॉक्स व बुट दूरची गोष्ट. खर्च यायचा तो फक्त कलमचाच. तोही पाच-दहा पैश्यांत विकत मिळायचा म्हणजे आमचा पहिला वर्ग साधारण पणे फुकटात पूर्ण व्हायचे आणि आज पहिला वर्ग करतांना पालकांच्या खिशाला किती चाट बसत आहे आज त्यास पहिल्या वर्गात प्रवेश देतांना पंधरा हजार रूपयांपासून पन्नास हजार रूपयांपर्यंत प्रवेश फी भरावा लागत आहे. शाळेचा गणवेश सॉक्स, बुट, दप्तर, वह्या कंपासपेटी इत्यादी सर्व बाबींचा खर्च साधरणपणे वर्षाकाठी एक वर्ग शिकविण्यासाठी लाखांच्या घरात खर्च करण्याची पालकाची आज तयारी दिसून येत आहे. पालकांच्या याच मानसिकतेचा विचार करून काही खाजगी मंडळी शिक्षण संस्था उघडून ठेवल्या आहेत आणि शासन त्यांना परवानगी देत आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाचा खर्च सुद्धा भरमसाठ वाढत आहे असे का होत आहे याचाही कुठेतरी विचार करणे आवश्यक आहे.

पालकांची मानसिकता आजच्या पालकांची मानसिकता पूर्वीच्या पालकांसारखी नक्कीच नाही. घरांजवळ असलेली शाळा ओलांडून दूरच्या शाळेत टाकण्याची त्यांचा विचार कधीच होत नव्हता. कदाचित त्यांना इतर शाळेची माहिती नव्हती किंवा त्यांना आपले मुल घरांपासून दूर ठेवावे वाटत नसेल. त्याचसोबत त्यांना जवळच्या शाळेवर विश्वास सुद्धा होता. जे की आज कमी कमी होत चाललेला आहे. शिक्षणाच्या बाबतीत अधिकच जागरूक झालेली पालक मंडळी भरपूर पैसा खर्च करण्याची तयारी दाखवित आहेत. इकडे सरकारी शाळेत मोफत गणवेश, शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत दुपारचे जेवण, मोफत पाठ्यपुस्तके याचसोबत विविध योजनेचा फायदा देऊनसुद्धा पालक मंडळी या शाळेकडे कानाडोळा करीत आहेत. खर्चात काटकसर करण्याऐवजी आपला खर्च वाढवित आहेत. एखाद्या चर्चेत मध्ये बोलतांना मोठ्या अभिमानाने छाती फुगवून सांगतात की, माझ्या मुलांना पहिल्या वर्गासाठी साधारणपणे एक लाख रूपये खर्च येतो. बहुतांश पालकांना असा समज आहे की, भरपूर पैसा खर्च केला की मुलांना उत्तमातील उत्तम शिक्षण मिळते जे की या सरकारी शाळेतून मिळत नाही. या शाळांचे नियम फारच कडक त्याची अंमलबजावणी मुलांना तर करावी लागतेच शिवाय पालकांना सुद्धा या गोष्टीकडे लक्ष द्यावे लागते. अन्यथा पालकांना ही मंडळी नियमाची आठवण करून देतात. ज्या बाबीसाठी साधारणपणे खूपच कमी खर्च अपेक्षित असतांना लाख-लाख रूपये खर्च का करायचे? या बाबीचा कोणी विचार न केल्यामूळे शिक्षणावरचा नाहक खर्च वाढत आहे. शिक्षणाच्या अधिकार कायद्यात अनेक कलमांचा समावेश आहे, ज्यातून 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत शिक्षण देण्याचे ठरविण्यात आले. परंतु खरोखरच त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळते का? लाखो रूपये खर्च होण्याची वेळ पालकांवर का येत आहे? याचा कोणी तरी विचार करणे अगत्याचे आहे.

मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळावे यासाठी कायदा करण्यात आला मात्र तरीही जनता पैसा खर्च करून प्राथमिक शिक्षण मिळवते यास काय म्हणावे? यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या अधिकार कायद्यानुसार मुलांना एक किमीच्या आत प्राथमिक शाळा मिळावी. तीन किमीच्या आत उच्च प्राथमिक आणि पाच किमीच्या आत माध्यमिक शाळा मिळावी असे यात नमूद केले आहे या अनुषंगाने संबंधित शाळेच्या परिसरांत आढळून येणारी मुले त्या शाळेत प्रवेश घेण्यास पात्र असतात. पण त्या परिसरांतील मंडळी आपल्या जवळच्या शाळेत प्रवेश घेण्याऐवजी दूरच्या शाळेत प्रवेश घेतात. त्यांना वाटते की, या शाळेपेक्षा अमूक शाळा खूप चांगली आहे. जरी दूर असले तरी आज अशी परिस्थिती बघायला मिळत आहे की, ग्रामीण भागात सुद्धा या खाजगी शाळांचे लोणी परसले आहे. जवळपास गावांपासून पाच-दहा किमी दूर अंतरावर असलेल्या शाळांत आपल्या चिमुकल्या बाळांना पाठविले जात आहे. त्या लहान मुलांच्या मानसिकतेचा, त्याच्या मित्र परिवाराचा, परिसराचा अजिबात विचार न करता पालक मंडळी आपल्या अपेक्षांचे ओझे त्या लहान मुलांवर लादत आहेत. याबाबत या कायद्यात कसल्याच प्रकारची कलमाचा समावेश नाही. त्यामूळे पालक आपल्या मुलांना कोणत्याही

शाळेत प्रवेश देऊ इच्छितात. मात्र यात थोडा बदल केल्यास महागात चाललेले शिक्षण स्वस्त होऊ शकेल. शाळेच्या परिसरांतील मुलांनाच त्या शाळेत प्रवेश दिले जावे असे जर केले तर एका शाळेत मुलांची गर्दी आणि एका शाळेत मुलेच नाहीत असे चित्र दिसते ते संपेल. शहरामध्ये तर काही शाळेत प्रवेशासाठी रांगाच रांगा लागतात तर काही शाळांना मुले शोधण्यासाठी गल्लोगल्ली फिरावे लागते. शासनाने या बाबीवर कुठेतरी आणि केव्हा तरी विचार करणे गरजेचे आहे. एका शाळेत एका वर्गात जास्तीत जास्त किती विद्यार्थी असावेत याचा काहीच नेम नाही. याबाबत काही तरी नियमावली तयार केल्याशिवाय ही शाळा-शाळांमध्ये चालत असलेली जीवघेणी स्पर्धा संपणार नाही.

मला तर वाटते ज्या प्रकारे अकरावी वर्गात केंद्रीय पद्धतीने भरती केल्या जाते अगदी त्याच पद्धतीचा वापर शहरातल्या शाळेत केला गेला तर सर्वच शाळांत समान संख्या राहील आणि सर्वांना समान शिक्षण मिळेल. आज ज्याच्याकडे भरपूर पैसा आहे, तो पैश्यांच्या बळावर खाजगी शाळेत प्रवेश मिळवीत आहे तर गरीब असलेल्या मुलांना सरकारी जि.प. शाळेशिवाय पर्याय उरला नाही. म्हणूनच आजचे शिक्षण गरिबांचे राहिले नाही अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

शिकवणी- आज शाळा व कॉलेज एवढचं किंवा त्याहून जास्त शिकवणीला महत्व दिल्या जात आहे. मुले शाळा व कॉलेजात कमी परंतू कोचिंग क्लासेस मध्ये जास्त दिसून येत आहेत. हे शहरांतील मोठे मोठे पोस्टर व बॅनर्स पाहून आपल्या लक्षात येते. दहावी व बारावीचा निकाल लागतो त्यावेळी राज्यातील सर्वच्या सर्व वृत्तपत्र कोचिंग क्लालेसच्या जाहिरातीने पानन पान भरले जातात.

प्रत्येक पालक आपल्या मुलांना चांगल्या शाळेत तर प्रवेश देण्यासाठी धडपड करतोच शिवाय चांगल्या ठिकाणी शिकवणी मिळावी यासाठी सुद्धा प्रयत्न करीत असतो. कोचिंग क्लासची खरोखरच मुलांना गरज आहे काय? याचा जरासुद्धा विचार केला जात नाही. खाजगी शिकवणी लावण्याची प्रथा केव्हापासून सुरू झाली याचा काही शोध लागू शकत नाही मात्र जो विषय कठीण वाटतो विशेष करून इंग्रजी व गणित याचसाठी पूर्वी शिकवणी लावल्या जायचे आणि शाळेत शिकविणारे शिक्षकच ते शिकवणी घ्यायचे. त्यामूळे शाळा व कॉलेजच्या वेळांचे भान त्यांना असायचे. या शिकवणीमूळे शिक्षक मंडळी वर्गात आणि घरात तेच शिकवीत असल्यामुळे मुलाची प्रगती तात्काळ कळायची.

जे मूलं शिकवणी लावू शकत नव्हते त्यांचे मात्र खूप नुकसान व्हायचे कारण ते शिकवणीला न येत असल्यामुळे शिक्षक शाळेत त्यांच्याकडे लक्ष द्यायचे नाही. त्याचे कारण एकच ते म्हणजे गरिबी ही मुले घरची गरीब असल्यामुळे शिकवणी लावू शकत नव्हते आणि शिक्षक शाळेत नीट शिकवीत नव्हते. यात त्या गरीबांच्या मुलांचे अतोनात नुकसान व्हायचे हे जेव्हा लक्षात येऊ लागले तेव्हापासून शिक्षकांच्या खाजगी शिकवणीवर बंदी घालण्यात आली आणि शाळेतील शिक्षक आत्ता शाळेतच शिकवू लागले. त्यांचे खाजगी शिकवणी बंद झाले. याचा चांगला परिणाम होईल असे प्रत्येकांना वाटू लागले होते.

परंतु काही वर्षातच खाजगी कोचिंग क्लासेसचा स्त्रोत खूप वाढीस लागला. अव्वाचा सव्वा फीस आकारणी होऊ लागली. श्रीमंताची पोरं या क्लासेसला जाऊ लागली आणि परत एकदा शाळेतील शिक्षकांचे शिकविणे थंडावले. परंतु गरीब मुलांचे काय? त्यांना आजही दर्जेदार शिक्षण मिळत नाही. काही कोचिंग क्लासेसचे संचालक गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिकवितात परंतु अश्याची संख्या फारच कमी आहे ते ही खरे आहे.

या खाजगी शिकवणीमुळे गरीबांच्या मुलांवर एक प्रकारे अन्याय होत आहे या बाबीचा कोणीही, कुठेही विचार करायला तयार नाही. शिकवणीमुळे बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळाले परंतु प्रत्येक जण शिकवणी लावू शकत नाही. त्यांना शिक्षण महागडे वाटणार नाही काय? पूर्वी अवघड वाटणा-या विषयाचीच शिकवणी लावल्या जायची आणि आज प्रत्येक विषयाची शिकवणी लावण्याची प्रथा चालू झाली. त्यामुळे मुले जास्तीत जास्त वेळ शाळा व शिकवणीमध्ये व्यस्त राहू लागले. त्याचा खेळण्याचा आणि झोपण्याचा वेळ याच कार्यक्रमात जाऊ लागला त्यामुळे त्या मुलांचे शारीरिक व मानसिक खच्चीकरण सुद्धा होत आहे

याच काही कारणांमूळे प्राथमिक शिक्षणासह सर्वच प्रकारचे शिक्षण खूपच महाग झाले आहे.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

चारोळ्या

## चारोळ्या

जगण्याची आस तू,
मनाचा विश्वास तू,
जीवनातील सोबतीला,
सुखावणारा आभास तू,
***

अबोल भाव मनीचे जाणलेस तू,
सोबतीने प्रीत बंधात मज बांधलेस तू,
तू जाणवतो सोबतीचा सखा प्यारा,
या क्षणांत चमकतोय चंद्र अन् तारा.
***

“तुटलेल्या” गोष्टी,
जोडल्या नाही जात.
असतो तो मनावर,
आयुष्यभराचा आघात.
***

ज्ञानाचा प्रकाशरुपी दिवा,
कायम तेवत रहावा.
भयान अंधकार अज्ञानाचा,
कायमचा दूर व्हावा
.***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

ललित

## जीवनात हसण्याचे महत्व

माणसाचे जीवन निरोगी राखायचे असेल तर जीवनात हास्याला मोलाचे स्थान आहे. गंभीर चेहऱ्याचा आणि कधीच न हसणाऱ्या व्यक्तीच्या सहवासात चांगली व्यक्ती सुध्दा मानसिकरित्या आजारी पडते. तर विनोदी हसऱ्या व्यक्तीसोबत शारीरिक आजार असलेल्या व्यक्तीला सुध्दा थोडा वेळ का होईना बरे वाटते. राजेश खन्ना अभिनीत आनंद चित्रपट पाहिल्यावर असे वाटते की, खरोखरच आपल्या जीवनात हास्य राहिले नसते तर आपण जास्त काळ जिवंत राहू शकलो नसतो. हसण्यामुळे मनावरचा ताण क्षणभर नाहीसा होतो आणि मनाला, मेंदूला ताजेतवाने वाटते अन् मोठ्या जोमाने हाती घेतलेले काम पूर्णत्वास नेता येते.

कोणतेही काम आत्मिक आनंदाने केले नाही तर त्या केलेल्या कामात काही रुची, चव राहत नाही. मग ते स्वयंपाक असो की, घरकाम असो वा कार्यालयीन काम. विनोदाच्या चार ओळीच दिवसभरातील शीण दूर करतात. समर्थ रामदास स्वामी "टवाळा आवडे विनोद " असे म्हणतात. कारण आज आपण आत्मिक पध्दतीने न हसता इतरांच्या फजितीवर किंवा त्यांची फसवणूक झाल्यावर हसतो. वास्तविक पाहता असे हसणे क्षणिक असावे. आपल्या हसण्याने इतरांना त्रास होणार नाही, याची जाणीव ठेवून विनोद करणे केंव्हाही चांगले. विनोदात शब्द हे खूप मोठे कार्य करतात. शाब्दिक कोट्यावरून भरपूर विनोद तयार केले जातात आणि कधी कधी सहजच विनोद तयार होतात. संत तुकाराम महाराज यांनी म्हटल्याप्रमाणे शब्द हे शस्त्र आहेत जरा जपून वापरा. शब्दाचे घाव इतर घावापेक्षा खोल असतात. त्यामूळे योग्य शब्दाचा योग्य वापर करून विनोद निर्माण करणे आपल्यासाठी आणि समाजांसाठी सुध्दा चांगले असते. जीवनात हसण्याचे प्रसंग बहुतेक वेळा येतात. साध्या साध्या घटनेतून आपण विनोद निर्माण करीत राहिलो तर कुटुंबातील वातावरण हसरे व निकोप राहील. सब टी व्ही वरील तारक मेहता का उल्टा चष्मा ही मालिका प्रत्येक कुटुंबातील लहान मोठ्या सर्व प्रकारच्या प्रसंगाना विनोदबुध्दीने संकटाना कसे तोंड द्यायचे याचे नमुनेदार

प्रसंग दाखवून सर्वांना नेहमी खळखळून हसविण्याचे काम करीत असते. आपण ही त्या पात्राप्रमाणे जगण्याचा प्रयत्न का करू नये !

आचार्य अत्रे यांना विनोदाचा बादशहा असे म्हणतात त्यांनी आपल्या जीवनातील प्रत्येक संकटाला विनोदबुध्दीने तोंड दिले चार्ली चप्लीन या जगप्रसिद्ध कलाकाराने संपूर्ण जगाला हसविले म्हणून आपण आज ही त्यांना विसरू शकत नाही चित्रपटात असे भरपूर कलाकार झाले आहेत ज्याना फक्त आपणाला हसविण्याचे काम केले म्हणून आपण त्यांना आठवण करतो. जसे की जुन्या काळातील जॉनी वॉकर, असराणी, महेमुद, जगदीप, जॉनी लिव्हर, दादा कोंडके, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे इत्यादी. आज टी व्ही वर श्रोत्यांना हसविण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रमाची रेलचेल आहे. ज्याद्वारे आपण खूप हसू शकतो. जगज्जेता सिकंदर सर्व जग जिंकला, पण रिकाम्या हाताने परतला. आपण सुध्दा असेच एके दिवशी रिकाम्या हाताने परत जाणार आहोत. तत्पूर्वी काही चांगले काम म्हणजे सर्वांना हसत खेळत ठेवण्याचे काम केलेले बरे ! आपण सर्वजण विदूषकाच्या गमती जमती पाहण्यासाठी सर्कशीला जातो सर्कस पाहुन आपण खूप हसतो त्याला पोट धरून हसणे असे म्हणतात हे कदाचित तिथे कळते. या हसण्यामुळे मनाला आनंद मिळतो. हसण्यामुळे आपल्या शरीरातील सर्वांगाचा व्यायाम होतो. त्यामूळे हसण्याचे जीवनात फारच महत्वाचे आहे. म्हणून कोठेही आणि कसेही हसता येत नाही. आपण मोठमोठ्याने हसलो तर आजूबाजूचे सर्वांचे लक्ष आपल्याकडे जाते त्यामुळे हसताना वेळ आणि जागा याचेही भान असू द्यावे. मुलींनी आणि महिलांनी फारच सांभाळून हसावे लागते. आपल्या हसण्यात सुध्दा सौंदर्य लपलेले असते. खूपच गंभीर वातावरणात थोडसं विनोद सुध्दा संपूर्ण वातावरण बदलवुन टाकू शकते.

मोठ्या शहरात रोजची धावपळ आणि धकाधकीमुळे त्याचे हास्य लोप पावत आहे असे वाटते. त्यामूळे लॉफिंग क्लब उघडण्याची नामुश्की आली आहे. हसनारे बाळ आणि हसरे व्यक्ती आपणा सर्वांना हवेहवेसे वाटतात. पण नुसतेच लटके हसणे, तोंडावरच उसने हसू इतरांच्या मनाला समाधान देवू शकत नाही. त्यासाठी मनातून हसले तरच कोणीतरी आपणाला खरी दाद देतील.

हजरजवाबीपणा आणि चातुर्य विनोद अशा गुणांच्या बाबतीत जुन्या काळातील उत्तर भारतातील बादशहाच्या दरबारातील बिरबल आणि दक्षिण राज्यातील चतुर तेनालीराम यांच्या अनेक कथा आपण ऐकलेल्या आहेत. त्यातून आपणांस त्यांची विनोदबुध्दी स्पष्टपणे जाणवते. त्यानंतर पुढील काळात मराठी साहित्यात आचार्य अत्रे यांचे नाव विनोदाच्या बाबतीत अग्रक्रमाने घेतला जातो. त्यांचीच परंपरा पुढे पु ल देशपांडे यांनी चालविली. त्याचे साहित्य आज ही वाचकांना खळखळून हसविते. चला तर मग असेच काही मजेशीर विनोद वाचू या आणि दिवसाची सुरुवात हसण्याने करू या

**

बंड्याला कम्प्यूटर इन्स्टिट्यूट मध्ये नोकरी मिळाली, पहिल्याच दिवशी तो घरी गेलाच नाही. रात्रभर काम करत बसला खूष झालेल्या बॉसने सकाळी त्याला विचारलं, " बंड्या, रात्रभर जागून एवढं कसलं काम कर होतास ?" बंड्या म्हणाला "अहो सर, सगळ्या की-बोर्डांवर 'एबीसीडी'चा क्रम चुकलेला होता. सगळ्या की उपसून नीट लावून घेतल्या...( हसा )

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

## *मराठी विचारधन*

यशाकडे नेणारा *सर्वात जवळचा मार्ग* अजुन तयार व्हायचा आहे !

***

**संग्रहित**

लेख

## माझे हक्क आणि माझे कर्तव्य

लहानपणी मला सर्वात जवळची आणि चांगली गोष्ट वाटायची ते म्हणजे माझा हक्क. मला माझी हवी असलेली वस्तू मिळायलाच हवे असे वाटायचे. बालपणीच्या वयात प्रत्येक गोष्ट मिळविण्यासाठी रडणे हा एक चांगला पर्याय असायचा. रडून ती वस्तू मिळविताना दुसऱ्याच्या हक्काची गोष्ट आपण हिसकावुन तर घेत नाही ना याचा जरा सुध्दा विचार केला जात नव्हता. पण जसजसे वय वाढत गेले आणि आणि हक्क म्हणजे काय ? याची परिचीती आली आणि कळू लागले आपल्या हक्कासोबत कर्तव्याची जाणीव जेंव्हा झाली तेंव्हा हक्काने ज्या गोष्टी मिळवायला पाहिजे त्यावर सुध्दा आत्ता हक्क न सांगता समायोजन करण्याचे शिकलो. दुसऱ्याच्या हक्कातील वस्तु हिरावून घेतल्याने आपणाला तो आनंद मिळत नाही जो आनंद आपली वस्तू इतरांना वाटण्यात मिळते. हक्काची जाणीव झाली की माणूस सर्वात पहिल्यांदा कर्तव्याकडे वळतो. ज्यांना जाणीव होत नाही ते फक्त हक्कासाठी नेहमी लढत राहतात. हक्काची मागणी करतांना कर्तव्याला विसरून चालणार नाही. मी या देशाचा घटक असल्यामूळे देशाने मला काही हक्क दिले आहेत त्याच सोबत काही कर्तव्य सुध्दा आहेत. मला चांगले शिक्षण मिळावा, शुध्द पाणी मिळावा, वीज, आरोग्य आणि मूलभूत सुविधा मिळण्याचा मला हक्क आहे. त्याच बरोबर हे हक्क मिळविण्यासाठी आपले कर्तव्य काय आहेत. आपण एक जागरूक नागरिक होऊन प्रत्येक पाऊल जागरूकतेने टाकणे आपले कर्तव्य आहे. आपण आपले कर्तव्य विसरून चालल्यामुळे आज अशी विपरित परिस्थिती बघायला मिळत आहे. त्यामुळे माझे हक्क काय आहे हे तर आपणांस माहिती पाहिजेच शिवाय कर्तव्य सुध्दा आपण कधीही विसरू नये असे वाटते.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

मंथन

## शेतकऱ्यांना जगवायचे असेल तर .

भारतातील जवळपास ७५ टक्के जनता खेड्यांत राहते. लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती म्हणूनच भारत देश कृषिप्रधान आहे असे म्हटले जाते. भारतातील संपूर्ण व्यवहार हा शेतीवरच अवलंबून आहे. शेतातून निघणा-या उत्पादनावरच भारताचा विकास अवलंबून आहे. इतरांना जगवणारा, उत्पादक असा शेतकरी मात्र फारच बिकट अवस्थेत दिसून येतो. कवी इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील ओळीनुसार शेतकरी हा उभ्या जगाचा पोशिंदा आहे. मात्र त्याच्याच पदरात धोंडा का पडतो? हे एक न सुटणारे कोडे आहे. जगाचे पालनपोषण करणारा शेतकरी मात्र महागाईच्या आगीत होरपळून निघत आहे. कर्जाच्या डोंगराखाली दबला जात आहे. त्याचबरोबर याच शेतातील उत्पादनावर व्यापार करणारी मंडळी महालातील पंख्याखाली बसून भरपूर पैसा कमवित आहेत आणि शेतात दिवसरात्र काबाडकष्ट करणारा शेतकरी मात्र हलाखीचे जीवन जगत आहे.

शेतकरी मंडळींना ना निसर्गाची साथ ना सरकारची, त्यामुळे त्यांच्या पदरात दरवर्षी निराशाच येते. पावसाळा आला की, नव्या दमाने, नव्या उत्साहाने तो कामाला लागतो. मात्र त्याच्या उत्साहावर निसर्ग कायम पाणी टाकतो. वेळेवर पावसाचे पाणी पडत नाही मात्र केलेल्या कामावर पाणी टाकायला विसरत नाही. शेतातून निघणा-या उत्पादनांवर भरवसा ठेवून शेतकरी आपले कौटुंबिक व्यवहार पूर्ण करतो आणि ऐनवेळी निसर्गाकडून त्यास फटका बसतो. त्यामुळे त्याच्या डोक्यावर कर्जाचे डोंगर वाढत जातात व एक दिवस अशी परिस्थिती येते की, शेतक-यांना आत्महत्या करण्याशिवाय पर्यायच दिसत नाही. एका वर्षात कोणत्या भागात किती शेतक-यांनी आत्महत्या केल्या? हे महत्त्वाचे नाही. महत्त्वाचे आहे ते शेतकरी आत्महत्या का करतो? निसर्गाची साथ- भारतात प्रामुख्याने दोन प्रकारची शेती केली जाते. एक म्हणजे जिरायती अर्थात कोरडवाहू आणि दुसरी बागायती. देशात दुस-या प्रकारापेक्षा पहिल्या प्रकाराची शेती करणा-यांची संख्या जास्त आहे.

निसर्गावर आधारित शेती करावी लागते, त्यामुळे त्याचे जीवन बेभरवशाचे असते. शेतकरी पै-पै गोळा करून बी-बियाणे, खते व औषधी खरेदी करतो आणि शेतात टाकतो. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे एक तर त्याला आकाशाकडे डोळे लावून बसावे लागते किंवा अति पावसामुळे पाऊस थांबण्याची वाट पाहावी लागते. काही का असेना फटका मात्र शेतक-यांनाच बसतो. सध्या तरी कोरडवाहू शेती करणे म्हणजे एक जुगारच आहे. लागली लॉटरी तर लागूनच जाते अन्यथा बरबादच. नशिबाने साथ दिली तरच शेतात टाकलेले बी-बियाणे, खते, औषधे आणि श्रम यांना फळ मिळते. नाही तर खर्च झालेली मुद्दल रक्कमसुद्धा त्यास परत मिळत नाही. शेतक-यांसोबत दरवर्षी असेच घडते. त्यामुळे त्याच्या पदरात नेहमीच निराशा पडते.

शेतक-याचे जीवनमान, त्याचा जीवन जगण्याचा स्तर उंचवायचा असेल तर सर्वप्रथम त्याची शेती निसर्गावर अवलंबून राहू नये अशी परिस्थिती निर्माण करावी. निसर्गाचा लहरीपणा निर्माण केला आपणच आणि त्यास अटकाव करण्याची जबाबदारी आपणावरच आहे. पाऊस पडणे वा न पडणे हे सरकारच्या हाती नाही. पाण्याचे योग्य नियोजन करणे, वृक्षलागवड करून वृक्षसंवर्धन करणे इत्यादी साधे उपाय करणे आवश्यक आहे. वृक्षांमुळे पाऊस पडतो हे आता सर्वज्ञात झाले आहे. उघड्या जागेवर, माळरानावर, टेकड्यांवर जास्तीत जास्त वृक्ष कसे जगविता येतील याचा प्रत्येकाने विचार करणे आवश्यक आहे. निसर्गाची शोभा व पर्यावरण संतुलन कसे राखता येईल यावर विचार झाला पाहिजे.

*** शेतक-यांच्या उत्पादनाला हमी भाव**

शेतकरी जीवनावश्यक अशा अनेक अन्नघटकांचे उत्पादन करतो. संसार चालविण्यासाठी पैशाची आवश्यकता भासते त्यामुळे तो आपला उत्पादित माल बाजारपेठेत विक्रीसाठी आणतो. मात्र बाजारपेठेतील मागणी व पुरवठ्याच्या गणितात शेतक-यांना नेहमीच फटका बसतो. जेव्हा शेतक-याजवळ शेतमाल असतो त्यावेळी बाजारात भाव कमी असतो आणि व्यापारी मात्र साठवणूक करून चढ्या भावाने विक्री करतात. दरवाढीचा खरा फायदा शेतक-यांना होण्याऐवजी तो दलालांना व व्यापा-यांनाच जास्त होतो. त्यामुळे अन्नधान्य उत्पादन करणारा पोशिंदा कंगाल बनत चालला आहे तर त्याच्या उत्पादनावर जगणारी बांडगुळे श्रीमंत होत आहेत. तेव्हा शासनाने या प्रश्नाविषयी गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. बाजारपेठेत व्यापारी वा दलाल लोकांची मक्तेदारी संपुष्टात आणण्यासाठी प्रत्येक शेतक-याला आपला उत्पादित माल साठविता येईल अशा शीतगृह कोठारांची गावोगावी निर्मिती करावी. मध्यस्थाच्या मदतीने चालणारा व्यवहार बंद करून शेतक-यांच्या प्रत्येक उत्पादित मालाचे शासनाने हमी भाव अगोदरच जाहीर केल्यास शेतक-यांची लूट होणार नाही. उत्पादित मालाची नोंदणी शेतक-यांच्या नावे करण्यात यावी ज्यामुळे शेतकरी विक्री करताना तूरडाळीची किंमत ३५ रु. प्रति किलो आणि व्यापारी विक्री करताना ८० रु. तर या वाढीव रकमेतून निदान ५० टक्के रक्कम शेतक-यांना मिळावी असा कायदा तयार केल्यास शेतक-यांचा नक्कीच फायदा होईल. शेतक-याच्या हातून एकदा माल गेला की त्यावर त्याचे कसल्याच प्रकारचे नियंत्रण नसते.बाजारात सध्या असलेली ही विषमता दूर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बाजारपेठेतील शेतक-यांच्या उत्पादित मालाचे सर्व व्यवहार कृषि उत्पन्न बाजार समितीमार्फतच व्हावेत. बाजारपेठेत शेतक-यांच्या मालाची बोली लावण्याची पद्धत सर्वप्रथम बंद करावी. उत्पादित मालाला वेगवेगळ्या प्रकारची नावे ठेवून दलाल मंडळी एकाच प्रकारच्या उत्पादनाला दर तासाला किंवा दिवसागणिक वेगळेच भाव लावतात. अशा या लिलाव प्रक्रियेमुळे शेतकरी हवालदिल होतो. त्याऐवजी स्थिर भावात खरेदी-विक्री झाल्यास शेतक-यांना आपल्या उत्पादित मालाविषयी विश्वास वाटतो. व्यापारी किंवा दलाल मंडळींना फाटा देऊन ज्याप्रकारे पणन महासंघ कापूस खरेदी करते त्याच धर्तीवर सर्व उत्पादित माल जसे की, तूर, मूग, उडीद, सोयाबीन इत्यादी सर्व वस्तू शासनाने खरेदी कराव्या व एकच हमीभाव जाहीर करावा म्हणजे शेतकरी विश्वासपूर्वक जगू शकेल.

*** जोडधंदा करण्यासाठी अनुदान द्यावे**

शेतीला पूरक असा जोडधंदा असेल तर शेतातून झालेले नुकसान या व्यवसायातून भरपाई करता येऊ शकते.

पश्चिम महाराष्ट्र, खानदेश किंवा कोकण विभागातील शेतकरी शेती या मुख्य व्यवसायासोबत पशुपालन, शेळीपालन किंवा इतर जोड व्यवसाय करतो. ज्यामुळे त्याला आर्थिक चणचण भासत नाही किंवा ऐनवेळी कोणाकडे जावे लागत नाही. याच जोडधंद्याची उणीव मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागात दिसून येते. येथील शेतक-यांची नुकसानभरपाई कोणत्याच मार्गाने होत नाही.

२०-२५ वर्षांपूर्वी प्रत्येकाच्या घरी एक तरी दुभते जनावर असायचे ज्यामुळे दूध त मिळतच होते शिवाय दुग्धजन्य पदार्थही घरीच मिळत होते. त्याचसोबत जनावरेही वाढत होती. मात्र ५-१० वर्षांपासून जनावरांची संख्या कमी झाली. जेथे दुधाची गंगा वाहात होती तेथील लोकांना चहासाठी जेवढे दूध लागते तेवढ्या दुधासाठी मोताद होण्याची वेळ आली. एवढी विपरीत स्थिती का निर्माण झाली? शासनाने वेळीच यावर उपाययोजना आखली नाही. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी संपूर्ण कर्जमाफी केली. याने आत्महत्या थांबल्या का? नाही. उलट वाढतच गेल्या. याव्यतिरिक्त शासनाने प्रत्येक शेतक-याला पशुपालन, शेळीपालन वा इतर जोड व्यवसाय उभारणीसाठी सबसिडीच्या स्वरूपात किंवा कर्जाच्या स्वरूपात रक्कम दिली असती तर लाखो शेतक-यांच्या हाताला काम मिळाले असते, गावात समृद्धता वाढली असती. शेतक-यांची नुकसानभरपाई झाली असती, त्याचसोबत धवलक्रांतीही घडली असती. काही लघुउद्योगांसाठी जरी कर्जपुरवठा झाला असता तर त्याच्या मानसिकतेत बदल झाला असता. परंतु कर्जमाफी करून शेतक-यांना आळशी बनविले.

फुकट मिळालेल्या पैशातून दारू, जुगार या बाबींवर खर्च करणा-यांची संख्या कमी नाही. एक प्रकारे शासनाने लोकांना फुकट जगविण्याचा जणू विडा उचलला आहे असे दिसते. नुकतेच पारित करण्यात आलेले अन्न सुरक्षा विधेयक २०१३ मधून एक चित्र ठळकपणे दिसत आहे. भविष्यात शेतकरीवर्गास शेतात काम करण्यासाठी जे काही मजूर लागतील ते अव्वाच्या सव्वा दरात मिळवावे लागतील आणि कदाचित मजूर मिळणारही नाहीत. कारण या विधेयकानुसार देशातील अर्ध्या जनतेला कमी दरात अन्नधान्य मिळत असेल तर ते काम का करतील? आज अंत्योदय योजनेतून जे सूक्ष्म चित्र दिसत आहे या योजनेतून अगदी ठळक दिसेल. यापेक्षा शासनाने शेतक-यांच्या उत्पादित मालाला संरक्षण व हमी भाव दिला असता तर फार बरे झाले असते.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

चारोळ्या

## चारोळ्या

नखशिखांत नटलेला
पाऊस एकदा भेटायला हवा
गारवा मनाचा असा
मनामनात रूजायला हवा
***

तुला बरसताना पाहिले की
शब्द माझ्याकडे धावत येतात
आणि त्यातून पुन्हा एकदा
कवितांच्या ओवी बनत राहतात
***

आभाळ भरून आल्यावर
वाटतं धरती होऊन जावं
आणि पावसात मनसोक्त
ओलेचिंब होत नाहून निघावं
.***

**शानिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोट्याचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५५०७६४५६**

लेख

# मुलींचे शिक्षण: प्रगतीचे लक्षण

शनि शिंगणापूर येथील मंदिरात महिलांना प्रवेश द्यावा किंवा नाही या बाबत सध्या समाजात, मिडियामध्ये जोरदार चर्चा चालू आहे. खरोखरच शनि मंदिराच्या चौथ-यावर महिलांना प्रवेश मिळाला तर त्यांचे सारेच प्रश्न सुटतात काय ? चारशे वर्षापासून चालू असलेली परंपरा सहजा सहजी बदलेल असे वाटत नाही. ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण, महिलांची कुचंबणा, घरात व दारात महिलांची होत असलेली मुस्कटदाबी याविषयी फार कमी बोलल्या जाते. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडल्या जात नाही त्यांमूळे त्यांच्या वरील अन्याय काही केल्या कमी होत नाही. यात महिलांनीच पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांवर होणारे अन्याय महिलांनीच सक्षमरित्या सामना करून सोडविले पाहिजे, त्याशिवाय महिलांची प्रगती अशक्य आहे आणि ही शक्ती महिलांमध्ये फक्त शिक्षणामूळेच येऊ शकते. शिक्षण हा मानवी जीवन विकासाचा मुख्य स्त्रोत आहे. शिक्षण घेतल्यामुळे आपल्या जीवनाला एक दिशा मिळते, संजिवनी मिळते. यांचे उत्तम उदाहरण म्हणून आपण महात्मा ज्योतिबा फुले आणि त्यांची पत्नी सावित्राबाई फुले यांच्या जीवनचरित्राकडे पाहू शकतो. अनाडी व निरक्षर पत्नी मूळे एके दिवशी ज्योतिबाना त्यांचा महत्वाचा कागद गमवावा लागला आणि त्याच वेळी पत्नी सावित्रीबाईला साक्षर करण्याचा त्यांनी मनसुभा केला. तेवढ्याच तत्परतेने त्यास सावित्रीबाईनी होकार दिला. घरातल्या घरात शिक्षण दिले. त्याचा फायदा एवढा झाला की, देशातील पहिलि महिला शिक्षिका होण्याचा मान सावित्राबाई फुले यांना मिळाला. साहित्याच्या क्षेत्रात त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. महात्मा फुले यांना शिक्षणाचे महत्व कळाले होते. त्यामुळे त्यांनी सन १८४८ मध्ये पुणे येथील भिडेच्या वाड्यात खास करून मुलींसाठी देशातील पहिली शाळा सुरू केली. एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब शिकते अशी त्यांची धारणा होती त्यातूनच मग त्यांनी आपल्या पत्नीला शिकवले. असे महत्व प्रत्येक पालकांना, नव-यांना म्हणजेच पुरूष मंडळींना कळणे गरजेचे आहे. समाजात आजही मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीत पालक जागरूक नाहीत. असे म्हणण्यापेक्षा मुलांच्या व मुलींच्या शिक्षणाबाबत दुजाभाव करीत असतात. मुलगी शिकून काय करणार ? ही पालकांची भावना अजूनही दुर झालेली नाही. इंग्रजांच्या गुलामीगिरीच्या काळात महिलानी घराबाहेर जाणे अगदी तुच्छ समजले जायचे. महिला या " चूल आणि मूल " एवढ्याच कामासाठी समाजात राबत असत, तर शिक्षणासाठी घराबाहेर जाणे दूरची गोष्ट. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी देशासमोर निरक्षरता ही फार मोठी समस्या होती. त्यातल्या त्यात महिलांची निरक्षरता तर देशाच्या प्रगतीत फार मोठी अडसर ठरत आले आहे. त्यामुळे शासन प्रथम पासुनच महिलांच्या शिक्षणावर भर देत आले आहे. गेल्या वीस एक वर्षापासुन शिक्षणाच्या बाबतीत भारताची प्रगती उल्लेखनीय झाली म्हणणे चुकीचे ठरणार नाही. प्राथमिक शिक्षणात सर्व शिक्षा अभियान मोहिमेमुळे मुलींच्या शिक्षणाला प्रेरणा मिळाली. शासनाने मुलींच्या शिक्षणाचा प्रचार व प्रसार व्हावा या साठी मुलींचा उपस्थिती भत्ता, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मोफत गणवेश, मोफत पुस्तके, सावित्रीबाई फुले मागासवर्गीय शिष्यवृत्ती योजना, विद्यावेतन, शाळेला ये-जा करण्यासाठी राजमाता जिजाऊ मोफत सायकल योजना, एसटी ने मोफत प्रवास करण्यासाठी अहिलाबाई होळकर योजना, कस्तुरबा गांधी बालिका निवासी विद्यालय, मानव विकास योजना, तसेच लेक वाचवा लेक शिकवा या सारख्या अनेक योजनाच्या माध्यमातून मुलींच्या शिक्षणासाठी शासन प्रयत्न करीत होते आणि करीत आहे. त्यांना त्यात काही अंशी यश मिळाले पण पुर्ण यश मिळालेच नाही. त्यांची अनेक कारणे आहेत. त्या कारणाचा विचार करून त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे.

*** पालकांची शिक्षणाबात अनास्था -**

मुलींच्या शिक्षणासाठी ग्रामीण भागातील पालकामध्ये तेवढी उत्सुकता व जागरूकता दिसत नाही, जेवढे शहरी भागातील पालक जागरूक असतात. ग्रामीण भागातील पालक स्वत: शिक्षणाच्या बाबतीत अनभिज्ञ असतात, त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्व पटत नाही. बरं शिक्षणाचे महत्व पटत नाही असे जर म्हणावे तर हेच निरक्षर पालक आपल्या मुलाचे शिक्षण कुठेच थांबू देत नाहीत. पोटाला चिमटा देऊन आपल्या मुलाचे शिक्षण पुर्ण करतात

आणि मुलीचे शिक्षण मात्र या ना त्या कारणांवरुन थांबवितात. गावात ज्या वर्गापर्यंत शाळा त्याच वर्गापर्यंत मुलींना शाळा शिकण्याची मुभा दिली जाते. पुढील शिक्षणासाठी जवळच्या गावात किंवा शहरात जावे लागते आणि त्याठिकाणी जाण्यासाठी मुलींना परवानगी दिली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे आज प्राथमिक वर्गातील मुलींची संख्या माध्यमिक वर्गात गेल्यावर ५० % पेक्षा कमी होते ही गळती मुलीच्या विकासास नक्कीच बाधक ठरत आहे.

*** अनिष्ठ रूढी व परंपरा –**

ग्रामीण भागातील समाज आज ही अनिष्ठ रुढी व परंपरेच्या खोल गर्तेतुन बाहेर येण्यास तयार नाहीत. मुलींच्या शिक्षणा विषयी त्यांच्या मनात आज ही तेच विचार घोळत आहेत जे की, वीस वर्षापूर्वी होते. मुलीने शिकून काय करावं ? शेवटी घरच तर सांभाळायचे आहे. त्यासाठी एवढं शिक्षण पुरेस आहे या विचाराने ग्रामीण भागातील पालक आपल्या मुलींचे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच बंद करायला भाग पाडतात. काही पालक मंडळी मुलींना सुरक्षेच्या कारणांवरून शाळेत पाठविणे बंद करतात. मुलींचे लग्न होईपर्यंत आई-वडिलांना तिची काळजी वाटते, मुलींच्या वाट्याला कोणतेही वाईट प्रसंग येऊ नये असे प्रत्येक पालकांना वाटते त्यामुळे त्यांचे पुढील शिक्षण बंद करण्यात आल्याचे काही पालक खाजगीत बोलतात. तर काही पालक मुलगी आता उपवर झाली, तिच्या साठी एखादे चांगले स्थळ बघुन एकदाचं हात पिवळं केलं की, मी मोकळा होईन असे बोलतात. त्यांच्या या बोलण्यातून मुलीं विषयी असलेली त्यांची तळमळ व काळजी स्पष्टपणे दिसून येते. सध्या समाजात असलेले गढूळ वातावरण आणि मुलींच्या बाबतीत वाढत चाललेली असुरक्षितता यामूळे कोणीही मुलीच्या शिक्षणासाठी पुढील पाऊल टाकताना दिसून येत नाही. त्याच बरोबर देशात चालत आलेली वधूपक्षाकडून वरपक्षाला द्यावी लागणारी देणगी म्हणजे हुंडा. यामुळेसुध्दा मुलींच्या शिक्षणावर फार मोठा प्रतिकूल परिणाम दिसून येत आहे. एखाद्या पालकांने आपल्या मुलींना खुप शिकविले, तिच्या शिक्षणावर खूप खर्च केला, असे असले तरी मुलींच्या लग्नाच्या वेळी देणगी द्यावीच लागते अशी परंपरा मुलींच्या शिक्षणास घातक ठरत आहे. त्यामुळे अश्या अनिष्ठ रूढी व परंपरा यास तिलांजली देणे अत्यावश्यक आहे. एवढं शिकवून, खर्च करून जर पुन्हा आहे तीच प्रथा सांभाळायची असेल तर मुलींच्या शिक्षणावर खर्च का करावा ? असा सर्व सामान्य विचार पालक करतोच, यात त्याचा तरी काय दोष ? पण याउलट मुलगी शिकून सवरून नौकरीला लागली किंवा स्वत:च्या बुध्दीमत्तेच्या बळावर रोजगार मिळवून कमावती झाली तर समाजात तिची पद, प्रतिष्ठा, मानसन्मान या सर्वच गोष्टी वाढीस लागतात. महिलांच्या हातात स्वत:चा पैसा असला किंवा पुरुषांकडे भीक मागण्याची वेळ जर महिलांवर येत नसेल तर तिला स्वाभिमानाने जीवन जगता येते. स्वाभिमानी स्त्रिया ह्या अनिष्ठ रुढी, परंपरा आणि प्रथा यांच्याविरोधात लढा देऊ शकतात आणि त्यात यश सुध्दा मिळवू शकतात. म्हणूनच मुलींचे शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे.

*** हक्क आणि कर्तव्याची जाण –**

भारतात आज सर्वच क्षेत्रात महिलांची प्रगती नेत्रदीपक अशी आहे. भारताच्या सर्वोच्च अश्या राष्ट्रपती पदावर प्रतिभाताई पाटील यांनी पाच वर्ष आपली धुरा सांभाळली आणि पहिली महिला राष्ट्रपती होण्याचा मान मिळविला.घरातून राजकीय वारसा लाभलेली श्रीमती इंदिरा गांधी या देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या. देशातल्या विविध राज्यात महिला ह्या मुख्यमंत्री वा इतर महत्वाच्या पदावर काम करीत आहेत. देशाची पहिली महिला पोलिस महासंचालक पदावर श्रीमती किरण बेदीचे नाव ठळक अक्षराने लिहीले गेले. लता मंगेशकर यांना भारताची गानकोकीळा म्हणून संबोधले जाते. क्रीडा क्षेत्रात पी.टी. उषा, कविता राऊत, मल्लेश्वरी, साईना नेहवाल, सानिया मिर्झा इत्यादी सर्व महिला आपल्या अपूर्व योगदानाने देशाला यशोशिखरावर नेण्यासाठी महत्वाची भुमिका बजावली आहे. विविध क्षेत्रात असंख्य महिला आहेत. ज्यांची कामगिरी खरोखरच नेत्रदीपक आहे. त्या सर्वांची यादी करीत बसलो तर फारच लांबलचक यादी होईल. महिलांची भरारी डोळ्यात भरणारी असली तरी हे चित्र फार समाधानकारक नाही. कारण आज ही महिलांना म्हणावी तशी संधी मिळत नाही, हे वास्तव नाकारून चालणार नाही. देशाच्या राजकारणात आणि इतर महत्वाच्या क्षेत्रात महिलांना संधी मिळावी,

त्यांच्यात धाडस, साहस, प्रगती व्हावी यासाठी सरकारने महिलांना पन्नास टक्के आरक्षण देण्याच्या तयारीत आहे. परंतु आज जे काही महिला राजकारणात आहेत किंवा ज्यांनी निवडणूक जिंकून सत्ता व पद मिळविले आहेत. त्या पदावर खरोखरच महिलाच राज्य करीत आहेत काय ? याचे वास्तव चित्र असे आहे की बहुतांश ठिकाणी सरपंच, पोलिस पाटील, तालुक्याचे सभापती, शहराचे नगराध्यक्ष किवा जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी महिलांची वर्णी लागत आहे. त्यांचे रिमोट मात्र त्यांच्या पतीराजच्या हातात आहे. यास कारण एकच आहे ते म्हणजे या पदाधिकारी महिला शिकलेल्या नसल्यामूळे ते आपल्या पतीच्या हातून कारभार पाहत असतात. संविधानाने ज्या हेतूने किंवा उदेश्याने नियमावली तयार केली त्याचा आपण अश्याप्रकारे अनादर करीत असतो. आपणाला आपले हक्क आणि कर्तव्याची जाण निर्माण करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. निरक्षर किंवा अडाणी बाई लोकप्रतिनिधी झाली तर त्या विभागाचा विकास जसा व्हायला पाहिजे तसा होतो का ? निदान याचा एक वेळा विचार करून आपल्या मुलींना शिकवू या. उद्या कदाचित ती गावची सरपंच बनून गावाचा कायापालट करू शकेल.

*** पालकांचे दारिद्र्य**

मुलींच्या शिक्षण विकासात पालकांचे दारिद्र्य ही फार मोठी समस्या आहे. पोटाचे प्रश्न जो पर्यंत सुटत नाहीत तो पर्यंत माणसाचे कशातच लक्ष नसते. शेती काम करतांना घरातील लहान मोठी कामे करण्याची गरज घरातील मुलीं कडून पूर्ण केल्या जाते. घरातील छोटी भांवडे सांभाळणे, कपडे धुणे, भांडी घासणे, घर सांभाळणे इत्यादी कामे अर्थातच मुलींना करावे लागते. याउलट मुले काहीच काम करीत नाहीत तरी आई-वडीलांचा मुलांविषयी वेगळाच भाव असतो आणि मुलीं विषयी वेगळाच. एवढं असून सुध्दा प्राथमिक वर्गात मुलींची अभ्यासातील प्रगती मुलांपेक्षा जास्त दिसून येते. याची प्रचिती दहावी व बारावीच्या निकाल ज्यावेळेस लागतो त्यावेळेस निदर्शनास येते. मुलींचा निकाल मुलांच्या निकालापेक्षा नेहमीच सरस असतो. पहिल्या दहा मध्ये सर्व श्रेष्ठ गुणांत मुलींच बाजी मारतात. मात्र पुढे पदवीचे शिक्षण घेतांना मुलींच्या संख्येत लक्षणीय घट होते. गुणवत्ता यादीत झळकणा-या मुलीं कदाचित कुठे तरी नौकरी मिळवतिल परंतु बाकीच्या मुलींचे पुढे काय प्रगती होते ? या बाबत प्रश्न चिन्हच आहे. याउलट दहावी-बारावीत सर्वसाधारण गुण मिळविलेला मुलगा मात्र आपले शिक्षण पूर्ण करून नोकरीसाठी प्रयत्न करतो. ही प्रथा कुठे तरी बंद व्हायला पाहिजे मुलगा असो वा मुलगी सर्वांना शिक्षण मिळायलाच हवे. याउलट मुलींचे शिक्षण समाजाच्या व देशाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. आज देशात जे काही अनैतिक किंवा अराजकता वाढत चालले आहे. त्यास मुलींना शिक्षण न देणे हेच प्रमुख कारण दिसून येते. मुलीने शिक्षण घेतले तर तिला स्वत:बद्दल आत्मविश्वास निर्माण होतो. आज घरोघरी हुंडाबळी किंवा विवाहित मुलींचा जो छळ चालू आहे त्यास शिक्षण घेतलेली मुलगी नक्कीच विरोध करेल यात शंकाच नाही. मुलींच्या सुरक्षित आयुष्यासाठी तिला वयाच्या आठराव्या वर्षा पर्यंत शिक्षण देणे आवश्यक आहे. देशाच्या प्रगतीसाठी मुलींचे शिक्षण हे फारच आवश्यक आहे. पराया धन किंवा परक्या घरची सून म्हणून जाणारी, आपल्या घरांसाठी तिचा ज्ञानाचा काय फायदा ? अश्या गोष्टीचा विचार न करता मुलींना शिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यायाच्या विरूध्द आवाज उठविण्यासाठी मुलींना शिकवलेच पाहिजे, त्याशिवाय देशाचा विकास अशक्य आहे. म्हणूनच मुलींचे शिक्षण म्हणजे प्रगतीचे लक्षण असे म्हटल्या जाते ते काही खोटे नाही हे आपण नेहमी साठी लक्षात ठेवावे.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

## मराठी विचारधन

स्वतंत्र हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे पण त्याचा स्वैराचार होऊ न देणं हे आपलं आद्यकर्तव्य आहे.

***

**संग्रहित**

**लेख**

# जिल्हा परिषद शाळा कात टाकतंय

जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळा म्हटले की, प्रत्येकांच्या डोळ्यासमोर एक वेगळेच चित्र उभे राहते. ज्या चित्रात त्या शाळाची, तेथील परिसराची, शिक्षकांची आणि विद्यार्थ्याच्या बाबतीतचे चित्रण भयानक दिसून येते. या शाळांची स्थिती कधीच सुधारणार नाही, अशी धारणा प्रत्येकाची बनलेली आहे. या शाळांत फक्त गरिबांची मुलेच शिकतात म्हणून यास गरिबांची शाळा असे सुध्दा संबोधले जाते. सरकारी यंत्रणेमार्फत चालविण्यात येणारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियंत्रणाखालील जिल्हा परिषदेची शाळा प्रत्येक गावात आढळून येते. कारण 'गाव तेथे शाळा" या संकल्पनेत प्रत्येक गावात, वाडी-तांडयात, डोंगर, कपा-यात, दरी खो-यात प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. सहा ते चौदा वयोगटांतील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी वेगवेगळया योजना राबवून जसे की महात्मा फुले शिक्षण हमी योजना, साखर शाळा, राजीव गांधी निवासी व अनिवासी सेतू शाळा, वस्ती शाळा, हंगामी स्थलांतरित पालकांच्या मुलांसाठी वसतीगृह इत्यादी योजनेतून शासनाने मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्याचा प्रयत्न केला. भारत प्रजासत्ताक होतांना भारतात मोठ्या प्रमाणात निरक्षर लोकांची संख्या होती, ती भारत सरकार समोर एक फार मोठे आव्हान होते. स्वत: निरक्षर असल्यामूळे त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे ही लक्ष दिले नाही. त्यामूळे दुसरी पिढी सुध्दा निरक्षरतेच्या खाईत लोटली गेली. त्यानंतरची पिढी मात्र शिकून सवरून साक्षर झाली, नोकरी लागली आणि समृध्द बनली. त्यामुळे आज शाळेत दाखल होणा-या मुलांचे पालक जवळपास नव्वद टक्के साक्षर, समजूतदार सजग व शिक्षणाला महत्व देणारे आहेत. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळेशिवाय पर्यायच नसतो. काही श्रीमंत किंवा पैसेवाले मंडळी आपल्या पैशाच्या बळावर शेजारच्या इंग्रजी शाळेत आपल्या मुलांना पाठवितात. सरकारी शाळेत काहीच शिकविले जात नाही, असे टोमणे या सरकारी शाळांसाठी वशिला पुजेलेले आहे. त्यात या पालकांना दोष देऊन चालणार नाही. कारण तसे वास्तव त्यांना कुठेनकुठे दिसते. गव्हासोबत किडे रगडण्याच्या प्रकारामूळे चांगल्या असलेल्या शाळा आणि विद्यार्थी सुध्दा या चूकीच्या रांगेत नेऊन बसविले जाते. वास्तविक पाहता सरकारी शाळा एवढ्या वाईट नव्हते किंवा नाहीत, सध्या वर्ग एक किंवा दोन पदावर काम करणा-या अधिका-यांचे प्राथमिक शिक्षण कोठून पूर्ण झाले ? या प्रश्नांच्या उत्तरांतून कळेल की, ते सर्व जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळेतून प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले आढळून येतील.

ज्याकाळी शिक्षणाच्या प्रचार आणि प्रसार म्हणावा तेवढा झाला नव्हता त्या काळात शाळेतून शिकवायला गुरूजी मिळत नसायचे, हा एक गंभीर प्रश्न होता. असाच प्रसंग महात्मा ज्योतिबा फुले यांना सन 1848 मध्ये जेंव्हा पुण्यातील भिडेच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली होती, त्यावेळी त्यांच्या समोर हा प्रश्न राहिला होता. मात्र त्यांनी स्वत:ची पत्नी सावित्राबाई फुले यांना यासाठी तयार केले आणि देशातील पहिली महिला शिक्षिका बनण्याचा मान त्यांना मिळाला परंतू शासन इथे तसे करू शकत नाही. त्यांच्यावर काही बंधन असतात, नियम असतात. उत्तम शेती, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ नोकरी या त्रिसुत्रीच्या विचारधारेत असलेल्या मंडळींनी त्यांकाळी शिक्षकांची नोकरी करण्यास तयार नव्हती. त्या मंडळीना आजही या घटनेचा पश्चात्ताप होत असे आढंळून येते. कारण त्यांच्या सोबतची मंडळी शिक्षकाची नोकरी करीत आज सुखात आहेत. पंचवीस - तीस वर्षापूर्वी प्रत्येक गावात रस्ता आणि वीज पोहोचली नव्हती त्यामूळे शिक्षक सुध्दा पोहोचले नव्हतेच किंवा त्यांचे प्रमाण कमी होते. चिखलाचा रस्ता तुडवित, एका हातात धोतराचा सोगा अन दुस-या हातात चपलांचा जोडा आणि मानेवर लांब छत्री अडकवुन आठवडयातल्या पहिल्या दिवशी सोमवारी गुरूजी शाळेत यायचे. हात-पाय स्वच्छ धुऊन झाले की, शाळेकडे म्हणजे एकच वर्गखोली त्यात प्रवेश करायचे. आपली शबनम बाजूला ठेवून साफसफाई केल्या जायची. मग सुरु व्हायचा शाळेचा दिनक्रम. गुरूजीचा एक ही शब्द खाली पडू द्यायचे नाही, गुरूजींनी आपणाला काही तरी काम सांगावे असे प्रत्येकांना वाटायचे. परंतु गुरुजी ठराविक मुलांनाच काम सांगायचे, याचा इतर मुलांना राग यायचा. गुरूजीचा गावातील सर्व लोकांशी संपर्क असायचा. चांगला असो,

भांडकुदळ असो, बेवडा असो वा नालायक, गुरूजींना सर्वच जण नमस्कार करायचे आणि गुरूजी सुद्धा सर्वांना. आठवडाभर मुक्कमी राहणारे गुरूजी स्वत:ची कामे कधी स्वत: करीत तर कधी इतरांकडून करवून घेत. शाळेत तुटका फळा, एकच लाकडी पेटी ज्यात शाळेचा संपूर्ण दप्तर, एक टेबल, एक खुर्ची एवढेच काय ते साहित्य. एकाच वेळी सर्व वर्गांना शिकवायचे. काही काम असले की, वरच्या वर्गातील अंगाने लठ्ठ, धष्टपुष्ट असलेल्या मुलाला मॉनिटर म्हणून उभे करायचे आणि आपले काम पूर्ण करायचे. एखाद्या मुलाला वाचता आले नाही किंवा गणित सोडविता आले नाही की, गुरूजींची शिक्षा कडक राहत असे. गुरूजींची शिक्षा मिळू नये यासाठी प्रत्येक मूल धडपड करी, प्रयत्न करी, आणि शिक्षा मिळाली नाही याचा मनातून आनंद व्हायचा. याच प्रसंगातून मुले शिकली, मोठी झाली. काहींना सरकारी नौकरी मिळाली, काहींना खाजगी तर काही व्यापारी झाले अन उरले सुरले सर्व शेतकरी आणि शेतमजूर बनले. परंतू त्या गुरूजींला ते अजूनही विसरले नाहीत आणि विसरणार ही नाहीत. कारण गुरूजी आणि मुलांमध्ये जिव्हाळा निर्माण झालेला असतो.

पूर्वीच्या शाळेचा इतिहास पाहता सध्याच्या सरकारी शाळा त्या मानाने खूप चांगल्या आहेत. खडू - फळा मोहिम आणि सर्व शिक्षा अभियानामूळे पडक्या घरात, ग्रामपंचायतीत किंवा झाडाखाली भरणा-या शाळा स्वत: च्या इमारतीत भरू लागल्या आज गावोगावी सर्व सोयी सुविधायुक्त ( तांत्रिक कारणामूळे सुविधा बंद अवस्थेत असेल ती गोष्ट वेगळी ) शाळा आहेत. शिक्षकांना ये-जा करण्यासाठी रस्ते चांगले झाले आहेत. त्यास्तव त्या गावात राहण्याचा त्यांना प्रश्नच येत नाही. तसेच स्वत:कडे वाहन असल्यामुळे तर ये - जा करण्याचा प्रश्नच मिटला. आज शाळेवर अध्यापन करण्यासाठी येत असलेला शिक्षक हा स्वत: हुशार असल्यामूळे स्वत:चे प्रतिबिंब विद्यार्थ्यांत पाहणार, यात आश्चर्य ते काय ? याच विचार प्रक्रियेतून आज राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा कात टाकतंय असे म्हणणे चूकीचे अन अतिशयोक्तीचे ठरणार नाही. संगणक युगाच्या काळात आज प्रत्येकांच्या घरी मोबाईल, लॅपटॉप आणि संगणकाचा वापर चालू झाला आहे. घरात ही वस्तू असल्यामूळे त्याचा वापर शालेय मुले सुध्दा करू लागली. जमाने के साथ चलो प्रथेनूसार शिक्षक मंडळींना सुध्दा याच प्रवाहात सामिल होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यानुसार 'डिजिटल शाळा' ही संकल्पना पुढे आली. त्यासाठी लागणारा लाख-दिड लाख रूपयांपर्यंतचा निधी सरकार ऐवजी शिक्षक, गावकरी, तरूण मंडळ, ग्रामपंचायत याच्या लोक सहभागातून जमा करण्यात येऊ लागला. पाहता पाहता राज्यातल्या अनेक शाळा डिजिटल क्लासरूम मध्ये रुपांतर होऊन विद्यार्थ्यांना ई-लर्निंग चे धडे द्यायला सुरूवात झाली आहे. राज्याचे शिक्षण सचिव नंदकुमार साहेब आणि शिक्षण आयुक्त पुरुषोत्तम भापकर साहेब यांनी राज्यातील तंत्रस्नेही शिक्षकांना दिलेल्या प्रोत्साहनामूळेच आज राज्यात सर्वत्र डिजिटल शाळांचे वारे वाहत आहेत. सध्या अजून एक बाब प्रकर्षाने लक्ष वेधून घेत आहे ते म्हणजे कुमठे बीट येथील ज्ञानरचनावाद. दररोज किती तरी शाळांचे शिक्षक, मुख्याध्यापक आणि अधिकारी वर्ग या कुमठे बीटला भेट देऊन ज्ञानरचनावाद समजून घेत आहेत. त्या ज्ञानाचा फायदा आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना देत आहेत. चांगली बाब दृष्टीस पडल्या शिवाय आपली दृष्टी देखील बदलत नाही हे ही तेवढेच खरे आहे. आज राज्यात किती तरी शाळा डिजिटल झाली आहेत. आय एस ओ मानांकनाच्या शाळा आहेत. ज्ञानरचनावाद युक्त शाळा आहेत. इंग्रजी शाळेला लाजवेल अशा ही सरकारी शाळा पहायला मिळतात. पूर्वीसारखा शिक्षक आज नक्कीच नाही. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारावर मोबाईल, टॅब, लेपटॉप आणि संगणकाचा वापर करीत मुलांना गुणवंत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गरज आहे लोकांनी या सरकारी शाळाकडे चांगल्या दृष्टीने पाहण्याची. सरकारी शाळेतील शिक्षकावर विश्वास ठेवून, त्यांना सर्वतोपरि मदत करण्याची, नक्कीच ते चांगले करून दाखवू शकतात. बहुतांश गावात लोकांची मदत शाळेला मिळत नाही, शाळेला भरपूर निधी येतो तेंव्हा या शाळेला आम्ही का मदत करायची ? अशी विचार प्रणाली गावातील लोकांची असते म्हणून त्या गावाची शाळा नावारूपास येत नाही. शीतावरून भाताची परीक्षा न करता आपल्या गावातील शाळांचे भविष्य आपणच घडवावे. तालुक्यात, जिल्हयात अश्या अनेक शाळा आहेत ज्याचा कायापालट गावातील लोकांनी मिळून केला आहे. आपली एक रुपयांची मदत शाळेला लाखमोलाचे काम करून जाते. शाळा आपली आहे ही संकल्पना तयार होण्यासाठी शाळेला थोडा वेळ द्या, शिक्षकाची समस्या समजून घ्या, त्यांना

प्रोत्साहित करा, त्यांना गावकरी मंडळीच्या आधाराची खरी गरज असते. नेमके याच ठिकाणी चुका होतात आणि शाळा फक्त नावालाच शाळा राहते. जेथे वरील पध्दतीने शाळा चालविली जाते, तेथील शाळा खरोखरच सुंदर होतात. इंग्रजी शाळेचे खूळ मनातून काढून टाकून पालकांनी आपल्या मुलांना सरकारी शाळेत प्रवेश देणे गरजेचे आहे. पूर्वी सारख्या शाळा आणि शिक्षक आज राहिले नाहीत म्हणून आता लोकांनी जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणे आवश्यक आहे कारण सरकारी शाळा आता कात टाकतंय.........

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

**चारोळ्या**

## चारोळ्या

तशी अजूनही दिसते
माझ्यात प्रतिमा तुझी रितसर
आणि पाऊस म्हटला की
प्रीत झुले आभाळभर
***

पाऊस दरवेळी तुझ्यापरि
हवाहवासा वाटतो
अथांग अशा या नभापरि
आठवणी पेरून जातो
.***

**शानिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोट्याचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

**लेख**

## मराठी भाषा गौरव दिन

ज्येष्ठ साहित्यिक, नाटककार, कादंबरीकार तथा भारतीय ज्ञानपीठ पुरस्कार मिळविणारे मराठी साहित्यातील दुसरे साहित्यिक कविश्रेष्ठ विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त आज संपूर्ण महाराष्ट्रात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा होत आहे त्या निमिताने मराठी भाषेच्या विकासासाठी आपण सारे जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवे. मराठी भाषा ९ व्या शतकापासून प्रचलित भाषा आहे.

मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकसंख्येनुसार मराठी ही जगातील पंधरावी व भारतातील चौथी भाषा आहे.मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. मात्र आपल्याच राज्यात आपण आपल्या मराठी भाषेला पदोपदी ठार करीत आहेत. बहुतांश वेळा आपण गांभीर्याने विचार न करता भाषेचा वापर करीत असतो, त्यामुळे भाषेची पुरती वाट लागून जाते. ज्यांना भाषेच्या प्रत्येक शब्दांत असलेल्या सौंदर्य आणि सामर्थ्यांची जाणीव नसते, त्यांना वाक्यरचनेशी किंवा शब्दाशी काही देणे-घेणे नसते. अशा लोकांच्या भाषेमूळे मराठी भाषा रसातळाला जात आहे, म्हणणे चूकीचे ठरणार नाही. माणसाच्या जीवनांत आईचे स्थान जेवढे महत्वाचे असते तेवढेच मातृभाषेचे ही असायला पाहिजे. पण आज तिच्याबाबत जे चित्र दिसते ते दुर्दैवाने फार वेगळे आणि मन उदास करणारे आहे. ती स्थिती बदलण्याची जबाबदारी जिथे जिथे मराठी माणूस राहतो आहे, तिथे तिथे प्रत्येकाची आहे.

आज प्रत्येकजण आपल्या पाल्यांना मराठीच्या शाळेत शिकविण्या ऐवजी इंग्रजी मिशनरीच्या शाळेत शिकविण्याकडे जास्त कल दिसून येत आहे. संपूर्ण जगात इंग्रजी भाषा बोलणा-यांची संख्या सर्वात जास्त आहे. इंग्रजी लिहिता-बोलता आली तर आपले मूल जगाच्या स्पर्धेत टिकू शकतो. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणातील इंग्रजी सोपी वाटावी म्हणून त्याला K.G. पासून इंग्रजीचे धडे शिकविण्यास प्रारंभ केल्या जाते. सध्या पालकांचा असा एक भ्रम झाला आहे. की, प्राथमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून

झाले की त्याला पुढील शिक्षण काही कठीण वाटत नाही.परंतु वास्तव काही उलट आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या मुलांच्या संकल्पना अधिक स्पष्ट होतात. त्यास घोकंपट्टी किंवा वारंवार अभ्यास करावे लागत नाही. विषयाची संकल्पना मुलांना कळाली तर ते अगदी बिनधास्त पणे व्यक्त करू शकतात आणि त्यासाठी मातृभाषेतून शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे. इंग्रजी शाळेत टापटीपपणा आणि होमवर्क पूर्ण करण्याची पध्दत एवढे दोनच बाबी कोटेकोरपणे पाळले जातात. येथे शिकविण्यासाठी तज्ञमंडळी उपलब्ध नसल्यामूळे थातूर मातूर शिकविले जाते याकडे मात्र साफ दुर्लक्ष केल्या जाते. पालकांकडून भरपूर पमाणात फिस च्या स्वरूपात पैसा उकळणे आणि त्या बदल्यात मात्र त्या मुलांना घोकंपट्टीशिवाय काहीच मिळत नाही, हे वास्तव चित्र आहे. याउलट एखादी इंग्रजी शाळा असू शकते जे की पालक व विद्यार्थ्यांच्या सर्व आशा पूर्ण करू शकेल. पण अश्या शाळांच्या संख्या फार कमी. मुलांच्या भावना लक्षात न घेता आपण त्यांना त्या गैरभाषे कडे वळवितो तर याबाबीमूळे मुलांवर अपण अन्याय करीत नाही का ? याबाबीचा विचार कोणताही पालक करतांना आढळून येत नाही. या बाबतीत समाजातील काही शिक्षणतज्ञ किंवा जाणकार लोकांनी पालकांचे योग्य मार्गदर्शन करून त्यांची होणारी आर्थिक व मानसिक पिळवणूक थांबविणे गरजेचे आहे. इंग्रजी माध्यमात शिकणा-या मराठी मुलाची भाषा जर ऐकायला आणि पहायला मिळाली तर त्याची फारच कीव येते कारण त्यांना मराठी शब्दांचे अर्थ नीट कळत नाहीच शिवाय नियमानुसार अक्षरांचे लेखन सुध्दा करीत नाहीत.

संत तुकाराम महाराज यांनी शेजा-यावर प्रेम करा असा संदेश दिला आहे. मात्र ही मंडळी शेजा-यांशी नेहमी तुलनात्मक दृष्टीने पाहतात. पालक वर्ग नेहमी शेजा-यांच्या मुलांची तुलना करत असतात. शेजा-याचा मुलगा इंग्रजी माध्यमात शिकत असेल आणि रेन रेन कम अगेन म्हणत असेल तर आपले मूल सुध्दा असे गीत म्हणावे असे त्यांना वाटते परंतू त्या इंग्रजीच्या मुलांना रेन रेन कम अगेन चा अर्थ कळत नाही तो फक्त यांत्रिक पध्दतीने गात असतो परंतू आपला मराठी शाळेतील मुलगा ‘ येरे येरे पावसा ’म्हणताना त्याच्या चेह-यावरचे भाव स्पष्ट दिसतात. कारण त्याचा अर्थ त्याला कळालेला असतो. लहान वयात जी भावना, संकल्पना स्पष्ट होते ती आयूष्यभर सोबत राहते तसेच संकल्पना समजून घेण्यासाठी मातृभाषा कधीच ओझे वाटत नाही इंग्रजी सारखी. इकडे मराठी माध्यमाच्या शाळांतील मुलांची स्थिती खुपच चांगली आहे, असेही छाती ठोकून सांगता येत नाही. कारण येथील मुलांची स्थिती सुध्दा मराठीच्या बाबतीत फारच वाईट आहे. मराठी भाषेला नीट समजून न घेता दरवर्षी एका नवीन वर्गाची पायरी चढत शाळेच्या बाहेर पडलेला जेव्हा समाजात व्यवहार करण्यास प्रारंभ करतो तेंव्हा निरक्षर व्यक्तीपेक्षा साक्षर व्यक्तीच मराठी भाषेला पदोपदी मारत असतांना आढळून येतो.

मात्र (मातृ) देवो भव, कार अपघातांत त्यांचा अंत्य (अंत) झाला, पाणी हे द्रव्य (द्रव) आहे. आज शिक्षक दीन (दिन) आहे, सचिनचा कर्म (क्रम) सौरभ नंतर येतो इत्यादी वाक्याचे बारीक निरीक्षण केल्यास कंसातील शब्दामुळे वाक्याचा अर्थ स्पष्ट होतो मात्र भाषेचे ज्ञान नसलेले किंवा अर्धवट ज्ञानी मंडळी एक प्रकारे भाषेचे चिरफाड करून वाक्याचे अनर्थ करून टाकतात. हे म्हणजे कसे आहे, गाडी नीट चालवता येत नसलेल्या व्यक्तीच्या हातात गाडी देऊन अपघात करून घेण्यासारखे नाही का ? ज्याप्रकारे गाडी चालवण्यासाठी परवानाची गरज भासते अगदी त्याच प्रकारे भाषेची मांडणी करणा-या व्यक्तीला विशेष ज्ञान असल्याचा परवाना आवश्यक नाही काय ?

लहानपणापासून मुलांच्या बोलण्याकडे विशेष लक्ष देवून त्यांच्यात वारंवार सुधारणा घडवून आणण्याची जबाबदारी प्रत्येक पालकांनी घेणे आवश्यक आहे. प्राथमिक शाळेतून शिक्षण घेतांना मुलांना मराठीच्या जास्तीत जास्त शब्दाची तोंड ओळख कशी होईल ? याचे नियोजन प्रत्येक भाषा विषय शिकविणा-या शिक्षकांनी केले पाहिजे. शब्द पाहिले, ऐकले आणि लिहिले तरच त्याच्या कायम स्मरणात राहील. मराठी शब्दांच्या बाबतीत अगदी प्राथमिक शिक्षणाच्या पाया पासून श्रवण भाषण,वाचन आणि लेखन या (LSRW) चार टप्यानुसार चालते आणि शिक्षकांचे सुक्ष्म निरीक्षण असेल तर मुलांमध्ये भाषेचे फार कमी चुका होतील. परंतु विशेष करून येथेच दुर्लक्ष केल्या जाते आणि भविष्यात याच मुलांच्या हातून भाषेची चिरफाड होतांना दिसून येते. मराठी भाषा फार सोपी वाटत असेल तरी या विषयात

अनुत्तीर्ण होणा-यांची संख्या फार मोठी आहे. कारण स्वत:च्या भाषेत या मुलांना वर्णन करता येत नाही. त्यांना वेळेवर पर्यायी अर्थपूर्ण शब्द आठवत नाहीत किंवा खरा शब्द नेमकं कसा आहे? हे ही लक्षात येत नाही. सन 1960 साली भाषेनुसार महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. परंतू गेल्या पन्नास वर्षात मराठीचा व्हावा तेवढा विकास झाला नाही. कारण या समस्येकडे कुणीच गांभीर्याने लक्ष देत नाहीत. यासाठी समाजातील प्रत्येक घटक तेवढाच जबाबदार आहे. त्यामुळे मराठीची प्रगती व्हावी, त्याचा विकास व्हावा,त्याची चीरफाड होवू नये असे वाटत असेल तर प्रत्येकाने आज जागे होणे अत्यंत गरजेचे आहे. शाळेतून विशेष करून मराठी भाषा शिकविणा-या शिक्षकांनी याविषयी गांभीर्याने दक्षता घेवून मुलांच्या भाषिक कौशल्याचा विकास करावा. इयत्ता पहिली व दुसरीमध्ये अनुलेखन ,तिसरी व चौथ्या वर्गात शुध्दलेखन आणि पाचवी ते आठव्या वर्गापर्यंत प्रत्येक विद्यार्थ्यांना श्रुतलेखन योग्य प्रकारे करता यावे असा किमान उद्देश डोळ्या समोर ठेवून कार्य केल्यास मुलांत वारंवार होणा-या चूका नक्कीच टाळता येतात. बहुतांश वेळा मुलांची श्रवण प्रक्रिया योग्य प्रकारे विकसीत न झाल्यामुळे समान आवाजाच्या शब्दात मुले घोळ करतात जसे खाक-काक, मखर–मकर , खेळ-केळ ,भार–बार, घार–गार , झरा–जरा ,झाग–जाग,धार–दार ,भाई–बाई , साफ–साप,फळ-पळ, संग-संत,बंध-बंद, फर–पर ,खल-कल, भाग–बाग, साथ–सात , पथ–पत,कोश-कोष, इत्यादी शब्द ज्यांची ध्वनी जवळपास सारखी वाटते आणि शब्दाचा अर्थ बदलतो. यानंरत मराठीत असेही काही शब्द आहेत ज्यांच्या -हस्व व दीर्घ इकार व उकार मुळे वाक्याचा अर्थच बदलून जातो. जसे की, आदी–आदि, आयत- आयात, आर्त–आर्द, स्त्री-इस्त्री, कोश–कोष, दिन–दीन, नियत-नीयत, केशर–केसर, पास–पाश, पिक–पीक, बहु–बहू, लक्ष-लक्ष्य, विष–वीस ,चालक-चालाक, इ. अशा बारीक सारीक बाबींकडे विषय शिक्षकांनी लक्ष दिल्यास मुलांच्या मराठी लेखनात नक्कीच सुधारणा होवू शकेल. संत ज्ञानेश्वर महाराजांनी माझा मऱ्हाटीचि बोलु कवतुके परी अमृतातेही पैंजेसी जिंके असे म्हटले आहे तर प्रसिध्द गजलसम्राट सुरेश भट यांनी म्हटले आहे

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य एक तो मराठी**
**धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी**
**एवढ्या जगात माय मानतो मराठी**

मराठी भाषेचा विकास व्हावा व प्रगती व्हावी असे मनातून वाटत असले तर प्रत्येकांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. शालेय वयात इंग्रजी शब्दार्थ पाठांतर करीत असल्याचे आपणा सर्वांना आजही आठवते. मात्र मराठी शब्दार्थ पाठांतर आपण करतो कां? अर्थातच याचे उत्तर नाही असेच येते. इंग्रजी शब्दाची जास्तीत जास्त ओळख व्हावी म्हणून ऑक्सफर्डची डिक्शनरी प्रत्येकजण एकदा तरी हाताळलेला असतो. मात्र मराठीची शब्दासंपत्ती वाढवी म्हणून निदान मराठी विश्वकोषाचे खंड हे दूरचीच गोष्ट आहे निदान वसंत आबाजी डहाके यांचा शालेय मराठी शब्दकोशाचा शंभरामागे एखादा मराठी व्यक्ती हाताळतो. मराठी भाषेसाठी ही फार मोठी शोकांतिका आहे. त्यास्तव प्रत्येकाने आपली शब्दसंपत्ती कशी वाढविता येईल याचा जरूर विचार करावा. यासाठी मुलांना लहानपणा पासून विविध प्रकारचे मराठी शब्दकोडे सोडविण्याचा छंद कसा लागेल याकडे विशेष लक्ष द्यावे. वारंवार कोडे सोडविल्यामुळे खेळत खेळत मराठी भाषेच्या अनेक शब्दांची व त्याच्या अर्थाची ओळख होते. मराठी भाषेच्या विकासासाठी व भाषेची चिरफाड टाळण्यासाठी प्रत्येकांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

परिमलांमध्ये कस्तुरी का अंबरामध्ये शंबरारी, तैसी मऱ्हाठी सुंदरी भाषांमध्ये, ही ओळ लक्षात ठेवून आपल्या मराठी भाषेचा अभिमान बाळगू या. मराठी भाषा गौरव दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

लेख

## भ्रष्टाचार बनलाय शिष्टाचार

'पाचशे रूपयाची लाच घेताना अमूक कर्मचा-यांस अटक' अशा आशयाच्या बातम्या आत्ता रोजच वर्तमानपत्रातून प्रकाशित होत आहे. कदाचित अशा बातमी शिवाय त्या दिवशीचे पेपर पूर्णच होत नसेल! राज्यात कुठे ना कुठे अशी घटना घडतेच. कारण आज भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनत चालला आहे. तसेच भ्रष्टाचार करण्यासाठी ही मंडळी मागे-पुढे अजिबात कसलाही विचार न करता इतरांसोबत वागत असतात. सरकारी कर्मचारी त्यास शासनांकडून त्यांच्या कुटूंबाचे पालन पोषण होईल, एवढा पगार मिळतो. तरी सुद्धा त्यांची पैसा कमाविण्याची लालसा काही केल्या कमी होत नाही. मिळेल त्या पगारात जी व्यक्ती समाधानी असते त्याला कुठेच भ्रष्टाचार करण्याची गरज भासत नाही. असे म्हटल्या जाते की, आडमार्गाने कमावलेला पैसा कसा येतो आणि किती येतो हे जसे कळत नाही तसे गेल्याचे सुद्धा कळत नाही. कारण या पैश्यांसाठी आपल्या शरीरातील घाम गळत नाही. घामाचा पैसा असेल तर त्याचा हिशेब सुद्धा लागतो. आजकाल झटपट पैसा मिळविणे आणि आपले जीवन सुखी समृद्ध बनविण्यासाठी प्रत्येकजण आपली नैतिकता वेशीला टांगून अनैतिक कृत्य करीत आहेत. भ्रष्टाचाराची सुरूवात घराच्या दारांपासून सुरू होते ते थेट मंत्रालयाच्या दारात जाऊन पोहोचते. या दरम्यान अनेकांची दारे लागतात, त्या त्या ठिकाणी भ्रष्टाचार दृष्टीस पडतो. म्हणजेच भ्रष्टाचाराची सुरूवात स्वत:पासून करावी लागते. स्वत:पासून मग तो स्वत: खासदार असेल, आमदार असेल, उच्चपदस्थ अधिकारी असेल, साधा कर्मचारी असेल किंवा खाजगी कंपनीत काम करणारा असेल, त्यांनी भ्रष्टाचार करणार नसल्याचे जर ठरविले तर याचा नायनाट होऊ शकतो.

महात्मा गांधीजी म्हणतात की, कोणत्याही चांगल्या कामाची सुरूवात स्वत:पासून करण्यात यावी. आपण मात्र इतरांकडे बोटं दाखवितो. त्यामुळे कामाची सुरूवात होतच नाही. या भ्रष्टाचाराला सुरूवात अगदी सहजपणे होते, तेव्हा आपणाला असे वाटत सुद्धा नाही की, माझ्यामूळे या भ्रष्टाचाराला सुरूवात झाली. एका कार्यालयातील काम संबंधित कर्मचा-याने अपेक्षेपेक्षा लवकर पूर्ण करून आपल्या हाती दिल्यानंतर आपल्याला आनंद होणारच. मग त्या आनंदाच्या भरात आपण त्या कर्मचा-याला 'चला एक कप चहा घेऊ या' असे म्हणणार. कर्मचारी ही मग आपली टेबल व खुर्ची सोडून चहा पिण्यास जाई. येथूनच मग सुरू होतो 'चहा-पाण्याचा खर्च'. काही ठिकाणी यापेक्षा वेगळा अनुभव असेल ही कदाचित. परंतु व्यक्ती आपल्या कामाला जेव्हा सुरूवात करतो तेव्हा त्याला कामाची जाणिव अधिक प्रमाणात असते. मात्र जसे जसे सेवा वाढत जाते आणि त्या क्षेत्रात रूळले जातात तसे तसे कामाला प्राधान्य देण्याऐवजी 'चहा-पानाला' प्राधान्य देत असतो. यावरून आपण निष्कर्ष काढू शकतो की, भ्रष्टाचाराला सुरूवात कोणी केली, आपण की कर्मचा-याने. प्रत्येक विभागात याचे वेगवेगळे अनुभव येतात जर यदा कदाचित लाच न घेणारा अधिकारी कार्यालयाला भेटला तर त्याचे जीवन हे लोक तंगवून टाकतात. त्याच्यावर वेगवेगळ्या स्तरांवरून दबाव टाकल्या जाते आणि प्रामाणिक असलेल्या कर्मचा-यास सुद्धा या भ्रष्टाचाराच्या खाईत ओढल्या जाते. त्यांची ईच्छा नसतांना सुद्धा जेव्हा भ्रष्टाचार करण्याची पाळी येते तेव्हा त्यांना स्वत:ला पश्चाताप वाटत असेल ही कदाचित परंतु काहीच करता येत नाही. राज्यात असे ही काही विभाग आहेत ज्या ठिकाणी भ्रष्टाचार न करणे एकप्रकारे अप्रामाणिक समजल्या जाते. लाच घेणारा व्यक्ती कामाचा निपटारा तात्काळ करतो, हे सत्य आहे.

भ्रष्टाचाराची कीड समाजाला लागली आहे. ती कीड समूळ नष्ट करण्यासाठी आपल्यात बदल करावा लागेल. माझ्या कामांसाठी मी एक ही रूपाया न देता काम पूर्ण करून घेण्याचा निर्धार करणे गरजेचे आहे. मग त्यासाठी दहा वेळा चकरा मारले तरी चालेल असा विचार केल्यास यात बदल होऊ शकतो. एखाद्या कर्मचा-यास लाच लुचपत विभागात पकडून दिल्याने समाजातील ही भ्रष्टाचाराची कीड नष्ट होणार नाही. या गुन्ह्यातून सुद्धा अनेक लोक सुटतात त्यामूळे यावर सुद्धा लोकांचा आज विश्वास कमी होत चालला आहे. शेवटी जाता जाता एक बाब सांगावेसे वाटते की, ज्या दिवशी एखाद्या गोष्टीत भ्रष्टाचार करून आपण पैसा कमाविला असेल त्या रात्री आपणांस गाढ झोप लागते का?

जर झोप लागत नसेल तर आपण कमाविलेले लाखो रूपये काही कामाचे नाहीत. कारण त्या पैशातून झोप विकत घेता येत नाही. इकडे प्रामाणिक काम करणा-या व्यक्तीला पैसा कमी मिळत असेल परंतु रात्री समाधानाने झोप लागते. त्यासाठी झोपेची गोळी घ्यावी लागत नाही. यावरून प्रत्येकाने विचार करावा आणि भ्रष्टाचार संपविण्यासाठी स्वत: पहिले पाऊल उचलावे, याशिवाय भ्रष्टाचार संपविणे शक्यच नाही.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

**कविता**

## उन्हात दाटल्या तळ्याशी

उन्हात दाटल्या तळ्याशी
तुझी मिठी वेडी खुळी
जागवीत स्पंदने श्वासांची
बहरास आल्या प्रणयलहरी
काळजास उसवीत येतो
श्वास तुझा अनवाणी
घनवसंत मोगरा फुलतो
पेटत्या देहांमधूनी

***

**स्वाती उदार**
**ई पत्ता : swati.udar@gmail.com**

**लेख**

## परीक्षेला जाता जाता

फेब्रुवारी महिना उजाडला की, सर्वांना परीक्षेचे वेध लागतात. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाद्वारे या परीक्षेच्या कार्यक्रमाचे उद्घाटन बारावीच्या परीक्षेने दरवर्षी करीत असते. तसे बारावीच्या परीक्षेला फेब्रुवारी महिन्याच्या 18 तारखेपासून सुरुवात झाली. त्यानंतर दहावीच्या परीक्षेला आजपासून सुरूवात होत आहे. मग इयत्ता पहिली ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होते. विद्यापीठाच्या परीक्षेने या परीक्षांचा शेवट होतो. परीक्षेच्या काळात मुलांवर एक वेगळ्याच प्रकारचे दडपण जाणवते. वर्षभर केलेल्या अभ्यासाची फक्त दोन ते तीन तासात परीक्षा द्यावी लागते. बहुतांश वेळा असे होते की ऐनवेळी विद्यार्थी प्रश्नाचे उत्तर विसरतात. परीक्षेच्या काळात गोंधळून जाऊ नये किंवा मनावर जास्तीचे दडपण घेवू नये. परीक्षेच्या आदल्या दिवशी जागरण करून अभ्यास न करता निश्चित झोपी जावे. उद्याचा पेपर कसा जाईल ? याची अजिबात काळजी न करता आपले डोके शांत ठेवल्यास त्याचा परिक्षेच्या काळात निश्चितपणे फायदा होतो. नावडता विषय आपणाला अवघड वाटतो, त्याची जास्तच काळजी वाटते. त्यामुळे त्या विषयातील येत असलेला भाग सुध्दा आपण विसरून जातो. असे होऊ नये यासाठी त्या विषयाची धास्ती मनात न ठेवता परीक्षेला सामोरे जावे. इयत्ता पहिली ते आठव्या वर्गाची परीक्षा पध्दत बंद केल्यामूळे विद्यार्थ्यांचा परीक्षेला जाण्याचा सराव कमी झाला असे म्हणणे चूकीचे ठरणार नाही. पूर्वी पहिल्या वर्गापासून घटक चाचणी व सहामाही म्हणजे प्रथम व द्वितीय सत्र परीक्षा होत असत. परिक्षेच्या काळात शाळेमध्ये सर्वत्र परीक्षेचे वातावरण असायचे, जो तो आपले डोके पुस्तकांत खुपसून अभ्यास करीत बसायचे, शक्यतो गृहपाठाच्या वह्या वाचून काढले जायचे कारण त्यातीलच प्रश्न परीक्षेत विचारल्या जायचे. परीक्षेला जातांना आपल्या उजव्या हाताच्या करंगळीने सामसोळीच्या शेपटाला स्पर्श केला तर पेपर सोपा जातो असं परीक्षेच्या आदल्या दिवशी मित्रांमध्ये चर्चा व्हायची. नेमकं परीक्षेला निघताना ती सामसोळी मात्र कुठच दिसायची नाही. पेपर सोपा गेला तर त्याची आठवण सुध्दा यायची नाही. परंतु

जर पेपर अवघड गेला असं जर वाटलं तर मनात रुखरुख लागायची. परीक्षेतला जातांना अजून एक प्रकर्षाने व्हायचं परीक्षेच्या पॅडला तुळशीचे दोन पान लावायचे. त्याचं काय गुपित आहे ते आजपर्यंत कळले नाही. आज शहरात अंगण नाही तर तुळस कुठं दिसणार. पण ही बाब अजूनही घरोघरी दिसून येत आहे. परीक्षेचा दिवस उजाडला की, सकाळी सर्व कामे आटोपून परीक्षेला पॅड घेऊन निघतांना आई ओरडून म्हणायची" अरे देवाच्या पाया पड, पेपर सोपा जाईल" तिच्या या बोलण्याचं मला हसू यायचे आणि मी म्हणायचो 'वर्षभर अभ्यास केल्यामूळे माझं पेपर सोपं जाणारच आहे. त्यासाठी देव काय मदत करणार आहे. तो काय स्वत: येऊन मला लिहायला मदत करणार आहे कां ? असा प्रति प्रश्न तिला विचारायचा. आपल्या देवाला कुणी काही असं बोललेलं तिला खपायचे नाही, रुचायचे नाही. ती मला समजावून सांगे की, 'देवाला पाया पडल्याने आत्मिक समाधान लाभते, बळ मिळते, एक वेगळा उत्साह येतो. यामूळे देवाला नमस्कार करायचा'. मग शेवटी आईचे मन रहावे म्हणून देवासमोर नतमस्तक व्हायचो. पहिला पेपर सोपा गेला की, आपसुकच दुस-या दिवशी परीक्षेला जाण्यापूर्वी पाय देवघरांकडे वळायचे. मग यानंतर जीवनात कोणती ही परीक्षा असो त्यापूर्वी आपले पाय देवघरांकडे वळतातच. आज ही आम्ही हीच प्रथा किंवा परंपरा आपल्या मुलांपर्यंत पोहचवित आहोत. आज आपली मुले जेंव्हा परीक्षेला निघतांत त्यावेळेस 'जा देवाचे पाया पड आणि मग परीक्षेला जा' असे आपण अगदी सहज म्हणतो. परीक्षेला जातांना देवाच्या पाया पडावे किंवा नाही हा वादातीत विषय आहे. त्यावर चर्चा केल्यास वादंग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. मात्र देवाच्या पाया पडल्यानंतर जो आत्मविश्वास मनात तयार होतो, ते अत्यंत महत्वाचे आहे. परीक्षा म्हणजे एक कसोटी, आयुष्यात घेत असलेले महत्वाचे वळण. या कसोटीत निर्भेळ यश मिळविण्यासाठी देवांसोबत घरातील वाड-वडिलांचे आशीर्वाद घेणे सुध्दा अत्यंत महत्वाचे आहे असे वाटते. ज्याप्रकारे पूर्वी रंणागणावर जातांना राजे महाराजे आपल्या पूर्वजांचे आशीर्वाद घ्यायचे तसेच काहीसे या परीक्षेच्या बाबतीत होत असते. स्वामी समर्थाच्या 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' या वाक्याने त्यांच्या भक्तात एक नवी प्रेरणा, उत्साह दिसून येतो दे रे हरी पलंगावरी अशी ज्याची वृती नाही त्याला परीक्षेची अजिबात भीती वाटत नाही. परीक्षेत जास्तीत गुण मिळावे यासाठी नकला मारणे ही स्वत: सोबत केलेली फार मोठी चूक आहे. त्यामूळे नकला मारून पास होण्यात काही अर्थ नाही. या परीक्षेत कदाचित तुम्ही पास व्हाल पण आयुष्याच्या परीक्षेत नकलाच नसतात तिथे मात्र नापास होण्याची शक्यता जास्त असते. नकला मारणे म्हणजे चोरी करणे. आणि चोरी कधी ना कधी पकडली जाते. म्हणून मुलांनो, परीक्षेत यशस्वीपणे तोंड देण्यासाठी परमेश्वर आपणास सुबुध्दी देवो, आत्मिक बळ देवो. दहावीची परीक्षा देणाऱ्या सर्वांना खुप खूप शुभेच्छा.

***


**नागोराव सा.येवतीकर**

**मु.येवती, ता.धर्माबाद**

**ई पत्ता : nagorao26@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**


**चारोळ्या**

## चारोळ्या

वाटतं एकदा पाऊस व्हावे
तुझ्या सोबती चिंब नाहवे
आयुष्यात साचलेले शिण
तुझ्या मिठीत विरघळून जावे
***

आयुष्याच्या ओंजळीत
शब्दांचे दान
तुझ्या माझ्या प्रितीचा
रुजला इथे मान
.***


**शानिल चंद्रकांत पाटील**

**मु. मोहोट्याचापाडा, ता. वाडा, जि. पालघर**

**ई पत्ता : netbhaari@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

लेख

# आई - वडील हेच खरे दौलत

एका कवितेत घार उडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी असे वाचले आहे. खरोखरच आई वडीलांची आपल्या लेकरांबाबतची माया निराळीच असते. तळहाताच्या फोडाप्रमाणे आई वडील मुलांची देखभाल करतात, त्यांना मोठी करतात. आजच्या काळात मात्र मुले मोठी झाल्यावर आपल्या जन्मदात्यालाच विसरतात. ज्यांनी आपणाला या सुंदर अश्या पृथ्वीवर आणले, त्यांना वृध्दाश्रमात धाडण्यास सुध्दा मागे पुढे पहात नाहीत. ज्या आई वडिलांनी आपणाला लहानाचे मोठे केले त्यांच्याप्रति आपले काहीच कर्तव्य नाहीत काय ? त्यांच्यावर आपण एवढा अन्याय का करावा ? आजच्या विभक्त कुटुंब पध्दती मुळे नातवंडाना आजोबांची कथा आणि आजीचे गाणी ऐकायलाच मिळत नाहीत.आजी - आजोबांचे प्रेम कसे असते हे फक्त चित्रपटातून पाहण्याची वेळ त्यांच्यावर आलेली आहे. या नातवंडाचे किती दुर्भाग्य ! अशा घटनांना सर्वस्वी ही मुलेच जबाबदार आहेत असे मला वाटते.

काही कुटुंबात भावाभावाचे वाद होतात. काही वेळा बायकोच्या कटकटीमुळे ईच्छा असूनही मुलांना आई वडिलांपासून दूर रहावे लागते. अशा वेळी घरातील चिमुकल्याचे खूप नुकसान होते. दिवसेंदिवस समाजातील नितिमत्ता खालवली जात आहे. घरातील थोरासाठी ज्या काळात वृध्दाश्रमाची सोय झाली, त्याच काळात नितिमत्ता लयास जाण्यास सुरुवात झाली. मी माझ्या आई वडिलांना सांभाळू शकत नाही, असे म्हणताना आई वडिलांनी स्वतःच्या पोटाला चिमटा देऊन आपले पोट भरविले या गोष्टीची आठवण मुलांनी एकदा तरी ठेवायला हवी. रोज सकाळी उठून देवपूजा करते, देवाला गोडधोड नेवैद्य देते, पण सासू सासऱ्याच्या तब्येतीबद्दल न विचारणाऱ्या सुनेला आयुष्यभर देव कळणार नाही. आजकाल माहेरच्या सांगण्यावरून किंवा कुठल्याही कारणावरून " आम्ही दोघे राजा राणी, घरात नको परका कोणी" अशीच संसाराची पध्दत नवीन मुलींच्या मनात रूढ होऊ पाहत आहे. संकृतमध्ये एक श्लोक आहे मातृ देवो भव, पितृ देवो भव अर्थात आई वडिलांना देव माना व त्यांचा आदर करा, सेवा करा, यांतच मुलांची पुण्याई आहे. एखाद्या तीर्थक्षेत्री ठिकाणी भेट दिल्याने जे पुण्य मिळविता येते असे वाटते त्यापेक्षा जास्त पुण्य आई वडिलांच्या सेवेतून मिळते. आज तुम्ही तुमच्या आई वडिलांना जर वृध्दाश्रमात पाठवित असाल तर उद्या तुम्हांला सुध्दा याच वृध्दाश्रमात तुमची मुलं तुम्हांला पाठवणार नाहीत कश्यावरून. कारण जसे पेराल तसे उगवणार ते तर ठरलेलेच आहे. तेंव्हा प्रत्येक मुलाने " वृध्दाश्रम कश्यासाठी " यावर सखोल चिंतन करून आपल्या आई वडीलांची आजन्म सेवा करावी ते आपले परम कर्तव्य आहे.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

चारोळ्या

# चारोळ्या

तसं पाहिलं तर
आपल्यात कुठलंच नाही वैर
तरीही पाऊस म्हटला की
होतो आपण इथे गैर
***

जगण्याचा हा अट्टाहास
जेव्हा तुझ्याकडे वळतो
तेव्हा माझं मलाच कळत नाही
मी नव्याने कसा जगून जातो
.***

**शनिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोट्याचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

लेख

# मरावे परी कीर्तिरूपे उरावे

आज भारताचा ६९ वा स्वातंत्र्य दिन. ह्या सोनेरी दिवसाची पहाट पाहण्यासाठी कित्येक लोकांना आपले प्राण गमवावे लागले. आजच्या दिवशी आपण ह्या सर्व थोर मंडळीची आठवण करतो.

"भारतमाता की जय" असा नारा देतांना त्या छोट्याशा शिरीषकुमारची आठवण आल्याशिवाय राहत नाही. तो शाळकरी वयाचा म्हणजे जेमतेम १० वर्षाचा होता. इंग्रजांचा विरोधात नारे दिल्यामुळे आणि भारतमातेची सेवा केल्यामुळे त्याला इंग्रजांनी ठार केले. परदेशी कपड्यांच्या गाडीसमोर स्वतःचे बलिदान करणारे बाबू गेनूला आपण कसे विसरू. शिरीषकुमार व बाबू गेनू आज आपल्यात नाहीत परंतु त्याच्या आठवणी, त्याचे कार्य अजूनही स्मरणात आहे. आपण ते कधीच विसरु शकत नाही. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नेताजी सुभाषचंद्र बोस, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अनेक जणांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ उभी केली व देशाला गुलामगिरीतून मुक्त केले. त्यापूर्वी महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुणे येथील भिडेच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. समाजातील रुढ, परंपरा व सनातन पद्धतीच्या काळात फुले दाम्पत्याना खूप हालअपेष्टा सोसावे लागले. तरीही त्यांनी न डगमगता शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्याचे महान काम केले त्यास्तव शैक्षणिक क्षेत्रातील त्याचे कार्य विसरून चालणार नाही. हिंदवी स्वराज्य निर्मितीसाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपले संपूर्ण आयुष्य अर्पण केले हे तर लक्षात राहतेच शिवाय त्यांना घडविणारी राजमाता जिजाऊ यांची आठवण पदोपदी येत राहते. सहा महिन्यांचे तान्हे बाळ पाठीशी बांधून इंग्रज लोकांशी दोन हात करणारी आणि मेरी झाँसी नहीँ दूँगी अशी ठणकावून सांगणारी राणी लक्ष्मीबाई चे शौर्य आमच्यासाठी नेहमीच प्रेरणा देत राहील. गरीब व अनाथांची आई मदर तेरेसा हे त्यांच्या अविरत सेवेमुळे कायम स्मरणात राहतात.

या सर्वच लोकाना जाऊन इतकी वर्षे झाली तरी त्यांचे नाव आपण स्मरणात ठेवतो, आठवण करतो, त्यांना विसरत नाही. कारण त्यांनी कामाच असे केले आहे की त्यास कोणीच विसरू शकत नाही यालाच म्हणतात मरावे परी कीर्तिरूपे उरावे.

आपणाला सुद्धा असेच काही लोकांच्या आठवणीत, स्मरणात रहावे असे कार्य करणे गरजेचे आहे. तसा निर्धार आपण करायला हवे. प्रसिद्ध विचारवंत साईरस म्हणतो की, ' कीर्ती मिळविण्यासाठी चांगल्या प्रकारची पुष्कळ कामे करावी लागतात ; मात्र अपकिर्ती होण्यासाठी एक वाईट काम पुरेसे असते'. अनेक लोक जन्मतात आणि किती तरी लोक रोज मरण पावतात. परंतु ज्यांनी समाजाच्या उपयोगी पडेल असे काम केले आहे त्यांचीच समाजामध्ये कीर्ती आणि नाव शिल्लक राहते. स्वतःसाठी किंवा स्वतःच्या कुटुंबासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या व धडपडणाऱ्या व्यक्तीला त्याच्या कुटुंबातील सदस्यच तेवढे लक्षात ठेवू शकतात. त्यामुळे हेन्नी एस. सटन यांनी म्हटल्याप्रमाणे ' कीर्ती मिळवायचे असेल तर दुसऱ्याचे अश्रू पुसण्यचे प्रयत्न करा'. आपण जेंव्हा इतरांचे दुःख समजून घेऊन त्याना हातभार किंवा दिलासा देतो तेंव्हा त्याच्या मनात आपल्याविषयी करुणा, प्रेम, माया आणि ममतेची भावना निर्माण होते आणि नक्कीच आपली कीर्ती होते. या जगात आपण रिकाम्या हाताने आलोत आणि रिकाम्या हातानेच परत जाणार आहोत ही जगज्जेता सिकंदराची शिकवण विसरून चालणार नाही. कवी भा. रा. तांबे आपल्या कवितेत म्हणतात की, ' जन पळभर म्हणतील हाय हाय, मी जाता राहील कार्य काय ? ' असा प्रश्न त्यांनी सर्वांना विचारला परंतु आपल्या मृत्यूनंतर या जगात काय उरते तर ते फक्त नाव आणि कीर्ती. म्हणून आपल्या माघारी आपले नाव सर्वांनी घ्यावे असे वाटत असेल तर काही जगापेक्षा वेगळे करू या. स्वातंत्र्यदिनाच्या सर्व भारतीयांना खूप खूप शुभेच्छा. जय हिंद.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

लेख

# आधी वंदू तुज मोरया

**वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ:**
**निर्विघ्नम कुरुमे देव सर्व कार्येशू सर्वदा**

आपल्या सर्वांचा लाडका देव म्हणजे गणपती बाप्पा. देव कसला आपण तर त्यांना माय फ्रेंड गणेशा असे म्हणता. पुढच्या वर्षी लवकर या असा निरोप दिल्यामुळे गणेशोत्सव कधी एकदा येतो याची आपणाला उत्सुकता लागलेली असते. प्रत्येक शुभ कार्यात मग तो लग्न समारंभ असो वा लक्ष्मीपूजन असो, कोनशिला समारंभ असो वा वास्तू शांती असो की सत्यनारायणाची पूजा असो त्यात सर्वसाधारपणे सर्वप्रथम श्री गणेशाची पूजा केली जाते. म्हणूनच श्री गणेशाला आद्य दैवत म्हटले जाते. हिंदू धर्मातील लोकांच्या उंबरठ्याकडे लक्ष दिल्यास एक बाब प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे घराच्या चौकटीतील वरच्या आडव्या लाकडी फटीवर श्री गणेशाची मूर्ती कोरलेली दिसते. त्याशिवाय घराला घरपण येत नाही. ज्यांच्या घराच्या चौकटींवर श्री गणेशाची मूर्ती नाही असे घर शोधून सुध्दा सापडणार नाही. घरातून बाहेर पडताना आपण कोणत्या कामांसाठी बाहेर जात आहोत ? स्वार्थासाठी की निस्वार्थ कामांसाठी जात आहोत यांची नोंद चौकटींवर विराजमान असलेले श्री गणेशा करतात, असे पुराणात सांगितले आहे. त्याचमुळे घराबाहेर पडताना वडील मंडळी विशेष करून महिला नेहमीच चौकटीचे दर्शन घेतांना आढळून येतात व ठरविलेले काम वेळेत पूर्ण होवो अशी प्रार्थना श्री गणेशाजवळ करतात.

तसे पाहिले तर प्रत्येक महिन्याच्या कृष्ण पक्षातील चतुर्थीला घरात श्री गणेशाची पूजा केली जाते. मात्र भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थीला घराघरात श्री गणेशाच्या मूर्तीची स्थापना करून विधिवत त्यांची पूजा केली जाते. याच दिवसाची आबाळापासून ते वृद्धांपर्यंत सर्वचजण आतुरतेने वाट पाहतात. हत्तीचे सोंड असलेले तोंड, सुपासारखे मोठे कान, बारीक डोळे, अगडबंब पोट आणि त्याचा लहानसा वाहन मुषकराज या सर्वाविषयी आपल्या मनात कमालीची उत्सुकता असते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात घरोघरी श्री गणेशाची स्थापना केली जात असे असा उल्लेख इतिहासात आढळते. भारतीय असंतोषाचे जनक आणि जहाल नेते लोकमान्य टिळकांनी इंग्रजाच्या जुलमी राजवटीविषयी लोकांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी, लोकांत एकता आणि एकात्मतेचे वातावरण तयार व्हावे म्हणून सन १८९० च्या दशकात श्री गणेशाच्या घराघरातील उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. पुण्याच्या दगडूशेठ हलवाईच्या गणपतीची सन १८९४ मध्ये स्थापना करून सार्वजनिक गणेशोत्सवास प्रारंभ केली. तेंव्हापासून आजतागायत आपण सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करू लागलोत. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केली तो उद्देश आज सफल होत आहे काय ? यांचा विचार करण्याची वेळ आपणावर आलेली आहे. या दिवसांत " गजानना श्री गणराया, आधी वंदू तुज मोरया " या गीतांने सर्वत्र चैतन्यमय वातावरण होऊन जाते. तेंव्हा बोला एकदाचे गणपती बाप्पा $$$$ मोरया $$$$$$.

***

**नागोराव सा.येवतीकर**
**मु.येवती, ता.धर्माबाद**
**ई पत्ता : nagorao26@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३६२५७६९**

कविता

# मनाच्या टोकाशी

मनाच्या टोकाशी
उरातल्या डोहाशी
काळजातल्या गाभ्याशी
कोकीळ होता दडला
साद जराशी मिळता त्याला
वसंत स्वरांचा बहरुन आला

***

**स्वाती उदार**
**ई पत्ता : swati.udar@gmail.com**

लेख

# *मन*

मन एक अत्यंत वेगवान, सर्वात शक्तिमान, अतृप्त, चंचल, अशा अनेक संकल्पना आपण मना शी जोडत असतो. आज एक विचार वाचला " ज्याने स्वताचे मन जिंकले त्याने जग जिंकले." विचार अतिशय सत्य आहे. मी थोडासा अंतर्मुख झालो त्या वाचलेल्या वाक्यावर विचारमंथन करू लागलो. वाक्य फक्त एका ओळीचे पण ते विचारांना चालना देण्यास प्रवृत्त करते. एक वेळ घोड्याला लगाम देणे सहज आहे परंतु मना वर लगाम लावणे अशक्य नाही पण अतिशय कठीण आहे . लहान बालका पासून ते वयोवृद्ध व्यक्ती पर्यंत सर्वांचे मन कधीच थाऱ्यावर किंवा स्थिर राहत नाही. कारण एखादी व्यक्ती शांत बसलेली आहे पण त्याच्या मनातील वादळे फक्त त्यालाच माहित असतात.

मन स्थिर ठेवणे खरच खूप अवघड आहे. कधी कधी माणूस बाहेर एक आत एक असा वागत असतो म्हणजेच त्याच्या मनात काहीतरी लपंडाव चालत असतात ते कळने अशक्य आहे.

एखादा डॉक्टर मनोरुग्णाला फक्त मानसिक पाठींबा किंवा सहानुभूतीदेवून त्याला आधार देण्याचा प्रयत्न करत असतो पण तोही कोणाच्याही मनातील गोष्ट जाणून घेवू शकत नाही. मन हे किती चंचल असते यावरूनचकळून येते. शाळेत विद्यार्थी शरीराने वर्गात बसलेला असतो पण मनाने तो क्रीडांगणंवर आपल्या विचारांची उंचच उंच पतंग उडवत असतो.

आयुष्यात विचार बोलून दाखवणे सहज सोपे असते पण ते आचरणात आणणे अतिशय कठीण असते मनाचे खेळ प्रत्येक जन अनुभवत असतो. कधी सुखावह तर कधी क्लेशकारक.

**"माझे मन नाही मनात**

**कधी आत तर कधी बाहेर**
**न मला ठाव न ठिकाण**
**कधी शांत तर कधी अशांत**

**माझे मन नाही मनात . . . . .**

**कधी उंच उंच झोक्यात**
**कधी खोल खोल पाण्यात**
**माझे मन नाही मनात . . .. .**

**जिंकेल दुसऱ्याचे मन आपसूक**
**पण स्वताचे स्वच्छंद लहरांत**
**माझे मन नाही मनात . . . . .**

**लहर आली तर करेल कहर**
**माझे मन नाही मनात . . . . .**

**नाही स्वर्गात नाही नरकात**
**हा भटकतो स्वत:त**

**माझे मन नाही मनात . . . . .**
**कधी भावूक कधी हळवा**
**खेळ खेळती लपंडावाचे**

**माझे मन नाही मनात . . . . .**
**माझे मन नाही मनात . . . . . .**
**माझे मन नाही मनात . . . . . .**
**माझे मन नाही मनात . . . . . .**

मन नाही मनात खरेच मित्रांनो, काय वाटते तुम्हाला ?

***

**विकास लाड**
**नाशिक**
**ई पत्ता : vikylad@gmail.com**

**कथा**

# *अजा पुत्राला बळी*

भलं मोठ्ठ घर, ह्या टोका पासून त्या टोकापर्यंत पसरलेलं. छोट्या दीड वर्षाच्या बाबूला तर ते अख्खं जगच होतं. भिंतीच भिंती सगळीकडे, आणि खिडक्या, दारं कतीतरी. त्याला अजून आकडे मोजता येत नव्हते, नाहीतर त्याने नेमकी संख्या सांगितली असती. वरती ऐसपैस माडी; त्याच्या मागे पोटमाळा. जीनेच जीने, लाकडी ! उंबरठे तर त्याच्या मांडीपर्यंत पोचतील इतके उंच. घरातच, पाण्याने काठोकाठ भरलेल्या, तीन विहीरी. एक रांधपघराला लागून, स्वयंपाक करता करताच बायका, छोट्या खिडकीतून पाणी ओढून काढायच्या. एक न्हाणीघराच्या शेजारी आणि एक मधल्या घरात; धुणीभांडी करायला सोयीस्कर पडेल अशी. पूर्वीच्या काळात आक्रमणं व्हायची; तेव्हां घराबाहेर पडायची वेळच येणार नाही; अशी सर्व रचना होती .

अंधुक उजेड किंवा कौलात लावलेल्या चौकोनी काचातून येणारी सूर्यप्रकाशाची तिरीप मिरवणाऱ्या, अगडबंब खोल्या. एकीत नारळांचा ढिगारा ! एकदा बाबू त्या खोलीत कडमडायला गेला होता. त्याच्या धक्क्याने नारळांची उतरंड कोसळली होती. नशिबानं बाबू आटोकटी वाचला. पण तेव्हां पासून नारळाची खोली, भाताची खोली, तांदळाची, तुसाची, बाळंतीणीची खोली; त्या सगळ्या सगळ्या खोल्यांच्या जाड लाकडी दारांच्या पितळेच्या दणकट कड्या नेहमी लावलेल्याच असायच्या.

एके काळी घर भरलेलं होतं, माणसांनी पण आणि दौलतीनं पण ! हळू हळू सगळ्यालाच गळती लागली. प्राचीन घर. पोर्तुगीजांच्या काळातलं. त्याच्या जाड भिंतींमध्ये, जमिनी खाली मोहरांचे हंडे, रांजण पुरून ठेवले आहेत अशी सगळ्यांना खात्री होती. घरात दाढी वाढलेले, जटा झालेले, भगव्या कपड्यातले अनोळखी यायचे. रमल विद्या जाणणारे, भविष्य सांगणारे, अंतर्ज्ञान असणारे, सोनं बनवणारे किमयागार असे कैकाडे, भूताडे कोण कोण यायचे. ते येऊन गेले की रात्री ही खोली खणली जायची, ती भिंत उकरली जायची. पण ते गुप्त धन हुलकावण्या देत होतं. .

बाबूचा जास्त वावर मागच्या घरातच असायचा. विहिरी पल्याड असणाऱ्या अरुंद खोलीत त्याचे आबोजा होते. कायम बाजेवर पडलेले, सतत खोकणारे. पण फक्त त्यांच्या कडे बाबूसाठी वेळ होता. बाबू तिथेच रमायचा. त्याला पाहिल्यावर अबोजांचे डोळे लकाकायचे. त्यांच्या कडे बाबूला द्यायला काही नव्हतं, पण बाबुला त्यांचा स्पर्श, त्यांचं कुरवाळणं, त्यांच्या बाजूला बसून बिट्टीच्या, पांगार्याच्या बियांबरोबर, गुंजांबरोबर खेळायला आवडायचं. रात्री खेळता खेळता तो तिथेच झोपायचा. कोणीतरी येऊन त्याला नंतर घेऊन जायचं. सकाळी तो उठायचा पुढच्या घरात.

एकदा असाच कोणी बैरागी आला होता. गुप्त धन शोधून देणार होता. घर त्याच्या भोवती जमलं होतं. "घरातलाच कोणीतरी तुमच्या वायाटावर आहे. धन हाताशी येतं, पण त्याची काळी छाया पडली की ते दूर कुठेतरी, दुसर्याच बाजूला जातं !" तो सांगत होता. कोण आहे तो; हे शोधणं चाललं होतं. पणती लावली होती. तिच्या ज्योतीवर उलटा चमचा धरला होता. त्यावर काजळी धरत होती. कोणीतरी जाऊन बाबूला बखोटीला धरून आणलं. तो नाराज होता, तो अबोजांच्या खोलीत त्यांच्या बरोबर खेळत होता, त्यांच्यातली पेज खात होता. तंगड्या झाडत तो; आबोजा, आबोजा असं ओरडत होता. पण त्याला थांबवायची शक्ती त्याच्या आबोजा मध्ये नव्हती.

बाबूच्या आक्रस्ताळेपणा कडे लक्ष न देता त्याला बैराग्या समोर आदळलं गेलं. बैराग्याने खोट्या मायाळू आवाजात विचारलं, "कोण दिसतंय तुला ह्याच्यात ?" काजळीने भरलेला चमचा त्याने बाबुसमोर धरला. बाबूला तिथे कोणीच दिसत नव्हतं. त्याने रडवेल्या चेहऱ्याने एक नजर चमच्याकडे टाकली. कोणीतर नव्हतं. त्याने पुन्हा रडायला सुरुवात केली ... ""आबोजा आबोजा !"" जमलेल्या सगळ्यांनी एकमेकांकडे अर्थपूर्ण नजर टाकली. कोणीतरी पुटपुटल, "मला संशय होताच, हे म्हतारडच आडव येतंय !"

बाबू हाताला हिसडा मारून तिथून पळाला. आबोजाच्या खोलीत त्याच्याशी खेळता खेळता त्यांच्याच बाजेवर झोपला. दुसऱ्या दिवशी पुढच्या घरात जागा झाला; नेहमीप्रमाणे ! पण आज काहीतरी वेगळंच दिसत होतं.

ओटीवर जमिनीवर चटई वर आबोजा शांतपणे झोपले होते. त्यांच्यावर पांढर पांघरूण होतं.. बाबू ने त्यांच्याकडे धाव घेतली . "आबोजा , आबोजा ..." पण ते काहीही बोलले नाहीत, त्याला जवळ घेतलं नाही.

बाबूला काही समजत नव्हतं. त्याला एक आठवत होतं, रात्री त्याला न्यायला कोणीतरी आलं होतं, तेव्हां त्याच्या हातात उशी होती. पेंगुळलेल्या बाबूला तेव्हां कळल नव्हतं कि ती उशी आबोजांच्या डोक्याखाली न ठेवता त्यांच्या तोंडावर का दाबली जात होती ?? आणि आत्ता तीच उशी अबोजांच्या डोक्याखाली . का ठेवली होती ?? तेव्हांच का नाही ती उशी आबोजांच्या डोक्याखाली ठेवली ??

त्याला ते काही कळत नव्हतं तेच बर होतं. नेहमी अजापुत्रालाच बळी दिलं जातं, हे कळायला त्याला अजून खूप मोठ व्हायचं होतं !

***

**सुरेखा मोंडकर**
**ई पत्ता : mondkarsurekha@gmail.com**

**चारोळ्या**

## चारोळ्या

तुला सांगण्यासारखे
बरेच काही असते
तरीही मी का अबोल होतो
माझे मलाच ठावूक नसते ?

***

**शानिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोट्याचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

**लेख**

## स्मशानभूमीस पत्र

आया बायांच्या किंकाळ्यांच्या आवाजाने आभाळ फाटून जाईल अशा काळीज फाडणाऱ्या आवाजातही तु उभी असतेस धडका सोसत गावाच्या बाहेर किंवा नदीवर... खरच तुला भीती नाही का वाटत त्या भयानक रात्रीच्या एकांताची.. कित्येक तीरड्या येउन पडल्या तुझ्या अंगनात शेवटच्या अंत्यविधीसाठी तरी तु धाडसाने हल्ले सोसत राहतेस दगडावर झालेल्या हातोड्यांच्या घावासारखी. कधी कुणाचा भाऊ, कधी कुणाचा बाप, कधी आई, कधी बहीण झोपलेले असतात सरनावर मुक्तीसाठी.... कधी नुसतीच गिधाड फिरत असतात तुझ्या डोक्यावर खाण्याच्या शोधात पन तु कसलीही अपेक्षा न करता सहन करतेस..... का?

गरीब श्रीमंत अनेक येत असतील ना तुझ्या छत्राखाली शेवटच्या क्षणी... कुणाच्या सरणाची लाकडं बाभळीची कुणाची चंदनाची ही असतील ना.. पण तुझ्यासाठी काय गं फक्त धुरातून उठून फुफाट्यात जाणं. एवढच ना ....

तुझ्यासोबतही खुप असतील ना रडणारी, रडवणारी कि नुसतीच तुझ्यावर हसणारी हो पन हे नक्की तु कधीच एकटी नसतेस हो ना..... ती काळोखी आमवस्येची रात्र तो रात्रभर काजव्यांसारखा लखलखनारा सरणाचा विस्तव आणि हो ते काळीज भेदून जाणारे किंकाळ्यांचे आवाज गुंगत असतील ना सारखे तुझ्या कानामध्ये सोबतीला असल्यासारखे......

तुला कधी ना सण कधी आनंद साजरा करताही येत नसेल ना गं... सदा ते नाराज चेहरे पांढरी फेक कपाळं आणि नुसतेच पांढरे कपडे घातलेले कावळे...

बिनबोभाट भरदिवसा तुझ्या छत्राखाली कित्येक जण मन मोकळी करत असतील ना ते एकूण तुला बर वाटत असेल पण ते काही क्षणापुर्तच नंतर आहेच ये रे माझ्या मागल्या... पन कितीही मोठा माणूस असला तरी शेवटी तरी तुझ्याकडे यावेच लागते हे सत्य तु नकारुच शकत नाहीस....

कित्येक जणांचे आत्मे तु कामाला लावलेही असशील पण तु तुझ्या आत्म्याचे सांत्वन करु शकशील काय...? झुकलेही असतील तुझ्यासमोर ती पांढऱ्या कपड्यांचा बुरखा घालुन लोकांना अमाप लुबाडाणारी माणसे पण हे ध्यानात घे तुझ्या समोर नाही तर तुला भिउन झुकले ते तुझ्यासमोर एकदाचे.... हे सगळ सोड पण मला खरचं तुझी खुप दया येते जेव्हा तु एकटीच रडत असतेस काळोख्या अंधारात एकटेपणा लपवत तेव्हा मनापासुन वाटत याव तुला भेटायला जीवंतपणी बिंधास्त न घाबरता नी खुप गप्पा माराव्यात तुझ्या मनातलही जाणून घ्याव सार तुझ स्मशान होउन तु कधी तरी मला नक्की बोलव मी येइल तुझ्या भेटीस न घाबरता पण तु बोलशील ना मन मोकळेपणाने जिवलग मित्रासारख.....

आग आमच्या शेतकरी बापाकडे स्वत:च्या सरणाला पुरतील एवढे पैसे सुद्धा त्याच्या ठिगळाच्या खिशात, विरलेल्या पायजम्यात नसतात तरी तो गळफास घेण्याचं थांबतो का तुझ्या भीतीने....पण तु निवांत, निशब्द असतेस बीन जीवाच्या धडासारखी नी शंडासारखी पडलेली असतेस गावाबाहेरच्या माळावर ज्याच माळावर शेतकरी बापानें पाणी नाही म्हणून स्वत:च्या हाताने स्वत:च्याच गळ्यात गळफास लाउन घेतला.... त्याच शेतकरी बापाचा १० वा १३ वा पाहताना, खाताना तुला लाज नाही का वाटत नुसतच पाहण्याची निशब्दपणे मुक्यासारखी....

आजकाल म्हणे तुझ्या छत्राखाली नवनवीन आधुनिक प्रयोगही होतात काल तर म्हणे कुणी तरी वाढदिवस साजरा केला वाटत तुला झाला असेल थोडा आनंद पण हे सारे तुझी भीती घालवण्यासाठी बर का माणसाच्या मनातुन आता तुच विचार कर जे पांढरे कावळे तुझ्यासमोर झुकायचे ते झुकतील का... मग तुझ महत्व काय राहणार ते आता तुच ठरव की कस उभ रहायचे ते निर्भीडपणे ढालीसारखे......

कधी कधी तुलाही वाटत असेल ना मनमोकळेपणाने रडावे ओरडून टाहो फोडावा आसमंत दुमदुमून गेला पाहिजे असा पण तुझ्या रडण्याचा, ओरडण्याचा आवाज एकूण तुझी कुणाला कीव तरी येत असेल का गं... आणि हो कित्येत ठिकाणी तुझी दुरावस्था झालेली दिसुन येते काही ठिकाणे तर पर्यटनस्थळ बनुन गेलेत महाबळेश्वरसारखी शांततेच्या ठिकाणांसारखी... तुझ्या या दुरावस्थेकडे पाहून मलाच तुझी दया येउ लागलीय म्हणून हे पत्र स्मशाना तुझ्या केविलवाण्या भयानक रुपाला....

तुझ्या छत्राखाली माणसे आयुष्य संपल्यावर येतात पन ज्या व्यक्तीला तु आयुष्य सुरु करण्यासाठी आसरा दिला अशी सिंधुताई सपकाळ सारखी माणसे घडलीही असतील तुझ्या सानिध्यात. भित घाबरत काळजाला पिळे मारत दिवस ढकलत ध्येय आणि आयुष्य पूर्ण करण्यासाठी धडपडणारी जीवाच्या आकांताने आतले आत रडणारी अशी माणसही तुच सांभाळलीस ना मग यात तुझी कोणती भावना लपली आहे कळेल का?

मित्र सगे सोयरे परखा आपला दुरचा सगळे जण रडत असतात ओरडत असतात भेगाळलेल्या जमिनीच्या भेगा सांधत तुझ्या छत्राखाली दिवसरात्र ना आजची चिंता ना उद्याची पर्वा नुसतीच बेभान होउन किंचाळी फोडत असतात त्याच्या जाण्याची हेच तुझेच एकमेव ठिकाण असे असेल ना जीथे माणूस गेल्यावर तुच्या पाठीवर चांगले बोलले जाते व त्याच्या आवडीच्या सगळ्या गोष्टी त्याला जागच्या जागी मिळत असतिल ना पन तुला काय ग त्याच तु अशीच उभी असतेस बिनबोभाट...... पड झड झालेल्या किल्ल्यासारखी..... अडगळीत पडल्यासारखी तुला हे विचारायचे होते कि ही भुत म्हणजे काय ग ? जगताना ज्यांनी आयुष्यभर दुसऱ्याचा विचार केला त्यांचीच ती तडफडणारी आत्मेच ना मग तु त्यांना सांभाळुन का घेत नाहीस आपल्या माणसासारखा...

***

**निखिल सतिश जगताप**
**मु. पो. बेलसर, ता पुरंदर, जि पुणे**
**ई पत्ता : nikhiljagtap037@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०५९०३७४**

कविता

## बलात्कार

कुठे होतो विनयभंग
कुठे चालतो बलात्कार
कधी दिल्ली कधी कर्जत
बघता बघता आग आली
आपल्या घराजवळ गर्जत
भारतमाताही झाली असेल व्याकुळ
पाहुन तिच्या लेकींचे हाल
खरच सोकावत चाललाय काळ
हाच का शिवशंभुंचा महाराष्ट्र
घडले जिथे नरवीर सर्वश्रेष्ठ
कधी फुलं कधी कोवळ्या कळ्याही
जातायत कुस्करल्या हल्ली
बस,टॅक्सी अन् मेट्रोच काय
सुरक्षित राहिली नाही खेड्यातली गल्ली
वासनांध साप सोडतायत राजरोस फुत्कार
आम्ही मात्र मशगुल देण्या हारतुरे
अन् करण्या एकमेकांचे सत्कार ॥

आता तरी थांबवल्याच हवे
हे सारे काही
चित्रविचित्र घटना अन्
घडते काहीबाही
ही असली वेळीच ठेचायला हवीत सापं
तरच मिटतील जरा माथ्यावरली पापं
जर एवढे होऊनही आपण करणार नसु बंड
मग आपणच आपल्याला घोषीत करु षंड ॥

असेच जरा का होत राहिले
स्त्री देहाचे लचके तुटत राहिले
माणुसकीचे श्वास घुटत राहिले
तर सारी स्त्री जातच
मागेल कोणाला सुरक्षा
तेंव्हा असल्या गिधाडांचा
वेळीच पाडायला हवा फडशा
ठेचावी यांची नांगी अन् करावी कठोर शिक्षा ॥

जर काहीच नाही करु शकलो आपण
चार दिवस मोर्चे अन् पुन्हा सारे शांत
समजुन घ्यायचं आपणच आपल्या पुरषत्वाचा
करुन टाकलाय अंत
पण अशातही आई- बहिणींच्या वेदनेचा
जेंव्हा कानी पडेल आवाज
आपोआपच गळुन पडेल
माणुसकीचा लटका साज
मग कधिच गर्वाने उठणार नाही मान
अन् कायमचे बधिर होतील कान ॥

तेंव्हा आत्ताच सावध होऊ
सारे एकदाचे पेटुन उठू
अन् ही सारी बांडगुळं
मुळासगट उखडुन काढू ॥
***

**शशिकांत मा. बाबर**
**बोररांजणीकर,जि. जालना**
**ई पत्ता : shashikantbabar12@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९१३०६२०८३४**

चारोळ्या

## चारोळ्या

सुरवातीला कळत नाही
असे का होते ?
म्हणूनच प्रेमात पडल्यावर
जग बदललेले दिसते
***

**शानिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोटयाचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

**कविता**

# प्रवास

नुसतं चालत राहणं म्हणजे प्रवास
कधी कधी पळत जाणं म्हणजेही प्रवास
आईच्या गर्भातुन बाह्यजगात येईपर्यंतचा प्रवास
किंवा पहिल्या श्वासापासुन स्मशानापर्यंतचा प्रवास
प्रवास अनभिज्ञतेने चालु राहतो एकाटोकापासुन दुसर्या टोकापर्यंत, कधी ध्येयासाठी कधी दिशाहिन पण आपला चालुच राहतो प्रवास
कुणाच्या संगतीन प्रवास तर कधी एकांताच्या साथीनं प्रवास
काही कमावण्यासाठीचा प्रवास असो किंवा काही गमावल्यानंतरचा प्रवास
हा सारा प्रवास चालुच राहतो अव्याहतपणे
शरीरानं थांबवला तरी कुठे थांबतो मनाचा प्रवास
ते झेपावते दिशांच्याही पलिकडे, सीमांपल्ल्याड
कधी ठिकाणापासुन ठिकाणापर्यंतचा प्रवास तर कधी मनापासुन मनापर्यंतचा प्रवास
कधी अंतर मिटवण्यासाठीचा प्रवास कधी दुर जाण्यासाठीचा प्रवास
कधी मनासाठी कधी मनाविरुद्ध पण करावाच लागतों प्रवास
या सार्या प्रवासात कधी नुसतं बघतो आपण तर कधी निरखतोही सारं काही
याच प्रवासात घडतात भेटी श्रावणातल्या ढगांसारख्या अल्पजीवी पण कायम लक्षात राहणार्या
असा हा प्रवास वाटायला चित्र विचित्र पण आयुष्याचे सारे रंग दाखवतो हा सचित्र
अगदी निसर्गाशी एकरुप होण्याची अन् आपल्याच रुपाला बघण्याची देतो संधी प्रवास
अगदी बालपणी मोठे होण्यासाठीचा प्रवास अन् मोठे झाल्यावर समाधानी होण्यासाठीचा प्रवास
आपण सारं सोडुन जातानाही स्मशानापर्यंतचा करावाच लागतो प्रवास
कधी लोकांच्या खांद्याला खांदा लावुन तर कधी लोकांच्या खांद्यावर करावाच लागतो प्रवास
एक एक श्वास घेत पुढच्या टप्प्याची आस धरत आपण करत असतो प्रवास
प्रवासात दग दगही होते अन् जगण्याची धगही जाणवते
प्रवास फार काही शिकवत राहतो,जणु आपणच आपल्या सावलीला खातो
हाच प्रवास शिकवतो ,आपण पुढे सरकलो की गोष्टी कशा मागे जातात आजच्या कल्पना उद्या इतिहासजमा होतात
कधी एकाट्यानच करावा प्रवास. पहावं खुल्या खिडकीतुन बाहेर दिसेल सारं काही, अगदी आकद ,सकस अन् भकासशुद्धा
सकाळचा प्रवास तसा आल्हाददायक ,शांत ,निवांत, अन् प्रसन्नदायक
आयुष्याच्या पटरीवर आपली गाडी नाही थांबत कुठल्याच क्रोसिंगसाठी. धावत राहते आपल्याच मस्तीत अन् चालुच राहतो अखंड प्रवास
जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे प्रवास आणि जीवन हा ही प्रवासच
अंधाराकडून प्रकाशापर्यंतचा, उन्हातुन सावलीकडचा, मातीवरुन मातीखालचा, उगवल्यापासुन कापणीपर्यंतचा, आजचा ,उद्याचा अन् नाविन्याचा प्रवास
सारं सारं प्रवास, आस ,ध्यास अन् श्वास प्रवास
प्रवास खरच प्रवास असतो
कधी वाळंवटातुन, कधी घाटा घाटातुन असतो
पण हरवेळी तो खास असतो .........
***

**शशिकांत मा. बाबर**
**बोररांजणीकर,जि. जालना**
**ई पत्ता : shashikantbabar12@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९१३०६२०८३४**

## मराठी विचारधन

डोक शांत असेल तर निर्णय चुकत नाहीत अन भाषा गोड असेल तर माणसं तुटत नाहीत.
***

**संग्रहित**

## कविता

# शेती

आमच्या कित्येक पिढ्या मातीत राबुन मातीत गेल्या।

सावकराच्या रिनापायी वर नाही आल्या ॥
पणजा, आजा अन् आता राबतोय महा बाप।

कधी सुकं, कधी अवकाळी त्याच्या डोक्याला ताप ॥
मातीमध्ये राबण्यात तव्हा यगळा रुबाब होता।

शेतकरी माझा तव्हा बळीराजा होता ॥
मातीमध्ये राबण्यातच बापाची हयात जात आहे।
जग चालले पबमध्ये अन् बाप शेतीचे गीत गात आहे॥

बापाला म्हणलं सोड सारं आता
यात राहिलय तरी काय।

बाप म्हणे पोरा, नाळ माझी मातीशी
यातच घट्ट माझे पाय ॥

खरच गड्यांनो आता राहिले नाहीत ते दिसं।
रानातल्या झुडुपातही आता दिसतय कुठं ससं ॥

आता एकच करायचं,शेतावरच प्रेम जरा ढिलं करायच।
शेती सोडुन दुसरबी काहितरी करायच ॥
***

**शशिकांत मा. बाबर**
**बोररांजणीकर,जि. जालना**
**ई पत्ता : shashikantbabar12@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९१३०६२०८३४**

## कविता

# स्वप्न

एक होतं गाव
तिथे होतं एक ठुमदार घर
समोर छान बगीचा, एक मोठी कार
पाहायची स्वप्ने सारीच चंद्राची
गोष्टी इथल्या रती अन् इंद्राची ॥

तसच दुसरही होतं एक गाव
जरा दुर तटावर जाया तिथे नाव
तिथे मात्र मित्रा नव्हतं ठुमदार घर
कुठे होती झोपडी,कुठे भिंती लिंपती कर
यांना नव्हती कसली स्वप्न पडायची साखरेची
प्रश्न रोजच पडायचा,
काय खायचं अन् चिंता भाकरेची ॥

ही दोन गावं तशी पाहिली तर जवळ
पाहिली तर किसो दूर
एकीकडे पैशांचा धुर तर
दुसरीकडे आसवांचा पुर
ही नव्हे कोण्या दंतकथेतली गावं
शोधल्यावर कळेल,ओळखीच वाटतील नावं
म्हणायला यांचा एकच आहे देश
दोघांच्याही हिशोबातला वेगळा आहे शेष
एक चकाकत्या इंडियातली स्मार्ट सिटी
दुसरीकडे कुपोषित भारताच्या नावाची पाटी ॥

आपण आपलं करायच असतं
आपण आपलं बघायच असतं
शेजारच्याशी आपलं देणंघेणं नसतं
हेच होतायत आमच्यावर संस्कार
म्हणुनच भेगाळल्यागत झाल्यात इथल्या वस्त्या
अन् दुभंगलीत इथली गावं ॥

सारा बिघडत चाललाय आकार अन् ऊकार
मग तुम्हीच सांगा कलाम सर

कसे अन् कधी होणार
स्वप्न तुमचे आमचे साकार ॥
***

**शशिकांत मा. बाबर**
**बोररांजणीकर,जि. जालना**
**ई पत्ता : shashikantbabar12@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९३०६२०८३४**

**चारोळ्या**

# चारोळ्या

१) वेदनांचा खेळ हा
चाले कसा दिनरात ।
आपुल्याच वेदनेवर
मीठ चोळती आपुलेच हात ॥

२) निसर्गही हल्ली कुठे
नियम पाळतो आहे ।
माणसासारखा तोही आता
माणसांना छळतो आहे ॥

३) बदलतात ऋतु अन्
बदलतात वारे ।
वेळेनुसारे माणसेही
बदलतात चेहरे ॥

४) मुखवटे घालुन हल्ली
फिरतो असतो वणवण ।
आपुल्याच चेहर्‍याची मग
भासु लागते चणचण ॥
***

**शशिकांत मा. बाबर**
**बोररांजणीकर,जि. जालना**
**ई पत्ता : shashikantbabar12@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९३०६२०८३४**

**कविता**

# *शंकाग्रस्त बीज*

जीवनदायी रक्षणकर्त्यांचा जर "घातच"
"प्रघात" इथला |
ईतरांसाठी विशाल होऊ
का मी कवटाळून मृत्युला ? || धृ. ||

क्षितीजाचेही नसते बंधन शापित
भूमी अथांग ऐशी |
रक्त जळून छायेवीण जिकडे
सांगाड्यांच्या अगणित राशी |
अनंत वर्षे शाप भोगुनी फुटे
पालवी त्या धरणीला |
ईतरांसाठी ...||1||

करुणामयी मग रोप ऊगवते हिमालयाचे
धैर्य अंतरी |
वार झेलुनीही सृष्टीचे रोप पसरते
परोपकारी |
विश्व पाहूनी तडफडणारे रोप घडविते
वटवृक्षाला | ईतरांसाठी ...||2||

छाया ह्याची बनते घरकुल जणू श्वास
हा प्रत्येकाचा |
मरुभूमीतील तृष्णेसाठी जणू निर्झर
हा चैतन्याचा |
कल्पवृक्ष हा आनंदाचा का खुपतो मग
त्या दैवाला ? | ईतरांसाठी...||3||

झंझावाती काळी छाया एके
दिवशी नभास गिळूनी |
कंपित होती दहादिशाही तिथे
दामिनींच्या नृत्यानी |
ढाल बनवूनी तरु 'स्वत:सी'
धरतो ह्यी प्रत्येकाला |

ईतरांसाठी...||4||

निर्भय ऊंच तरु हा पाहून "अहं
ठेंगणा" नभी विजेचा |
नखशिखान्त पेटूनी दामिनी प्राण
जाळूनी जाते ह्याचा |
बीजही जळते जमिनीमध्ये प्रश्न
विचारून हाचा स्वत:ला |
"ईतरांसाठी विशाल होऊ
का मी कवटाळून मृत्युला ?" ||5||
***

**मकरंद सुधाकर पाटोळे-कदम**
**ई पत्ता : makarandpatole32@gmail.com**

**कविता**

## *अशाश्वती*

चकवा देऊन सत्य दडविणे
असे डाव हा परिस्थितीचा |
अशाश्वतीच्या विश्वासाने
कुणास चेहरा प्रलयाग्निचा ? || धृ.||

ऊन्हात करपून सृष्टी
जेंव्हा अंतर्कलहाने त्या मळकट |
मेघ धरूनी शीतल छाया
मायेनी तीज न्हाऊ घालत |
कलह वाहूनी भरतो नयनी
शालु हिरवा समृद्धीचा ! .. अशाश्वतीच्या || 1 ||

तृण वृक्ष अन सृष्टी सारी
अमृतवर्षावातुन न्हाऊन |
परस्परातील स्पर्धा विकृत
हेवेदावे जाती वाहून |
शाश्वत शांती सृष्टीमधुनी
रूजवे अंकुर समृध्दीचा ! ... अशाश्वती ....|| 2 ||

जमीनीवरच्या वेलींची मग
तृण-तरूशी मैत्री होऊन |
वृक्ष - लता वार्यावर झुलता
सृष्टी ऊठते जणू शहारून |
शाश्वत शांती परी वनातील
पाहून जळतो जीव विजेचा ! ... अशाश्वती || 3 ||

"प्रपात" ऊर्जेचा कोसळतो
वृक्षावर मग गिळण्या तिजला |
अग्नि जळता सरपण पहातो
संचित ठेवा सोबत जळला |
लुप्त होऊनी घेतो अनुभव
"शीतलतेतील सखोलतेचा !"... अशाश्वतीच्या || 4 ||

परी काळ सरतो सौख्याचा
ते बदलांचे वारे वाहून |
कुतुहल वार्यांचे सृष्टीला
जरी फुलते रोमांचित होऊन |
ओलाव्याला कळतो परी तो
तप्त श्वास भीषण अंताचा | ... अशाश्वतीच्या || 5 ||

शीळ घालूनी हर्षभरीत जो
ह्या सृष्टीला चटके देऊन |
सृष्टीतील हिरवाईसोबत
"जीवन" ऊकळून तृण - झुडूपांतुन |
करड्या रंगातुन जणू जातो
ओढुन गालीचाच मृत्युचा | ... अशाश्वतीच्या || 6 ||

भुमीतील ओलावा हरवून
दाटून भय "स्वअस्तित्वाचे" |
वृक्षांची मग मुळेच भिडती पाय
ओढण्या परस्परांचे |
श्वापद बनुनी मुळे राक्षसी घास
घेत कोवळ्या मुळांचा | ... अशाश्वतीच्या || 7 ||

अशाश्वतीच्या वादळात या
ईवली ठिणगीहि धडपडते |
"दोन क्षणांचे जीवन मज का ?"

म्हणूनी ढसाढसाहि रडते |
"मिटवू स्वत:ला" म्हणते ठिणगी "
भार फार झाला दु:खाचा " | ... अशाश्वतीच्या || 8 ||

झोकुन देता परी भुमीवर
ती अपुल्याला दैव बदलते |
जीर्ण सुक्या तृणात पडूनी
हि तेज हिचे विस्तारत जाते |
पहाता पहाता विशाल होता
हसतो दावानल प्रलयाचा | ... अशाश्वतीच्या || 9 ||

म्हणे क्रूर दावानल
"ईवले जीवन आधी दोन क्षणांचे |
विशाल वृक्षांना परी गिळतो
साक्षीदार जे गतशतकांचे |
वनास गिळूनी ठसा सोडूनी
जाईन 'शाश्वत' अशाश्वतीचा |"
अशाश्वतीच्या विश्वासाने
कुणास चेहरा प्रलयाग्निचा ? || 10 ||
***

**मकरंद सुधाकर पाटोळे-कदम**
**ई पत्ता : makarandpatole32@gmail.com**

**कविता**

## सार्थक

पूर्वसंचीताने कर्मबंधनाचा
फेरा नशिबी आला
८४ लक्ष योनी फिरून
माया नगरीत जन्म झाला ........

काही कळण्या आत
सरले अल्लड बालपण
कर्तेपणाचा बुरखा पांघरून
जपावे लागले मोठेपण ......

सळसळत्या उत्साहाने केला
तडफदार तारूण्यात प्रवेश
पाहिलेल्या स्वप्नं पूर्ती साठी
घेण्या पल्लेदार झेप .....

वेळोवेळी घेतली उंच भरारी
असाध्य ते सध्या करण्यास
पण नेहमीच झाली पंखांची छाटणी
चौकटीतील बंदिस्त आयष्य जगण्यास ....

तरीही आशावादी राहून
करीत होतो धडपड
अगम्य ,अतर्क्य करण्यासाठी
तडजोडीच्या जंजाळात या
द्यावी लागली इच्छा आकांक्षांना मूठमाती .....

निस्वार्थ,निरिच्छ मनाने
सदैव दिला मदतीचा हात
चांगुलपणाचा फायदा घेत
स्वार्थी जगाने केला
कायमच विश्वासघात .....

आयुष्याच्या वळणा वळणांवर
सोडून गेले साथी
संध्याछाया भिवाविता
काही न उरले हाती ....

आयष्य सरले निरर्थक
भौतिक सुखाच्या मागे लागून
अंतिम घडीला मृत्यूला पुढ्यात पाहून
मी त्याला म्हणालो
जरा सवडीने येतोस का?
गेले जगायचे राहून......

कृष्णप्रिया
***

**वर्षा किडे कुळकर्णी**
**नागपूर -३६**
**ई पत्ता : varshakulkarni73@yahoo.com**
**मोबाईल क्रमांक : ८००७६७२९८३**

कविता

## मनीषा

नवे वर्ष, नवे पर्व
नवे क्षितीज, नवी प्रभा
द्या मनास नवी उभारी ......

नवे स्वप्न, नवी आशा
घ्या उंच गगन भरारी.....
नवे ध्यास, नवी दिशा
ठेवा मन निर्भय करारी .....

नवे प्रश्न, नवी आव्हाने
समर्थ पेला सक्षम बाहुंवरी ......
नवे धेय्य, नवे उदिष्ट
गाठण्या मार्ग क्रमा
घेउनि श्रम सर्वतोपरी .....

टाळा प्रलोभने, बाळगा संयम
वागू नका अविचारी .....
राखा मनी विवेक
होऊ नका व्यसनी, विकारी .....

देऊ नका दु;ख कुणा
लागेल असे जिव्हारी ..........
विसरू नकाच केंव्हा
आहे हा देह नश्वरी.....

बहरू दे वसंत
सदा आयुष्यभरी ........
हीच आस असे
मनीची अंतरी ....

उमटू दे जीवनी सदा
रंगछटा फुलपाखरी ........
करिते ही मनीषा
माझिया मन्वन्तरि....

असो सदैव कृपा
तुम्हावरी परमेश्वरी ..........
हेच प्रार्थिते त्रिवार
चरणी या मातेश्वरी .....
***

**वर्षा किडे कुळकर्णी**
**नागपूर -३६**
**ई पत्ता : varshakulkarni73@yahoo.com**
**मोबाईल क्रमांक : ८००७६७२९८३**

कविता

## विचारून घे मनाला

मीच का तुझ्या मनाला
माझ्यात गुंतवावे,
तूच तुझ्या मनाचे
शोध घेत जावे !
अभंग हे नाते कुठले
जोडणारे दोन्ही मनाला,
मनाला तुझ्याच विचारून घे
नको विचारू दुसऱ्या कुणाला
हसता हसता कधी येतो रूसवा
रडतानाही सूर फसवा
मीच का समजूत घालावी
हेही विचारून घे मनाला तेंव्हा
क्षण दोन सुखाचे पदरी पडावे
असेच का वाटत रहावे ?
आनंदातही माणसाच्या नयनी
पाणी का दाटून यावे !
***

**मुक्तविहारी**
**ई - १२/७२, थर्मल कॉलनी,**
**परळी वैजनाथ ४३१५२०**
**ई पत्ता : muktvihari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८६०९८५९११**

कविता

## ताई

आईबाबा रागवल्यावर
समजुत काढणारी ती ताई
पण चुकीचे वागल्यावर
रागीट रुप धारण करणारी ती ताई

कधी गणित चुकल्यावर
समजुन सांगणारी ती ताई
पण फोनविषयी आपल्याला
माहिती विचारणारी ती ताई

एखाद्या हट्टापायी रुसल्यावर
समजुत काढणारी ती ताई
आईबाबा बाहेर गेल्यावर प्रेमाने
शिराचा घास भरवणारी ती ताई

रक्षाबंधनला तिच्या आवडीचे
गिफ्ट घेतल्यावर खुष होणारी ताई
वाढदिवसाला खुष होऊन गिफ्ट व
छानसा गालावर पापा देणारी ती ताई
***

**विक्रम सरक**
**ई पत्ता : vikramsarak13@gmail.com**

कविता

## काय जादु केलीस

काय जादु केलीस
आणि तु माझ्या मनात आलीस
तुझे ते माझ्याशी चांगले वागणे
पाहुन मला वाटले तु माझी झालीस
पण जेव्हा तुला माझ्या मनातले
सांगितलेल्यावर तुझे रिलेशिनशीप कळणे
स्वत:ला हारलेला पाहून स्वत:चा राग राग
करत दु:खाने माझे परत मागे वळणे
तुझा राग राग करावे तर
तुझी स्माईल तुझा रागच येत नाही
तुला विसरेन म्हणतो पण
तुझी आठवण तुला विसरु देत नाही
मला असा दु:खी बनवुन
तु मला सोडून जावो नको ना
हारलोय हे कसे समजावु मनाला
आता मैत्रीण म्हणून राहशील ना
***

**विक्रम सरक**
**ई पत्ता : vikramsarak13@gmail.com**

कविता

## एकदा माझ्या लेकीला

एकदा माझ्या लेकीला
कोडे मोठे पडले ग
सांग सांग आई माझे
बाबा कुठे दडले ग

उठते तेव्हा दिसेना तो
झोपतानाही असेना ग
मग हातांचा करून पाळणा
अंगाई कोण गातो ग

एकच असा दिवस प्यारा
बाबा सोबत असतो ग
अख्खा दिस लेकीचा सारा
आनंदात सरतो ग
***

**निलेश उजाळ**
**दापोली / पिसई**
**ई पत्ता : nilesh.ujal16@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०४५३९८५६१**

कविता

## मोत्याचा थेंब

दाटून आले आकाश
थेंब पाण्याचा नाही
धावून ये वरुणराजा
अंगाची झाली लाही

डाव लपा छुपीचा
खेळू नकोस असा
जीव झाला कासावीस
पाण्याविना तरफडे मासा

आशेने तुझ्या वाटेकडे
नयन लावून बसले
धरतीच्या कुशीत बीज
डोळे मिटून झोपले

रुसून बसली धरती
वाट तुझी पाहून
तुही मोठा हट्टी
नाही आलास धावून

अंतरीची साद माझी
क्षणभर ऐक आता
मोत्याच्या थेंबाने तुझ्या
धरणीस न्हावूदे आता

***

**किरण दिलीपकुमार म्हसकर**
**मु . केळी, पो . चावंड,**
**ता जुन्नर ,जि पुणे 410502**
**ई पत्ता : kiranmhaskar59@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९१११११०५६९**

कविता

## श्रावण...

श्रावण आल्यावर मी
निळा सावळा होतो...
तुझी आठवण येते
पुन्हा वेंधळा होतो...

रंग ह्या श्रावणाचा
काही ऐसा खुलतो...
डायरीत जपलेला
पुन्हा गुलाब बहरतो...

ह्दयाच्या प्रश्नांना
श्रावण देतो उत्तर...
जखमांसाठी होतो
तो मायेची फुंकर...

मला नेहमी श्रावण
खरे जगणे शिकवतो...
वेदनांना जाणुनी
आसवांना हसवतो...

सये श्रावणसरींचा
अंगावरी शहारा...
ओल्या आठवणींचा
वाहतो मंद वारा...

***

**निलेश कवडे**
**अकोला**
**ई पत्ता : nilesh.k8485@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८२२३६७७०६**

कविता

## बेडूकराव

एका तळ्यात बेडूकराव
लठ्ठ होते फुगलेले
तळ्यातील सारे मासे
मटकावून बसलेले !!

हुशारीने उड्या मारत
तळ्याबाहेर ते पडले
तेवढ्यात पट्टदिशी
सापाने त्याला खाल्ले !!

साप भाऊ आनंदाने
गिरक्या घेत चालू लागले
छाती फुगवून मुंगूसाने
त्याला तिथेच मारले !!

असेच आपण एकमेकांवर
अवलंबून असतो सारे
यालाच आपण विज्ञानात
जीवनचक्र म्हणतो रे !!

***

**निलेश उजाळ**
**दापोली / पिसई**
**ई पत्ता : nilesh.ujal16@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०४५३९८५६१**

कविता

## बाप

बाप नावाचं एक जहाज असतं
झेलुन वादळ वारे इच्छित स्थळी पोहचवतं
आई झाली घराचा कळस बाप झाला पाया
नाही करता येत शब्दात व्यक्त रे बापाची माया
फणसाची गरे म्हणजे बाप
घामाच सिंचन असतो बाप
बापाच्या मनी किती तरी चिंता
एकटाच सोडवतो संसारी गुंता
कष्टाळू बाप शोधतो भाकरी घास
दुःखाच्या पहाडातही घेतो ध्यास
जन्मभर अश्रुंचा आवळून असतो बांध
जाता लेक सासरी कोसळतो खांब
नाही येत लवकर सगळ्यांच्या ध्यानात
येता दुःखाचे सावट तोच रहतो उन्हात
कळेल रे तुलाही नक्की तूझा तो बाप
जेव्हा होशील तू तूझ्या लेकरांचा बाप

***

**योगिता किरण पाखले**
**पुणे**
**ई पत्ता : yogitakotkar51@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९२२५७९४६५८**

चारोळ्या

## चारोळ्या

नजरेतून दिसते ते सुद्धा प्रेम असते
शब्दांतून व्यक्त होते ते ही प्रेम असते
भावना परिस्थितीनुसार बदलल्या तरी
जे जगण्याची प्रेरणा देत ते प्रेम असते

***

**शानिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोट्याचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

कविता

## "ती विहीर तहानलेली"

डोळ्यांच्या कडांवर
विस्कटलेल्या
आयुष्या प्रमाणे
तग धरून राहतात
आसव......
प्रवाहाच्या दिशेने
वाहण्यासाठी....
शोधात विहारीच्या....
काळवंडते सार
आयुष्य
फिरत राहत
स्वत:भोवती
सुखाच्या शोधात
पाणवठ्यावर
विसाव्यासाठी......
पन एका घोटासाठी
दिवस रात्र जागून
आकाशाकडे मान वर
करून पाहत राहते
"ती विहीर तहानलेली"
पाण्याच्या आशेने......
ओल आयुष्य पुन्हा
मिळविण्यासाठी....
***

**निखिल जगताप**
**पुरंदर**
**ई पत्ता : nikhiljagtap037@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०५९०३७४**

कविता

## मोड काळजाचा

कस उतरल जीण
आज आल पाभारीत
उभा राहीला विठोबा
तोल कसा सावरीत......

बैल जुपली औताला
सुरु झालीया पेरण
हाती धरुन कासरा
माती गाडतो धोरण.....

शोधी झाडाची सावली
करी बसून न्याहारी
झरा पुटतो नव्याण
वाहु लागल्या विहिरी......

झाडा फुटली पालवी
कसा बहरला जीव
मोर नाचे अंगनात
उरी मावना रं गाव......

दु:ख उरात दाबुनी
मोड काळजाला आला
पावसाच्या विसाव्याण
थेंब मोत्यावाणी झाला.......
***

**निखिल जगताप**
**पुरंदर**
**ई पत्ता : nikhiljagtap037@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०५९०३७४**

कविता

## मी मराठी,माझी मराठी

मी मराठी, माझी मराठी
नको फुकाचा जयघोष ,
आपणच बोलत नाही मराठी
देऊ नका दुसऱ्याला दोष ...!!

मराठी जगवा, मराठी जागवा
नुसते बोलून काय उपयोग ?
दुसऱ्याशी मराठी बोलून दाखवा
तरच होईल काही उपयोग ..?

मराठीचा डांगोरा नुसताच पिटू नका
तिचा मान सन्मान वाढवा
मराठीचा दर्जा घसरु देऊ नका
तिला वैभवाच्या शिखरी बसवा ...
***

**प्रा. सौ.संगिता भालसिंग**
**अहमदनगर**
**ई पत्ता : sangita_bhalsing@rediffmail.com**

सुधाकरी

## सावळ्या विठ्ठला

१.
सावळ्या विठ्ठला
केलीस करणी
लागले झुरणी
मन माझे ...

२.
सावळ्या विठुचे
धरिते चरण
येतसे मरण
सोडीना मी ..

३.
सावळ्या विठ्ठला
लागली रे ओढ
देहाचे रे खोड
वाहीन मी ...

४.
सावळ्या विठ्ठला
जीव तळमळे
जगे बळेबळे
तुजपायी ...

५.
सावळा विठ्ठल
सपनी भेटतो
मनात वसतो
सखा माझा ..

६.
जनाबाई करी
विठ्ठलाचा धावा
घोर लागे जीवा
पांडुरंगा ...

७.
विठुची पंढरी
हाकेचं अंतर
भास मला तर
माहेराचा ...

८.
सावळा विठ्ठल
करी भानामती
करिते मी प्रीती
येड्या वानी ...

९.
पंढ रीच्या वाटे
फुलांचा ग सड़ा
जीव झाला येड़ा
विठु पायी

१०.
विठ्ठलाच्या पायी
आनंद सोहळा
लावितोय लळा
वारकरी ...

११.
सावळ्या विठ्ठला
पड़ते रे पाया
येरे मला न्याया
पंढरीला ...

१२.
लेकुरवाळा तू
कटी मज घेई
आशीर्वाद देई
पांडुरंगा ...

१३.
विठु दरबारी
लाविले झुंबर
पहाया नंबर
वारकरी...

१४.
पंढरीचा थाट
पाहते दुरुन
विठुला स्मरुन
संसारात ...

१५.
तन मन धन
अर्पण तुजला
सावळ्या विठ्ठला
आशिष दे ...

१६.
विठु दरबारी
वारकरी नाचे
हरिनाम वाचे
उच्चारित...

१७.
सावळ्या विठ्ठला
आठविते तुला
सैरभैर झाला
जीव माझा...

१८.
सावळ्या विठुची
पंढरी सजली
वाट लाल झाली
गुलालाने ...

१९.
सावळ्या विठुची
समाधी भंगली
आरती रंगली
गाभाऱ्यात ...

२०.
सावळा विठ्ठल
सुंदर हे रूप
देहाचा हा धुप
ओवाळीते ...

२१.
सावळ्या विठुची
मूरत सपनी

जीवाला काचनी
भेटीची ती ...

२२.
सावळ्या विठूला
करिते वंदन
देहाचे चंदन
उगाळुन ...

२३.
सावळ्या विठ्ठला
धरिते मी ताल
लाविते मी चाल
अभंगाला ...

२४.
लागे हुरहुर
डोळा येई पुर
जाऊ नको दूर
पांडुरंगा ...

२५.
विठु माझा बाप
रखुमाई आई
माहेरी मी जाई
पंढरीला ...

२६.
सावळ्या विठ्ठला
येऊ दे रे सर
डोळा येई पूर
बळीराजा ...

२७.
लागली ग ओढ़
माहेराची मला
विठ्ठला न्यायाला
ये रे बापा...

२८.
सड़ा नि रांगोळी
अंगणी घातली
विठुने पुसली
पावलाने ...

२९.
लाडाची ग लेक
खेळती एकली
विठुने टाकली
प्रेम दृष्टी ...

३०.
विठुने लावले
मला बाई वेड
लागेना ती गोड
भाकर ही...

४१.
चंद्रभागा तिरी
विठुची आंघोळ
कर्णा तो मंजुळ
वाजतसे ...

४२.
सजली पंढरी
वाजत गाजत
लगीन लागत
पांडुरंग ...

४३.
सावळ्या विठुच्या
पंढरीची वाट
लागे दिवे घाट
सुंदर तो ...

४४.
ओठावर ओवी

दळण दळिते
जिभेला वळिते
पांडुरंगी ...

४५.
सावळया विठुची
करावी ती भक्ती
मिळेल ती मुक्ती
जीवनात ...

४६.
नर अणि नारी
लोळती घोळती
पाय ते धरिती
विठ्ठलाचे ....

४७.
सावळया विठुचे
पाऊले झिजती
मस्तक टेकिती
वारकरी ...

४८.
विठुची पंढरी
झाली लाल लाल
उधळी गुलाल
वारकरी ...

४९.
राउळी ऐकली
विठ्ठल माऊली
रुक्मिन रुसली
गर्दीने त्या ...

५०.
टाळ मृदंगाचा
आवाज कानात
विठ्ठल मनात
भरला गे ...

५१.
राधा प्रेमवेडी
कृष्णाच्या भक्तित
विठुच्या भक्तित
जनाबाई ...

५२.
बोले जनाबाई
येरे बा विठ्ठला
ओवी ती गायला
जात्यावर ...

५३.
जात्यावर ओवी
विठ्ठलाची येते
आनंदे दळीते
दळण ते ...

५४.
दळण दळीते
ओव्या गात गात
भार कमी होत
श्रमाचा तो ...

५५.
जाते ओढताना
दम ग भरला
श्वासात उरला
पांडुरंग ...

५६.
दुष्काळ पडला
कृषक अडला
दान दे विठ्ठला
पावसाचे ...

५७.
विठ्ठला रे बापा
पाड तू पाऊस
येऊ दे दिवस
सोनियाचे ...

५८.
विठ्ठला रे बापा
पावसाला आण
घालिते मी आन
रुख्मीनीची ...

५९.
दिव्य ते दर्शन
विठोबाचे रूप
दिप अणि धुप
ओवाळीते ...

६०.
सावळया कपाळी
चंदनी ओलावा
मिळतो गारवा
विठ्ठलाला...

६१.
संसार तापाने
भिजला पदर
घालितो पाखर
पांडुरंग ...

६२.
पाहते विठूला
डोळे ग भरून
जाईल सरुन
दुःख माझे ...

६३.
गुरु गुरु फिरे
दगडाचे जाते
जणू ओव्या गाते
विठ्ठलाच्या ..

६४.
युगे अठ्ठाविस
विटेवर उभा
परि मुखी प्रभा
विठ्ठलाच्या ....

६५.
साजुक तुपात
नैवेद्याची पोळी
भक्ती माझी भोळी
विठ्ठलाची ...

६६.
विठ्ठलाच्या पायी
भोळी माझी भक्ती
देवा दे रे शक्ती
संकटात ....

६७.
जनी आळवीते
विठ्ठल माऊली
पावलो पावली
भक्तिने ती ...

६८.
पंढरपुरात
मन शांत होई
आशीर्वाद देई
पांडुरंग ....

६९.
जातिभेद मोड़ी
पंढरीची वारी

समानता सारी
विठु पायी ....

७०.
आषाढ़ी कार्तिकी
दिंडी ती चालती
मुखानी बोलती
पांडुरंग ...

७१.
सावळा विठ्ठल
घालितो पाखर
उभारा मखर
भक्तीचे ते ...

७२.
विठ्ठल चरणी
सुखाचा सागर
भरावी घागर
आनंदाची ...

७३.
मनाचा रे वारु
कसा रे आवरु
कसा रे सावरु
सांग विठु ....

७४.
विठु दरबारी
किती ही गर्दी
लोक देती वर्दी
कीर्तनाने ...

७५.
रंगले कीर्तन
पंढरपुरात
आवाज उरात
चिपळ्यांचा ...

७६.
वारकरी पहा
अनवानी चाले
मुखानी तो बोले

पांडुरंग ...

७७.
जात्यावर ओवी
विठ्ठलाची गाते
हलकेच होते
तन मन ...

७८.
अजब सोहळा
सुखावे नजर
टाळाचा गजर
पंढरीत ...

७९.
चंद्रभागा धावे
आनंदे नाचत
धुवून टाकत
पाप सारे ...

८०.
विठुच्या चरणी
साकडे घालती
माघारी फिरती
आनंदाने ...

८१.
विठुची शिदोरी
भक्तीने भरली
आम्हीही सेविली
आनंदाने ...

८२.
सावळ्या विठ्ठला

मागते मी दान
थोडा तरी आण
पाऊस रे ....

८३.
खुणावते मला
नाम्याची पायरी
विठ्ठल मंदिरी
पहिली ती .....

८४.
विठुच्या मंदिरी
पताका फड़के
असती लाडके
वारकरी ...

८५.
पंढरीची वारी
तानभूक जाई
उपाशी मी राही
बारीमंदी ...

८६.
विठु दरबारी
रंक अणि राव
समान तो भाव
पांडुरंग ...

८७.
विठुच्या चरणी
देह तो पडावा
मोक्ष तो घड़ावा
ईह लोकी ...

८८.
सावळा विठ्ठल
भक्तीचा भुकेला
उपास मी केला
निरंकार ....

८९.
सुंदर रुक्मिणी
बोलते मनाशी
एकटी का अशी
विठु विन ....

९०.
एकली रुक्मिन
राउळी उदास
विठुचा तो भास
मनामधी ....

९१.
एकली रुक्मिन
उदास दिसते
अशी का रूसते
विठुवर ...

९२.
रुक्मिन रुसली
समजव तिला
भेटीला तो आला
भक्तगण ...

९३.
पंढरपुरात
सोनियाची खाण
लुटे थोर सान
भक्तीची ती ...

९४.
पंढर्पुरात
कसा गलबला
गजर तो झाला
विठुनाम ....

९५.
पंढरपुरात
मुस्लिम तो भक्त
आळवितो फ़क्त
विठु नाम ...

९६.
मुस्लिम तो भक्त
वारीला निघाला
बारीला बसला
अनवानी...

९७.
रुक्मिन सुंदरी
लाग रांधायला
वारकरी आला
जेवायला ...

९८.
पंढरपूरात
समतेचा राजा
पांडुरंग माझा
जीव भाव ...

९९.
विठ्ठल भेटीची
लागलीसे आस
होत आहे भास
रात्रंदिन ...

१००.
चंद्रभागा तिरी
सुंदर ती रेती
पायाला लागती
मऊ मऊ ...

१०१.
काम क्रोध मोह
दूर मी सारिले
चरण धारिले
विठ्ठलाचे ....

***

**प्रा. सौ.संगिता भालसिंग**
**अहमदनगर**
**ई पत्ता : sangita_bhalsing@rediffmail.com**

**कविता**

## *मी एक*

एक कन्या
नकोशी असूनही गर्भात राहिले
मातेच्या रक्त मांस श्वासावर जगले
कष्ट हालआपेष्टात शिक्षण झाले
बुद्धिचा आधार पायावर उभी राहिले
मी एक पत्नी
सासरच्या सेवेत जीवन वाहिले
आज्ञा, नम्रता विनय गुण धरिले
सावली पतीची बनून राहिले
राबण्याचा गांव आंदण मिळाले
मी एक आई
पोटातल्या गर्भाशी सुखसंवाद केले
किलबिल ताऱ्यात दुःख विसरले
तळहात पाळणा, नेत्राचा दिवा केला
उत्तम ज्ञान संस्कार शिक्षण दिले
मी एक स्त्री
रुढी परंपरा कधी धरून,सोडून
दुःख, वेदना, संकटाशी लढणारी
समाजशृंखला कधी धरून, सोडून
स्वतः च स्वतंत्र अस्तित्व शोधणारी

***

**प्रा. सौ.संगिता भालसिंग**
**अहमदनगर**
**ई पत्ता : sangita_bhalsing@rediffmail.com**

कविता

## घे अवतार पुन्हा

कृष्णा पुन्हा घे अवतार
कलीयुगाला भार कंसाचा झाला.!
द्वापार वेळी एकच होता मामा
तरीही लगबगीने धावून आला.!!

मामाने तर मारले जीवंत मुले
येथे तर गर्भी कळी खुंटती.!
बहूत झाली रे उत्पत्ति दैत्यकुळं
सज्जन कोन नच उमजती.!!

तुझ्याकडे चोरी होती चिताची
येथे रोजच खुला भ्रष्टाचार.!
राहीला न विचार शुद्धता
रोजच चाले कसा अविचार.!!

द्रौपदीला पुरविले तू वस्त्र
वस्त्र पुरवाया उरले ना कोणी.!
रोजच वस्त्रांची लुट होते आहे
वालीच राहीला नाही कोणी.!!

मंजुळ  होता बासुरी स्वर
गायी फोडत होत्या हंबरडा.!
राहीली नाही बासुरी ध्वनी
राहील्या न गायी फक्त गराडा.!!
***

**गजानन पवार पाटील**
**वरुड देवी, हिंगोली**
**ई पत्ता : gajupawar4896@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०६६७७९२६५**

कविता

## "मन वेडे स्वप्न"

मन वेडे हे रमतच नाही
समजावले किती तयासी..!
कोठे माझे ते येकत नाही,
काही सांगा भटक्या मनासी..!!
चित हरपले भान विसरले
तुझा मोह सखे आवरेन..!
रुप स्वप्नी दिसे लावणे ग,
जसी हिरेजडीत नवरत्न खान..!!
लागत नाही पापणी डोळा
दृष्टी दिसे रात्रंदिन मोहिनी..!
जादूगरी तुझ्या शब्दातून
वाहे आठवणी डोळा पाणी..!!
यालाच म्हणतात का प्रेम सखय?
विसर ना चेन जीवासी आता..!
कसा मोहून बोजवारी बुडालो
कसा तोल सावरेल पुरता..!!
चिंता खाणार उठून देहाती
भीती वाटते कधी जणांची..!
कधी वाटले झोकून या देहाला,
पण लक्ष्मण रेखा आडवी जगाची..!!
वाटले मनाचा गुंता काढता
आशा पल्लवीत होईल काही..!
आठवणी वाचून दिवस नाही
हुरहुर लावणारी कहाणी ही..!!
नकळत पडलो नयन बाणी
उमजले नाही कसे तेव्हा ग..!
जसी तव्यावर भाजून लाही,
दोन्ही जीवन तडफडती ग..!!
***

**गजानन पवार पाटील**
**वरुड देवी, हिंगोली**
**ई पत्ता : gajupawar4896@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०६६७७९२६५**

कविता

## "नका हिम्मत हरू"

उन्हाच्या दहाकतेनी
रखरखीत झाल्या वाटा..
भेगाळलेली 'पायच' सारी
माखती रक्ताने कधी पायी काटा..!!

जन्मच कुणब्या घरचा
वाटू लागतो शाप आता..
हास्यास्पद जीने झाले किती,
राजकारण त्याचे 'जीवावर' करता..!!

बहुत गेले की 'बळी' आजवर
हिम्मत राखून ठेवणेच पर्याय..
झगडून एकजुटीने संकटांना,
'गळफास' त्यावर नाही उपाय..!!

'पाण्यासाठी' पायपीट चालली
तळमळ व्यथा जीवा लागली..
होते लग्न मुलींचे ठरलेली,
दुष्काळी 'हळद' सुकून गेली..!!

वनात पेटायचा 'वणवा'
कथा सांगत होती आजी..
'ह्रदयी' पेटला वणवा सहज,
कोणाला नाही दिसला सहजी..!!
***

**गजानन पवार पाटील**
**वरुड देवी, हिंगोली**
**ई पत्ता : gajupawar4896@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०६६७७९२६५**

कविता

## "सांगायचे आहे तुला"

सांगायचे आहे तुला
ओठांवरती थांबले
लाजरीच भाषा शैली
मन ओलेचिंब झाले

ओठांवरील ही भाषा
हवी गं उमजायला
प्रिती अंधळी प्रेमाची
आळवी सखे जगाला

वळून बघता मागे
आगळे जीवन गीत
गाभाऱ्यात देव कोठे?

हरपले तुझे चित
दैवाचा खेळ चालतो
चालक उभा श्रीहरी
कुणा हाती भाग्यरेखा
कुणा भेटली तिजोरी
कोणाला नाही दिसला सहजी..!!
***

**गजानन पवार पाटील**
**वरुड देवी, हिंगोली**
**ई पत्ता : gajupawar4896@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०६६७७९२६५**

## मराठी विचारधन

"आयुष्य फार सुंदर आहे... ते फक्त चांगल्या विचारांनी जगता आले पाहिजे...
***

**पु. ल. देशपांडे**

कविता

## कविता

वेदनेच्या निखा-या मधुन
जन्म घेते माझी कविता ॥
कधी लक्ष्मीपुष्पाच्या सुगंधी
पाकळ्या मध्ये जन्मते कविता॥१॥

दुःख पार घालते कविता
शब्दांच्या एका लाटे सरशी ॥
फुटती शब्द वेडे सुखाचे
एका हुंदक्या सरशी ॥२॥

कधी शब्दांच्या माळा बनती
कधीच काही कळत नाही ॥
गुंतून गेलो शब्द नगरीत
दिवस की रात्र कळत नाही ॥३॥

जाऊद्या सवयच जडली
शब्दाविना नाही करमत ॥
झोप हरवली व्यैरीन व्यर्थ,
नाही तहान भूक लागत ॥४॥

स्वप्न उरी बाळगून कविता
नविन असतो रोजच ध्यास ॥
चंदनाचे ही मिटते आयुष्य
घासल्याविना नसे सुवास ॥५॥
***

**गजानन पवार पाटील**
**वरुड देवी, हिंगोली**
**ई पत्ता : gajupawar4896@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०६६७७९२६५**

कविता

## 'सर्वेश्वर'

तु गाजवं तुझी अनिर्बंध सत्ता
घाल धुडघुस बेफामपणे गोर-गरीबांवर
चालवं तळपत्या शमशेरी दिनदुबळ्यांवर
घडवून आण प्रचंड रक्तपात
कारण -
नियतीने दिलाय तुला तो अधिकार
तुझ्या हाती सत्ता देऊन.
पण एवढं लक्षात ठेवं
आमच्या दृष्टीने तु एक रक्तपिपासू कीटकचं .
तो रक्त प्राशन करून जगतो
आणि तु रक्त शोषून जगतोस
तरीही तुला वाटतं
जगातला सर्वशक्तीमान सर्वेश्वर असल्यासारखं ...
***

**ऋषिकेश गंगाधरराव देशमुख**
**मु. पो. शिळवणी ता. देगलूर जि. नांदेड**
**पिन कोड : ४३१७४१**
**ई पत्ता : rushigdeshmukh@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९२३०४५५५०**

चारोळ्या

## चारोळ्या

खरंच तू भेटल्यापासून
सारीकडे प्रेम मी अनुभवले आहे
गतजन्माच्या पुण्याईचे जणू
आंदण लाभले आहे
***

**शानिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोटयाचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

**गझल**

## मैफील आज जमली

मैफील आज जमली पण रंग नाहि भरला
नादात मी तिच्या तो कोठेतरी हरवला

मी देवळात दमलो देवीस शोधताना
माता घरात दिसली दारात जीव हसला

शोधीत कस्तुरीच्या गंधास दूर फिरलो
शेजारधर्म नाते जपण्यात तो मिसळला

पाऊस पाहण्या मी दारी उभा जरासा
गळक्या छतातुनी तो पाठीवरी बरसला

का मित्र मीच जपला मागून घात झाला
वैरी समोरुनी का जाता उगाच हसला
***

**विजयकुमार देशपांडे**
**बावधन, पुणे**
**ई पत्ता : deshpande.vijaykumar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९०११६६७१२७**

**चारोळ्या**

## चारोळ्या

मनाला जणू स्पर्श करते.
मैत्रीच्या नात्याचा,
अनमोल धागा,
संकटाला मदतीचा हाथ द्यावा.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**कविता**

## तरुणपण

अस्थि मांसाचा देह तुझा
त्यावर त्वचेचे आवरण
चेहऱ्याची अशी ती ठेवण
नाव त्याजला कि सुंदरपण!

शरीरातील घाण हि सारी
देहात तुझ्या ती कुजलेली
बाह्य वाटेने जी निघलेली
तुझ्यातच गुपित असलेली
गर्व तुला या स्वरूपतेचा
काही काळात जे नश्वर
त्यातही तुझ्यातील कि विकार
जीवन जगायला हि खडतर

चार घटकेच आयुष्य तुझं
एक घटकेच हे तारुण्य
पुसणार कोण मग लावण्य
अन वृद्ध पणाच कारुण्य!

अंतरातील विषय हे तुजला
सोयीने त्यांच्या तुज खेळवीती
घटकेची ती मौज ठेवती
आयुष्य पुढे मग नासविती

समजुनी घे पाश सर्व
नको ती वासनेची उधळण
जवळ येति मृत्यू चे क्षण
व्यर्थ नको कि तरुणपण..!
***

**तुषार कथोरे**
**ई पत्ता : tusshar.kathore@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९७०४६९९०२**

कविता

## कोलाज

काही अर्धवट ओळी
पडून असतात
कुठल्याशा वहीत.. कुठल्याशा पानावर..
सर्वांनाच कविता होण्याचं भाग्य लाभत नसतं
पूर्णत्वाची आस मात्र प्रत्येकीला असते
कुणाचं वाट पाहणं फळाला येतं
कुणाची प्रतिक्षा आजन्म संपत नाही...
कुणाला लाभतो पूर्णविराम,
तर कुणाला केवळ तीन बिंदू अपूर्णत्वाचे...
आयुष्य असंच असतं
मनाच्या कुठल्याशा कप्प्यात
जाणीवांच्या पानांवर
पडून असतं काहीबाही...
इच्छा-आकांक्षा, नाती, स्वप्नं..
कुणाचं वाट पाहणं फळाला येतं
कुणाची प्रतिक्षा आजन्म संपत नाही...
जुळलेल्या ओळी जगात मिरवतात
आणि अपूर्ण ओळी मनाला आर्त साद देत राहतात
अनेक अपूर्ण ओळी जोडून
एक पूर्ण कविता काही होत नाही...
पण आयुष्य मात्र असंच असतं...
न जुळलेल्या असंख्य तुकड्यांचा
एक कोलाज...!
***

**स्वप्निल चाफेकर 'प्रीत'**
**ई पत्ता : swapnilchafekar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४६०५४३०**

## मराठी विचारधन

आयुष्यात “मनस्ताप” अवस्था टाळायची असेल तर कोणाकडून कोणतीही अपेक्षा ठेवू नका....
***
**संग्रहित**

कविता

## सांग देवा

किती जन्म झाले खरे सांग देवा
किती कंठले मी बरे सांग देवा...
किती वाहिल्या ओंजळी मी फुलांच्या
किती पाडले मी चरे सांग देवा...
किती चेहऱ्यांनी मला मोहवावे
किती काळजाला घरे सांग देवा...
तुझे नाव घेऊन होती लढाया
कुणा मागु मी उत्तरे सांग देवा...
तनाचे? मनाचे ? यशाचे ? धनाचे?
सुखी कोणते पिंजरे सांग देवा
***

**स्वप्निल चाफेकर 'प्रीत'**
**ई पत्ता : swapnilchafekar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४६०५४३०**

कविता

## आनंदवारी

एकीकडे भरे । महा कुम्भमेळा ।
आषाढी सोहळा । एकीकडे ॥१॥
दोन महातीर्थे । भरुन वाहती ।
भक्तिला भरती । भाविकांच्या ॥२॥
गोदातिरी एक । एक भीमेकाठी ।
सारी दाटीवाटी । सुखालागी ॥३॥
येथले भगवे । तेथ 'पांडु'रंगी ।
काय अंतरंगी । कुणा ठावे ॥४॥
भस्म फासलेले । येथ जटाभार ।
कपाळी अबीर । वैष्णवांच्या ॥५॥
मानपान येथे । दिव्य चमत्कार ।
तेथ नमस्कार । एकमेकां ॥६॥
गळां-हाती-डोई । रुद्राक्षांचा घोळ ।
तुळशीची माळ । पुरे कोणा ॥७॥
येथले संन्यासी । प्रपंची तेथले ।
कुणा गवसले । समाधान ॥८॥

कुण्या वाटे जावे । काय अनुसरु ।
प्रश्न हा विचारु । कुणा देवा ॥९॥
सावता माळ्याने । केली नाही वारी ।
धावला श्रीहरी । शेतामाजी ॥१०॥
आनंदाचा 'कुम्भ' । दडला अंतरी ।
तेथ घडो 'वारी' । विठुराया ॥११॥
***

**स्वप्निल चाफेकर 'प्रीत'**
**ई पत्ता : swapnilchafekar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४६०५४३०**

**कविता**

## *समता*

महामानवा, तुझ्यामुळे जरि कळली समता,
तुझ्या बांधवां अजून नाही फळली समता..

उपेक्षितांना नव्हता वाली जगात कोणी
अन्यायाची किती युगे कळवळली समता..

स्वत:स मोठे म्हणणारे, ते दांभिक होते
पायांखाली तृणापरी चुरगळली समता..

'संविधान' हा वेद निर्मिला लोकशाहिचा
खरोखरी का मनोमनी परिमळली समता..?

राजकारणी पहा निघाले खरे बेरकी
जशी सोयिची तशी बिचारी वळली समता..

चला, बुद्ध अन कबीर, शाहू, फुले स्मरुया
अता पाहिजे धमन्यान्तुन सळसळली समता..
***

**स्वप्निल चाफेकर 'प्रीत'**
**ई पत्ता : swapnilchafekar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४६०५४३०**

**कविता**

## *जोगवा*

एवढा द्या जोगवा कोणीतरी
देव माझा सोडवा कोणीतरी...

तो निधर्मी एकटा आहे जगी
संघ त्याचा वाढवा कोणीतरी...

सर्व भूतांतून नांदे तो जरी
का उपाशी, नागवा कोणीतरी ?...

सूर्य गेला, जाउ द्या, तुम्हीच व्हा
तेजगर्भी काजवा कोणीतरी...

या मनाचे बिंब दिसते ज्यातुनी
आरसा तो दाखवा कोणीतरी...

आपली ही 'प्रीत' अंधारातली
जाणतो तो चांदवा कोणीतरी...
***

**स्वप्निल चाफेकर 'प्रीत'**
**ई पत्ता : swapnilchafekar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४६०५४३०**

**चारोळ्या**

## *चारोळ्या*

पाहताक्षणी जीव तुझ्याकडे वळला
तोल तुझ्यावर असा हा ढळला
पण साथ प्रिये सोडूनी जाताना
कावा तुझा न कळला
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## *उत्सव*

जाता जाता मागे वळून कृपेने पहाल ना...
खरंच पुढच्या वर्षी बाप्पा तुम्ही लवकर याल ना... ? ॥धृ॥

शांत आणि भक्तिपूर्ण असतील आमची गाणी
सजावटीत निसर्गाची मुळीच नसेल हानी
विधायक घडेल हातून, अशी बुद्धि द्याल ना...
खरंच पुढच्या वर्षी बाप्पा तुम्ही लवकर याल ना... ? ॥१॥

दिखाऊपणा नसेल, भडक नसेल रोशणाई
डीजे-बेन्जो बाद, साधे असेल सारे काही
'वारी' सारख्या मिरवणुकीत, तृप्त होऊन जाल ना...
खरंच पुढच्या वर्षी बाप्पा तुम्ही लवकर याल ना... ? ॥२॥

आवडेल तुम्हां असाच उत्सव घडवू तुमच्यासाठी
समाजाला जवळ आणू प्रबोधनासाठी
खरा भक्तिभाव आम्हां प्रसादरुपे द्याल ना...
खरंच पुढच्या वर्षी बाप्पा तुम्ही लवकर याल ना... ? ॥३॥
***

**स्वप्निल चाफेकर 'प्रीत'**
**ई पत्ता : swapnilchafekar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४६०५४३०**

कविता

## *मैत्री*

खांद्यावरती हात आहे,
सुखादुःखात साथ आहे
तुझ्या-माझ्या मैत्रीची
काही औरच बात आहे...

हृदयामध्ये 'प्रीत' आहे
आनंदाचे गीत आहे
तुझ्या-माझ्या मैत्रीची
जगावेगळी रीत आहे...

ना कधी तेढ आहे
सोबतीची ओढ आहे
तुझ्या-माझ्या भांडणाचा
शेवट मात्र गोड आहे...

अंतरीचा बोल आहे
शब्दांमध्ये ओल आहे-
तुझ्या-माझ्या मैत्रीशिवाय
बाकी सारं फोल आहे ...
***

**स्वप्निल चाफेकर 'प्रीत'**
**ई पत्ता : swapnilchafekar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४६०५४३०**

कविता

## *आम्ही सगळे कासवछापवाले*

आम्ही सगळे कासवछापवाले
संध्याकाळ झाली की
कासवछाप पेटवायची
डासांच्या हल्ल्यापासून बचावासाठी
आपली डोकी कासवाच्या
धुराळ कवचाखाली मिटवायची
कालपर्यंत हे दुष्ट डास
कानाकोपऱ्यांत घुण-घुण करीत डासायचे
आता तर त्यांनी
माजघरापर्यंत मजल मारली आहे
लख्ख उजेडालाही न घाबरता
कचाकचा खुपसताहेत ते
आपल्या सूक्ष्म, टोकदार सोंडी
आणि शोषून घेताहेत पोट भरून
हाडाडलेल्या कष्टकऱ्यांचं रक्त
जे लागलंय आता
चांगलंच त्यांच्या तोंडी
हे उन्मत्त डास आता
एवढे निर्ढावलेत की
सरकारी फवारणीलाही ते

भीक घालीत नाहीत
आपल्यातल्याच काहींनी
तयार करून ठेवलाय
इथं-तिथं चिखल आणि
पसरवून ठेवलीहेत सर्वत्र
घाणेरड्या पाण्याची डबकी
जी त्यांच्यासाठी ठरलीत
अक्षय आनंदाच्या खाणी
आता तुम्हीच सांगा
'चिपाड झालेल्या कष्टकऱ्यांना
या डासांच्या छळापासून वाचवायला
कोणी वालीच उरला नाही'
असं म्हणायचं?
की या साऱ्या कीडलेल्या
व्यवस्थेलाच आभाळभर
टाहो फोडून हसायचं
***

**दिलीप पाटील**
**नाशिक**

**कविता**

## *बंध रेशमाचे*

बंध हे रेशमाचे
माझ्या तुझ्या मनाचे...
घे शपथ आपल्या प्रेमाची
दे शपथ आपल्या मनाची
उजळू दे अंतरीची गाथा
शमवू दे मनाची व्यथा
असे हे बंध रेशमाचे
माझ्या तुझ्या मनाचे...
तुझ्या नयन ओंजळीत
नसावा आसवांचा थेंब
दु:खी मनाच्या लहरी
शमवील मी किनारी
असे हे बंध रेशमाचे
माझ्या तुझ्या मनाचे...
नको तोडशिल कधी
बंध आपल्या मनाचे
मी जगू कसा तुझविन
मी मरू कसा तुझविन
असे हे बंध रेशमाचे
माझ्या तुझ्या मनाचे...
***

**गणेश म. तायडे**
**खामगांव**

**कविता**

## *जीवसखी*

उनात सावली असणारी, चार चोगात लाजणारी...ती
डोयांनी बोलणारी, पाहून घोड हसणारी...ती
न बोलता माज्या, मनातले समजणारी...ती
इवल्याश्या मनात, खूप सारे प्रेम ठेवणारी...ती
दुखावल्यास टचकन, डोळे ओले करणारी...ती
स्वताला त्रास झाला तरी, सुख देणारी...ती
चुकी नसली तरी, समजून घेणारी...ती
काही होताच, दाहून येणारी...ती
परस्तीतीला सामोरी जावून, मुथोड जाब देणारी...ती
माज्या सारख्या दगडाला, देव मानणारी...ती
आशी जिवापार जीव लावणारी ती माजी...जीवसखी
***

**सागर आबनावे**

## कविता

# प्रेम व्यक्त

पहिल्या भेटीत होतं प्रेम..
प्रेमात वाटतात पापण्यांचं खरं
मित्रांच खरं
प्रत्येक स्वप्न वाटतं खरं..!!

प्रियेला प्रेम व्यक्त करण्यास
नाही होतं हिम्मत
आज बोलायचं म्हणुनी
ठेवतो मनात

मी पण आहे का तिच्या मनात ?
असा प्रश्न पडतो माझ्या मनात

नजरेस नजर भिडली
पाहुनी मला ती गाली हसली
मग वेळच कसली
सांगुन टाकलं एका शब्दात

"तू खुप आवडतेस मला
मी पण आवडतो का तुला
ए,माझ्या गुलाबाच्या फुला
आता सांगशील का उत्तर मला"

पडला विचार मनात.....
जर नाही म्हणाली तर
ठेच पोहचेल माझ्या काळजात
अगं प्रिये सांगशील का मला तू
काय आहे तुझ्या मनात
काही असेल तर म्हण तू
एकाच शब्दात

प्रेम व्यक्त करताना वाटली भीती
विचार करा कशी झाली असेल माझी स्थिती
सांगायचं होतं मनात भरपूर तरी किती
पण नाही केली मी अती
नाहीतर झाली असती ना माझी माती......!!
***

**वैभव यशवंत जाधव**

## कविता

# गुंता

नजरेत तुझ्या काय जाणिले मी
चुकला नकळत हृदयाचा ठोका
तुझ्या मनीचा ठाव कसा घ्यावा
समजत नव्हतं आहे प्रेम की धोका

तुझ्या इश्काची इंगळी डसताना
माझं हृदय खुदकन हसायच
तुझ्या मनात खरच काय आहे
मजला कधीच नाही ग समजायच

कधीतरी तू बोलावस मनसोक्त
यासाठीच तळमळायच ग माझं मन
तुझ्याच प्रेमात झुरुन झुरुन
विरुन गेलं ग सारं गगन

भावनांना माझ्या मिळावी सावली
ठेवून होतो ही एकच आशा
तुज प्रेमप्रवाहातच करपल्या भावना
अन पदरी पडली तिच निराशा

गुज माझ्या अंतरीचे तुला
कधीच नाही ग उमजल
जिंकून सुद्धा हरलो मी तुझ्या प्रेमात
पण तुला कधीच नाही समजल

तुझ्याविना मी कसा जगीन
याचा कधीतरी तू विचार कर
अश्रूंना माझ्या झेल कधी तू
भावनांच तुझ्या खुल दार कर

जे घडायच ते घडून गेल
चुकल असेल काही तर माफ कर
गैरसमजुतीला प्रेमात नको ठाव
तुही आपल मन साफ कर

रुसवे फुगवे तर चालतच राहतात
विश्वास माझा सखे तोडू नको
वाईट वेळ आली कितीही
माझा हात सखे तू सोडू नको

पुन्हा भावनांच भरलय आभाळ
तरीही गातो मी विरहाचेच सूर
तुलाही अन मलाही माहीत
जाणार एक दिवस आपण खुप दूर

शब्दही कमी पडतात भावना मांडायला
शेवटी एकच कर तू जाता जाता
प्रेम, आठवण, विरह की जीवनभर तुझीच साथ
खरच तू सोडवून जा हा गुंता
सोडवून जा हा गुंता.......
***

**अनिकेत स्वामी**
**अकलूज**

## मराठी विचारधन

आपल्याकडे जगाला देण्यासाठी काहीच नाही, असं वाटत असेल तर....... चेहऱ्यावर एक छान "SMILE" दया.....!! खरच हा उपहार इतर कोणत्याही वस्तू पेक्षा खुपच "मौल्यवान" आहे.
***

**संग्रहित**

**कविता**

## भोग

बाप पोळतो उन्हात
माय भरविते घास
चार कुडाच्या घराला
लागे गरीबीचा फास.....

पराकोटीच दारिद्र्य
नाही आसवाला थारा
हल्का पदर उडतो
माय गोंजारते वारा.....

अंधारात लख्ख प्रेम
उडे कोरडा फुफाटा
टोचायचा जवा उरी
हात बाभळीचा काटा....

ढेकळात मातीतल्या
एकरूप त्याचं जग
जसा तमाशाचा फड
हंबरून गातो वग.....

काकुळलेली ओलाणी
तिला ठिगळांची रास
छत पाहुन भकास
उन्हाळ्याचा लाग ध्यास....

दिस आला दिस गेला
घोर लागला जीवाला
उन्ह अंगाला लागली
हात जोड्ल भोगाला....
***

**प्रशांत गायकवाड्**
**मुंबई**

कविता

# आई - जीवनाची शिल्पकार

पोटात असायची भूक
अनी टोपल्यात
नसायची कधी भाकरं
आमच्या घरात....

वात आणला गरीबीने
आई चं आमची
भाकरीसाठी रडायची
अनी भाकरीला
पिठ कुठून तरी मागून
रोज आनायची....

नाही पीठ मिळाले तर
ठोकर आमचीचं
मायं घडोघडी खायची
अनी म्हणायची...
बाळांनो, घाबरू नकात
आता घालू भात
पिठ नाही रे भाकरीला
अजीबात घरात...

वात आणला गरीबीनी
बात ती कराया
जीव होई रे कासाविस
रडायची माया
पाया पडूनी लेकाराला
मागे ती खाया...

साया नव्हता कुणाचा
जीव मेटा कुटी
वाटे सगे-सोयरे नाती
सारी ती खोटी...

वाटी तिचं सुख-शांती
कष्टाचीचं पाटी
देई सदैव आम्हा हाती
शिकण्या पाटी...

ललाटीच्या भाग्यरेषा
तिने आखल्या
जीवनाची शिल्पकार
तीचं आपल्या...

पांग तिचे कधी नाही
फिटणार ऋण
माय ममतेचे गुणगान
गातो शब्दधन....
***

**श्री.दिगंबर बापू शिंदे ( शब्दनन डीबी )**
**पुणे- ३३**
**मोबाईल क्रमांक : ९७६३११६३३६**

चारोळ्या

# चारोळ्या

सुंदर आपले प्रेमाचे नाते,
विश्वास जगण्याचा मनी देते.
गेलास काही क्षण दूर जरी,
मनाला हुरहूर लावूनी जाते.
***
स्वप्नक्षितीजा पलीकडे प्रिया,
मी वाट तुझी बघत राहिले.
वेड्या स्वप्नांच्या रुपेरी आशेत,
मन माझे चंदेरी चांदण्यात धुंदावले.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## साखळीतील प्रेम

तुझ्या डोळ्यामंदी ,भावनांची कळी
मनी ह्यो चांदवा, वेदनांची तळी
तुह्या डोळ्यांत मी, पाहतो कैकदा
झिंगते अंतरी स्वप्न सोनसळी....

धागे काळजाचे, छेडती बासरी
प्रेम मोठे किती जातीच्या मंदिरी?
स्वप्न व्हावे पुरे, मुल्य हे व्यापुनी
बागडावी इथे, अंतरी पाकोळी....

काय सांगू तुला, नाही काही गुन्हा
दुनियेची ड्युटी, भांडते रे पुन्हा
आसवांचा किती, थांबवू सामना
रोज येते इथे, वेगळी साखळी....

तुला भेटायला, खोदला मी झरा
काळजाच्या तीरी, नेहमी आसरा
बंधने घातली, त्यांनी या पाखरा
झोप घे तू सखे, होऊनी मोकळी
***

**समाधान गायकवाड ( समतावादी कवी )**
**ई पत्ता : shabdbhaskar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८८८८६८७६२८**

## मराठी विचारधन

या जगात इतका श्रीमंत कोणी नाही जो स्वत:चे बालपण किंवा तरुणपण विकत घेऊ शकतो, पण मित्र या दोन्ही गोष्टी तुम्हाला देऊ शकतात आणि तेही विनामूल्य....
***

**संग्रहित**

कविता

## ब्रँन्ड

बसायचो कालपर्यंत मी
मार्क्सवादी, साम्यवादी, भांडवलवादी,
जातीयवादी, धर्म- पंथवादी, विद्रोही
आणि अशा रंगबिरंगी झेंडाधारी दोस्तांच्या मैफलीत,
पेगला पेग धडकवून 'चिअर्स' म्हण,
पण टिकलाच नाही शेवटपर्यंत
एकही दोस्त,
कुणी संपला एका पेगात,
कुणी झिंगला दोनमध्ये,
तर कुणाची गाडी अडखळली
दुसऱ्या तिसर्यावर....
सारेच बघत राहिले आश्चर्याने,
आणि म्हणत सुटले
"याला तर थोडीही चढली नाही"
सारे पचवून तसाच राहणारा 'बेवडा' ह्योच.....
आजच्या मैफलीचे मला
आलेच नाही निमंत्रण
आणि येणारही नाही कारण.....
अयोग्य ठरलोय मी त्या मैफलीत
वाटत नाही मी त्यांच्यातला
कारण...
मी पडत नाही ना बेहोश ....
कोणत्याही 'ब्रँन्ड' समोर
***

**समाधान गायकवाड ( समतावादी कवी )**
**ई पत्ता : shabdbhaskar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८८८८६८७६२८**

## मराठी विचारधन

नात ते टिकते ज्यात, शब्द कमी आणि समज जास्त, तक्रार कमी आणि प्रेम जास्त, अपेक्षा कमी आणि विश्वास जास्त असतो...!!
***

**संग्रहित**

कविता

## स्वत:कडे या

द्रष्टे, गधे, शहाणे, नादान, भाबडे या
घडवायचे जगाला तेव्हा स्वत:कडे या

जर वाटते जुने ते सोने खरे तुम्हाला
नेसून वल्कले वा फेडून कापडे या

आम्ही तुम्ही पुरवितो रुचकर रसद जिभेला
म्हणतो दगड कधी का घेऊन बोकडे या?

बोले घरात आम्हा कणगी उदासवाणी
मारा भुकेस किंवा काढून आतडे या

आणू नका फुलांचे सुतकात हार कोणी
मयतीस यायचे तर घेऊन लाकडे या
***

**जयदिप एकनाथ विघ्ने**
**मु.पो.ता. देऊळगाव राजा**
**जि.बुलढाणा, आदर्श कॉलनी**
**देऊळगाव राजा**
**ई पत्ता : dipjay2004@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७०५७५८८३२९**

चारोळ्या

## चारोळ्या

स्वप्नसुंदरी तू हृदयाची प्रीतभाषा,
मिलनवेडया मनाची वेडी ती आशा.
मनी फुललेल्या स्वप्नवत कळीत,
तू येताच गंधाळल्या चारी दिशा.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## बघ तुझ्या येन्याने

बघ तुझ्या येन्याने
मंदिरेही सजली आहेत
मज्जिदीही गजबजलि आहेत
बघ तुझ्या येन्याने
बघ तुझ्या येन्याने
कळयाही फुलल्या आहेत
पिकेही डुलली आहेत
बघ तुझ्या येन्याने
बघ तुझ्या येन्याने
नद्याही वाहत्या आहेत
पक्षी ही गात आहेत
बघ तुझ्या येन्याने
बघ तुझ्या येन्याने
गेले ते दु:ख आहे
आले ते सुख आहे
बघ तुझ्या येन्याने
बघ तुझ्या येन्याने
पिकले हे रान आहे
मन गात आनंदी गान आहे
बघ तुझ्या येन्याने
बघ तुझ्या येन्याने
तो फंदा ही दूर जाईल
जो अनेंकना अनाथ करायचा
बघ तुझ्या येन्याने
बघ तुझ्या येन्याने
ते हातही पिवळे होतील
जे बापाची चिंता दूर करतील
बघ तुझ्या येन्याने
***

**अमोल अलगुडे**
**निलंगा**
**ई पत्ता : aalgude777@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९७५२३२६०२**

कविता

## माणुसकी पिऊन

माणूसकी पिऊन घेतली ढेकर
इतकी कशी रे देवा वाया गेली तुझी लेकर
अशी नराधम चौहिकड
सांग देवा माता बहिन फिरावी कुनिकड
मन्हें देवा तुझा फार चमत्कार
मग करकी अशी नराधम ठार
माणूसकी पिऊन घेतली ढेकर
इतकी कशी रे देवा वाया गेली तुझी लेकर
***

**अमोल अलगुडे**
**निलंगा**
**ई पत्ता : aalgude777@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९७५२३२६०२**

कविता

## क्षण हा आजचा..

क्षण हा आजचा
समुद्र आनंदाचा
क्षण हा आजचा
नदी ही दुखाची
क्षण हा आजचा
चांदणे सुखाचे
क्षण हा आजचा
पाऊस आनंदाचा
क्षण हा आजचा
लाख मौजेचा
चिंता ही उद्याची
दुष्काळ आजचा
क्षण हा आजचा
समुद्र आनंदाचा
***

**अमोल अलगुडे**
**निलंगा**
**ई पत्ता : aalgude777@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९७५२३२६०२**

कविता

## सखे

त्या फुलपाखरांचा रंग
तुज विन फिका सखे
त्या फुलांचा गंध
तुज विन फिका सखे
त्या पावसाच्या सरी
तुज विन सुक्या सखे
त्या पौर्णिमेचि चांद रात्र
तुज विन खिन्न सखे
***

**अमोल अलगुडे**
**निलंगा**
**ई पत्ता : aalgude777@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९७५२३२६०२**

चारोळ्या

## चारोळ्या

प्रीतीत प्रियाच्या मन,
प्रीतरंगात भिजतं.
ओढ़ त्याची लावणारं,
हे वयच असच असतं.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## दिस शाळेचा पहिला

( शाळेच्या पहिल्या दिवशी लेकरांच्या मनाची बरीच घालमेल होते.आता ते दिवस आठवले की अशी चारोळी जन्म घेते. )

दिस शाळेचा पहिला
मि जाऊन पाहीला
आइचि आठवण
गुरुजिंचि सात्वन
दिस शाळेचा पहिला
मि जाऊन पाहीला
सरांचि अ आ इ ई
घरची याद येई
आता रोजच कॉलेजचि घाई
पण आठवण शाळेचि येई
***

**अमोल अलगुडे**
**निलंगा**
**ई पत्ता : aalgude777@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९७५२३२६०२**

कविता

## सावित्री

सावित्री तु नाही गीळली नुसता पुल
गीळली अनेक मातांचि मूल
अग तुझ्याच मुळ, अग तुझ्याच मुळ
कोमेजली अनेक फूल
मि नाही देणार कुन्या बाबुला दोष
होतिल चौकश्या सूटतिल निर्दोष
***

**अमोल अलगुडे**
**निलंगा**
**ई पत्ता : aalgude777@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९७५२३२६०२**

लेख

## मनोगत

मी एका शेतक-याचा मुलगा. माझे वडिल, आजोबा शेतीच करायचे. मीही शेतकरीच. त्यावेळी मी एस वाय बिए मध्ये शिकत होतो. माझ्या दृष्टीने नेहमी सारखाच तो दिवस होता. कॉलेज करावं, राहीलेल्या वेळेत शेती बघावी. असे दिवस चालले होते. अचानक एक घटना घडली आणि माझे सारे जीवनच बदलुन गेले. शेतामध्ये चारा आणायला गेल्यानंतर बैलगाडी पलटली आणि माझ्या मज्जातंतूला जोराचा धक्का बसला . डॉक्टरांनी याला 'स्पायनल कॉर्ड पॅराप्लेजीया' म्हंटलं. कुणी काही म्हंटलं कुणी काही, पण मला चालता येईना हे एक सत्य होतं.

एक हसतं खेळतं जीवन चारभिंतीत कोंडलं गेलं. एक वर्ष होत आलं तरी मला चालता येत नव्हतं. सर्व उपचार थकले. आयुर्वेदीक, ॲलोपॅथी, होमियोपॅथी या सर्व पॅथी निष्प्रभ झाल्या. माझं शरीर म्हणजे लाकडाची एक निरूपयोगी मोळी बनलं. मला चालता येत नव्हतंच पण उठूनही बसता येत नव्हतं. सर्व क्रिया बेडवरच कराव्या लागायच्या. दिवसरात्र मी कॉटवर पडून असे. मला अजून आठवतंय, आमच्या घराच्या दरवाजातून निळ्या आभाळाचा एक बारकासा तुकडा दिसायचा. ते आभाळ मला साद घालायचं उंच उंच भरारी घेण्यासाठी. माझं मन भरारी घ्यायचं पण शरीर साथ द्यायचं नाही.

अशिच दोन तीन वर्षे गेली. घरचे निराश झाले. ज्या वयात जीवन घडवायचं, आकाशाला गवसनी घालायची त्या वयात हे काय माझ्या वाट्याला आलं. मी अस्वस्थ होऊ लागलो. आत्महत्येचे विचार मनात येऊ लागले. आपण अपघातातच का मेलो नाही, असं वाटू लागलं. त्यातच माझ्या आजारपणामुळे आमची आर्थीक परीस्थीती खुपच ढासळली. शेतीचं उत्पन्न घटलं. पैसा पेरल्याशिवाय शेती पिकत नाही. औषध उपचाराला पैसे नव्हतेच पण दोन वेळ पोटाला मिळायची सुद्धा मारामार उठली. एका अपघाताने आमचं सारं घर उध्वस्त झालं.

माझी प्रकृती तर खुपच खालावली. एका कुशिवरून दुस-या कुशिवर होत मी दिवस ढकलीत असे. झोपून झोपून अंगाला जखमा होऊ लागल्या. आणखी एकेक आजार वाढू लागले. ताप, पित्त, कंबरदुखी, अपचन, बेडसोर, युरीन इन्फेक्शन, पायात मुंग्या येणे असे एकेक आजार वाढू लागले. मी पांढरा फटक पडलो. हळूहळू कुठल्यातरी अंधकारात आपण बुडत चाललोय असं मला वाटू लागलं.

अशा अंधकारमय अवस्थेत मला एकमेव साथ दिली ती पुस्तकांनी. आमचे वडील पुस्तके वाचायचे. ते पट्टीचे वाचक. त्यांच्यामुळेच वाचनाची आवड वाढली. वाचनालयातुन चांगली चांगली पुस्तके आणून मी वाचू लागलो. वाचता वाचता काही चांगली पुस्तके हाती लागली. सावरकरांचे माझी जन्मठेप, आचार्य अत्रेंचं कर्हेचं पाणी, एक होता कारव्हर, हेर्नी शॅरीयरचं पॅपिलॉन, मृत्यूंजय, ययाती, श्रीमानयोगी, कोसला, गोतावळा, माचीवरला बुधा, गावाकडच्या गोष्टी, आनंदी गोपाळ, बनगरवाडी, फकीरा, अशा अनेक पुस्तकांनी मला जगणं शिकवलं. ज्ञानेश्वरी, कथाकल्पतरू, स्वामी विवेकानंद ग्रंथावलीचे सर्व खंड मी वाचून काढले. झपाटल्यासारखा वाचायचा मी सपाटा लावला. मी जिवंत राहण्यासाठी सामर्थ्य या पुस्तकांनीच मला दिलं. या पुस्तकातील विचार मला जगण्याची शक्ती पुरवित होते.

थोडक्यात संकटे जितकी मोठी तितका माणूस मोठा, हे या पुस्तकांनीच मला शिकवलं. श्रीरामाने वनवास भोगला म्हणून तो मोठा! राजा हरिश्चंद्राचे हालहाल झाले म्हणून तो मोठा! ज्ञानेश्वर असो, शिवछत्रपती असो, तुकोबा असो, या सगळ्यांनी खूप संकटे झेलली म्हणून ते मोठे झाले. मग आपण का या आजारपणरूपी संकटाला भ्यावं? त्याचवेळी मी निश्चय केला. आता भ्यायचं नाही, घाबरायचं नाही. संकटाशी दोन हात करायचे. जिद्दीनं जिवातजीव असेपर्यंत झुंजायचं. जन्माला आलेला प्रत्येक माणूस कधीनाकधी मरतो पण मरताना त्याने किती झुंज दिली हे महत्वाचे आहे.

माझ्या आजारपणाचं हे सहावं वर्ष होतं. मी वॉकर घेऊन हळूहळू चालू लागलो. पण फक्त चालणं हे माझं ध्येय नव्हतं. मला वेडं व्हायचं होतं शब्दासाठी! हे शब्द मला साद घालायचे. माझ्या मनात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली. मग मी लिहायचं ठरवलं.

पण लिहणं मला जितकं सोपं वाटत होतं तितकं नव्हतं. ज्यावेळी मी लिहायला हाती घेतलं त्यावेळी मला धड बसताही येत नव्हतं. आजवरचं सगळं लेखन मी एका कुशीवर झोपूनच केलं आहे. प्रकृतीच्या अनंत अडचणी सहन करीत मी लिहीलं. त्यातुन मला आनंदच मिळत गेला. दु:खरूपी काट्याचीच फुले झाली म्हणा हवं तर.

माझ्या 'सांगावा' या कथेसाठी 'अक्षरवैदर्भी उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार' मिळाला, हे माझं पहीलं यश. त्यानंतर माझा 'सांगावा' हा कथासंग्रह अजब पब्लिकेशन कोल्हापूर यांनी प्रकाशीत केला. त्याला महाराष्ट्र साहित्य परिषद इस्लामपूर यांचा राजारामबापू उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार मिळाला. या शिवाय अंजनकुमार, आदर्श कथालेखक, जिद्द पुरस्कार, साहित्यप्रेमी उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार, जनस्वास्थ्य इ. लहान मोठे पुरस्कार मिळाले. माझ्या 'येरे येरे पैसा' या पुस्तकाचं राजसाहेब ठाकरे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. त्याची आता दुसरी आवृत्ती संपली आहे.

या सगळ्या संकटामध्ये माझी आई खंबिरपणे माझ्या पाठीशी उभी राहीली. मोठ्या भावाने मोलाची साथ दिली.वडील,वहिनी, पुतणी प्रांजली या घरच्या सर्वांनी लहान बाळाप्रमाणे माझी सेवा, सुश्रुशा केली. या सगळ्यामधे माझा गाव आणि माझा मित्र परिवार यांची सोबत मिळाली.

सोळा वर्षापुर्वी मी माझे पाय गमावले. एकोणीस वर्षे मी माझ्या पायावर चाललोय. पाय असणे आणि पाय नसने यामधे खूप अंतर आहे. पायात संवेदना नसने हे फार मोठं दु:ख आहे. नशिबानं मी ग्रामिण भागात जन्मलो. रानातल्या पायवाटा, हिरवंगार कुरण, खट्ट माळरान, काळ्या मातीतला गुडघाभर चिखल तुडवित मी चाललोय.विहीरीत ओढ्यात केलेली अंघोळ,पोहताना माशांनी पायाला केलेल्या गुदगुल्या,मुरमाड टेकडीवर चढताना रक्त येईपर्यंत खरचटलेली खरट,गर्जत आलेला गारांचा उन्हाळी पाऊस,पावसा-पाण्याने पायाला पडलेल्या सुरकुत्या, तोंडावरल्या वा-यात पायात जीव एकवटून कुथून मारलेली

सायकल, तापलेल्या डांबरीचे तळव्याला बसलेले चटके, बोटभर देवबाभळीचा टाचेत घुसलेला काटा, या सगळ्यांच्या संवेदना माझ्या मनात अजून ताज्या आहेत. जरी माझ्या दोन्ही पायांच्या संवेदना कायमच्या गेल्या असल्या तरी !

एका शेतकरी कुटूंबात जन्मलेला, वाढलेला मी शेतकरी, कष्टक-यांचे प्रश्न आपल्या साहित्यातून मांडतोय याचा मला अभिमान आहे. अजून खूप लिहायचं आहे. माझा 'अवकाळी विळखा' हा कथासंग्रह गवळी प्रकाशनाकडून आज प्रकाशित होतोय. वाचकांनी, साहित्यिक मित्रांनी मला भरभरून प्रेम दिलं. आजही या संकल्पासाठी तुम्ही आशिर्वाद द्याल ही आशा...

***

**सचिन वसंत पाटील**
**विजय भारत चौक, कर्नाळ**
**ता मिरज जि सांगली**
**मोबाईल क्रमांक : ८२७५३७७०४९**

चारोळ्या

## चारोळ्या

बरसणार्या रिमझीम धुनेत,
वेडं मन तल्लीन झालं.
सुख-स्वप्नांच्या सोबतीने,
मन आठवणीत विरुनी गेलं.
***

जीवनधारेत वाहताना,
कित्येक खाच,खळगे येतात.
खोलवर जखमा हृदयावरी देवूनी,
आयुष्याची सत्वपरीक्षा घेतात.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

लेख

## बाप

दिवस शनिवारचा, सकाळची शाळा. पहिले काही तास संपल्यानंतर शालेय पोषण आहार देण्याची वेळ. मीही थोडा नाश्ता करून नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे शालेय आवरातील विद्यार्थ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवत व्हरांड्यात उभा होतो. मुलेही आपले जेवण आटोपून स्वच्छंदपणे गप्पा मारणे, कोणी खेळ खेळणे तर कोणी नुसतेच उभे राहलेली. हे सर्व पाहत मी उभा होतो. गेल्या चार-पाच दिवसांत उसंत न घेतलेल्या पावसाने क्षणभर विश्रांती घेतली असता मैदानावर साचलेल्या पाण्यात उड्या मारताना काहीजण मला दिसत होते. पण त्यांच्या या बालआनंदात व्यत्यय आणण्यास माझे मन तयार नव्हते. इतक्यात एक मुलगा माझ्याजवळ आला नि त्यांच्या कृत्याची तक्रार नोंदवू लागला. आता याच्याही मनाचे समाधान करणे मला भाग होते. मग शिस्तीच्या नावाखाली मी त्या मुलांना उगाच रागवण्याचा अविर्भाव आणून तेथून हटकले. याक्षणी तक्रारदाराची आनंदी मुद्रा माझ्या नजरेआड झाली नाही. हे सर्व न्याहाळताना, अनुभवताना तिसरीच्या वर्गातील एक विद्यार्थी माझ्याजवळ आला नि मला नुसतीच हाक देऊन गेला. त्याचा हा हाक मारण्याचा एपिसोड टि.व्ही. वरील मालिकांप्रमाणे रिपिट होत राहिला. त्याच्या प्रत्येक हाकेला मी ओ देत होतो. शेवटी न राहवून मी त्याला थोडा वैतागुनच विचारले, अरे!काय काम आहे? का उगाच सारखा बोलावत आहेस? मी काय कुठे पळून चाललो आहे की काय? एका दमात एवढं सारे बोलून झाल्यावर मला वाटले आता हा घाबरून वर्गात जाईल. पण या महाशयांनी माघार घेतलीच नाही. यापुढे तो मला म्हणाला, मग शाळा सुटल्यावर जातासा की घरी. त्याच्या या बोलण्याचा मला राग आला पण त्याला आणखी बोलते करण्याच्या हेतूने मी राग मागे सारून त्याला विचारले, मग इथेच राहू का? नि मग मी जेवायचे कोठे? यावर तो उत्तरला राहा की इथे नि जेवा आमच्या घरी. या त्याच्या बालबुद्धिचे मला आता जरा जास्तच कुतूहल वाटायला लागले नि त्याला आणखी बोलते करायचे ठरवून मी त्याला म्हणालो, अरे! माझ्या घरचे माझी वाट पाहतील की! त्यांच्याकडे नको का जायला मला? या माझ्या प्रश्नावरही त्याने उपाय शोधून

ठेवलेला होताच. जावा की शनिवारी आणि रविवारी परत या सोमवारी.

आता मात्र मला त्याच्या जाणतेपणाची जाणीव व्हायला लागली होती. सध्याची पिढी कशात मागे राहू शकत नाही याचा प्रत्यय मला येत होता. मी त्याच्याकडून क्लीन बोल्ड होण्याच्याच मार्गावर होतो. तरीही मी माझी विकेट सहजासहजी गमवायची नाही ठरवलेलं. याच निग्रहानं मी त्याला विचारले, तुला चालतं का तुझे बाबा तुझ्याजवळ नसलेले? करमत का तुला त्यांच्याशिवाय? आता आपण याला षटकार खेचला आहे ही माझी अहंमिक भावना. पण त्याने यापुढे टाकलेल्या यॉर्कर चेंडूने मात्र माझ्यातील गुरूजी नि बाप दोघांची विकेट काढली.

तो तिसरीच्या वयोगटातील विद्यार्थी. जेमतेम नऊ वर्षे वयाचा. या वयात मानसशास्त्रीय दृष्टिने विचार करता मुलांना भावनिक, शारीरिक सुरक्षितता महत्वाची असते. ही सुरक्षितता त्याला सर्वप्रथम त्याच्या आई-वडील नि कुटुंबातील इतर सदस्यांकडून असते. त्याचे त्याच्या कुटुंबातील प्रत्येक घटकाशी अतूट नाते असते. असे नाते की ज्याच्या आधारावर तो आपल्या आयुष्याची शिडी बळकट करत असतो. नि या भक्कम पाय-यांवर स्वार होत तो आयुष्यातील अनेक आव्हाने पेलत यशशिखर गाठतो. हा सर्व तर्क या विद्यार्थ्याच्या उत्तराने पूर्णत: निष्क्रिय केला असे मला वाटते. तो विद्यार्थी म्हणाला, करमतय की. पप्पा नसले म्हणून काय झाले. मम्मी आहे की घरी.

मी क्षणभर त्याच्याकडे पाहतच राहीलो नि शेवटी माझा झालेला पराजय मला आवडेना म्हणून मग मी त्याच्यावर चिडून त्याला वर्गात जाण्यास सांगितले. मुलगा वर्गात निघून गेल्यावर माझे पुढे कशातच मन लागेना. पप्पा नसले म्हणून काय झाले. मम्मी आहे की घरी. त्याच्या या वाक्याने माझ्यातील बापपणाला पुरते विचारमग्न केले होते. याच नव्हे तर बालवयातील नि युवावस्थेतील मुलांच्या मनात 'बाप' कसा असेल?त्यांच्या जीवनात बापाचे स्थान काय असावे? आई इतकाच जिव्हाळा, ओढ, माया बापाबद्दल मुलाच्या मनात असते का? या मुलाने असे का म्हटले असावे? बाप यांत कुठे नि का कमी पडतो?या प्रश्नांचे विचारचक्रच माझ्या मनात घुमू लागले.

प्रत्येक मुलाच्या जीवनात त्याच्या आईचे अनन्यसाधारण असेच महत्त्व आहे. 'आई माझा गुरू, आई कल्पतरू, सौख्याचा सागरु, आई माझी' या श्लोकातून आईचे जीवनातील स्थान अधोरेखीत होते. पण आई प्रमाणेच मुलाच्या जीवनप्रवासात बापदेखील तितकाच महत्त्वपूर्ण असतो.पण या मुलाच्या या वक्तव्याने मात्र बापाचे सध्याच्या मुलांच्या मनातील स्थान काय असावे हे विचारधीन झाले. बाप हा केवळ भौतिक सुखसोयी करून देणारा, कुटुंबाच्या गरजा भागवणारा घटक असेच का त्याचे नाते असते. केवळ बापच कमविता असेल तर त्या घरातील मुलांचे ऋणानुबंध आईशी जसे जुळलेले असतात तसे ते बापाशी जुळत नसावेत का? कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वाधिक वेळ कुटुंबातून बाहेर राहिल्याने व त्यात भर म्हणून मुलांचे संगोपन या संकल्पनेत डोकावलेला पुरषी अहंकार या कारणांनी या बापाचे मुलाशी इतके घट्ट नाते तयार होत नसावे जितके मुलाचे त्याच्या नित्य सहवासात असलेल्या त्याच्या आईशी असते. क्षणभर डॉ. सलील कुलकर्णी यांनी गायलेले 'कोमेजून निजलेली एक परीराणी.... या गीताच्या ओळी कानावर गुंजन करु लागल्या नि मन घरातील माझ्या मुलांकडे धाव घेउ लागले.पण शाळा सुटायला अजून तासभर वेळ होता. **'Emotions are not great than our duty'** या सुवचनाचीही आठवण याक्षणी मनात होती. शेवटी मी माझी कर्तव्यपुर्तता करून शाळा सुटल्यावर घरी मार्गस्थ झालो. घरी पोहचल्यावर आजच्या उर्वरित दिवसातील बहुतेक वेळ मी माझ्या ऊर्जास्रोत असणा-या मुलांच्यासोबत व्यतीत केला. तसे मी नेहमीच दिवसातील अधिक वेळ माझ्या दोन्ही मुलांच्या सोबत घालवतो. आई इतका किंबहुना थोडा जास्तच माझा सहवास माझ्या या दोन्ही बालवयातील मुलांना हवा असतो.

जीवनाच्या वाटेवर मार्गक्रमण करताना आजच्या या धावपळीच्या युगातही आपल्या मुलांचे पालकत्व आईच्याच ममतेने बापाने जोपासावे असे मला मनोमन वाटते. मुलांना त्यांचा बाप आई इतकाच हवाहवासा वाटावा यासाठी प्रत्येक बापाने आपल्या मनात माऊलीची स्थापना करायला काय

हरकत आहे. असे घडले तर भविष्यात 'आई -बाबा माझे गुरू,आई-बाबा कल्पतरु, सौख्याचा सागरू आई- बाबा माझे' असाही श्लोक मुलांच्या ओठी येईल ना!

यापुढे जाऊन ज्या घरात भौतिक सुखप्राप्ती करिता धावणा-या बापाच्या जोडीला मुलाची आईदेखील घराबाहेर पडून धावत आहे त्या घरातील मुलाचे मन कोणाला शोधत असेल हा माझ्या मनाला पडलेला प्रश्न अनुत्तरितच राहतोय.

***

**सुवर्णविलास**

**ई पत्ता : ९०४९२११७८५**

**कविता**

## व्यथा

ईतभर देहाचा हा
बाई मांडला पसारा...|
सण होळीचा नशिबीत
नाही दिवाळी दसरा...||

भर रस्त्यात नर
बाई ठेवत्यात डोळा...|
नजर चुकवुनी झाला
जीव माझाच हो गोळा...||

फाटक्या या कापडात
मी कशी लाज झाकू...|
जुलमाच्या या बेडीत
मला दिसत्यात डाकू...||

***

**शाहीर प्रमोद जगताप**

**रा.गोखळी, ता.फलटण, जि.सातारा**

**ई पत्ता : psjagtap55@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ८५५४८५७२५२**

**कविता**

## तिखट मीठ चोळून गेले

ढवळलेल्या दुनियेचे रंग
हळूहळू मनाला कळून गेले...
वेदनांच्या पाशवी बाजारात
उमलणारे कोवळे मन जळून गेले...

असह्य वेदनांच्या ओझ्यांनी
नकळत आज सारे छळून गेले...
निषेधाचे काढून महामोर्चे जगी
लढण्याआधीच सारे पळून गेले...

कुकर्माची पाहुनी रोज नवी भूते
माणूसपण इभ्रतिने मळून गेले...
पुरूषार्थाच्या बाता करता करता
मी पणाचे तळे डोळ्यादेखत गळून गेले

जातिपातीच्या भांडणात इथे
स्वार्थी नेते आपलं दळण दळून गेले
सरळमार्गी चालणारे देखील
षंढांनमुळे वेडे वाकडे वळून गेले

पीडीत मनास आमच्या देऊन भेटी
जखमांवर तिखट मीठ चोळून गेले
सरते शेवटी जाता जाता इथं
जातीभेदाचे गजरे वेणीत माळून गेला

***

**शाहीर प्रमोद जगताप**

**रा.गोखळी, ता.फलटण, जि.सातारा**

**ई पत्ता : psjagtap55@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ८५५४८५७२५२**

कविता

# जीवनाचा थाट

रात्रीचा दिवस होतो ,
संपेना काम . .
नेहमी चांगले देवून जाते,
या दिसा ची साथ . .
हेच होईल कर्म अन्
हीच होईल वाट . .
शेवटीच्या वळणावर
क्षण होईल भेट . .
एक सांज सरून गेली,
मनात ठसली अशी . .
डोळा पाणी घेवून निजे,
आठवां ची उशी . .
जे मिळे सूख त्यात,
लपे जीवनाचे "सार " . .
सुटले वळण जगणे शिकवे,
सारे गोड करी "सार " . .
हसणे होई जगासाठी
मन दुःखा चा भाव . .
ही दुःखे अस्तित्व देई,
मनालाच ठाव . .
पाय जे चालत जाती,
खाच- खडकाची वाट. .
भीती संपून संकटाची,
चकाके जीवनाचा थाट . . ! !
***

**सौ. अस्मिता चव्हाण**
**कोल्हापूर**
**मोबाईल क्रमांक : ८०८७१३६४५२**

कविता

# पिलू

( पिलू शाळेतून घरी आली, तिला विचारले - बाईनी काय शिकवले ? म्हणाली - ते पप्पाना सांगणार,तुला नाही ! का म्हणून विचारले तर म्हणली - पप्पाना बाई शाळेत बसून देत नाहीत , बाहेर जाऊन बसा म्हणतात ! मग त्याना कोण शिकवणार ? त्यावरील कविता )

इकडचा पाय ,
तिकडंचा बूट
दोरीत अडके
शाळेचा सूट . .

गडबड गोंधळ ,
आवरायची धडपड !
शाळेच येत
पप्पांना टेंशन . . !

दरात जाऊन
मरतात हाक !
येऊन पहतात
फुगलेल नाक . .

मग म्हणतात ,
बॅग उचलून . .
मीच जातो
एकटा निघून !

आता यांना
कोण सांगणार ? ?
मोठ्याना नाही
शाळेत घेणार !

मीच बापडी
हसत म्हणते . .

शाळेत जाते
खूप शिकते !

सोडा काळजी
शिकवीन सार . .
शाळेत मलाच,
गेलेलं बर ! ! !
***

**सौ. अस्मिता चव्हाण**
**कोल्हापूर**
**मोबाईल क्रमांक : ८०८७१३६४५२**

**चारोळ्या**

## चारोळ्या

तो एक गोल . .
**whtsapp dp** चा गोल
कधी उजवी कडे - कधी डावीकडे  कधी मधोमध . . .
असते त्याच्या फोटोची पोज . .  तौ एक गोल . .
***

साऱ्या कुंडल्या काढल्या
पण बाजूला गुन्हा अन् दारू . .
कळतंय- जातोय जीव निष्पाप ,
 तरी वळताना येतय रडू . . ! !
***

जरी दूर किनारा
लाटांना त्याची आस का . .
ये अशी तोडून सारी बंधने
सखे मंद झाल्या तारका . . !
***

**सौ. अस्मिता चव्हाण**
**कोल्हापूर**
**मोबाईल क्रमांक : ८०८७१३६४५२**

**कविता**

## जीवन

माणसाच्या जीवनात,
एकदाच असतो जन्म..
एकदाच असतं मरण...
नात्यांची असते चढण..
अन् काळाची उतरण....
जीवनाशी झुंज,
एकदाच असते द्यायची..
सुख दुःखाच्या परडीतून..
सुखं असतात वेचायची..
जीवनाच्या प्रवासात,
होतात अनेक गाठीभेटी..
आपण मात्र जपतो..
मनात रूजलेली नाती...
एकदाच असते,
जवळीक नात्यांची..
एकाच माळेत गुंफतात
मनं साऱ्यांची..
अनेक ऋणानुबंधांना,
फुटतात जेव्हा अंकुर..
ताला सूरांची जमता गट्टी ,
सप्तसूरही होतात मधूर......
रेश्माचे बंध,
बांधून घेतात अनेक पाश
पाशांच्या दुनियेतून..
जगत असतात अनेक श्वास..
जीवनाचा जाणून खरा अर्थ,
जन्म करायचा असतो..
येथे सार्थ...
बालपणीचा काळ सुखाचा,
मधाचे अर्ध्य लेवून..
मोती वाढे क्षणाचा..
जीवनातील हिरवळ म्हणजे,
काळ यौवनाचा....

स्वप्नांच्या आकाशात..
मुक्तपणे विहरण्याचा..
यौवनाच्या धुंदीत,
भान नसते विश्वाचे..
मनाच्या उन्मत्त लहरींना..
भरते असते उत्साहाचे..
वृध्दापकाळ येई जेव्हा,
जीवनाचे वर्म कळू लागे तेव्हा..
आठवणी करू लागती पाठपुरावा...
सहन न होई नात्यातला दुरावा...
जीवन हसून म्हणू लागते
अवघा जन्म गेला आता,
मरणाच्या प्रतिक्षेमधूनी
आनंदपुष्पे उधळावी जाता जाता...
नाजूक भावबंधांनी ,
निर्माण होते मायेचे विश्व..
या मायाजाला पुढे,
जीवनच वाटू लागते फसवं...
***

**सौ. कस्तुरी देवरुखकर**
**मुंबई**
**ई पत्ता : kasturikdevrukhkar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७५७२३०६४७**

## कविता
## जत्रा

गावच्या जत्रेची त-हाच न्यारी..
उत्साहाचं वारं वाहतं भारी...
सणासुदीची लगबग दिसे सारी..
चमचमणारी गोजीरी दुनिया प्यारी..
गावा गावात चुरस लागते खरी..
मंदीरात चालतो गजर हरी हरी...
मानपानाचे नाट्य रंगते क्षणभरी..
आनंद चित्र विरसते जनांच्या उरी...
अहो म्हणतात ,
गावची जत्रा आणि भानगडी सत्रा..
असे गोंधळ असा जरी,
घेऊन आनंद दोन घडीचा..
खुशाल आहे गावकरी...
***

**सौ. कस्तुरी देवरुखकर**
**मुंबई**
**ई पत्ता : kasturikdevrukhkar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७५७२३०६४७**

## गझल
## दान

काळ हा जाळ हा
पेटला - माळ हा।

हरवला घास हा
जीवना - फास हा।

तापले रण पहा
सावली - भास हा।

मोकळा माठ हा
पाखरा - शाप हा।

शेत हे जीव हा
राबतो - बाप हा।

पावसा ऐक हा
दान दे - आर्त हा॥
***

**महादेव बी. बुरुटे**
**६५०, जे. मार्ग, शेगांव**
**ता. जत, जि. सांगली - 416 404**
**ई पत्ता : burutemahadev@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६५३७४८०५**

**कविता**

## पणती

त्या इवल्याशा पणतीच आयुष्य
मला कधी कळलच नाही
तिचं आयुष्य कळायला
मी तिच्याकडे कधी आपलं
म्हणुन पाहीलंच नाही
इतरांच्या सुखासाठी ती
कित्येक रात्री जागली
स्वत: अंधारात राहून
इतरांना प्रकाशाच सुख देत आली
गरजे पुरता वापरून तिला
अडगळीच्या खोलीत ठेवली
अंधारा शिवाय कधी तिची
आठवणही मज आली नाही
देऊ तेवढ आयुष्य ती
अगदी सुखने जगत आली
कधी कधी वाऱ्याबरोबर
हळुवार डोलत राही
कधी रडली नाही
कधी रूसली नाही
तिला वाटणारी अंधाराची भिती
तिने कधी बोलूनही दाखवली नाही
थरथरत्या अंगाने
ती रात्रभर जगायची
बाकी उरलेले आयुष्य तिचं
मी फुंकर मारून विझवायची
तिचं आयुष्य हे कधी
पुर्णत्वाला गेलचं नाही
पुर्णत्वाला जायला ती
कधी स्व:त साठी
जगलीच नाही..
***

**सुजित कदम**
**मोबाईल क्रमांक : ७२७६२८२६२६**

**कविता**

## बाप

बाप जगल्याची व्यथा.
अनुभवाची गाथा.
बाप एक कैवारी,
संस्कार ज्ञानेश्वरी.
बाप एक धर्म,
बाप एक कर्म.
बाप झाल्यावर,
कळे सारे वर्म.
बाप एक हुंदका,
पापणी आड साचलेला.
बाप एक आनंद,
ओठभरून हासलेला.
बाप आदर्श लोकशाही,
एकमत हुकूमशाही.
बाप खरा साम्यवाद,
घराची भांडवलशाही.
बाप एक काळीज,
लेकीसाठी तुटलेल.
बाप एक शौर्य,
मुलांना भेटलेल.
बाप एक रास,
पोटगी अयुष्याची.
बाप एक भूक,
पोट मारल्याची.
बाप खरा ज्योतिषी,
भविष्य घडविणारा.
बाप एक रस्ता,
पुढे पुढे नेणारा.
बाप एक कष्ट,
जबाबदारीने श्रेष्ठ.
सुख दु:खाचा,
पहारेकरी स्वस्त.
बाप एक छत,
हेळसांड झाकणारे.

बाप एक फूल,
सुगंधाने दरवळणारे.
बाप एक जग,
लेकरांच्या हिताच.
बाप एक राज ,
स्वराज्य कुटुंबाच.
बाप एक जाणीव
माणूस आसल्याची
बाप एक कीव
साद्याच गुन्ह्याची
म्हणून..
ज्याचा बाप गेला
तो अर्धाच जगला.
जगाच्या गर्दीत
वनवासी राहिला.
वनवासी राहिला.
***

**अशोक क. गायकवाड**
**पारळकर, वैजापूर, औरंगाबाद**
**मोबाईल क्रमांक : ७५८८८१२३७६**

चारोळ्या

## चारोळ्या

मेघनीळ बरसती प्रीतपाखरा,
रूपवान जणू तू स्वर्ग-अप्सरा.
घायाळ मन झाले, तूच जीवनधारा,
नयनात व्यापले,चित्त ग स्वरा.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## हे स्त्री तुझा महिमा

जीवनाचा चढ उतार
भासे तुझ्या घनदाट
वलयदार बटी .........

अंधारात वाट दावी
तुझ्या मृग नयनातली
सोन गारोळी गोटी ......

नासीकातला प्राणवायू
बहरून उतावीळ होई
रसाळ मायेसाठी ......

तुझ्या अधरपंखा वरले
शब्द आधार देई
जीवन जगण्यासाठी ......

तव अमृत पान्ह्यातून
पाझरे मायेचे वरदान
मानवतेच्या साठी......

मधूकणास करण्या अंकूर
माय होऊनी जोपासते
अर्भका उदरी पोटी ......

हे स्त्री तव मंगल पदी
स्नेहाने काठोकाठ भरलेले
नमन कोटी कोटी ......
***

**राजेंन्द्र जोगदंडे मामा**
**औरंगाबाद**
**मोबाईल क्रमांक : ९१४५५०५७९५**

कथा

# वैदेहीची गोष्ट

वैदेही माझी जिवाभावाची शाळेपासूनची मैत्रीण. मोठ्या हौसेन तिने मुलीच्या लग्नाची जय्यत तयारी केली होती. मी अगदी आग्रहानी तिला तिच्या स्वतः करता लग्नात प्रत्येक प्रसंगासाठी वेगळी साडी आणि त्यावर माचींग अक्सेसरीज घ्ययला लावल्या होत्या. ती नाही नाहीच म्हणत होती. हे काय आता नटण्या मुरडण्याच वय आहे का ? आता कुणासाठी नटायच ? लोक काय म्हणतील ? अर्थात मी तीच काही ऐकणार नाही हे ती जाणून होती मी तिला म्हणाले "हे बघ आता कसला ही विचार करू नकोस मला माहिती आहे अगदी शाळेपासून तुला नटायची नीटनेटके राहायची आवड होती. लोक काय कधीही काही न काही बोलतच असतात. अग हौसेला जस मोल नसत तस वय पण नसत. ते काही नाही या लाग्नापुरती मी तुझी ब्यूटीशिअन आहे असे समज आणि मी सांगेन ते आणि तसे सगळे तुला करून घ्याव लागेल". ती तोंडदेखल हो तर म्हणाली पण मला कळत होत कि या गोष्टीला तिची अजून मानसिक तयारी नाहीये. आणि ती इतक्या लवकर होणार पण नव्हती. एका विधवा बाईने चांगले रहावे, दागदागिने घालावेत या गोष्टींना आपल्या समाजात अजूनही मान्यता नाही. गौरी म्हणाली कि आई तू जरा छान नीटनेटके

रहाना, मुळात तू दिसायला छान आहेस पण इतकी साधी का रहातेस ?पण आता माझ्या लग्नात मावशी सांगते तसच करायचं. लग्नात तू छानच दिसली पाहिजेस. तिने आईला आग्रहानी चांगल्या साड्या घ्यायला लावल्या. ती मला सारखा समजवायचा प्रयत्न करत होती "वैजू अग हे काय खूळ काढलं आहेस ? अग मला आता या गोष्टींचा खरच मोह नाही राहिला. लग्न झाल्यापासून गेली पंचवीस वर्ष मी अशीच रहात आले आहे. आता मला असच रहायची सवय झाली आहे." असे म्हणून तिने माझी बोळवण केली होती. खरे तर मला तिची व्यथा काळात होती. कॉलेज मधे टेचात रहाणारी वैदेही लग्नानंतर मानसी झाली आणि नावा बरोबरच स्वतःच मूळ रूप आणि स्वभाव पण विसरली. तिच्या सासरची माणसे खूपच जुन्या विचारांची होती. तिथे तिची खूपच घुसमट होत होती. तिच्या पुढे दोनच पर्याय होते. एक तर सगळ सहन करून संसार करणे नाहीतर सगळे झुगारून देऊन सेपरेट होणे. म्हणजेच स्वाभिमान कि सामाजिक सुरक्षितता. तिने पहिला पर्याय निवडला. आम्ही सगळ्या तिला म्हणत होतो, तू चांगली डॉक्टर आहेस. practice सुरु कर आणि स्वाभिमानानी रहा. पण तिने आई, वडील, धाकट्या दोघी बहिणी यांचा विचार केला आणि नशिबान वाट्याला आलं तस आयुष्य स्वीकारायचं ठरवलं. अगदी पहिल्या रात्री पासून ती इतकी रडली होती कि आता तिच्या डोळ्यातील पाणी आटून गेले होते इतके कि नवरा गेल्यावर तिला रडूच आले नाही. सगळ्यांना वाटले कि ती दुःखानी सुन्न झाली आहे. मला कल्पना होती या सगळ्या गोष्टींची. आपण कधी कल्पना हि केली नसेल इतकी जाचक परिस्थिती तिच्यावर आली होती. जेंव्हा तिच्या सहनशक्तीचा कडेलोट व्हायचा तेंव्हा ती कधी कधी माझ्याकडे येत असे पण कधीही तिने तिचं मन माझ्याकडे मोकळ केला नाही. स्वतःच रडगाण गाण तिला कधीच मान्य नव्हते. ती म्हणायची हा पर्याय मी माझ्या इच्छेन निवडला आहे. तेंव्हा त्यासाठी दुःख का करायचे. तिला कोणाचीही सहानुभूती नको होती.

मुले मोठी होत होती, त्यांच्या समोर तरी वाद आणि भांडणे नकोत म्हणून तिने माहेरी जाणे सुद्धा जवळ जवळ बंद केले होते. पण तिने कधीच कुणाला काहीच सांगितले नाही. सगळ स्वतःच सोसत राहिली. अर्थात कोणत्या हि स्त्री ला यात स्वतःच अपयश आणि अपमान वाटण साहजिकच आहे. आम्ही मैत्रिणी तीच दुःख समजू शकत होतो कारण आपल्याकडे बहुतेक सगळ्यांच्याच वाट्याला थोडा फार तरी त्रास येतोच. मला आठवतंय लग्न ठरल्या ठरल्या तिच्या सासूबाई म्हणाल्या होत्या आजच्या fashion प्रमाणे नवऱ्याला नावानी हाक मारलेली आमच्याकडे चालणार नाही हं. यावर आम्ही मैत्रिणीनी तिला चिडवल पण होत. पण त्या वेळी वाटल जाऊदे हि काय किरकोळ गोष्ट आहे किंवा हे 'म्हणतील'आपण दोघे असताना मला तू नावानी हाक मार मला आवडेल'. असे तिला वाटले पण लग्न नंतर पहिल्याच दिवशी घरी गेल्यावर तिच्या नवऱ्यानी प्रथम काय केले असेल तर तिच्या केसातले सगळे गजरे अक्षरशः ओरबाडून काढले आणि म्हणाले या पुढे केसात फुले घातलेली चालणार

नाहीत. फुलं घालून काय बाजारात बसायचं आहे का ? प्रथम एक मिनिट ते काय म्हणतायत तेच तिला कळले नाही. पण कळले तेंव्हा मेल्याहून मेल्या सारखे झाले. हा अपमान ती कसा कोणाला सांगणार होती ? सगळ्या मुलीं प्रमाणे तिने सुद्धा पहिल्या रात्रीची किती तरी स्वप्न पाहिली होती, सिनेमातून कथा कादंबऱ्यातून वाचलेली वर्णन मनात आठवतच तिने खोलीत प्रवेश केला, पण .... वैदेहीला त्या आठवणी कायमच छळतात त्या तिच्या मनातून कधीच पुसल्या जाणार नाहीत. दुधाचा ग्लास घेऊन खोलीत गेल्या गेल्या या पुढे तिने कस वागायचं याची नियमावलीच तिच्या तोंडावर फेकली गेली. त्यात कितीतरी अपमानास्पद आणि जाचक अटी होत्या त्या नुसार ती फक्त पहिल्या वर्षी सणावारा पुरताच माहेरी जाऊ शकत होती, नंतर माहेर बंद, मित्र मैत्रिणी सगळ बंद, रोज फक्त साड्याच नेसायच्या. असे आणि आणखी किती तरी नियम तिच्या नवऱ्याने तिच्या तोंडावर फेकले. तिच्या नवथर भावनांचा केंव्हाच चक्काचूर झाला होता. झालेल्या अपमानानी आणि अपेक्षा भंगाने ती पूर्ण खचून गेली होती मग जे काही झाले ते काय झाले कसे झाले काही कळलेच नाही. भानावर आली तेंव्हा नवरा तिच्याकडे पाठ करून घोरत होता. आणि ती पुढच आयुष्य या माणसा बरोबर कस काढायचं या कल्पनेनीच रात्र भर तळमळत होती. मन आणि शरीर अपमानाच्या आगीत जळत होते. पुढची २५ वर्ष ती जळत राहिली आणि सगळ सहन करत राहिली. पण चेहेऱ्यावर मात्र कधी काही दिसू दिले नाही. मग ती नवऱ्याच्याच कंपनीत मेडिकल ऑफिसर म्हणून नोकरीला लागली. नोकरीची परवानगी मिळवण्या करता तिला खूप आटापिटा करावा लागला, अगदी हातापाया पडावे लागले अनेक अटी मान्य कराव्या लागल्या. नवरा तिला स्वतः बरोबर घेऊन जायचा आणि परत आणायचा. डॉक्टर असल्याने तिची पोस्ट वरची होती त्यामुळे तिला कधी मिटिंग ला किंवा कधी इमर्जन्सी आली तर थांबावे लागायचे. तेंव्हा 'तो' पण तिच्यासाठी थांबून रहात असे, लोकांना वाटायचं बायकोवर केवढे प्रेम आहे केवढी काळजी आहे या माणसाला बायकोची. पण घरी गेल्यावर सासू सासरे आणि 'तो' मिळून तिच्यावर जे तोंडसुख घ्यायचे कि वाटायचं नोकरी सोडून द्यावी. पण नोकरी हा एकाच विरंगुळा होता तिला म्हणून ती ते सगळे सहन करत होती. कालांतरानी गौरांग चा जन्म झाला. तिला वाटल चला यांना वारस दिला आता तरी माझा त्रास थोडा कमी होईल. हि माणसे थोडी तरी चांगली वागणूक देतील. पण तिच्या नशिबातच सुख नव्हते त्याला तो वारस तरी काय करणार ? आम्ही मुलाला सांभाळणार नाही आणि त्याला पाळणा घरात पण ठेवायचं नाही, नोकरी सोड आणि घरात बैस. असा हुकुम निघाला आणि नोकरी सोडून तिला घरी बसावे लागले. मग गौरी झाली. ती मुलांमध्ये मनापासून रमली होती. पण डिग्री स्वस्थ बसू देत नव्हती. मग घरीच काम सांभाळून प्राक्टिस सुरु केली. तिची प्राक्टिस पण चांगली चालायला लागली होती मी पण तिच्याकडेच जायला लागले तिचे निदान एकदम चांगले होते. पण प्राक्टिस जशी वाढायला लागली तस तिच्यावर वर घाणेरडे आरोप प्रत्यारोप करून, तमाशे करून प्राक्टिस बंद करायला लावली गेली. काय तर म्हणे तुझ्याकडे पुरुष पेशंटच का जास्त येतात ?तू त्यांच्याशी गप्पच जास्त मारतेस, तू आतल्या खोलीत त्यांच्या बरोबर काय थेर करतेस काय माहिती असे घाणेरडे आरोप करून तिला छळायला सुरवात केली. ती हे सगळ निमुटपणे सहन करत होती कारण त्यांना समजावण्यात काही अर्थ नव्हता. शेवटी एक दिवस त्यांनी दवाखान्याला कुलुपच लावले आणि तिची प्राक्टिस बंद झाली. धाकट्या मुलाकडे राहायला जाताना सुद्धा सासू सासऱ्यांनी त्यांच्या मुलाच्या मृत्यूचे खापर तिच्या डोक्यावर फोडले. जाऊदेत झालं गेलं गंगार्पणमस्तू म्हणून आणि एक वाईट स्वप्न म्हणून सगळ विसरायचा प्रयत्न ती करत होती. पण आता यातून बाहेर पडण तिच्या साठी खूप अवघड होत. मुलांच्या मदतीने ती सगळ विसरायचा प्रयत्न करत होती. मुले तिला म्हणत होती "आई तू फक्त मनापासून प्रयत्न कर आम्ही आहोत तुझ्या सोबतीला, मदतीला."

भूतकाळाचा पट वैदेहीच्या डोळ्यांसमोरून सरकत होता, त्यात ती पूर्ण पणे स्वतःला हरवून बसली होती. डोळ्यातून पाण्याच्या धारा वाहत होत्या. गौरी कधी तिच्या जवळ येउन बसली तिला कळलच नाही. हळुवार पणे तिचा हात हातात घेऊन तिने हाक मारली आई...... तशी वैदेही शुद्धीवर आली आणि ती डोळे पुसायला लागली. गौरी ने तिचे हात पकडले आणि म्हणाली "नको पुसुस वाहून जाऊ देत, निचरा होऊ देत सगळ्याचा. आई मला सगळ माहिती आहे, तू

काय किती आणि कसं सोसलं आहेस. वैदेही गौरीकडे डोळे विस्फारून बघतच राहिली. आई तुझं अजून काही वय झालं नाहीये, तू पुन्हा नव्या उमेदिनी उभी रहा. आम्ही आहोत तुझ्या बरोबर. आज गौरी तिची आई झाली होती. आई तू मुळात हुशार आहेस, थोडा प्रयत्न कर, तुला नक्की जमेल. मला खात्री आहे.गौरी तिला समजावत होती. तू पुन्हा तुझी प्रक्टिस सुरु कर. थोड फार समाजकार्य कर त्यातून तुला आनंद मिळेल. जगण्याला एक नवा अर्थ मिळेल. ती आई झालेल्या आपल्या मुलीकडे पाहताच राहिली होती. अरे रडण्याच्या कार्यक्रमाला अजून 4वेळ आहे, वातावरणातला ताण हलका करण्याचा प्रयत्न करत गौरांग आत आला. तशी वैदेही पटकन उठत म्हणाली चला मी कॉफी करते. नाही नाही तू बस मी करतो आज सगळ्यांसाठी मस्त कॉफी. कॉफी चा कप हातात देत हळूच गौरांग म्हणाला आई आज तू खूप फ्रेश दिसते आहेस अशीच फ्रेश रहा. मला आणि गौरीला तू खूप खूप हवी आहेस. वैदेहीच्या डोळ्यातून खळकन पाणी आलं. इतकी वर्षं एक उपेक्षित आयुष्य जगल्यावर इतकं छान काहीतरी आपल्या वाट्याला येईल याची तिला कल्पनाच नव्हती. आयुष्याच सार्थक झाल्या सारखे तिला वाटत होते. दोन्ही मुलांचा हात हातात धरून वैदेही कितीतरी वेळ अशीच बसून राहिली होती . काय बोलाव तिला सुचतच नव्हत. वैदेहीच्या चेहेऱ्यावर एक समाधान पसरल होत. मग मीच सगळ्यांची तंद्री भंग करत म्हणाले चला आता उठा, पुढच्या तयारीला लागुयात. अजून सगळ packing व्हायचं आहे. बाईसाहेबांची रवानगी करायची आहे ना !!! मग काय जोरदार लग्नाची तयारी सुरु झाली आणि हां हां म्हणता तो दिवस आला पण कार्यालयात जायच्या आधी वैदेहीचे पाय अडखळले गौरीच्या लक्षात आलं. गौरी म्हणाली आई काळजी करू नकोस अश्विन आणि त्याच्या घरची माणसे खूप चांगली आणि समंजस आहेत. माझी काळजी करू नकोस. अगदी नि:शंक मनानी चल. मग पूर्ण लग्नात वैदेही अगदी थाटात मिरवत होती. "काय बाई नवरा होता तोपर्यंत कशी अगदी बाळबोध पणे राहायची आणि आता बघा", "विधवेला शोभते का असे मिरवणे" हे आणि असे काही टोमणे अधून मधून कानावर येत होते पण ह्याची आम्हाला कल्पना होतीच त्यामुळे त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करायचे हे आधीच ठरले होते. गौरीच्या सासरची माणसे उच्च शिक्षित आणि उदार मतवादी आहेत त्यामुळे त्यांना या गोष्टी अजिबात खटकल्या नाहीत. अरे वा अगदी निवांत कॉफी पीत बसली आहेस ? अरे ये ये वैजू आज अचानक कशी ? अग इकडून जात होते, सहज डोकवाव म्हणून आले. बर झालं मी तुला फोन करणारच होते. हो ! का ग ? अग आज मी आश्रम शाळेत गेले होते, तिथल्या सगळ्या मुलांची मोफत वैद्यकीय तपासणी केली. मला खूप चांगल वाटतंय. तिचा वाढलेला आत्मविश्वास तिच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसत होता. तिने उठून मला गच्च मिठी मारली .

***

**वैजयंती डांगे**
**ई पत्ता : vaijayanti62@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९२२६२७०९६**

**चारोळ्या**

## चारोळ्या

आपलेपणाची वेदना स्वार्थाने भरली.
मात्या-पित्याला वृद्धाश्रमी नेताना,
म्हणतात, आमचा सांभाळ करून,
तुम्ही तुमची कर्तव्ये पार पाडली.

***

व्याकूळ निरागस जीव,
अन्नासाठी दाहीदिशा फिरतो.
पोटाची खळगी भराया,
आशेत तीळ-तीळ मरतो..

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

# देवाची ही परिक्षा घ्यावी...

कधी कधी वाटते..
देवाची ही परिक्षा घ्यावी...
नापास झाल्यावर त्याला..
मोठी शिक्षा द्यावी..

दप्तराचे ओझे..
त्याच्या पाठीवर द्यावे..
तसाच नेऊन त्याला..
वर्गात शेवटी बसवावे...

गणिताच्या तासाला..
करील आकडे मोड..
विज्ञानाच्या तासाला..
मोडेल त्याची खोड..

मराठीचा धडा लिहून..
दुखेल त्याचा हात..
वाचन करुन करून..
विसरेल इतिहास...

इंग्रजीच्या स्पेलिंग जेव्हा..
फ़ोडेल त्याचे डोके..
भुगोलाच्या तासाला म्हणेल..
पृथ्वीला दोन भोके..

शाळेच्या आवारात..
खेळेल तो खोखो..
तेव्हाच देईन त्याला..
मी पण खो...
***

**प्रशांत प्र. पवार ( मंथन )**
**ई पत्ता : prapawar85@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९२२६२७०९६**

चारोळ्या

# चारोळ्या

'आयुष्य -'
अर्धे आयुष्य व्हाटसपात
अर्धे आयुष्य फेसबुकात -
उरलेच काय कुठे आता
जगण्यासाठी आयुष्यात ..
***

'आठवणी -'
असता दूरच्या प्रवासात मी
चमचमली नभी एक चांदणी -
बस्स ! क्षण एकच पुरेसा तो
दाटून आल्या तुझ्या आठवणी ..
***

दे धक्का-
आनंदाने चालत होतो
मी दुःखाच्या रस्त्यावरुनी
सुखाने कसे दुखवले
आज अचानक मला भेटुनी . .
***

'हुजरे -'
बघता फळास झाडावर
जमतो थवा जसा पक्ष्यांचा -
बसता नेता खुर्चीवर
रमतो मेळा तसा चमच्यांचा ..
***

**विजयकुमार देशपांडे**
**बावधन, पुणे**
**ई पत्ता : deshpande.vijaykumar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९०११६६७१२७**

कविता

## नभ आले गहीवरुन...

नभ आले...
आज गहिवरुन..
बरसले निखळ..
तेही भरुन..

थेंब थेंब जणू..
बरसण्यास आतूर..
लागली कसली..
त्याच्याही मनी काहूर..

धग काही..
आता थांबेनात..
अन सरींवर सरी..
वेग रोखेनात..

वीजही कडाडून..
आज बरसतेय..
तीही मन मोकळे..
करुन घेतेय..

उमगतय आता..
कारण मज..
कळवळलेय आज..
त्याचेही मन...

त्यासही कळून..
चुकले सारे..
अन भिजले आता..
टक लावणारे डोळे..

संपली तपश्चर्या..
आता बळीराजाची..
अन बहरत चालली..
पिके मळ्याची..

पक्षीही बेधुंद.
नाचुन गाई..
त्यात झाडाची पालवीही..
हसून वर येई..

पाहून सारे..
आनंदी चेहरे..
नभाचेही भरले..
आज डोळे..
***

**अंकिता साळवी**
**संगहित : प्रशांत पवार**
**ई पत्ता : prapawar85@gmail.com**

चारोळ्या

## चारोळ्या

गर्दीतल्या मनाला एकाकीपण आले,
जीवघेण्या स्पर्धेत, जीवनच विसरुनी गेले.
स्वत:हाच्या कामात व्यस्त जीवनी,
आपलेपणाची जाणीव करून देणारेही दिवस गेले.
***

हृदयी वसंत फुलला,
मनी प्रीत-वेल बहरला.
चांदण्याच्या सोनेरी रात्री,
साजन तो मनी भरला.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## बाई आणि कविता

कोणतीही बाई मला आता कवितेसारखीच वाटते
म्हणजे असं की
अभिव्यक्तिच्या एक एक पायऱ्या चढत
आशयाच्या भोजाला भिडणारी.
बाई चक्क वाचता येते
अनुभवता येते खालून वरून, आतून बाहेरून
दुर्बोध वाटत असली तरी
असते साधी सोपी सुटसुटीत
आपल्याला फक्त तिच्यापरीने
अर्थ लावता यायला हवा तिच्या बाईपणाचा.
बाईच्या अर्थाचे पदर उलगडताना
आपल्यालाच व्हावे लागते उघडे नागडे
अन्यथा, वेगवेगळे अर्थ निघून
आपण भटकत राहून देहाच्या वर्तुळात.

बाई समजून घेण्याची कुठून करायची सुरुवात?
शेवटापासून की सुरवातीच्याही आधीपासून ?
काळजापासून की चेहऱ्यापासून?
बाई स्वयंपाक करताना असते का गद्य
अन् बिछान्यात पद्य ?
की एकच असते बाई की असते तिचे प्रतिबिंब?

बाईच्या एका शेरात असते आख्खी कविता
फक्त आपला रदीफ जुळायला हवा
मतल्यासारखी एखादी बाई चमकून जाते
अन् आयुष्यभर तुमच्यात येरझरा घालते गझलेसारखी.

बाईला शीर्षक दिलं कुंकवाचं
की तिचं सार्थक होतं कवितापण
प्रतिमांचं ओझं वाहून थकलेली बाई
आयुष्याला जोडून घेण्यासाठी पहात असते वाट
नि आणि अन् या शब्दांची.
मात्र, विद्रोही बाईचं भावगीत करू पाहणारे आपण
तिला भटकू देत नाही मुक्तछंदात स्वच्छंदपणे
तिला चालीत बसवून नाचवतो धर्मसभेत.

जसं जसं आपण समजून घेऊ लागतो बाईला
आपल्या मनात मरून पडलेलं तिचं पुरातन चित्र
हळूहळू हलू लागतं.
मग बाई रहात नाही आपल्यासाठी कुतूहलाचा विषय.

संपूर्ण बाई समजून घेण्यासाठी लिहावी लागते कविता ......
***

**भगवान निळे**
**23/ 32 विजयनगरी एनेक्स ,**
**घोडबंदर रोड ,**
**वाघबीळ नाका ,**
**ठाणे (प): 400615**
**ई पत्ता : bhagwannilejii@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : 9792146880**

चारोळ्या

## चारोळ्या

शब्दांचे जग आमुचे,
शब्दची जीवन.
क्षितीजापार स्वप्नवत,
भरारी घेते मन.
***

स्वप्नांचा फुलोरा मनी सजला,
प्रीतीत हृदय किनारा भिजला.
साता-जन्माच्या बंधनात सख्या,
हे हृदय अर्पिले तुजला.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## "कशी आहेस?"

आज त्याचा मेसेज आला "कशी आहेस?"
काय उत्तर देऊ या प्रश्नाच
सगळ काही ठीक चाललय माझं
तुला विसरण्याचा मनापासून प्रयन्त करते
फक्त तो सफल होत नाहीये अजून
बाकि सगळ ठीक चाललय माझं
तुझ्यापसुंन दूर जाण्यासाठी
मी वचन , गायन , लेखन असं बरच काही करते
पण नवल वाटत मला यातून तू पुन्हा नव्याने भेटतोस
कधी कधी वाटत पुन्हा नव्याने प्रेमात पड़ाव
पुन्हा नव्याने प्रेमात पड़ते मी
फक्त तो तूच असतोस
बाकि सगळ ठीक चाललय माझं
कधी कधी मला माझाच राग येतो
हा एकटेपणा मी स्वत: का ओढून घेतला असेल???
मग मन शांत झाल्यावर कळत
मी एकटी कधी होते
कधी कधी मला प्रश्न पडतो
एवढे प्रयन्त करूनही का विसरत नाहीये मी तुला?
मग उत्तर मिळत की विसरण्यासाठी का
प्रेम केल होत मी

माहिती आहे मला एकतर्फी प्रेमाला काहीच अर्थ नसतो.
पण प्रेम करण न करण थोडीच आपल्या हातात असत
पण खर सांगायच तर प्रेम या शब्दाचा अर्थ मला खोलवर कळायला लागला आहे मला अत्ता
एकसारखी विचारांची तन्द्रिच लागली होती.
दूसरा मेसेज आला तेव्हा तन्द्रितुन बाहेर आले
"एवढं काय टाइप करतेस? तुझ्यावर नीबंध ?? "
मग स्वताशी हसून एका शब्दात उत्तर दिल " मजेत"
***

**प्रतिभा कांबळे**
**मोबाईल क्रमांक : ९७९२१४६८८०**

लेख

## देवाचा कोंबडा...!

देव ही कन्सेप्ट तशी फार व्हास्ट, ज्यांना समजुन घ्यायचीय त्यांनी National grography चॅनल वर शनिवारी रात्री १० वाजता Story of God हा प्रोग्राम बघत जा...!

(त्यात काही मी गुंतवनुक केलेली नाही, फक्त कंसेप्ट क्लियर व्हावी म्हणुन सांगीतल)

तर असो, आजची ही गोड god वर लिहायची वेळ का आली ह्याचा माझ्या भाषेत बद्दयाबोळ पुढे लिहीतोय, तो वन्स अगेन ये गॉड की कहानी बि.एस.एफ के जुबानी, तर झाल अस, मि बसलो होतो एका मैत्रीणीच्या घरात, भर दुपारी चहा पाजला पोरीन,

आधीच चहा पिऊन डोक तापल होत.... त्यात भर घातली पोरीच्या आईने...! मि आपल "गप गुमान् गाव गप्पा" मारत बसलो होतो, तेवढ्यात मावशींनी आवाज दिला "ओ सर.... परवा दिवशी संध्याकाळी जेवण करायला या घरी....!" मि म्हंटल काय? काही विशेष आहे का?

किचन मधुन आवाज आला -हो, आखाडाचा शेवटचा वार आलाय...! देवाला कोंबडा कापायला लावलाय.....! आता कर्मकांड निघाल्यामुळ मात्र माझी उस्कुकता वाढली अजुनच...!

मावशींच शिक्षण त्या काळातल syba आर्ट मधुन ग्रॅज्युएशनचे दोन वर्ग पास...! म्हणजे उच्चशिक्षीत मावशी...! नवरा बायको दोन्ही नोकरीला....! सदन सुखी कुटूंब...! त्रास फक्त एकच मैत्रीण(मावशीची मुलगी) सुंदर असल्यान पोरा सोरांचा होइल तो त्रास...! घरात एकुलत एक वारसदार पोरग...! निव्वळ बेवड...! ह्याच्या पिन्याचा थोडा फार त्रास....! बाकी सर्व काही सुरळीत...!

मी उस्तुकतेने विचारल, काय ओ मावशी.... हे कोंबड कापायच अस अचानक कस निघाल? काही विशेष कारण

असेल ना?

त्यावर मावशीबाई एकदम जागतीक संकट सॉल करनार अश्या अविर्भावात बोलल्या , "हो, आपल्याला ना खुप प्रॉब्लेम येतात सारखे, काही केल्या ते सुटत नाही, सारख कुनालातरी आजारपण येत....! आपला सोन्या पन ह्या दारुपाई बिघडलाय...! ह्या पोरीच लग्न जमेना...!" म्हणुन मग मी एका बाबांन्ना विचारल तर त्यांनी सांगीतल अस करायला..! आपले देव रुसलेत..!

सगळ काही ऐकुन मग मि म्हंटल, मावशी कोंबडा कोण कापेल? मावशी बोलल्या "एखाद्या दारुड्याकडुन कापुन घेवु.." मग मि लगेच संधीचा फायदा घेत बोललो, "ओ... प्रॉब्लेम्स तुम्हाला येतात ना? मग कोंबडा कापुन देवाचा आत्मा त्या दारुड्याने शांत का करायचा? कोंबडा कापन्याच काम जो करनार क्रेडीट पन त्यालाच जानार की मग...!"

माझ्या ह्या डावात मावशी बरोबर फसल्या...! थोड्या गंभीर व चलबिचलीत होत त्यांनी सावरासावर करत प्रत्युत्तर केल, "ओ सर तस काही नसत... कोंबडा तर आपल्या पैशाचा असनार ना..?" मग मि लगेच पुढचा वार केला, "मावशी.. मावशी... तुमचा देव त्या कोंबडा कापणार्याला बघनार की त्या कोंबड्याचे पैसे देणार्या तुम्हाला बघनार?" "आम्हाला बघनार ना.. " (मावशी गर्वात बोलल्या)

मग मि परत डावपेच टाकला, "ओ मावशी देव जर तुम्ही पैशाने विकत घेतलेला कोंबडा पाहुन जर कापनार्यापेक्षा कापुन घेनार्याकडे पैसा हे मध्यस्थी माध्यम म्हनुन पाहनार असेल तर, त्याला पैसा महत्वाचा आहे की...!" तुम्ही कशाला त्या कोंबड्याचा बळी देता, देवाला ५०० रुपये वाहा की त्यापेक्षा...! म्हणजे काय होइल, देव तुमचा पैसा पाहील डायरेक्ट अन प्रॉब्लेम सॉल...!

या माझ्या उत्तरावर मात्र मावशी चिडल्या...! तुम्ही बाकीच तत्वज्ञान झाडु नका सर...! मि लहान नाही ए...! आणी ग्रॅजुएट आहे मि पन...! मि अशी बरीच बडबड ऐकली त्यांची...!

मि म्हंटल, ओ ते बाकी जाउद्या.... कोंबडा गावठी हवाय, आर.आर हवा की ब्रॉयलर हवा बोला? गावठीच हवाय ओ...(मावशी) ठिक ए मग, देवाला पन ब्रँडेड माल लागतो बुवा...(मी) बस्स करा ओ, परंपरा आहेत त्या आपल्या... पाळाव्या लागतात सर...(मावशी)

परंपरा? पाळतो का आपन खरच परंपरा? बळी देण ही कसली परंपरा? "एका पाचशे रुपयाच्या कोंबड्या पोटी जर देव तुम्हाला अडचणी निर्माण करुन छळत असेल तर तो देव कसला...! तो तर कोंबडी चोर लबाड म्हणावा..." अन् औ मौसी, देवाला काय ५०० ची कोंबडी स्वतः न घेन्याईतकी गरीबी आलीय काय तुमच्या? कापणार कापुन जाणार, अन देवापुढ मुंडक व पिसट टाकुन बाकी घरी आननार...! मग देवाला जर मुंडकच लागत असेल ना, तर तुम्ही एक काम करा की 'खाटकाकड जावा, अन चार पाच मुंडके रेडीमेड १०-१५ रुपयात देइल तो... ते घेया अन् मग देवाला वाहा की...!

माझ्या ह्या रागातल्या बोलन्यान मावशी गप्प झाल्या, शिकल्या सवरल्या डोक्यात जरा प्रकाश पडल्यासारख वाटल...!

त्यांची चलबिचल अन पडलेला चेहरा मला काही पाहवेना...! मग मि परत माझ तोंड चालु केल,

म्हंटल, काय ओ..... आता कोंबड कापल की ते घरी आननार? तुम्ही स्वता तर खात नाही, ही सगुना पन खात नाही... काका सुट्टी लागलेली नाही म्हंजे ते पन इथ येत नाही...! तुमचा सुपुत्र व मी आम्ही दोघच खाणार ...!

मावशी हसुन बोलल्या "हो रे माझ्या सासर्या... गप्प बस अता..."

मी परत पुडचा डाव टाकला, "मावशी कोंबडा देवाला कापताय ना? मावशींनी मान हलवताच मी परत बोललो, पन कोंबडा तर आम्ही दोघ खानार मग देव कोण झाल?

आमच कोपर्यात गप्प बसलेल सोन्या बेवड जोरात हसल, माझ्या शेजारी बसल... आम्ही दोघांनी सोबतच पाय पुढे केले व ओरडलो, "माते पाया पडा भगवंताच्या... अन कोंबड तयार करा... आलोच पर्वा....."

यावर चौघे खुप हसलो...! मग परत एक चहा झाला, मावशी शेजारी बसल्या अन बोलल्या " सर तुम्हाला खायला म्हनुन आनुयात, देवाला म्हनुन नको...!" सर फक्त एक काम करा, "सोन्याची दारु सोडवा... मी तुमचे पाय धरेल..." नकळत मावशी रडल्या, मलाही कसतरी अवघडल्यागत वाटल... सोन्यान हातातला कप आपटला, बाहेर गेला...! "ओ मावशी शब्द देतो मी, लवकरात लवकर सोन्याची दारु सोडवतो काळजी करु नका..." इतकच बोलुन मी अर्धा चहा खाली ठेवला, बाहेर सोन्याला आवाज दिला, त्याच्या जवळ बसलो अन् फक्त एक वाक्य बोललो,

"सोन्या इथ ज्याला कोंबड कापायच तो देवही तु, जो रुसलाय तो देवही तु, ज्याला प्रॉब्लेम आहेत तो तुच, तुझी शिकली सवरलेली आई ह्या च्युतीया कर्मकांडी बाबांच्या नादाला लागली याच कारण तु, बाबा घरी येत नाही त्या रागाच कारण तु.... तुझ्या ताईच लग्न मोडतय ना नेहमी त्याचही जरास कारण तु...... इथ तुच हिलन झालाय, अन् आता कुलाच हिरो व्हायचय रे... विचार कर जरा, मी वाट पाहतोय मेसेजची तु दारु सोडली याची...."

सोन्याचेही डोळे पानावले अन हळु आवाजात घाबरत बोलला "सर तुम्हाला माहीतीय मि का पितो ते..."मिही म्हंटल, हो रे माहीती... पन सोड आता..!

"मघाशीच सोडलीय सर, चहा पन अन दारु पन..." (सोन्या इतकच बोलला अन गादीवर पडला)

घरातुन मावशींचे व आमच्या सोनीचे आनंदाश्रु मागे न बघताच जाणवत होते, दोन्ही खांद्यांवर पडलेले दोन हात मला भरभरुन आशिर्वाद देत होते,

मि परत आलो परवा जेवण करायला मावशी, अन् हो, सोनीला विचारा मि कोंबडा खात नाही, सो व्हेज मधे बेत आखा...! यावर तिघेही हसलो,

आतुन सोन्याचा आवाज आला, सर मि कोंबडाच खानार, तेवढ सोडायला लावु नका...!

ह्यावर चौघे हसलो, अन मि परतीच्या प्रवासाला निघालो, एका सुंदर अनुभवाला सोबत घेवुन, काहीतरी मस्त मस्त वाटत होत.. थोड थोड प्राउड प्राऊड वाटत होत...!

एकंदरीत जाम भारी वाटत होत, वाटतय... वाटत राहील....!

नेहमिप्रमाणे....

(सोन्या दारु का प्यायचा ह्या प्रश्नाच उत्तर समजनार्यांना समजल असेल, न समजनार्यांनी मतदान कार्ड मिळेपर्यंत (१८+) दम धरा समजेल... पन मला कारण नका विचारु)

***

**बि.एस.एफ**
**ई पत्ता : balufodase@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**चारोळ्या**

## चारोळ्या

आयुष्यचं सारे तुजवरी वाहिले,
ह्रदयावरी तुझेच नाव कोरले.
प्रीतबंधनात जोडताना तुजला,
माझे सर्वस्व तुझ्यापुढे अर्पिले.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

लेख

# आकाशी झेप

माझ्या घराजवळच झोपडपट्टीत राहणारी कला. वय जेमतेम १४ वर्षे. परिस्थिती अतिशय बिकट. बिकट इतकी कि, दोन वेळचे अन्नही तिच्या नशिबी नव्हते. बाप शेत मजूर होता.पण शिकायची आवड काय असते ? त्यात काय गोडी असते ? हे तिच्यात मला दिसले. गरीब परिस्थितीमुळे इच्छा असूनही तिला शाळेत जाता येत नव्हते. पण घरची सर्व कामे आवरून, ती मोकळ्या वेळेत समोरच राहणा-या तिच्या मैत्रिणीकडे जावून तिच्याकडून शिक्षणाचे धडे गिरवत होती.

तिला मी एके दिवशी आमच्या शाळेत पाहिले. ती आज शाळेत आली होती आणि मला म्हणाली, "गुरुजी, मला हे पुस्तक वाचायचे आहे. मी म्हणालो, अरे व्वा, घे वाच. पण तू शाळेत नाही येत का ?"

ती म्हणाली, "नाही गुरुजी, बा म्हणतु, शिकून काय उपयोग हाय ? अन् गणवेश, पुस्तक कुठून आणायचं ? पैका नाही आपल्याकडं."हे ऐकुण मला आश्चर्य वाटले नाही, कारण परिस्थितीने मारलेल्या तिच्या बा ला मी काय विचारणार ? पण मी म्हणालो, शिकून उपयोग होत नाही असे नाही. शिक्षण माणसाला माणूस बनवते. राहिला प्रश्न गणवेश आणि पुस्तकाचा ते मी देतो. तू उद्यापासून शाळेत येत जा. हे ऐकताच तिच्या चेह-यावर आनंदी-आनंद पसरला. मी ते पुस्तक तिला भेट म्हणून दिले आणि म्हणालो, कला तू हे कादंबरीचे पुस्तक वाच आणि या कादंबरीमध्ये काय दिले आहे ? ते उद्या मला सांग.

दुसरा दिवस उजाडला. आज शाळेकडे जाण्यास थोडा उशीर झाला होता. जसा शाळेकडे गेलो तर मला कला दिसली आणि म्हणाली, "गुरुजी, हे घ्या पुस्तक. मी तुम्हाला यात नेमका काय आशय दिला आहे ते सांगण्याचा प्रयत्न करते. तिने त्या कांदबरीच्या पुस्तकाचा आशय खूप सुंदर विस्तारपूर्वक मला सांगितला. मी ते ऐकुण आश्चर्य-चकित झालो आणि कलाला शाबासकीची थाप दिली.

ज्या दिवशी मी तिला ते कादंबरीचे पुस्तक भेट दिले होते, त्या दिवशी रात्री मी घरी निघालो होतो. अचानक माझी नजर रस्त्यावरच्या थोड्या दूर असणा-या विजेच्या डांबाखाली गेली. दुरून मला कला, मी दिलेले कादंबरीचे पुस्तक अतिशय तल्लीनपणे वाचताना दिसली. मला खूप आनंद वाटला. कारण कलाच्या जिद्दीने, धडाडीने माझे मन जिंकले होते. पण खरचं गरीब मुले ज्यांना पैश्यांच्या अभावी शिकता येत नाही. अश्यांना आपण सर्वांनीच आपल्या-आपल्या परीने, जेवढे जमेल तेवढी मदत करायला हवी. फक्त पैसे रूपाने मदत करावी असे काही नाही. मदतीचे स्वरूप वेगळेही असू शकते. गरीब मुलांना, आपण वही, दफ्तर, पुस्तके, शालोपयोगी साहित्य देवून मदत केली तर,उद्याचे सुंदर भविष्य आपल्याला पाहायला मिळेल आणि याहून मोठे पुण्याचे कार्य काय असेल?

**दान पैश्यांचेच करावे,**
**असे काही नाही.**
**करा दान जीवनावश्यक,**
**वस्तूंचे काही.**

**गरिबांना द्या,**
**मदतीचा हाथ.**
**मग होते ना पहा,**
**नव्या युगाची सुरवात.**

**अश्रू गरिबांचे पुसता,**
**हर्ष मनाला होईल.**
**आपले जीवन पण त्या हर्ष्याने,**
**गगनास भिडून जाईल.**

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhanjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

लेख

## सावधान! स्त्रियांची संख्या घटत आहे.

अगदी मागच्या रविवारचीच गोष्ट आमच्या शेजारच्या अनुची .महेश तिला म्हणतो "आज आपण छानपैकी सिनेमाला जाऊ", लगेचच सुरेश म्हणतो "नाही, नाही शॉपिंग ला जाऊ" पण रमेश म्हणतो "अगं ,अनु आपण दोघे स्मुद्रकिनारी फिरायला जाऊ" तर गणेश म्हणतो ,"घरीच थांबू" व निलेशच वेगळचं मंदिरात जाऊ. बिचारी अनु अगदी वैताकते व म्हणते "तुम्ही माझे काय चालविले आहे?" खरच! का झाली असेल अशी अवस्था अनुची? ही फक्त अनुचीच अवस्था नाही तर आपल्या येणाऱ्या पुढील काळाची अवस्था आहे. म्हणून सांगावस वाटतं– "मुलांची संख्या झाली फार सगळीकडे होईल हाहाकार, दिवसा होतील अनाचार, वाढतील अत्याचार मुलांना मिळणार नाही मुली, पत्नी होईल ती पाच पांडवांची"

खरेच या सर्वाला जबाबादार कोण? तुम्ही आम्ही नव्हे तर हा संपूर्ण समाज. अहो आम्हाला एक प्रेयसी चालते, एक बायको चालते, एक आई चालते, मग मुलगी का नको? "आज मी असेल पाळण्यात पाळणा हालेल तुमच्या घरात" हे लक्षात असावे.

आज का झाली मुलीची ही अवस्था? याची कारणे जर शोधायला गेली तर वंशाला दिवा म्हणून मुलगा हवा. म्हातारपणाची काठी हवी. हुंडा बळींची संख्या वाढते, स्त्री अबला तिला काही कळत नाही अशा अनेक रुढी व समजुती वर्षानुवर्षे आमच्या मनात घर करून आहेत व जन्मल्यापासून स्त्रीची मानसिकता अशीच बनवली जाते म्हणूनच ती अबला स्त्री म्हणते–

**" स्त्री चा जन्म नको घालू सख्या हरी,**
**अरे रात्र न दिन परक्याची ताबेदारी**
**नाचण्याचा कोंडा कशाचा नाही कामा**
**नको देऊ रे जन्म मुलीचा श्रीरामा".**

परंतु ही अबला स्त्री कालबाह्य झाली खरं तर ती कधी अबला नव्हतीच कारण–

**"आली जन्माला जिजा**
**म्हणून घडला शिवबा**
**तलवार छातीशी पुत्र पाठीशी**
**लढून ब्रिटिशांशी सोडली नाही झाशी**
**जिने केली मुलींसाठी शिक्षणाची द्वारे खुले**
**ती महान सावित्रीबाई फुले**
**एकाची माता नव्हे झाली हजारोंची माता**
**ती सिंधुताई अन् मदर तेरेसा**
**ओलम्पिक मधून मेडल होते आणले**
**साइना अन् मेरी कोमने**
**अंतराळातही भरारी घेतली**
**चावला कल्पना आणि सुनीता विल्ममने**

अशा आमच्या मुली ज्या प्रत्येक क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करून जगास सांगत असतात आम्ही सबला होतो, सबला आहोत व सबलाच राहणार. कुणालाही न भीता मोठ्या धाडसाने म्हणतात–

**"कोमल हूँ कमजोर नहीं**
**शक्ति का नाम ही मेरा नारी है**
**सबको जीवन देनेवाली**
**मौत भी हमसे हारी है"**

आजची पाकिस्तानातील मलाला स्त्री शिक्षणासाठी लढते .मात्र तिचा आवाज दाबून टाकला जातो. समाजात अशा अनेक मलाला आहेत. अगदी धरणीपासून गगनापर्यंत झेप घेतलेल्या स्त्रीची अवस्था आज मात्र अतिशय वाईट आहे. आज आम्ही तिचे पृथ्वीवरील अस्तित्वच नष्ट करायला निघालो आहोत ते स्त्री भ्रूण हत्येच्या माध्यमातून! आईच्या पोटात तिचा अंकुर रुजतो न रुजतो तोच तिला मारण्याचा कट केला जातो. तिचा खून किंवा कत्तल म्हटल्यास वावगे ठरू नये. या खुनाची एक साखळीच तयार असते .यात अगदी स्वताचा अंश वाढवणारी आई पासून डॉक्टर्स पर्यंत.

आज महाराष्ट्रातील स्त्रीयांचे दर हजारी पुरुषामागे प्रमाण बघितले तर कमी आहे. आज एखाद्या फॅशन प्रमाणे, व्यसनाप्रमाने स्त्रीयांची गर्भातच हत्या केली जाते. मात्र होणाऱ्या परिणामांचा विचार आपण कितीसा करतो?

निसर्गाच्या नियमात जर आपण ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न करू तर त्याचे होणारे परिणाम हे महाभयंकरच आहेत. स्त्री ही अनेक रूपातून आपली भूमिका बजावत असते मग ती मुलगी, बहीण, पत्नी, माता असते. त्यामुळे प्रेम, वात्सल्य, माया या भावनांची पूर्तता फक्त तीच करू शकते. तिच्याशी जोडलेल्या नात्यांमधुन आपण हे अनुभवू शकतो. जर भावाला बहीण नसेल तर रक्षाबंधन ,भाऊबीज तरी कशी होणार? तिच्यावर होणाऱ्या अत्याचारचे प्रमाण वाढतच रहणार.

स्त्रीचे अस्तित्व टिकवायचे असेल तर स्त्रीचा सन्मान होणं गरजेचे आहे. सर्व पुरुष वर्गाने आपला स्त्री कडे बघण्याचा दृष्टिकोण बदलेला हवा. विवेकानंदांनी म्हटले आहेच ,"यत्र नार्यस्तु पुज्यते ,रमन्ते तत्र देवता" हुंडा ही पद्धत समाजातून कायमचीच नष्ट व्हायला हवी. स्त्री विषयी असलेले गैरसमज दूर करून त्यांना जगण्याचा हक्क हवा. स्त्री हे परक्याचे धन जरी असले तरी देखील दोन परिवारांना जोडणारी प्रेमाची वीण आहे. गर्भजल चाचणी हे वरदान आहे. स्त्री गर्भाची हत्या करून तो शाप व्हायला नको. वेळीच स्त्री भ्रूणहत्या करणाऱ्यांना रोखले पाहिजे. यासाठी कायदे फक्त कागदावर न राहता ते प्रत्यक्ष कृतीत व्हावेत. डॉक्टर्स हे पापाचे भागीदार न होता पापापासून परावृत्त करणारे हवे. एक कळीला खुडून न टाकता ते फुलू देण्यास प्रोत्सहन देणारे फूल बनवणारे हव ईश्वर ही विश्वातील सर्वव्यापी शक्ती आहे व स्त्री ही त्याच शक्तिचा अविष्कार आहे म्हणूनच या शक्तिविना असलेले क्षेत्र अपूर्ण आहे. "God wanted to be everywhere so he created mother". करुणा, माया, ममता याचं मदर रूपी बिज मातीत रुजतच नाही मग कसे बरे निर्माण होईल पिक?

म्हणूनच सावधान मुलींची संख्या घटत आहे या धोक्याच्या घंटेकडे काळजीपूर्वक बघा नाही तर याचे परिणाम अणुबॉम्बपेक्षाही भयंकर असतील हे लक्षात ठेवा.

आजच्या कर्तव्यदक्ष माता पित्यांनी, भावी आधुनिक दाम्पत्यांनी लक्षात ठेवूया व इतरांनाही मूलमंत्र देवूया–

"सन्मानाने जगू दया मुलींना, आनंदाने त्यांचे स्वागत करुया. मुलगा, मुलगी दोघे समान, नका करू त्यांचे बलिदान शपथ घेऊ सारे मिळुनी भ्रूणहत्या करणार नाही".

कारण मित्रांनो पुन्हा एकदा लक्ष वेधतेय आजच्या मातृदिनी सावधान! स्त्रियांची संख्या घटत आहे...

***

**योगिता किरण पाखले**
**पुणे**
**ई पत्ता : yogitakotkar51@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९२२५७७१४६५८**

**कविता**

## *माझी बाहुली ( बाल कविता )*

बाबा बघा बघा माझी बाहुली
किती छान छान दिसे
लाज लाजेरी सोनकली
जणू राजकुमारी ही भासे
बाबा बघा बघा माझी बाहुली
केस तिचे कसे वाऱ्यावरती डुलती
बघूनी मजकडे ती
का बरे अशी गोड गोड लाजती ?
बाबा बघा बघा माझी बाहुली
आता आम्ही दोघी खेळ भारी खेळू
एक डाव तिचा, एक डाव माझा
मज्जा खूप खूप आम्ही करू
बाबा बघा बघा माझी बाहुली
दोघी संगती शाळेमध्ये जावू
कधी अ आ ई बोलू
तर कधी चिवू कावूचे धडे गिरवू
बाबा बघा बघा माझी बाहुली
किती गोड गोड दिसे
गोंडस आहे तिचे रूप
जणू राजकुमारी ही भासे !!!

.***

**शानिल चंद्रकांत पाटील**
**मु. मोहोटयाचापाडा, ता. वाडा,**
**जि. पालघर**
**ई पत्ता : netbhaari@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५०७६४५६**

कथा

## "प्रतीक्षा"

भाद्रपदाचा महिना. घरात ज्येष्ठागौरीच्या सणाचा गजबजाट होता. कालच गौरी उभ्या केल्या. सुंदरशी सजावट केली. सगळ्या सजावटीवर सम्पन्नतेचा जाणवणारा ठसा होता. गौरी प्रसन्नवदने समोर बघत उभ्या. मी घरातील सासुरवाशिंण. त्यात मोठी सून. त्यामुळे स्वयंपाकघरातील रगाड्यात बुडून गेलेली.

दुपारची जेवणे आटोपली होती। ज़रा निवांतपण मिळालेल्या वयस्क स्त्रिया महालक्ष्मीच्या मांडवासमोर चटई टाकून बसलेल्या होत्या. देवीची भजने म्हणणे सुरु होते. दोनतीन भजने झाली. आणि एका गोड किनरा अनघड अशा खूप आर्त स्वरात एक गाणे सुरु झाले। "हे भोळ्या शंकरा, आवड तुजला बेलाची, बेलाच्या पानाची,......."

तो गोड पण आर्त सूर, तो आवाज ऐकताच मनात काहीतरी गलबललं. कोण म्हणतंय गाणं? म्हणून मी हॉल मध्ये डोकावले. येऊन गाणारी समोर बसले. गाणारी म्हणजे एक ध्यानच होतं. अस्ताव्यस्त पांढरे केस, तेही आखुड़, अंगात एक ढगळ ब्लाउज अड़कवलेला. विरलेली जुनी साडी, आखुड़ नेसल्यामुळे पावले घोट्या पर्यन्त उघड़ी पडलेली. एका बाजूने दांत पुढे आलेले. हातात प्लास्टिकच्या बांगड्या. गळ्यात हिरव्या मण्यांची माळ. नजर अधांतरी आसुसलेली, जणू कुणाला शोधत असावी.

स्वर मात्र गोड स्वच्छ, आर्तता असलेला. शंकरासमोर बसून प्रत्यक्ष आळवित असल्यासारखा. कोणतीही साथसंगत नसून सुद्धा गाणं अगदी तालासुरात तन्मयतेने गात होती. तिला बघून माझ्या मनात पिळवटलं, पोटात काहीतरी तट तट तुटलं. मी नजरेनेच स्वातीला विचारले, कोण गं ही? डोकं जागेवर दिसत नाही हिचं? गाणं संपल्यावर स्वातीने मला तिची गोष्ट सांगितली।

शेजारच्या गल्लीत राहणाऱ्या दस्तुरांच्या सुनेची ही बहिण आहे. नाव शकुबाई. ही स्वताचे गांव, घर सोडून भटकत शेवटी आपल्या बहिणीकडे इथे आली. बहिणीने व तिच्या सासरच्या लोकांनी तिला सांभाळून घेतलं. तिचा एकाच उद्योग म्हणजे ओळखीच्या घरी जायचं, "तिकडे" फोन लावा म्हणून विनवायचं. ज्यांना तिची हकीकत माहीत होती ते फोन केल्याचं खोटे नाटक करून तिला कसेबसे काढून लावायचे. "तिकडे"म्हणजे कुठे गं? मी विचारले. अगं, तिचं लग्न ठरलं होतं पूर्वी एकदा. लग्नतिथि ठरली.सगळी तयारी झाली होती. ही टार आनंदाने फुलली होती. मध्यमवर्गीय साध्या घरातली मुलगी. लग्न होईपर्यंत माहेरी, मग सासरी नांदायचं अशी साधिभोळि मुलगी. पण नियातीचे खेळ वेगळेच असतात गं. लग्नाआधी काही दिवस एका अपघातात तिचा होणारा नवरा मरण पावला. हीचे लग्न जागच्या जागी च राहिले.

शकुला धक्का सहन झाला नाही. ती सैरभैर झाली. सगळं भान सुटलं. ना खाण्याचे ना लेण्याचे. म्हातारे आईवडिल शिरावरच्या जबाबदाऱ्या पार पाडून थकले.हिच्या साठी कोण लक्ष देणार? आईवडील एकेक करुन देवाघरी गेले. ही शेवटी बहिणीच्या आश्रयाला आली.बहिणीकडे निदान भुकेला घास व रात्री डोक्यावर छप्पर मिळाले.

शकु अजूनही वाट पाहतेच आहे. दिसेल त्याला फोन करायला लावते. म्हणते,"विचारा नं त्यांना कधी येणार आहेत ते?" कोणी काही दिलं तर साडीच्या ओच्यात नीट ठेवते, म्हणते, ते आल्यावर वापरिन. तेव्हा कामी येईल ही वस्तू. "

वेटाळातल्या सर्वांना शकुबाई व् तिची कहाणी माहीती होती. त्यामुळे कुणी त्रास द्यायचे नाही. बायाबापड्या तर हळहळ करायच्या. आमच्या घरी कधीही आली तर चहा पिऊनच जायची। सणावाराला जेउखाऊ घालूनच पाठवायचे. तिचा मूड बघून सगळ्या आग्रह करतात , शकुबाई गाणे म्हण ना". शकुबाई म्हणते,"आधी फोन लाव." तिच्यासमोर फोन लावायचा, आणि बोलायच,"हॅलो, भाऊजी, केव्हा येणार आहे तुम्ही, शकुबाई वाट पाहाते आहे. लवकर या." मग शकुबाईची कळी खुलते. चेहरा फुलतो. ती गाणं म्हणते,"हे भोळ्या शंकरा......."

घरातल्या सगळ्या साळकाया माळकाया तिला पुन्हा भजन म्हणायला लावतात. तिचा गोड आर्त स्वर कानात भरू लागतो. बिना साथी संगतीचं ते आर्त गीत वाहत्या खळखळत्या पाण्यासारखे स्वच्छ वाहत जातं. त्या निर्मळ स्वरांत तिची निरागसता निष्पाप प्रतीक्षा क्षणोक्षणी दिसते. माझ्या डोळ्यातलं पाणी थांबत नाही.

ही एक शकु, अंगाला हळद न लागताच विधवेचं जिणं जगतेय. अनिवार प्रतीक्षा करतेय तिच्या सहचाराची.अशा किती शकु असतील ज्या सौभाग्याचं लेणे लेउनही मनातल्या जोड़ीदाराची आस अपुरी असणाऱ्या. जीवाच्या जीवलगाची वाट बघणाऱ्या.

जिवंत बाहुल्यांना नाचावणाऱ्या त्या नियतिला वानवावं की शिव्याशाप द्यावेत ते कळत नाही.

डोळ्यातले पाणी लपवण्यासाठी मी घाईघाईने स्वयंपाकघरात परत फिरते.

ज्येष्ठां आणि कनीष्ठा गौरी निर्विकार नजरेने सगळं न्याहाळतात , निःशब्दपणे. गोड पण आर्त सूर भरून राहिलेत सगळीकडे.

***

**मीनाक्षी अडे**

**ई पत्ता : Minaxi.Ade@licindia.com**

**मोबाईल क्रमांक : ८९८०००१२७२**

## मराठी विचारधन

चांगल्या गोष्टी घडत नसतात त्या घड्वाव्या लागतात , त्यासाठी योग्य त्या वेळी योग्य ते निर्णय घ्यावे लागतात ...

***

**संग्रहित**

**कथा**

## "औषध"

"डॉक्टर, रूम नम्बर २३ चा पेशंट औषध घ्यायला तयार च नाही. " वय अंदाजे ४० असलेल्या डॉ. शैलेश ला राउंड घेताना नर्स म्हणाली.

"काय म्हणता धनंजय काका? "अल्झाइमर पेशंट असलेल्या काकांच्या कॉट जवळ खुर्ची ओढुन बसत डॉ शैलेशने विचारले.

"मी औषध घेणार नाही" काकांनी तोंड फिरवले.

'काका एक गोष्ट वाचली होती ती तुम्हाला सांगायला आलो.तुम्हाला आवडतं ना गोष्ट ऐकायला ! काका रुसल्यासारखे तोंड फिरवुन बसले होते त्याकडे दुर्लक्ष करून तो बोलू लागला.

"आमच्या वैद्यकीय क्षेत्रातलीच गोष्ट आहे काका". एका लहान मुलाच्या फुफ्फुसाचे ऑपरेशन प्रसिद्ध सर्जन डॉ. पाठक करणार होते. ते अत्यंत कड़क शिस्तीचे डॉक्टर होते. मुख्य सर्जरी झाली की बाकी टाके वगैरे सहायक डॉक्टर करीत. आज सर्जरी ला थोडा उशिर झाला होता कारण हा लहांनगा पेशंट जिद्द करीत होता की माझे टेडी बेयर एका बाजूने फाटले ते आधी शिवून द्या. त्याला आपल्या त्रासापेक्षा टेडिबेअर ची जास्त काळजी होती त्यामुळे तो हट्टुन बसला होता. इकडे डॉक्टरांच्या भीतीने नर्स ला काही सुचत नव्हते. शेवटी तिने त्याच्या हातातला टेडी हिसकुन बाजूला केला व् त्या छोट्याला अनेस्थेशिया दिला.

संध्याकाळी हा छोटू भानावर आला तर टेडी त्याच्याजवळ नव्हता. तो रडू लागला तेव्हा नुकत्याच घातलेल्या त्याच्या टाक्यातून कळ उमटली, ती त्याच्या चेहऱ्या वर ही होती. लगेचच खोलीत डॉ.पाठक आले. त्यांच्या हातात छोटुचे टेडी होते. त्या विख्यात सर्जनने त्या टेडीला स्वतः टाके घालून शिवले होते व त्यालाही बँडेज बांधले होते. डॉक्टर छोटू समोर बसून म्हणाले, "बेटा, एक गोळी तुला

आणि एक गोळी तुझ्या टेडीला! त्याचेपण ऑपरेशन झाले ना! पण टेडी कसा औषध घेईल? म्हणून त्याची व् तुझी दोन्ही गोळ्या तूच घ्यायच्या. चला घ्या बरं पटकन औषध. शहाणं बाळ! आता तुम्ही दोघही लवकर बरे व्हाल!"

काका गोष्टीत रमले हे डॉ. शैलेश ने ओळखले. "काका माझा टेडी अजूनही औषध घेऊ शकत नाही. तेव्हा तुमच्या गोळी बरोबर त्याचीपण गोळी तुम्ही घेऊन टाका न प्लीज." शैलेशच्या विनवणीला मान देऊन काकानी दोन्ही गोळ्या घेतल्या. हसून ते म्हणाले," गोष्ट छान होती हं."

डॉ. शैलेश समाधानाने हसून बाहेर पड़तांना म्हणाला,"काका, मीच तो छोटू."

त्याने स्पेशल रूमचे दार ओढुन घेतले, दारावर पेशंटचे नाव लिहलेले होते "डॉ.धनंजय पाठक".

***

**मीनाक्षी अडे**
**ई पत्ता : Minaxi.Ade@licindia.com**
**मोबाईल क्रमांक : ८९८०००१२७२**

**चारोळ्या**

## चारोळ्या

आयुष्य हीच एक परीक्षा असते,
मनुष्य असतो आयुष्यभर विद्यार्थी.
“अनुभावातून” शिकता येते,
समज, बोध आयुष्याला एकार्थी.

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhanjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**कविता**

## दूरस्थ

तू दूरच असावास माझ्यापासून,
दूर असावा सूर्यासारखा
अवघ्या विश्वाचं अंतर पार करुन
या धरेपर्यन्त येणाऱ्या उबदार किरणांसारखा ,
तुझ्या प्रेमाची उबदार झळाळी
पोचवित रहा माझ्यापर्यन्त,
ती किरणे शोषुन मिळेल मला जीवनरस,
माझं अस्तित्व टिकवण्यासाठी.
तू दूरस्थ असावा चंद्रासारखा,
रुपेरी स्नेहाची बरसात करीत,
प्रतिपदेच्या नाजुकशा कोरी पासून
पूर्ण चंद्राच्या तेजस्वी झळाळी पर्यन्त।
मग मधले अंधारे दिवस मी सहज
पेलून नेईन पुनवेचि वाट पाहात।
तुझ्या प्रितिचें कलेकलेने वाढणे,
अन् लोपणे गाजविल भरती नि ओहोटी
माझ्या मनातल्या सागरात,
तू दूर दूर निळ्या आभाळासारखा
कुठुनही बघता सामोरा येशिल
निळ्या बाहुत मला सामावण्यासाठी,
हे तुझं माझं नातं
नाजुकशा फुलावर बसलेल्या फुलपाखरासारख
हात लावताच उडून जाईल अशी भीती,
पारिजातकाच्या कोवळ्या फुला सारखं,
हातात घेताच तेवढया उबेनेही कोमेजुन जाईल
अशी भीती वाटते मला,
म्हणूनच म्हणते तू दूर च रहा माझ्यापासून
दुरुन येणाऱ्या तुझ्या मनातल्या स्नेहल लहरी
देतील मला जगण्याची आशा।

***

**मीनाक्षी अडे**
**ई पत्ता : Minaxi.Ade@licindia.com**
**मोबाईल क्रमांक : ८९८०००१२७२**

कविता

## नुपूर वाजले वाजले

नुपूर वाजले वाजले
ठोके वाढले वाढले
तिचा पायरव कानी
झाली धुंद सारी गाणी
माझ्या गाण्यात भरला
रंग चंद्राचा गुलाबी
साऱ्या गुलाबांनी केली
तिच्या गालावर दाटी
तिची गोरीपान छबी
उघड्या पाठीवर वेणी
भर उन्हातही आल्या
गार वाऱ्याच्या झुळूकी
माझ्या काळजाचे डोह
गेले क्षणात भरून
तुझ्या आगमनी सखे
आले सुगंध वाहून
***

**स्वाती उदार**
**ई पत्ता : swati.udar@gmail.com**

चारोळ्या

## चारोळ्या

प्रयत्नांती श्रम-साफल्य अवश्य मिळते,
निराशेच्या अंधकारात नवप्रेरणा मिळते.
स्वप्न रुपेरी जीवनाचे पुरे होता,
आयुष्याची सुंदरता मनास कळते.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhanjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## मनामनातला पाऊस..

भिजण्याची आहे हौस
कधी पडेल पाऊस ?

कोणाला मनातलं रानं
विझवायचं असत
कोणाला प्रेयसीबरोबर
भिजायचं असत

आळवावर पडणा-या थेंबाप्रमाणे
निसटायचं असत
चिंब भिजविणा-या
भुतकाळातल सारं आठवायचं असत

पावसाच्या थेंबाने अश्रू
लपवायचे असतात
खोटे खोटे भाव
दाखवायचे असतात

सोडायची असते दु:खाची कागदी नाव
आनंदाला द्यायचा असतो मनात वाव

आमच्या बळीराजाच मात्र
वेगळचं असतं कारण
त्याची जमिन असते
बॅंकेकडे तारण छत्र ....

आई.....
उडून गेली तिची छत्रछाया
किती किती होती माझ्यावर तिची माया

तिच्या शब्दाने संकट सारी दूर जाई
अशी होती माझी आई

तिनेच भरवला पहिला घास
तिनेच दिला पहिला श्वास

कितीही आली संकटे
कधी नाही वाटले एकटे

तु सोडून गेलीस मन होत नाही संमत
तुला अग्नी देण्याची होत नव्हती हिंमत
तु असताना मात्र कळली नाही तुझी किंमत

जपून ठेवल्यात तुझ्या आस्तित्वाच्या खुणा
आठवण येते तुझी पुन्हा पुन्हा

होतो मी तुझा लाडका
झालो मी आता पोरका
***

**रमेश पां. जाधव**
**एम -२६/२२७२, म. हौ .बोर्ड**
**येरवडा, पुणे ४११००६,**
**ईशान्य मॉलजवळ**
**ई पत्ता : rameshjadhav3394@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५००५६२१२**

**चारोळ्या**

## चारोळ्या

सोबतीत तुझिया सख्या,
मन सुखावून जाते.
मनाच्या प्रेमभावनांना,
आधार मनीचा देते.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhanjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**कथा**

## पिंपळसमाधी

नात्यांची एक कहाणी जी संपत्ती आणि माती यातील फरक उलगडते, एक कहाणी जी नात्यातला ओलावा आपल्या डोळ्यात आणते, एक कहाणी जी मुल्ये आणि वारसा यांचे महत्व सांगते... मना मनातली घालमेल जी प्रश्न बनून कदाचित प्रत्येकाच्या जीवनात कधी तरी समोर उभी ठाकते. तुम्ही कसा सोडवाल हा गुंता ? जाणून घ्यायचंय ? तर मग वाचा ....

नुकतेच कुठे झुंजूमुंजू झाले होते, निम्मं गाव अजून जागं झालेल नव्हतं अन गावच्या वेशीजवळून शिंद्यांच्या वस्तीवरचा प्रौढ वयाचा औदु अक्षरशः बोंब मारत ओरडत ओरडत गावात शिरला .......

“घात झाला, घात झाला ! वासुकाकानी जीव दिला !, माझ्या धन्यानं फास लावून घीतला! अरे पांडूरंगा तुझ्या दाराला लागली काठी ! असाकसा रे दावा साधलास ? घात झाला, आता मी कुणाकडे बघून जगू रे देवा ? असा कसा रे दुश्मन झालास देवा ? वासुकाका ओ काकाsss !! आमाला सोडून का गेलासा ?” त्याचा असा धावा सुरूच होता.

देवळाजवळ रामपारी गोळा झालेले काही लोक आणि नुकतेच पारापाशी आलेले काही रिकामटेकडे त्याच्या आक्रोशाने जागेवर थबकून गेले. त्यांच्या डोळ्यावरची झोप पाखरागत उडून गेली. त्याचा आवाज ऐकून शंकर गुरव तर मारुतीची पूजा अर्ध्यात थांबवून देवळाबाहेर आला अन खुळ्यागत पाठमोऱ्या औदुंबराकडे बघत उभा राहिला. काही लोकांनी हातातली कामे टाकली अन जे ते पळणाऱ्या औदुंबरच्या मागे जाऊ लागले.

नेमके काय झालेय हे कुणालाच काही कळत नव्हते पण वासुकाकाच्या जीवाचे काहीतरी बरेवाईट झालेय एव्हढे मात्र प्रत्येकाने ताडले होते.

धावतपळत आलेला औदु गावाच्या मधोमध असणाऱ्या वासुकाकाच्या वाड्यासमोर आला अन ‘धनी’ असे

म्हणून मोठ्याने आर्त किंकाळी फोडून दारावर डोके बडवून घेऊ लागला. त्याच्या मागे धावत आलेल्या पोरासोरांनी त्याला दारापासून मागे ओढला, तरी त्याचे सगळे अंग थरथरत होते.त्याच्या डोळ्यातून संततधार वाहत होती. अनवाणी पायाने वस्तीतून थेट घरी आलेल्या औदूचे पाय पुरते ठेचकाळलेले होते.

घराबाहेरच्या तुळशीला पाणी घालून अन सूर्यनारायणाला नमस्कार करून नुकत्याच चुलीपुढे येऊन बसलेल्या यशोदाकाकूनी त्याचा गलका ऐकला अन औदुंबरच्या आर्त किकाळीने जागेवर भोवळ येऊन पडल्या. वासु काकाच्या तिन्ही सुना तरातरा बाहेर आल्या अन औदुला प्रश्न करू लागल्या,

“आण्णा, नीट सांगशीला का न्हाई ? काय झालंया ? का रडाया लागलासा ?”

एव्हाना त्यांची मुलेही तेथे आली, त्यांनी ओळखले की काही तरी आक्रीत झालंय. त्यांनी औदुंबरला नीट बोलते केले. इकडे सुनांनी यशोदाकाकुच्या तोंडावर पाणी मारून सावध केले. नाही म्हटले तरी अख्ख्या गावात बातमी कानोकानी झाली होती अन वासुकाकाच्या चौसोपी वाड्यासमोर ही गर्दी जमा झाली. ज्या बाया बापड्या वाडयाजवळ आल्या होत्या, त्या दारातनं थेटयाशोदाकाकूकडे गेल्या अन बायकांचा गदारोळ वाढत गेला. कोण काय म्हणतंय काही कळत नव्हते इतका आवाज वाढला. शेवटी औदुंबरने रडत रडत सगळी हकीकत सांगितली अन सर्वांचाच धीर सुटला. इतका वेळ धीराने उभी असलेली वासुकाकांची मुलं एकनाथ अन यादवराव या दोघांनीही कंबर खचल्यागत जमिनीवर बसकण मारली. वासुकाकांची नातवंडे सज्ज्यातून पळत खाली आली अन ती देखील अवसान गळाल्यागत भुईवर पडलेल्या आपापल्या बापाच्या गळ्यात पडून रडू लागली. आत बायांनी टाहो फोडले होते. घरातली सान लेकरेही आता जागी झाली अन त्यांचा जीव ह्या सगळ्या रडारडीने कावराबावरा झाला. या सर्वांचे पाणावलेले डोळे अन बायकांचा आक्रोश पाहून दारात गोळा झालेली माणसेही रडू लागली. बघता बघता सगळ्या गावावर शोककळा पसरली.

वासुकाका म्हणजे वासुदेव गोरक्षनाथ शिंदे. गावातल्या वयाने आणि मानाने जेष्ठ व्यक्तीपैकी एक. रामायणातली रामटाळी असो वा आषाढातली काकडआरती किंवा चातुर्मासातले किर्तन, वासुकाका सगळ्यात आधी हजर असणारच. सत्तरी पार केलेले वासुकाका गावातल्या पहिल्या टाळकरयांपैकी एक. गावातले पहिले मॅट्रिक शिकलेलं आता पिवळे झालेले हे पिकल पान. कोणाच्या अधेमध्ये नसणारा धार्मिक वृत्तीचा सांप्रदायिक अन सात्विक संस्काराचा हा मितभाषी जाणता माणूस. गावात कोणाच्याही घरचे तंटेबखेडे असोत वा कोणाचे जमिनीचे वाद असोत वासुकाकापाशी तो वाद आला की त्यावर ते नामी तोडगा काढत. अगदी पंचक्रोशीतल्या गावातली सगळी माणसे त्यांच्याकडे सल्ला घ्यायला येत. पापभिरू अन हसतमुख अशा या वासुकाकांना तीन मुले अन दोन मुली होत्या. जयवंत, एकनाथ अन यादवरावही मुले अन कृष्णा – कावेरी ह्या मुली. त्यापैकी जयवंत हा चांगले उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन नोकरीच्या निमित्ताने पुण्यात स्थाईक झालेला तर एकनाथ अन यादवराव हे गावातच आपल्या वडिलांच्या घरी असत. कावेरी अन कृष्णेची लग्ने चांगल्या घरी पण जवळच्याच गावांमध्ये देऊन केलेली होती. वासुकाकांच्या पोराबाळांना मुलेही त्यांच्या सारखीच लवकर झाली होती, त्या पोरांनाही आता नुकतेच मिसरूड फुटले होते. एकनाथ अन येदा दोघांच्याही बायका चांगल्या घरच्या गुणी मुली होत्या. त्यांनी आपल्या सासूसासऱ्यांच्या सेवेत कधी खंड पडू दिला नव्हता. मागील तीनेक वर्षात वासुकाकांचाथोरला मुलगा जयवंत याच्या गावाकडच्या चकरा मात्र खूप वाढल्या होत्या. येताना त्याच्या हाताशी आलेल्या पोराला तो गावाकडे घेऊन आल्याचे गावकरयांनी अलीकडे खूपवेळा बघितले होते. कृष्णा कावेरी देखील सणावाराला येऊन जात असत. वासुकाकांचे वडिलोपार्जीत वीस एकरांचे शेत होते. काळीभोर जमीन होती अन बापलेक मन लावून काळ्या आईची सेवा करायचे, वर पांडुरंगाच्या कृपेने विहिरीला पाणीही बारमाही होते. त्यामुळे त्यांच्या शेतात सदा शिवार फुललेले असायचे, धान्याची कणगी भरलेली असायची अन कडब्याचे भले मोठे बुचाड लागलेले असायचे. गोठ्यातल्या जनावरांचे बक्कळ दुभदुभते घरात येत होते. वासुकाकांशी लग्न झाल्यापासून आपल्या नवरयाची सावली बनून राहिलेल्या यशोदेकडे तर सगळे गाव आपली आई म्हणून बघायचे. यशोदाकाकूकडे

कोणी पदर पसरून गेलंय अन तिने त्याची नड भागवली नाही असे घडलेच नव्हते. आपला नवरा अन आपले कुटुंब हेच तिच्या जीवनाचे परिघ होते. वारकरी सांप्रदायातले घराणे असल्याने घरात देवधर्माची ओढ होती, घरातले वातावरण शांत असायचे, वासुकाकांची नातवंडेही अभ्यासात हुशार होती. हसतमुख चेहरयाचे हे घर म्हणजे गावाची शान होती.
नाही म्हणायला गावाला खटकणारी एकच गोष्ट अलीकड घडत होती, म्हणजे उतारवयाला लागलेल्या वासुकाकांचे सारखे सारखे शेतातल्या आडवस्तीत जाऊन राहणे. अलीकडे ते घरी कमी असायचे अन वस्तीवर जास्त. त्यामुळे त्यांचे देवळातले नित्यक्रमही ते चुकवू लागले होते. पण त्यावर कोणी प्रश्नचिन्ह उपस्थित केले नव्हते. अशा देवमाणसाच्या घरात डोकावणे अन त्यांच्यासारख्या मानी अन इमानी माणसाच्या वैयक्तिक प्रश्नात तोंड खुपसणे गावाला देखील मान्य नव्हते. त्यामुळे त्याच्या खुलाशाच्या भानगडीत कोणी पडले नव्हते. एव्हढे सर्व आलबेल असूनही वासुकाकानी आपला जीव का दिला असावा हा प्रश्न गावातल्या लोकांच्या डोक्यात नागानं फणा काढावा तसा उभा राहिला होता....

पन्नाशीच्या वयाचे विष्णू पाटील गावाचे सरपंच. इतर लोकांप्रमाणे ते देखील आपली सगळी कामे टाकून ते वासुकाकांच्या वाड्यावरआले. त्यांनी इशारा करून वासुकाकांच्या मुलांपैकी मधल्याला म्हणजे एकनाथाला बाहेर बोलावले. 'नेमके काय घडलेय' याचा काही अंदाज काढता येतो का ते त्यांनी जोखण्यास सुरुवात केली.
'थोरल्या जयवंताला सांगावा दिला का न्हाई ?', अशी विचारणा केली.

त्यांच्या या प्रश्नाने इतका वेळ आपल्या मनावर ताबा ठेवून असलेल्या एकनाथाच्या डोळ्यातून पाणी वाहू लागले मात्र हुंदके बाहेर पडत नव्हते. त्या सरशी विष्णू पाटलांनी पुन्हा तोच सवाल केला. तरीही एकनाथ नुसताच मुक्याने रडत होता. "आरं, काही बोलशील का नाही ? का नुस्ताच रडणार हायेस ?"

त्यांच्या या प्रश्नासरशी मात्र एकनाथ टाहो फोडून रडू लागला. त्या बरोबर आजूबाजूच्या माणसांनी कान टवकारले.

“तो मुंबैला गेलाय. कालच तो तिथून निघाला असल. तिथनं तडक गावाकडं येतो म्हटला होता. निघाला बी असंल. यीलच तो आता ! आपल्या बापाला पाणी पाजायला !"

त्याचे हे बोलणे ऐकून इतका वेळ हमसून हमसून रडत असणारा येदा म्हणजे यादवराव जोरात ओरडला, "नाव नग काढूस त्येचं ! त्येनं वाड्यात पाय ठिवला तर पाय कापून काढीन! माझ्या बाच्या अंगाला त्येचा हात लागला तर याद राखा, एकाला बी मी सोडणार नाही !......."

इतक्या वेळ स्वतःवर संयम राखून असलेला यादवराव आता छाती बडवत रडू लागला अन रडता रडता तो आपल्या पित्याला उद्देशून बोलू लागला- "आबा ह्या समद्या लोकांला कोण खरे सांगणार ? कोण सोडीवणार ह्यो गुत्ता ? का वो असा केलासा ? एक डाव आमच्याशी बोलायचे तरी हुतावो आबा !'

रागाने येदाचा चेहरा लालबुंद झाला होता आणि तरीही त्याचे अश्रू आणि आक्रोश काही केल्या थांबत नव्हते. तो असा सैरभैर आक्रोश करायला लागलेला पाहून एकनाथ त्याच्याजवळ गेला अन त्याच्या डोक्यावर हात ठेवून त्याला म्हणाला.” आपण आपल्या आबाची पोरं हाव ना ? मग आपल्याला त्येनी असं बोलायला शिकवलंय का ? शांत हो येदा, माझ्या भावा ! पांडुरंगच आता काय तो न्याय करील.”

भावाभावातला हा संवाद ऐकून गावकरी मात्र पार गोंधळून गेले होते. 'वासुकाकाच्या घरात सगळं ठाकठीक नाही काही तरी ग्यानबाची मेख दडून हाय' हे एव्हाना सगळ्याना कळून चुकले होते. आपली पोक्त मुले असा कोलाहल करताना बघून यशोदाकाकुच्या अंगावर वीज कोसळल्यागत झाले, त्या लगबगीने पुढे आल्या अन दोन्ही पोरांच्या तोंडावरून हात फिरवत म्हणाल्या, "गप बसा ! देवावर भरुसा ठेवा, रडून जगाला तमाशा दावायचा का ? आपला गुत्ता आता पांडुरंगच सोडवील. आपले आबा आपल्यातच हायीत, ते आपल्याला सोडून कुठंबी जाणार

न्हाईत."

आपल्या डोळ्याला लागलेली धार आपल्या पदराने पुसत ती माय माऊली आपल्या मुलाना धीर देत होती खरं, पण ती स्वतःच या आघाताने एखादया जुनाट वडाच्या झाडाप्रमाणे उन्मळून गेली होती..

तिथला हा गोंधळ वाढताना पाहून विष्णू पाटलांनी येदाला आपल्याबरोबर घेतले आणि त्याला घेऊन ते शिंद्यांच्या वस्तीकडे निघाले. खरे तर त्यांच्या मनातसुद्धा या घटनेमागे काय नेमके काय कारण आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा होती. पण ते विचारण्याची धमक गावातल्या कोणत्याच माणसात नव्हती कारण तेव्हढी पतच वासुकाकांच्या कुटुंबाने साभाळून ठेवली होती. विष्णू पाटलाच्या अगोदर गावातली काही तरुण मुले अन आजूबाजूच्या वस्तीवरची माणसे तिथे गोळा झाली होती. भैरूनाना जे गावचे पोलीस पाटील होते ते देखील हजर झालेले होते. गावाकडे येणारया रस्त्याच्या थेट सुरुवातीच्या हद्दीत हमरस्त्याला लागून वासुकाकाचे शेत होते.

एक पाय हमरस्त्याच्या सडकेवर अन एक पाय शेतात असं म्हटलं तरी चालल अशा मोक्याच्या जागेवर त्यांचे शेत होते. शेताला लागून असणारा रस्ता आता साधा राहिला नव्हता. तिथं आता जलदगती सुपर हायवे झाला होता. या रस्त्याच्या निमित्ताने जेंव्हा सरकारने गावकरयांच्या जमिनी ताब्यात घ्यायला सुरुवात केली होती तेंव्हा सर्वात आधी आवाज वासुकाकांनी उठवला होता. आजूबाजूच्या गावातली माणसे गोळा करून जिल्हा परिषद ते सडक बनवणारया ठेकेदाराच्या कंपनी ऑफिसपर्यंत त्यांनी खेटे मारले होते. सरकारी यंत्रणेकडून जमिनीला योग्य मोबदला यावा म्हणून अनेक अधिकारी अन पुढारयांचे उंबरठे झिझवले होते. लागेल तेव्हढीच जमीन सरकारने ताब्यात घ्यावी म्हणून त्यांनी जीवाचे रान केले होते. एव्हढ्या उतारवयात त्यांनी गावासाठी केलेला हा संघर्ष सगळ्यांसाठी चर्चेचा विषय झाला होता. पण त्यामुळेच सगळ्याना मुबलक पैसा मिळाला होता अन वासुकाकानाही त्यांच्या शिवाराचे पुढल्या अंगाचे काही गुंठे रान सडकेत गेल्यामुळे काही पैसा मिळाला होता. त्यांमुळे या मुद्द्यावरून या कुटुंबात असले काही घडले असेल असे विष्णू पाटलांना वाटत नव्हते. विचार करत करत त्यांची गाडी वस्तीला लागली....

वस्तीतले ते दृश्य कोणाही माणसाला हेलावून टाकणारे होते. शेताच्या मधल्या अंगाने विहिरीच्या कडेनं गेलेल्या दंडाला लागून एक बांधहोता, हा बांध थेट शेताच्या वरल्या अंगापर्यंत गेला होता. त्या बांधावर उंबराची अन चिंचेची झाडे होती., अन त्या झाडांच्या रांगेत शेवटी एक मोठे पिंपळाचे झाड होते. फार जुने अन फार मोठे असं ते जुनाट पिंपळपान होतं. तीन साडेतीन फुटाचा मोठा लठ बुंधाहोता. त्या झाडाच्या खाली वासुकाकाच्या वडिलांच्या अन आज्याच्या समाध्या होत्या. शेताला लागून सडक असल्याने हे पिंपळाचे झाड अन त्याच्याखालच्या ह्या शाळीग्रामच्या काळ्या कुळकुळीत ताशीव दगडातून केलेल्या स्वच्छ, देखण्या समाध्या कोणाचेही लक्ष वेधून घ्यायच्या. त्यामुळेच की काय गच्च बहरलेल्या मळ्यातले ते पिंपळाचे झाड म्हणजे वासुकाकाचे जीव की प्राण होते. एक वेळ कोंबडा आरवायला चुकेल पण वासुकाका रोज तिथ येऊन गेल्या शिवाय अन चार घटका तिथं घालवल्याशिवाय त्याना हायसे वाटत नव्हते. आज त्याच झाडाच्या सर्वात खालच्याफांदीला त्यांनी फास घेऊन आपला जीव दिला होता. विष्णू पाटलानी भैरूनानाच्या कानात कुजबुज केली अन पोराना हाताने खुणावल. तशी गोळा झालेली पोरे पुढे सरसावली अन त्यांनी लगबगीने वर चढून वासुकाकाचा निष्प्राण देह झाडावरून खाली उतरवला.

वस्तीतली त्यांचीच रोज पांघरायची गोधडी खाली अंथरण्यात आली अन त्यांचा देह त्यावर विसावण्यात आला तशी इतका वेळ अश्रुंचे बांध अडवून उभा असणारा येदा त्यांच्या अंगावर कोसळला अन लहान पोरांगत ओक्साबोक्शी रडू लागला. "आबा का गेलासा ? आमी आता कुणाकडं बघून जगायच वो आबा...बोला की वो आबा....रामकृष्ण हरी म्हणा वो आबा...टाळ वाजवा...भजन म्हणा ... गायी म्हशीच्या अंगावरून हात फिरवा. घरी नातवंडे तुमची वाट बघत्येत वो आबा...घरी जाऊन आईला आता मी काय सांगू ? तिला असं टाकून कागेला वो तुमी? माझ्या बहिणीना आता काय तोंड दावू वो आबा, काय तरी बोला वो...मनमोकळं करा वो, असं गपगुमान तुमाला जाता येणार

नाही....देवा तुला बी असं कस गुमान घालून त्यास्नी न्यावं वाटलं रे ? आबा वो आबा उटा की ! चला, तुम्हाला काकड आरतीला जायाचं नाही का ?.. पांडुरगा का रे असा दावा मांडला ?" त्याचं हे रडणे आणि आक्रोश बघून जमलेली सगळी माणसे हेलावून गेली. अनेकांच्या डोळ्याला धारा लागल्या. आजूबाजूच्या वस्तीवरून गोळा झालेल्या बायांनी डोळ्याला पदर लावला अन त्या हुंदका देऊन रडू लागल्या. हा गलका ऐकून गोठ्यात इतका वेळ शांत उभी असलेली जनावरे बिथरली, ती मोठ्याने हंबरू लागली, जोराचे सोसाट्याचे वारे सुटले अन पिंपळपानांचा जणू पाऊस पडावा तसा सडा पडू लागला. वारया वाव्दानाचे रूप बघून विष्णूपाटील पुढे झाले, त्यांनी येदाला जवळ घेतले, ऊराशी कवटाळले. त्याच्या पाठीवरून मायेने हात फिरवला अन ते भैरूनानांच्या कानात पुन्हा कुजबुजले. बघता बघता सर्वांचे सांत्वन करून त्यांनी वासुकाकांचा देह गाडीत ठेवला ....

पाटलांनी त्यांची गाडी फिरवली अन गावाकडच्यादिशेने वळवली, त्या गाडीत मागचे सीट दुमडून वासुकाकांचा देह ठेवण्यात आला. त्यांच्या शेजारी येदा अन पुढे औदुंबरची बायको अन मुले बसली. खाच खळगे चुकवत हळूहळू ती गाडी त्या शेतातून पुढे निघाली. ज्या वासुकाकानी गावाला अनेक आदर्श घालून दिले, अनेक तंटेबखेडे सोडवले, ज्यांच्या घराचा सगळा गाव अभिमान बाळगायचे त्या घरातला आधारवड म्हणजे वासुकाका. त्यांनीच अशा प्रकारे आपली जीवनयात्रा संपवल्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला होता. जो तो आपापाल्या परीने याचा अर्थ लावत होता. गाडीने वस्तीला वेढा घालून पुढे जाताना सर्वांना अश्रू अनावर झाले होते. येदा मोठ्याने ओरडला "ये, आई गं, बग बग तुजा राजा तुला सोडून चालला गं ! आता हितं दारं कोन धरणार ? मोट कोण बांधणार ? चारा कोण खाऊ घालणार ? कोण नांगर धरणार अन तुजी माती रोज आपल्या कपाळाला कोण लावणार ?" त्याचं रडणं सुरूच होतं आणि अखेर वासुकाकानी आपल्या शेतातून निरोप घेतला......

इकडे गावात त्यांच्या वाड्यात हुंदक्यांचा हल्लकल्लोळ माजला होता. त्यांच्या दोन्ही मुली घरी आल्या होत्या. त्यांचा आक्रोश काळीज पिळवटून टाकत होता. तिथल्या सगळ्यांच्या नजरा आता शेतातून येणारया वासुकाकांच्या पार्थिवाकडे होत्या. वेळ जड जात होता काटा पुढं सरकत नव्हता. इतक्यात वेशीत जयवंत त्याच्या मुलासह गाडीतून दाखल झाला. गावात उतरता क्षणी दिसलेले वातावरण त्याच्या समजण्याच्या पलीकडचे होते. गावातल्या माणसांच्या शोधक नजरा त्याच्यावर खिळून राहिल्या. त्या सरशी त्याच्या मनात गावात काहीतरी अघटीत घडल्याची शंकेची पाल चुकचुकून गेली. तो तसाच पुढे जाऊ लागला, तशी माणसे त्याच्या मागोमाग चालत येऊ लागली, त्याला जेंव्हा आपल्या वाडयाबाहेर मधमाशाच्या मोहोळासारखी माणसे दिसली तेंव्हा त्याच्या पायातले अवसान गळून गेले. घशाला कोरड पडली, जीभ आत ओढू लागली, चेहरा पांढरा फटक पडला. वाडयापुढच्या माणसामध्ये कुजबुज सुरु झाली, ‘जयादादा आला, जयादादा आला’.....

दाराशी आलेला जयवंत आतले दृश्य बघून थिजून गेला. यशोदाकाकूच्या गळ्यात पडून धाय मोकलून रडणारया आपल्यां बहिणी बघून त्याला धक्का बसला,. दाराशी येऊन उभारलेल्या जयवंताला बघून गुडघ्यात डोके खुपसून रडत बसलेला एकनाथ पुढे झाला अन त्याने जयवंताला करकचून मिठी मारली अन त्याचा संयम तुटला. त्याने अश्रुना वाट मोकळी करून दिली, “दादा, आबा आपल्याला सोडून पांडुरंगाकडे गेलं रे ! दादा आपण आता पोरकं झालो रे! आई आन अक्काला आता तुच समजीव ! तुच आता निभावून ने रे दादा !!’ असे म्हणून एकनाथाने फोडलेला टाहो सगळ्यांना भारावून गेला.

काय घडलेय याचा जयवंतने अंदाज घेतला अन तो आईजवळ गेला. तिला कवेत घेतले, इतक्या वेळ रडत असणारया याशोदाकाकू जया आल्यावर अचानक शांत झाल्या होत्या. कृष्णा- कावेरी थिजून गेल्यासारख्या जयाकडे पाहत होत्या. जयाला काय बोलावे ते सुचत नव्हते. त्याच्या सर्व अंगाला कापरे भरले होते. तो सर्व बळ एक करून कावेरीकडे गेला तसा तिने त्याला जोरदार हिसडा देऊन त्याला दूर लोटले. अन ती मोठ्याने ओरडली, ‘खबरदार, मुडदया याद राख माझ्या अंगाला हात लावशील

तर !”

त्या सरशी जमलेले सगळे लोक अवाक होऊन पाहत राहिले तशी यशोदाकाकू पुढे झाली अन कावेरीच्या डोक्यावरून तिने हात फिरवत डोळ्याने शांत राहायला खुणावले. तिथे आणखी काही तरी अघटीत घडण्याआधी झालेली हकीकत कानावर घालावी या हेतूने जयाला बाजूला घेऊन शेजारच्या अप्पा पवारांनी सर्व किस्सा सांगितला तसं जया पार हबकून गेला. त्याची बोबडी वळायचीच राहिली. त्याच्या सर्वांगाला घाम फुटला. सोबत आलेला त्याचा मुलगा देखील ह्या सगळ्या प्रकाराने भांबावून गेला होता ......

विष्णू पाटलांची गाडी वेशीतून येऊन वासुकाकांच्या वाड्याकडे निघाली तसा जमलेल्या लोकांनी गलका सुरु केला. दिस उगवल्यापासून गावात कोणाच्याही घरी चुल पेटली नव्हती. सगळा गाव जणू सैरभैर झाला होता, आपल्या लाडक्या भूमीपुत्राच्या अखेरच्या दर्शनासाठी तहानभूक हरपून सगळे तिथे गोळा झालेले होते. गाडीचे दार उघडून सावकाशपणे वासुकाकांचा देह बाहेर काढण्यात आला आणि गोधडीत लपेटलेला आपल्या बापाचा देह बघून कृष्णा कावेरीला अश्रू अनावर झाले आणि त्यांनी हंबरडा फोडला. अगदी आर्त स्वरात त्या आपल्या लाडक्या पित्याला आर्जव करू लागल्या. वासुकाकांचा देह दाराकडे तोंड करून ढेलजेतल्या भिंतीला टेकवून ठेवण्यात आला. लोक भरलेल्या डोळ्याने येऊन त्यांच्या पायावर डोके टेकवून आपले मन हलके करू लागले. यशोदा काकू त्यांच्या डोक्यावरून हात फिरवत होत्या, त्यांचा देह बघून त्या थिजून गेल्या होत्या. कृष्णा, कावेरी आपल्या वडिलांच्या अंगावर डोके टेकवून रडत होत्या. आपल्या वडिलांचा देह आत घेऊन आलेल्या येदाची नजर बाहेर उभ्या राहिलेल्या आपल्याथोरल्या भावावर, जयावर पडली अन त्याचा संताप अनावर झाला, नकळत हाताच्या मुठी आवळल्या गेल्या अन पुढच्याच क्षणी तो त्याच्या अंगावर धावून गेला. आता काहीतरी विपरीत घडणार हे ओळखून बेगीने याशोदाकाकू ओरडल्या.’येदा जागेवरच थांब....आपल्या आबाचं सागणं इसारलास काय ?’

आईच्या बोलण्याने येदा जागेवर मुठी आवळत तिथेच उभा राहिला, रागाने लालाबुंद झालेला येदा स्फुंदत होता. समोरच्या शिसवी खांबावर हाताच्या बुक्क्या मारू लागला. दहा हत्तीचं बळ अंगी असलेला येदा रागानं नुसता थरथर कापत होता. त्याचा तो अवतार बघून जयाला धडकी भरली. तो वाडयाबाहेर निघून आला. या सर्व प्रकाराने दाराबाहेर उभे असलेले गावकरी आपसात कुजबुज करू लागले तसं वडिलांच्या पायाशी बसलेला एकनाथ उठला अन त्याने येदाला जवळ जाऊन आपल्या मिठीत घेतले अन त्याच्या डोक्यावरून हात फिरवत तो त्याला शांत करू लागला. येदाला त्याने वासुकाकांच्या पायाशी नेऊन बसवले. बाहेर उभ्या असलेल्या जयवंताजवळ एकनाथ गेला आणि त्याने त्याला हाताला धरून घरात आणले. जयाच्या मुलालासुद्धा त्याने पोटाशी धरले. गावकरी अवाक होऊन सगळे दृश्य बघत होते....

दुपार टळून गेली आणि दूर शहरात राहणारी वासुकाकांची एकुलती एक बहिण त्यांच्या वाड्यात रडत रडतच आली तेंव्हा शांत झालेल्या बायाबापड्यानी एकच टाहो फोडला. आपल्या वृद्ध भावाच्या तोंडावरून हात फिरवताना तिला भरून आले होते. आता बाहेर जमलेल्या पै पाहुण्यांनी चुळबुळ सुरु केली. मयतीचे सामान आले आणि सर्व सोपस्कार पार पडून वासुकाकांचा देह तिरडीवर ठेवला. त्यांची अखेरची आरती झाली. राम कृष्ण हरीच्या गजरात टाळकरी पुढे आणि मागे गावकरी त्यांना आपल्या खांदयावर घेऊन निघाले.

शेतातल्या पिंपळाच्या झाडाजवळच त्यांची चिता रचण्यात आली होती. त्यावर त्यांचा देह ठेवण्यात आला. गवऱ्या लावण्यात येऊ लागल्या. विष्णू पाटलांनी वासुकाकाना अखेरचे पाणी पाजण्यासाठी त्यांची मुले मुली आणि यशोदाकाकूला पुढे बोलावले. सर्वांनी आपल्या पित्याच्या ओठावर पाणी सोडले. भाळी बुक्का लावलेला वासुकाकांचा गोरापान सुरकुतलेला चेहरा त्यावेळी खुप तेजस्वी वाटत होता. झुकेलेल्या कानाच्या पाळ्या अन ओघळलेले ओठ त्यांचे प्राण निघून गेल्याचे खुणवत असले तरी चेहरामात्र ते आता काही तरी बोलतील इतका बोलका आणि प्रसन्न वाटत होता. त्यांच्या मुखात तुळशीपत्र ठेवून चेहरा गोवऱ्याने कायमचा झाकण्यात आला. त्यांची चिता आता पूर्ण रचून झाली होती. अग्नी देण्यासाठी रिवाजाप्रमाणे

थोरल्या मुलाला जयवंताला पाटलांनी पुढे बोलावले. तसं इतका वेळ शांत बसलेला येदा अंगात वाऱ्याचे उफान याव तसं उसळून पुढे आला आणि म्हणाला." थांबा, आबाला अग्नी दादा देणार नाही...त्येच्या पायी माझं आबा गेल्येत..एकनाथा माज्या भावा तुज्याच हाताने दहान दे रे माझ्या आबांना !"

जमलेले लोक अवाक झाले, एकनाथ गांगरून पुढे झाला तसं येदा म्हणाला " मी ह्यात तरी आता कोणाचंच काय ऐकणार नाही, आन जर का माझं ऐकलं नाही तर मीच चितेत उडी धिवून जीव दीन .'

एव्हढा वेळ शांत उभा असेलला जयवंत आता मात्र साफ कोलमडून गेला होता. तो चितेवरच पडला आणि मोठ्यामोठ्याने धाय मोकलून रडू लागला, 'आबा मला माफ करा. मला छातीशी घ्या आबा. चुकलो मी आबा...मला तुमच्या पदरात घ्या आबा..अस गुमान जाऊन नका आबा...मला निदान माफ तरी करा...मी तुमचा दोषी आहे...येदा बरोबर सांगतोय, माझीच सगळी चूक आहे. मी तुमचा घोर अपराधी आहे. चूक माझी होती आणि तुम्ही सजा स्वत:ला करून घेतलीत. असं का केलंत आबा तुम्ही ?"

असे म्हणून तो रडू लागला, "जसा गावाला चार पदरी रस्ता झाला, तसा आबांनी सगळ्यांसाठी सरकारशी भांडून पैसा मिळवून दिला. त्याना देखील काही रक्कम मिळाली पण त्यांनी तो पैसा देवळाच्या जिर्णोद्धारासठी वापरला तेंव्हा मला त्यांचा जरा राग आला होता. पण मी गप्प बसलो. नंतर काही महिन्यांपुर्वी इथल्या होऊ घातलेल्या टोल नाक्याची माहिती मला मिळाली.'

त्याचे हे वाक्य अर्ध्यात तोडण्याचा प्रयत्न एकनाथाने केला पण जया म्हणाला, " थांब आज बोलू दे मला, माझे पाप कबुल करू देत. माझा खरा चेहरा गावाला कळू देत. टोल नाक्याची जागा आमच्या शेताला लागूनच होती. त्याची सर्व माहिती मिळाल्यावर मला माझी बायको आणि पोरांनी तिथे हॉटेल काढण्याचे माझ्या मनात भरवले. जरी त्यांनी मला सांगितले असले तरी माझ्या मनात सुद्धा लालसा तयार झाली अन मी गावाकडे येऊन आबांशी त्या विषयावर बोललो. ते मला रानात घेऊन गेले,नेमकी जागा कोणती हे त्याना मला दाखवायचे होते. मी रस्त्यावर उभा राहून हातानेच इशारे करून त्याना हॉटेलसाठी लागणारी जागा दाखवली तसे त्यांच्या डोळ्यातून पाणी आले.

ते म्हणाले, 'सगळं शेत माग पण एव्हढी जागा सोडून काहीही तु माग. मी तुला ते देतो, हा माझा शब्द आहे तुला.' पण मी हट्टाला पडलो होतो. मी परत सहा महिन्यात दहा चकरा मारल्या अन त्याना म्हणालो वेळ निघून चाललीय मला लवकर तेव्हढा जमिनीचा तुकडा दया, मला बाकी काहीही नको, तेवढे जरी मिळाले तरी माझे आयुष्य सुखात जाईल.'

पण आबांनी नकार दिला. मग मी वाटण्या करून मागितल्या, आई आन आबा दोघेही दुखावले, माझे भाऊ बहिण माझ्यावर नाराज झाले. कावेरीने मला समजावून सांगितले पण पैशाची हाव सुटलेल्या माझ्या मनाने कोणाचाही सल्ला मानला नाही. एक दिवशी मी तहसील कार्यालयात जाऊन वाटणीची नोटीस देऊन आलो तंव्हा आबा माझ्या समोर हात जोडून रडले.

"ठीक आहे,तुझी इच्छा पूर्ण करतो' म्हणून त्यांनी माझ्या इतर भावंडाना अंधारात ठेवून मला त्या कागदावर सह्या दिल्या, रस्त्यालगतचा तो सलग एक एकराचा तुकडा त्यांनी माझ्या नावावर केला. पण त्या दिवसापासून ते शेतातच राहू लागले.घर जवळजवळ वर्ज्य केले. स्वत:ला ते क्लेश करून घेऊ लागले... त्यामुळे माझे मन खाऊ लागले पण मोहाचा वारू माझ्यावर स्वार झाला होता...मागच्या एक आठवड्यापूर्वी माझ्या हॉटेलची कागदाची पूर्तता झाली अन एक नवीन अडचण माझ्यापुढे उभी राहिली' ... जमलेला सगळा गाव कानात प्राण आणून जयाचे कथन ऐकत होता...

"सरकारी अधिकारयांनी नियमाप्रमाणे मला माझ्या जमिनीलगतच्या शेतकरयांच्या सह्या म्हणजे ना हरकत प्रमाणपत्र आणायला सांगितले होते. हा निरोप मी आबांना चार दिवसांपूर्वी येऊन दिला. तेंव्हा ते नखशिखांत हादरले. रडू लागले. झाले असे होते की रस्त्याला लागून असलेल्या त्या एक एकराच्या तुकड्यात आबांच्या वडिलांच्या आणि आजोबांच्या समाध्या होत्यां अन त्यावर त्यांची जिवापेक्षा

जास्त माया होती.

ते रडवेले होऊन म्हणाले.' जया तु पिंपळ तोडणार ? बापजाद्यांच्या समाध्या पाडणार ? घोर पाप आहे रे हे जया ! माझा जीव घे पर असलं वंगाळ काही करू नगस रे माझ्या वासरा !" माझ्या गालावर हात त्यांनी फिरवलेला तो अखेरचा हात. माझ्या मुळे त्यांनी स्वतःला कोंडून घेतले होते. त्यांचा जीव झुरत होता. पण माझे डोळे उघडत नव्हते ...

थोडा विचार करून ते म्हणाले, 'तु इथेच थांब मी घरी जाउन येदा आणि एकाशी बोलतो. कृष्णा कावेरीलाबी समदं सांगावे लागल.यशोदाला हे कसं सांगावं काही कळत नाही पर सांगाव तर लागंलच...'

"ते स्वतःशी पुटपुटतच वाड्याकडे गेले. त्या दुपारी त्यांनी सगळ्याना जवळ घेऊन सगळा प्रकार सांगितला. येदा आणि एका दोघांकडून शब्द घेतला की त्यांच्या माघारी देखील कोणी भांडणार नाही, कोणी वाद घालणार नाही. जयाने जर कुठल्या कागदावर सह्या मागितल्या तर त्या त्याला देऊन टाका असे ते म्हणाले. नंतर त्यांनी मळ्यात येऊन मला कागदावर सह्या घ्यायला आज यायला सांगितले. पण त्याना त्यांच्या जिवंतपणी हा दिवस बघायचा नव्हता. आपल्या पिंपळपानावर कुऱ्हाड चाललेली त्यांना सहन झाली नसती. वाडवडलांच्या समाधीच्या ठिकरया उडालेल्या बघून त्यांच्या काळजाचे तुकडे झाले असते हे आज माझ्या लक्षात आलंय. जे काही वाईट व्हायचे ते आपल्या पाठीमागे व्हावे हा विचार त्यांनी केला अन त्यांनी आपले जीवनदान दिले. त्यामुळे का होईना पण माझे डोळे उघडले. पण खूप उशीर झालाय, मी खूप चुकलो. माझी चूक कळण्यासाठी माझ्या आबांना जीव गमवावा लागला. इथून पुढे आयुष्यभर देवाहून श्रेष्ठ असणारया माझ्या वडिलांच्या मृत्यूचे कारण म्हणून मला जगावे लागेल. माझ्यासाठी हीच मोठी शिक्षा आहे. तुम्ही मला सांगाल ती शिक्षाही मी भोगेन, पण मला प्रायश्चित्त करायची संधी दया. आबा मला माफ करा" असे म्हणत तो जागेवरच ऊर बडवू लागला....

तसे पुढे होऊन विष्णू पाटलांनी आणि एकनाथाने त्याला सावरले. सगळे स्तब्ध झाले होते. शेवटी यशोदाकाकू आपले अश्रू पुसत पुढे झाल्या आणि म्हणाल्या, "तुला तुजी चूक कळली यात समदं आलं. तुला पच्चात्ताप हुतो ह्येचं त्येंच्या जीवाला समाधान होईल. त्यांचं संस्कार वाया जाणार न्हाईत ह्येचा मला इश्वास होता."

आईचे बोलणे ऐकून सगळी भावंडे एकमेकाच्या गळ्यात पडून रडू लागली. गावकरीसुद्धा शोकाकुल झाले. थोड्या वेळाने जयाच्या हातानेच वासुकाकांच्या चितेला अग्नी देण्यात आला.पिंपळाजवळ पेटवलेली वासुकाकांची चिता धडाडून पेटली आणि वारयाने गळून पडणारी पिंपळपाने हळुवार गिरक्या खात त्या चितेत स्वतःला झोकून देऊ लागली ....

या घटनेला आता बराच काळ लोटलाय.....जयवंताने आबांनी त्याच्या नावावर केलेली जमीन परत दिलीय. त्या जागेवर रस्त्यालगतच्या भागात वारीत पायी जाणारया वारकरयांसाठी एक मोठा हॉल जयाने स्वतःच्या खर्चाने बांधलाय. त्यांच्या विसाव्याची सोय करण्यात आलीय. मोठी बदामाची झाडे तिथे सावलीसाठी लावलेली आहेत. वारीच्या दरसाली मुक्कामी वेळेस जया आणि त्याचे कुटुंबीय पुण्याहुन गावाकडे येतात. आबांचे सगळे कुटुंब वारकरयांची सेवा करतं. शेताकडे येणं झालं की आजोबांच्या समाधीशेजारीच जिथं आबांची समाधी बांधलीय तिथं पिंपळाच्या झाडाखाली बसलेला जया झाडाच्या प्रत्येक पानात आपल्या आबांना पाहतो अन नकळत त्याच्या डोळ्याना अश्रूंची संततधार लागते. तो पिंपळ आता जणू काही त्यांचा पुराणपुरुष झाला होता. यशोदाकाकू त्याला पोटाशी कवटाळून आभाळाकडे बघत काहीतरी पुटपुटतात..

त्या पिंपळवेडया रातींना काळ्याकुट्ट आकाशात पश्चिमेला एक चांदणी जोमाने चमकत राहते.. तिच्याकडे बघत वाडयाच्या माळवदावर अंथरुणावर पडल्या पडल्या यशोदाकाकू हात जोडतात अन वासुकाकांच्या जगात स्वतःला घेऊन जातात.....

***

**समीरबापू गायकवाड**

**ई पत्ता : sameerbapu@gmail.com**

**पथनाट्य**

# *मराठी शाळाच*

**(एक भंगारवाला, त्याच्या खांद्यावर गोणी आहे. तो मराठी शाळा विकतोय. तेवढ्यात तिथे हवाल येतो)**

भंगारवाला : शाला लेलो.... इस्कूल... मराठी इस्कूल... जुना पुराना मराठी इस्कूल...

हवालदार : ए.... ए... हा... तुच... काय रे टोणक्या... काय करतोयस?

भंगारवाला : क्या हुआ साब?

हवालदार : अरे, क्या हुआ म्हणजे क्या हुआ? ये काय विकताय तुम? आयला आपलं हिंदी बोंबलतंय (स्वत:शीच)

भंगारवाला : साब हमको मराठी आती है.

हवालदार : ठीक आहे, ठीक आहे

भंगारवाला : ठीक हाय साब, जातो मी (जायला निघतो)

हवालदार : ए थांब.... थांब, आता तू काय म्हणालास?

भंगारवाला : जातो मी

हवालदार : माझ्या चेहऱ्यावर मी मूर्ख आहे असं लिहिलंय का? तू काय विकत होतास?

भंगारवाला : विकत नव्हतो साब, विकतोय... मराठी इस्कूल

हवालदार : काय सकाळ सकाळ लावून आलास काय (दारु प्यायची ऍक्सन करतो)

भंगारवाला : साब, मी पीत नाही और मैं सच्ची बोल रहा हूं

हवालदार : अरे शाळा काय भंगारात विकण्याची गोष्ट आहे का? चल तुला चौकीत नेतो आणि चांगला वठणीवर आणतो.

(तेवढ्यात एक साडी नेसलेली व गॉगल लावलेली एक बाई येते. ती शिक्षिका आहे)

शिक्षिका : एक्स क्यूज मी.... (दोघेही तिच्याकडे पाहतात) वॉट्स गोइंग ऑन?

हवालदार : बाई, कोण आहात तुम्ही?

शिक्षिका : आय एम टिचर, मी शिशिका आहे.

हवालदार : अहो शिशिका नाही ओ, शिक्षिका असं म्हणतात...

शिक्षिका : शुक शुक... तेच ते... बर्रं.. मला शांगा इथे खाय चालू हाय (इंग्रजी)

भंगारवाला : बेहेनजी, हम पुराना मराठी इस्कूल बेच रहे (लोकांसारखी बोलते)

शिक्षिका : ओ माय गॉड... दॅट्स अमेजिंग. मुझे भी एक स्कूल दे दो भैया.. कितने का दिया?

हवालदार : ए चुप्प... गप्प बसा. कितने का दिया. काय भाजी आहे का? कितने का दिया बोलायला.

शिक्षिका : माय गॉड, थिस हवालदार इस सो मिडलक्लास... लूक्स लाईक अ घाटी.

हवालदार : घाटी? घाटी नाही, मालवणी...

शिक्षिका : ओके मालवणी, मलाड वेस्ट

हवालदार : बाईचा वरचा मजला रीकामी आहे वाटतं. (स्वत:शीच बोलतो)

शिक्षिका : यस यस वरचा मजला रीकामी हाय. भाडेकरु हवाय.

हवालदार : वाटलंच (स्वतःशीच)

(तेव्हा समाजसेवक अण्णा तिथे येतात)

अण्णा : काय झालं रे बाबांनो. कसला गोंधळ मांडलाय.

हवालदार : (अण्णांना नमस्कार करुन) नमस्कार करतो अण्णा (अण्णा "असू दे" असं म्हणतात) अहो अण्णा, हा भंगारवाला मराठी शाळा भंगारात विकतोय.

अण्णा : काय? शाळा आणि भंगारात? काय रे.. कोण आहेस तू?

भंगारवाला : अन्ना हम भंगारवाला हूं. मराठी इस्कूल बेच रहा हूं. वो क्या है ना कि मराठी बच्चे अंग्रेजी इस्कूल में पढ रहे है. इसलिए अब मराठी इस्कूल बंद हो रहे है. तो इसलिए हम उन स्कूलो को भंगार में बेच रहे है. जैसे मानो कि अंग्रेजी पेपर की रद्दी को ज्यादा भाव है और मराठी पेपर के रद्दी को कम भाव है. वैसेही ये बंद पडा मराठी स्कूल है, तो इसे भंगार में बेचूंगा ना?

अण्णा : बात तो सही है.

हवालदार : अहो अण्णा तुम्ही सुद्धा? अहो मराठी शाळा का बंद पडत आहेत याचा विचार नको का करायला?

अण्णा : तुझं म्हणणं बरोबर आहे रे बाबा. पण याच्याही बोलण्यात तथ्य आहे. आपणच मराठी म्हणून कुठेतरी कमी पडलो आहोत. आज लोकांवर मराठी शाळा भंगारात विकण्याची पाळी आली?

(त्यांच्या बाजूला एक माणूस उभा असतो. तो सर्वसामान्य पालक आहे)

पालक : सगळा सावळा गोंधळ आहे. काय करावं तेच कळेनासं झालंय. लोक म्हणतात मुलांना इंग्रजी शाळेला घाला. इंग्रजी काळाची गरज आहे आणि काही लोक म्हणतात इंग्रजी शाळांमुळे मराठी शाळा मृत पावत आहे. पण आम्ही काय करायचं.

हवालदार : दादा कोण आहात तुम्ही?

पालक : मी... मी पालक आहे. एक सर्वसामान्य पालक... माझा मुलगा इंग्रजी शाळेत शिकतोय... पण... आता माझ्याकडे जीव देण्यापासून दुसरा पर्याय उरलेला नाही.

शिक्षिका :माय गॉड... तुम्ही कशाला सुसाइड करता...

पालक : शाळेची फी नाही परवडत ओ. यांची महिन्याला जेवढी फी आहे, तेवढ्या पैशात तर आम्ही आयुष्यभराचं शिक्षण घेतलंय. मुलाला चांगलं शिक्षण मिळावं, तो शिकून मोठा माणूस व्हावा या हेतूने आम्ही चांगल्या इंटरनॅशनल इंग्रजी शाळेत घातलं. पन आम्हाला या इंग्रजी शाळेने कर्जबाजारी करुन टाकलं बघा. आता हे मराठी शाळा भंगारात विकतायत, आम्हा पालकांनाही विकून टाका भंगारात. किमान त्या पैशानं तरी माझ्या मुलाचं शिक्षण होईल.
(तेव्हा तिथे सफेद कपडे घातलेला एक नेता येतो)

नेता : (भाषण देतो) मी मराठीचा... अशा तऱ्हेने इथे एक मराठी पालक हतबल झालेले आहेत. तर या ठिकाणी मी सांगू इच्छितो की हे परप्रांतियांचे कारस्थान आहे.

पालक : परप्रांतीय नाही साहेब. हे तर तुमचंच कारस्थान आहे.

नेता : हे पहा तुमचं मानसिक संतुलन बिघडल्यामुळे तुम्ही असं काहीतरी म्हणत आहात. तुम्ही घाबरु नका, मी तुम्हाला न्याय मिळवून देईन. मी तुमच्या पाठीशी आहे. तर या ठिकाणी

पालक : तिच तर भिती आहे ना साहेब. तुम्ही आमच्या पाठीशी आहात, म्हणूनच आमच्या पाठीत खंजीराचे वार आहेत. अहो इतकी वर्षे तुमचे सरकार आहे? काय केलंत तुम्ही आमच्यासाठी. अस्मितेचे राजकारणच केले ना?

अण्णा : होय, तुम्ही फक्त राजकारण केलेत. परप्रांतीय परप्रांतीय म्हणजे काय हो? ते देशबांधव आहेत आपले. मराठीच्या मुद्द्यासाठी तुम्ही महाराष्ट्र पेटवता, पण तुमची मुलं मात्र इंग्रजी माध्यमात शिकतात. हा कसला ढोंगीपणा आहे. म्हणूनच या भंगारवाल्याला मराठी शाळा भंगारात विकण्याची संधी तुम्ही दिली आहे.

नेता : मराठी शाळा भंगारात विकतोय? परप्रांतीय दिसतोय... काय रे, माज आलाय का?

भंगारवाला : नाही साहेब, माज नाही आला, पण तुम्ही मात्र लाज आणलीत.

हवालदार : अरे तू तर छान मराठी बोलतोयस.

भंगारवाला : मी मराठीच आहे. (सगळे अवाक होऊन पाहतात) होय मी मराठीच आहे. मराठी शाळा भंगारात विकण्याचं नाटक करत होतो. मराठी शाळा अजून तरी भंगारात विकल्या जात नाहीत. पण त्या भंगारात विकल्या जाण्याची वाट पाहत आहोत का आपण?

अण्णा : तू काय बोलतोयस. हे कळू लागलंय थोडं थोडं

भंगारवाला : अण्णा... तुम्ही तर ज्येष्ठ आहात. एके काळी तुम्ही मराठीचे प्राध्यापकही होता. आपण मराठीच्या संवर्धनासाठी काहीतरी करु शकतो ना?

अण्णा : नक्की करु शकतो. अरे आपण महाराष्ट्रातल्या आणि संपूर्ण भारतातल्या पालकांना आवाहन करु शकतो की त्यांनी त्यांच्या पाल्यांना मातृभाषेतून शिक्षण द्यावं. मातृभाषेतून शिक्षण मिळाल्यामुळे त्याची बुद्धी लवकर वृद्धींगत होते. गोष्टी त्याला लवकर कळू लागतात.

भंगारवाल : होय... आणि जपान, फ्रान्ससारखे देश आपली मातृभाषा जपून सुद्धा जगावर आपला प्रभाव पाडत आहेतच. अर्थात इंग्रजी शिकणं महत्वाचं आहेच, पण इंग्रजीतून शिकणं मुळीच महत्वाचं नाही.

अण्णा : अगदी बरोबर बोललास बाळा...

नेता : तर या ठिकाणी...

हवालदार : गप्प बसा ओ जरा... ही काय तुमची सभा नाही

नेता : हवालदार... (ओरडतो)

हवालदार : ओरडू नका, आवाज मलाही काढता येतो.

शिक्षिका : तुम्ही भंगारवाला नाय, तर तुम्ही कौन हाय?

भंगारवाला : मी? मी प्रबोधक... (सगळे अवाक होऊन पाहतात आणी "प्रबोधक?" असे म्हणतात) होय मी प्रबोधक आहे. महाराष्ट्रासाठी जे जे उत्तम उदात्त उन्नत ते ते साकार करण्यासाठी झटणारा प्रबोधक.

अण्णा : मग बेटा, भंगारवाल्याचं सोंग का घेतलंस?

भंगारवाला : लोकांना जागं करायला...

अण्णा : जागं करायला?

भंगारवाला : होय अण्णा, जागं करायला... मराठी शाळा भंगारात विकल्या जात आहेत, हा मराठी जनांसाठी अपमान आहे. किमान यामुळे तरी मराठी पालक आपल्या मुलांना मराठी शाळेत घालतील आणि तुम्ही म्हणालात तसं मुद्द मराठीचा नाही, मुद्दा मातृभाषेचा आहे. भारतीय भाषांचा आहे. इंग्रजी ही खुपच गोड भाषा आहे, ती आत्मसात केलीच पाहिजे. पण म्हणून काय आपण मराठीचा गळा आवळायचा? अहो आपले सगळे महापुरुष मातृभाषेत शिकले, त्याचं काहीच आडलं नाही. मग आपल्यालाच का नडतं?

हवालदार : बरोबर आहे तुमचं. मी तुमच्यासोबत आहे. माझी बायको पोटूशी आहे (लाजत बोलतो) आम्हाला मुल झालं की आम्ही त्याला मराठी शाळेतच घालू.

शिक्षिका : ओके... मी पण तुमच्या सपोर्टमध्ये हाय.

पालक : मला तुमचं म्हणणं पटलं. मी सुद्धा तुमच्यासोबत आहे.

हवालदार : (नेत्याकडे पाहून) काय साहेब, तुम्ही आमच्यासोबत नाही? कदाचित यात तुमच्या पक्षाला फायदा नाही होणार, पण महाराष्ट्राचं नक्कीच भलं होईल.

नेता : ठीक आहे... तर अशा तऱ्हेने, मी सांगू इच्छित आहे की मी प्रबोधकसोबत आहे. मी प्रबोधकचा प्र,... (सगळे नेत्याकडे पाहतात आणि "एएएए" असं म्हणतात. नेता दचकतो आणि "माफ करा" म्हणतो)

भंगारवाला : तर मग चला, आपल्या मातृभाषेला, माय मराठीला वाचवूया, आपल्या मुलांना मराठी शाळेतच घालूया... हा निर्णय केवळ मराठीच्या अभिनामासाठी नव्हे तर आपल्या पाल्याच्या बौद्धिक विकासासाठी आहे, हे लक्षात ठेवा. चला विचार बदलूया... कारण विचार बदलेल, तर महाराष्ट्र घडेल आणि मराठी शाळा टिकेल...

(सगळे हात जोडून एकत्र मराठी अभिमानगीत म्हणतात)

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी**
**धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी**
**एवढ्या जगात माय मानतो मराठी**

***

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**
**ई पत्ता : smartboy.mestry5@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६७७९६२५४**

**कविता**

## *लुगडं*

ओढ्यावर धुणं धुताना
पोर म्हणालं
माय तू
नवं लुगडं का नाय घेत
येक ठीगळ लावल्यालं
आन
दुसरं सारखं शिवल्याल.
पोरा...
येक गरिबी सुखात भोगलेलं
लुगडं माहेरचं
आन
दुसरं फाटकं आभाळ शिवलेलं
लुगडं सासरचं.
म्हणाली माय मुका घेत
पुस्ताक शिकून पोरा
तूच घे की नवं लुगडं
आत्मविश्वासाच्या डोंगरावर
उभं राहून पोर म्हणालं
व्हय माय
म्याच घेईल तुले नवं लुगडं.

***

**मनिष मालुसरे**
**९४९,आनंद नगर, शिवसेना शाखे जवळ,**
**श्री साई समर्थ क्लासेस,**
**कोपरी, ठाणे पूर्व ४००६०३**
**ई पत्ता : manishmalusare005@gmail.com**
**मोबाईल क्रमांक ९८६७१३५५१३**

कविता

## सिंधू अन साक्षीला

( पान जागे फुल जागे, भाव नयनी जागला चंद आहे साक्षीला या गाण्याच्या चालीवर. कौतुक गीत सिंधू अन साक्षीसाठी.)

देश जागे, नेते जागे, अभिमान आम्हा वाटला
सिंधू अन साक्षीला, सिंधू अन साक्षीला,

पदकांचा सुगंध आला, कालच्या त्या रात्रीला
सिंधू अन साक्षीला, सिंधू अन साक्षीला,

हर्षाची हि बातमी, हा दरारा बोलतो
देश हा, राज्य हा, आनंदाने डोलतो

कन्यारत्नाच्या यशाने देश हा सुखावला
कोडगा, बावळट हा, रोखे कन्या जन्मा

सांग ना शोधूनी, दीपकाच्या पराक्रमा
आज दोघींनी या, यशाचा मार्ग खेचिला
***

**गजाभाऊ लोखंडे**
**ई पत्ता : gaja.lokhande@airindia.in**
**मोबाईल क्रमांक : ९९६७७९६२५४**

## मराठी विचारधन

आयुष्यात काही शिकायचं असेल तर ते पाण्याकडून शिकावं, वाटेतला खड्डा टाळून नाही तर ते नेहमी भरून जावं...
***

**संग्रहित**

कथा

## तात्या

"आई तात्या कुठे गेलेत?" चहाचा कप हातात घेत संजीव म्हणाला.
"संध्याकाळचा फेरफटका मारायला गेलेत."
"मग तुझी काय टाप लागून राहिली त्यांना विरोध करायला."
"संजीव.. जास्त आगाऊपणा करू नकोस हं!"
"आई पहिले तात्यांचा काय रुबाब असायचा ना कॉलनीत,सीमेवरून आले की, बघायलाच नको.. काय स्वागत व्हायचे.. फुलांची आतषबाजी उधळायची, राजकारणी नेते आपल्या घरी उंबरठे झिजवीत असायची. आम्हा भावंडाची एक वेगळीच ऐट असायची ना!"
"हो पण हे सारं आता भूतकाळात जमा झालं. आता कसला सत्कार नाही की कोणी राजकारणी पुढारी नेते आपल्या घराचे उंबरठे झिजवीत नाहीत." आईने डोळ्याला पदर लावला.
"क्षण ही आपल्या हातून निसटून ही बराच काळ लोटला जातो. ईश्वराची कृपा की काय, मृत्यूच्या दाढेतून तेसुखरूप वाचले, पण पायाचे अपंगत्व मात्र दुर्दैवाने नशीबात आले."आई.
"अहो ऐकलंत का? केव्हापासून आवाज देतोय पण तुम्हा मायलेकराचे लक्षच नाही. एवढ्याकाय गुजगोष्टी चालल्या होत्या."
कुबड्यांच्या साथीने तात्या घरात डोकावले.
"तात्या तसे काही विशेष नाही. नेहमीचंच.. तुमचे कसे पहिले सत्कार व्हायचे सीमेतून आल्यावर.. ते दिवस आठवले."
"संजीव बेटा गेले ते दिन गेले. आता जुन्या आठवणी उगाळून काय मिळणार? कोळसा कितीही उगाळला तरी काळाच राहणार, पांढरा होणार नाही."
"तात्या मान्य आहे. जुन्या आठवणी उगाळण्यात काही अर्थ नाही, पण एका ओळीचे समाधान तरी मिळते ना,एखाद्या व्यक्तीला विशेषतः सैनिकाला एवढा आदर मिळतो हे मी अनुभवले. तुमची दिमाखदार ऐट पाहून मीही सुखावून जायचो. माझी पण सैन्यात जायची इच्छा बळावत होती, पण आईने माझ्याकडून सैनिक न बनण्याची शपथ बेसावधपणे घेतली. मग काय माझे सैन्यात भरती होण्याचे स्वप्न तरंगत राहिले."

"संजीव.... आईचा कंठ दाटून आला.
"अरे एखाद्या स्त्रीचा मुलगा अथवा पती सीमेवर जेव्हा लढत असतो तेव्हा ती डोळ्यांत प्राण साठवून अश्रूंचे निरांजन करून दरवाजाकडे डोळे लावून बसलेली असते रे, त्यावेळच्या मनाची घालमेल मी समजू शकतो. मग यात तुझी आई अपवाद कशी राहणार? भलेही सर्व सोयी सुविधा मिळतात, पण हे सारे क्षणभंगुर असतं, कारण यासाठी खूप मोठी किंमत मोजावी लागते. लाडक्या पतीचे / मुलाचे अचानक जाणे हेच दु:खं आभाळ कोसळण्यासारखे असते. शहीद झालेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना सहानुभूती देतात. अर्थात अशा सहानुभूतीत चिमुटभर काळजी, आपुलकी, संवेदना असते तर ढीगभर लाचारी देखील असते. राजकारणी पुढारी शहीद सैनिकाचे बॅनर लावून श्रद्धांजली वाहतात तर काही अति गाजलेले राजकारणी नेते चेक देऊन प्रसिद्धी माध्यमातर्फे प्रदर्शन करतात. सारंच विचित्र असतं. अशा वेळी समोरच्यांच्या दु:खांचे सांत्वन करायला मंडळी येतात का झालेल्या दु:खात अधिक भर घालायला येतात. हेच कळत नाही."तात्यांची खंत.
"खरंच तात्या.. ही वस्तुस्थिती आहे, पण एक खरे आहे की, सैनिकाची पत्नी ही तिचापती जिवंत असे पर्यंत एका अर्थी विधवेचं आयुष्य जगत असते. हे कटू सत्य आहे."
"संजीव अशा सांजवेळी अभद्र गोष्टी बोलू नकोस रे. जिवाचा तीळ होतो. चल फ्रेश हो. आल्यापासून तुझं सैनिक पुराण चाललं आहे."
तात्यांनी संजीवला नजरेने इशारा केला. तेव्हा आई पदराने डोळे पुसल्याचे चित्र दोघांच्याही मनात भरले.

सकाळीच संगीता ताईचा फोन आला तिने तात्यांबद्दल चौकशी केली.
"तायडे अगं तात्या रोजच मॉर्निंग वॉकला जातात त्यांना अडवणे अवघड आहे, तुला माहितच आहे.थोड्या वेळाने फोन कर."
"मॉर्निंग वॉक आणि अशाही अवस्थेत?" तिचा प्रश्न अधिक काळजी.
"हो ना, तुला तर माहितच आहे ना, आपले तात्या किती ग्रेट आहेत ते. कुबड्या हातात घेऊन अडखळत चालण्याच्या अवस्थेतही त्यांनी मॉर्निंग वॉकचा नियम मोडला नाही."
"हो रे.. खरंच खूप अभिमान वाटतो मलाही तात्यांचा."
"ताई राकेश भाऊजींचे पिणे जास्त वाढले?"
"अगदी मनकवडा आहेस.नेहमीचेच रे.. राकेशच्या विचित्र वागण्याचा मला प्रचंड त्रासहोतो कधी कधी .. केवळ रिमाकडे पाहून सहन करते.. त्याला कधीकधी स्वत:चीच खूप मगरूरी येते. सासू सासरे, दीर जावा, नणंदा सारेच राकेशचे उदोउदो करीत असतात सर्वांनी रिमाला नको तितके लाडावून ठेवले आहे. माझ्या एकटीची कोंडी होते. अति लाडाने ती बिघडेल हे कटू सत्य स्वीकारायला कोणीच तयार नाही. मी माझ्या परीने समजावण्याचा प्रयत्न करते."
"शांत हो.. ताई..
"आई कशी आहे?" ताईनेच विषय बदलला.
"अगदी मजेत. कालच संध्याकाळी आम्ही तुझी आठवण काढली होती. आपले बालपणीचे दिवस किती सुखाचे होते ना.. तात्यांचे सैन्यातील दिवस आठवत होतो."
"हो रे.. ते बालपण तर माझ्या मनात अल्बमसारखे फ्रेम झाले आहेत. आता माहेर ही दूर पडायला लागले ना.. पहिले तर बेस्ट बसने केवळ अर्ध्या तासाच्या अंतरावर सासर होते. तेव्हामाझे येणेजाणे होत राहायचे. राकेशने त्याच्या आईच्या हट्टामुळे कल्याणला घर घेतले, तेव्हापासून अंधेरी ते कल्याण बराच अंतर काटावंलागतं. आधी राकेशने नोकरी करू दिली नाही आणि आता नोकरीचा विचार ही करू देत नाही, त्यामुळे भेटणे दुर्मिळ होतेय. तात्या मागच्या महिन्यात आले पण मला येणे शक्य झाले नाही. मी मुलगी म्हणून कर्तव्यात कमी पडतेय असे टोचतराहतं मनात."
"अगं मी आहे ना त्यांची काळजी घ्यायला, कर्तव्य पूर्ण करायला."
"हो रे तेवढाच एक दिलासा.. रिमाला तिच्या लाडक्या तात्या आजोबांकडून सैनिक विषयावर निबंधासाठी मुद्दे हवे आहेत ना त्या निमित्ताने येथे येणे शक्य होत आहेएवढेच.
चल मी तुझा खूप वेळ घेतला. रिमाला उद्या घेऊन येईल... चल बाय."
"बाय ताई..

रविवारचा दिवस उगवला, संगीता ताई,रिमा आणि राकेश घरी आले. रिमाने तर तिची छोटीशी पर्स देखीलसोबतआणली होती. त्यात तिची पेन्सिल, वहीहोती. ना.. आई तर लेकीच्याआणि जावयाच्या आवडीचे जेवण बनविण्यात मग्न होती. ताई तिला मदत करीत होती. संजीव,

तात्या, राकेश आपल्या विषयात गर्क होते.तात्या आजोबांकडून रिमाला निबंधासाठी खूप मदत झाली होती. तिला तिच्या निबंधाचे मुद्दे मिळाल्यावर खूप खुश होती. एकंदरीत सर्व वातावरण आनंदात दिसत होतं. तात्यांचाकरारी स्वभाव असल्याने त्यांनीच त्यांच्या अपंगत्वाचा डांगोरा पिटवला नाही. रविवार जसा उगवला तसेच मावळला आणि तो ही आनंदात

\

संध्याकाळ उलटून गेली होती

"अजून संजीव घरी आला नाही."

पेपर वाचत बसलेल्या तात्यांना आई सांगत होती.

"अहो येईल तो. गाड्या लेट असतील." तात्यांचे समजावणे.

"पण एवढा वेळ तर कधीच होत नाही. ऑफिस मध्ये जास्त काम असेल तर त्याने तसे घरी कळवायला नको का, काळजी वाटते हो."

"अहो एवढीकाळजी करू नका, तुम्हीजरा तुमच्या काळजीतून स्वेच्छानिवृत्ती घ्या. आधी माझ्या काळजीने अर्धा संसार रेटला आणि आता लेकाच्या काळजीने..

"नक्की गाड्या लेट असतील? का रस्त्यात कुठे दंगल तर झाली नसेल ना!" आईची वाढती काळजी.

"थांबा टिव्ही लावतो." तात्या टिव्हीच्या दिशेने वळले.

बातम्या सुरु होत्या. स्टेशनजवळ राजकारणी पुढा-यांच्या कार्यकर्त्यांची दंगल झाली होती. सामाजिक नेत्याच्या पुतळ्याची विटंबना एवढाच विषय दंगलीला पुरेसा होतो.

इथे आई तात्यांची काळजी वाढली. संजीव घरी येईपर्यंत जीव मुठीत धरून बसले होते. दरम्यान ताईचा ही फोन येऊन गेला. तिने आई तात्यांना काळजी करू नका तो येईल असे सुचविले.

रात्री ब-याचउशीरा संजीव सही सलामत घरी आला. दोघांचा जीव भांड्यात पडला.

सकाळी निघालेली कोणतीही व्यक्ती संध्याकाळपर्यंत सुखरूप घरी पोचेल याची शाश्वती हल्ली नाहीशी झाली होती.

दंगलीचे वातावरण आठवडाभर चालू होतं. दंगल पुढाकार घेतलेल्या नेत्यांच्या कार्यकर्त्यांविरुद्ध अटक करणे वगैरे सारे मार्ग सुरु असतात. वर्तमानपत्र अशा बातम्यांनी भरले जातात. प्रसिद्धी माध्यमे जीभ कोरडी होईपर्यंत घराबाहेर न पडण्याची सूचना देत असतात. फार भयानक चित्र असतं अशा वेळी. पुन्हा नेहमीसारखे दिनक्रम सुरु झाले. कारण मुंबईचा चाकरमनी कोणत्याही घटनेने कितीही धास्तावलेला असला तरी जीव मुठीत धरून, काळजी मनात साठवून, मनावर दगड ठेवून कामावर जायला सुरुवात करतो. हे आपल्या लाडक्या मुंबईचे वैशिष्ट्यच म्हणता येईल.

संगीता ताईने फोन केला. संजीवची चौकशी झाली, सारे काही तिचे मजेत चालल्याचे भासवत राहिली. लेक आपल्यापासून काही तरी लपवीत आहे हे तात्यांना कळले.

"बेटा मी तुझा जन्मदाता आहे. मुलांनी आई बाबांकडे कितीही लपवण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना बरोबर समजतं. तू ही एका मुलीची आई आहेसच ना, तुला रिमाचे बदललेले वागणे कळतेच ना! मागे घरी आली होतीस तेव्हाच माझ्या लक्षात आले होते. तू ही फारशी माझ्या समोर एकटी अशी आली नव्हतीस. नंतर तुझ्याकडे यावे हा विचार ही गिळावा लागला कारण मला एवढ्या लांब येणे शक्यही नव्हते. नाही तर राकेशचा कान पिळून विचारले असते माझी पोर उदास का वाटते?"

अखेर तात्यांनी मुद्द्यालाच स्पर्श केला.

"तात्या तुम्ही ग्रेट आहात. खरे तर मी सारे मनात लपविण्याचा प्रयत्न करीतच होती. माझ्या मनाची घालमेल राकेश ही ओळखू शकत नाही, पण तुम्ही, संजीव, आई बरोबर ओळखता. ख-या अर्थाने तुम्ही सारेच माझ्या सुखापेक्षा दु:खाचेच अधिक वाटेकरी आहात."

"संगीता विषय बदलल्याने प्रश्न संपत नसतात. उलट ती अधिक चिघळतात."

"तात्या मी रिमाला घेऊन कायमची माहेरी यावं असं वाटतंय. राकेशची मगरूरी अधिकच वाढत चालली आहे. त्याचे सततचे बदलणारे विक्षिप्त वागणे बघितले कि माझी घुसमट होते. त्याच्या समोर तो मला स्थानच देत नाही. माझी एवढी चांगली नोकरी सोडून मी संसाराला लागली. अजून पर्यंत कोणतीही तक्रार मी कोणाकडे केली नव्हती."

"आणि बापाने विचारल्यावर, विनंती केल्यावरच आठवतं ना!"

"तात्या.. संगीताचा आवाज जडावला.

“तात्या मला माफ करा.माझा स्वाभिमान चिरडला जात आहे."

"एक काम कर बेटा. जोडून दोन दिवस रजा असेल तेव्हा राकेशला घेऊन ये इथे. तू घाबरू नकोस. तुझे नावही यात येणार नाही."
"पण राकेशचा विचार बदलणारा नाही...
"ते मी बघेल गं. स्वतःला सावर. कणखर बनव तेव्हाच आपण यशस्वी होऊ शकतो. तू तुझी काळजी घे"

"आजोबा.... रिमाने आवाज दिला.
राकेश, संगीता आई तात्यांच्या पाया पडले.
"आजोबा मला तुम्ही अजून खूप खूप गोष्टी सांगायचे कबूल केले आहे माहित आहे ना."
सहावी इयत्तेत शिकत असलेली रिमा लाडक्या आजोबांना बिलगली.
तिचा संजीव मामा आल्यावर ती आजोबांपासून दूर होऊन मामाकडे धावली. तिला छान छान गोष्टी सांगणे म्हणजे मामाचे परमकर्तव्य.
जेवणं उरकली. जोडून रजामिळाल्या मुळे राकेशला तात्यांकडे येणे शक्य झाले. राकेश बदलला असलातरीही तात्यांसमोर एकदम सुतासारखा सरळ. राकेशला त्यांचा खूप आदर आहे.
"राकेश जरा बाहेर फेरफटका मारून येऊ या."
"हो नक्की." त्यानेही कबुली दिली.
" मी पण येऊ?"
"रिमा... संजीव मामा तिच्या मागून आला.
"चल तुला चांदोबा मामाची गोष्टसांगतो." संजीव मामाने युक्ती शोधली.
"खरंच मामा.. गोब-या गालावर हाथ ठेवत रिमाचा आनंद.
तात्यांनी राकेशबरोबर इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या. राकेशची कामाची पोस्ट वाढलीत्यामुळे तो थोडा चिडचिडा झाला होता इतकंच.जितके हाताशी मुद्दे येतील तेवढे उकरून काढले. मग त्यांनी घर, जबाबदारी, कर्तव्य, संस्कार, एक स्त्री घरात कशी भूमिका घेते आणि तिच्याकडे घरातले पुरुषमंडळी कसे दुर्लक्ष करतात ते पटवले. हेसारं मनाच्या डोळ्याने बघायला पटवले. सरते शेवटी राकेशला त्याची चूक कळली. शिवाय ते सीमेवर लढताना, युद्ध संपल्यावर घरी येताना घरातील सर्वजण डोळ्यांत प्राण साठवून वाट पाहत असल्याचे चित्र डोळ्यासमोर आणून दिले. क्षणभरातच राकेशची धुंदी उतरली होती. तात्यांनी राकेशला संगीताने सांगितल्याचा थांगपत्ताही लागू दिला नव्हता.

संगीता खुशीने वागत होती. राकेशच्या वागण्यातला बदल तिला सुखावून जात होता. नाहीतर उगाचच याच कारणासाठी कायमची घर सोडून आली असती. इथे तात्यांनी दुभंगणारं घर सावरलं.

गोंधळ कानी पडला म्हणून टिव्हीवरची नजरउचलत तात्या खिडकीजवळ आले. जातीवरून दंगल उसळली होती. निर्दोष मारले जात होते. बाहेर लोकांची धावपळ चालली होती. राजकारणी कार्यकर्त्यांच्या पक्षात वाद सुरु होता. एकूण भीतीदायक वातावरण झाले होते.सीमेवर लढताना देखील स्वतःच्या जीवाची पर्वा न करता आम्ही सारे सैनिक एकजूट होऊन शेवटच्या क्षणापर्यंत लढत असतो. तिथे कसलाही स्वार्थ नसतो. भारतमातेचे सुपुत्र बनून लढत असतो, तिथे कोणतीही नाती डोळ्यांसमोर आणत नाहीत. भारतमातेचे रक्षण हेच आमचे कर्तव्य असते. आणि इथे आपापसातले वाद पाहून तात्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. जाती जातीवरून की धर्मावरून वाद उसळला होता हे नक्की समजणे अवघड होते.नीटसे कारण कळलेले नव्हते.
ते घरातच येरझा-या घालत होते.
शेवटी न राहवून ते कुबड्यांच्या साथीने बाहेर आले.
"काय झाले? तात्या गरजले.
तात्यांसमोर बोलण्याची किंवा रोखण्याची कोणाचीही हिंमत झाली नाही.
"थांबा... बंद करा हा आक्रोश... दंगली उसळताय.. हिंसाचारात सर्व सामान्य जनता चिरडली जातेय. हे दिसत नाहीये का?एवढाच जर जोश तुमच्यात असेल तर जा सीमेवर लढा. तिथे जाती जातीचे युद्ध नसते. धर्माचे युध्द नसते. आपल्याच माणसात भांडणं नसतात. सर्व एकजुटीने स्वतःच्या जीवाची पर्वा न करता परकीय शत्रूंशी लढत असतात. सैनिक भारतसीमेचे रक्षण करतात म्हणूनच इथे तुम्ही सारे सुखाने घास खात असता. प्रत्येकाला जीव नकोसा झाला असेल तर जा सीमेवर शत्रूंशी लढा. इतकेही शक्य नसेल तर मनातील वाईट विचारांना नष्ट करा. कोणा एकाच्या चुकीमुळे तुम्ही सारे किती जणांचे जीव धोक्यात

घालणार आहात. इथे आळा घाला तुमच्या दुष्ट विचारांनातेव्हाच पुढची पिढी या सर्वांपासून वेगळी राहील... हाणामारी, खून खटला, मारामारी, माणुसकीचा बळी हीच तुमची मुलभुत कर्तव्य आहेत का? या वागण्यामुळे तुम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक आहात हे सिद्ध होणार आहे का? आपल्या देशावर प्रेम कराल, आदर राखाल तेव्हाच आपल्या देशाच्या समस्या ह्या आपल्याच आहेत असे समजाल आणि तेव्हाच आपला देश विकासाच्या दिशेने अधिक प्रगती करेल. अभिमान बाळगा जरा आपल्या देशाचा.. देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झटलेल्या प्रत्येक क्रांतिकारी नेत्यांची आठवण ठेवा. ज्यांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून केवळ स्वतंत्रतेचा ध्यास घेतला. परिणामी वाट्याला येणारी सर्व दु:खे गिळली, पचवली. देश स्वतंत्र झाला तेव्हाच आपण आता स्वातंत्र्याचे सुख अनुभवीत आहोत.प्रत्येकांनीच असा स्वार्थ पाहिला असता तर अजूनही आपला देश इंग्रजांच्या गुलामीतच असता, हिंसाचार, जाळपोळ, हाणामारी, खून खटले ही नैतिकता नाही केवळ हिंसा आहे. काढून टाका ती मनातून. लोकशाही म्हणजे स्वतंत्र देशाची अमुल्य देणगी आहे. या देणगीचा जरुरी इतकाच उपयोग करा, अति वापर करता म्हणून हे असे भयानक करूण दृश्य बघण्याचे दुर्दैव नशिबात येते.”

तात्यागरजले खरे पण त्यांच्या डोळ्यांतून दु:खं झरझरत होतं, तळमळत होतं हे सर्वांनाच कळून चुकले होते. एकाएकी सर्व वातावरण शांत झालं. तात्या जड मनाने मागे वळले. त्यांची पत्नी, संजीव, धास्तावलेले, भीतीने थरथरत होते. कदाचित त्यांच्या जीवावरही बेतले असते.

पुन्हा एकदा हा वाद, हिंसाचारकेवळ एकट्या तात्यांमुळे मिटला होता.

तात्यांसारखे व्यक्तिमत्व जिथे जिथे असेल तिथे तिथे ते स्वत:चे घर सावरून देशाचे नागरिकत्व, कर्तव्य निभावून देशाची लाज राखू शकतात.

***

**पुष्पलता करंगुटकर**
**ई पत्ता : push_gick@yahoo.co.in**

**कविता**

## *रोज होई भेट आपुली*

रोज होई भेट आपुली शब्द कसे आठवेना
नजरांची नजरभेट होई नजर कशी हटेना

शब्दांवाचूनही बोलून गेलो मनात झरझरणारे भाव
बेहोषीत मग्न पावलांना भान कसे उरेना

धावुनी येते वाटेवर का तुझ्या चेहऱ्यावरचा प्रश्न
युक्तीने भिरकावते कारण कसे ते कळेना

वाऱ्यासारखी सुसाट पळे वाटेवर तुझ्या
ओढीने पावले एकत्र यावी कशी ती वळेना

तू नेहमीच अबोल अन मी बडबडी
आता मी ही अबोल कशी ते सुचेना

अबोला ठेवून वाचता येते मन
तुझ्याकडून शिकली कधी ते आठवेना

वळत्या पावलांना वाट माहित नाही
हुरहुरत्या ओढीला नाव आता स्मरेना

प्रेमच म्हणावे लागेल ना
तळमळणं दोघात एकरूप होतं कसे ते समजेना

ओरडून सांगावं अख्ख्या विश्वाला तुझ्या माझ्या प्रेमाची कहाणी
मनाशी एकटीच संवाद साधे कारण तुला ते पटेना

***

**पुष्पलता करंगुटकर**
**ई पत्ता : push_gick@yahoo.co.in**

**कथा**

# गावाकडची गोष्ट

"आई शप्पथ सांगतो त्या झाडावर काहीतरी होत." दिघ्या थरथर कापत म्हणाला.

"झाल... सुरु झाले याचे भास आणि आभास. दिघ्या साल्या चढली बहुतेक तुला. काहीतरी नाही कोणीतरी म्हण."जेटली हसत म्हणाला.

"म्हणजे?" डोळे विस्फारून दिघ्याने जेटलीकडे बघितले.

"हा हा हा! म्हणजे साल्या तुला हडळ दिसली असेल तिथे त्या झाडावर. अशक्य घाबरट आहेस तू. गपचूप पेग भर आणि तोंडाला लाव. आपण इथे इतक्या बाजूच्या व्हिलामध्ये आलो कारण कोणी डिस्टर्ब करायला नको. आणि नशिबाने खरच कोणी नाही इथे आजूबाजूला. तर तुला काहीतरी आणि कोणीतरी दिसतं आहे." जेटली वैतागत म्हणाला.

जेटलीच्या पहिल्याच वाक्याने दिघे कमालीचा दचकला होता. पण ते जेटलीच्या लक्षात आल नाही. "जेटली... खरच रे! तू एकदा मागे वळून त्या झाडाकडे बघ तरी. हलत आहे कधीच काहीतरी त्या झाडावर." दिघ्या विनवणीच्या स्वरात म्हणाला.

"तो इतकं म्हणतो आहे तर बघ की रे जेटली." शांतपणे आपल्या ग्लासातल्या बर्फाच्या तुकड्याकडे बघत काणे म्हणाला.

"भडव्या तू बघ न. तू मात्र तुझ्या ग्लासातल्या बर्फाकडे बघतो आहेस ना?" जेटली काणेला टोचत म्हणाला.

"अरे मी दिघ्याच्या वटवटीने डोक फिरू नये म्हणून बर्फाकडे बघत डोक शांत करतो आहे." काणेने दिघ्याला टोमणा मारला आणि जेटली आणि काणे मोठ्याने हसायला लागले.

"करा...... माझी चेष्टा करा. पण मग तुमची अवस्था माझ्या जुन्या मालकांसारखी.....नारायण रावांसारखी....झाली तर माझी जवाबदारी नाही." दिघ्या त्या झाडाकडे बघत जेटली आणि काणेला म्हणाला.

"त्यांची आणि आमची अवस्था सारखी कशी होईल? ते चार पेग नंतरही तुझी बकवास ऐकायला शुद्धीवर राहू शकतात का?" काणे बर्फावरची नजर उचलून थंडपणे दिघ्याला म्हणाला.

"राहीलं! तुम्ही दोघ संपवा तुमचा चौथा पेग. मग मी पुढचा भरतो. फक्त पीत राहूया हा आपण." दिघ्या चिडून म्हणाला. पण अजूनही त्याची नजर बाहेरच्या झाडावरून हलत नव्हती.

"दिघ्या.......... भेनच्यो......"जेटलीने सुरवात केली.

"जेटली... शिव्या आवर.मी माणसांना नाही घाबरत समजल. तुझ्या शिव्याना मीसुद्धा शिव्यानीच उत्तर देऊ शकतो हे लक्षात ठेव. साल्या तू एसी वाल्या थंडगार खोलीत बसून कागदावर जे काम ठरवतोस ना ते मी कामगारांबरोबर फ्लोरवर उभा राहून करून घेतो. त्यामुळे असली भाषा तू क्वचित बोलत असशील. माझी रोजचीच आहे." दिघ्या आता पेटला होता.

एकूण प्रकरण तापतं आहे हे लक्षात येऊन जेटली काही म्हणायच्या आत काणेने विषय बदलला. "दिघ्या आजकाल तू सारखा चिडायला लागला आहेस. चल सोड ते! बर, सांग बघू कोण ते तुझे नारायणराव? काय झाल त्याचं? बाकी आपल्या आऊटींग्स मध्ये एखादी इंटरेस्टिंग स्टोरी असलीच पाहिजे न. पण आज आपण असली सोय केलेली नाही. तेव्हा दिघ्याच्या नारायणरावांच्या गोष्टीवर आज तहान भागावूया."

"ओके. मान्य. सॉरी दिघे साहेब. कृपया आपण माझे बोलणे मनावर न घेता आपली स्टोरी सांगाल का?" नाटकी अविर्भावात जेटली म्हणाला. जेटलीच्या माघार घेण्याने वातारणातला तणाव थोडा कमी झाला; आणि त्याला जरा जास्तच चढली आहे हे काणे आणि दिघे दोघांच्याही लक्षात आले. नाहीतर जेटली इतका सहज सॉरी बोललाच नसता. त्यामुळे त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून आणि अधूनमधून खिडकी बाहेरच्या झाडाकडे बघत दिघ्याने नारायणरावाची गोष्ट सांगायला सुरवात केली.

"मी पूर्वी जिथे नोकरी करत होतो ती नोकरी आणि गाव मी जरी सोडून आलो असलो तरी तिथल्या मालकाचा माझ्यावार खूप विश्वास होता." दिघ्या बोलायला लागला. पण अजूनही जेटलीची दिघेचा पाय खेचायची खुमखुमी गेली नव्हती. त्याने दिघेच वाक्य तोडल आणि म्हणाला,"हो... हो... तर! इतका विश्वास होता की त्याला वेड लागणार आहे हे जेव्हा त्याच्या लक्षात आल, तेव्हा त्याने तुला मुद्दाम

बोलावून नोकरी सोडायला सांगितलं. आणि फक्त नोकरीच नाही तर ते गाव सुद्धा. हो ना?"

काणेला वाटल आता परत दिघ्या उखडणार आणि दोघांची जुंपणार. कारण जरी दिघ्याने पहिला जॉब आणि ते गावही सोडला होत; तरी त्याने त्याचं कारण कधी सांगितल नव्हत. कायम एकच म्हणायचा की मालकाने सांगितल जायला म्हणून सोडल. पण त्याच्या त्या जुन्या मालकाबद्दल मात्र तो खूप आदराने बोलायचा. खर तर त्याच्यामुळेच कमी शिकलेला दिघ्या त्यांच्या मल्टी नाशन्ल कंपनीमध्ये चांगल्या नोकरीला लागला होता. अर्थात जेटली जे म्हणत होता त्यात देखील सत्य होत. कारण दिघेचा पूर्वीचा मालक वेड लागून मेला होता. त्यावेळी ते प्रकरण वर्तमानपत्रातून खूप गजलं होत. स्वतःच्या कारखान्याला आणि बंगल्याला आग लावून मालकाने गळफास लावून आत्महत्या करून घेतली होती.

जेटलीच्या कॉमेंटमुळे दिघ्या भडकेल अस वाटून त्याला शांत करायला काणे काहीतरी बोलणार होता; पण त्यागोदार दिघे जेटलीकडे बघत शांतपणे म्हणाला,"हो जेटली. वेड लागणार हे त्यांना माहित होत म्हणूनच त्यांनी मला ते गाव आणि नोकरी सोडून जायला सांगितल. कारण मी जर तिथेच राहिलो असतो तर त्यांच्याप्रमाणे मलादेखील वेड लागल असत.... विचार करून करून."

आता मात्र जेटली आणि काणे चक्रावले. "दिघ्या ... साल्या.... वातावरण निर्मिती करतो आहेस की काय??" काणेने दिघेला विचारले.
"नाही... खरी घटना सांगतो आहे. मला माहित आहे तुमचा विश्वास बसणार नाही. पण तरीही... आज मला जेटलीला पटवून द्यायचं आहे की मला भास होत नाहीत. मी जे दिसत तेच सांगत असतो. तर....

मी बीड जिल्ह्यातल्या एका आड गावात नोकरीला होतो. मी काही फारसा शिकलेलो नाही. त्यामुळे मी कधीच मोठ्या शहराची, मोठ्या कंपनीतल्या मोठ्या पगाराची स्वप्न बघितली नाहीत. वडील लहानपणीच गेले होते. त्यामुळे आई बरोबर कष्ट करून जितकं शिकता आल तितक शिकलो आणि ती गेल्यावर गाव सोडून जिथे नोकरी मिळेल तिथे रहायचं अस ठरवून निघालो. बीडमध्ये नोकरी शोधताना मला कळल की जवळच्या एका गावात एक छोटासा लाकडाचा कारखाना आहे आणि तिथे मला नोकरी मिळू शकते. त्यामुळे मग मी फारसा विचार न करता तिथे गेलो आणि त्या कारखान्याच्या मालकांना जाऊन भेटलो.

त्यांनीही मला फार काही प्रश्न विचारले नाहीत. मी सडा फटिंग होतो त्यामुळे वेळेचं बंधन मला नव्हत हा त्यांच्या दृष्टीने मोठाच प्लस पॉईंट होता. त्यात तरुण होतो आणि मुख्य म्हणजे गरजू होतो. त्यांनी मला त्यांच्या कारखान्यात ठेवून घेतले. जंगलातली लाकडे आणून घेणे आणि ती कापून विकणे असा तो एकूण व्यवसाय होता. सुरवातीला मी येणाऱ्या ट्रक्स मधून आलेले लाकूड वजन करून उतरवून घेण्याचे काम करत होतो. पण त्या आड गावात जवाबदारीने काम करणारं कोणीच नव्हत. बिनडोकपणे काम करणारे अनेक कामगार मिळायचे. पण ते रोजंदारीवर. आज येतील तर उद्या नाही. हातात पैसे पडले की दारू पिणे एवढच आयुष्य असणारे लोकं होते तिथे. म्हणून मग मीच आपणहून एक एक काम अंगावर घ्यायला सुरवात केली. लाकड नीट उतरवून घेतली जातात की नाही; कापण्यासाठी मशीनवर किती घेतली आहेत; नको असणारी फळकुटं कारखाना बंद होण्या अगोदर निट लॉक केली आहेत ना... सगळच बघायला लागलो.

मी मुद्दाम केवळ साहेबांचा विश्वास मिळवायला अस काही करत नव्हतो; आणि मी असं काही मनात ठेवून काम करतो आहे अस म्हणण्यासाठी कोणी नव्हतच. कामगार सोडले तर एकूण कायमचा स्टाफ असा कमीच. एक स्टेनो. ती सुधा बोलावल्यावर यायची. कारण रोज काही काम नसायचं. तीच अकौंट्स बघायची. दुसरा म्हणजे ऑफिसमध्ये असणारा जीवा. त्याला ऐकू कमी यायचं. तो सकाळी नऊ म्हणजे नऊला हजार व्हायचा आणि साहेबांचा दुपारचा चहा तीन वाजता झाला की निघून जायचा.

मी नोकरीला लागलो आणि हळू हळू माझ्या कामात रमून गेलो. गावात मी कोणाला ओळखत नाही हे माहीत असल्याने मला साहेबांनी राहण्यासाठी त्यांच्या आउट

हाउसमध्ये जागा दिली होती. एका माणसाच्या मानाने भरपूर जागा होती. लहानस स्वयंपाक घर आणि एक खोली. मी खुप खुश होतो माझ्या आयुष्यावर. फार काही स्वप्न नव्हतीच. लाकडं भरलेले ट्रक्स रात्रीचा प्रवास करून पहाटेच यायचे. ट्रक ड्रायव्हर्सना लाकडं उतरवून लगेच जायचं असायचं. त्यामुळे मी सकाळी पाच-सहा जशी गरज पडेल तसा कारखान्यावर जायचो. लाकडं मोजून उतरवून घ्यायचो आणि परत येऊन झोपायचो. मग थोडं उशिरा म्हणजे दहा पर्यंत परत जाऊन कामगारांना एकत्र करायचो आणि मशीनवर कोणती आणि किती लावायची त्याची यादी द्यायचो. सगळ काम दुपार पर्यंत आटपून जायचं. तीन-चार नंतर तर काहीच काम नसायचं. जीवा गेला की थोड्या वेळाने मी देखील निघायचो. आठ-दहा दिवसातून एकदा लाकडं असलेल्या ऑर्डर प्रमाणे रवाना करायची असायची. मालक फक्त त्यात लक्ष घालायचे. एकूण मस्त चाललं होतं माझं. खुश होतो मी माझ्या कामावर.

लहानसं आड बाजुच गाव असल्याने फार काही करण्यासारख नसायचं. म्हणून मग कामावरून परतून आणि अंघोळ करून रोज संध्याकाळी मी गावातल्या देवळात जायला लागलो. त्यामुळे हळू हळू ओळखी देखील व्हायला लागल्या. लोक मला आडून आडून माझ्या मालकाबद्दल विचारायचे. कसा आहे माणूस; गावात कोणाशी बोलत नाही तर तुमच्याशी तरी बोलतो का? एकदा मात्र एका गावकऱ्याने विचारले,"का हो तुम्ही बंगल्याच्या आवारातील जागेत राहाता ना? मग तुम्ही त्याच्या पत्नीला बघितल आहे का...?" मी या प्रश्नाने गोंधळून गेलो. मुळात मालकांच लग्न झालं आहे किंवा नाही ते मला माहित नव्हत. आणि झालंच असलं तरी त्यांच्या पत्नीला मी कसा आणि का बघेन? असा मलाच प्रश्न पडला. पण यावर काही चर्चा सुरु होण्या अगोदरच मंदिराचे पूजारीबुवा प्रसाद घेऊन आमच्यात येऊन बसले आणि कसा कोण जाणे पण तो विषय तिथेच राहिला. अर्थात जरी त्या अगाऊ माणसाने विषय चालू ठेवला असता तरी मी काय सांगणार होतो त्यांना? मलाही फारशी माहिती नव्हतीच. मालकांनी मला नोकरी दिली होती. चांगला पगार होता. कामाच्या वेळेचं बंधन नव्हतं. रोज कटकट करणारं कोणी नव्हत. त्यामुळे मालकांच्या वय्यक्तिक आयुष्यात लक्ष घालून मी कशाला माझ सुखाच आयुष्य दु:खात घालू?

रोज साहेब यायचे साडे नऊ दहाला. ते त्यांच्या केबिनमध्ये बसलेले असायचे. कधी फोनवर बोलत असायचे तर कधी मान खाली घालुन काही-बाही लिहीत असायचे. दुपारचा चहा झाला की जायचे. तेच ऑर्डर्स मिळवायचे आणि फोन करून स्टेनोला बोलावून सगळी पत्र करून घ्यायचे. बास! त्यांचं प्रत्येकाच्या कामावर बारीक लक्ष्य असायचं. पण फार कोणाशी बोलायचे नाहीत. सुरवातीला मशीनवर काम चालू असताना फेऱ्या मारायचे. पण मग बहुतेक त्यांचा माझ्यावर विश्वास बसला. कारण त्यांनी हळुहळू कारखान्यात खाली मशीनकडे येण कमी करत बंदच केल. मला ऑफिसमध्ये बोलावून सगळी माहिती घ्यायचे... याहून जास्त तर मलाही साहेबांबद्धल काही माहित नव्हत.

मी मात्र संध्याकाळी रोज देवळात जायचो. गावातले सगळेच तिथे रोज असायचे असं नाही. पण देऊळ असल्याने पूजारीबुवा मात्र असायचेच. त्यामुळे देवळातल्या पुजारीबुवांची चांगलीच ओळख झाली होती. त्यांनी माझी बरीच चौकशी केली माझ्याकडे. पण मी एकटाच आहे ; याव्यतिरिक्त माझ्याकडे माझ्याबद्दल सांगण्यासारखं काहीच नव्हत. कधीतरी असच गप्पा मारताना पुजारीबुवांनी त्यांच्या कुटुंबाची माहिती मला दिली. त्यांच्या दोन मुली होत्या. एकीच लग्न झाल होत म्हणे. दुसरीच लग्नाचं वय होऊन गेल होत पण पैशाअभावी लग्न होत नव्हतं. त्यांनी माहिती सांगितली आणि मी ऐकून घेतली.... माझ्यासाठी विषय इथेच संपला होता. पण पूजारीबुवांसाठी मात्र ती सुरवात होती.

असेच दिवस जात होते. मला त्या गावात नोकरी लागून दोन-चार महिने झाले असतील, पुजारीबुवांनी एकदा मी एकटाच असताना विषय काढला.

"अच्युतराव लग्नाचा काही विचार आहे की नाही? अहो तुमच वय होऊन चालल न लग्नाच." पुजारीबुवा म्हणाले.

त्यांचा रोख न कळल्यामुळे मी म्हणालो,"बुवा, कोण देणार मला मुलगी. असा सडाफटिंग माणूस मी. तिशी उलटली आहे. बरी नोकरी आहे... ती ही आता लागली आहे. ना गावाचा पत्ता... ना नातेवाईकांचा. स्वत:ची अशी रहायची जागा

देखील नाही. मालकांच्या कृपेमुळे छत आहे ते नशीब. त्यामुळे मी लग्न हा विषय माझ्या आयुष्यातून पुसून टाकला आहे."

"अहो अस काय म्हणता. आत्ता तरुण आहात म्हणून अस बोलता आहात. वय वाढलं की कोणीतरी सोबत असावं अस वाटत सर्वांनाच. त्यावेळी काय कराल?"

"खर आहे बुवा. पण आता मी कुठे माझ्याचसाठी मुलगी शोधायला जाऊ? आणि आपणहून कोण मला मुलगी द्यायला बसलं आहे?" मी विषय संपवायचा म्हणून म्हणालो.

"अच्युतराव तुम्हाला मालिनी; माझी मुलीगी माहीतच आहे." हे खर होत. मालिनी अनेकदा देवळात पुजारीबुवाना मदत करायला यायची. त्यामुळे मी तिला बघितले होते. मालिनी दिसायला अत्यंत सुंदर आणि सालस होती. पुजारीबुवा बोलतच होते,"तुमच्याच वयाची आहे. एखाद-दोन वर्ष पुढे मागे. दिसायला देखील चांगली आहे हो. पण या छोट्या गावातल्या देवळातून अशी काय कमाई असणार माझ्यासारख्याची. त्यामुळे तिच लग्न झालेलं नाही. तुम्ही देखील एकटेच आहात. बघा विचार करून... पटल तर हो म्हणा; पण जर नसेल इच्छा तर कृपा करून मी हा विषय तुमच्याकडे बोललो हे गावात कोणाकडे बोलू नका. बिचारी मालिनी तशीच दु:खात असते. आता या वयात 'नकार आला' अशी चर्चा गावात झाली तर जीव देईल ती." खालच्या मानेने पुजारीबुवा बोलत होते. त्यांनी अचानक समोर ठेवलेल्या प्रस्तावामुळे मी एकदम चक्रावून गेलो.

"विचार करून कळवतो." अस तुटक बोलून मी उठलो आणि चालू पडलो. रात्रभर मी विचार करत होतो. माझ्यासारख्याला कोण मुलगी देणार होतं आता. मालिनी तर दिसायला खरच खुप सुंदर होती. मी तिला देवळात हार करताना बघितले होते. इतक्या सुंदर मुलीच लग्न केवळ पैशांमुळे झाल नाही ही खरच दुःखाची गोष्ट होती. पण माझ्यासारख्या नुकत्याच त्या गावात आलेल्या माणसाला स्वतःची मुलगी द्यायला पूजारीबुवा तयार झाले होते; यात त्यांचा काही अंतस्थ हेतू तर नसेल न... माझ्या मनात आलं. मग माझ्या लक्षात आलं की पुजारीबुवा म्हणाले होते की मालिनी माझ्याहून एखाद-दोन वर्ष पुढे मागे आहे... म्हणजे कदाचित् ती माझ्याहून मोठीच असावी. पण गरिबी पोटी पूजारीबुवांनी मला विचारले असावे. हे मनात आलं आणि मी शांत झालो. त्या बाबतीत माझी काहीच हरकत नव्हती. पण प्रश्न हा होता की मी मालकांच्या आउट हाउस मध्ये राहत होतो. माझ स्वतःच अस घर नव्हत. त्यामुळे लग्नाचा निर्णय घेण्याअगोदर मला मालकांना विचारण आवश्यक होत. रात्री डोळा लागायच्या अगोदर ठरवून टाकल की मालकांना उद्या विचारायचं आणि लगेच पुजारीबुवांकडे जायचं.

दुसऱ्या दिवशी दुपारी मालकांच जेवण झाल आणि ते थोडे निवांत वाटले म्हूणून हिंमत करून मी त्यांच्या समोर जाऊन उभा राहिलो.

"बोला दिघे..." ते मला माझ्या पहिल्या नावाने कधीच हाक मारायचे नाहीत.

"मालक... एक विचारायचं होत." विषय कसा सुरु करावा ते मला सुचत नव्हत.

"काय... लग्नाचा बार उडवता आहात का दिघे? वा वा! चांगल आहे." मालक हसत म्हणाले.

मी पुरता चक्रावून विचारल, "तुम्हाला कस कळल मालक?" त्यावर मालक हसत हसत म्हणाले... "अहो, लग्न न झालेला मुलगा नोकरी लागल्यानंतर काही महिन्यात जर मालकाचा मूड बघून काही विचारायला आला तर त्याचा अजून काय अर्थ होऊ शकतो? बर, कोण मुलगी आहे? याच गावातली की तुमच्या गावाकडची?" मी लाजलो. "मालक, गावातले पुजारीबुवा आहेत ना... त्याची मुलगी... मालिनी." मी म्हणालो. ते एकताच मालकांनी माझ्याकडे दचकून बघितले. क्षण दोन क्षण ते शांत बसले आणि म्हणाले,"चला बर झाल. तस मालिनीच लग्नाच वयही उलटून चालाल होतं. बर, पण तुम्हाला हे माहित आहे का की पुजारीबुवांच्या दुसऱ्या मुलीशी मी लग्न केलं आहे." त्यांच्या त्या वाक्याने मी उडालोच. म्हंटल,"नाही मालक. मला अस काहीच नाही बोलले पुजारीबुवा." त्यावर मालक समजुतीच्या सुरात म्हणाले, "अहो तुमचा होकार आला की सांगतीलच. उगाच घरातल्या गोष्टी अगोदर कशाला कोणी सांगेल. बर, मग कधी करता आहात लग्न?" मी यावर काय बोलणार. म्हणालो,"मालक माझ स्वतःच अस घर नाही. तुमच्या आउट हाउस मध्ये रहातो ते तुमची मेहेरबानीच आहे. लग्न करून बायकोला कुठे आणू?"

"दिघे, अहो, तुम्ही आल्यापासून मला कारखान्यात काहीच काम नसत. तुम्ही सगळीच जवाबदारी चांगली पार पाडता.

मेहेरबानी कशाबद्दल? अहो अशा आड गावात असा कोणी विश्वासू आणि चांगला माणूस मिळण फक्त अवघड नाही तर अशक्यच आहे. त्यामुळे तुम्ही कोणताही संकोच ठेवू नका. उरकून टाका लग्न." मालक म्हणाले.

त्यांच्या या बोलण्याने मला हायसं वाटलं. कारण ज्या क्षणी त्यांनी मला सांगितलं की ते देखील पूजारीबुवांचे जावई आहेत त्याच क्षणी मी ठरवलं होतं की आपण या विषयातून अंग काढून घ्यायचं. पण त्यांनी आपणहून लग्नाला परवानगी दिली म्हणजे त्यांची काही हरकत नाही हे माझ्या लक्षात आलं. मी त्यांना नमस्कार केला आणि मनापासून म्हणालो"तुम्ही मला नोकरी दिलीत आणि आता या लग्नाला परवानगी दिलीत; अजून काय हवं? खूप उपकार झाले मालक."

त्यादिवशी संध्याकाळी छान तयार होऊन मी थोडा लवकरच देवळात गेलो. अजून गावकऱ्यांपैकी कोणी बसायला आलं नव्हतं. मी पूजारीबुवाना गाठलं आणि माझा होकार सांगितला. बुवांचा चेहेरा खूप आनंदी झाला. त्यांच्या डोळ्यात पाणी उभं राहील. माझा हात धरून ते म्हणाले,"अच्युतराव तुम्ही हो म्हणून माझ्या मनावरच ओझ उतरवलत. चला असेच घरी. मालिनीच्या आईला सांगू ही बातमी." पण अजूनही पूजारीबुवानी मला सांगितल नव्हत की त्यांच्या दुसऱ्या मुलीच लग्न मालकांबरोबर झाल आहे. मीदेखील ठरवलं की आपणहून विषय काढायचं नाही. पूजारीबुवा सांगतीलच ना! म्हणून मग काही न बोलता मी त्यांच्या बरोबर त्यांच्या घराकडे निघालो.

पुजारीबुवा देवळाच्या बाजूलाच फर्लांगभर अंतरावर राहात होते. घराच्या आजूबाजूला बरीच फुलझाडं होती. पेरू, चिक्कू, आवळे अशी थोडी बहुत फळझाड देखील दिसत होती. ते बघून मी म्हणालो,"बुवा झाडं बरीच आणि छान आहेत. बाग छान ठेवली आहे तुम्ही." त्यावर ते हसत म्हणाले,"अहो मी काही करत नाही. मालिनीला झाडांची खूप आवाड आहे. फुल झाडं आणि फळझाडं सगळी तिनेच लावली आहेत. मागे विहीर आहे त्यातून दहा-पंधरा बादल्या पाणी काढावं लागत रोज या झाडांसाठी. नाहीतर इथल्या हवेला कसली जगतात ही झाडं. पण मालिनीला अजिबात कंटाळा म्हणून माहित नाही. रोज सकाळी उठून ती फुलं काढते आणि सगळ्या झाडाना पाणी घालते. त्यामुळेच माझ्या देवळातल्या देवांना बारा महिने उत्तम फुलांचे हार असतात बरं." लेकीच कौतुक करताना पूजारीबुवांचा चेहेरा फुलून गेला होता. काही मिनिटापुर्वीची अस्वस्थता अजिबात नाहीशी झाली होती.

ओवारीवरूनच त्यांनी मालिनीच्या आईला हाक मारली. "ऐकलत का... अच्युतराव आले आहेत. साखर घेऊनच बाहेर या... मालीनिसाठी त्यांनी होकार दिला आहे."
"अग्गोबाई... आलेच" असा आवाज आला आणि मालिनीची आई बाहेर आली. त्यांनी बुवांच्या आणि माझ्या हातावर साखर ठेवली. "चहा ठेवू का?" त्यांनी बुवाना विचारल.
"नको... आता वेळ टळून गेली आहे चहाची. तुम्ही जेवणाची तयारी करा. आज अच्युतराव इथेच जेवतील." पुजारीबुवा म्हणाले.
"अहो बुवा नको. मी जातो घरी. उगाच कशाला तुम्ही घोळ घालता आहात." मी संकोचून म्हणालो.
"अच्युतराव अहो तुम्ही लग्नाला होकार देऊन माझा मेल्यानंतरचा स्वर्गाचा मार्ग मोकळा केला आहात. आता आज तुम्ही कशालाच नाही म्हणू नका. आमच्याकडे काही पक्वान्न नाहीत हो. पण तरीही आज तुम्ही थांबाच. आम्ही जी काही भाजी भाकरी खातो त्यातलीच थोडी तुम्हीदेखील खाल, अजून काय?" बुवा म्हणाले. मला त्यांचा आग्रह मोडता आला नाही. आणि मग घरात मालिनी आणि तिची आई स्वयंपाकाच्या तयारीला लागल्या. मी आणि बुवा बाहेर गप्पा मारत बसलो.

रात्रीची जेवणं आटपली आणि मी निघालो. मला सोडायला बुवा देवळापर्यंत आले. मी निघताना मला म्हणाले,"अच्युतराव मला माहित आहे की कदाचित् तुम्हाला कल्पना असेल. पण तरीही मी आपणहून तुम्हाला सांगावं अस वाटत म्हणून सांगतो आहे" बुवा असं म्हणताच मला वाटलं ते त्यांच्या लग्न झालेल्या मुलीबद्दल आता सांगणार आहेत. पण त्यांनी दुसराच विषय काढला. म्हणाले, "अच्युतराव आमची मालिनी तुमच्यापेक्षा वर्षभराने मोठी आहे." त्यांनी हे सांगताच माझा थोडा अपेक्षा भंग झाला. पण स्वतःला सावरत मी बुवांच्या खांद्यावर हात ठेवून म्हणालो, "बुवा मला अंदाज होता. अहो पण आता या वयाला आणि

माझ्यासारख्या आगा-पिछा नसलेल्या माणसाला कोण मुलगी देणार होतं. मी तर लग्न हा विषय माझ्या आयुष्यातून काढूनच टाकला होता. त्यामुळे माझी काहीच हरकत नाही. मला तुमच्या परिस्थितीची पूर्ण कल्पना आहे आणि तुम्हाला माझ्या. त्यामुळे आता यावर फार चर्चा नकोच. तुम्ही मुहूर्त बघा आणि आपण या आपल्या देवळातच लग्न उरकून टाकू. माझी तुमच्याकडून काहीच अपेक्षा नाही बुवा. उलट जो काही खर्च होईल तो मीच करणार. ठीक?"

"अजून एक होत...." बुवा चाचरत बोलायला लागले. मी त्यांना थांबवल. कदाचित त्यांच्या एका मुलीच लग्न माझ्या मालकांशी झाल आहे हे सांगताण त्यांना अवघड वाटत असावं अस मला वाटल म्हणून मी म्हणालो,"बुवा जितकी चर्चा करू तितके प्रश्न उभे राहातील. त्यामुळे आता फक्त दिवस ठरवा......... माझी एकच विनंती आहे की मालिनीची या लग्नाला खरच तयारी आहे का हे मला तिच्याकडून जाणून घ्यायचे आहे. त्यामुळे मला एकदा फक्त तिला एकटीला भेटायची परवानगी द्या... अर्थात तुमची हरकत नसली तर."

बुवांच्या डोळ्यात पाणी उभं राहील. "आमची काही हरकत नाही. उद्या गुरुवार आहे. दत्ताच्या पुढ्यात भजन आहे संध्याकाळी. त्यामुळे फुलांचा हार घेऊन मालिनी येईलच तिथे. त्यावेळी तुम्ही तिच्याशी बोलून घ्या. माझ्या मनातही होतच. पण तिच्या आईला पटणार नाही म्हणून मी काही बोललो नाही. आता तुम्हीच म्हणता आहात म्हंटल्यावर ती काही म्हणायची नाही." ते डोळे टिपत म्हणाले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मालिनी देवळात आली. ती पूजारीबुवाना मदत करत होती. त्यामुळे त्यावेळी तिच्याशी जाऊन बोलावं हे मला प्रशस्त वाटलं नाही. म्हणून मग मी थांबलो देवळाच्या पायऱ्यांवरच. हळू हळू लोक जमायला लागले. आता मालिनीशी कस बोलावं ते मला कळेना. थोडंसं गोंधळून मी तिथेच पायऱ्यांवर बसून राहिलो. येणारी प्रत्येक व्यक्ति मला आत येण्यासाठी सांगत होती आणि मी 'आलो', 'येतोय', असं सांगून आत जाणं टाळत होतो.

शेवटी एकदाची भजनाला सुरवात झाली आणि मालिनी देवळाच्या कामातून मोकळी होऊन तिच्या घराकडे निघाली. त्यावेळी मात्र सगळा धीर एकवटून मी तिला गाठले. मागूनही तिचा कमनीय बांध लक्षात येत होता. वय वाढल असलं तरी मालिनी अजूनही अप्रतिम सुंदर दिसत होती. तिच्या मागे चार पावलांवर चालत मी हळूच म्हणालो,"मालिनी, मला तुमच्याशी बोलायचं होत थोड." तिने थबकून मागे वळून बघितलं. ती थांबलेली बघून मी अंतर राखून उभा राहिलो. तिची मान खाली होती. ती काहीच बोलत नव्हती. क्षणभर मला कशी सुरवात करावी ते सुचेना. पण मग मनाचा हिय्या करून मी तिला थेट प्रश्न केला. "तुमचा या लग्नाला होकार आहे का मालिनीजी?" तिने मानेनेच हो म्हंटले. मला बरे वाटले. आणि मग उगाच कोणी बघितले तर चर्चा होईल म्हणून मी लगेच मागे फिरलो आणि निघालो. पण मालिनीने मागून हळुवारपणे हाक मारली,"अहो.... एक मिनिट." मालिनीने हाक मारली हे लक्षात येऊन मी वळून बघितले. आता ती थेट माझ्याकडे बघत होती. "तुम्हाला माहित आहे का की माझ्या बहिणीच लग्न तुम्ही जिथे काम करता त्या कारखान्याच्या मालकांशी झाल आहे." स्वतःबद्दल किंवा माझ्या बद्दल न बोलता हे अचानक बहिणीच्या लग्नाबद्दल ती का बोलत होती ते माझ्या लक्षात आल नाही. मी शांतपणे 'हो' म्हंटल. त्यावर ती म्हणाली ,"हम्म... कदाचित बाबांनी सांगितल असेल नसेल म्हणून मी बोलले. पण मला वाटत नाही की तुम्हाला हे माहित असेल की माझ्या धाकट्या बहिणीशी त्यांनी लग्न केलंय. तस सांगायचं तर तुमच्या मालकांनी अगोदर मला मागणी घातली होती. पण लग्नाच्या दिवशी त्यांनी बाबांना सांगितल की त्यांना माझ्याशी नाही शालिनीशी लग्न करायचं आहे. बाबांना मोठा धक्का बसला. पण अस स्थळ परत नसतं आलं याची आम्हाला सर्वांना कल्पना होती. बाबांना आमच्या दोघींचंच काय एकीच लग्न कारण सुद्धा परवडणार नव्हत. त्यात त्या लग्नाचा संपूर्ण खर्च तुमचे मालकच करत होते. उत्तम कपडे, दागिने, खाणं-पिणं सगळा खर्च त्यांनी केला होता. मग अस चांगल स्थळ का सोडायचं. मी बाबाना समजावलं किमान एकीच्या जवाबदारी मधून तर सुटाल. आणि जर माझ्या नशिबात लग्न असेल तरकधी ना कधी नक्की होईल. आई-बाबांना पटल. शालिनी एकूणच माझं लग्न ठरल्यापासून शांत होती. मालकांच्या मागणीनंतरही

ती शांतच होती. अर्थात तिला तिची इच्छा विचारण्यासारखी परिस्थिती देखील नव्हती. म्हणून मग तुमच्या मालकांनी इच्छा व्यक्त केल्या प्रमाणे त्यांच आणि शालिनीच लग्न बाबांनी लावून दिल. मात्र त्यादिवसानंतर आम्ही शालिनीला कधीच भेटलेलो नाही. का कुणास ठाऊक पण तिने कधीच आमच्याकडे काही निरोप धाडला नाही किंवा कधी भेटायला आली नाही. बस! एवढच सांगायचं होत मला." अस म्हणून ती वळली आणि निघून गेली.

मी एकूणच सगळ एकून चक्रावून गेलो होतो. थोडा विचार केल्यावर लक्षात आल की कदाचित काल बुवाना हेच सांगायचं असेल. पण आपण बोलू दिल नाही त्याना. अर्थात मालकांनी अस का केल... किंवा आता त्यांच्या पत्नीने माहेरच्या माणसांशी काहीच संबंध का ठेवलेला नाही... हे प्रश्न असले तरी त्याची उत्तर शोधायची माझी इच्छा नव्हती. शेवटी हा ज्याच्या त्याच्या आयुष्याचा प्रश्न असतो अस म्हणून मी तो विषय तिथेच सोडला.

आठ दिवसानंतरचा एक मुहूर्त बुवांनी काढला. ना माझ्याकडे पैसा होता ना बुवांकडे... मोठ लग्न, जेवणावळी हे आम्हाला दोघांनाही परवडणार नव्हत. त्यामुळे गावातल्या कोणाला बोलावल नाही. पण गावकरी देखील चांगले होते, त्याना माझ्या आणि बुवांच्या परिस्थितीची कल्पना होती. त्यामुळे त्यांनी देखील समजून घेतल. आम्हाला केवळ आशीर्वाद देण्यासाठी गावातली मोठी जाणती मंडळी लग्न लागल्यानंतर काही वेळानी आली आणि हातावर एक पेढा तेवढा घेऊन निघून गेली.

खर तर लग्न झाल तरी माझ्या आयुष्यात फार फरक पडला नव्हता. मी तसाच रोज पहाटे उठून कारखान्यात जात होतो. त्यावेळी करण्यासारखं काहीही नसल्याने मालिनी देखील तेव्हाच उठायची आणि तिच्या बगीच्याकडे जायची. झाडाना पाणी घालणे, देवांचे हार करणे वगैरे नेहेमीची कामे उरकून परत घरी यायची. घरातली थोडीवार आवराआवर करून थोडं उशिरानेच माझ जेवण करून माझी वाट बघायची. लग्न झाल आणि मी दुपारी घरी जेवायला जायला लागलो होतो. साधारण दोन-अडीच ला यायचं; जेवून थोडं पडायचं आणि तीन पर्यंत परत कामावर जायचं. त्यामुळे मला आता घरी परतायला साधारण पाच वाजत होते. कामावरून घरी गेलो की मग मात्र आम्ही दोघेही देवळाकडे जायचो. मालिनी आईला भेटून यायची त्यावेळी मी देवळात बसायचो. इतर गावकरी देखील असायचेच. मालिनी आली की मग आम्ही घरी जायचो. लग्न झाल आणि खरच आयुष्याला एक वेगळ वळण लागल अस मला वाटायला लागल होत. खूप सुखी होतो मी. मालिनी देखील आहे त्यात सुख मानणारी होती. असेच दिवस जात होते. त्यावर्षीची दिवाळी आली. तस बघितल तर आमचा पहिला सण. पण ना माझ्याकडे काही होत ना बुवांकडे काही देण्यासारख! त्यामुळे आम्ही पाडव्याला बुवांकडे जेवायला गेलो इतकंच. तेही रोजचच साधस जेवण.

जेवण झाल आणि मी आणि बुवा पाय मोकळे करायला बागेत फेऱ्या मारत होतो. मालिनी आईला आवरा-आवर करायला मदत करत होती. बुवाना काय वाटल कोणास ठाऊक त्यांनी अचानक बोलायला सुरवात केली. म्हणाले,"जावईबापू, कदाचित आतापावेतो मालिनी तुम्हाला बोलली असेलच की माझ्या धाकट्या मुळीच लग्न तुमच्या मालकांशी झाल आहे. तिने लग्नाच्या वेळचा प्रसंग देखील सांगितला असेल. तुमच्या मनात प्रश्न देखील असेल की मालकांनी अस का केल असेल... किंवा आता आमचा त्या घराशी काहीच संबंध का नाही.... आज का कोणजाणे मला तुम्हाला त्याबद्दल सांगावस वाटत आहे. मालिनी जशी शांत आणि दिसायला सोज्वळ आहे तसाच तिचा स्वभाव आहे. मात्र शालिनी तशी नाही. म्हणजे शालिनी आणि मालीनी दिसायला अगदी सारख्या आहेत. जवळ जवळ उभ्या राहिल्या तर कोण शालिनी आणि कोण मालिनी ते कळणार नाही. पण शालिनी फार ढालगज स्वभावाने. एका गरीब पुजाऱ्याच्या घरातल्या मुलीला परवडणार नाही अशी तिची स्वप्न होती. तिने घरात कधीच काहीच काम केल नाही. कायम स्वतःच सौंदर्य मिरवत गावातून फिरत असायची. तुमच्या मालकांच्या पहिल्या पत्नी कायम आजारी असायच्या. त्यांची सेवा करायला माझी पत्नी जायची. कधी कधी मालिनी देखील तिला मदत करायला जायची. तेव्हाच कधीतरी मालकांनी मालिनीला बघितली असेल. त्यामुळे पत्नीच्या निधनानंतर त्यांनी मालिनीला मागणी घातली. तुम्ही आमची परिस्थिती पाहातच आहात. त्यामुळे आम्ही नकार देण्याचं प्रश्नच येत

नव्हता. परंतु मालिनीच लग्न ठरलं आणि शालिनी खूप अस्वस्थ झाली. तिने लग्नाच्या दोन दिवस अगोदर देवळात मला गाठल आणि म्हणाली की तिला कारखान्याच्या मालकांशी लग्न करायचं आहे. परंतु ते माझ्या हातातच नव्हत तर मी तिला काय सांगणार? ती खूप चिडली... संतापली आणि तरातरा निघून गेली...... त्यानंतर लग्नाच्या दिवशी झालेला तो घोळ. शालिनी मला भेटायला देवळात आली होती आणि तिने तिची जी इच्छा बोलून दाखवली होती ते मी आजवर कोणालाच सांगितल नव्हत. अगदी मुलींच्या आईलादेखील नाही. पण मला मनातून ही गोष्ट खात होती. मन मोकळ करायचं होत. तुमच्याजवळ बोलून खूप बर वाटल."

त्यांनी जे सांगितल ते एकून मला खूप आश्चर्य वाटल. पण मी तस काहीच दाखवलं नाही. बुवांच्या खांध्यावर थोपटून मी म्हणालो,"बुवा मी तुमच्या मुला सारखाच आहे. माझ्याशी बोलून तुम्हाला हलक वाटत असेल तर मोकळेपणी माझ्याशी बोलत जा. मी कधीही कोणालाही यातल काही बोलणार नाही. बर! आमची निघायची वेळ झाली आहे. घराकडे जाऊया का?" अस म्हणून मी घराकडे वळलो. त्यावेळी बुवांनी मला थांबवल आणि म्हणाले,"जावईबापू. गैरसमज करून घेऊ नका पण एक सांगू का?" त्याचं अस विचारण मला विचित्र वाटल. म्हणालो,"बोला बुवा... अस का म्हणता? मोकळेपणी सांगा काय ते." "जावईबापू, तुम्हाला जर कधी तुमच्या मालकांच्या बंगल्यावरून बोलावण आल तर कृपा करून जाऊ नका किंवा मालिनीला देखील पाठवू नका." मला त्याचं बोलण एकून आश्चर्य वाटल. मी म्हणालो,"बुवा अस का म्हणता? अहो तुमचीच मुलगी आहे शालिनी. त्यावेळी ती काशिका वागली असेना का... पण लग्नानंतर सगळे बदलतात. ती देखील बदलली असेल. सर्वात महत्वाच म्हणजे मालिनीला तुमची आणि शालीनीची देवळातली भेट माहित नाही. त्यमुळे जर शालिनीने मालिनीला बोलावलं आणि बहिणीने बोलावल म्हणून मालिनीने जायचं ठरवल तर मी कस अडवू तिला?" त्यावार मात्र गंभीर होत बुवा म्हणाले,"जावईबापू, शालिनीला मालिनीच सुख कधीच बघवल नाही. तिने सख्खी बहिण असूनही मालिनीला कायम पाण्यात बघितल आहे. माला संशय आहे की शालीनिनेच काहीतरी करून मालकांच मन वळवल आणि त्यांना त्यांचा निर्णय बदलायला भाग पाडल. तिला कदाचित वाटल असेल की मालिनीच लग्न आता होणारच नाही. पण तुमच्या रूपाने मला देवच पावला. आणि आता मालिनीच्या चेहेऱ्यावरून ती खूप सुखात आहे ते मला कळत आहे. त्यामुळे आता मालिनीच्या सुखात शालिनीने विष कालवू नये अस मला वाटत इतकच." बुवा मनापासून अगदी पोटतिडकीने बोलत होते. त्यामुळे मी त्यांना शांत करत शब्द दिला की मी किंवा मालिनी कधीच शालिनीला भेटायला जाणार नाही. माझ्या त्या एका वाक्याने ते शांत झाले आणि आम्ही घराकडे वळलो.

मी आणि मालिनी दोघे घरी आलो आणि बंगल्यावरून निरोप आला की मला आणि मालिनीला मालकांनी बोलावल होत. मला खूप आश्चर्य वाटल. नेमक दुपारीच माझ आणि बुवांच याच विषयावर बोलण झाल असण आणि त्याचवेळी मालकांच्या घरून बोलावण येण हा काय योगायोग असावा ते मला कळेना. आता माझी अवस्था कात्रीमध्ये असल्यासारखी झाली होती. मी बुवाना शब्द दिला होता की मी किंवा मालिनी कधीच बंगाल्यवर जाणार नाही आणि नेमक आजच आमंत्रण आल होत. मी ठरवलं होत की एक दोन दिवसात एखादी बनावट गोष्ट तयार करून मालिनीला सांगायची आणि आपणद दोघांनी वाड्यावर कधीही जायचं नाही हे तिला पटवून द्यायचं. त्यात बुवाना शब्द देताना मझ्या मनात होत की आजवर मालकांनी कधीच त्यांच्या घरी बोलावल नव्हत. किंवा माझ लग्न झाल तरी कधी त्याविषयी ते माझ्याशी बोलले नव्हते.लग्न झाल्यवर लगेच जर बोलावलं नाही तर आता इतक्या महिन्यांनंतर कशाला मालक किंवा मालिनीची बहिण आम्हला बोलावेल. पण माझे सगळेच विचार फोल ठरले होते. आणि मी काही निर्णय घ्यायच्या आत मालिनी आनंदाने तयार होऊन निघाली सुद्धा होती. आता मात्र मला काहीच पर्याय उरला नाही. तिला काही समजावाव इतका वेळ देखील नव्हता. मात्र बंगल्यावर पोहोचण्याअगोदर मी मालिनीला एवढेच म्हणालो,"मालिनी, दिवाळीच्या शुभेच्छा देऊन आपण लगेच निघायचं आहे. तिथे अजिबात रेंगाळायचं नाही." मालिनीला माझ बोलण एकूण खूप आश्चर्य वाटल. तिने का म्हणून विचारल. तिला काय कारण सांगाव हे न सुचल्याने मी थोडा आवाज चढवून म्हणालो,"मी म्हणतो म्हणून. प्रत्येकवेळी मी

तुझ्या प्रश्नाला उत्तर दिलच पाहिजे अस नाही." लग्न झाल्यापासून पहिल्यांदाच मी माझा आवाज मालिनीवर चढवला होता. त्यामुळे माझ अस आवाज चढवून बोललेलं एकूण मालिनीला खूप आश्चर्य वाटलं. ती थोडी नाराज देखील झाली. पण त्यावेळी तिला काही समजावण मला शक्य नव्हत. त्यामुळे मी गप राहिलो.

आम्ही बंगल्यावर पोहोचलो. मालक दिवाणखान्यातच बसलेले होते. त्यांनी शांतपणे आमच स्वागत केल, बसायला सांगितल आणि आत निघून गेले. मालक गप्पिष्ट स्वभावाचे नव्हतेच. पण माझ्याशी जेव्हा जेव्हा बोलले होते त्यावेळी मला ते मोकळ्या स्वभावाचे वाटले होते. त्यामुळे त्याचं अस स्वतःच बोलावून आत निघून जाण मला थोड विचित्र वाटल, पण मी काहीच बोललो नाही. थोड्या वेळाने एक नोकर खूपसे फराळाचे जिन्नस आणि तीन-चार प्रकारचा गरम-गरम नाश्ता घेऊन आला. आणि आमच्यापुढे ठेऊन आत निघून गेला. आम्ही गोंधळून एकमेकांचे चेहेरे बघत बसून राहिलो. असाच थोडा वेळ गेला. आता माझ्या मनात चलबिचल सुरु झाली होती. आणि तेवढ्यात आतून शालिनी बाहेर आली. तिला पाहून माझा श्वासच अडकला. बुवा म्हणाले होते की शालिनी मालीनिपेक्षा दिसायला काकणभर कमी होती.... की जास्त चांगली होती? की दोघी सारख्याच दिसतात? काय म्हणाले होते बुवा? मला काहीच आठवत नव्हते. मात्र समोर उभी असलेली आमच्या मालकांची पत्नी आणि मालिनीची धाकटी बहिण म्हणजे संगमरवारातून घडवलेल्या अप्सरेच्या मूर्तीसारखी अप्रतिम सुंदर होती. तिने उंची साडी नेसली होती आणि अनेक दागिनेदेखील घातले होते. परंतु तरीही तिचे उपजत सौंदर्यच जास्त उठून दिसत होते. तिला पाहाताच मालिनी उठून उभी राहिली आणि आनंदाने तिच्या जवळ जाऊन तिने शालिनीला मिठी मारली. तिने शालिनीचा हात हातात घेतला आणि म्हणाली,"शालिनी किती सुंदर दिसते आहेस. लग्न छानच मानवल आहे ग तुला. आपण दोघी पूर्वी सारख्याच दिसायचो हे कोणाला सांगूनही खर वाटायचं नाही आता." शालिनीच्या चेहेऱ्यावर मंद हास्य होत. तिने मालिनीचा हात हातात घेतला आणि तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करत उलट तिला विचारल,"कशी आहेस ताई? तुझ लग्न ठरल आणि झालसुद्धा. पण मला मात्र तू बोलावल नाहीस ह. ताई, पण आज तुझा दिवाळसण म्हणून मी मुद्दाम तुला बोलावण पाठवल. मला माहित होत की मी बोलावल आहे हे कळल तर तुझे पती कदाचित येणार नाहीत. म्हणून मग ह्यांच्या नावाने निरोप पाठवला. मी आले ही असते ग तुला भेटायला या अगोदर. पण मला या बंगल्यातून बाहेर पडायची परवानगी नाही." अस म्हणून ती क्षणभर थांबली आणि मग म्हणाली;"... म्हणजे... यांना माझी काळजी वाटते न! त्यामुळे त्यांनी मला एकटीने बाहेर पडू नकोस म्हणून सांगितल आहे." मग माझ्याकडे वळून ती म्हणाली,"भाऊजी कसे आहात?" मी काहीतरी उत्तर देणार होतो. पण त्याअगोदर तीच बोलायला लागली,"अरे तुम्ही काही घेतलं नाहीत का? अहो, घ्या ना. तुमच्यासाठी मुद्दाम गरम-गरम नाश्ता बनवून घेतला आहे." तिच एकूण वागण आणि बोलण खूपच सोज्वळ आणि शांत होत. आता मात्र मी पुरता गोंधळून गेलो. आजच बुवांनी मला सांगितल होत मी शालिनी ढालगज स्वभावाची होती आणि तिलाच मालकांशी लग्न करायची तीव्र इच्छा होती. पण माझ्या समोर जी शालिनी उभी होती, ती आपल्या बहिणीचा मत्सर करणारी वाटत नव्हती. ती ज्या पद्धतीने माझ्याशी बोलली होती आणि मालिनीची आस्थेने विचारणा करत होती त्यावरूनही ती मनाने वाईट असेल अस वाटत नव्हत. अर्थात समोर उभी असलेली शालिनी खरी की बुवांनी वर्णन केलेली शालिनी खरी हा प्रश्नच होता. कारण आपणहून कोणी वडील आपल्या मुलीबद्दल वाईट सांगणार नाहीत, अस माझ मन मला सांगत होत. पण डोळ्यांना जे दिसात होत ते मात्र खूप वेगळ होत.

माझ्या मनात विचारांची आवर्तन सुरु होती. त्यामुळेच कदाचित्ए मी गप्प बसलो होतो. पण मालिनीला वाटलं की मला मुळात वाड्यावर यायचं नव्हत; कदाचित म्हणूनच मी शांत आहे. तिला बहुतेक माझ मन दुखवायचं नव्हत. म्हणून मग एकदा माझ्यकडे बघून मालिनी म्हणाली,"शालू अग आम्ही नुकतेच आई-बाबांकडून जेऊन आलो आहोत. त्यामुळे खायला काहीच नको. तुझ लग्न झाल्यापासून तुझी भेट नव्हती झाली. त्यात तूच बोलावण पाठवल असशील अशी माझी खात्री होती. म्हणून फक्त तुला भेटायला आले आहे ग मी. बर! निघू का आम्ही आता? तस आता आपण जवळच राहतो आहोत. आज भेटण झालच आहे तर भेटूच की परत."

"खरच भेटू न ताई आपण? येशील माझ्याकडे? येत जा ह." शालिनी मालिनीचा हात हातात धरून म्हणाली. बोलताना तिचा गळा भरून आला होता.

आम्ही निघणार होतो म्हणून मी उठून दाराकडे वळलो होतो. इतक्यात मला मालिनीचा आवाज एकायला आला. "नक्की भेटूच. आता तर भेटलच पाहिजे तुला परत एकदा." मालिनी म्हणाली. तो आवाज नक्की मालीनिचाच होता याची मला खात्री होती. पण तरीही त्या आवाजात काहीतरी वेगळ होत. म्हणून मी गर्कन मागे वळून बघितल.मालिनीची माझ्याकडे पाठ होती आणि शालीनिकडे चेहेरा. मी बगितल की तिने अस म्हणताच शालिनी दचकली होती आणि भेदरून तिने मालीनिकडे बघितल. मग माझ्याकडे बघितल आणि मालिनीचा हात सोडून दोन पावलं मागे झाली. तिने हात सोडताच मालिनी माझ्याकडे आली आणि म्हणाली,"चलूया का? आपला पहिला दिवाळसण आहे. घरी देवासमोर दिवा लावायचा आहे मला." मी मानेनेच होकार दिला आणि आम्ही निघालो. माझ्या समोर आलेली मालिनी शांत होती. पण क्षणभर मला वाटल की ही माझी नेहेमीची मालिनी नाही. अर्थात मी फार विचार करत थांबलो नाही.

मात्र मी बंगल्याच्या दारातून बाहेर पडताना सहज मागे वळून बघितल तर शालिनीने तिच्या साडीचा पदर डोळ्यांना लावला होता. तिच संपूर्ण अंग थरथरत होत. बहुतेक ती रडत होती... किंवा खूप घाबरली होती. घरी गेल्यावर शालीनिबद्दल मालिनीला विचाराव अस मी मनात ठरवल. आम्ही घरी आलो आणि मालिनी देवाला दिवा लावणे वगैरे कामाला लागली. त्यामुळे मग बंगल्यावरच्या भेटीबद्दल आमच्यात काहीच चर्चा झाली नाही आणि मग तो विषय राहूनच गेला. शालीनिशी बोलतानाचा मालिनीचा तो वेगळा आवाज मी एकला होता त्याचाच विचार मी करत होतो. पण परतल्या नंतर मला एकूणच मालिनीच्या वागण्यात कोणत्याच फरक जाणवला नाही. त्यामुळे मलाच काहीतरी भास झाला असेल असा विचार करून मी तो विषय तिथेच सोडून दिला.

असेच दिवस जात होते. दिवाळीची ती भेट माझ्या मनातून पुसली गेली होती. माझ आणि मालिनीच नेहेमीच रुटीन सुरु झाल होत. एक दिवस मालक सकाळीच कारखान्यावर आले. त्यांना एवढ्या लवकर आलेले बघून मला खुप आश्चर्य वाटल. पण कारखाना त्यांचा... झाली असेल इच्छा म्हणून आले असतील; असा विचार करून मी आपल्या कामाला लागलो. त्यादिवशी बरीच लाकड आली होती. त्यामुळे ती उतरवून घेऊन त्यांचा हिशोब करून मशीनवर चढवायची यादी कारण आणि बाकीची लाकड निट गोदामात ठेवून घेण हे सगळ मार्गी लावेपर्यंत खूप उशीर झाला. मला क्षणाचीही उसंत मिळाली नव्हती. त्यामुळे मी घरी जेवायला देखील गेलो नव्हतो. आता जवळ जवळ चार वाजून गेले होते. मला कडकडून भूक लागली होती. मालिनीसुद्धा माझ्यासाठी थांबून राहिली असेल हे मनात येत होत. पण जीवा अजूनही इथे तिथे घुटमळत असलेला मला सारखा दिसत होता म्हणजे मालक देखील कारखान्यातच होते... मालक गेल्याशिवाय तो जाणार नाही याची मला खात्री होती. अर्थात माझ काम आटपल होत त्यामुळे मी निघायची तयारी करायला लागलो. हात पाय धुवून मी मागे वळलो तर मालक समोर उभे. त्यांना अस अचानक समोर बघून मी दचकलोच. त्यांनी मला त्यांच्या मागून येण्याची खुण केली आणि ते वळून चालू लागले.

ते गोदामाच्या दिशेने निघाले आणि मी त्यांच्या मागे. गोदामाच्या दारापाशी जीवा उभा होता. "आत कोणाला सोडू नकोस. मी आणि दिघे एकूण लाकडांची मोजणी करून लगेच बाहेर येतो आहोत." अस म्हणून मालक गोदामात शिरले. ते आत अगदी पहिल्या लाकडांच्या राशीपाशी जाऊन उभे राहिले आणि त्यांनी मलादेखील त्यांच्या जवळ बोलावून घेतले. मी पुरता बुचकळ्यात पडलो होतो. मालकांना हे असे अचानक लाकडे मोजण्याचे का सुचावे ते मला कळत नव्हते. 'कोणी माझ्याबद्दल तक्रार केली असेल का? माझ्यावरचा त्यांचा विश्वास उडाला असेल का?' माझ्या मनात अनेक विचार येत होते. मी देखील भराभर चालत त्यांच्याजवळ जाऊन पोहोचलो. "दिघे, मी काय सांगतो आहे ते निट एका. माझ्याकडे फार बोलायला वेळ नाही आहे. एरवी तुमच्या प्रश्नाची उत्तरे देण्याइतके माझे डोके देखील शाबूत आहे की नाही ते मला माहित नाही. पण हे नक्की की आज... आत्ता

माझ मन आणि बुद्धी संपूर्णपणे माझ्या ताब्यात आहे. नंतरच मला माहित नाही. तुम्ही जर उद्या मला आपल्या या भेटीची आठवण करून दिलीत तर कदाचित मी सपशेल नाकारीन. तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. कारण मी आपली ही भेट इथून बाहेर पडण्याच्या अगोदर मनातून पुसून टाकणार आहे. त्याच कारणही तसच आहे. तिने जर माझ मन वाचल तर तुमच आणि माझ दोघांच भविष्य धोक्यात येईल...." मालक अत्यंत हळू आवाजात बोलत होते आणि बोलताना देखील सारखे आजूबाजूला बघत होते. खर तर गोदामात आम्ही दोघेतच होतो. सगळे कामगार कधीच निघाले होते. चुकून एकखाद-दुसरा काम करत असावा.... मशीनवर शेवटचे लाकूड कापले जात असावे. कारण मशीन चालू असल्याचा आवाज मात्र येत होता. पण ते सगळ बाहेर पार लांब चालू होत. मी नक्की काय केल पाहिजे ते मला सुचत नव्हत. त्यामुळे मी मालकांच्या समोर नुसता उभा राहून ते काय बोलतात ते एकत होतो.

"दिघे, तिच आपल्याकडे बारीक लक्ष आहे. आपल्या तिघांकडे! अजून तुम्हाला काहीच माहित नाही आहे त्यामुळे तुम्हाला ती काहीच करणार नाही. किंबहुना तिला काहीच करता येणार नाही. अहो, मलादेखील जोवर या सगळ्या प्रकारची माहिती नव्हती तोवर मी खूप सुखी होतो. एकदिवस अचानक माझ्यासमोर हे सगळ उलगडल आणि मीदेखील यात माझ्या इच्छेविरुद्ध अडकलो." मालक अजूनही कोड्यातच बोलत होते आणि मी जास्तच गोधळून जात होतो. शेवटी मी मालकांना विचारले,"तुम्ही काय म्हणता आहात मालक? मला काहीच कळत नाहीय. कोण ती? काय करणार आहे?"

"श्श.... हळू बोल. भिंतीनाही कान असतात. मुख्य म्हणजे तिची नजर सतत माझा पाठलाग करत असते. दिघे, एक सांगू? मी हे अस दुसर लग्न केल खर. पण मला मुळात परत लग्नच करायचं नव्हत. तिने मला भाग पडल. म्हणून मग मी मुद्दाम आयत्यावेळी मालिनीच्या एवजी शालीनिशी लग्न करायचं म्हंटल. मला वाटल होत बुवा नाही म्हणतील आणि मी एक निष्पाप जीव वाचवू शकेन. पण ते जमल नाही. तिला माझा आणि माझ्याबरोबर अनेकांचा अंत करायचा होता, हे माझ्या उशिरा लक्षात आल. मग मात्र मला योग्य वेळेची वाट बघत बसण्याव्यातिरिक्त काही मार्ग नव्हता. दिघे, तुम्ही आलात आणि मला सुटकेची आशा वाटायला लागली. पण मग तुमच आणि मालिनीच; लग्न झाल आणि परत मला थांबायला लागेल हे लक्षात आल. पण तुम्ही दोघे बंगल्यावर येऊन गेलात आणि माझ्या लक्षात आल की आता हा खेळ फार वेळ टिकणार नाही. तिचे विचार माझ्यापेक्षाही पुढे धावत आहेत. मुळात जर मी स्वतःला वाचवायला गेलो तर इतर मारतील. आणि दुसऱ्यांना मरू देऊन मी जगू शकत नाही. दिघे, मला माझा अंत दिसतोच आहे... पण निदान मी निर्दोष आणि प्रामाणिक आयुष्य वाचवू शकलो तर शांतपणे मरू शकेन."

मालक काय बोलत होते ते मला अजिबात कळत नव्हत. ते कोणाबद्दल बोलत होते? कोण होती ही ती? जिच नाव ते घ्यायला तयार नव्हते. मालिनी...की शालिनी? जिला सगळ कळत अस त्याचं म्हणण होत. अगदी मनदेखील वाचता येत होत तिला मालकांच! कदाचित शालिनीच. नाहीतर अजून कोण होत त्यांच्या बंगल्यात आणि आयुष्यात? मी मालकांना शांत करण्याचा प्रयत्न केला. "मी काही करण्यासारखं आहे का मालक?" मी विचारलं. त्यावर त्यांनी डोळ्यात पाणी आणून नाकारात्मक मान हलवली. ते अगदी हळू आवाजात पुटपुटले, "हिने देखील हट्टाने माझ्याशी लग्न केले. मी खूप समजावले होते तरी. आता ती देखील माझ्याबरोबर भोगते आहे सगळ." मी अजूनच गोंधळलो. मी अजून काहीतरी त्यांना धीर देणार बोलणार होतो तेवढ्यात जीवा आत आला आणि म्हणाला,"मालक, बंगल्यावरून फोन होता. मालकीणबाईना बर वाटत नाही. तुम्हाला लवकर बोलावल आहे." माझ्याकडे एक हेतुपूर्ण कटाक्ष टाकून मालक निघाले.

दोन पावल पुढे जाऊन ते अचानक परत मागे फिरले आणि परत माझ्याकडे आले. म्हणाले,"दिघे तू खुप चांगला माणूस आहेस. तू इथून निघून जा तुझ्या पत्नीला घेऊन. खरच जा! मी माझ्या एका मित्राकडे तुझ्या नोकरीबद्दल बोललो आहे. बुवांचा पत्ता दिला आहे मुद्दाम. तुला त्या पत्त्यावर पत्र येईल. तू जा इथून." एवढ बोलून मला काहीही बोलायला न देता मालक तिथून निघून गेले.

मी एकटाच विचार करत तिथे कितीतरी वेळ उभा होतो. 'मालकांनी आजवर माझा एकेरी उल्लेख केला नव्हता. परंतु जाता जाता त्यांनी मला ही नोकरी आणि गाव सोडायला सांगितल आणि माझा एकेरी उल्लेख केला. अस का? मालक नक्की कोणाबद्दल बोलत होते? शालीनीची त्यांना भिती वाटत असेल का? पण तसं असत तर ते म्हणाले नसते की माझ्याशी हट्टाने लग्न करून मग ती देखील भोगते आहे. पण अस काय झाल असेल? शालिनी दिसायला मालीनिपेक्षा नक्कीच उजवी आहे.पण मी आणि मालिनी भेटायला गेलो होतो दिवाळीत तेव्हा तर मालिनी म्हणाली होती की आता शालिनी वेगळी आणि अजून चांगली दिसायला लागली आहे. हा विचार मनात आला आणि आठवलं की आम्ही जेव्हा निघण्यासाठी उठलो होतो आणि माझी पाठ होती त्यावेळी मालिनीचा आवाज एकदम बदलला होता. अचानक थोडा तुटक, गंभीर आणि काहीसा धमकावणी दिल्यासारखा आला होता. म्हणजे मालकांनी उल्लेख केलेली "ती" म्हणजे मालिनी तर नव्हे? पण मग तस असत तर मालक मला अस का म्हणाले की तुझ्या पत्नीला घेऊन निघून जा?.....एक ना अनेक विचार माझ्या मनात सारखे येत होते. माझ्याही नकळत मी विचार करत अजूनही तिथेच लाकडांच्या राशींजवळ उभा होतो. थोड्यावेळाने जीवा मी उभा होतो तिथे आला. म्हणाला,"कारखाना बंद करायचा आहे साहेब. तुम्ही निघता ना?" मी एकवेळ त्याच्याकडे बघितलं आणि काही न बोलता तिथून निघालो.

मी घरी पोहोचलो तर संध्याकाळ होत आली होती. मालिनी घरी नव्हती. बहुतेक मला उशीर झाला म्हणून ती देवळाकडे निघून गेली होती. मी परत बाहेर पडण्याच्या मनस्थितीत नव्हतो. मालिनी काहीशी उशिराच आली. बहुतेक मी दुपारी न आल्यामुळे आणि तिला काही कळवलं नसल्याने ती घुश्श्यात होती. त्यामुळे ती काहीच बोलत नव्हती. मी देखील काहीच बोललो नाही. मालकांनी मला जे सांगितलं होत ती तस धक्कादायक आणि काहीस अविश्वासनीय होत. त्यामुळे ते सगळ सांगून मालिनीला उगाच कशाला त्रास द्यायचा? हळूहळू काय सत्य आहे ते समजेलच. असा विचार मी केला. त्यादिवशी कारखान्यातल्या कामामुळे आणि मालकांनी सांगितलेल्या एकूणच सगळ्या विषयामुळे मी खूप मनाने आणि शरीराने खूप थकलो होतो. पण तरीही झोप येत नव्हती. मालिनी सगळ आवरून झोपायला आली तरी मी अस्वस्थपणे फेऱ्या मारत होतो. शेवटी तिने जवळ येऊन विचारल,"काय झालय आज तुम्हाला? आज दुपारी जेवायला देखील आला नाहीत. मी नाराजी दाखवली तरीही तुमच अजिबात लक्ष नव्हत. एकूणच कशातही अगदी लक्ष नाही तुमच आज." तिचा आवाज आर्जवी होता. म्हणाली,"चला बघू आत झोपायला. कसली एवढी काळजी करता आहात?" तिचं ते प्रेमळ आणि काळजीपोटी बोलण एकून मला माझाच राग आला. मालकांनी त्या कोणा स्त्रीबद्दल काहीतरी सांगितल आणि मी माझ्या पत्नीवर संशय घेतला होता. मनात आल किती कोत्या मनाचा होतो मी. म्हणून मग बोलण टाळायला मी म्हणालो,"मालिनी, माझ्या गावाहून पत्र आल आहे. एक छोटासा जमिनीचा तुकडा होता आमचा. त्यासंदर्भात आहे. मी जरा बुवांना भेटून येतो. तू झोप कडी लावून. काळजी करू नकोस. मी आज तिथेच राहीन. उद्या सकाळीच येतो." मालिनीला बहुतेक आवडली नव्हती ती कल्पना. पण ती काही बोलली नाही. फक्त होकारार्थी मान हलवली. मी पायात चपला अडकवून तसाच निघालो आणि देवळात जाऊन बसलो. काही गावातली मंडळी बसली होती त्यांच्याशी गप्पा सुरु झाल्या. आणि नकळत मन थोड हलक झाल. गप्पांना चांगलाच रंग चढला होता. विषय बाजूच्या गावात आलेल्या नव्या तमाशा पार्टीचा होता. त्यामुळे किती वाजले आहेत याचं भान कोणालाच नव्हत.

अचानक मालकांच्या बंगल्याच्या बाजूने ओरड एकू आली. आम्ही सगळेच गोंधळून गेलो आणि धावत बंगल्याच्या दिशेने निघालो. जाऊन बघतो तर काय संपूर्ण बंगला पेटला होता. मला काय कराव सुचेना. मी आउट हाउसच्या दिशेने धावलो. मालिनीला बाहेर काढण महत्वाच होत. ती एकटीच होती आत. आणि मी येणार नाही अस सांगितल्याने कडी लावून झोपली होती. माझ्या जीवाची घालमेल होत होती. मी धावतच आमच्या त्या छोट्याश्या आउट हाउसकडे पोहोचलो. पण आग आउट हाउस पर्यंत पोहोचली देखील होती. मी मालिनीच्या नावाने हाका मारायला सुरवात केली. पण मला तिच्या ओरडण्याचा आवाज एकू येत नव्हता. बरोबर आलेले गावकरी जमेल तिथून पाणी आणून आउट हाउसवर मारत होते. मी दाराकडे धावलो. पण दराने पेट घेतला होता. लोकांनी मला अडवलं. माझ्या डोळ्यासमोर संपूर्ण बंगला

आणि आउट हाउस जळून गेल. मी काहीही करू शकलो नाही. आग आटोक्यात येईपर्यंत पाहाट झाली होती. पाणी मारणाऱ्या लोकांनी जरा उसंत घेतली... त्याचवेळी कोणीतरी सांगत आल की काल रात्री कारखाना सुद्धा पेटला होता.... आणि सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे मालकांनी कारखान्यासामोरच्या झाडाला लटकून गळफास लावून घेतला होता.

मी धावत कारखान्याकडे गेलो. कारखाना धगधगत होता आणि समोरच्या झाडाला मालकांचा मृतदेह लटकत होता. लोकांनी पुढे होऊन त्यांचा देह खाली उतरवला. कोणीतरी गावातल्या पोलीस चौकीवर जाऊन वर्दी दिली होती. त्यामुळे पोलीस पाटील तिथे येऊन पोहोचले होते. मी एकूण झालेल्या घटनाक्रमामुळे सरभरीत झालो होतो. डोक्याला हात लावून मी मट्कन तिथेच बसलो. बुवा आणि माझ्या सासूबाई देखील तिथे येऊन पोहोचले होते. सासुबाईना बायकांनी आवरून धरले होते. परंतु त्या छाती पिटून पिटून रडत होत्या आणि मोठमोठ्याने म्हणत होत्या,"मी आई नाही कैदाशीण आहे. सोन्यासारख्या मुलीना मी स्वतःच्या हाताने मरणाच्या दाढेत लोटलं. कुठे फाडू हे पाप." बुवा त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करत होते. ते माझ्याजवळ आले आणि म्हणाले,"जावईबापू चला माझ्याबरोबर. आता इथे काहीच उरलेले नाही."

मला एकूणच परिस्थितीचे भान राहिले नव्हते. त्यामुळे ते 'चला' म्हणाले आणि मी त्यांच्याबारोबार निघालो. बायकांनी सासुबाईना धरून घराकडे चालवले. सासूबाईच्या अंगातली शक्ती आता पूर्णपणे संपली होती. त्या आधार घेऊन निमुटपणे चालत होत्या. फटफटीत उजाडले होते आणि थंडीचे दिवस असूनही एकूणच प्रचंड उष्मा जाणवत होता. घराकडे पोहोचताच बुवांनी पडवीमध्ये एक घोंगडी अंथरली आणि मला आडवं व्हायला सांगितल. मी निमुटपणे त्यांनी सांगितल्या प्रमाणे आडवा झालो. तोपर्यंत मी मनाने आणि शरीराने इतका दमलो होतो की मनात दु:ख दाटून आल होत तरी आडवं होताक्षणीच मला झोप लागली. जेव्हा जाग आली तेव्हा उन्ह उतरणीला लागली होती आणि जाग आल्यावर लक्षात आल की समोर पोलीस पाटील उभे आहेत आणि बुवा माझ्याकडे हात करून त्यांच्याशी काहीतरी बोलत आहेत. मी उठून बसलो आणि त्यांच्या दिशेने गेलो. मला पहाताच बुवा गप्प झाले. पोलीस पाटील माझ्याकडे बघत होते. मी त्याना नमस्कार केला. त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि ते म्हणाले, "हे बघा, बंगल्याला आग लागली आणि ती आउट हाउसपर्यंत पोहोचली तरी तुम्हाला कळल नाही ही खर तर आश्चर्याची गोष्ट आहे. कारण तिथे असणारी सर्वच माणस आज मृत्यूमुखी पडली आहेत. वाचलेले असे तुम्ही एकटेच आहात. अर्थात आता एकूण सगळच संपल आहे. तुमच्या पत्नी आणि मेव्हणी दोघीही लागलेल्या आगीत जळून गेल्या आहेत. पोलिसांच्या दृष्टीकोनातून सांगायचं तर तुमच्या मालकांनी बंगल्याला आणि कारखान्याला आग लावून स्वतःला गळफास लावून घेतला आहे, असा अहवाल लिहून आम्ही एकूण ही केस बंद केली आहे. कारण समोर हेच एक सत्य दिसत आहे. त्यामुळे तुमच्यावर कोणतेही बालंट येणार नाही आहे. मुख्य म्हणजे आमच आणि गावातल्या लोकांच तुमच्या बद्दलच मत चांगलंच असल्याने आग लागली तेव्हाच नेमके तुम्ही देवळात कसे होतात अस कोणीच विचारलेल नाही. मात्र मी एक गोष्ट सुचवू का तुम्हाला? हे गाव सोडून लवकरात लवकर निघून जा तुम्ही." एवढ बोलून पोलीस पाटील परत जायला निघाले.

मी आणि बुवा देखील घराकडे निघालो. थोड पुढे जाऊन पाटलानी मला हाक मारली म्हणून बुवाना पुढे व्हायला सांगून मी परत पोलीस पाटलांकडे गेलो. त्यांनी एकवार पाठमोऱ्या बुवांकडे बघितले आणि घाईघाईने माझ्या हातात एक कागद दिला. मग मात्र काही एक न बोलता झपझप चालत ते तिथून निघून गेले. एव्हाना संध्याकाळ पुरती कलली होती. त्यांनी कागद मला बुवांच्या समोर दिला नव्हता, म्हणजे कदाचित तो कागद केवळ माझ्यासाठी होता, असा कयास मी केला आणि पटकन तो कागद सदऱ्याच्या खिशात घालून मी बुवाना गाठले. रात्री शेजाऱ्यांनी आणून दिलेलं पिठलं भात कसतरी पोटात ढकलून मी परत पडवीत येऊन बसलो. बुवांनी येऊन एक कंदील माझ्याशेजारी ठेवला आणि गारठा जाणवत असल्याने ते परत घरात घेले. थोडी सामसूम झाल्यावर मी पाटलांनी दिलेला कागद खिशातून बाहेर काढला.

ती एक चिठ्ठी होती.... मालकांनी माझ्या नावाने दिलेली. त्यात त्यांनी लिहील होत,"दिघे जे घडल आहे त्याचा अर्थ शोधायचा प्रयत्न करू नकोस. जे घडल आहे त्याचा विचारही आयुष्यात कधीही मनात आणू नकोस. कारण जोवर तू भीत नाहीस तोवरच तू जगणार आहेस, हे लक्षात ठेव. मी आयुष्यभर भिती मानात येऊ दिली नाही. पण कधी कशी कोण जाणे मनात भिती डोकावली आणि आता तू माझ पत्र वाचत असताना मी या जगात नाही."

ती दोन ओळींची चिठ्ठी वाचून मी हबकून गेलो. भिती? मालकांच्या मनात केवळ भिती होती म्हणून हे सगळ घडलं? मालकांनी मनात भिती बाळगली होती महणून त्यांनी स्वतःला आणि स्वतःबरोबर माझ्या संसाराला संपवलं? या गावात आल्यापासून मी स्वतःला भाग्यवान समजायला लागलो होतो. परंतु गेल्या दोन दिवसात माझ्या आयुष्य जे जे घडल होत त्याचा विचार करता मी ते गाव सोडून जायचा निर्णय घेतला. मात्र मालकांनी माझ्यासाठी जिथे नोकरीच बोलण केल होत त्याचं पत्र येईपर्यंत मी तिथेच बुवांच्या घरी राहिलो. नोकरीच पत्र येताक्षणी मात्र बुवांचा निरोपही न घेता मी ते गाव सोडल."

दिघे बोलायचा थांबला आणि त्याची कहाणी ऐकणारे जेटली आणि काणे थरारून गेले. दोघांच्याही तोंडातून एकही शब्द फुटत नव्हता. दिघे शांतपणे त्यांच्याकडे बघत होता. त्याचं पिण कधीच थांबल होत आणि जी काही चढली होती ती देखील पुरती उतरली होती.

जेटली अगोदर भानावर आला. त्याने दिघेचा हात हातात घेतला आणि गच्च धरला. तो प्रचंड घाबरला होता. त्याचा हात थरथरत होता. आवाजही कापत होता. त्याने आजूबाजूला बघितल आणि म्हणाला,"दिघ्या साल्या खर सांग... काहीतरी गोष्ट रचून सांगतो आहेस ना? भडव्या.... तुझ्या आयुष्यात इतकं काही घडलं आणि तरीही तू इतका शांत असतोस? भेनच्योद आपण इथे मजा करायला आलो आहोत ना?.आणि अशा अनोळखी जागी रात्रीच्यावेळी तुला असल्या कहाण्या सुचताहेत काय?" जेटलीची जाम फाटली होती. भितीने मनाचा पुरता पगडा घेतला होता. मात्र दिघे शांत होता. त्याच शांतपणे त्याने जेटलीकडे बघितल. त्याची नजर थंड होती. जेटलीचे दिघेच्या डोळ्यांकडे लक्ष नव्हते. तो उगाचच आजूबाजूला काही दिसत आहे का ते बघत होता. मात्र काणे दिघेकडेच बघत होता. त्यामुळे त्याच्या डोळ्यातले भाव बघून तो हबकून गेला. दिघ्याने जेटलीच्या हातातला आपला हात सोडवून घेतला आणि तीच थंड नजर खिडकीबाहेर वळवली.

दिघ्या खिडकी बाहेर बघायला लागला त्यामुळे नकळत जेटली आणि काणेची नजर देखील खिडकीबाहेर वळली........... जेटली आणि काणे दोघांचे डोळे मोठे झाले..... खिडकी बाहेरच्या झाडावर दिघेच्या मालकाचे शव लटकत होते. डोळे सताड उघडे होते, जीभ बाहेर आली होती........ आणि आजूबाजूला आग लागल्या प्रमाणे ज्वाळा जाणवत होत्या. त्या परिस्थितीत देखील मालकांच्या त्या हिडीस सुजलेल्या चेहेऱ्यावर केविलवाणे हसू होते. ते पहाताच जेटली आणि काणे दोघेही छातीवर हात दाबत खाली पडले.

ते दोघे खाली पडल्याचा आवाज एकून दिघेने खोलीत नजर वळवली. दोघांनाही पडलेले पाहून तो तोंडातल्या तोंडात स्वतःशीच पुटपुटला.... "मूर्ख लेकाचे! सगळ लक्ष आग कशी लागली, मालक कसे मेले आणि ते मारताना कसे दिसत होते या वर्नानामध्येच होत. मी मालकांच्या शेवटच्या चिठ्ठीतला मजकूर सांगूनही दोघेही काहीतरी विचार करायला लागले वाटत? आता देखील मी सहज खिडकी बाहेर बघत होतो ...... बहुतेक यांनी काहीतरी अपेक्षा करत भीत भीत बाहेर बघितलेलं दिसत आहे..... आणि त्यामुळेच त्यांची अपेक्षा पूर्ण झाली आहे. हम्म! ठीक आहे......स्साले.... माझी चेष्टा करत होते? मला कमी लेखात होते ना! घ्या!!! किंमत मोजावी लागलीच शेवटी. जाउदे! मात्र हे बर झाल......चला पुढच्या वेळी दुसऱ्या कोणाबरोबर बाहेर जाईन तेव्हा जर त्यांनी माझी थट्टा केली तर या दोघांची गोष्ट तर सांगता येईल ना. स्साले, वरच्या पोस्टवर होते म्हणून माज दाखवत होते ना......... घ्या आता....

त्या दोन कलेवरांच्या बाजूला बसून दिघे स्वतःशीच बडबडत होता............ आणि खिडकी बाहेरच्या झाडावर.......

***

**ज्योति अलवनि**

**साभार : मिसळपाव http://www.misalpav.com**

कथा

# डायरीतला एक दिवस

आजपण सकाळी लवकर जाग आलीच नाही. रोजची रडारड आहेच मग. त्यात स्वप्नीलची काहीही मदत नसते सकाळी. स्वत:चं आवरून जातो फक्त. बिघडवून ठेवलाय आईने, दुसरं काय? असली वळणं लहानपणीच लावायला पाहिजे होती. आमचं नशीब कुठे इतकं? त्यात हा यश, अजिबात काही आवारात नाही. सगळी ढकलगाडी आहे. आणि जरा रागावलं की ओठ काढून बसतो. किती क्यूट दिसतो. अगदी सशाचं पिल्लूच. मम्मिशिवाय याचं पान हलत नाही. 🙂 अगदी लेसही मीच बांधून द्यायची याच्या शूजची. याला शाळेत सोडायचं म्हणजे जीवावर येतं. काय करणार ? अजून थोडी वर्षं तरी नोकरी करायलाच लागणार. मी तर पक्कं ठरवलंय अजून दहा वर्षं नोकरी करणार फ़क्त. मग स्वप्नील ऑफिसला, यश कॉलेज आणि मी आरामात घरी राहणार. हि रोजची मरमर झेपत नाही. घरातून घाईने निघाले.

त्यात आज जाऊबाईकडे जायचं होतं, पूजेचं सामान द्यायला. सामान घेऊन बसमध्ये चढले तर एक सीट मोकळी नाही. इतकं सामान घेऊन बाई उभी आहे म्हणून एक माणूस उठला नाही मेला. वर उभ्या राहिलेल्या बाईकडे टक लावायला असतातच टगे. सामान द्यायला गेले तर ऐकवलंच," अगं किती दिवस तुझ्याकडे वर्षातून एकदाच असते पूजा, इथे रोज असते ना. रोज आई मला विचारत होत्या आणलस का म्हणून." इतकी खडूस आहे. सासूसासरे हिच्याकडे असतात म्हणून आपलं रोज ऐकून घ्यायचं हिचं. तिथून ऑफिसला रिक्षानेच गेले मग.

जरा रिक्षात बसल्यावर बघावं म्हणून फोनवर फेसबुक उघडलं तर रावी म्याडमचा प्रोफाईल फोटो होता नवीन पोस केलेला. घ्या ढिगाने कमेंट आणि लाईक्स. हिला काय पोरं बाळ नाहीत. फिरते नवऱ्यासोबत सगळीकडे. आणि यांच्या नवऱ्याना बरे चालतात हे असले कपडे घातलेले आणि फोटो पोस्ट केलेले? आमची जरा बसताना मागून जीन्स खाली आली की डोळे मोठ्ठे होतात. आता इतके तर होणारच ना? मी काय मुद्दाम करतेय का? जाऊ दे. किती दिवस झाले छान एक फोटो काढायला पाहिजे. कुठे खास काही करणं होतंच नाही त्यात यश झाल्यावर पोट वाढलंय. जीमला जायला हवं, कधी करणार काय माहित. निदान डाएट तरी सुरु करते. मग बारीक झाले ना मी पण असे फोटो टाकते की नाही बघ रावीबाई.

ऑफिसला पोचले तर चिडचिड झाली. काल उशिरा पर्यंत थांबून घेतलेल्या कॉलवर एकही मेल नव्हती ऑनसाईटकडून. एक तर यांना उशिरा थांबून केलेल्या कामाची किंमत नाही. आणि जरा इश्यू झाला की वर तक्रार करायला मोकळेच. सकाळ सकाळी म्यानेजरचा मेल पाहून अजून चिडचिड झाली. आता या शर्माला प्रमोशन देणार म्हणे. मी काय मेलेय का? याची कामं कोण करून देतं? लवकर घरी गेले तरी घरून कॉल घेते. याच्यासारखं बॉससोबत ड्रिंक्सला जात नाही, मागे मागे करत नाही म्हणजे बाकी कशालाच किंमत नाही का? च्यामारी ! कितीही काम केलं तरी बायकांना प्रमोशन द्यायचं म्हणालं की बोंब. सोडूनच जायला पाहिजे, म्हणजे मग कळेल यांना किती काम करते मी ते. काही नाही, आता लवकरच सुरु करते नवीन नोकरी बघायला. याच्यापेक्षा भारी नोकरी मिळवेन आणि जाईन मग यांच्या नाकावर टिच्चून.

दुपारी विराट डेस्कवर आल्यावर जरा डोक्यातला राग शांत झाला. इतका स्मार्ट दिसतो, म्हणजे विराट कोहलीच आमच्या फ्लोअरचा. सारखा मैम, मैम करत असतो. जरा याच्यापेक्षा मोठी आहे म्हणून इतकं अहो जाहो कशाला करायचं? त्याच्या गोड बोलण्याकडे लक्ष ठेवायला पाहिजे मला. त्याच्याशी जरा माऊच वागते की काय अशी शंका येते मला कधी कधी. पण काय करणार? किती विचार करणार आणि कशा कशाचा? ही राशी, सात महिने प्रेग्नंट आहे. कधी दांडी मारेल सांगता येत नाही. उद्या ती सुट्टीवर गेल्यावर मला यालाच काम सांगायला लागणार आहे ना? चहानंतर बॉसकडे गेले तर म्हणे, "काम चांगलं आहे पण तुमचा विचार पुढच्या प्रमोशनला करू. यावेळी काही करू शकत नाही". घ्या, म्हणजे धार सोडताही येत नाही. सगळे नुसते गोड बोलून काम करून घेतात. ऑन साईटला जावं तर स्वप्नीलची नोकरी अशी इथली. माझ्यासोबत येणार आहे का

सोडून? बसायचं मग इथेच आपण पण अडकून. वैताग आहे सगळाच.

घरी फोन केला तर आई बाबांचं रडगाणं. दोघेही ऐकत नाहीत. किती हट्टीपणा करतात? जरा सांभाळून घ्यायचं ना? त्यात ही ताई, पोरांचं सोडून स्वत:च्या धंद्याचं बघत राहते. कशाला हवाय हिला इतका व्याप? कधी वाटतं आपणच पैसे द्यावे तिला ज्यादा, पण त्यासाठी इकडे घरी कोण उत्तरं देत बसणार? जाऊ दे. यशला बघितल्यावर जरा बरं वाटलं. जेवायलाही 'बाहेरून आणू' म्हणाले तर 'चालेल' म्हणाला स्वप्नील. ते एक बरं आहे, सांभाळून घेतो तो. नाहीतर दिरासारखं रोज घरचंच जेवण पाहिजे दोन वेळेला म्हणालं तर मला काही जमलं नसतं. जरा रात्री निवांत टीव्ही बघत बसावं म्हटलं तर सासूबाईंचा फोन. पुढच्या आठवड्यात नंदाबाई येणार आहेत. म्हणजे गेला विकेंड. तिला बरं आहे, तिकडे घरी नवरा सगळं ऐकतो आणि इकडे आम्ही आहेच सेवेला. मेलं आमचं नशीब कुठे इतकं चांगलं?

झालं एकदाचं आवरून घर. उद्याच्या डब्याचं बघायला पाहिजे. बाईला पैसे द्यायचेत. परवाचा ड्रेस तिने खराबच केला. आता वापरता येणार नाही. आजही व्यायाम करायला जमलं नाही. उद्यापासून डाएट सुरूच करते नक्की. उद्या यशच्या शाळेत जायचं आहे. त्याचं आजचा होमवर्क ठेवला का बघते. रिझ्युम अपडेट केला पाहिजे. इथलीच कंपनी पाहिली पाहिजे. जास्त लांबचा प्रवास करता येणार नाही. का जाऊ दे? सध्या चालू आहे ठीक तर? प्रमोशनच बघू पुढच्या वेळी. नवीन ठिकाणी अजून कसले लोक मिळतील काय माहित? झोपावं आता, आजचा दिवस संपला. निदान एक तरी सिरीयल बघावी,"नांदा सौख्य भरे" लागली असेल आता.

***

**विद्या भुतकर**

**https://www.facebook.com/VidyaBhutkar1/**

**साभार : https://www.maitrin.com**

**कथा**

## असंही जोडलेलं एक नातं...

चार वर्षांची मुलगी आणि वर्षाचं बाळ मागे सोडून ती भरल्या संसारातून निघून गेली. गेली म्हणजे खरंच गेली, देवाघरी. घरावर दु:खाचं सावट पसरलं. पसरलं म्हणजे काय? घराला व्यापून राहिलं. कुठे जावं, काय करावं, महेशला काही सुचत नव्हतं. घरात काय चाललं आहे? मुलांचं काय? यापेक्षा तिच्याशिवाय आपण आयुष्यं कसं काढणार हाच एक विचार डोक्यात होता त्याच्या. अशी वेळ सांगून थोडीच येते आणि कुणावर आलीच तर त्याला काय होत असेल हे त्याचं त्यांनाच माहीत. कारण अशा दु:खाची कल्पना करणं शक्यही नाही आणि अशा कल्पना करूही नयेत. पण काय करणार? त्याच्यावर ती वेळ आली होती. घर लोकांनी भरलं होतं. जो तो जमेल तशी मदत करत होता. नातेवाईक जमले होते. मुलं समोर आली की याच्या अश्रूंचा बांध फुटायचा. ती तरी काय करणार बिचारी. कुणीतरी मोठ्या मुलीला बघत होतं कुणी बाळाला. दु:खं दु:खं म्हणतात ते हेच, दुसरं काय?

त्याने सर्व विधी पार पाडले. कुठेतरी त्यालाही कळत होतंच, जे झालंय ते स्वीकारावं तर लागणार आहेच. कालासमोर कुणाचं चाललंय? प्रत्येकजण त्याला हेच तर समजावून सांगत होता. दोन मुलांसाठी तुला धीट व्हावेच लागेल. असं रडून चालणार नाहीये, इ. इ. १५ दिवसांनी त्याने थोडं स्वत:च्या पलीकडे जाऊन पाहिलं. घराची दुरवस्था होती एकदम. त्याला वाटलं,'ती असती तर अजिबात चालला नसता हा पसारा'. त्याने घर आवरायला सुरुवात केली. पण जिथे तिथे तीच ती होती प्रत्येक गोष्टीत, घराच्या कणाकणात. तो थकला, बसून राहिला शून्यात बघत. पुन्हा त्याला ते लोकांचे 'धीर धरायला' लावणारे शब्द कानावर होतेच. त्याला एकदम आठवले,'मुलं कुठे आहेत?' . त्यांना किती दिवस पाहिलेच नव्हते त्याने. तो किचनमध्ये आला. त्याला तिथे चार बायका जेवण बनवताना दिसल्या. त्याने विचारलं,'मुलं कुठे आहेत?'. त्याची आई म्हणाली, 'त्यांना परवापासून डे-केअरला पाठवायला सुरु केलंय परत. इथे घरात ठेवून काय करणार दिवसभर?' .

तो बाहेर आला तेव्हा त्याला तिची आई एका कोपऱ्यात बसलेली दिसली. त्यांच्याकडे पाहून त्याला एकदम जाणवलं की आपण आपल्याच दु:खात इतके बुडालो आहोत की त्यांनी त्यांची एकुलती एक मुलगी गमावलीय याचा आपण विचारच केला नाहीये. गेल्या तीन चार वर्षापासून तिची आई यांच्या घरी राहायला आली. एकटीच होती, बाबा गेल्यावर आई किती दिवस एकटी राहणार म्हणून तिने हट्ट केला होता पण जावयाच्या घरी कसं राहायचं म्हणून आई येतंच नव्हती. पण नात झाल्यावर, 'तिचं करायला लागतं' असं निमित्त करून तिला घरी आणलं होतं. सुरुवातीला त्याच्या घरच्यांच्या विरोध खटकायचा तिला पण ती हळूहळू दुर्लक्ष करू लागली. असेही सासू सासरे परगावी राहायचे. मग ,'त्यांना काय त्रास होतोय ती इथे असली तर?' हा प्रश्न तिने अनेकदा महेशला विचारला होता. तो तिला समजवायचा. त्यांचं काही खूप जवळचं नातं नव्हतं त्यांच्याशी पण समजून घ्यायचा, मोजकंच बोलायचा. मुलांना आजीचा लळा होताच. आज महेशला भानावर आल्यावर कळले की नवरा नाही आणि आता एकुलती एक मुलगीही अशी सोडून गेली याचं किती दु:खं असेल या बाईला? आणि तरीही गेल्या पंधरा दिवसात त्याच मुलांचं बघत होत्या.

आताही महेश त्यांच्याकडे आला तशा त्या पटकन उठल्या म्हणाल्या, "काही हवंय का? पाणी आणू? जेवण होतंच आहे इतक्यात. आज मुलं पाळणाघरात आहेत. मी येईन घेऊन." त्यांची ती तत्परता आणि त्याला सांभाळण्याचा आवेश पाहून त्याला कसंनुसं झालं.

तो म्हणाला, "काही नाही मी ठीक आहे. मी येतो घेऊन मुलांना पाहिजे तर."

त्या," नाही, नको तुम्ही थोडे दिवस तरी गाडी नका चालवू. मी जाऊन येईन रिक्षाने."

त्याने मान हलवली आणि बाहेर जाऊन बसला. आता त्याच्या डोक्यात सासुबाईंचे विचार सुरु झाले होते. तो हळूहळू त्यांना सहारा देऊ लागला होता. त्यांचं हवं नको पाहू लागला होता. दिवस काय संपत जातात, कुणी नसलं तरी चक्र चालूच राहतं. दोनेक महिने होऊन गेले होते. घरातील वर्दळ आता बंद झाली होती आणि रोजचं आयुष्य तिच्याशिवाय कसं जगायचं हे तो शिकत होता. रोज एका नव्या आठवणीला मागे टाकत होता, कधी स्वत:शी झगडत होता. आई, बाबा आणि सासू इतकेच लोक होते घरात. एक रविवारी दुपारी सासुबाईनी आपली bag भरलेली त्याला दिसली.

त्या त्याच्याशेजारी येऊन बसल्या, म्हणाल्या,"महेश खूप विचार केला काय करायचं, कुठे जायचं? अनेक प्रश्नही पडले, माझ्या या छोट्या नातवाचं काय? तुमचं कसं होईल? इतके दिवस थांबून राहिले, जमेल तितकं काम केलं. पण मला आता बाहेर पडलंच पाहिजे."

त्यांचं हे वाक्य ऐकून तो जरा बिथरला."अहो काय बोलताय काकू तुम्ही? कुठे जाणार आहे? ".

त्या बोलल्या, "कुठे म्हणजे? जाईन ना माझ्या घरी. इतके दिवस लेकीचं घर म्हणून राहिले. आता तीच नाही तर मी तुमच्या घरात कशी राहणार?".

इतक्यात त्याची आई बाहेर आली, म्हणाली," अरे मी बोलले त्यांना थांबा अजून थोडे दिवस. जरा तुझे बाबाही गावाकडची कामं करून येतील. मग जा. पण ऐकत नाहीयेत या."

त्याला आता आईचा राग येऊ लागला. "थोडे दिवस म्हणजे काय? त्यानंतर कुठे जाणार? ".

त्याची आई थोडी गांगरली,"अरे, असं काय करतोस? त्या काय करणार इथे राहून?"
"काय म्हणजे? काकू काही नाही तुम्ही कुठेही जायचं नाहीये. इथेच राहायचं आहे. आपल्या नातवांना असं वाऱ्यावर सोडून जाणार का? ".

त्यावर त्या बोलल्या," अरे आहेत ना तुमचे आई-बाबा ही इथेच येत आहेत. मी काय करणार इथे राहून? मी येत जाईन अधे मध्ये. "

त्याला काही सुचेना, त्याने त्यांचे सामान घरात नेऊन ठेवले. त्याच्या सध्याच्या मनस्थितीमध्ये त्याला कुणी काहीही त्रास देऊ इच्छित नव्हतं. त्या गप्प बसल्या. 'जाऊ थोड्या दिवसांनी' त्यांनी विचार केला. रात्री घरातलं सर्व आवरून, मुलांना झोपवून त्या बाहेर आल्या तर महेश एकटाच कट्ट्यावर बसला होता. त्या त्याच्या शेजारी जाऊन बसल्या.

हळू आवाजात बोलू लागल्या,"हे गेले तेंव्हा लेकीकडे बघून जगत राहिले. तुमच्याकडे आले तेव्हा कुठे जरा मन रमलं. नातवांना बघून सुखावले. आता ती इथे नाही. तुम्हीच सांगा लेकीचं म्हणून तरी हे घर माझं राहिलंय का?" त्यांचे अश्रू वाहतच होते. अशा वेळी कुणी कुणाला समजवावं हे कळत नाही.

तो धीराने बोलला, "काकू तुम्ही इथे आलात तेव्हा तिची आई म्हणून मीही स्वीकारलं. माझे आई बाबा या घरात राहू शकतात तर तुम्ही का नाही? त्यामुळे त्यात चुकीचं काही वाटलं नाही. तिच्याजागी मी गेलो असतो तर माझ्या आई-बाबांसोबत नसती का राहिली ती? मग तुम्ही का असं बोलता? आणि हो, खरं सांगू का? या घरात कितीही लोक असले ना तरी, तुम्ही आजूबाजूला असता तेव्हा एक दिलासा असतो. बाकी सर्व लोकांना मी माझ्या दुखातून बाहेर कसा पडू यावर बोलायचं असतं. पण तुम्ही काहीच बोलत नाही. फक्त माझ्यासोबत असता. माझं दु:खं तुमच्यापेक्षा कुणाला जास्त कळणार? आपण दोघांनी ती एक व्यक्ती गमावली आहे. त्याचं दु:खं कुणालाच ना सांगू शकतो ना समजावू शकतो. "

ती जिवंत असताना कदाचित नसेल त्याचं नातं इतकं पक्कं. पण तिच्या जाण्याच्या दु:खाने त्यांना अजून जवळ आणलं होतं. तो नकळत त्यांच्या मांडीवर डोके ठेवून पहुडला होता आणि त्याही डोळे झिरपत त्याला शांत करत होत्या.

***

**विद्या भुतकर**

**https://www.facebook.com/VidyaBhutkar1/**

**साभार : https://www.maitrin.com**

**कविता**

## *कया सावता नी*

कया सावतानी मया,
पांडुरंग ना हवाले.
काय झायं शेतकरी,
घात जीवना कराले.[धृ]

नही गया तो वारीले,
इठोबाना पंढरीले.
नही इसरना पन,
पंढरीना तो हरीले.[१]

झाडे तोडीसनी माड्या,
तुबी लागना बांधाले.
तुन्हा तूच करा घात,
झाडे बायात रांधाले.[२]

झाडे आम्हना सोयरा,
सांगी गया तुकोबारे.
बात आत्ये तरी त्यानी,
हायी ध्यानम्हा ठेवा रे.[३]

सावताले तुकोबाले,
याद पाहिजे कराले.
बात त्यासनीच यी रे,
आत्ये आम्हले ताराले.[४]

***

**सौ. मंगला रोकडे**

**मोबाईल क्रमांक : ९३७१९०२३०३**

## *मराठी विचारधन*

आयुष्यातील कोणत्याही क्षणी क्रोधाचे गुलाम बनू नका.

***

**संग्रहित**

कविता

## तुझं सोनियाचं गाणं

पावसारे तुझं देणं,
भरभराटीचं दान.
सांग काही माणसाला,
कर त्याला ही शहाणं.[धृ]

पैसा काय पैशापरी,
शब्द रत्नांचा घे मान.
देरे पदराच्या गाठी,
धन धान्य आणि शान.[१]

बच्चे माझे इवलाले,
तुला देतील रे मान.
येरे येरे पावसाचं,
बघ म्हणून रे गाणं.[२]

नाचून नि बागडून,
करतील रे सन्मान .
येण्यासाठी पावसारे,
नको करु अनमान.[३]

तुझ्या येण्याने जातील,
बदलून दिनमान.
घर अवघं गायिलं,
तुझं सोनियाचं गाणं [४]
***

**सौ. मंगला रोकडे**
**मोबाईल क्रमांक : ९३७१९०२३०३**

## मराठी विचारधन

इंग्लिश हि फक्त भाषा आहे, कोणाची बुद्धिमत्ता मोजण्याचे साधन नाही.
***

**संग्रहित**

कविता

## तुझे पांझरे नजारे

पांझरे ग रुप तुझे,
होते पाहिले साजरे.
खळखळ झुळूझुळू,
सदा वाहते नजारे.[१]

रुप तुझं न्याहळत,
होते येणारे जाणारे.
तुझ्या प्रवाहात पाय,
शमवित पोळणारे.[२]

कंठ शुष्क तहानले,
कधी होते ग गाणारे.
एकविरा माऊलीचे,
गीत ओठी सजणारे.[३]

तुझ्या झुळूझुळूच्या ग,
संगितात नाहणारे.
अहा ! काय ते नजारे,
हजारात ही ग न्यारे.[४]
***

**सौ. मंगला रोकडे**
**मोबाईल क्रमांक : ९३७१९०२३०३**

## मराठी विचारधन

उन एकटं कधीच येत नाही ते सावलीला घेऊनच येतं, दु:खाचे अन सुखाचे हेच नातं असतं.
***

उत्साह हेच सर्वकाही आहे, फक्त ते गिटारच्या तारांप्रमाणे नीट आवळलेले असायला हवे...
***

**संग्रहित**

कविता

## पूर्ण ब्रम्हाची पूर्णता

येता येता अशी कुठे,
थांबलीस कोथंबिरी.
तुझ्या वाचून कोणती,
माझी सुगरण खरी.[धृ]

तुजमुळे सुगृहिणी,
मला म्हणतात जरी.
तूच वाढवी सन्मान,
माझा माझियाच घरी.[१]

माझ्या सावत्याने केली,
सेवा तुझी जन्मभरी.
तुझ्यातच पाहिला गं,
त्याने पंढरीचा हरी.[२]

संत झाला सेवकरी,
अशी थोर तूच खरी.
तरी केलीस माझी गं,
तुही अखंड चाकरी.[३]

तूच माझिया जीवनी,
गोडी भरते साखरी.
अन्न पूर्णब्रम्ह तूच,
पूर्णतेत रुची भरी.[४]

***

**सौ. मंगला रोकडे**
**मोबाईल क्रमांक : ९३७१९०२३०३**

## मराठी विचारधन

कल्पनेच्या जगात सत्याची ठेच लागली कि माणूस वास्तवतेच्या जगात येऊन पडतो.

***

**संग्रहित**

लेख

## कामाठीपुऱ्याची वेदना - हिराबाई.....

कामाठीपुऱ्याच्या ११व्या गल्लीत अरुंद बोळांच्या आणि खेटून उभ्या असलेल्या कळकटलेल्या इमारतींच्या भाऊगर्दीत उभी आहे 'आशियाना' ही आता पडायला झालेली इमारत. या इमारतीच्या आठवणी हिराबाईशी अन तिच्या मुलीशी ताजेश्वरीशी निगडीत आहेत. आजही 'आशियाना' हिराबाईच्या मधुर आवाजाला आसुसलेला असेल असं वाटते. 'बच्चुची वाडी' पासून उजव्या हाताला वळून पुढे आले की गल्लीतली सर्वात जुनी इमारत म्हणजे 'आशियाना'. जागोजागी भितींच्या गिलाव्याचे पोपडे निघालेले, आतल्या विटांचे लाल काळे आतडे बाहेर डोकावणारे अवशेष पहिल्या नजरेत तिरस्करणीय वाटतात. इथल्या लाकडी खिडक्यांनी केंव्हाच माना टाकलेल्या तर दरवाजांची फळकुटे नावाला आहेत, इमारतीच्या दर्शनी भागातल्या खोल्यांचे सज्जे पार वाकून गेलेले अन त्यांचे कठडे कलून गेलेले, त्या कठड्यावर आतल्या बायकापोरींनी नाही नाही ते सर्व धुवून वाळत घातलेले. अगदी बेडशीटपासून ते ब्लाऊजपर्यंत सगळं तिथं बाहेर लटकत राहते. 'आशियाना' एक चौकोनी इमारत आहे, चार विंगा असाव्यात तशी हिची रचना. मधोमध मोकळी जागा जणू काही मेघांनीही तिथं आत वाकून बघावं अन आपल्या इच्छावासना शमवून घ्याव्यात अशी तिची बांधणी . दिवसभरात उन्हे या चारही भागातून मनसोक्त फिरतात, इमारतीच्या दाटीवाटीमुळे वारा मात्र इथं फारसा नाही. इमारतीच्या दर्शनी भागातील तळमजल्यावर दुकानांची रांग अन त्यांच्या मधोमध दरवाजा नसलेली एक भली मोठी लाकडी चौकट आहे. कधीकाळी इथे दरवाजा असणार, कारण कडी अडकवण्याच्या खाणाखुणा तिथं खाली जमिनीत अन वर छतात दिसतात. खाली सगळीकडे शहाबादी फरशा अंथरलेल्या मात्र प्रत्येक फरशीचे तुकडे उडालेले अन त्या तुकड्यातून डोकावणारी मातकट जमीन यावरून माणसे येजा करत राहतात, लोक खाली बघत आत येत नाहीत तर त्यांच्या नजरा इतस्ततः खिळलेल्या असतात त्यामुळे ते खाली गटारगंगा वाहत असली तरी त्यातून खुशाल पुढे चालतच राहतात. इतरत्र आढळतात तसे जागोजागी पान खाऊन थुंकलेले जिने, रंग उडालेला बाह्य भाग अन

दाटीवाटीने लावलेली वाहने, पाण्याचे गळके फुटके नळ, मोऱ्यात पडलेली शाम्पूची, गुटख्याची अन नको त्या गोष्टींची वेष्टने अशा कबाडखानी अंगणाच्या या इमारतीची खासियत तिथल्या उजव्या दिशेतील चाळवजा भागात होती. अख्ख्या कामाठीपुरयात बच्चूची वाडी आणि आशियान्याच्या चार पैकी या भागातील इमारतीत नाचगाणे चालते, ते पण असे की जिथे अंगाला हात लावून घेतला जात नाही.

तर या दर्शनी दरवाजातून आत आले की उजव्या हाताची जी चाळवजा बाजू आहे त्यातल्या चौथ्या मजल्यावर राहायची हिराबाई. ती मुळची बहादूरपूरची. जिल्हा मुरादाबाद, युपी तिचे मूळगाव होते. तिथंच जवळ असणाऱ्या एका वाडीवर ती आपल्या लहानशा परिवारात समाधानात गेलेलं...एकदा शेतात आई बरोबर कामावर गेली असताना गोफणीतून फेकेलेला दगड तिच्या डाव्या डोळ्याला लागल्याने तिचा डावा डोळा तेंव्हापासूनच निकामी झालेला होता. तिला आणखी दोन लहान बहिणी अन एक भाऊ होता जो वयाने सर्वात लहान होता. या चारही मुलांचे शिक्षण करणे तिच्या वडिलांना त्या कठीण काळात अशक्य होते. शिवाय त्यांची आर्थिक परिस्थिती अगदी हलाखीची होती. लहानग्या हिराचा एक डोळा गेला आणि चौथीतच तिची शाळा तुटली. हिरा खरे तर अभ्यासात हुशार होती मात्र डोळा गमावल्याने तिला घरी बसण्याची वेळ आली. हिराचे वडील कृष्णभजन गायचे, गावोगावी जलशात जायचे एरव्ही कुणाच्याही शेतात रोजंदारीवर कामाला जायचे अन आई देखील पडेल ते काम करायची. हिराची शाळा सुटली अन गायन सुरु झाले. त्याचे कारण तसेच होते, हिरा अभिजात गोड गळ्याची, सुरेल आवाजाची देखणी मुलगी होती. शाळेत प्रार्थना वा राष्ट्रगीत गाताना तिला टेबलावर उभे केले जाई. हिराच्या वडिलांनी तिच्यातले हे गुण हेरून आपल्या बरोबर गायनाचे ठिकाणी तिला सोबत न्यायला सुरुवात केली. राधेची वा मीरेची पदे ती गाऊ लागली. तिचं गाणं सुरु झालं की समोरच्या माणसाची अक्षरशः ब्रम्हानंदी टाळी लागत असे !

एकदा हिराचे वडील तिला मुरादाबादमध्ये एका मोठ्या भजनसंध्येत घेऊन गेले, तिथे त्यांची गाठ पडली राघवशी. राघवने पहिल्याच भेटीत हिराच्या वडिलांवर आपली छाप उमटवली. त्याने त्यांचा पत्ता घेतला अन नंतर दोन चार वेळा त्यांच्या घरी देखील जाऊन आला. आपली सारी माहिती खोटी सांगून,नानाविध नाटके करून त्याने हिराला आपल्या गळास लावले. गरिबीने पिचलेल्या व वडिलांच्या असहायतेमुळे खचलेल्या हिराला त्याला होकार देण्याशिवाय पर्याय नव्हता. तिने होकार देताच राघवने काही दिवसातच हिराच्या घरासमोरच मांडव उभा करून त्याच्या सारखेच दोनपाच खोटे नातेवाईक गोळा करून त्यांची 'बारात' तिच्या दारी आणली अन तो लग्न करून तिला तिथून घेऊन गेला तो कायमचाच ! या दिवसापासून हिराच्या आयुष्यात कायमचा अंधार झाला. तिची एका डोळ्याची दृष्टी गेली तेंव्हा तिला सावरायला, हात दयायला तिचं सारं कुटुंब एक झालं होतं. आता तिच्या ताटात जे वाढून ठेवलं जाणार होतं त्यातून बाहेर काढायला तिचा कृष्णसखाही येणार नव्हता कारण हे घोर कलियुग आहे !

राघव हा एक अट्टल दलाल होता. गरीब, नडलेल्या, असहाय मुली जाळ्यात ओढून त्यांना मुंबईत आणून विकायचं त्याचं कामच होतं. त्याने हिराशी विवाह केला आधी आपल्या घरी घेऊन गेला, तिथं तिला मनसोक्त कुस्करून झाल्यावर त्याने तिला एके सकाळी आपण मुंबई बघायला जाणार आहोत असं सांगितलं. ज्या मुंबईबद्दल आपण ऐकलं आहे त्या शहराला आपण भेट दयायला जाणार या कल्पनेने ती हरखून गेली. तिला वाटले, 'आपला नवरा आपल्यावर किती मनापासून प्रेम करतो ! खरेच आपण धन्य आहोत !'...दोनेक दिवसात हिराला घेऊन राघव मुंबईला आला. मुंबईला येण्यापूर्वी हिराने आपल्या आईवडीलाना लिहिलेले पत्र त्याच्याकडे टपालपेटीत टाकण्यासाठी दिले. पण त्याने ते फाडून फेकून दिले अन तिला टपालपेटीत सांगितल्याचे खोटे सांगितले. ती बिचारी त्याच्या शब्दावर विश्वास टाकून त्याच्यासवे मुंबईस आली. राघव अन हिरा मुंबईत आले ते साल १९७७ च्या आसपासचे असावे. ऐन मध्यरात्री ते रेल्वेने मुंबईत उतरले. आल्याबरोबर राघवने तिला 'आपण पूर्वी इथं नोकरीस असल्याची' थाप ठोकत थेट कामाठीपुऱ्यातल्या गल्लीत आणले. ते तिथं आले तेंव्हा रात्र उतरणीला लागली होती, रस्ता उजाड झाला होता अन त्या अरुंद गल्ल्यात तिथल्या अभागी स्त्रियांच्या उमाळ्यांशिवाय काहीही नव्हते, नाही म्हणायला काही दारुडे इतस्ततः लोळत पडले होते अन त्यांच्या वळचणीला भटकी कुत्री अंगाची वळकटी करून

बसली होती. साऱ्या परिसरात वेदना आणि उन्माद यांचा एकत्रित हुंकार भरून राहिला होता, तिथले भगभगते पिवळे दिवे आणखी भयाण वाटत होते. आसपासची छोटी मोठी दुकाने, टपऱ्यादेखील बंद झाल्या होत्या, जणू कुणालाच तिथल्या बायकांचे कन्हणे ऐकायचे नव्हते. त्या रात्री राघव तिला घेऊन थेट 'जमुनाबाईच्या बिल्डींग'मध्ये घेऊन आला. बहुधा तो येणार याची जमुनाला खबर असावी कारण त्याने दोनेक वेळा दार वाजवताच स्वतः पुढे होऊन तिने दार उघडले. दार उघडून त्याला कोपऱ्यातील खोलीकडे जाण्याचा इशारा केला. त्या सरशी पडत्या फळाची आज्ञा गोड मानून राघव सरासरा त्या खोलीकडे निघाला.

ती अरुंद भयाण गल्ली अन तिथल्या एकेमेकाच्या अंगचटीला आलेल्या कोंदट इमारती अन त्यातील त्या कोंबडयाच्या खुराडयासारख्या खोल्या बघून खरे तर हिरा भांबावून गेली होती, मात्र तिचा तिच्या नवऱ्यावर पूर्ण विश्वास होता. त्या अरुंद खोलीत सामान टाकल्याबरोबर त्याला बिलगत तिने 'आपल्याला फार भीती वाटत असल्याचे' सांगितले. 'एक रात्रीचा प्रश्न आहे, उद्या आपण मित्राच्या खोलीवर राहायला जाणार आहोत तेंव्हा फार काळ इथं काढावा लागणार नाही' असं तिला सांगून प्रवासाने थकलेले ते दोन्ही जीव तिथेच झोपी गेले. भल्या पहाटे ती गाढ झोपी गेल्याची खात्री होताच राघव आपल्यासोबत आणलेली पिशवी घेऊन बाहेर आला अन त्याने हलकेच जमुनाबाईचे अर्धउघडे असलेले दार आत लोटून तिच्या खोलीत प्रवेश केला. तिच्याशी दबक्या आवाजात बोलत, हातावर हात देत ठरलेली रक्कम घेऊन त्याने तिथून पोबारा केला. राघव तिथून नुसताच निघून गेला असे नव्हे तर राघव हिराच्या आयुष्यातून कायमचा निघून गेला मात्र तिच्या आधीच अंधकारलेल्या आयुष्यात नरकयातनांची काळरात्र कायमची टाकून गेला.......

दुसऱ्या दिवशी सकाळ होताच हिराला काय होतंय हेच लवकर उमजले नाही, ती जागी झाल्याची बातमी जमुनाच्या कानी गेल्यावर ती तिला बघायला त्या खोलीत आली अन हिराला पाहून तिने मोठ्याने बोंब ठोकली. हिरा एका डोळ्याने अंध आहे हे राघवने तिला सांगितले नव्हते. हिरा जरी नाकीडोळी छान असली तरी तिच्यातल्या व्यंगामुळे तिला कोणी गिऱ्हाईक हात लावणार नाही. फारतर 'एखाद दुसरा म्हातारा वा रोगी दरिद्री माणूस हात लावेल' असं पुटपुटत ती कपाळावर हात मारून घेऊ लागली. तिने हिराचा त्या दिवसापासून अनन्वित छळ सुरु केला. आजूबाजूचा परिसर अन त्या साऱ्या बायका बघून भांबावून गेलेली हिरा धाय मोकलून रडत बसे. ना कोणाची ओळख न कुणी माथ्यावरून हात फिरवणारे ! कारण सगळेच दुःखी अन सगळेच वेदनेला सरावलेले ! दुःख कुणी कुणासाठी अन का करावे अशी तिथली अवस्था होती. आपल्या पतीने आपल्याला इथं आणून विकले याचा फार मोठा धक्का तिला बसला अन त्याही पेक्षा मोठा धक्का तिला त्या रात्री बसला. जमुनाने तिला रात्रीसाठी सजवण्याचा लाख प्रयत्न करून पाहिला. पुढच्या काही दिवसात उपाशी ठेवले, पाठीवर पोटावर चटके दिले, लाथाबुक्क्याने तुडवून काढले. खाणेपिणे बंद केले ! राघवचा राग देखील तिने हिरावरच काढला. गरीब असली तरी हिरा सुसंस्कृत घरातली होती, ती जमुनाचे असले घाणेरडे हुकुम कधीच ऐकणारी नव्हती. तिने जीव देण्याचा प्रयत्न करू नये म्हणून तिला पलंगाला बांधून ठेवण्यात आले होते. बघता बघता एक आठवडा असाच गेला. तिच्या कपड्यांची लक्तरे झाली होती, गोऱ्यापान देहाची पार ऱ्या गेली होती. रडून रडून डोळे सुजले होते, हातावर पाठींवर मारहाणीचे व्रण पडले होते, ओठावर ठोसा बसल्याने ओठ रक्तबंबाळ होऊन फाटून सुजून गेले होते. त्या नंतरच्या दिवशी बहुधा नवरात्रीस सुरुवात झाली होती, बाहेरील आरतीचा आवाज ऐकल्यानंतर हीराला आपल्या गावाकडील कृष्णभजनांची आठवण झाली, आपले आईवडील आपली भावंडे आठवली अन तिच्या डोळ्याला धारा लागल्या. त्या दुःखावेगातूनच ती गाऊ लागली. माताराणीचे गाणे तिने इतक्या सुरेल आवाजात अन तन्मयतेने गायले की तिच्या आजूबाजूच्या खोलीतील मुली तिच्या भोवती येऊन उभ्या राहिल्या. तिचं गाणं ऐकून जमुनाबाई देखील तिथे आली. काही क्षण तिने मन लावून तिने गाणे ऐकले अन तिच्या चेहऱ्यावर एक अनामिक आनंद ओसंडून वाहिला !

हिराचे गाणे ऐकून जमुनाबाईची चिंता मिटली होती. तिने तत्काळ एक निरोप पाठवून जुम्मनमियाला बोलावणे धाडले. तोपर्यंत हिराला दोरखंडातून मोकळे करून तिला खायला प्यायला दिले, मस्तपैकी कडक पाणी अंघोळीला

दिले. अंघोळीला भरपूर गरम पाणी ही इथे एक चैनच मानली जाते. हिरा मात्र बुचकळ्यात पडली होती. काही वेळाने जुम्मनमिया तिथे आले. तो साधारण पन्नाशीचा माणूस असावा. डोक्यावर जाळीची टोपी अन रंगवलेले तांबूस केस, गौरवर्ण, भेदक घारे डोळे, स्थूल देह, मध्यम उंची अशा देहयाष्टीचा तो माणूस नवीन गायिकेला ऐकायला बेचैन झाला होता. आपल्याला जमुनाबाईने 'ताबडतोब निघून या, एक कमालीचा तोहफा आणला आहे' असं का सांगितलं असावं याची त्यांना फार उत्सुकता लागून राहिली होती. ते आल्याबरोबर जमुनाबाईने हीराला बोलावणे धाडले. घाबरत घाबरत हिरा त्यांच्या समोर आली. नाना शंका कुशंकांनी ती हैराण झाली होती. खरे तर तिच्यात उभे राहण्याचे सोडा, रडण्याचे देखील त्राण नव्हते. हिराला जुम्मन मियाच्या समोर बसवण्यात आले,तिचे सर्वांग थरथरत होते. जुम्मनमियाने तिच्याकडे डोळे भरून पहिले अन हलक्या आवाजात तिला म्हटले - "गाओ बेटी !"

त्यांच्या तोंडून निघालेल्या त्या 'बेटी' या शब्दाने जणू तिचे काळीज चिरून टाकले, ती विद्ध होऊन गेली अन ओक्साबोक्शी रडत रडत जुम्मनमियाच्या कुशीत केंव्हा शिरली कुणालाच कळले नाही. तिला पाठीवर थोपटून जुम्मननी तिला गायला सांगितले.
"तुम अगर अच्छा गाओगी तो मै तुम्हारी मदद करुंगा, गाओ बेटी ! डरो नही !"

त्यांच्या या बोलण्याने जीवात जीव आलेली हिरा जरा सावरली अन तिने गायला सुरुवात केली. तिने सुरेल आलाप घेत मीरेचे भजन गायला सुरुवात केली -
"मैं बिरहिन बैठी जागूं; जगत सब सोवे री आली
दुल्हन बैठी रंगमहल में, मोतियन की लड़ पोवे....."
गाताना तिच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा लागल्या होत्या अन तिचे गाणे ऐकून जुम्मनमियांच्या डोळ्यात देखील आनंदाश्रू आले. त्यांनी तिच्या डोक्यावरून हात फिरवला,डोळे पुसले. 'आणखी काही वेगळे गायला येते का' याची चौकशी केली अन जमुनाबाईशी पुढील मसलत करण्यात ते दंग झाले. हिरा तिच्या खोलीत निघून आली. काय घडते आहे याचा तिला अंदाज आला नव्हता.

जमुनाबाईच्या इथून निघालेला जुम्मन थेट वाहिदाकडे आले. त्यांनी सारा किस्सा तिला बयान केला, ते ऐकताना तिचे डोळे विस्फारल्या सारखे वाटले. संध्याकाळ होण्याच्या आधी जुम्मन पुन्हा जमुनाकडे गेले व हिराला सोबत घेऊन तडक 'आशियाना'त आले ! हिरा अशा प्रकारे 'आशियाना'त दाखल झाली. हिराच्या सौंदर्याला वाहिदा भुलून बघत होती, तिच्या एका गमावलेल्या डोळ्याचे अस्तित्व तिच्या देखण्या चेहऱ्यात जास्त ठळक जाणवत होते. हिराला वाहिदाच्या समोर बसवण्यात आले अन पुन्हा गायला सांगितले गेले. तिने 'गिरधर के घर जाउं' हे आर्त भजन गायला सुरुवात केली अन सारे तिच्या गायनात दंग झाले. वाहिदाने त्या दिवसापासूनच तिला आपल्याकडेच ठेवून घेतले ते कायमचेच ! मात्र अर्थातच पूर्ण किंमत देऊन. जमुनाबाईने वाहिदाकडून हिराचा मोबदला वसूल करताना दोनपाच हजार जास्तीच वसूल केले होते. अशा रीतीने हिराची त्या बाजारात दुसऱ्यांदा विक्री झाली. एक अनमोल हिरा कवडीमोल भावाने पुन्हा विकला गेला !...मात्र एक झाले, हिराच्या एका अंध डोळ्याने तिच्या शरीराचे लचके तोडायचे वाचवले तर तिच्या गोड गळ्याने तिला पुन्हा इथेच अडकवले. पण पहिल्यापेक्षा तिची जरा बरी अवस्था इथे होती कारण वाहिदाच्या घरात फक्त नाचगाणे चाले तिथे वेश्याव्यवसाय नव्हता. त्यामुळे हिराची त्यातून सुटका तिच्या गोड गळ्यानेच झाली. हीराला वाहिदाने तिथेच तालीम सुरु केली, गुलाबभाई नावाचे या बदनाम गल्ल्यातले गायक तिला शिकवायला येऊ लागले. या गुलाबभाईनी तिच्या गायकीत फुलांचे सौंदर्य भरले, अत्तरांचे गंध ओतले, शृंगाराचे कुंभ तिच्या गायकीत रिते केले, तिला खयाल शिकवले नानाविध चीजा शिकवल्या.

काही आठवडे गेले अन हिराचे पहिली पेशगी म्हणजे पहिले गाणे बजावणे सादर झाले. तिथे आलेले सगळे तिच्या गायकीवर फिदा झाले. वाहिदालाही पैसे वसूल होतील याची खात्री झाली. हिराला या काळात आपल्या गावाकडे पत्र पाठवावे असे वारंवार वाटू लागले, घरी आपली काळजी करत असतील असं वाटू लागले. तिने तिची सारी दर्दभरी कथा वाहीदाला ऐकवली व तिला परवानगी मागितली. तिथला पत्ता न देण्याच्या अटीवर हिराला पत्र पाठवायची परवानगी तिने दिली. हिरानेही घरी आपली काळजी करतील या हेतूने

अन घरच्यांना आपल्या पायी त्रास नको म्हणून खोटे क्षेमकुशल कळवले. आता हिराला कामाठीपुरयात येऊन दीड महिना झाला होता अन एके सकाळी तिला उलट्या होऊ लागल्या, चक्कर येऊ लागली. वाहिदाने काय झाले असेल याचा अंदाज बांधत तिथल्या हकिमाला बोलावले. त्यानेही तेच निदान केले. हिरा गरोदर होती ! हिराच्या पोटात राघवचा गर्भ वाढत होता. वाहिदाने तिला पोट पाडायला सांगितले, धमकावून बघितले, सर्व उपाय करून बघितले मात्र हिरा बधली नाही. तिला वाटत होते की, 'आपण आपल्या माणसांपासून इतके दूर आहोत की कधी त्यांची पुन्हा भेट होणे संभव नाही...मग आपल्या रक्ताचे आपलेपण दाखवणारे, आपली काळजी करणारे कोणी तरी आपल्यापाशी भविष्यात असावे..' वाहिदाने तिला अटी घातल्या त्या तिला निमूटपणे मान्य कराव्या लागल्या. तिथून पोलिसांकडे जाणे सोपे होते मात्र पोलिस वापरून कोर्टात नेतात, तिथं चिल्लर पैसे दंड म्हणून भरले की सोडले जाते, पुन्हा रस्त्यावर नाहीतर सुधारगृह नावाच्या दुसऱ्या शोषणगृहात जावे लागते हे एव्हाना तिला कळले होते. सारे पर्याय बंद झाल्याने वाहिदा म्हणेल तसं वागण्याशिवाय तिला पर्याय नव्हता. वाहिदाने अटी घातल्या होत्या की, 'मूल झाल्यावर आठवड्यात काम सुरु करायचे, मूल रडले तरी उठून जायचे नाही, दवाखाना वगैरे साठी बाहेर पडायचे नाही !'

यथावकाश हिराची प्रसूती झाली. तिने अत्यंत देखण्या मुलीला जन्म दिला होता. ती मुलगी तिचं विश्व बनून राहिली, तिलाच तिनं आपलं प्रेम मानलं, तिलाच आपलं ईश्वर मानलं म्हणून तिनं तिचे नाव ठेवले - 'ताजेश्वरी' ! .......ठरल्याप्रमाणे हिरा अकराव्यादिवशी मैफिलमध्ये गायला बसली. पण तिचे सारे लक्ष पोरीकडे असे. मुलीचे आर्त स्वर ऐकले की तिच्या पोटात कालवत असे. मग तिथल्याच कामवाल्या मौसीला तिने रात्री थांबवून घ्यायचे ठरवले. पोर तिच्या मांडीवर असे, ती रडली की दुधाची बाटली तोंडाला लावली जाई. तिचा आवाज शांत झाला की हिराबाई मन लावून गात असे.अगदी मुबारक बेगमचे 'हमरी अटरियापे' देखील ती मन लावून म्हणत असे -

"सांस में बुलाये बैठी, कहाँ गुम हुआ अंजाना
अरे अरे दिए रे जलाए रे जलाये, ना अटरिया पे आया परवाना
कौन सा तन हाय, बारमाये रे हमरी अटरिया पे, आजा रे सांवरिया...."

ती गात असताना समोर नाचणाऱ्या मुली देहभान हरपून जात, जुम्मनमिया तबल्यावर साथ देई तर साकीब हार्मोनियमवर असत. जुम्मनमिया सारी कमाई इथल्या एका बाईवर उधळून खुश असे तर साकिबचा इथल्या कुठल्याच बाईवर तिळमात्र विश्वास नव्हता. ढोलकी वाजवणारे सुजितदादा मात्र या सर्व लोकांपासून अलिप्त असत. आपण भले नि आपले काम भले अशी त्यांची वर्तणूक होती मात्र या सर्व लोकांचा हिरावर जीव होता अन लहानगी ताजेश्वरी या सर्वांची लाडकी होती. कधी कधी एखादे हौशी, कदरदान गिऱ्हाईक हिराबाईवर देखील दौलतजादा करून जात असे. हिरा ते पैसे आपल्या पोरीसाठी साठवे. काळ पुढे जात गेला अन ताजेश्वरी मोठी होऊ लागली. हिराने साठवलेल्या पैशातले काही पैसे घरी पाठवले तर वाहिदाचे तिच्या 'खरेदी'चे बरेच देणे तिने फेडले. तिने गावाकडे पाठवलेले पैसे तिच्या पाठच्या बहिणींच्या लग्नात कामाला आले. घरच्यांनी तिला लाख बोलावले तरी ती मानी स्त्री आपल्या घरी परत गेली नाही, मात्र आपला खुला हात तिने आकसता केला नाही...

इथे देखण्या स्त्रियांचे काय हाल होतात हे हिरा डोळ्याने बघत होती, अनुभवत होती म्हणून तिने ताजेश्वरी सहासात वर्षाची असताना तिला नाईलाजाने गाणं शिकवण्यास सुरुवात केली. तिची आईही तीच होती अन शाळाही तीच होती. वाहिदा वरवर गरीब वाटायची पण धोरणीही होती. जमीन अस्मान एक झाले तरी ती गिऱ्हाईकाला अंगचटीस येऊ देत नसे, त्यामुळे तिच्या अड्ड्यावर तशी माणसेच येत नसत. बघता बघता काळ पुढे निघून गेला हिराबाईचे केस हळूहळू पिकत गेले अन एका सकाळी ताजेश्वरी न्हाती धुती झाली तशी हिराच्या काळजात वीजा चमकल्या....ताजेश्वरी आईसारखीच समजूतदार होती, असल्या वस्तीत राहून देखील तिनं स्वतःचे शरीर जपले होते. आईच्या शब्दाबाहेर जायची तिची टाप नव्हती.

अन एके दिवशी आक्रीत झालं. बाजारात गेलेली वाहिदा अपघातात जागेवर मृत्यमुखी पडली. तिच्या

घरातल्या सर्व लोकांवर आभाळ कोसळले. कारण वाहिदा हीच त्यांची ढाल होती. वाहिदाच्या पश्चात तिच्या अड्ड्याची मालकी तिच्या बहिणीकडे, शबनमकडे आली. तिच्यात अन वाहिदाच्या स्वभावात दोन धृवांचे अंतर होते. तिने घराचा ताबा घेतल्यापासून कस्टमरशी शरीरसंबंध ठेवण्यासाठी तिथल्या पोरीबाळींना दम दयायला सुरुवात केली कारण तिला अधिकाधिक पैसे हवे होते. तिच्यासाठी हिराबाई ही 'काम की चीज' नव्हती. तिने राहिलेले पैसे टाकून हिराबाईला घर सोडण्यासाठी त्रागा सुरु केला होता. कमवलेले सर्व पैसे घरी पाठवून हिराबाई जाम फसली होती. शबनम दम खायला तयार नव्हती. तिने एक पर्याय समोर मांडला, "एक तर पोरीला धंद्याला लाव नाहीतर बाजारात उभी कर !"....या संकटकाळात शबनमने कामावरून काढलेले जुम्मनमिया पुन्हा तिच्या कामी आले. त्यांनी कोलकात्यात 'सोनागाछी'त त्यांच्या ओळखीच्या एका कोठ्यात गाणे बजावण्यासाठी ताजेश्वरीची सोय केली. तिथे त्याचा भाचा तबलाही वाजवायचा अन गायकीदेखील करायचा. मात्र तिथे राहण्यासाठी हिराबाईला परवानगी नव्हती अन एक डोळ्याने अंध असलेल्या चाळीशीच्या बाईला 'किंमत'देखील नव्हती. हिराबाई नाईलाजाने शबनमकडेच राहिली अन ताजेश्वरी कोलकत्याला गेली. जाताना मायलेकरे एकमेकाच्या गळ्यात जीव तोडून रडली. त्यांच्या दुःखात सामील व्हायला जगाकडे वेळ नव्हता, जग ज्यांना निव्वळ भोगवस्तू समजते त्यांचीही एक दर्दभरी दुनिया असते हेच मुळात जगाला ठाऊक करून घ्यायचे नसते.

ताजेश्वरी गेली अन हिराबाई खचून गेली, तिच्या गायकीतला जणू प्राण गेला. तिचे ख्याल चुकू लागले, तिचा ताल चकवा खाऊ लागला, श्वास अडकू लागला. चाळीशी पार झालेल्या हिराबाईला दवाखान्याची पायरी चढावी लागली. डॉक्टरांनी तिला तपासून मोठ्या दवाखान्यात जाण्याचा सल्ला दिला. तिथं तिच्या सर्व तपासण्या झाल्या अन तिला घशाचा कर्करोग झाल्याचे निदान झाले. उपचारालाच नव्हे तर दोन वेळेचे अन्न घ्यायला आता हिराबाई महाग झाली होती तिथं दवाखाना कसा करणार हा प्रश्न आ वासून उभा होता. तिला समाधान एकच होते की ताजेश्वरी जिथे होती तिथेही देहविक्रय होत नव्हता. शिवाय जुम्मनमियाचा भाचा अजहर ताजेश्वरीसोबत लग्न लावून संसार थाटू इच्छित होता. ताजुने तसा संदेशा हिराबाईला पाठवला अन हिराबाईचा जीव खूप दिवसानंतर आनंदून गेला. तरीही एक अडचण होतीच, अजहरने तिथे काही पैसे उचल घेतले होते त्याची परतफेड करण्यासाठी काही रक्कम कमी पडत होती. त्या शिवाय तिथून निघता येत नव्हते. हा तिढा कसा सोडवायचा हे हिराबाईला सुचत नव्हते. तिने उसनवारी मागून बघितले, सावकाराची पायरी चढून बघितली. बँकेची दारे अशा लोकांसाठी कधीच उघडी नसतात कारण यांच्याजवळ स्वतःची ओळख नसते ना जामीन नसतो ना गहाण टाकायला काही ऐवज असतो ! शेवटी हिराबाईने काळजावर दगड ठेवून तो निर्णय घेतलाच. इतकी वर्षे देहाच्या बाजारात राहूनही जिने स्वतःचे पावित्र्य जपले होते तिने आपले शरीर कुणाच्याही आधीन केले. आपण असे न तसे लवकरच मरणार आहोत तर मग आपल्या लेकीच्या आयुष्याचे भले करून मेलो तर आपले जीवन कारणी लागेल हा एकच विचार तिने केला. स्वतःच्या आरोग्याची पर्वा न करता काळ्याकभिन्न, आडदांड, राक्षसी, कुरूप, रोगीष्ट, दारुडया, नशेखोर, चरसी, वासनांध तरुणवृद्ध अशा कोणत्याही वखवखलेल्या गिधाडांच्या हाती तिने स्वतःला स्वाधीन केले. तिने तिचा आजार अंगावर काढला, दवापाणी तर चालूच केले नव्हते. तिची ही हकीकत कुणी तरी एनजीओ पर्यंत पोहोचवली. पण तोवर फार उशीर झाला होता. दोन महिने रात्रंदिवस एक करून हिराबाईने पैसा गोळा करून पोरीकडे पोहोच केला.मात्र हे पैसे कसे गोळा झाले याची तिला कानोकान खबर होऊ दिली नाही. पुढच्याच दिवशी तिची तब्येत खूप बिघडली तेंव्हा तिला केईएममध्ये दाखल केले गेले. बहुधा १९९८ चे ते वर्ष असावे. ती एक आठवडाभर दवाखान्यात होती, आता तिचे श्वास जड होऊ लागले होते. एव्हाना तिने ताजेश्वरीला तिच्याकडे बोलावणे धाडले होते. ती थेट इस्पितळातच आली, आईच्या गळ्यात पडून रडली. हिराबाईच्या डोळ्यातून मात्र आनंदाश्रू वाहत होते.पोरीचे लग्न बघता आले नाही मात्र या नरकातून तिची सुटका झाली याचा तिला आनंद होता. तिचा भावी जोडीदार सोबत पाहून तिचा जीव आणखी मोठा झाला....

त्या अंधारया रात्री आयुष्यभर संघर्ष करत जगलेल्या हिराबाईचे प्राण हलकेच निघून गेले. हॉस्पिटलमधील भिंती तेंव्हा गदगदून गेल्या होत्या, ती ज्या बिछान्यावर पडून होती

तो तिचे कलेवर अंगावर घेऊन मूक रुदन करीत होता. तिचे कण्हणे ज्यांनी ऐकले होते त्या सर्व निर्जीव वस्तूंनी गहिरे उसासे टाकले होते. वारा सुन्न होऊन थबकला होता तर काळ्या आभाळातील कृष्णमेघ तिच्या आत्म्यासोबत दिक्कालाच्या पलीकडे निघून गेले. ताजेश्वरीचे काळीज विदीर्ण करून हिराबाई अनंताच्या प्रवासाला निघून गेली. ताजेश्वरीने आपल्या आईच्या चितेला अग्नी दिला तेंव्हा त्या स्मशानभूमीत चारच माणसे होती. ताजेश्वरीच्या दुःखात सामील जगाने का व्हावे असा प्रश्न मला जेंव्हा पडतो तेंव्हा मी जगाचा एक भाग असल्याची जाणीव अपराधी करून जाते. कामाठीपुरयातील हिराबाईच्या मोडक्या ट्रंकेतले सर्व जीर्ण साहित्य आपल्या बेगेत भरताना त्यात वीसेक राख्या आढळल्या तेंव्हा ताजेश्वरीचे श्वास अर्ध्यात राहिले, मग जुम्मनमियांनी तिला तिच्या आजोळची माहिती दिली. आपला संसार थाटण्याआधी आपण आपल्या आजीआजोबा हयात असले तर त्यांना भेटले पाहिजे हे तिने मनात पक्के केले. अन दुसऱ्याच दिवशी ती मुरादाबादकडे जाणाऱ्या रेल्वेत जोडीने बसली. ती गावाकडे गेली, तिला कळले की तिचे आजीआजोबा वारले होते मात्र हिराबाईचा भाऊ तिथंच होता. त्याने आता शेतीवाडी सुरु केली होती. ताजेश्वरीने आपल्या मामाला सर्व हकीकत सांगितली तेंव्हा त्याचे डोळे भरून आले. त्याला काय बोलावे ते सुचेनासे झाले. त्याने त्या राख्या उराशी कवटाळल्या, त्या दिवशी हिराबाईच्या आत्म्याला नक्कीच शांती मिळाली असेल.....

काही महिन्यातच ताजेश्वरीने अजहरशी लग्न केले. हे दांपत्य आता बनारसमधे राहते. त्यांचा संसार आता सुखाचा आहे. त्यांना दोन मुले अन एक मुलगी आहे. राम,रहीम आणि हिरा ही त्यांची नावं ! ताजेश्वरी गायनाचे तर अजहर तबल्याचे वर्ग घेतो. मुले चांगल्या शाळेत शिकायला आहेत. पण हिराबाईने अखेरच्या काळात पैसे कसे जमवले ते ताजेश्वरीला आजही कोणीही कळू दिले नाही. नाहीतर ती आयुष्यभर स्वतःला दोष देत बसली असती. हिराबाईच्या अखेरच्या काळात थोडीफार मदत केल्याने ताजेश्वरीने मला आधी तिच्या कोलकत्यातील घरी बोलवले होते तेंव्हा मोठ्या सुरेल आवाजात तिने "तुम आये तो आया मुझे याद गली में आज चाँद निकला जाने कितने दिनों के बाद गली में आज चाँद निकला..." हे गाणं गायलं होतं.

आता ताजेश्वरीचे पुन्हा निमंत्रण आहे. आता तिची मुलगी हिरा ही देखील गाणं गात्ये असं ती कौतुकाने सांगते. मला त्या हिराला मन लावून ऐकायचे आहे. मला वाटते या नवतरुण हिराच्या मुखातून ती सुरेल गळ्याची अभूतपूर्व स्वर्गीय गायिका हिराबाईच गाणं गात असणार, तिची अर्धी राहिलेली गायकी गाण्यासाठी अन आपल्या सर्व आप्तेष्ठाना भेटण्यासाठी तीच परतून आली असणार...

मी जेंव्हा या हिराच्या समोर असेन तेंव्हा तिला हिराबाईचे आवडते गाणे गायला सांगेन अन ती गात असेल तेंव्हा अर्थातच माझे डोळे ओलावले असतील, हिराबाईच्या दुर्दैवी आयुष्याच्या करुण गाथेने ते डबडबले असतील ...

"जमुना किनारे मेरो गाँव साँवरे आई जाइयो,  
साँवरे आई जाइयो,साँवरे आई जाइयो |  
जमुना किनारे मेरी ऊँची हवेली,  
मैं ब्रज की गोपीका अलबेली  
राधा किशोरी मेरो नाम........"

आताही हे गाणं मी ऐकतोय अन आषाढातील तरल शाममेघात हिराबाईची मनस्वी तस्वीर हळूच तरळून जात्येय

(सूचना- मूळ घटनेतील व्यक्तींची नावे बदलली आहेत. यामागील लेखन हेतू या स्त्रियांचे दुःख वेदना समाजासमोर मांडणे हा असून, त्याबद्दल कुणाला आपत्ती वा हरकत असल्यास ते मला अन्फ्रेंड वा ब्लॉक करू शकतात, लेख शेअर करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नाही मात्र तो नावासहित शेअर केल्यास मला जास्त समाधान वाटेल. एनजीओसाठी काही योगदान दयावे वा सहभाग नोंदवावा असे वाटत असेल तर **www.preranaantitrafficking.org** येथे भेट दयावी )

***

**समीरबापू गायकवाड**  
**ई पत्ता : sameerbapu@gmail.com**

**कविता**

## रात्र

नव्हतीस उरी तू जेव्हा,
ती रात्र सतावत होती.
स्वप्नांना झापड येता,
ती हळूच जागवित होती.

हे सताड उघडे डोळे,
तुझी झलक पाहण्या जागे.
बघ चंद्रही निघून गेला,
चांदण्या निघाल्या मागे.

मी गीते अनेक रचली,
ऐकाया कोणी नाही.
मनी सरगम सुरू स्वरांची,
श्रोत्यांची सोबत नाही.

बघ शैय्या तशीच उरली,
तुझी वाट पाहूनी हरली.
ती खेळ पाहण्या उत्सुक,
सजलेली तशीच निजली.

मी कुठवर जाळू देहा?
एकांता अंत असावा.
तू परतुनी येता दारी,
तुज मिठीत स्वर्ग मिळावा.
***

**प्रसन्ना शानभाग**
**ई पत्ता :** prasanna_shanbhag@yahoo.com

## मराठी विचारधन

कष्ट हि प्रेरक शक्ती आहे जी माणसाची क्षमता तपासते आणि त्याला विकासाच्या मार्गावर नेते.
***

**संग्रहित**

**कविता**

## चांदणचकवा

धुरकटलेला चंद्रगोल काजळडोहाच्या थिजलेल्या प्रतलावर येऊन विसावतो,
तेंव्हा हलकेच तू येतेस,
आसमंतातील चैतन्याला चांदणचकवा देऊन,
दिठीतले गंधभारित निर्माल्य घेऊन !
भेगाळलेल्या पावलांचे ठसे न उमटवता चालत पुढे पुढे जात राहतेस.
कातडी सोलून निघालेले डोहाकडे टक लावून बसलेले भोवतालचे
अपराधी जरठवृक्ष तेंव्हा डोळे मिटून घेतात.
म्लान रुधिरफुले, कुरतडलेली पांगळीपाने आणि अर्धोन्मिलित मृदुलकळ्या
आ वासून बसतात.
घरट्यात लपलेली चिमणीपाखरे तुझ्या चाहुलीने अर्धीकच्ची जागी होतात,
अन पुन्हा चोची मिटतात.
डोहाकाठचे छिन्नचराचर तुला पाहून मूक आक्रंदन करत राहते,
संथगतीने तू डोहाच्या काठाशी येतेस.
तरंगावरचा चंद्रगोल तुझ्यामायेच्या स्पर्शासाठी जणू आतुरलेलाच असतो,
तो सवयीने छन्नी हात पुढे करतो !
त्याचे आवतन तुझ्या देहात झंकारते, काळजात खंजीर खुपसावा तसे
तू डोहात अल्वार उतरतेस !
तुझ्या हालचालींचे जादुई कोमलतरंग
कळकटल्या डोहाच्या शांत प्रवाहावर पिसे फिरवू लागतात,
लखलखत्या सौदामिनीला साक्षीस ठेवून पिसाळलेला डोह
तुला सर्वशक्तीनिशी खाली खेचू लागतो.
तुझ्या नाकातोंडात पाणी जाते,
भकास उघडे डोळेही पाण्याआड जातात.
तू खोल खोल डोहाच्या तळाच्या दिशेने जात राहतेस,
खाली जाताना अनामिकासाठी तू अखेरचा हलवलेला तुझ्या हेमांगरंगी

झीजलेल्या हाताचा तळवा डोहावर तरंगताना दिसतो.
तुझा आरसपानी देह कर्दमून जातो अन
अधाशी डोह पुन्हा साळसूद होतो.
त्या सरशी काजळडोहावर रेंगाळत बसलेला खिन्न चंद्रगोल तिथून उठून वटवाघुळांच्या थव्यात लीन होत पुढे निघून जातो.
दर पुनवेला तुझे हे असेच चालू असते कित्येक वर्षापासून त्याच गतीने !
तू अशीच येतेस अन काहीही न बोलता,
आक्रोश देखील न करता...
अश्रूंची धार डोहातल्या पाण्यात विरघळवून तू वैदेहीसारखी मातीच्या गाभ्याशी जाऊन सत्व शोधतेस.
ओघळलेला चेहरा घेऊन तोही तिथेच उभा असतो अन बर्फाळलेल्या डोळ्यांनी
काळीज विस्फारून तुझ्याकडे बघत असतो.
जिवाभावाच्या माणसाला डोहात बुडवून मारलेल्या बातम्यांची कात्रणे हाती धरून तो उभा असतो.
त्याची यातून सुटका नाही.
वीसेक वर्षापूर्वीच चित्रगुप्ताने त्याला सांगितलंय,
"जोवर ती या डोहात येत राहील तोवर तुला तिन्ही लोकाची दारे बंद आहेत !,
तू असाच अधांतरी लटक, तू केलेल्या विश्वासघाताची सजा मी देत नाही तुझेच कर्म देतेय !"
तेंव्हापासून या काजळडोहाजवळ तो पायात खिळे ठोकल्यागत उभा आहे.
देहाची चिपाडे घेऊन, डोळ्यांच्या खोल विहिरीत,
तुझी भग्न प्रतिमा घेऊन उभा आहे !
खोल गेलेले पोट, खचून गेलेली वाकलेली पाठ आणि
शिरावर मेंदूतल्या आठवणींच्या जखमांनी व्यापलेले विशालकाय भेंडोळे घेऊन तो उभा आहे ....
कुजलेल्या हाताची शिसवीबोटे जोडून तो उभा आहे तुझ्या माफीच्या प्रतिक्षेत !
जोवर तू माफ करत नाहीस,
तोवर तरी असेच 'अधांतरी' राहावे लागेल त्याला ......
***

**समीरबापू गायकवाड**
**ई पत्ता : sameerbapu@gmail.com**

**कथा**

## मत्सर

संध्याकाळी ७ वाजता आशिष कसाबसा घरी पोहोचला. आजचा दिवस तसा फारच गडबडीचा होता. सकाळपासून घरी फोन करायलाही वेळ मिळाला नव्हता, आरती किती रागात असेल हे सांगायची गरजच नव्हती. पण आशय ला तरी कुठे पाहिलं होतं त्याने सकाळपासून. घरातून निघाला तेव्हा तो झोपलेलाच होता. घाईघाईने घरी आलेल्या आशिषाला पाहून आशयने पळत पळत जाऊन पकडलं तर आरतीने एक रागीट कटाक्ष टाकला.
"सकाळपासून उच्छाद मांडला आहे नुसता. जरा काही देत नाही म्हटलं तर भोकांड पसरून बसतो." आरती रागारागात म्हणाली.
"जाऊ दे गं, त्याला काय समजतंय, त्याचं वय काय, आपलं काय?" ,आशिष.
"हो, रडल्यावर सगळं मिळतं, आणि आपला बाबा आपले लाड करतो हे बरं कळतं त्याला? सकाळपासून काही खाल्लं नाहीये त्याने. मघापासून दूध देण्याचा प्रयत्न करतेय तेही पीत नाहीये. तूच भरव आता त्याला. मी जरा घर आवरते.", असं म्हणून आरती तिथून उठलीच.

आशय बाबांच्या मांडीवर जाऊन बसला देखील होता. आशिषने दुधाची बाटली त्याच्या तोंडाला लावायचा प्रयत्न केला पण त्याने हातानेच ती दूर सारली.
"बरं, नाही प्यायचं दूध? चला आपण खेळूया जरा. ", मग बाप-लेक चेंडू घेऊन खेळू लागले.

आशिष आणि आरतीच्या लग्नाला अडीच-तीन वर्षे झाली, तोपर्यंत तरी आयुष्य आरामात चालू होतं. पण आशयच्या जन्मानंतर मात्र त्यांच्या संथपणे चाललेल्या आयुष्यात धावपळ सुरु झाली होतं. सगळं कसं त्याला केंद्रबिंदू ठेवूनच आरेखलं जात होतं. पण एक होतं आशयला आधीपासूनच बाबाचा फार लळा. संध्याकाळी बाबा घरी आला की स्वारी खुललीच म्हणायची एकदम. प्रत्येक दिवस जणू त्यांच्यासाठी नवीन असायचा. आरती दिवसभरांतल्या बाळाने नवीन शिकलेल्या गोष्टी आशिशला सांगायची.

दिवस कसे भुर्रकन उडून चालले होते.आशयचं वय आता साधारण दीड वर्ष झालं होतं आणि त्याच्या वयानुसार त्याची प्रगतीही चालूच होती. आजकाल त्याला रडण्याचे फायदे कळले होते. :-) जरा काही मनासारखं झालं नाही की तो भोकांड पसरायचा. बरं आशिष ऑफिसातून परत येईपर्यंत आरती त्याचं, घरचं करेपर्यंत थकून जायची त्यात असा आशयचा वाढता हट्टीपणा !

तासभर झाला तरी आशयची खायची काही चिन्हे दिसेनात. आशिषला तिने आता खेळ थांबवायला सांगितले आणि वरण-भात मिसळून आणला. आई समोर दिसल्यावर आशय परत पळून बाबांकडे गेला. आशिषलाच मग गप्पा मारायला समोर बसवून ती एकेक घास भरवू लागली, पण आज आईचे ऐकायचेच नाही असे त्याने बहुतेक ठरविले होते. आरतीचे तो ऐकत नाहीये म्हटल्यावर आशिशने त्याला आपल्याकडे घेऊन काही बाही गप्पा मारत सगळा भात संपवून टाकला आणि त्याला झोपवलेही. रात्रीच्या जेवणात आरतीचे मुळीच लक्ष नव्हते. आशय जेवून झोपूनही गेला तरी तिची एव्हढी का चिडचिड होते हे आशिषला काही कळत नव्हतं. कसंबसं आवरून अंथरुणावर पडल्यावर आरतीला आपले अश्रू आवरता आले नाहीत.

आशयला बाबाचा लळा आहे हे तर तिला माहीतच होतं पण आज काल तो तिचं काहीच ऐकत नाही हे तिला फारच टोचत होतं. माझ्या हातून खायला नको, बाबा सोबत असेल तर माझ्याकडे यायला नको की माझ्याशी लाडाने खेळायला नको. बरं आपलंच पोर ते, आणि तेही इवलुसं. त्याला काय कळणार आपल्याला काय वाटतं ते? त्याच्यावर रागावून काय उपयोग? आशिशला काही बोलावं तरी काय? की आपल्याच मुलासाठी मी तुझ्याशी स्पर्धा करतेय? त्याला आपले बाबा प्रिय आहेत म्हणून त्याच्यावर चिडतेय? बरं या गोष्टीकडे दुर्लक्ष करावं असाही प्रयत्न केला. पण तिला हेही वाटत होतं की तो लहान असतानाच ही अवस्था, आपल्याला आयुष्य सोबत काढायचं आहे. जर हे असं वाढतंच गेलं तर आपण सहन करू शकू का? आज आशयला काही कळत नाही असं तरी म्हणता येतंय. उद्या तो समजून-सावरूनही आईकडे दुर्लक्ष करू लागला तर? मला सहन होईल का? या सर्व विचारात तिला उशीरा कधीतरी झोप लागली.

दुसऱ्या दिवशी झोपलेल्या आशयच्या निरागस चेहऱ्याकडे पाहताना तिला वाटलं कसं रागावू शकतो या निरागस पिलावर? रात्रीचे विचार मागे सोडून तिने एका नवीन दिवसाची नवीन सुरुवात करायचं ठरवलं. आज आशयला अजिबात रडू द्यायचं नाही, त्याला अजिबात रागावायचं नाही. मग दिवसभर त्यांनी दोघांनी खूप मजा केली. खूप खेळ खेळले, बाहेर भटकूनही आले. इतरवेळी आरती आशयला घेऊन बसायची, त्याला छोट्या-छोट्या गोष्टी शिकवायची, कधी तो लक्ष देत नसला तरी एखादे गाणे त्याला सारखे ऐकवत राहायची. तर कधी तो एखाद्या वस्तूला हात लावताना 'नको' म्हणून सांगत राहायची की ज्यामुळे त्याला कळेल तरी की त्याला हात लावायचा नाही किंवा ती खायची वस्तू नाहीये ते. पण आज यातलं काहीच तिने केलं नव्हतं.

वरवर जरी हे सर्व ठीक वाटत असलं तरी आरतीला मनातून हे काही पटत नव्हतं.अगदीच राहवेना म्हणून ती संध्याकाळी आशयला घेऊन तिच्या आईकडे गेली. थोडा वेळ गप्पा झाल्यावर तिने मुद्द्याला हात घातला. तिचं बोलणं ऐकून आई हसूच लागली. आशिष आपल्या बोलण्याला हसतो हे तिला माहीत होतं पण आईलाही हसताना पाहून तिची अजूनच चिडचिड झाली.

मग शेवटी आईने तिला समजावलं, "अगं वेडे, मत्सर हा तर माणसाचा स्वभावधर्मच आहे. अगदी तू नाही का तुझ्या दादाला मी जवळ घेतलं की रागवायचीस. तुला वाटायचं की माझं त्याच्यावर जास्त प्रेम आहे. तेव्हा तू बाबांकडे तक्रार घेऊन जायचीस. लग्नानंतर घरातून बाहेर गेल्यावर तुला कळलंच ना की आम्ही दोघंही तुझ्यावर किती प्रेम करतो ते?".

"अगं पण आशय एकुलता एक आहे आणि आताशी तर दीड वर्षाचाच आहे. त्याला वळण तर लावायलाच हवं ना? आतापासूनच मला हे असं दुसरेपण मिळतं आपल्याच मुलाकडून. बरं आशिषला तरी काय बोलणार? तो त्याच्याकडून प्रयत्न करतोच. भाऊ-बहीण किंवा मित्र-मैत्रिणी, नातेवाईक यांच्यात मत्सर असतो हे मला मान्य आहे पण मला याचं वाईट वाटतंय की आपल्याच मुलासाठी स्वत::च्याच नवऱ्याशी स्पर्धा करावीशी वाटावी हा कुठला स्वभावधर्म?" आरती कळवळून म्हणाली.

आई म्हणाली, "हे बघ, तुला जे वाटतं ते काही चूक आहे असं मी म्हणणार नाही. आणि त्यात स्वतःला अपराधी वाटण्यासारखंही काही नाहीये. आशयला बाबांसारखी आईही प्रिय वाटावी म्हणून तू त्याला हवं ते करू देणार आहेस का? नाही ना? तुला काय वाटतंय माझ्यासाठी हे सर्व सोपं होतं का? तुम्ही झालात तेव्हा मीही अशीच एक सर्वसामान्य स्त्री होते. पण मग 'आई' झाले. माणसाला स्वभाव बदलणं किती तरी अवघड असतं, तेच तर एक आई करते. म्हणून 'पालक' होणं सोपं असतं, 'आई' होणं अवघड. आपल्या मुलासाठी, त्याच्या भल्यासाठी त्याचाच राग स्वीकारण्याचा जुगार आईला खेळावाच लागतो. आज तुला वाटतंय की ही तर सुरुवात आहे, अजून आयुष्य जायचंय. तुझं म्हणणं बरोबर आहे. ही तर सुरुवात आहे तुझ्या 'आई' होण्याची. त्याच्या परीक्षा रोज वेगवेगळ्या असतात, त्या देत राहणं आणि पास होण्याचा प्रयत्न करणं इतकंच आपल्या हातात असतं. आज तुला तुझ्या या मत्सरावर मात करून योग्य तेच करायची परीक्षा द्यायची आहे.आणि तू पास होशीलच याची मला खात्री आहे. "

मनावरचं मणांचं ओझं उतरवून आरती घरी आली होती !

***

**विद्या भुतकर.**
**https://www.facebook.com/VidyaBhutkar1/**

## मराठी विचारधन

जगात कोणीही संपूर्ण स्वतंत्रपणे ज्ञान शोधून काढले आहे असे नाही..

***

जिकडून जे घेता येईल, ज्यांच्यापासून जे शिकता येईल, ते आदराने घ्या.

***

**साने गुरुजी**

**लेख**

# आयुष्यांच्या पेटवा मशाली

**धुमसतात अजुनी विझल्या चितांचे निखारे**
**अजुनी रक्त मागत फिरती वधस्तंभ सारे...**
**आसवेच स्वातंत्र्याची आम्हाला मिळाली**
**अरे पुन्हा पेटवा आयुष्यांच्या पेटवा मशाली...**

सुरेश भटांनी अनेक वर्षांपूर्वी लिहीलेल्या या कवितेच्या ओळी सध्याच्या सामाजिक परिस्थितीला अनुसरूनच आहेत. अंर्तमुख होऊन विचार केला तर यातलं धगधगतं वास्तव आपल्या लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले पण त्या दिवसापासून आजच्या तारखेपर्यंत पहाता असे लक्षात येते की, देशाची प्रगती होण्याबरोबरच इथल्या समस्याही वाढू लागल्या. गरीबी, निरक्षरता, बेकारी, दहशतवादी हल्ले, बाबरी मशिद प्रकरण, मुंबईमध्ये झालेले बॉम्बस्फोट, संसदेवर झालेला हल्ला, काही मंदिरावर झालेले हल्ले अशा अनेक समस्यांना देशाला सामोरं जावं लागलं, या सगळ्यातनं वाट काढता काढता, प्रगती साधायची म्हणजे खरं तर तारेवरची कसरत! रोज काहीतरी घडतं आहे. अतिवृष्टी, भूकंप, अपघात बॉम्बस्फोट, जातीय दंगली असे रोज काही ना काही घडतंच आहे. आजच आपल आयुष्य खरोखर किती सुरक्षित आहे?

आपणच निवडून दिलेलं शासन वेळेवर संकटात सापडलेल्या लोकांना मदत करण्यासाठी माणसं पाठविण्यात अपयशी ठरलं मग लोक करणार काय? असं असलं तरीही आक्रोशणा-या, विव्हळणा-या प्रत्येक माणसाला मदत करणं म्हणजे फक्त सामाजिकतंचं भान राखणं असा आहे का? याचा विचार समाजात राहणा-या प्रत्येकाने किमान एकदा तरी करावा. अशा घटनांवर सहज मात करणारा सामान्य माणूस हा संपूर्ण समाजरचनेचा कणा आहे ही बाब आपणच लक्षात घेत नाही. आज इथं एक वर्ग असा आहे की ज्या वर्गाला वाटतं, 'बाहेर काहीही घडो आपल्याला काही झळ बसलेली नाही ना आपल्यापर्यंत काही येत नाही ना मग दुनिया गेली खड्डयात ...' ही मानसिकता कधी बदलणार आहे? नागरीकशास्त्रात असं शिकवलं जातं की माणूस हा

समाजशील प्राणी आहे...या ओळीचा उपयोग बरेच फक्त लेखी परीक्षेत मिळणारा एक गुण मिळविण्याकरीता करतात आणि मग सोयीस्करपणे ही ओळ विसरूनही जातात. सामान्य माणूस मात्र गप्प असतो किंबहुना त्याला अशा घटनांची सवय झाली आहे असं मला वाटतं.कुठलाही अन्याय झाल्यावर सरकार किंवा पोलीस यंत्रणेला दोष द्यायचा, चार दिवस त्या मुद्यावर चर्चा करायची, त्या मुद्याविषयीच्या बातम्या वाचायच्या, पाहायच्या, त्यावर एक चर्चा करायची आणि मग काही दिवसांनी नवा मुद्दा मिळाला की हे सारं विसरून जायचं. मनातल्या संवेदना इतक्या गोठून गेल्या आहेत ना की गेल्यावर्षी झालेल्या बॉम्बस्फोटांसारखे किती बॉम्बस्फोट झाल्यावर त्या प्रज्वलित होणार आहेत कुणास ठाऊक? की आपण फक्त धैर्यवान, सहनशील नागरिक अशी बिरूदं लावण्यात धन्यता मानणार आहोत. आत्ताची वेळ अशी आहे की इथं प्रत्येकाचं रोजच जगणं कठीण होऊन बसलं आहे अशा काळात आपण काहीतरी कृती करणं गरजेचं आहे. आपण निवडून दिलेल्या बहुतांश लोकप्रतिनिधींपैकी अनेकांनी आपल्याला आश्वासनंच दिली आहेत.

सध्या सगळया राज्यावर संकट आहे भारनियमनाचं. भारनियमनाचा भार आता सोसेनासा झाला आहे. लोक रस्त्यावर उतरले आहेत. आदोलनं होत आहेत तर कुठे दगडफेक, जाळपोळही होत आहे. पण आज जी परिस्थिती राज्यावर आली आहे त्याला फक्त आणि फक्त सरकार जबाबदार आहे असं म्हणून कसं चालेल? आपण नागरिक म्हणून जबाबदार नाही का? हा प्रश्न आज प्रत्येकानं स्वत:ला विचारायला हवा. आपण वीज वाचविण्यासाठी आजवर काय केलं? कितीवेळा वीजेचं बील वेळेवर भरलं असे साधे प्रश्न विचारले तरी आपल्याला प्रत्येकालाच भारनियमनाच्या संकंटाचा सामना करणं आणखी सोपं जाणार आहे. सरकार दोषी आहे पण तितकेच दोषी आपणही आहोत हे वास्तव स्वीकारायला हवं.

आपली अवस्था एक किंवा दोन बक-यांमागे चालणा-या मेंढयांच्या कळपासारखी झाली आहे. आपण या मेंढयांप्रमाणे कळप म्हणून न जगता समाजाचा एक कृतीशील आणि त्या समाजाविषयी मनात अभिमान असणारा घटक म्हणून राहणं जास्त गरजेचं आहे. आपल्या देशात २५ ते ४० या वयोगटात मोडणारा सर्वाधिक वर्ग आहे. या वर्गाने आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी स्वत: पावलं नाही उचलली तर पुढे आपल्या देशाला, राज्याला, शहराला खूप मोठे आघात सहन करावे लागतील. आजची परिस्थिती लक्षात घेतली तर इथे पुतळयाच्या विटबंनेपासून ते बॉम्बस्फोटांपर्यंत आणि कसलंही राजकारण खेळलं जातं. अशा परिस्थितीत नुसती टीका न करता असं का घडतं यावर विचार करून हे कसं होणार नाही याच भान राखणं गरजेचं आहे.

समाजातल्या प्रत्येकानेच स्वत: पुढाकार घेऊन ही परिस्थिती बदलण्यासाठी ठोस प्रयत्न केले पाहिजेत. अन्याया विरोधात आवाज उठवला जात नाही असं नाही पण अनेक प्रकरणं दडपली जातात. आजची सामाजिक परिस्थिती बदलण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणं आणि गरजेचं आहे. एखादा प्रश्न अनुत्तरीत राहतो तर तो का? गंभीर प्रकरणांचे खटले वर्षांनुवर्षे का चालतात? गुन्हेगार अनेकदा पुराव्या अभावी निर्दोष का सुटतात?, कुठलेही संकट आले की अतिरेकी संघटनांकडे बोट दाखवले जाते यामागे राजकारण आहे का? कारण अतेरिकी जर इतक्या कारवाया करू शकत असतील तर आपली सुरक्षा यंत्रणा कमकुवत आहे का? या आणि अशा अनेक अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरं शोधायला हवीत. हे खरं आहे की क्रांती किंवा कुठलाही बदल हा एका दिवसात होत नाही पण सुरूवात होणं खूप गरजेचं आहे. ही सुरूवात अशी असायला हवी ज्यामुळे आपल्या पुढच्या पिढीकडे कोणतेच प्रश्न अनुत्तरीत नसतील भविष्याची उज्ज्वल पहाट पाहण्यासाठी आजच्या रात्रीशी लढणं गरजेचं आहे म्हणजेच त्यानंतर उगवणारा प्रत्येक सोनेरी दिवस आपण अभिमानाने आणि स्वाभिमानाने जगण्यात खरा आनंद आपल्याला मिळेल.

***

**समीर जावळे**

## मराठी विचारधन

मोत्यांच्या हारापेक्षा घामाच्या धारांनीच मनुष्य शोभतो.

***

**साने गुरुजी**

**कथा**

# ओल्या सांजवेळी !!

बाहेर आभाळ दाटून आलं होतं.. कुठल्याही क्षणी पाऊस पडेल असं वाटत असतानाच त्याचं बरसणं चालू झालं.. पावसाचं ते तांडव बघत असताना मन मात्र भूतकाळात चाललं होतं..

एक क्षण पुन्हा आला,
घेऊन नभ आठवांचा......
पुन्हा खेळ सुरु झाला,
उन्हा मागून पावसाचा...

खरच पहिला पाऊस म्हणजे आठवणींची आठवण करून देणारा . . . . . . . पहिला पाऊस..

त्यादिवशी ही तो असाच कोसळत होता, उभा-आडवा. ढगांमध्ये उठलेले आवाजांचे मोहोळ; मधूनच लखलखणारी वीज.

ऐन संध्याकाळचा सुमार रस्त्यावर चोहोबाजूंनी पाण्याचे लोंढे आणि यावर अजूनही बेफाम होऊन थैमान घालणारा तो वरून राजा. जीव वेडावला होता. रेल्वेचे ट्रक पाण्याखाली दडलेले. भिजलेल्या, धास्तावलेल्या माणसांनी प्लेटफोर्म भरलेला. सैरावैरा धावत होते. टॅक्सी, रिक्षा पाण्यामध्ये ठप्प. बसकरीता प्रचंड गर्दी. एका स्टेशनपासून दुसऱ्या स्टेशनपर्यंत फक्त २० मिनिटांचे अंतर.

जीव गलबला होता. तो वाट पहात असेल.........त्याचं माझ ठरलं होते......आज एक नाटक बघायचे , आज ह्या पावसाचं नाटक पहायला मिळेल याची! काय कल्पना?

धावती बस पकडली मन अजूनही स्थिरावलं नव्हतं. भीती होती, एवढा पाऊस पाहून हा थांबला नाही तर;

कदाचित तो हा ही विचार करेल, सर्व वाहतुकीचे मार्ग बंद, मी कशी येईन? अन् निघून गेला तर? उलट्या सुलट्या विचारांचा कल्लोळ . मी एकटीनं परतायचं कसं? आता जाण्याकरीता तर ही बस मिळाली परत यायला नाहीच मिळाली तर!

बापरे! सांयकाळ होत आली होती, वरून ह्या पावसाचा अंधार, नाटकाची वेळ केव्हाच टळून गेली होती. दहा मिनटावर असणारं घर टाकून मी सुरक्षिततेपासून दूर पळतेय त्याच्याकरिता ......

कदाचित तो थांबेलही अन् नाहीच थांबला तर .............

भीतीनं वा थंडीनं पण आख्खं शरीर शहारल. पर्स व भिजलेली ओढणी शरीरभर ओढणी घेतली.

रस्त्यात सर्वत्र पाण्याचं साम्राज्य माजलं होतं. माझी छाती भीतीन् दडपली होती.

आमच्या 'भेटीचा' स्टॉप जवळ आला, मी उतरले समोर 'तो' दिसला. पाण्याने चिंब झालेला.......केसावरच पाणी हातानं निपटून काढणारा.........एकदम सुरक्षित वाटलं. काही मिनिटापुर्वीची भीती गायब झाली. मघाशी शरीरभर पसरणारा भीतीचा काटा नाहीसा झाला. अंग मोहरून आलं.................पावसाची आता भीती नव्हती ..होत ती आस. त्याला भेटण्याची ......!

"खूप पाऊस पडतोय आता काय" तो .
"काहीच नाही" मी मिस्किलपणान् म्हटलं.
"घरी जाऊया नाहीतर, अडकून पडू" तो.

"तुम्ही गेला का नाहीत, मला फोन करायचा ना! " त्यावेळी आजच्यासारखे मोबाईल नव्हते.

"तू ऑफिसमधून निघाली होतीस, मला माहीत होतं तू इथेच येणार ते." त्याचं खात्रीलायक उत्तर.

"आणि नसतं शक्य झालं असतं तर" मी काहीही करून पोहचले असते हे स्वत:ला माहीत असूनही विचारलेला प्रश्न.

"संध्याकाळी सात वाजेपर्यंत वाट पाहिली असते अन् गेलो असतो परत". भेटीची वेळ साडेतीनची, आता पाच वाजत आले होते.

मी पावसाला विसरून फक्त त्याला पहात राहिले
त्याला ते नकळत जाणवलं
हळुच त्याच छानसं हसणं.
मी म्हणाले हा वाऱ्याचा गंध ना रे?
तो म्हणाला ... हट... वेडू कुठली...

हा तर भिजल्या मातीचा पावसाबरोबर झालेल्या पहिल्या मिलनाचा तृप्त गंध...

वारा फक्त तो वाहून आणतो इतकंच आणि मग मिलनाचा गंध मला मिळाला "त्याच्या सोबतीने.....

पावसातली ती पहिलीच भेट...... नाटकाची वेळ टळून गेली होती.आमच्याकडे पुरेसा वेळ होता.

पावसाचा आनंद घेता यावा म्हणून जवळच असलेल्या टेकडीवर जाण्याचा मोह नाही आवरता आला . पावसाच्या या मोहक वातावरणात ......

झपाझप पावलं उचलतं चढून गेले होते. ती छोटीशी टेकडी. गुलमोहराच्या ओढीने टेकडी चढून जाताना भेटलेला वेड्या वाऱ्याचा गंध मला पहिल्यांदा त्याच्या सोबतीने मिळाला. वळणा वळणाची पाऊलवाट असणारी. त्या टोकावर पोहोचेपर्यंत श्वास फुलून आला होता माझा. पण त्याचा हात हाती होता. त्यामुळे जाणवले नाहीत मला माझे श्रम. तिथे पोहोचल्यावर दिसले ते फक्त आभाळाच्या भल्या मोठ्या कॅनव्हास वर जमलेले ढग. क्षणक्षणाला साकारत होती आकाराची अभिनव कलाकृती. मी भरून घेतले संधिकालाचे ते सारे वातावरण. माझ्या डोळ्यांच्या कुपीत काठोकाठ आणि ते साठवतानाचा त्याचा मनाला झालेला स्पर्श मनाच्या खोल डोहात ...!

गार वाऱ्यानं आधीच मनाला वेड लावलं होतं. पावसाने काळीज गलबललं होतं. त्याची सोबत भावनाप्रधान झाली होती. सोबत गप्पांची फोडणी घालत आम्ही निवांत टेकडीवरच उभे राहून त्या पावसाची रीप रीप पहात होतो.

तेवढ्यात त्याचा हळूवार स्पर्श माझ्या हाताला झाला त्याने माझा हात हातात घेतल्याबरोबर मी " जागीच गोठली. नखशिखांत गारठली. सर्वांगात विलक्षण मोहरली. माझं जग अगदी स्तब्ध झालं. त्याचा उबदार मायेचा स्पर्श मनाला भिडला. काळजाला साद घालीत राहिला. त्यातून झिरपणारा विश्वास मनाला उभारी देत होता. आयुष्यातील कमिटमेंट अधोरेखित करीत होता. मी त्याचा हात घट्ट धरला.

"खरंच किती लवकर दिवस जातात ना...! कॉलेज सरलं. नोकरी लागली. कॉलेजात असताना आपलं प्रेम जडलं. ते उत्तरोत्तर बहरत गेलं. त्यानंतर प्रपोज. त्यातली बालिश नाराजी. नंतर एक्सेप्टन्स. खरंच लाइफ किती छान आहेना. असं वाटतं अख्खं आयुष्य असंच जावं. अगदी तुझ्या सोबतीनं.

मला तुझ्याविना आयुष्याचा एक क्षणही घालवायचा नाही. तुझ्यासोबत खूप खूप एन्जॉय करायचंय. आपण मिळून आपलं घर उभं करू . तेथे आपला संसार फुलेल. खरंच सगळं अगदी स्वप्नवत असेल," तो भावनेच्या भरात बोलत होता . त्याच्या मनाला आज अंकुर फुटला होता.

""हो ना. मी ठरवलंय की तुझ्या आई-वडिलांना भेटायचं. त्यांच्यासमोर आपल्या लग्नाचं प्रपोजल मांडायचं. आता नाही राहवत गं तुझ्याविना. तुझी सारखी आठवण येत असते. सगळीकडे तूच तू दिसतेस. मी खरंच नाही राहू शकत तुझ्याशिवाय," त्याने " माझ्या " भावना अचूक ओळखल्या. माझ्या मनाला भावनिक साद घातली.

त्याचे " शब्द कानावर पडल्यावर मन भरून आलं. आनंदाश्रू डोळ्यांच्या कडा ओलांडून गालांवरून ओघळू लागले. यावेळी दोघांच्या मनातील सुखद सोनेरी स्वप्नं आपली वाट शोधत होते.ढगांकडे पाहत मी पावसाच्यासरी झेलत राहिले......डोळ्यातले अश्रू लपवत बेभान होऊन भिजत राहिले.....

दिवसाचा अस्त झाल्यावरही कितीतरी वेळ न्याहाळत बसलो होतो आम्ही कोसळणारा पाऊस! "माझ्यासाठी तू आणि तुझ्यासाठी मी... आयुष्याच्या अस्तापर्यंत... सोबत राहू." अशा आम्ही घेत असलेल्या वचनांनाही ही पावसाची साक्ष लागली होती.बघता बघता दोघेही...कधी सुके सुके होतो आणि कधी रिमझिम तर कधी मुसळदार पावसात चिंब भिजून ओले झालो,हे समजलेच नाही.

त्या क्षणी मात्र तो पाऊस सुद्धा बेभान होऊन बरसात होता, काळ्या डांबरी रस्त्यावर उतरून तो नाचत होता, खाच-खळग्यात भरून तो ओसंडून वाहत होता, पानां-फुला-झाडावरती थेंब बनून पसरला. समोरचा तो डोंगरमाथा आधी उघडाबंब होता, त्या दिवशी मात्र त्याच स्वताचं हिरवं रुपडं सगळ्यांना तृप्त करत होत.

त्या पावसाचं ते मनमोहक रूप पाहून मग मी ही ठरवलं की ............। आपण ही आज असंच मनसोक्त, मनमुरादपणे बरसायचं, मनाच्या तंबोऱ्याच्या तारांना आज हलकंच छेडायचं,

ओल्या हवेत श्वास घेताना अंगावर येणाऱ्या त्या शहाऱ्याची भावना शब्दात मांडता येणार नाही .

गारवा , हवेतला ओलावा सहज अंगाला स्पर्श करून गेला आणि मनाला थोडा विसावा मिळाला

थंड ओली आणि अंगावर रोमांच फुलवणारी हि पावसातली सांजवेळ .......कधीही न विसरणार ...!

थोड्या वेळाने उतरू लागलो आपण टेकडीची अंधारी उतरण. त्यावेळी मी त्याला विचारलं... "सांजवेळ झाली नंतर काय?" तो सहज म्हणून गेला...आता अंधार ...! "अंधार". थोड्या वेळापूर्वी आयुष्याच्या अस्तापर्यंत एकमेकांना साथ देण्याच्या शपथा घेतलेली मी हादरून गेले त्याच्या या उत्तराने. पण मला सावरलं त्याच्याच शब्दांनी... "मी आहे ना..."

परतीच्या उतरणीवर पावसाच्या रिपरिपमध्ये अडखळणाऱ्या माझ्या पाऊलांना मिळाला होता त्याचा आधार. त्या सांजवेळी आम्ही व्यक्त झालो होतो फक्त त्या बरसणाऱ्या थेंबातुन.

भावनांचा कल्लोळ माजला होता .निर्सगाच्या मुक्त रंगांमध्ये. आयुष्याच्या कॅनव्हासवर अलगद सांडलेले ते भावनांचे ,शब्दांचे प्रेमाचे रंग एकजीव झाल्यावर खूपच सुंदर भासले होते त्या क्षणी.

पाऊसाचा आवेग कमी होत होतं. त्याने रिक्षा थांबवली. घरी परतण्याचे मार्ग एकच होते. फक्त तो थोडा माझ्यापासून पुढे रहात होता. रिक्षात त्याला बिलगले बाहेर थंड असूनही मनात उबदार पणा जाणवत होता ......

पंधरा मिनिटांत त्याने माझ्या 'वाटेवर' मला सोडले व तो पुढे मार्गस्थ झाला. मनात साठलेल्या आठवणींच्या गंधकोशी एकेक उघडत राहिल्या,

त्यांनी मनावर गारुड घातले. आनंदाचे इंद्रधनुष्य मनाच्या क्षितिजावर उमटून आले. आजही तो असाच आठवतो...........नाती बदलली अन् तोही ............पण ही आठवण निरंतर राहिली. मनाच्या अंधारात नंदीदीपा सारखी तेवत......

त्याला पाहिल्यानंतर अनुभवलेली सुरक्षितता, विश्वास व निसर्गालाही धडक देण्याची उर्मी आज ही जतन करते.

फक्त सोबत 'तो' हवा असतो. मध्येच वाटेवर सोडणारा नको. चिरंतर माझ्यासोबत वाट चालणारा "तो"आणि पावसातील ती ओली सांज वेळ !!

***

**सौ. संतोषी केदार कदम (सई )**
**भायंदर (ठाणे )**
**ई पत्ता : santoshikkadam@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : 8652211380**

**कथा**

# आठवणीतले प्रेम

सरता सरता न सरणारी वेळ म्हणजेच कातरवेळ. दिवे लागणीच्या वेळेस कातरवेळ म्हणण्याची जुनी पद्धत आपल्या कडे आहे. एक अशी वेळेची कातर ज्यात दिवस आणि रात्र एकमेकांना दुभागतात आणि त्याचा मध्य गाठणारी वेळ म्हणजेच कातर वेळ.

त्याचा अर्थ आणि अनुभव प्रत्येकाला माहित असतो, पण काहींना कळतो काहींना कळत नाही. कारण माणूस किती हि हुशार विद्वान असला तरी सायंकाळ हि कोणाचीच चुकचुकल्या शिवाय सरत नाही .

एक अशी घटका ज्या घटकेत कोणाची तरी ओढ लागते

जीव कासावीस होतो, उदास वाटू लागतं किंव्हा क्वचित लाजरस हसू येतं. त्यात पावसाची भर हा उत्तम प्रकार आहे. अशा संध्याकाळी ओल्या हवेत श्वास घेताना अंगावर येणाऱ्या त्या शहाऱ्याची भावना, गारवा, हवेतला ओलावा सहज अंगाला स्पर्श करून जातो आणि मनाला थोडा विसावा देऊन जाते ती पावसातली कातरवेळ.

थंड ओली आणि अंगावर रोमांच फुलवणारी हि कातरवेळ.

प्रेम म्हणजे फक्त स्पर्श नसून हा मनातून जोडलेल्या प्रेमाचा अनुभव सुधा असु शकतो. ज्याला हा अनुभव घेता आला त्याला प्रेम समजलं आणि प्रेम समजल म्हणजे जगणं हे आलच. हे असे छोटे छोटे आनंद माणसाने अनुभवावे कारण यातूनच नातं घडत जातं फुलत जातं.

निसर्ग हा उत्तम प्रकार आहे स्पर्श समजण्याचा. अशा खूप छोट्या छोट्या गोष्टी आहेत ज्या त्याच्या कडून आपण शिकू शकतो, समजू शकतो, अनुभवू शकतो. त्याच्या प्रत्येक गोष्टीत प्रेम आहे फक्त ते अनुभवणार मन हवं. विचार करता करता माझ लक्ष त्या संध्याकाळच्या दिव्याकडे वेढल होत.

तो सुबक शांत लखं चमकत होता. त्याची ती स्थिरावलेली जोत सर्वत्र कोवळा प्रकाश पसरवत होती आणि मन प्रसंन करत होती. बाहेर बऱ्यापैकी गारवा होता. मी ओट्यावर बसून काहीतरी विचार करत होते.

मी बेचेन होऊन माझ्या खोलीत जाऊन कपाटातील एक बरेच दिवस बंद असलेला डबा उघडला .

त्यात होत माज गुपित खूप वर्ष जीवाशी साठवून ठेवलेलं जपून ठेवलेलं. ते विरघळलेल पिंपळ पान आणि एक दगड ज्याला कोरीव काम करून हृदयाचा आकार दिला होता. त्यात होते काही मोती धाग्यात पिरून त्याने माझ्या गळ्यात बांधलेले.

आणि माझे डोळे पाणावले त्याचा आठवणीने. मी तुटून निराश होऊन एकटीच पुटपुटले

कुठे दुरावलास तू ...............?
वाट पाहते मी तुझी .......!

खूप................ खूप आठवण येते रे तुझी आज ...! आणि मी कोसळले खाली ............ सगळ अस्ता व्यस्त पसरलं. बरेच वर्ष ठेऊन धागा कच्चा झाला होता आमच्या नात्या सारखा आणि त्यातले ते मोती खोली भर झाले होते विखुरले होते अगदी माझ्या मनासारखे. माझे अश्रूही आता न थांबता वाहू लागले. मी कासावीस होऊन खचून रडू लागले. कशी होईल भेट आपली ......!

का दुरावलास इतका माझ्या पासून तू .......? मला हवा आहेस तू शेवट पर्यंत ............?

शाळा सुटल्यावर आम्ही त्या तळया काठच्या झाडा जवळ भेटायचो .एकदा त्याने माझ्या साठी काही मोती आणले होते स्वत ओउन माळ करून. त्याच तळया काठी माझ्या गळ्यात घातले होते. आठवण म्हणून दिलं होत पिंपळ पान.

आणि तळ्यात भेटलेला दगड झिजून दिलं होत मला एक रेखीव हृदय. खूप आवडायचं मला त्याच अस असण. माझ्यासाठी सतत काही तरी नवीन कारण. आम्ही खूप गप्पा मारायचो. तासान तास एकमेकात रमायचो. खूप प्रेम होत आमच एकमेकांवर. मला आज हि आठवत तो दिवस.

आम्ही सगळे सजून १० वीच्या निरोप समारंभासाठी आलो. थोड बोलणं झाल मन शांत झाल. वेळ झाली ती खरच निरोप घ्यायची आणि मला तिथून निघावासच वाटेना ..

आज आम्ही काही बोलोच नाही आमच्या डोळ्यातून फक्त पाणी ओघळत होत.

मला आता तुला भेटता नाही येणार .......... मी ... मी बाहेर चालोय शिक्षणा साठी .......!

पण ......... मी हे एकूण संपले होते . पण त्याने मला दिलासा दिला होता . कि तो परत येईल .
शुभंभवतु ......
***

**सौ. संतोषी केदार कदम (सई )**
**भायंदर (ठाणे )**
**ई पत्ता : santoshikkadam@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८६५२२११३८०**

**चारोळी**

## चारोळी

तू मला म्हणालास,
आयुष्यभर तुला फुलासारखे ठेवेन जपून
तू तुझा शब्द खरा केलास
कायम काट्यात ठेऊन
***

**सुवर्णा अ जाधव**
**महालक्ष्मि मुंबई ११**
**ई पत्ता : goldanj@gmail.com**

**लेख**

## पाऊस मित्रा,

प्रिय,
पाऊस मित्रा,

कसा आहेस? बरेच दिवस झाले तुझ्यावर काहीतरी लिहायचे म्हणत होते. होय! तेच ते लेख, कविता वगैरे. पण काही सुचतच नव्हतं!

आज शेवटी, काहीतरी लिहायचे असे ठरवूनच बसले. मनात आल, तुला एक छानसं पत्रच का लिहू नये? कशी वाटली कल्पना? मस्त ना!

आज सर्वत्र दिवसभर पावसाळी हवा आहे, इतकच नाही तर, तू दिवसभर कोसळतोस कि काय अस वाटत होत.

खिडकीतून दिसणारा तू,
बाहेर कोसळणारा तू,
पानापानावर होणार्या
तुझ्या प्रीतीचा हळुवार नाद तू,
त्याच नादातून कानात गुंजणारी
प्रेमाची धुंद साद तू,

तुझ्या या आवेगी प्रेमात भिजवून चिंब झालेली ओले ती पर्णराजी ·······. अहाहा! काय? सुंदर दृश्य आहे हे! मस्त वाटतंय!

पण······ पण, हे आठवणीतले सुंदर क्षण आहेत, तसेच येणाऱ्या भविष्यातले एक सुंदर अपेक्षित स्वप्न!जे अधाशा सारखे साठवत होते मी माझ्या मनात! तुझ्याच विचारांच्या तंद्रीत!

एक गंमत बघ ना! आज मी तुला पत्र लिहितेय,पण एके काळी, तू स्वताच एक पत्र होतास जून महिण्यात कोसळणारा... तू पत्रच होतास, आकाशाने पृथ्वीला पाठवलेले एक पत्र !

असे पत्र जे हृदयाच्या आतल्या गाभ्यातून यायचं ! नाही तर स्वतः इतक प्रेमान भिजून आम्हालाही चिंब भिजवणार अस पत्र, रसिक आणि प्रेमाच्या विविध रंगात रंगलेला सच्चा प्रियकरच पाठवू शकतो. आकाशाने पृथ्वीला पाठवलेल्या पत्राच्या रुपात तू यायचास, पण आमचा सखा, जीवलग होऊन केव्हा जायचा हे कळायच सुद्धा नाही .

तुझ्या प्रत्येक थेंबाने, आश्वासक स्पर्शाने, अंतकरण निवळायचे. तप्त उन्हात सुकलेल्या गालावरच्या खळीला आनंदाचे लेण मिळायचे.

लतावेली, रानोपानी आनंदाच उधान यायचं. आम्हा कवींच्या कल्पनांना पालवी फुटायची. मन नव्या उत्साहाने, उमेदीने, जीवन गाणे गुणगुणू लागायचे.

पुन्हा पुन्हा त्याच त्याच व्यक्तीच्या आठवणीच्या प्रेमात पडावस वाटायचं. खरेच, तू पाऊस रूपाने कोसळणारे पत्रच असायचास. कधी आनंदाने,कधी प्रेमाने, कधी दुःखाने व्याकूळ होऊन तर कधी गारपिठी करत कोसळत असायचास तू, कधी बोचर, काटेरी शब्दाने घायाळ करणारा तू, आनंदाचे हसू ही तू, अंतकरणाचा बांध फोडून धावणारे रडू ही तूच, अस्फुट हुंदकेही तूच मित्रा

आवेगाने धावत सुटलेल्या भावनांचा अल्लड आणि अवखळ झरा म्हणजे फक्त तूच मित्रा. आठवणीचा एक हळुवार अबोली कप्पा म्हणजे फक्त तूच आणि तूच पाऊस मित्रा! असे विविध रूपं असताना तुझे आमच्या जीवनात किती महत्व आहे हे तुला सांगायला हवे का?

उन्हाळ्यात उन्हाने त्रस्त झालेल्या सर्व जीवाना हवाहवासा वाटणारा तू, बालपणात सुट्टी मिळावी म्हणून पावसाला घातलेली भोलानाथची साद तू, बळीराजाने पेरणी केल्यावर त्याला वाट पहायला लावणारा तू, कधी अवखळ पणे हवामान खात्याचे अंदाज चुकवणारा तू आणि अचानक शेतकऱ्याच्या गायीवासरांच्या मेघमल्हाराला ऐकून धावत येऊन जोरात कोसळणाराही तूच.

प्रत्येक कोरड्या असणाऱ्या नद्यांना खळखळत्या पाण्याने भिजवणारा तू, आई बहिणीच्यापाण्याचा त्रास कमी करणाऱ्या हे सावळ्या दयाघनाही तुच !

असा सर्वांचा आवडता तू कुठे दडी मारून बसला आहेस? कुठे आहेस तू? हे पाऊस मित्रा,

शेतकरी ते अन्य नोकरदार वर्गापासून सगळेच तू येण्याची वाट पाहत आहेत. सगळ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. सगळे तुला साद घालतात, नवस करतात तू यावस म्हणून,व्याकुळ झाल्यात कासावीस नजरा आकाशाकडे पाहत, तुझ्या दर्शनासाठी…!

तू ये पावसा आणि बघ तुला दिसेल रुक्ष, ओसाड पडलेली राने, कोरड्या पडलेल्या नद्या, तळी. पिसारा फुलवून आनंदाने नाचणारा मोर, कसा उदास होवून पिसारा मिटवून बसला आहे. गुरे, वासरे, माणसे हतबल झालीत तुझ्या नसण्याने, अन्नाचा घास बनून ये, सृष्टीतल्या प्रत्येक जीवासाठी ये, पाण्याशिवाय जीवन विस्कळीत झालय.

कधी तू येतच नाहीस तर कधी तू अवकाळी येउन गावच्या गाव पाण्याखाली जातात तर, कधी टिपूस भर पण तू पडत नाहीस. तुझ्या या लहरी पणाला काय बोलू मी ?

सामान्य माणूस ,बळीराजा तुझ्या या लपंडावामुळे हतबल झालाय मित्रा. रोहिणी बरसल्या कि मृगाची आस लागते. एकदा पेरण्या झाल्या कि बळीराजाचा चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहतो. पण, गेल्यावर्षी रोहिणीत तू आलाच नाहीस. मृगात पण तू दगा दिलास,आद्रा ही कोरडाच राहीला

ज़िथे जिथे थेंब थेंब हजेरी लावलीस तिथे पेरण्या वाया गेल्या. बरसता बरसता अचानक तू दडी मारल्याने बळीराजाचे खूप नुकसान झाले.

जगाचा पोशिंदा शेतकरी राजा, तू येशील बरसशील या एका आशेवर चातकासारखी वाट पहातोय, व्याकूळ झालाय मनाने, ढगांचा गडगडाट झाला, मेघ गर्जना झाली,

आणि तू आलाच नाहीस तर त्याच्या डोळ्यात मात्र पाणी यायचे.

तु न येण्याने त्याचे वेळा पत्रक बदलले. जून अखेरीस तू येणार नाहीस, हे कळताच तो भविष्याच्या चिंतेने बळीराजा हादरून गेला ,रानात चारा नाही ,जनावरांचे हाल होत आहेत, पाउसपाणी नाही, शेती नाही, पिक नाही, पिकामागून पिक घेण्याच्या प्रयत्नात बँक आणि सावकार यांच्या कचाट्यात तो सापडला. घेतलेले कर्ज, घरातील उपासमार, शिक्षणासाठी पैसा नाही, मुलीच्या लग्नासाठी पैसा नाही यामुळे तो असमर्थ ठरला.

तुझ्याविना जगाचा पोशिंदा स्वताच्या घरात हलाखीचे जीवन जगतोय रे ! तुझ्याशिवाय तो अपूर्ण आहे. रात्रदिवस शेतात घाम गाळतोय, रात्रीची झोप तो विसरला आहे.

लाखोंचा तारणहार आज तुझ्या न येण्याने उपासमार भोगतोय, शिवार ओस पडलय त्याच, पाण्याचा एक थेंब नाही शिवारात, नुसती भेगाळलेली माती! असेलच थेंब कुठे पाण्याचा तर, तो फक्त बळीराजाच्या डोळ्यात !

होय! तूच आहेस न त्याचा मित्र ! म्हणून तू ढगातून बरसत नाहीस म्हणून तो डोळ्यातून बरसतोय!

पूर्ण महाराष्ट्र पाण्यासाठी हळहळ व्यक्त करतोय दुष्काळ "आ" वासून उभा आहे. पूर्वी अन्न धान्य पिकण्यासाठी तुझी आळवणी करत होतो. तर आत्ता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालाय. तू आलाच नाही तर काय होईल? या सृष्टीचे! विचार कर जरा .

पक्षाचे थवे मरणाचा निरोप घेऊन येतील. बळीराजा झाडाला टांगला जातोय थांबव हे सगळे आता. मित्रा !!

थांब रे बाबा ! अशी विनवणी करण्याची वेळ आणणारा तू पाऊस मित्रा ! कुठे हरवला आहेस? का? नाही आलास मित्रा? कसला हा रुसवा? रागवला आहेस का आमच्यावर? ये ना रे पावसा.

आमच्या कृषिप्रधान असलेल्या देशातली या बळीराजासाठी ये ,ऐक ना रे त्याची आर्त हाक! पूस न त्याची आसवे. सावर ना त्याला आणि त्याच जीवन.

जंगलतोड घातक असूनही आम्ही त्याच्याकडे वेळोवेळी दुर्लक्ष केले. पण त्या मुळेच निसर्गाचे संतुलन बिघडले. परिणामी पावसाचे प्रमाण घटले.त्यचि परिणीती दुष्काळात झाली. तसेच वृक्ष तोड झाल्यामुळे अल्पस्वल्प पावसानेही जमिनीची धूप प्रचंड प्रमाणात होऊ लागली तेव्हाच आता जाणवले कि वृक्ष तोड करून आम्हीच आमच्या पायावर धोंडा मारून घेतला आहे.

आम्हाला माहीत आहे. आज माणूसच या सगळ्या पर्यावरणाचे संतुलन बिघडवण्यासाठी कारणीभूत आहे .

तुकाराम महाराजांनी "वृक्षवल्ली सगेसोयरे" मानले त्यांनी हा ऋणानुबंध कायम ठेवला. पण माणसाने स्वार्थी वृत्ती ठेऊन काहीही विचार न करता जंगल तोड केली आणि आज त्याचे परिणाम आम्ही सगळेच भोगत आहोत. पण उशिरा का होईना ही गोष्ट आमच्या निदर्शनास आली आहे. पाऊस मित्रा !

"झाडे लावा देश वाचवा " ही घोषणा सर्वत्र निनादू लागली आहे. वनमहोत्सव हा एक राष्ट्रीय उत्सव झाला आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा, ही झाडे, वेली भागवतात. हे माणसाच्या लक्षात आले आहे. तो आपली चूक सुधारत आहे,

पण या सगळ्यांची शिक्षा तू आमच्या बळीराजाला देऊ नकोस. माणसाने विकासाची कितीही क्षितीज गाठली तरी तो निसर्गाच्या पुढे कधीच जाउ शकत नाही या वास्तवाची जाणीव त्याला नक्कीच झाली आहे.

हे पाऊस मित्रा ,तूच आहेस एक विश्वास जो बळीराजाला पुन्हा जीवन देऊ शकतोस ,ये पावसा आणि फक्त लढ म्हण, माझ्या बळीराजाला सांग! त्याला म्हण " मी येतोय या वर्षी, नक्कीच येतोय. पूर्वीसारखाच अगदी मनापासुन बरसत येतोय, तू काळजी करू नकोस शेतकरी मित्रा,

नवनवे प्रयोग करून, तुझ्या कष्टाने हे भरडलेल विश्व मी फुलवेन .तु फक्त तयार रहा. तिफ़न आणि नांगर घेऊन हा बघ मी आलोच!" बस ! इतकाच तुझा दिलासा, त्या बळीराजाला उभी रहाण्याची नव्याने हिम्मत देईल. उष्मा घाताणे व्याकूळ झालेला जीव, करपलेली लतावेली, काळ्या भुइत अंकुरलेले बीज, बघ कसे आनंदाने सुखावेल .

अजून दोन महिने शिल्लक आहेत. यावर्षी जोरात बरसत ये, गडगडाट होऊ दे. पृथ्वीने हिरवा शालू पांघरू दे. धुंगरांचा साज चढून जीवशिवाच्या जोडीला कुंकूवाचा टिळा लाऊन तिफणी वरून धान्य पेरले जाऊ दे. एक दाणा शंभर दाने देतो याची प्रचीती पुन्हा एकदा होउन जाऊ दे.

नव्या साक्षात्काराचा, सृजनाचा क्षण पुन्हा पुन्हा पहायला मिळू दे. बळीराजा समृद्ध होउ दे, पर्यायाने हा देश समृद्ध होऊ दे

हीच तुला कळकळीची विनंती आहे पाउस मित्रा, मोठ्या मनाने माफ करशील, आमच्या वरचा रुसवा राग सोडशील, अशी अपेक्षा करते .

आनंदाने ये ,नाचत ये, बागडत ये आम्ही वाट पहात आहोत ,मग येतोस ना ? लवकर! ये हं !

वाट पाहते !

कळावे,

तुझीच एक मैत्रीण

***


**सौ. संतोषी केदार कदम (सई )**

**भायंदर (ठाणे )**

**ई पत्ता : santoshikkadam@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ८६५२२११३८०**


**कविता**

## आठवणीचे चांदणे

निळ्या नभाच्या तळ्यात,
क्षितिजाच्या किनार्याशी....
रोज येते चंद्रकोर,
सांज वेळेच्या दाराशी ....

तुझ्या आठवणीचे चांदणे,
दाटते माइया मनात,
तुझ्या माइया प्रीतीतून,
उजळले सांजवात.....

तुझ्या येण्याची चाहूल लागता,
सडा शिंपीते रातराणी...
मज क्षण क्षणाची प्रतीक्षा,
तुझ पाहता पंख मनाला फुटते ........

***


**सौ. संतोषी केदार कदम (सई )**

**भायंदर (ठाणे )**

**ई पत्ता : santoshikkadam@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ८६५२२११३८०**


**कविता**

## पाऊस तुझ्या आठवणीतच गेला

यंदाच सगळा पाऊस तुझ्या आठवणीतच गेला
कधी आला कधी गेला काहीच नाही कळला
माती आपल्या नादात गुणगुणत होती
सईची सर बरसत होती
मी मात्र तुझ्या आठवणीतच व्याकुळ होत होती
मोर राणात नाचत होते
वृक्ष वेली गात होते
मी मात्र तुझ्या आठवणीतच चिंब भिजत होते
पाऊस गेल्या वर कळला
पाऊसाच्या येण्याने हिरवा ऋतु बहरला होता

अगंणी पुन्हा पारिजात फुलला होता
वातावरण एकदम प्रसन्न झाला होता
सगळा जग आनंदाच्या पाऊसा ने भिजला होता
माझ्या मनाला मात्र अजून ही
तुझ्या विरहाचाच कांटा रुतला होता
तुझ पाहता पंख मनाला फुटते .......
***

**वैष्णवी पारसे**
**श्री भास्कर राव पारसे एकता कॉंलोनी**
**वानखडे भवन जवळ चंदनगॉंव**
**छिंदवाडा (म. प्र.)**
**ई पत्ता : vaishnaviparse@gmail.com**

**कविता**

## *तिची कहाणी*

बसतो तसबिरी समोर तुझ्या।
मन भटके गत क्षणात त्या ||
साथ नाही तुझी नशिबी या ।
अर्थ नाही उरला जगण्यात या ...||

आनंद होता सहवासात तुझ्या।
जीवनबाग मस्त फुलली होती ||
मीच काय ही दुनिया सारी।
रुपास तुझ्या भुलली होती .||

मनातली जागा तुज दिली होती।
तुझ्या ही मनात ती थोडी होती ||
निर्मल नाते होते मन साफ होते।
घडले असते प्रमाद ते ही माफ होते ||

परकी नव्हतीच कधी म्हणून ।
सांगितले होते तुला कितीदा ||
कैफ चढता धुंदी त्याची बेकार।
जिंकता जिंकता होते कधी हार ||

उंचीवर जाऊन वेगाने कोसळता।
उभारी घेऊन पुन्हा सावरणे ||
हे काही तुला जमलेच नाही।
मिटलेले डोळे पुन्हा उघडलेच नाही ||
***

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**ई पत्ता : arunvdeshpande@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०१७७३४२**

**कविता**

## *सांगता येत नाही*

तुला ते सारे आज आठवते का ते माहित नाही
ठरवले कितीदा मला ते विसरता येत नाही ||

कधी आठवेल काय आठवेल काही नेम नाही
आठवणी सार्या तुझ्या दुसर्या कुणाच्या येत नाही ||

मेंदीभरल्या हातावरचे तू नाव माझे दाखवले
खोटे होते दाखले हे आजही म्हणता येत नाही ||

घुटमळते हे मन आकाशी सरत्या संध्याकाळी
भिरभिरते उदासवाणे ते खाली काही येत नाही ||

दिवाना आहे तुझा मी हे गुपित नाहीच राहिले
मनात आहे तुझ्या का तुज सांगता येत नाही ? ||

कुत्सितपणे हसती लोक हे दगड-काळजाचे
हिणवतात मज किती कसे सांगता येत नाही ||

करू मुकाबला निष्टुर दुनियेचा मिळूनी दोघे
कसे असती दिवस उद्याचे ? सांगता येत नाही ||
***

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**ई पत्ता : arunvdeshpande@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०१७७३४२**

**कविता**

## आयुष्याचा सार

मातीतुन आलो मातीतच जायचे
मातीतुन आलो मातीतच जायचे

हे देह विश्वाचे परआत्म व्हायचे
सोडुनी अहंकार समाधानी व्हायचे
फिटोनी पाप मुक्त व्हायचे
मातीतुन आलो मातीतच जायचे॥

नको हाव कशाचा
नको इर्षा कुणाची
करुनी दान स्वर्ग गाठायचे
मातीतुन आलो मातीतच जायचे॥

घेऊनी ज्ञान करुनी दान
इतरांना कार्य सोपुनिया
ब्रम्हांड जिकांयचे
मातीतुन आलो मातीतच जायचे॥
मातीतुन आलो मातीतच जायचे॥
***

**प्रियांका लक्ष्मण माने**
**सातारा**
**मोबाईल क्रमांक : ९८९०३६१८९६**

**कविता**

## काय खाईल घास

बळीराज्याला राजा म्हणता
राजा कधी झालाच नाही
अधिकार तर सोडाच
सन्मानान कधी जगलाच नाही

दिली सरकारने पोटगी
तर पाऊस पडलाच नाही
तरीही फुलवली शेती
पण माणसाने दर दिलाच नाही
बळीराजाला राजा म्हणता तुम्ही
खळगी पोटाची भरण्यासाठी
बी त्याने पेरायच
आयत्या बिळात नागोबा म्हणत
सार ते लुटायच

एवढ करुन
लावला बळीराजाने फास ?
संपला बळीराजा
तर काय खाणार घास ?
***

**प्रियांका लक्ष्मण माने**
**सातारा**
**मोबाईल क्रमांक : ९८९०३६१८९६**

**कविता**

## प्रिये

प्रिये, तुला वसंत हा निवांत वेळ मागतो
हवेवरी सुगंधधुंद मंद साद घालतो
तिथे तुझ्या कळ्यांवरी बहार येत आगळी
मला इथेच जाणवे, जरी तिथे बहार तो


सभोवताल दर्वळे तुझ्याच कोवळ्या छटा
तुझाच श्वास अंतरी धुमारतो, उधाणतो !
जरी न भेटतो तुला, न शब्द तूच बोलते
तुझ्याच स्पर्श जाणिवा, पुन्हा पुन्हा शहारतो

समेट तू मला असे, लपेट तू मला तसे
अशाच स्वप्नजाणिवात रोज मी वहावतो
निवांत चांदण्यात, गारव्यात जीव एकटा
न बोलता तुलाच आज सांग काय सांगतो ?_
***

**प्रा. कविता डवरे-लाहुडकर**
**अमरावती**
**ई पत्ता : neetidaware@gmail.com**

## पुस्तक परिचय

# *जीवन खरंच सुंदर आहे*







***जीवन खरंच सुंदर आहे. (कविता संग्रह)***

**(कवी धनंजय शंकर पाटील.)**

इंटरनेट आणि फेसबुकवर साहित्य लेखन करणाऱ्या लेखक-कवी मध्ये सातत्याने विविध स्वरूपाचे लेखन करणारे -लेखक-कवी-चारोळीकार -धनंजय शंकर पाटील मंगळवेढा, हे नाव वाचकांच्या चांगलेच परिचयाचे झाले आहे. जानेवारी -२०१६ -म्हणजे या वर्षाच्या आरंभीच त्यांची एक नव्हे तर तीन पुस्तके प्रकाशित झालीत.

१. जीवन खरचं सुंदर आहे- कविता संग्रह.
२. हृदयी वसंत फुलला - चारोळी संग्रह
३. ती पुन्हा भेटली - कथा संग्रह

या पैकी - जीवन खरंच सुंदर आहे " या कविता संग्रहाचा परिचय करून देतो आहे.

"जीवन खरचं सुंदर आहे" त्यांचा हा पहिलाच कविता संग्रह. प्रस्तुत संग्रहातील कविता वाचून पहिली गोष्ट जाणवू लागते ती म्हणजे या कवीला जे दिसते, जे जाणवते त्यावर व्यक्त होण्याची त्याला एक प्रकारची असोशी आहे, अधीरता आहे. यामागची त्यांची तळमळ आणि यामागची भावना निखळ आणि प्रामाणिक आहेत ,याविषयी दुमत असण्याचे कारण नाही.

जीवन खरचं सुंदर आहे " कविता संग्रहात एकूण ५८ कविता आहेत. मनोगतात कवी म्हणतो आहे की- "शब्द जणू जीवनच झाले ,शब्दांशी घट्ट मैत्रीचे नाते जमले, यातूनच अनेक विषयावर काव्य निर्मिती झाली ", हे अगदी खरे आहे. कारण या संग्रहात - प्रेम विषयक अनेक कविता आहेत, तसेच सामाजिक संदेश, माणसाच्या मनात असलेल्या विविध भावना, आजच्या वर्तमानावर व्यक्त होणारी कविता अशा विविध कविता धनजंय पाटील यांनी लिहिल्या आहेत.

या संग्रहातील अनेक कवितांमधून कवी-धनंजय शंकर पाटील अतिशय भावनिक होऊन व्यक्त होतात, त्यांच्या कवितेचे हे सुरेख लक्षण आणि वैशिट्य आहे.या संग्रहातील -

मला आवडलेल्या काही कवितांचा उल्लेख जरूर करू इच्छितो...

१. मनातल्या आठवणींचा हा लपंडाव सारा ,
वाहतात कधी-कधी अश्रूंच्या धारा .
चित्त नाही थाऱ्यावर ,
मनात फक्त आठवणींचेच घर . ...( मनातल्या आठवणी ..पृ.६ )

२. शब्द ओठावरी येतात ,
मनातली भावना ,
सांगुनि जातात .
सुख , दु:खाचे चक्र सारे
जीवनात वाहतात कधी-कधी ,
तुफानी वारे ........(मनातले काही .पृ.१४ )

३. आज आहे पैसा , घरदार ,
पर आई तुझ्या नसण्याने ,
मनाला वाटतो अंध:कार .....(आठवण मायेची ..पृ.२६ )

४. एकटे हे मन कधी रमून गेले ,
या कवितांच्या दुनियेत.
ते कधी कळलेच नाही,
आता ध्यानी, मनी कविता आणि कविता .(कवितांच्या दुनियेत...पृ.२९ )

५. वाढल्या वाड्या अन वस्ती ,
वाटते मज घरटे बांधण्याची धास्ती
वृक्षतोड अमाप ही वाढली
जणू जगण्याची व्यवस्थाच मोडली ...(संघर्ष जगण्याचा ..(चिऊताई ) . ( .पृ.५६ )

६. कर सामना ,संघर्षमय जीवनाचा ,
तोल ढळू देऊ नको मनाचा .
खडतर प्रवासात या अपयशी मार्गाच्या ,
सूर गवसेल तुला जीवनाचा ...(जीवन संघर्ष ..(पृ.६४ ),

कवी धनंजय पाटील यांच्या कविता लेखनाची झलक... त्यांची आशावादी कविता या पुढील लेखन प्रवासात अधिक जोमाने आपली वाटचाल करणारी असेल ..हे नक्की. धनंजय शंकर पाटील हे नुसते कवीच नाहीत तर ते कथाकार देखील आहेत... साहित्यिक म्हणून त्यांची कामगिरी अधिकाधिक बहरत जावो अशा लेखन-शुभेच्छा त्यांना देतो.

-----------------------------------------------------------------

**पुस्तक -परिचय -**
**अरुण. वि. देशपांडे**
**पुणे**
**संपर्क -९८५०१७७३४२**

---------------------------------------

**कविता -संग्रह -**
**जीवन खरचं सुंदर आहे**
**पृ.६४ , मूल्य-रु.६० /-**
**कवी - धनंजय शंकर पाटील**
**धर्मगाव रोड,माळी वस्ती,**
**धनंजय निवास,मंगळवेढा.**
**ता. मंगळवेढा, जि.सोलापूर**
**संपर्क -८३८०९१६१५५**

-------------------------------------------

**प्रकाशक -**
**विजय बुक सर्व्हिसेस -**
**६ अ, सुशीलनगर , भारती विद्यापीठ समोर,**
**विजापूर रोड,**
**सोलापूर .**
**संपर्क- ९०२१७२७३३२**

------------------------------------------

***

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**ई पत्ता : arunvdeshpande@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०१७७३४२**

कविता

## मुसळधार पाऊस

मेघ दाटून येतात
आकाश झाकून जाते
सूर्यही दडपुन जातोय
एका गडद अंधारात

क्षणात धाऊन येतात
काळेकुट्ट मेघ
अन् ..... निस्तब्ध
किलरव पाखरांची

बेभान होऊन वारा
पळत सूटतोय सुसाट
कत्तल करत
मार्गस्थ वृक्षांची

लख्ख लख्ख वीजा
डोळ्यांपुढे चमचमतात
नभ गड्गडतात
आसमंतात

वार्याचा आक्रोश
विजांच थैमान
घनगर्द मेघांतून
मुसळधार पाऊस

जिवांचा आकांत
पाखरतांडव
वृक्षांची सळसळ
मुसळधार पाऊस, फक्त मुसळधार पाऊस
***

**विशाल कन्हेरकर**
**निंभा जि अमरावती**
**ई पत्ता : shabdasnehi@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९६३७४३७४१२**

कविता

## गुणगुणता ओठांवर हळवे गीत

गुणगुणता ओठांवर हळवे गीत,
मी किंचितसा बेभान होऊन जातो...
तालासुरांच्या लयबद्धतेत मग,
मी अविचित हरवून जातो...

श्रांत ना उरते मनाला कसली,
मी गीत गुणगुणत एकटाच चालत जातो...
भोवतालच्या गर्दीतही कधीचा,
मी एकटा एकटाच उरत जातो...

निशब्दांचेही गवसतात मग अर्थ कोणते,
मी मात्र तालासुरांच्या लयात गुंतून जातो...
उमजला नाही बोध कशाचाही जरी,
मी गाण्याच्या बंधनात अडकत जातो...

गुणगुणता ओठांवर हळवे गीत,
मी वेगळ्याच विश्वात रमून जातो...
तालासुरांच्या लयात गुंतून गुंतवून,
मी भान हरपून जातो...

गुणगुणता ओठांवर हळवे गीत,
मी भान हरपून जातो...
***

**गणेशदादा शितोळे**
**ई पत्ता : ganeshdadashitole@gmail.com**

## मराठी विचारधन

आयुष्यात कोणत्याच मर्यादा नाहीत फक्त तेवढ्याच आहेत ज्या तुम्ही तुमच्या मनात निर्माण केल्या आहेत...
***

**संग्रहित**

**कविता**

## *शब्द आणि पाऊस*

काल रात्रीच्या साखरझोपेत,
अचानक शब्दच स्वप्नात भेटले...
किर्र नीरव शांततेत,
ते माझ्याशी बोलु लागले...

आजकाल माझ्याशी तू कट्टी घेतली वाटतं,
लटक्या रागात शब्द बोलले...
असं का वाटतं तुला रे वेड्या,
मी त्याला आधाराचे उसणे बोलले...

रोज लिहणाऱ्या तू,
आजकाल सगळे सोडून तर नाही ना दिले...?
की त्रास होतो माझ्या भेटायला येण्याने,
म्हणून तर नाही ना मला टाळायला सुरू केले..?

नाही तर आजही मी लिहीतोच की,
पण अधूनमधून कवडसे घेत...
कसा टाळू शकेल तुला मी,
तू तर मला सर्वस्व आहे दिलेले...

मग हे आपलं भेटणंही,
पावसासारखंच झालंय समजायचं का मी..?
तुला तहान लागली की,
तू माझी आठवण काढणार मानायचं मी...?

बरं झालं बोलंला तू,
खरंच तुझं येणं जाणं पावसासारखंच झालंय आता...
कधी तू रिमझिम बरसला तर,
मीही वहावत जातो एकदम तुझ्या सरींसारखाच...

तू कोसळायला सुरू झाला मनसोक्त की,
मात्र माझं खुप खुप वाटोळं होतं...
सगळच काम जसंच्या तसं ठेऊन मग,
मन तुझ्यात गुंतून हरवून जातं...

मी तरी काय करणार याला,
माझं येणं जाणं कुठे माझ्या हातात आहे..?
तुझ्या मनाला एकटं एकटं वाटायला लागलं की,
मैत्रीचं कर्तव्य निभवायला मला यायलाच लागतं...

खरंय शब्दा तुझंही अन माझंही सगळं,
आजकाल सगळंच काही अलबेल झालंय...
तुझं येणंजाणं अन माझ्या मनाचं एकटं होणं असो,
सगळंच काही पावसासारखं बेमालूम झालंय...
सगळंच काही पावसासारखं बेमालूम झालंय...

***

**गणेशदादा शितोळे**
**ई पत्ता : ganeshdadashitole@gmail.com**

**कविता**

## *तुझ्या अंगणी अबोलीचे बन*

तुझ्या अंगणी अबोलीचे बन
निःशब्द सवांदाने भरवले मन....

कुणी तरी असाव लागत, आपल्याला माननारं
आपल्याही नकळत, आपल दुःख जाणनारं

वरुन किती समर्थ असलो तरी आतल्या आता ढासळत असतो
आपल्याही नकळत आपल्या दुःखात मिसळत असतो

वसंताच्या स्वागतासाठी पळस एकटाच बहारला
पाने नसली तरी गडद फुलाने शृंगारला।

***

**प्रियंवदा**
**ई पत्ता : ss.tagalpallewar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९०२८३३२८०८**

लेख

# खरंच आपण स्वतंत्र आहोत

नुकताच भारताचा स्वातंत्र्यदिन भारतभर मोठ्या धडक्यात साजरा केला गेला. पंतप्रधानांचं दिमाखदार भाषणही ऐकलं. राजपथवर सैन्याचं संचलन सुद्धा पाहिल. देशाच्या संस्कृतीचं दर्शन घडलं. पण या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने एक प्रश्न उभा राहतो.

खरंच आपण स्वतंत्र आहोत..?.

काही या प्रश्नावर मला वेड्यात सुद्धा काढतील. मग काय मौज म्हणून स्वातंत्र्यदिन साजरा करतो का..?

त्यांचंही खरंच आहे. त्यांनी कधी याबाबतचा विचारच केला नाही. पण खरंच विचार केला तर प्रत्येकाच्या मनात हा विचार नक्की जन्म घेईल. खरंच आपण स्वतंत्र आहोत..? माझं तर उत्तर आहे नाही. हो नक्कीच नाही. आजही आम्ही गुलामगिरीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी इंग्रज भारत सोडून अधिकृतपणे निघून गेले याचा आनंद म्हणजे १५ ऑगस्ट. यापलिकडे मला तरी दुसरी गोष्ट वाटत नाही. इंग्रज येण्याअगोदरपासूनच आपला देश गुलामगिरीतच निपचित पडला होता आणि आजतागायत तसाच गाढ झोपेत आहे. कुंभकर्णाच्या ऐकीव दंतकथेसारखा सहा महीने झोपलेला नव्हे तर अजून झोपच झाली नाही असा आहे आमचा देश.

जाती धर्माच्या जोखडात अडकलेला. जातीयवाद, धर्मवादाच्या जळमटांनी गुलाम होऊन बसलेला. अंधश्रध्देला कवटाळून बसलेला गुलाम.

आमची संस्कृती जन्माला आली आणि सोबत जात, धर्म, पंथ, वर्ण असे सगळे वादही सोबत घेऊन आली. याला स्वतःला श्रेष्ठ समजाणारे जितके कारणीभूत होते आणि आहेत तितकेच ते मान्य करत लादून घेणारे आपणही कारणीभूत होतो आणि आहोतच. हे आमचं सदभाग्य होतं की सुरवातीला सम्राट अशोक मधल्या काळात शहाजीराजे, राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि इंग्रज काळातील महात्मा फुले, राजर्षी शाहू, न्या.रानडे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर अशा महापुरुषांनी आपापल्या परीने त्या त्या काळात व्यापक लढा दिला. आणि काही अंशी या वादांना खिंडार पाडलं. इंग्रज आले आणि जात, धर्म, पंथ, वर्ण या वादांसोबत अंधश्रध्देने निपचित पडलेला हा देश अजूनच झोपेच्या खाईत लोटला. या खाईतून बाहेर काढण्याकरताच अनेकांना बलिदान द्यावे लागले. आणि १५ ऑगस्ट १९४७ रोजी नवीन सुर्याची पहाट दिसली. जगाला दाखवण्याकरता तरी धर्मनिरपेक्ष भारताचा जन्म झाला. परंतु वास्तवात तेव्हा पासून धर्मवाद आणि जातीयवाद अजूनच बोकाळला. ज्या दिवशी या देशाने राजकीय व्यवस्था स्विकारली आणि राजकीय पक्ष जन्माला आले. त्या दिवशी पुन्हा एकदा झोपण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली. मागील वर्षी एक चित्रपट येऊन गेला. नीळकंठ मास्तर. क्रांतिकारकांवरच आधारित होता. त्यातील किशोर कदम यांचा डायलॉग या राजकीय पक्षांच्या करता अगदी योग्य वाटतो. *१५ ऑगस्ट १९४७ रोजी काय झाले तर फक्त परके गोरे इंग्रज जाऊन आपले काळेसावळे इंग्रजच आले.* सोबत या राजकीय पक्षांसोबत धार्मिक आणि जातीयवादी संघटनांना पेवच फुटले. आणि आमचे हेच महापुरुष सुद्धा वाटून घेतले गेले. परिणामी आमचा देश पुन्हा एकदा गुलामगिरीतून अजून खोलीकडे वाटचाल करीत आहे.

ज्या संस्कृतीचा मोठा तोरा आम्ही मिरवतो त्याच संस्कृतीने आम्हाला पुरूष प्राधान्यता दिली. आणि आम्हाला जन्माला घालणारी स्त्री कायमची बंधिस्त करून टाकली. स्त्री म्हणजे केवळ उपभोगाची वस्तू या मानसिकतेची देण आमच्या संस्कृती ने दिली आहे. याच मानसिकतेचा बुरखा फाडण्याचे काम सतत समाजसुधारकांकडून केले गेले तरी आजही आमच्या समाजात त्याचे मुळ तसेच आहे.

अंधश्रध्देचा तर सुपिक भाग म्हणजे आमचा देश. कोणत्याही गोष्टीकरता इथे अंधश्रद्धा, अंधविश्वास ठेवण्याचा प्रयत्न सर्रासपणे केला गेला. त्यातून मग नरबळी, लैंगिक शोषण, मारझोड, असे प्रकार वाढले गेले. प्राण्यांचाही छळ सुरू आहे. थोतांडचं तांडव सुरू आहे. याला काही भल्या

माणसांनी सुरूंग लावण्याचा प्रयत्न केला. काही अंशी त्यांना यश आले देखील. पण धर्मवाद, जातीयवादाने पोखरलेल्या लोकांना ते मानवेना. आणि या भल्या लोकांनाही बलिदान द्यायला लागले.

आज स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतरही आपला देश तसाच आहे. झोपलेला. ज्या दिवशी धर्म, जात, प्रांत, अंधश्रद्धा ही जोखडातून आपला देश मुक्त होईल ती असेल खऱ्या अर्थाने स्वतंत्र भारताची सुवर्ण पहाट. त्यावेळी इथे नांदेल माणूसकी नावाचा एक धर्म. माणूस नावाची एकमेव ओळख.

***

**गणेशदादा शितोळे**
**ई पत्ता : ganeshdadashitole@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९७६४५९८२७२**

**कविता**

## दुसरं पर्व

गर्भमरण देताना तू कशी विसरलीस आई
तू ही कोणाची लाडाची लेक होतीस ...
कळी डवरताना फुलताना मोहरणारा तू बाबा
बाप-लेकीच्या भावना ऊमलण्यआधीच कुस्करल्यास ...
पक्षाघाताने बेजार झालेत समाज-पालक
वासनांधांच्या बळी जाताहेत तुमच्याच लेकी ...

आज एक पर्व संपेल
उद्या दुसरं सुरू होईल ...
त्या पर्वाकडे माझ्या लाडाच्या लेकीसाठी
मी विश्वासाचं आभाळ मागते
विश्वासाचं आभाळ मागते ...

***

**सौ. सुवर्णा अरुण कांबळे**
**खारघर, नवी मुंबई**
**ई पत्ता : suvaarnarun@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९२२४४४८२३१**

**कविता**

## स्वामीनी

स्त्री जन्मदात्री स्त्री शक्तीदात्री
पुत्र असो वा पुत्री समान तीच्या हृदयी
समतेचे सूत्र जन्मे तीच्याच गर्भातूनी
अशी सामर्थ्यशालिनी मानिनी तू

वसुधैवकुटुंबकम् कल्पनादात्री
रांधतसे कुटूंब सांधण्यासाठी
विविधतेतही एकतेची शक्ती जपणारी
अशी हृदयाहृदयांची स्वामीनी तू

नवयुगबदलांची संजीवनदात्री
विषमप्रथांची करी उचलबांगडी
भूतकाळास देवूनी माफी भविष्य घडविणारी
अशी लखलखती दामिनी तू

***

**सौ. सुवर्णा अरुण कांबळे**
**खारघर, नवी मुंबई**
**ई पत्ता : suvaarnarun@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९२२४४४८२३१**

## मराठी विचारधन

रिकामे पाकीट कधीच तुमच्या याश्याच्या आड येत नाहीत, जेवढे रिकामी डोके आणि रिकामी मन यशात अडसर बनते .

***

**संग्रहित**

कविता

# तुझा गाव तसा राहिला नाही

जिकडे तिकडे नुसतीच गर्दी बाहुल्यांची
दिसते मजला नुसतीच गर्दी साउल्यांची
गावाचा शिवार ही तसा राहिला नाही
झुडपात तिथेही कुठे आता
ससा राहिला नाही
तुझा गाव तसा राहिला नाही
असायचा सगळीकडेच नुसताच बोलबाला
असो पोळा अथवा गोपाळकाला
सगळेच कसे जमायचे
अगदी घरच्या सारखे
आता झाली पाखरे घरट्यास पारखे
देती सढळ हाताने तो पसा राहिला नाही
खरच तुझा गाव तसा राहिला नाही
होता कसा कट्टा, चालायची आपुली थट्टा
आता कुठे दिसते तसे
बदलले इतक्यात कसे
साधीच राहायची पोरं,आता करती बघ नट्टापट्टा
ऐकु येत नाही आता कुठे गोसायाची गाणी
विसरला गायाचे की तो घसाच राहिला नाही
पण खरच तुझा गाव तसा राहिला नाही
तु म्हणशील नेमका कसा राहिला नाही
मंदिरात दिव्यांचा आरास राहिला नाही की
पहाटेचा प्राजक्ताचा गंधाळ वास राहिला नाही
आपुलकी अन् मायेचा तो साथ राहिला नाही की
ध्यानात तुझ्या तो घात राहिला नाही
ते काहिहि असो, पण आपुलाच आपल्या हातात हात
राहिला
मग जर तुच तसा राहिला नाही
तर गावही तसा राहिला तरी कसा ॥

***

**शशिकांत मा. बाबर**
**बोररांजणीकर, जि. जालना**
**ई पत्ता : shashikantbabar12@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९१३०६२०८३४**

कविता

# मनाचा कबाडखाना

( हि कविता रस्त्यावरील भटक्या जमातीतील हातावर पोट चालवणाऱ्या समस्त श्रमिकांच्या मनातील... सुंदर स्वप्न महालात रमणाऱ्या आनंदायी मानवी मनावर आहे ... )

आयुष्याच्या एका अविस्मरणीय कबाडखान्यात
हिंदोळ्यांचा उंचच उंच मनोरा होता ...
साऱ्या त्रुटींनी भरलेला असा तो एक
कचकड्यानचा राजमहाल होता ...
जिवनी त्याच्या सुरुची वृक्ष्यासम
गगनचुंबी अनोखा बुरुज होता ...
बंद पडदया मागे ना खिडकी ना झरोका होता
बंदिस्त काळ - कोठडीत किड्यामुंग्यांचा
जणु अप्रतिम राजदरबारच होता ...
ना त्याचा कुणी परिकथेतील राजकुमार वाली होता
फक्त स्वप्नांचा मात्र अदभुत सुरेल झंकार होता ...
मौनातच सारा सारीपाट मांडला होता
त्या पटावर एक कठपुतळी राणी व एक राजा मोहरा होता ...
सोबती साऱ्या कबाडखान्याचा उपेक्षित बाजार होता
काडी काडी जमवलेल्या चिमण्या जीवाचा तो रद्दी माल होता...
शापित विवंचनेत गुरफलेला तो एक भंगार माल होता
राजकीय आश्वासनांच्या शाब्दिक ज्वलंत होळीत
काबाडखान्यांना पेटता गरिबीचा अंगार होता ....
तरी हि राजाच्या मनाचा कबाडखाना मात्र
तिनका तिनका जमवलेला सारे पाश बांधून होता ...
असा हा अविस्मरणीय अदभुत स्वप्नांच्या
झुल्यावर सुरेलच सुरेल झंकार होता ...
अखेरीस तो मौनातच झुलवांच्या झोक्यावर
हिंदोळतच होता ... हिंदोळतच होता ... हिंदोळतच होता ...

***

**वृषाली शिंदे**
**ई पत्ता : vrushali@pratilipi.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६९४८४३२८**

**कविता**

## ओघळलेली ती एक सर

नदीच्या पात्रातून ओघळलेली ती एक सर ...
सागरात आपले अस्तित्व मिटून समरसलेली ती एक सर ...
नयनांच्या भरभक्कम तटबंदी बांधावरून ,
साऱ्या कठड्यांना भेदून ओघळणारी ती एक सर ...
आपल्या अस्तित्वाची तमा न बाळगता ,
साऱ्या लहानसहान तट्टआंवरून ओसरणारी ती एक सर ...
शापित अपमानित दुय्यम दर्जा प्राप्त अशी ती एक सर···
क्षणिक प्रेमाला ओंजारून गोंजारणारी ती एक सर ...
बेधुंद तुफान बनून येणाऱ्या लाटेत ,
आपल्याला समरसून घेणारी ती एक सर ...
लाटांच्या ऊन-पाऊसाच्या नावेत हेलकावणारी ती एक सर···
जिद्दीने चिकट गोंदाप्रमाणे घट्ट आवळू पाहणारी ,
पण परिस्थिती पुढे नमणारी ती एक सर ...
आपल्या साऱ्या अस्तित्तावाच्या ठीकऱ्या होताना पाहणारी ती एक सर ...
असंख्य मैलाच्या प्रवासानंतर क्षितिजाशी ,
हितगुज करू पाहणारी ती एक सर ...
अन ......
आपुले अस्तित्व मिटवून कर्तव्यपुर्तीच्या धबधब्या वरुन ,
क्षितिजात विलीन होणारी ती एक सर ...
ती एक सर ... ओघळणारी ती एक सर ... बस्स तिच एक सर···
बस्स तिच एक सर···
***

**वृषाली शिंदे**
**ई पत्ता : vrushali@pratilipi.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६९४८४३२८**

**कविता**

## माझ गाव

गाव म्हणजे काय?

कौलारु घर म्हणजे गाव
घरात चुल म्हणजे गाव

शेणान सारवलेल आंगन म्हणजे गाव
दारासोर नांगर म्हणजे गाव

आजी म्हणजे गाव
आजोबा म्हणजे गाव

नदी म्हणजे गाव
धरण म्हणजे गाव

बैलजोडी म्हणजे गाव
बैलगाडी म्हणजे गाव

चुलीवरच जेवन म्हणजे गाव
झाडावरची कैरी म्हणजे गाव

मटक्यातील पाणी म्हणजे गाव
पहाटेची गाणी म्हणजे गाव
***

**संजय वि पाटील.**
**मोबाईल क्रमांक : ८२८६०१०१८७**

## मराठी विचारधन

आत्मविश्वास हे एक प्रभावी अंजन, हे ज्याच्या डोळ्यात लकाकत असेल त्याला कसल्याही काळोखातून अचूक मार्ग दिसतो.
***

**संग्रहित**

**कविता**

# *हा माणूस सध्या संपर्क*

क्षेत्राच्या बाहेर आहे
ज्याला
भरायची आहेत
चार दोन पोटाची खळगी
तो आता
उंचीवर तरी आहे
नाहीतर पाताळात तरी
हा माणूस संपर्क क्षेत्राच्या
बाहेर आहे

गर्दीत आहे !
बार मध्ये आहे !
देवळात आहे !
शेतात आहे !
स्वप्नात आहे !
हा माणूस सध्या संपर्क
क्षेत्राच्या बाहेर आहे

त्याच्या कडे सध्या मोबाईल आहे
लॅपटॉप आहे,
टीव्ही आहे,
प्रचंड काम आहे,
आणि महत्त्वाचे तो खूपच
मोकळा आहे
हा माणूस संपर्क क्षेत्राच्या
बाहेर आहे

हा सणात आहे,
उत्सवात आहे,
कॅलेंडरच्या पानापानात आहे
प्रतिष्ठेच्या मानात आहे
राजकीय तणावात आहे
हा माणूस
सध्या संपर्क क्षेत्राच्या
बाहेर आहे

हा जातीत आहे
धर्मात आहे
पंतात आहे
हा माणूस संपर्क क्षेत्राच्या
बाहेर आहे

हा माणूस तुम्हाला
सहज उपलब्ध होऊ शकतो
जो पुस्तकात आहे,
मैफिलीत आहे,
रंगात आहे
नादात आहे
कवी आहे
आणि "माणूस" असून
माणसात आहे
हा माणूस सध्या उपलब्ध आहे
***

**अभिजीत पाटील**
**सांगली**
**मोबाईल क्रमांक : ९९७०१८८६६१**

## *मराठी विचारधन*

जगणे निरर्थक म्हणतो तो बेईमान आहे, सुखासाठी कधी हसावे लागतं , तर कधी रडावं लागतं.... कारण सुंदर धबधबा बनायला पाण्यालाही उंचावरून पडावं लागतं...
***

**संग्रहित**

**कथा**

# कस्तूरी-निशाद

निशाद....... एक टिपिकल मुंबईकर तरुण.. मित्रांसोबत दंगा मस्ती करणे.. फिरणे.. मस्त आयुष्याची मजा घेणे.. हेच त्याला माहित होत.. आपण प्रेमात पडणं शक्यच नाही, असं अगदी तो पैजेवर मित्रांना सांगायचा....एवढं असूनही खूप हुशार होता तो... पूर्ण डबघाइला आलेला बाबांचा व्यवसाय त्याने स्व:ताच्या हिमतीने आणि हुशारीने पूर्ण भरात आणला होता...

एखाद्या मुलीचा आयुष्यात येण्याने पूर्ण आयुष्य बदलतं, यावर तर त्याचा अजिबात विश्वास नव्हता.... अशात एक दिवस त्याच्या आयुष्यात एक मुलगी आली..... "कस्तुरी".......... खूप सुंदर, बोलकी, खेळकर, निरागस डोळे... निशाद तर पाहताक्षणी तिच्या प्रेमात पडला.....आयुष्यात पहिल्यांदा.....कस्तुरीलाही तो खूप आवडला...

असेच प्रेमातील काही सुखाचे दिवस गेले, मग त्यांनी ठरवलं, की आता लग्न करायचं. पण दोन्ही घरातून विरोध हा होताच... मग शेवटी पर्याय नाही म्हणून त्यांनी कोर्ट मैरेज केल... जवळच्या मित्रांनी साथ दिली, त्यांना.....पण...... निशादचे वडील खूप भडकले आणि निशाद आणि कस्तुरीला घरात घेण्यास नकार दिला..... खूप वाईट वाटलं दोघांना.....

अशा अवस्थेत त्यांनी भाड्याने खोली घेतली आणि संसाराला सुरवात केली... एकमेकांना दिलासा देत. दोघेही आपल्या सुखी संसारात रमू लागले.... निशाद दुखी वाटला, की कस्तुरी त्याला हसवायाची.... आणि कधी घरच्या आठवणीने कस्तुरी उदास असली, की निशाद तिला आधार द्यायचा...... असच पडत... आणि मग स्व:ता उठत.... स्व:ता रडत आणि मग स्व:ताच्या रडण्याला हसत.... निशाद ऑफिसला जात असला, की हमखास कस्तुरी खिडकीतून त्याला हात करायची...

आता २ वर्ष झाली होती त्यांचा लग्नाला.. या काळात कस्तुरीच्या घरच्यांनी स्व:तची नाराजी दूर केली आणि त्या दोघांचा स्वीकार केला होता... ते दोघेही खूप सुखी होते आपल्या जगात..... पण......... अचानक एक दिवस कुणाची तरी त्यांना नजर लागली..... कुणाला तरी त्यांचं सुख पाहवत नव्हतं.....

एके रात्री दोघे गाढ झोपेत असताना... अचानक कस्तुरीला जाग आली.. कस्तुरी खूप घाबरट होती.. म्हणून कायम घरातील लाइट चालू ठेवून झोपायची.... पण तिने पहिलं तर सगळीकडे अंधार होता... खूप घाबरली ती.. पण तिने निशादला नाही उठवलं.. नाहीतर पुन्हा सकाळी घाबरट म्हणून चिडवेल म्हणून.... ती बेड वरुन उठली.. अंधारात काहीच स्पष्ट दिसत नव्हतं... तिने घड्याळ पहिलं तर ३ वाजले होते... कशीबशी चाचपडत तिने लाइटचा स्विच ऑन केला... पण स्विच तर ऑनच होता... कदाचित लाइट गेली असावी म्हणून तिने खिडकी बाहेर डोकावलं..... तर क्षणभर तिचे श्वासच थांबले.... बाहेर कोणीतरी होतं... तीन स्त्रिया होत्या.... एक वयस्कर... एक मध्यम वयाची आणि एक तरुण मुलगी होती...... त्या तिघी एकटक कस्तुरीकडे पाहत होत्या... त्या तिघींचा अवतार खूपच वेगळा होता... त्यापैकि दोघी साडीवर होत्या आणि ती तरुण मुलगी ड्रेस वर होती... त्यांचे चेहरे एकदम पांढरट होते.... त्यांना पाहून कस्तुरी खूपच घाबरली.... जवळ जवळ किंचाळतच तिने निशादला हाक मारली.... निशाद खडबडून जागा झाला... आणि तिच्याजवळ जाऊन विचारलं... "काय झाल?"

कस्तुरी बाहेर बोट दाखवत बोलली. ."ते बघ!! त्या बायका कशा बघत आहेत" निशादने समोर पहिलं तर कोणीच नव्हतं... तो बोलला. ."कुठे ग ?" कस्तुरी वैतागून बोलली, "अरे ते बघ ना समोर.."

निशादला काहीच कळेना.. त्याने कशीबाशी तिची समजूत काढली आणि तिला झोपवलं.... दुसर्या दिवशी नेहमी प्रमाणे निशाद ऑफिसला गेला... पण त्या दिवशी कस्तुरीला रक्ताची उलटी झाली.. ती निशादला काही न सांगता डॉक्टरकडे गेली...डॉक्टरने तिला काही टेस्ट करायला सांगितल्या... रीपोर्ट दुसर्या दिवशी मिळणार

होते... ती घरी आली... निशाद उगीचच टेंशन घेईल म्हणून तिने त्याला काही सांगितलं नाही....

त्या रात्री कसल्याशा आवाजाने कस्तुरीला जाग आली... लाइट गेलेलीच होती...पूर्ण अंधार होता खोलीमधे.... घड्याळ पहिलं तर ३ वाजले होते.. अगदी कालसारखंच होतं. सर्व पण का कुणास ठाऊक तिचे पाय आपोआप खिडकीकडे वळले... तिने हळूच खिडकी उघडली आणि बाहेर पाहीलं, तर तिच्या पायाखालची जमिनीच सरकली....कारण कालच्याच त्या तीन स्त्रिया आज फक्त काही अंतरावार उभ्या होत्या... तीच त्यांची भयानक एकटक नजर... आणि अचानक त्यांचातील वयस्कर स्त्रीने मूठ आवळली आणि तिचा मुठीमधे काहीतरी होत... तिने ते पूर्ण आवळल आणि एकदम कस्तुरीचा अंगावर फेकलं ... कस्तुरी या अचानक घडलेल्या घटनेने खूपच घाबरली आणि किंचाळत निशादला उठवू लागली... निशाद उठला त्याने बाहेर येऊन पाहीलं पण त्याला कोणीच नाही दिसलं.... कस्तुरी खूपच घाबरली होती... आणि सारखी बडबडत होती... "त्या बाईने माझा अंगावर काहीतरी फेकलं"... म्हणून...

निशाद तिला समजावू लागला...''अग..कोणी नाही तिथे.. भास झाला असेल तुला..'' पण कस्तूरीला माहीत होतं...तो भास नाहीये....

दुसर्या दिवशी सकाळी निशादची खूप महत्वाची मीटिंग होती... त्याला ऑफिसला जाणं गरजेचं होत... कारण त्याला माहीत होत, की आज त्याच प्रमोशन होणार आहे... पण याबद्दल त्याने कस्तुरीला काहीच सांगितलं नव्हतं.. सर्प्राइज देणार होता तो तिला... तो ऑफिसला निघाला.. नेहमीप्रमाणे कस्तुरीने खिडकीतून त्याला बाय केलं.... निशाद गेल्यानंतर ती लगेच डॉक्टरकडे गेली, कारण आज तिचे रिपोर्ट्स तिला मिळणार होते....

ती डॉक्टरकडे गेली... डॉक्टरांनी पूर्ण रिपोर्ट्स वाचल्या आणि सोबत कोणी आहे का? विचारलं...कस्तुरीचा मनात शंकेची पाल चुकचुकली.... ती बोलली... "कोणी नाही.. माझे हजबंड.. ऑफिस मधे गेलेत.. मला सांगा ना काय झालं?.."

डॉक्टर बोलले... "तुमचे पती जर तुमच्या सोबत असते..तर बरं झालं असतं.." पण कस्तुरी काहीच ऐकायला तयार नव्हती... तिने हट्टच केला की, "रीपोर्टमधे काय आहे ते सांगा" म्हणून... डॉक्टरांनी मग पूर्ण रिपोर्ट तिला समजावून सांगितला....कस्तुरीने डॉक्टरच म्हणणं पूर्ण ऐकून घेतलं... आणि रिपोर्ट घेऊन घरी निघाली... पण तिचे पाय खूपच जड झाले होते... डोळ्यात पाणी होतं... आणि डॉक्टरचे शब्द कानात घुमत होते....

इतक्यात तिचा फोन वाजला.. निशादचा फोन होता.... तिला खूप रडू येत होत.. पण तिने स्व:ताला आवरलं... आणि फोन उचलला..... तिकडून निशाद खूप आनंदात बोलत होता.... "कस्तुरी... अगं माझ प्रमोशन झालं.." कस्तुरी हसली आणि बोलली.. ''अभिनंदन!!...."

निशादने तिच्या आवाजावरून लगेच ओळखलं... काहीतरी प्रॉब्लेम झालाय..... तो बोलला, "काय झालं... कस्तुरी.. रडतेस का...?" कस्तुरी डोळे पुसत बोलली. ."अरे मी कुठे रडतेय.. तुझ आपलं काहीतरीच.." निशदला ते पटलं नाही तो बोलला... "तुला माझी शप्पथ कस्तुरी... सांग काय झालं..?"

यावेळी मात्र तिला हुंदका आवरता आला नाही... आणि रडत रडत बोलली... "निशाद मी मरणार आहे रे.!!.. फक्त तीन महीने आहेत माझाकडे.!!!.."

निशादच्या पायाखालची जमीनच सरकली... डोळ्यासमोर पूर्ण अंधार झाला... पायातील पूर्ण त्राण निघून गेला आणि तो मटकण जागेवर बसला.... त्याला काय बोलावं तेच सुचत नव्हतं.... कस्तुरी अजूनही रडतच होती... मग तीनेच फोन कट केला.... कस्तुरी घरी आली.... खूप रडली ती... कारण तिने ठरवलं होतं, की निशादसमोर रडायचं नाही.. किती स्वप्न पहिले होते तिने आणि निशादने... पण डॉक्टरांनी तिला ब्लड कॅन्सर आहे म्हणून सांगितलं... ते पण लास्ट स्टेज... तिचापण यावर विश्वास बसत नव्हता............... ३ महीने दिले होते तिला आता देवाने...जगण्यासाठी!! इकडे निशाद पण एका बागेत जाऊन बसला आणि खूप रडला... कारण त्याने पण ठरवलं होतं, की कस्तुरीसमोर रडायचं

नाही.. नियतीने खूप क्रूर चेष्टा केली होती त्याची... आता कुठे संसार सुरू झाला होता... सुखाचे दिवस येणार अस दिसत होत पण.......का...??? आपल्याच बाबतीत नियतीने अशी चेष्टा का करावी...?? याचाच विचार तो करत होता... पण त्याला कस्तुरीचा चेहरा आठवला... नाही... ३ महीने खूप खुश ठेवायच तिला.... मीच जर असा रडलो तर तिला कोण दिलासा देणार... असा विचार करून तो उठला... आणि घरी गेला...

कस्तुरीने नेहमीप्रमाणे हसतमुखाने त्याचं स्वागत केलं... दोघांचे डोळे रडून रडून सुजले होते... पण ओठावर उसनं हसू होतं... कस्तुरी त्याला बोलली.. "मरण तर प्रत्येकाचं निश्चित आहे... यात माझा नंबर लवकर लागला.. त्यात काय? एवढं.. तस पण मला म्हातारी होवून मरायचं नव्हतं...." आणि स्व:ताच मोठ मोठ्याने हसू लागली.... निशादला तिच्याकडे पाहू लागला... ओठ ताणून हसायचा प्रयत्न करू लागला.... पण डोळ्यांनी साथ नाही दिली... आणि त्यातून पाणी आलं. कस्तुरीही हसता हसता कधी रडू लागली तिला पण नाही कळलं...... तिने निशाद पाणी आलं मांडीवर डोक ठेवलं आणि रडत रडत म्हणाली.... मला नाही रे मरायचं... मला जगायच आहे रे तुझ्यासोबत.... खूप जगायचं आहे.. तुझासोबत हसायचं आहे... तुझासोबत रडायचं आहे.... मला तुझी साथ द्यायची आहे रे... आयुष्यभर..."

दोघे एकमेकांना बिलगून खूप वेळ रडत होते... .त्या दिवशी ते दोघे बाहेरच जेवले... .रात्री ते झोपले असताना... कस्तुरीला जाग आली.... तिने घड्याळ पहिलं....३ वाजले होते... तिला मागचे दोन दिवस आठवले... आणि तिचा आंगावार शहारा आला... आज पण असतील का त्या स्त्रिया खिडकीत.... तिने स्व:ताशी विचार केला... आणि कसलासा विचार करून ती उठली आणि खिडली उघडण्यासाठी हात लावणार....... इतक्यात खिडकी आपोआप उघडली... तिने समोर पहिलं तर त्या तीनही स्त्रिया खिडकीला एकदम चिकटून उभ्या होत्या... आणि त्यांची ती नजर....अजूनही कस्तुरीला एकटक पहात होती....कस्तुरी निशादला हाक मारू लागली... त्या स्त्रिया आज तिला हातवारे करून खुणावत होत्या... निशाद तिचाजवळ गेला.... कस्तुरी ओरडू लागली... ."त्या बघ बायका मला खुणावत आहेत... मला घेऊन जायला आल्यात त्या...." पण निशादला मात्र समोर अजूनही कुणीच दिसत नव्हते. शेवटी ती रात्र दोघांनीही. तशीच जागूनच काढली….

निशादला काहीच सुचत नव्हतं.. काय करावं ते.... आतून पूर्णपणे तो मोडला होता.... कस्तुरीचा आजार... आणि तिला होणारे भास... सगळीकडून एकदमच संकट आली होती त्याच्यावर... .त्यातूनही तो तिला खुश ठेवण्याचा प्रयत्न करू लागला...

दिवसभर तो तिला खूप खुश ठेवण्याचा प्रयत्न करायचा...पण रात्रीचे ३ वाजले की कस्तुरीला हमखास जाग यायची... कधी रडायची... ओरडायची आणि म्हणायची, "त्या बायका मला नाही सोडणार... त्या मला घेऊन जाणार.. निशाद... त्या मला नाही सोडणार....". अशा कित्येक रात्री निशादने जागून काढल्या होत्या.... पण समोर मार्गही काही दिसत नव्हता.....

एके दिवशी कस्तुरीचे बाबा तिला घ्यायला आले... तिच्या आजारपणाबद्दल निशादने फोन करून सांगितलं होतं... आणि तिला होणाऱ्या भासांबद्दलही त्याने तिच्या बाबांना कल्पना दिली... तिचे बाबा आले आणि तिला घेऊन जाऊ लागले... निशाद त्यांना स्टॅंडवर सोडायला आला.. दोघांनी हसत एकमेकांचा निरोप घेतला.... निशादनेही सुट्टी काढून गावी येण्याच वचन दिलं..... कस्तुरी खिडकीचा कडेला बसली होती… बस थोडी पुढे गेली असेल......इतक्यात तिची नजर बाहेर गेली... त्या तीन स्त्रिया भर दिवसा तिच्यापासून काही अंतरावर हवेत उडत होत्या आणि बस सोबत येत होत्या.... कस्तुरी बसमध्येच किंचाळू लागली.... "बाबा त्या बघा बायका... मागे मागे यायला लागल्यात... माझा पिच्छा सोडत का नाहीत त्या... बाबा त्या बायका मला घेऊन जाणार...."अशी काहीही ती बडबडू लागली... बाबांनी बाहेर पहिलं तर त्यांना काहीच दिसलं नाही... बाबा तिला शांत करू लागले... पण ती जास्तच बडबडू लागली... आणि बाबाचा मांडीवर डोक ठेवून झोपली......

गावी आल्या नंतरही कस्तुरीला त्या बायका रात्री तीनच्या सुमारास दिसत होत्याच.... पण त्या बायका कोण

आहेत?... तेच कळत नव्हतं.... तिच्या आजारपणानेपण आता त्याचे रंग दाखवायला चालू केलं होतं... काही दिवसांनी निशाद सुट्टी टाकून तिच्याकडे आला...आणि तिची अवस्था पाहून हादरलाच...... फक्त १० दिवसात खूप वाईट अवस्था झाली होती तिची........ फक्त बेडवर झोपून असायची... गोरीपान दिसणारी कस्तुरी... पण आता तिच्या चेहऱ्यावरचं तेजच नाहीसं झालं होतं... डोळे खोल आत गेले होते.... हातापायाची त्वचा पूर्ण हाडाला चिकटली होती... जणूकाही फक्त हाडाचा सापळाच शिल्लक होता.... निशादचा डोळ्यात अश्रु उभे राहिले त्याला तिची ती अवस्था पाहवत नव्हती...

तो दिवसभर बसून तिचाशी गप्पा मारायचा... तिला हसवायचा प्रयत्न करायचा... एक दिवस कस्तुरी निशादला बोलली, "माझी शेवटची इच्छा पूर्ण करशील..??" तिचा "शेवटची इच्छा" हा शब्द त्याचा काळजाला चिरून गेला.......... तो क्षणभर घुटमळला... आलेला आवंढा गिळून बोलला.. "बोल ना गं.."

कस्तुरीने पूर्ण जोर लावून त्याचा हातावर हात ठेवला आणि बोलली... "मला वचन दे.. माझ्यानंतर तू खूप दु:ख करत बसणार नाही...आणि मी तुझासाठी २-३ मुली पाहिल्यात त्यातील जी आवडेल तिचा बरोबर लग्न करशील?.."

निशादला स्व:तावर नियंत्रण ठेवता नाही आलं.... आणि खूप रडला तो... कस्तुरी शिवाय आयुष्याची कल्पनाही त्याला करवत नव्हती........ त्याच दिवशी त्याची सुट्टी संपली होती.... ऑफिसमधे जाऊन सुट्टी वाढवून घेऊन परत येण्यासाठी तो मुंबईला गेला... जाताना कस्तुरीचा निरोप घेतला आणि निघाला......... पण.......... ती भेट ही त्या दोघांची शेवटची ठरली... कारण त्याच रात्री ३ वाजता कस्तुरीने जीव सोडला....... ३ महिन्याचा डाव २ महिन्यातच संपला होता....

निशाद.... आहे तसा परत आला.... अंत्यविधी झाला.... रडून रडून त्याचा डोळ्यातील पाणी आटलं होतं.... सर्व आवश्यक विधी पार पाडून तो मुंबईमधे आला........ ते घर त्याला आता खायला उठत होत... त्या घरातील भिंती.. पडदे... आणि कस्तुरीने प्रेमाने सजवलेली प्रत्येक वस्तु... जणूकाही निशादला विचारत होते..... कस्तुरी कुठे आहे?..... पण त्याचं उत्तर निशाद कडे नव्हतंच....... तो तसाच न जेवता झोपी गेला.... अचानक त्याला जाग आली... घडयाळात पाहिलं ३ वाजले होते... पाय आपोआप खिडकीकडे वळले... त्याने खिडकी उघडून समोर पहिलं... तर त्याला धक्का बसला... कारण समोर तीन स्त्रिया उभ्या होत्या... हुबेहूब जशी कस्तुरी सांगायची..... याचा अर्थ खरच... कस्तुरीचा बळी या तिघींनी घेतला होता का..?? आता या मला पण नाही सोडणार का..?? एका क्षणात कित्येक प्रश्न त्याचा मनात आले.......पण .........इतक्यात तिथे चौथी आकृती दिसली.. काहीशी तेजोमय...त्या चौथ्या आकृतीच्या आगमनाने या तिन्ही आकृती जणूकाही गायबच झाल्या....ती आकृती... निशादला ओळखीची वाटली.... कस्तुरी.... हो कस्तुरीच आहे ती........ निशादने जोरात हाक मारली.......... पण.... तोपर्यंत ती आकृती निघून गेली होती....... पण त्या दिवसांनंतर कधीच त्या तीन स्त्रिया निशादला दिसल्या नाहीत......

निशादने काही ठिकाणी विचारलं तेंव्हा अस सांगण्यात आलं, की त्या तीन बायका कस्तुरीला घेऊन जाण्यासाठी आल्या होत्या... .कस्तुरी नंतर त्या निशादला पण घेऊन जाणार होत्या पण कस्तुरीच्या पवित्र आत्म्याने तसं होऊ दिलं नाही.....

ही कथा स्व:ता निशादने मला भेटून सांगितली...२-३ तास तो स्व:ताबद्दल आणि कस्तुरीबद्दल सांगत होता... निशाद तुझ्या भावना शब्दात मांडण्याचा केलेला हा छोटासा प्रयत्न... काही चुकलं असेल तर माफी असावी.... निशादला मी एकच सांगेन... "हरिण आयुष्यभर कस्तुरीचा शोध घेत असतं... कारण त्याचा सुगंध त्याला येत असतो.. पण त्या हरणाला हे कधीच कळत नाही, की सुगंध देणारी कस्तुरी त्याच्यातच आहे... निशाद तुझी कस्तुरी पण तुझ्यातच आहे.. कुठेच नाही गेली ती... तुझ्या आयुष्यात कायम सुगंध रूपाने ती राहील...... कदाचित ती तुला कधी दिसणार नाही पण तिचा सुगंध नेहमी तुझासोबत राहील.........."

***

**हासिम नागराल**

**मोबाईल क्रमांक : ९९६०७२६५५९**

लेख

# पुस्तकांची दुनिया

तुझी माझी ओळख कधीची  मला आठवत नाही, कशी झाली ते हि मला आठवत नाही पण तुझ्या शिवाय माझा एक हि दिवस सरत नाही कारण इतक्या जिव्हाळ्याच्या आणि निरपेक्ष  मित्र नाहीच दुसरा कुणी  घरचे सांगतात कि म्हणे फार लहान होते मी  आणि तू पण म्हणूनच लहान, आणि तू पण माझ्या सारखा रंग बेरंगी आणि अगदी सोपा सुरवातीला चिऊ काऊ, भित्रा ससा, चतुर कोल्हा यांची सद्दी होती मग, तुझ्या रूपाने खूप सारे मोठे हुशार कर्तुत्वान लोक भेटले मला त्या लोकांचे विचार कळण्याचे वय नव्हतेच माझे पण मला तुझ्या मुळेच गोष्टी रूपाने सहज सोपे कळले ते मला  रामायण महाभारत, शिवाजी महाराज, झाशीची राणी, टिळक,  आगरकर, सावरकर असे किती तरी व्यक्ती मला ओळखीच्या बनल्या तुझ्या मुळेच.  अर्थात माझे वय हि तसच होते, ह्या लोकांचे विचार पेलावण्याचे नसले तरी, किमान हे लोक महान आहेत हे तू मला पटवून दिलेस. एका बाजूला तुझ्यामुळे मला केवळ मनोरंजन हि मिळत होते, चंपक, चांदोबा, ठक ठक वाचून  एकीकडे गोट्या, चिंगी, फाफे सारखे थोडे व्रात्य पण मनानी निर्मळ आणि धाडसी  मित्र पण आणि एकीकडे या महान लोकांशी माझी अक्ष ओळख पण होत होती  आता मागे वळून पाहताना मला असे वाटतंय कि या सगळ्यातून खूप सूक्ष्म संस्कार होत असतात आपल्यावर, कुणीही मुद्दाम उपदेश न करता आणि नकळत  आपली गट्टी तशी खूप जुनी आहे, तुला एक गम्मत सांगू का मला अजूनही कुणी सुट्टी कशी घालवणार, हे जर का विचारले तर गेली कित्येक वर्षे तू माझ्या सुट्टीच्या काळातला एक अविभाज्य भाग आहेस. नुकतीच मे महिन्याची सुट्टी लागली आहे, हातात मस्तपैकी एक गुंगवून टाकणारे पुस्तक आहे, हाशहुश करायला  लावणारा उष्मा आहे खरा, पंख्याचे वारे पण गरम येतेय, पण आपल्याला त्याची पर्वा नाही. आपण दोघेच "मी आणि माझे पुस्तक", आई एकीकडे विचारून वैतागालीये, जेवणार कधी, चहाची वेळ झालीये चहा कि सरबत आणि आपले लक्षच नाहीये. चौघीजणी, युगंधरा, स्वामी किंवा असाच काही आपल्या हातात आहे, डोळ्यातून घळाघळा गंगा जमुना वाहत आहेत, पण आपण आपल्याच नादात रडतोय चक्क, आजूबाजूला कुणी आहे कि नाही ह्याची चिंता  न करता. वाह याच्या पेक्षा छान ते आणखी काय. संध्याकाळी मस्त वाचनालयात जायचं, तिथे तुझी भावंडे अगदी गुण्या गोविंदानी नांदत असतात. अर्धा एक तास तरी त्या शेल्फसच्या रांगेत नवीन जुन्या पुस्तकांचा वास घेत, कधी हवे ते पुस्तक आहे का ते शोधण्यात, कधी प्रस्तावना आणि पुस्तकावर मागे छापलेल्या प्रतिक्रिया वाचण्यात कसा संपायचा ते कळायचे नाहीच खरे सांगू तुझ्यामुळे मला खूप लोक भेटले, पुस्तक लिहिणारे आणि त्यांनी ज्यांना लिहिले असे पण.

पुस्तक कधीच निर्जीव नसते, ती एक जिवंत कलाकृती आहे, तुम्हाला कडकडून भेटणारी. आनंदाच्या क्षणी एखादी छान कविता आठवतेच  कि, निसर्गाकडे पहायची दृष्टी बालकवी आणि बोरकर देवून जातात. कधी कठीण प्रसंगामध्ये एखादा पुस्तकातला विचार खूप धीर देवून जातो. पुस्तकातून भेटलेले एखादे काकाजी, आचार्य, एकटीनेच तत्व निष्ठा आयुष्य जगणारी बाबी, रोजच्याच प्रसंगाकडे वेगळ्याच दृष्टीतून पाहणारा पार्टनर, प्रेमाचा अर्थ समजावणारी एखादी युगा, निखळ आणि निरागसपणे लोकांना मदत करणारे  गोट्या , चिंगी आणि बोक्यासुद्धा आपल्याला जगण्याची नवी उर्मी देत असतात

मला माणसाच्या या प्रतिभेचे खूपच कौतिक आणि अचंबा वाटत आला आहे. काल्पनिक म्हंटले तरी काल्पनिक असे नसतच ते. पुस्तकामधल्या व्यक्ती, प्रकृती घटना या सगळ्या कुठल्या न कुठल्या रुपात अंशत: का होईना पण समाज जीवनाचे प्रतिबिंब असतात. एखाद्या पुस्तकात आपणही सापडतो कि आपल्याला, अरे हे तर माझ्या सारखाच असे वाटते कि आपल्याला.

माझ्यासाठी घरातला आणि मनातला एक कप्पा पुस्तकासाठी खास आहे. आपल्याला वाचता येते याचा खरा आनंद मिळतो त्यातून. वेगवेगळी माणसे, त्यांचे स्वभाव आणि कोणत्या प्रसंगाला कोण कसा वागतो हे सांगतात बरे पुस्तके. कधी कधी वाटते हे एक प्रकारचे समुपदेशन म्हणजे आजच्या भाषेत "कौन्सेलिंग"च आहे.

पुस्तकांनी मला काय दिले हे मी शब्दात नाही सांगू शकत. आनंद मनोरंजन तर दिलेच पण मला वाटते जगण्याचे भानही दिले. भावना व्यक्त करायला शिकवल्या, माझ्या पालकांनी जे काही शिकवले त्याला पुस्तकांनी बळकटी दिली, खरच चूक झाली तर निर्भयपणे मान्य करायली हि शिकवले आणि समोरच्याला प्रसंगी माफ करायली हि. एखाद्या गोष्टीकडे चौकट मोडून पहायलाही शिकवले. अजून खूप वाचायचे, खूप पुस्तकांना भेटायचे बाकी आहे, आणि त्या मोहापायी तरी आपल्याला मस्त जगता आले पाहिजे हिच महत्वाकांक्षा आहे.

अथांग सागरातले काही शिंपले मिळाले म्हणून थोडी हरखली आहे मी पण हा सागर अथांग आहे, आणि वेळ प्रसंगी आपल्याला किनारा मिळवून देणारा आहे हे नक्की खूप वाचा आणि आनंदी राहा, आपल्या कक्षा रुंद करायला आणि मन मोठे करायला शिकवणारी या खेरीच कोणतीच शिकवणी नाही

**घरातली एक जागा आपण ठेवतो न देवासाठी**
**तसाच एक कोपरा हि द्या कि पुस्तकासाठी**
**देवघर उजळून निघते न समईच्या प्रकाशनी**
**तसेच हा कोपरा पण उजळे कि ज्ञानाच्या तेजानी**
**जशी एक जागा तुम्ही राखून ठेवता मनातली**
**जवळच्या सुह्दांसाठी**
**तशी द्या एक "स्पेस"**
**या आयुष्यभराच्या मैत्रीसाठी**
**पुस्तक नाही मी फक्त एक निर्जीव**
**माझ्यातही नांदतात किती तरी जीव**
**जर जुळतील आपले रेशीमबंध**
**आयुष्यभराचे असतील हे ऋणानुबंध**

***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

लेख

# *लहान पण देगा देवा !!!!*

किती वर्षे झाली, दप्तर भरले नाही किती दिवस झाले मधली सुट्टी पण मिळाली नाही. लहान सुट्टी मध्ये डबा संपून, मोठ्या सुट्टीमध्ये लगोरी पण लावली नाही. बरेच दिवस झालेत, प्राथर्ना म्हणण्यासाठी हात जोडून अन प्रतिज्ञा तर आता केवळ आठवणी मधेच राहिलेय. मागे वळून पाहताना थोडे, शाळेची घन्टा ऐकू येतीये आता शाळा भरेल असे वाटे पर्यंत आठवणीची रेती हातामधून निसटून जातीये घरचा अभ्यास आणि गृहपाठ नावाचा एक छळवाद होता तरी सुद्धा प्रत्येक दिवस किती आनंदात जात होता. छोट्या छोट्या गोष्टीमध्ये पण सुख सापडत होते आणि जगण्यासाठी आपले गणगोत आणि सुह्द पुरेसे आहेत ह्याचे हि कौतुक होते. खेळत लबाडी केली तरी, मैत्री मध्ये निरागसता होती. अगदी एक **cadboury** सुद्धा सात जणांमध्ये पुरत होती. आपल्या बालपण मध्ये , आई वडील त्यांचे बालपण शोधत होते.

"मला जे नाही मिळाले, ते तुम्हाला मिळू दे", यासाठीच झगडत होते. बघता बघत, बालवाडी संपली, प्राथमिक, माध्यमिक अन महविद्यालय पण झाले. इतक्या वर्षात, खरच कधी मागे वळून सुद्धा नाही पहिले. तरी आज पुन्हा भूतकाळात डोकावताना, शाळेची इमारत अजून हि आठवतीय, मित्र-मैत्रिणीच्या घोळक्यात खिदळणारे आपण हि दिसतोय. हसताना ज्या वळणावर सगळ्यांच्या वाटा निराळ्या झाल्या, तिथेच मन अडकून राहलय अजून हि मागे वळून पाहताना छान होते बालपण माझे, आई बाबा, भाऊ बहिण सगळ्यासाठी वेळ होता. शाळा, मित्र मैत्रिणी, माझे शिक्षक इतके छोटे पण सुंदर जग होते माझे तसे तर आयुष्य अजून हि सुंदर आहे, नवे जग, नवी नाती, थोडे त्रास हि आहेतच कि पण तरी सुद्धा जिथे तुकोबाला सुधा ज्या लहानपणचा मोह सुटला नाही, तो आपल्या तरी का सुटेल आज परत प्रार्थना म्हणावी लागली, तर लहानपणच मागू आपण देव असेलच तर म्हणेल अरे मी पण नाही का बाळकृष्णाचा, गीता सांगणारा कृष्ण झालो.

नियती आणि वेळ कधीच चुकत नाही आणि कुणासाठीच थांबत नाही म्हणूनच कदाचित, साठवण

हि बालपणाची जपू शकतो आपण थोडे निरागसतेने आयुष्याकडे पाहू या पुन्हा अन साठवू यात मनात आपल्या बालपणाची आठवण.

***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

**कविता**

## *जगता आलं पाहिजे*

थोड तरी खोट -खोट
जगता आल पाहिजे.
न आवडलेल्या गोष्टीला
लाईक केल पाहिजे.
एखादी पोस्ट न वाचताच
फॉरवर्ड केली पाहिजे.
त्याला मिळालेल्या लाईकला
धन्यवाद दिले पाहिजे.
नसलेल्या वाढदिवसाच्या
शुभेच्छा दिल्या पाहिजे.
शोकसंदेशाच्या सात्वनांला
घाई केली पाहिजे.
या ग्रुपवरून त्या ग्रुपवर
भटकंती केली पाहिजे.
न वाचताच डाटा
क्लिअर केला पाहिजे.
न सागंताच ग्रुपवरून
लेफ्ट झाल पाहिजे.
आपल्यालाही ऑनलाइन
जगता आलं पाहिजे.

***

**संदीप ढाकणे**
**जि.प.प्रा.शा.लिंगदरी ( औरंगाबाद )**
**ई पत्ता : sandeep.dhakne@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७५८८५१२४६७**

**लेख**

## *पर्यावरण संवर्धन व संगोपन*

पर्यावरण संवर्धनाबरोबरच पर्यावरण संगोपन आजच्या काळाची खरी गरजआहे. पृथ्वी,आप,तेज,वायू, आकाश या पंचमहाभूतांच्या वर्तुळांनी बनलेले पर्यावरण, आज प्रदूषणाच्या विळख्यात आले आहे. शहरीकरण व औद्योगिकीकरणामूळे अतोनात वृक्षतोड, जंगलतोड झाली. परिणामी वनसंपदा दिवसें-दिवस नष्ट होत गेली. मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीमुळे पर्यावरणीय समतोल बिघडला. शिवाय वातावरणातील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढतच गेले. कार्बन शोषुन आपल्याला ऑक्सिजन पुरवतात अश्या वृक्षांची संख्या त्यामानाने कमी-कमी होत गेली आणि यामुळे पर्जन्यमान कमी होऊन दुष्काळाचे सावट आपल्यासमोर उभे ठाकले. शिवाय प्रदुषणाचा वाढता आलेख यामुळे "ओझोन"चा थर जो सूर्यांच्या तीव्र किरणांना पृथ्वीवर येण्यापासून रोखतो. तो हि तुटत गेला.परिणामी अतिउष्माचा सामना प्रत्येक संजीवाना करावा लागत आहे. याला अर्थातच मनुष्यच सर्वस्वी जबाबदार आहे. त्याने वृक्ष तोडून वसाहती नक्की उभ्या केल्या पण...वृक्षतोडीमुळे प्रत्येकवेळी मैत्रीपुर्ण साथ देणारा निसर्ग रूसला आणि अनियमीत झाला. वृक्षतोडीमुळे पक्ष्यांचे घरटेहि नाहीसे होत गेले. यामुळे पक्ष्यांची संख्या कमी-कमी होत गेली. चिमणी सारखे पक्षी खूप अल्प प्रमणात आजकाल पाहायला मिळतात.

"हिरव्या-हिरव्या हरिततृणांनी बहरलेली सृष्टी नामशेष होत गेली." वृक्षतोडीमुळे धरणीचा हिरवा साज शृगांर नष्ट होत गेला. दरवर्षी नियमीत वेळेवर पडणारा पाऊस जणु पाहुण्यासारखाच भासू लागला. यांमुळे सा-या जगाचे पोट भरणारे शेतकरी माय-बाप जे सर्वस्वी पाऊसांच्या पाण्यावर अवलंबुन असतात त्यांच्यावर जीवघेणी आपत्ती ओढावली. पेरणी, दुबार पेरणी यामुळे कर्जाचा बोजा वाढतच गेला. पिकं पाण्याविना जळून गेली. दुष्काळाच्या झळात कित्येक शेतकरी मित्रांनी कर्जाला कंटाळुन आपले प्राण त्यागले. त्यांचबरोबर पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन् ,मिल भटकंती दररोजचेच चित्र भासू लागले. सर्वच पाण्याचे स्रोत

कुपनलिका,विहीर, नद्या, नाले, तलाव आटू लागले. भूमिगत जलसाठा दिवसेंदिवस खालावतच चालला आहे.

पर्यावरणाच्या -हासाला वृक्षतोड हे एकच कारण कारणीभूत नसून इतरही अनेक कारण ही जबाबदार आहेत. प्रदूषणरूपी राक्षस भुतलावर जलप्रदुषण,वायुप्रदुषण,भु-प्रदूषण,ध्वनिप्रदुषन अश्या वेगवेगळ्या रूपाने नटला. यांमुळे पर्यावरणात प्रदूषणाचे थैमान वाढले. प्रदूषणामुळे हवेत कार्बन डायऑक्साँईडचे प्रमाण वाढले, यांचा परिणाम पर्यावरणावर झाला. परिणामी पर्जन्यमान कमी झाले. घनकचरा,सांडपाणी,कचरा, नैसर्गिक साधनसंपत्तीचा बेसुमार वापर यांमुळे प्रदुषणात आणखी भरच पडत आहे.

संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातील "वृक्षवल्ली आम्हां सोयरे, वनचरे" प्रमाणेआज पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपणांबरोबर, वृक्षसंवर्धनाची खरी गरज आहे. हवेतील प्रदूषण कमी करण्याकरीता रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लावणे गरजेचे आहे. जोपर्यंत मनात सर्वजण ठाम निश्चय करणार नाहीत तोवर वृक्षारोपण होणार नाही. प्रती व्यक्ती आपण एकजरी वृक्षारोपन करून वृक्षसंवर्धन केले तर भविष्यात पर्यावरणाची आणखी बिघडणारी परिस्थिती रोखता येऊ शकेल. परोपकारी निसर्गाशी मैत्रीपुर्ण साथ कायम राहण्याकरिता आपणही त्याची योग्य निगा व काळजी घ्यायला हवी.

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhanjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**कविता**

## माणूस

प्रत्येकाने चेहऱ्याआडचा माणूस
त्याला जमेल तसा वाचून
मनात साठवावा
आणि तो आपल्याला कसा भावला
तो आपल्या कवितेतून सांगावा
आपल्या मनातील भाव
कवितेतून सांगावे
आपले मन हे कवितेतच रमवावे
कारण--
कविता सारे काही सांगून जाते
छोट्याशा आशयात
***

**सौ. निर्मला भयवाळ**
**१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी**
**गादिया विहार रोड**
**शहानूरवाडी**
**औरंगाबाद४३१००५**
**ई पत्ता : ukbhaiwal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८८८८९२५४८८**

**कविता**

## छावणी

माझ्या डोंगराळ गावात
आली, आली छावणी
कोरड्या पडल्या विहिरी
रित्या झाल्या दावणी

चा-यासाठी हंबरडा
गायीने फोडला
मे पोटासाठी इव्हळला
झाली गुरा-वासरांची कहाणी

कधी धावणार ख्वाजा अन देव
माणसांच्या मदतीला
दुष्काळाने केली जनावरांची थट्टा
गुरे-ढोरे खेळू लागली जीवन-मरणं सट्टा

दुष्काळाची हि दुर्दैवी कहाणी
रान भाबडे रडू लागले
देत आठवणींचे हुंदके
संपली हिरवी काया

दिसू लागली छावणीची छाया
गुर-ढोरांवर आली मरणपाळी
***

**शेख नजमा मैनुद्दीन**
**मु.पो. घानोरा, ता. आष्टी,**
**जि. बीड-४१४२०२**
**ई पत्ता : nadim939@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१३४९२२३**

**कविता**

## *उसाच्या फडात... एक गर्भपात*

डोक्यावर पडली, अक्षदांची 'बरसात'
सजन्याला पाहुनी, सजनी हसली गालातल्या गालात

हिरवा हिरवा चुडा
म्हणे चाल आता उस मळा
मधूचंद्रासाठी बोलवत होता
उसाचा तो फडा

रंग चढला हातावरच्या मेहंदीला, वावर पिकेना, धंदा बुडाला
उचल म्हणे कोयता, आता उस तोडायला

मनाचे हितगुज फडातच व्हायचे
नवेल्या दिवसात ध्येयच उचल फेडायचे
अशातच ती राहिली 'गर्भवती'
पायाखाली काळी मे 'माती'

दिवस रात्र तोडायचे उस, उगवणार होती ममतेची कुस
पती पत्नीच्या गळ्यात आनंदी माळ, घरात येणार होते सुंदर बाळ

कधी गु-हाळ, कधी कारखाना
रात्रंदिन कष्टाचाच धाना
उसाच्या मोळीला लागला गर्भास मार
ती किंचाळली जोरात फार

फडत झाली गर्भगळीत धरती, संपली तिची मातृत्वशक्ती
'स्वप्नं' विखुरले उसाच्या पाचरुंटात, उसाच्या फडत झाला...
एक गर्भपात...
***

**शेख नजमा मैनुद्दीन**
**मु.पो. घानोरा, ता. आष्टी,**
**जि. बीड-४१४२०२**
**ई पत्ता : nadim939@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१३४९२२३**

**कविता**

## *लेकी तू शाळा शिक*

रडून रडून थकून झोपतो तान्हा
फुटलेल्या मातृत्वाला येतो पान्हा
घेतलेली उचल फेडायची असते
कोयत्याला ममता समजत नसते
कुणी देत नाही मायेची भिक
म्हणून लेकी तू शाळा शिक
कामाशिवाय कशाचीच तमा नाही
उन वारा पाऊस सोसावा लागतो
विंचू काट्यावर पाय पडण्याचा भरवसा नसतो
नको राहू माझ्या लेकी तू अडाणी
ढग अन् धरणी शिवाय मिळत नाही दयेची भिक
उन्हाच्या झळा झोंबतात शरीराला
येथे न दिवाळी ना दसरा
उसाच्या पाचरटीत सगळं विसरा
ना पायात वहाणा, न हातात बांगडी
दोन्ही सांज चटणी अन् भाकरी
कुणी देत नाही माणुसकीची भिक
कोयता लागतो अंगाला
रानीवनी जावं लागतं चुलीच्या सरपणाला
काम केल्याने तारुण्यात निघतो पाठीला बाक
मोळी उचलताना भरतो अंगामधी ताप
हे सगळं तुला सोसणार नाही
जीवाचे रान केल्याशिवाय उगवत नाही पिक
म्हणून लेकी तू शाळा शिक
तरण्या ताठ्या बाईला इज्जत वाचवण्याचा घोर
मुकादमाच्या डोळ्यात वासनेचा चोर
काम करून स्वत:ला जपावं लागतं
असंच जीवन जगावं लागतं
तू घे मनच गगन भरारी

मागू नको कुणाला कशाचीच भिक
म्हणून लेकी तू शाळा शिक
***

**शेख नजमा मैनुद्दीन**
**मु.पो. घानोरा, ता. आष्टी,**
**जि. बीड-४१४२०२**
**ई पत्ता : nadim939@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१३४९२२३**

**कविता**

## गर्भाचा हुंकार

माझ्या गं दाराची कोणी काटली जाई ?
बाप म्हणू का म्हणू त्याला कसाई ?
नको गं कुस्करु काळी तुझ्या गर्भातली
गोर-गरिबांची होई मी सिंधुताई
जशी तुळस दारोदारी
तशी मुलगी का नको गं घरोघरी ?
जन्म देऊन मजला घडव, स्त्री जन्माची पुण्याई
माझ्या गं दारची

कविता मित्तली, कृष्णा पाटील मीच गं बाई
म्हातारपणी सांभाळेल मी तुम्हांस आई
यंत्राच्या खालीम मजला टाकू नको आई
जन्माआधी का मला मारण्याची घाई? आई
शिवबा घडवून होईल, मी जिजाऊ
माझ्या गं दारची

उद्याची प्रकाशज्योत क्रूरतेने विझवू नको आई
स्त्री वाचून राहील माणसाची अर्धी कहाणी
उत्तुंग तेजस्वी ज्योत ठेवत ठेऊ दे आई
ऊष.कालची उत्तुंग गगन भरारी घेऊ दे आई
मला जन्म देऊन स्त्रीभ्रूण हत्या थांबव आई
माझ्या गं दारची
***

**शेख नजमा मैनुद्दीन**
**मु.पो. घानोरा, ता. आष्टी,**
**जि. बीड-४१४२०२**
**ई पत्ता : nadim939@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१३४९२२३**

**कविता**

## स्वर्गातून... एक आवाज

मी बोलते स्वर्गातून
मला येते तुझी आठवण
मी तुझी कन्या गर्भातली
जन्माआधी मारलेली
स्त्रीभ्रूण हत्या तू का केलीस आई ?

भावाला बांधणार होते राखी
म्हातारपणात होणार होते आधाराची काठी
दिन-अनाथांची झाले असते सिंधुताई
शिवबा घडवुनी झाले असते जिजाबाई
जन्माआधी का केली मला मारण्याची घाई ?

अंतराळात जाऊन होणार होते कल्पना
राज्यकारभार करणार होते होऊन इंदिरा
फुलण्याआधी मी सुकले जन्माआधी मी मेले
शिकून होणार होते मी थोर सावित्रीबाई
गर्भात मला मारून पाप का केले, आई ?

कन्या म्हणून केला अपमान
स्वर्गी मिळाला मला सन्मान
आई असते देवता असे म्हणालाय कुणीतरी
ममतेच्या दारी भेदभाव केला तू, आई
स्त्रीजन्माची का थांबवली पुण्याई ?
***

**शेख नजमा मैनुद्दीन**
**मु.पो. घानोरा, ता. आष्टी,**
**जि. बीड-४१४२०२**
**ई पत्ता : nadim939@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१३४९२२३**

## मराठी विचारधन

जसे सोने तप्त केल्याने शुद्ध होते, तसे पश्चातापाने मन पवित्र होते....
***

**संग्रहित**

कविता

## स्वर्गातून... एक आवाज

मी बोलते स्वर्गातून
मला येते तुझी आठवण
मी तुझी कन्या गर्भातली
जन्माआधी मारलेली
स्त्रीभ्रूण हत्या तू का केलीस आई ?

भावाला बांधणार होते राखी
म्हातारपणात होणार होते आधाराची काठी
दिन-अनाथांची झाले असते सिंधुताई
शिवबा घडवुनी झाले असते जिजाबाई
जन्माआधी का केली मला मारण्याची घाई ?

अंतराळात जाऊन होणार होते कल्पना
राज्यकारभार करणार होते होऊन इंदिरा
फुलण्याआधी मी सुकले जन्माआधी मी मेले
शिकून होणार होते मी थोर सावित्रीबाई
गर्भात मला मारून पाप का केले, आई ?

कन्या म्हणून केला अपमान
स्वर्गी मिळाला मला सन्मान
आई असते देवता असे म्हणालाय कुणीतरी
ममतेच्या दारी भेदभाव केला तू, आई
स्त्रीजन्माची का थांबवली पुण्याई ?
***

**शेख नजमा मैनुद्दीन**
**मु.पो. घानोरा, ता. आष्टी,**
**जि. बीड-४१४२०२**
**ई पत्ता : nadim939@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१३४९२२३**

## मराठी विचारधन

स्वत:चा विकास करा, ध्यानात ठेवा, गती आणि वाढ हीच जिवंतपानाची लक्षणे आहेत.
***

**स्वामी विवेकानंद**

कथा

## एक गोष्ट त्यांची पण

**भाग - १**

रात्रीचे दहा तरी वाजले असतील. ती वाट बघत होती, म्हणजे तशी एकटीच आली होती ती विमानतळावर, कुणाला तरी जवळच्या माणसाला "रिसीव" करायला . गर्दीत असूनही आज ती जर हरवली होती. खर तर इराला वाट पाहण्याचा कधीच कंटाळा नाही यायचा. एखादे पुस्तक, मासिक किंवा आजू बाजूच्या माणसांचे निरीक्षण हा तिचा छंद होता, त्यामुळे वेळ कसा घालवायचा हा प्रश्न तिला कधीच पडला नाही. पण आज मात्र वेळ पळत नव्हता अन विचार तर नाहीच नाही. आपण स्वत: का आलो आहे इथे ह्याचा विचार तिच्या मनातून जात नव्हता. खर तर, तिच्या मनात दुसरेच विचार हवे होते, थोडे हूर हूर लावणारे, लग्न अगदी काही दिवसांवर आले होते. पण.... इरा सतत घड्याळाकडे बघत होती, कोणत्या हि क्षणी तो बाहेर येईल, आपल्याला काय वाटेल त्याला पाहिल्यवर, हेच तिला झेपत नव्हते.

इराला कंटाळा आला आहे असे वाटे पर्यंतच..... तो आला. "इतक्या वर्षानंतर पण तो अजून तसाच, तेवढ्याच वयाचा कसा काय दिसू शकतो", ती स्वताशीच बोलली. “इरा”, त्याचा त्या उत्साही सादेने तिची विचार शृंखला तुटली. “अग ये इकडे तिकडे काय बघातीयेस. ओळख आहे ना, कशी गं तू अशी कायम आपल्याच नादात, तुझ्या पार्टनर ला पण अशीच पकवतेस का ग, आपल्यातच हरवून.”

आकाश बोलतच होता अन इराला काय बोलायचे, काय करायाचे तेच सुचत नव्हते आणि हा मात्र मधली सगळी वर्षे गायब करूनच आला होता जणू काही.

इराला त्याचा "पार्टनर" शब्द खटकला, तिच्या या आवडत्या पुस्तकावरून आकाश तिची खूप खेचत असे, आणि तुला दुसर्याच क्षणी त्यातलाच संदर्भ तिला आठवला "पाठीला पाठ लावून आलेली भावंडे "
"अहो बहिणाबाई, बघतच बसणार कि मला घरी पण नेणार आहेस ?"
"अरे, sorry एकदम बराच काही आठवले आणि काही सुचलास नाही रे, किती वर्षे झाली रे तुला बघून, चल लगेच निघूयात "

"तुला बरे पाठवले कि आई नि, स्वत: गाडी घेवून, लग्न दहा- पंधरा दिवसावर आलाय आणि, अर्थात तुझ्या

हट्टापुढे कुणाचे काय चालणार म्हणा, तशी पण तू आमची लाडोबा आहेस, कोण कोण डेरे दाखल झालाय ग ?, काही पण म्हण तू मस्त वाटती आहेस आता, आय मीन online दिसतेस त्या पेक्षा, मला खरच नाही वाटत आहे कि तू इतकी मोठी झालीयेस, मला अजून पण ती शाळेच्या गणवेश मधली आठवतेस गं. किती वर्षे गेली न उडून..... अत्तरासारखी"

इरा सफाईने गाडी चालवत होती, मुंबई - पुणे तिचा जणू रोजचा रस्ता होता. तिला असे वाटले कि तिला जी मधली वर्षे सतत डाचत आहेत, जाणवत आहेत, ती याची गावी नाहीतच जणू मुळे. कसे जमते ह्याला हे ? पण तो जे बोलतोय ते अगदी मनापासूनच, त्याला आत एक बाहेर एक जमलाच नाही मुळात आणि याच्या या प्रश्नांची काय उत्तरे देणार, घर तर पाहुण्यांनी भरलय, पण याच्यासाठी कुठे जागा आहे त्यामध्ये, कसे सांगायचे याला कि याची सोय कुठे केलेय ते. जावू दे आता नकोच काही बोलायला याबद्दल .
"अग तू काय मौन व्रत घेतले आहेस कि काय ?"
"अरे नाही , लक्ष जर traffic कडे होते, तू सांग कसा आहेस आणि प्रवास कसा झाला तुझा ? तुला भूक लागली असेल तर थांबू आपण, नाही तर मागे डब्या मध्ये लाडू आणि sandwitches आहेत घे न तू "
"लाडू, अरे वा आई नि केलेले दिसतात "
"नाही रे, मीच केलेत, बघ हा. काही झाले तुला तर तुझ्या जबाबदारी वर खा"
"बाप रे, असू असू दे तेवढी रिस्क घ्यायला काय हरकत आहे तुझ्या बद्दल,. तो जो सो called तुझा पार्टनर आहे ना निमिष नावाचा, त्याच्या रिस्क पुढे हे तर काहीच नाही.
"आकाश, तुला कानपिळीसाठी बोलवले आहे विसरू नको. तू झोप थोडा वेळ, पुणे आले कि उठवते तुला "
इरा नि मस्त पैकी आवडती गाणी लावली आणि आकाश थकला होता, कित्येक मैलांचे आणि वर्षांचे अंतर कापून तो आला होता, दमला होता, झोपून पण गेला. आणि मग इरा, समोर रस्ता, गाणी आणि सोबतीला असंख्य विचार. हा खरच आला, केवळ आपल्यासाठी, म्हंटले तर कसलाच पुढचा मागचा विचार न करता आणि एकीकडे फक्त माझाच विचार करून. का बोलावले मी याला, मला आत्ताच का गरज वाटली याची. खर तर मी जेव्हा जेव्हा अडखळले, गोंधळले तेव्हा तेव्हा हा होता. पण आता अस काहीच नाहीये, मी निमिषला स्वतः निवडलाय .

त्याला मी आणि आकाश किती वर्षे ओळखतोय, पूर्ण वेळ देवून, आणि विचार करून हे लग्न ठरलाय. तरी मला आकाश येईपर्यंत इतके बैचेन का वाटत होते, आणि आता तो आहे तर उगाचच मन भरून आलाय आणि जर बरे वाटतय.

.......अरेऐऐऐऐ
"इरा, लक्ष कुठाय, सावकाश चालव, कंटाळा आला असेल तर आपण थांबू पाच मिनिट. बाई साहेब लग्न आहे तुमचे विसरू नका आणि जर जमले तरी माझी पण काळजी करा"
"अरे सॉरी, परत नाही होणार असे, आणि नको थांबायला, पोचतच आलोय आपण, अजून अर्धा तास फार तर, तू झोप"
त्याने परत डोळे मिटले. तरी मन थोडेच झोपणार ते तर जागेच, किती विचारांचे काहूर माजले होते त्याच्या मनात. खर तर त्याला इतक्यात कुणा समोरच परत यायचे नव्हते, प्रश्न चुकवावे असे म्हणून नाही तर उत्तरे द्यायचा कंटाळा आला होता म्हणून.
'मी आलो आतासुद्धा केवळ या पोरीसाठी. किती माया आहे तिची आपल्यावर, आणि किती विश्वास. भावापेक्षा मैत्रीच नाते म्हणूनच अधिक घट्ट. पण आपल्या येण्यामुळे वातावरण गढूळ तर नाही न होणार. केवळ इराचे लग्न आहे म्हणून, हे प्रश्न निसटतील. जावू दे मी माझ्यापरीने प्रयत्न करीन कि लग्न घर अगदी आनंदी असेल, जसे असायला हवे तसाच.'
"बंधूराज, उठा !!! हम अपनी मंझील पोहोच गये ".
"हो ग, हा बघ मी जगच तर आहे "
"दादा, समान बाहेर काढू गाडीतून पटपट "
"अग इरे आपण इथे कुठे आलोय, म्हणजे आपण नवीन घर घेतलीये आणि तुम्ही लोकांनी साधे कळवले पण नाही मला "
"फार प्रश्न नको न विचारू, आधी वर तर चल"

इराला अजूनही कळत नव्हते कि याला कसे सांगायचे कि आपण कुठे आलोय ते. जे काय सुचेल ते बोलायचे इतकाच ठरवून तिने डोर बेल वाजवली. आणि आकाश त्याला वेगळाच tension कि दार कोण उघडेल, आई, बाबा कि आणि कुणी आणि समोर आल्यावर काय किती हि नाही म्हंटले गेल्या पाच वर्ष मध्ये कधीच समोर समोर येणे झालेच नव्हते. कधी तरी फोन बस. जे काही काल्याचे ते इरा कडूनच. दार उघडले, दारात निमिष "दोस्ता, वेलकम" असे म्हणून निमिषनि कडकडून मिठी मारली, आकाशाला. आकाश खडबडून जागा झाला आपल्याच विचारातूनच, आणि मग त्याच्या एकदम लक्षात आले कि दरवाज्यावर पाटी होती "इरा आणि निमिष" या नावांची
"काय रे निमिष, तुला खरच मी आल्याचा इतका आनंद झालाय, कि हा आनंद दुसरे कुणी तरी आहे माझ्यासोबत, म्हणून "
"बस काय आकाश, अरे आपली गाठ आधीची, हिच्याशी आता कुठे सूत जमलय. गाठी- गुंता व्हायला अजून वेळ आहे.
"चला, मग मी निघते रे भाव, तुमची युती आघाडी सगळे आहे तसे आहे, तेव्हा मी विरोधी पक्षात जायच्या आधी जाते."

"अग, इरा इतक्या उशिरा कुठे जातेस, आणि ती पण एकटी. थांब कि, का तुझा भावी नवरा काय चहा-कॉफी देतोय का बघू या कि."
"नको रे, घरी उगाच दंगा होईल उशिरा गेले तर, तुला तर माहीतच आहे. घर डोक्यावर घेतील सगळे जण. तू झोप इथे मस्त, आरामात राहा"
"म्हणजे मला वर पक्षात ढकलेले दिसतंय, काय दिवस आले आहेत, बघ बाबा निम्या तूच "
"दादू...प्लीज...",
"इरा , अग गम्मत केली मी , लगेच असे डोळ्यात पाणी काय आणि तसाही तुझेच घर आहे न आहे मग मी राहीन निवांत आणि तुझ्या या भावी नवऱ्यावर लक्ष पण ठेवीन जा तू सावकाश आणि ए ठोम्ब्या जा तिला सोडून ये खाली"
"दादा, उद्या दुपारी जेवायला भेटू, मी सकाळी फोन करते. गुड नाईट"
आकाश घर पाहत होता. त्याची आणि इराची आवड निवड किती सारखी होती. दोघांकडे असलेली सौन्दर्य दृष्टीसुद्धा सारखीच असावी याचे त्याला खूप कौतुक वाटत होत. तेवढ्यात निमिष परत आला.
"खूप बोलायचे आहे रे तुझ्याशी आकाश, तुझ्या या लाडक्या बहिणाला लग्नासाठी तयार करायला फार कष्ट घ्यावे लागले
“बाबा मला, शेवटी तूच धावून आलास देवासारखा”,
"मग काय करणार , तुम्ही दोघे असे हट्टी, मला लक्ष घालावाच लागले. अरे पण तू एकटाच कसा इथे, काका काकू नाही आलेत का इथे अजून ?"
"येणार आहेत रे, उद्या भेटतीलच आपल्याला, आता झोपू आपण. तुझी रूम तुझ्या बहिणीने छान सजवलीये. गुड नाईट"
आकाश खूप थकला होता आणि म्हणूनच त्याला गाढ झोप लागली.
"ओ भाऊराया , आता उठता का आपण, सुर्व्या आल्या डोईवर"
"उठतो गं आक्का, पाच मिनिट"
आकाशला वाटले कि हि बया खरच आलीये कि स्वप्न पडलाय आपल्याला, म्हणून त्याने डोळे उघडले, तर समोर कुणीच नाही. अधून मधून हे असे स्वप्न पडायचे त्याला.

**भाग -२**

आपल्याला अशी अधून मधून स्वप्न पडतात, आणि कदाचित आपल्याला आवडतात सुद्धा. थोडेसे झोपेतच त्याच्या मनात हे विचार येत होते. आकाश स्वप्नाळू कधीच नव्हता, पण हि अशी स्वप्ने त्याला आज काल आवडायची. आपण एकटे नाही आणि आपली काळजी करणारे आपल्या जीव भावाची व्यक्ती आहे याची जाणीवच होती ती. हे स्वप्न आहे कि सत्य ? पण डोळ्यांवर ची झोप अधिक प्रभावी ठरली आणि जागा झालेला आकाश झोपी गेला. इरा खरच आली होती का ? कि परत केवळ स्वप्न आणि भास ? अंदाजे २ तास तरी झाले असतील, आकाशाला जाग आली; म्हणजे अजूनही नुसताच पडून राहावे असे त्याला वाटत होते. इरा नि येवून उठवावे आणि आपले स्वप्न खरे असावे अस हि त्याला वाटत होते, पण.... तो उठला, आजूबाजूला नजर फिरवली आणि एकदम प्रसन्न वाटले त्याला, घरी आल्यासारखे. काल गडबडीत त्यानी आपली खोली निवांत पहिलीच नव्हती. आता पहिली आणि स्वताशीच हसला तो. आपल्या सगळ्या छोट्या छोट्या आवडी निवडी किती जपल्या आहेत या पोरीने. खोलीची रंगसंगती, चादरीचे रंग इथपासून ते अगदी, अरेच्चा, निशिगंध आणि गुलाबाची फुले सुद्धा आहेत कि इथे फुलदाणीत. खर तर "फ्लॉवर पॉट म्हण्याचे होते मला, पण इरा आठवली, इथे असती तर म्हणाली असती काय रे मराठी वापरायची लाज वाटते कि काय आता तुला. आकाशचे अलीकडे असच होत होते, सगळे संवाद स्वताशीच , विचारांच्या गर्दीत तो एकटाच, आकाश आवरून बाहेर आला
"शुभ प्रभात निमिष"
"काय रे आकाश, सकाळी सकाळी इरा चढली का तुला, शुभ प्रभात वगैरे "
"ए , पण ती आली होती का रे सकाळी "
"नाही "
"नक्की ?"
"हो आकाश, पण तू असे का विचारतो आहेस"
"इरा नक्की आली होती, या वेळी भास नाही, खर होते ते. प्लीज, सांग ना "
"पण तुला असे का वाटतय, कि इरा आली होती"
"हे बघ, मला निशिगंध आणि गुलाब किती आवडतो ते तिला माहितीये आणि रात्री ती फुले खोलीत नव्हती आणि आता आहेत. "
"शाब्बास, व्योमकेश बक्षी, अजून तुम्ही हुशारी टिकवून आहात तर "
"म्हणजे इरा आली होती न, मग कुठाय आणि मला न उठवता का गेली ?"
"अरे हो हो, गेलीये पण येणारे, अर्ध्या तासात येते म्हणाली. आणि ब्रेकफास्ट, म्हणजे न्याहारी एकत्र करू म्हणाली. बघ ना, तुमच्या दादा-ताईच्या प्रेमात मला उपाशी ठेवलाय, जाऊ दे चहा घेणार न तू, मी करतो एकदम सुंदर पैकी चहा आणि मग देतो तुला सुंदर पैकी कपातून"
"अरे चहा तर पाहिजेच, आणि काय रे अजून हे सुंदर पैकीच वेड आहेच वाटते, आणि ए कम ऑन तू आणि सकाळपासून उपाशी, थापा नको मारू आता, लग्न दहा दिवसावर आहे, सुधारा आता"

"अरे म्हणजे काय खास नाही पण खाल्लाय जर आपले उगाच एवढस, खाली जावून, इडली सांबर, वडा पाव, एक पोहे आणि दोन चहा आणि आणि  काही नाही, बस तू मी आलोच आपला चहा घेवून"

"वाह, निमिष, तू अगदी गृह कर्तव्य दक्ष झाला आहेस हा, चहा एकदम फक्कड, अगदी मला हवा तसा"

"काय करणार बाबा, तुझ्या बहिणीशी संसार करायचा आहे. तुला गम्मत सांगू, ती खूप आनंदात आहे रे तू आलास म्हणून. मला दहा वेळा बजावून गेली कि तुला कसा चहा आवडतो ते, पार पकलो मी पण मला छान वाटत होते कि या सगळ्या घडामोडी नंतर हि तुम्ही दोघे मात्र अजून हि तितकेच जवळ आहात. कदाचित जास्तच. मजा  सांगू तू येणार म्हणून तिने आलं , चहा मसाला  आणि चहाची  गवती पात सुद्धा आणून ठेवलीये घरात. मला म्हणाली त्याला चहा करून दे बाकी काय हवे नको बघ, तिकडे सगळे स्वत:च करतो. आणि तिने पाण्याचा माठ भरून ठेवलाय  काल, आणि त्यात वाळा आणि मोगऱ्याची फुले सुद्धा टाकली आहेत, तुला आवडतात म्हणून. मला तर वाटते, त्या बायका नवरासाठी कसे हरतालिका, वट-सावित्री वगैरे करतात न तसे अशी बहिण  मिळायला तू काही तरी व्रत केले असशील "

"हो खर आहे हे. फार जीव आहे रे तिचा माझ्या आणि माझा सुद्धा तिच्यावर. आता तुला सोपवातोय तिला, म्हणजे काळजीच नाही.  खरच , मला कळतंय रे, मी आलोय म्हणून ती खुश तर आहेच, पण मला इथे, आमच्या घरात  नसून सुद्धा, घरी आल्याचे सुख मिळावे म्हणून झटतीय ती. मला कळतंय कि मला इथे राहा असे सांगण्यात तिला खूप मनस्ताप होतोय, पण मी बोलेन तिच्याशी. I am comfortable here and she should not worry about it. She should enjoy these days and my stay in India. anyways whats plan for today "

"अरे,  राहा रे माझ्यासोबत मजेत.  आपण पण किती वर्षात असे निवांत नाही भेटलोय, आणि माझ्या इथे तरी कोण आहे रे! आई-बाबा कधी येतील काय माहित, आज- उद्या असे त्यांचे सुरु आहे. जवळच आहे येतो वगैरे वगिरे आणि भावंडे काय आहेत पण आणि नाहीत पण.  मी पण जाम खुशीत आहे रे, आणि खरे सांगू दु:ख एकट्यानं जगू शकतो रे, पण आनंद वाटून घेणारे कुणी नसेल न तर बाकी काही उरत नाही मग, आनंद सुद्धा.  जावू दे. साला बघ तू आलास न बृहस्पती कि हे असे होते तत्वज्ञान वगैरे वगैरे. पण हे बृहस्पती, हे ऋषिवर आपण स्नान करून घ्यावे. तो पर्यंत कुमारी इरावती आपली न्याहारी घेवून प्रवेश करेलच. तूर्तास आपण स्नानगृहा कडे प्रस्थान करावे आणि मी आपल्या बल्लावला दुपारच्या भोजनाच्या सूचना देवून येतो"

आकाश  हसत हसतच आता गेला, निमिष काही तरी बारीक सारीक कामात होता, तेवढ्यात फोन ची रिंग वाजली

"निमिष, इरा बोलतीय "

"कळले ग, खास रिंगटोन ठेवलाय तुझ्यासाठी, रडक्या बाळाचा,  हि हि"

"ए, नेहमी नेहमी काय रे तेच तेच विनोद, इकडे  राडा झालाय आणि मी जाम  कातावालीये"

"अग हो, हो जर थंड हो.  काय झाले ते सांग"

"अरे यार, ह्यांनी केळवणंची आमंत्रण घेवून ठेवली आहेत, तरी मी सांगितले होते कि जे काय असेल ते आकाश यायच्या आता संपवा. आधी त्याला तुझ्या कडे उतरवलाय, त्यात आम्ही त्याला सोडून हे असे  जायचे, केळवण खात फिरायचे, कसा तरीच वाटतय रे. तो पण  आमचा आहे कि. त्याला इकडे बोलावून मी काय केलाय चांगले कि वाईट, म्हणजे त्याला आनंद वाटतोय कि त्रास होतंय हेच कळत नाहीये रे "

"इरा, शांत हो आणि तू जा, मी  आकाश ला घेवून बाहेर जातो, ब्रेकफास्ट करतो, एक काम करीन आमच्या एक दोन दोस्ताना पण बोलावतो म्हणजे बेस्ट. आणि त्याला सांगेन मी कि तुला आता यायला जमत नाहीये"

"बरे, तू म्हणतोयेस तर तसच करु. मी दुपारी जेवण झाले कि येते. आपण चार वाजता बाहेर पडू. चल ठेवते आता"

"हो, काळजी घे, आणि शांतपणे  घे"

इराला, आता से वाटत होते कि आकाश ला इकडे येवून खरच आनंदी आहे न ?

"इरा, आटप लवकर"

"हो, आलेच आई, पाच मिनिट"

इराचे घर पाहुण्यांनी भरले होते.   घर माणसांनी, आनंदानी आणि वेगवेगळ्या सुगंधानी भरलेले, फुलांच्या, अत्तरांच्या, तोरणाच्या, होमाच्या, आणि वेगवेगळ्या गोड तिखट तळपच्या वासानी. फक्त एक गंध तिथे उणा  होता, राखीचा, भाऊबिजेच्या औक्षणाचा. पण इरानि आई बाबांना सांगितले कि होते कि आकाश येयील आणि काही जबाबदाऱ्या तोच पार पाडेल. खर तर घरच्यांनी पण तो आला तर हवाच होता, पण पाच वर्षात भेट नाही म्हणून कुणालाच अवघड वाटायला नको म्हणून त्याने सध्या तरी निमिषकडे राहावे असे आई ला वाटत होते. तिने इराला काल  पासून शंभर वेळा तरी, कळत नकळत त्याच्याबद्दल विचारले होते. इराला पण ते जाणवले, पण उघडपणे आई बाबा दोघे पण बोलणार नाहीत हे हि तुला ठावूक होते

"इरा, अग  काय कुठे हरवली आहेस, पोचलो कि आपण. "

"काही नाही बाबा असच. आकाश आला आहे काल"

"हो माहितीये, आम्हाला. पण ग आता त्याला बोलवणे खरच शक्य नाहीये बेटा"

"शक्य आहे, पण तुम्हालाच नकोय. जावू दे. ठरल्या प्रमाणे मी संध्याकाळी त्याच्या सोबत खरेदी ला आणि मेनू ठरवायला जाणारे आहे. ती जबाबदारी त्याला द्यायची असे ठरलाय न आपले. तुम्ही येतंय का ? बघा  जमले तर. कमीत कमी मेनू ठरवायला तरी या "
"बघू, आता तर आता चल, आणि जास्त विचार नको करू, फक्त आनंदी राहा "
"आकाश शिवाय,  आनंदी, हं "- इरा
आता नेहमी प्रमाणे आईला मध्ये पडावेच लागले.
"इरा, बास  आता,   हा विषय इथेच बंद कर. आकाश तुझा भाऊ आहे आणि आमचा कुणीच नाही का ? पण आता हि वेळ नाहीये. आपण घरी गेल्यावर बोलू. रागावू नको ग, पण तुझ्या कडे आता लोक आता तुझ्याकडे  नवरी म्हणून बघतात, मग तू पण छान आनंदी असायला नको का? बर तुझ्या मर्जीने तुझ्या आवडत्या माणसाशी लग्न होतंय आणि तुला हवे तसे आकाश  पण आलाच आहे कि आता."
"ह, कळतंय मला, चल आता  आई "

इराला वाटत होते कि निमिष नि काय सांगितलाय आकाशला काय माहित. इकडे निमिष च्या घरात,
"आकाश, चल रे आपण बाहेर खावून येवू माझी एक दोन काम पण करायची आहेत ती पण करू"-निमिष
"अरे पण, इरा ?"
"तिला कळवले आहे मी. ती दुपारी ४ वाजता येयील आता ,"
'बर, चल मग "

आकाश आणि निमिष बाहेर पडले. आकाश आजूबाजूला पाहत होता. ७ वर्षात बराच फरक पडला आहे कि शहरात पण. जाता जाता त्याला बरेच परिचित आणि खूप सारे अपरिचित अश्या खुणा दिसत होत्या. आणि इतक्यात त्याला ती,  दिसली तीच हि बाग, आणि त्याला एकदम आठवले , असे वाटले कि इरा  आहे त्या झोपाळ्यावर.  त्याचे लक्ष जर इकडे तिकडे झाले आणि "इरा आआआ…."  आकाश जोरात ओरडला, तेव्हाच नाही आता सुद्धा.

**<u>भाग तीन</u>**

"आकाश, अरे काय झाले. इरा कुठे दिसली का तुला ? आणि इतका का घाबरून ओरडत आहेस ? काय झाले काय ?, पाणी पी थोड, तुझ्या शेजारी आहे बघ बाटली"
"सॉरी, अरे काही नाही असच, असे वाटली कि इरा पडतीये खाली जोरात आणि मी पोचेपर्यंत …।"-निमिष
"अरे, तू इतका आणि तो पण असा विचार नको करू, आणि मध्येच कुठे इरा पडतीये वगैरे, लहान आहे का ती आत्ता. आणि हो माझ्या प्रेमात पडलीये आणि आता संसारात पडतीये म्हणून ओरडत असशील तर इराआआ---- ऐवजी आकाश सांभाळ असे तरी ओरड. पण खर संग न काय झाले कारण माझ्या पीजेवर पण हसत नाहीयेस मनापसून, बैचैन का आहेस ?"
"काही नाही दुल्हे बाबू, आपण  थांबलो खायला कि सांगतो "
"अरे पोचलोच कि आपण, मस्त पैकी मिसळ चापू आधी, मग ठरवू next काय ते "

आकाश आणि निमिष गाडीतून उतरले.  खर तर निमिषला जाणवले कि काही तरी बिनसले पण नक्की काय ते  कळत नव्हते. अशी काय आहेत हि बहिण भावंडे, इरा पडतीये ह्या कल्पनेने पण हा केवढा बैचेन आहे, नाही तर आमचे भाऊ  खरेदी ला या म्हंटले तर आता वेळ नाही, मग वेळ नाही, तरी बरी नुसते खरेदीला मदत करायला यायचं, पैसे नाही खर्च कारयाचे आहेत. आकाशला विचारायला पाहिजे काय झाले ते? इतक्या वर्षांनी आलाय, थोडे मन मोकळे झाले तर त्यालाच बरे वाटेल
"आकाश, आता सांग  कि मगाशी काय झाले ते"
"काही विशेष नाही रे, ती दिसली"
"कोण ??????, म्हणजे तुझ्या इतक्या मैत्रिणी होत्या  त्यातली कोण ?"
"काय रे तू पण, ती म्हणजे ती बाग. आम्ही जुन्या घरी राहायचो तेव्हा नाही का आपण सगळे जायचो ती".
"आपण सगळे, नक्की न… खर तर आकाश, तू बागेत जायचास तुझ्या लाडक्या बहिणीसाठी आणि म्हणून आम्हाला खेळायला तिथे बोलावायाचास आणि यायलाच लागयाचे, कारण  क्रिकेट चे किट, badminton ची राकेट हे सगळे तुझ्या कडेच होते न, बर ते जावू दे. बाग बघून ओरडलास? "
"तुला आठवते का रे निमिष, एकदा इरा झोपल्या वरून पडली होती त्या बागेत "
"हो, म्हणजे अंधुकसे आठवतोय, आपण जाम  घाबरलो होते, आणि तिला तुमच्या दवाखान्यात नेले होते. काका  ओरडले होते आपल्याला, 'लक्ष कुठे असते तुमचे आणि लक्ष देत येत नसेल तर तिला अजिबात नेऊ नका वगिरे वगिरे"
"हो, अगदी बरोबर, अंधुक काय, स्पष्ट आठवतंय कि तुला"
"पण आकाश इतक्या वर्षांनी का आठवले तुला, आणि आठवले तरी इतके घाबरायला काय झाले आता?, आणि तेव्हा पण काही फार लागले नव्हते "
'हो, फक्त चार टाकेच तर पडलेत, आणि सगळी लहान मुले अशी एकदा तरी पडतातच, त्यात काय इतके, इट्स ओके, अस आईनी ऐकवले रे मला. पण माझ्यासाठी ते चा------र टाके होते. तुला आठवतंय का कि आपण दवखान्यात  घेवून गेलो,  तेव्हा ती किती रडत होती आणि माझा शर्ट रक्ताने भिजला होता. अजून हि आठवते मला. आता विषय निघालाच

आहे म्हणून सांगतो, लहान पाणीच्या काही काही आठवणी आपल्या पिच्छा सोडत नाही त्यातलीच हि एक. मला अह्जूनही असाच स्वप्न पडते कि इरा पडतीय आणि तिला वाचवायला कुणीच नाहीये आणि मी तिच्या पर्यंत पोचू शकत नाहीये"

"अरे आकाश, असे काय करतो? , आता किती वर्षे झाली त्या घटनेला आणि मला अजून हि कळत नाहीये कि त्याचा इतका का परिणाम झालाय तुझ्यावर. म्हणजे आपल्या प्रत्येकच्या आयुष्यात असे असतच कि कधी तरी किंवा आपली भावंडे पडलीये, त्यांना लागलाय किंवा खूप आजारी पडलीत, अगदी तू सुधा पडला होतास कि, हात मोडला होता तुझा, ते विसरलास? त्या मानाने इराला काहीच लागले नव्हते रे"

"हो, खरय. ए तुला आठवतंय का रे निमिष, माझा हात मोडला होता तेव्हा मी इयत्ता ९ मध्ये असेन आणि इरा असेल चौथी मध्ये, पण रोज माझे दप्तर कार पर्यंत स्वत : घायची, पेलायचे नाही तरी. रोज डबा खायला पण आपल्या सोबत यायची, आणि रोज हट्ट करायची कि दादू मीच तुला भरवणार. खर सांगू तुम्ही सगळे खूप चेष्टा करायचा माझी, पण मला कधीच फिकीर नाही वाटली त्याची. का सांगू, कारण आजी नंतर तसे मला कुणीच प्रेमाने भरवले नाही रे, म्हणजे आई कधी तरी असायची पण ती तरी काय करणार, हॉस्पिटल, कॅम्पस या सगळ्यातून वेळच कमी मिळायचा. इरा माझी बहिण नाही, तर माझे कुटुंब आहे रे"

"ते सगळे खरय मित्रा, मला माहितीये आणि जाणवलंय सुद्धा आणि म्हणूच इतक्या गोड मुलीशी मला आयुष्यभर एकत्र जगायचं. फार जीव लावते यार हि. पण इराच्या पडण्याचा अजुनही इतका प्रभाव का आहे तुझ्यावर ते सांग. विषय बदलू नको. म्हणजे त्या हि पेक्षा किती तरी अश्या गोष्टी आयुष्यात कळल्या आहेत तुला, ज्याने तू असा अस्वस्थ झालास तर मी समजू शकतो "

"विचारतोच आहेस तू निमिष म्हणून सांगतो , कदाचित तुझा पण दृष्ट्कोन कळेल मला. आपण दवाखान्यात गेलो इराला घेवून तेव्हा, मी तर घाबरलो होतोच, पण इरा पण घाबरली होती आणि नेमके त्या दिवशीच आई, बाबा दोघे पण दवाखान्यात नव्हते , कॅम्पसाठी जवळ असणाऱ्या एका खेड्यात गेले होते आणि आजीपण बाहेर गावी गेली होती. टाके सुद्धा विनीता मावशीने घातले. मी आई ला फोन केला होता रे निरोप द्यायला, तेव्हा काय मोबाईल नव्हते, पण तिला निरोप मिळाला होता. ती विनीता मावशी सोबत बोलली आणि मग निरोप दिला कि संध्याकाळपर्यंत पोचतेच आहे म्हणून. आमचच हॉस्पीटल त्यामुळे सगळ्यांनी सांभाळून घेतले रे. घरात काय आमचे नोकर चाकर असायचेच सोबतीला. म्हणजे घराच्या सारखेच होते, पण मला वाटत होते कि हातातली सगळी कामे टाकून आई नि लगेच यावे आणि इराला कुशीत घेवून विचारावे कि कशी आहेस बाळा, घाबरू नकोश वगैरे. आई आली म्हणजे तशी लवकर आली. इराला जवळ पण घेतले आणि मला ओरडली पण नाही, पण इतकच म्हणाली, 'तुला इराची जबाबदारी घायची असेल तर घे नाही तर आम्ही आहोतच कि काही तरी व्यवस्था करू, बाकी काही नाही पोरीला काही झाले तर' तिच्या स्वरात काळजी होते रे, पण काही तरी नव्हते. एखाद्या दिवशी बघ भाजीत सगळे घातले तरी चव येत नाही आणि काय राहालीये ते पण काळत नाही, असे काही तरी वाटले मला. मग काय बाबा आले आणि शाळा घेतली आमच्या दोघांची, इराची पण. इरा, आणि मी आजीच्या खोलीत झोपणार होतो त्या दिवशी कारण ती खालच्या मजल्यावर होती. मला उगाच वाटले कि आई पण इरा सोबत झोपेल, पण तिला काही तरी काम होते म्हणे, कसले तरी रिसर्चचे. मला काय वाटले कुणास ठाऊक, पण मी आईला म्हणालो, कि थांब न आजच्या रात्री इथेच. कदाचित इरा उठली तर, तिला तूच हवी असशील आणि तुला तरी झोप लागणार आहे का ? काय आहे ते काम इथेच कर, दिवा सुरु राहिला तरी चालेल आम्हाला तसे आई नि काही आढे वेढे घेतले नाहीत, ती थाबली, रात्री बराच वेळ जागी होती, मध्ये मध्ये उठून इरा कडे पाहत पण होती. सगळे होते पण तरी हि, माहित नाही, असे वाटले कि काही तरी नाहीये या सगळ्यात, काळजी आहे, जबाबदारी आहे, प्रेम?, प्रेम सुद्धा आहे पण आई ची माया थोडी आटली आहे का ? म्हणजे आई वाईट नाहीये, पण आज आता ती इराची आई नाही तर पालक वाटतीये. कदाचित दिवसभर दमली असेल, आणि इतके काही जास्त लागले पण नाहीये, त्यात आई डॉक्टर म्हणजे तिला खरच किती लागलाय हे कळते ना म्हणून पण कदाचित ती ..., "

"अरे, हो आकाश पण तरी हे सगळे तुझे विचारच ना आणि तुला नक्की काय खटकले, आई लवकर आली नाही हे का ?"

"नाही, ती कामात होती आणि इरा वर उपचार झाले होते आणि आजच्या इतकी दळण वळणाची साधने पण नवती नव्हती तेव्हा. त्यामुळे ती या पेक्षा लवकर येवूच शकली नसती आणि ती विनिता मावशी सोबत दोन वेळा बोलली पण होती. मला काय खटकल माहितीये "पोरीला काही झाले तर ", मधला काळजीचा स्वर, काही तरी वेगळा होता, संकटात पडल्या सारखा आणि तिचे आपणहून रात्री न थांबणे. मी म्हंटल्यावर लगेच थांबली ती, म्हणजे तिने तसे इराला झोपवले होते, पण तिने आपणहून थांबायला हवे होते. तेव्हा पासून मला पक्के डोक्यात बसले कि आता इरा माझी जबाबदारी आहे, तिच्यासाठी कुणी थांबो अथवा न थांबो, मी आहे, माझ्या इरासाठी. नेहमीच त्या घटनेने मला ह्याची जाणीव दिली म्हण किंवा त्या एका प्रसंगात माझे आणि इराचे नाते बदलले असे म्हण, म्हणूच कदाचित आता इतके सगळी स्पष्टीकरणे

मिळूनसुद्धा हि ती घटना माझ्या मनात पक्की बसली आहे. कधी कधी हातातून काही निसटते आहे असे वाटले कि मला असाच स्वप्न पडते. आता कारण म्हणजे ती बाग इतकाच. जावू दे आपण फारच गंभीर विषयाकडे वळलो, पण तू विचारलास मला बरे वाटले. कधी कधी प्रश्नाची उत्तरे मिळाली कि नवीनच प्रश्न समोर येतात, आणि उत्तरे बरोबर असून हि पटत नाहीत. "

"मित्रा, काळजी नको करू, मी तुझ्या इराला कधीच दुखावणार नाही, जरा भावूक झालोय म्हणून सांगतो, विश्वास ठेव "

"अरे ए आकाश, भावूक हो तू, पण एक लक्षात ठेव, दहेज मे हम आ रहे है. मी काळजी घेईन असे म्हणून मला कटवु नको, कट करून "

"नाही रे, तुला न कटवता, मिसळीचा कट मागवतो "

"अरे, दुपारी कुठे जायचं रे आकाश"

"मेनू ठरवायला, अरे तोच नेहमीचा हॉल, तुझ्यावेळी ठरवले होते कि तेच रे...I am sorry, चुकून बोललो कि तुझ्या वेळी असे"

"असू दे रे, बित गायी बात गयी, आणि असे काही नाही. इरानि सांगितलं मला कि लग्न केले आहे तिने..."

"इरा म्हणजे न, अवघड आहे, मी म्हंटले होते तिला कि आकाश ला काही बोलू नकोस. तू आधीच तिकडे एकटा, त्यात उगाच पुन्हा जुन्या आठवणी त्यापाणु कटू आठवणींना उजाळा कशाला द्या "

"नाही रे, इतके काही नाही वाटत मला, आणि तसे पण जो काही निर्णय आम्ही दोघांनी घेतले त्याचे वैषम्य नाही आहे मला. जे झाले ते योग्यच होते. माझे आणि तिचे आयुष्य एकत्र कधीच सुखाचे झाले नसते. न माझ्या, न तिच्या आणि ना ... कुणाच्याच. आई आणि बाबांना खूप मनस्ताप झाला, त्यांना मला समजून घेणे तेव्हा पण जमले नाही आणि आता पण त्यांच्या आवाक्या बाहेरचे आहे सगळे. आणि इराची तेव्हा पासून कसरत सुरु झाली, आई बाबा आणि मी अशी नात्यांची तारांबळ."

"अरे पण, तिला पण नकोच होते हे लग्न, नाही तर तिने परत कशाला लग्न केले असते, ते पण प्रेम बिमात पडून. आणि मग आता काका काकुना काय प्रोब्लेम आहे, हे तर माहितीये न कि तू काय फक्त एक मार्गी लग्न मोडायचा निर्णय घेतला नव्हतास "

"निमिष, फक्त ते आणि तितकाच कारण असते तर मग कशाला, आमच्या या नात्याला खूप कंगोरे आहेत आणि म्हणूच गुंता पण मोठा आहे. लग्नासाठी नकार किंवा त्याची करणे हे आणि इतकाच आमच्यातल्या तणावाचा कारण आहे असे वाटते तुला. खूप वर्षापासून हा तणाव होता आमच्यात, हे एक निम्मित झाले फक्त कि तो तुम्हा सगळ्या समोर आला. असे बराच काही आहे अजून. जावू दे, परत गंभीर विषय नको आणि मला पण एन्जॉय करायचे आहे तुमचे लग्न. मी त्या साठी आलोय न इथे आणि तसाही तू फार वेळ गंभीर संभाषण करू नाही शकणार. आता आपण तुझ्या भाषेत 'सुंदर पैकी चहा घावू आणि सुंदर पैकी तुझी काम उरकू"

"अरे म्हणजे काय अति महत्वाची कामे आहेत, माझे shopping राहिलंय अजून, साला कुणाला वेळच नाही यार. बरे झाले तू आलास, आता तुलाच राबवतो "

"रोजगार हमी योजनेवर आल्यासारखे वाटतय मला. फ़ोरेन रिटर्न वेठ बीगार. पण निमिष, कमीत कमी तुझ्या आई बाबा न तर घेवू यात न बरोबर जाताजाता "

"ते काही तरी वेगळ्या गडबडीत असतील, हा होम ते हवन. यांना पत्रिका द्यायची, आमंत्रणे बाकी आहेत वगैरे"

"अरे पण विचारू तर खरे, मी विचारले तर नक्की येतील बघ. आणि काकुनी काय लाडू बीडू बनवालते त्याची चव पण चाखता येईल "

"मग चल, तसाही आई नि काल पासून १०० वेळा तरी मला सांगितले आहे आकाश ला काय हवे नको ते बघ आणि त्याच्या सोबत घरी एखादी चक्कर टाक म्हणून "

"चल मग, म्हणजे वेळेत काम करु नाही तर ती आमची बया ४ म्हणजे ४ ला हजर होईल आणि माझे डोके खाईल "

"ए थांब निमिष, इराला फोन करतो, जरा गम्मत, कश्यावर ताव मारतिये ते तर कळेल...लागला फोन,

ए काय ग काय खातीयेस तरी काय ? इकडे आम्हाला सोडून, माझा नाही भावाचा तरी विचार करायचास"

"अरे ए , निमिष आधी फोने वर हेलो तरी म्हणत जा, लगेच काय चौकश्या, फोन कुणी पण उचलू शकतो. आणि फालतू गप्पा नको, काही काम असेल तर सांग, मी आता विनीत मावशीकडे खाण्यात बीझी आहे, कळले. आणि काम नसेल तर ठेव फोन, नाही तर मीच ठेवते ?"

"काय ग इरा, निमिषचा फोन वाटते, अग मी त्याला पण घेवून ये म्हणाले होते "- विनिता मावशी

"नको ग, त्याला कशाला, नंतर आहेच कि मग लग्न नंतर. सारखे त्याचेच कौतुक करता मग तुम्ही लोक. दहीवडे मस्त झालेत एकदम "

"आकशाला पण खूप आवडतात न ग, खर तर म्हणून केले. उगचाच वाटले कि तो पण येयील आणि म्हणून चौघांच्या आवडीचे पदार्थ केले न मी. तो एकटाच चुकला बघ. येणार आहे का नाही तो ? आता तुझे लग्न म्हणजे येणारच म्हणा, पण आज चुकला बघ "- विनीता

"मावशी, तू घरचीच आहेस, म्हणून खोटे नाही बोलत, तो कालच आला आहे "

"इरा......"- इराची आई

"ए बोलू दे ग तिला. बोल ग इरा तू. कधी आलाय आकाश आणि त्याला का नाही आणलस मग, तो काय परका आहे का? आणि त्याला माझ्या कडे आणायला काय प्रोब्लेम आहे. तुला माहितीये न कि मला तुम्ही दोघे मुलासारखेच आहेत आणि तू नुसते सांगितलास असतास न तर माझ्या आमंत्रणाची वाट पण पहिली नसती त्याने आणि आईला घाबरता का तुम्ही अजून पण. ती काय म्हणाली असती तर मी सांगितले असते का ते. तुम्ही चौघे आहात तिघे नाहीत कुटुंब म्हणून किती वेळा सांगितलाय मी तिला. जावू दे बेटा, त्याला सांग येवून जायला, जमेल तसे"

"अग मावशी, तो आला असता ग. पण काल रात्री उशिरा आलो न, आणि आज आकाश आणि त्यांचे मित्र भेटणार होते कोण कोण म्हणून मीच नाही आणले त्याला. आई बाबाचे काही नाही ग तसे "

"असो, या निम्मितने का होईना, तो घरी आलाय, बरे वाटले. बर मी त्याच्यासाठी न देते सगळे थोडे थोडे डब्यातून, तू घेवून जा हा"

इरा विचारात होती कि मावशीला जर आकाश यावासा वाटला तर आई बाबा का नाही म्हणले. मावशी काही आमची नातेवाईक नाही पण खूप जवळची आहे. मला आणि आकशाला तिने लहान पण पासुन पाहिलये, मग ती जर आकाशला माफ करू शकते तर आई बाबा का नाही ? कधी तरी मला जमेल का मला हे सगळे परत पहिल्या सारखे करायला? लहानपणी एकदा चित्र काढायला घेतले आणि मधेच जर खोडले न तर असे वाटायचे कधी कधी कि पहिलाच चांगले आले होते, आता परत तसच काही जमायाचे नाही, तेव्हा आजी म्हणायची, कि बाळा चिडचिड करू नको, थोडा वेळ काहीच करू नकोस आणि मग परत नवी सुरवात कर. तसा अजून थोडा वेळ देवून नवीन सुरवात करावी लागणर का मला ?, आकाश-इरा आणि आई-बाबा अश्या समांतर रेषा झालाय आहेत जणू, एकाच प्रतलात कधीच न मिळणाऱ्या ...

"इरा, काय करायचं, तू खरच आकाश ला डबा देवून येतेस का ? आम्ही जातो घरी "- आई

"नको, उगाच हेलपाटा मला, तसे हि आपण त्याला सांगितले नव्हते आणि आत उगाच कशाला ?"

"पण मावशीनी इतका प्रेमाने दिलाय आणि त्याला आवडतात न ग …………" - आई

"मग तूच नेउन दे न, इतके प्रेम उफाळून आलाय तर "

"इरा, बेटा, प्लीज, तू तरी l जावू दे, मी सांगतीये न तू देवून ये आणि तसा हि आम्ही तुला पण ऐन वेळी संगितले न हे केळवणं चे मग, त्याला पण तसाच सांग ."

"ठीक आहे, निघा तुम्ही, मी दादू कडे जाऊन येते "

इरा पोचली, हे दोघे अजून आलेले दिसत नाहीयेत, फोन करून यायला हवे होते. जावू दे किल्ली तर आहे, डबा ठेवून, message करते. इराने दार उघडले, फ्रीज उगडून त्यात डबा ठेवला आणि ती आकाशाच्या खोलीत गेली. खोली आवरलेली होती, काही वस्तू मात्र काढून ठेवल्या होत्या. आकाशानी सगळ्यासाठी गिफ्ट आणल्या होत्या. हा असा कसा आहे इतका कुल!!!! लहानपणापासून असाच आहे, इकडे आग लागली तरी हा असाच शांत. बर्फ पण कमी थंड असेल. मी याच्या जागी असते तर, आई बाबांकडे येवून सरळ कचकचा भांडले असते.

इतक्यात तिला दार उघडल्याचा आवाज आला आणि गम्मत करावी म्हणून ती आवाज न करता तशीच थांबली.

"निमिष प्लीज, हे बघ जे झाले ते झाले, आता उगच इराला यातले काही सांगू नकोस, ती बिचारी आधीच किती वैतागली आहे, हि कसरत करताना. मला उगाच आलो असे वाटते, तुमचा एवढा आनंदाचा काळ आणि हा नात्यांचा ताण. आता तिला हे काही सांगू नकोस "

"काय सांगायचे नाहीये मला आकाश ?",- इरा न राहवून आतून बाहेर आली.

**भाग ४**

"काही नाही ग, आमचे गुपित आहे ते "- निमिष

"पण ते माझ्या बद्दल, म्हणजे माझे नाव आले तुम्ही बोलताना. मला कळलच पहिजे "- इरा

"बर बाई, सांगतो. अग, आकाश मला सांगत होता कि , सांगू का आकाश ?"

"ए अरे निमिष, काय ठरलाय आपले, मग गप्पा बैस न "

"अरे, सांगतो रे, तशी पण ती शेरलॉक ची fan आहे, काळजी नको करो, मी सांगतो तिला, समजून घेईन ती"

"ए आता, पाल्हाळ नका लावू तुम्ही दोघे. निमिष सरळ सांग मला. नाही तर … नाही तर… मी बोलणार नाही, नको त्या पेक्षा लग्न cancel "

"अग ए, सांगतो बाबा आकाश. अग, आकाश म्हणत होती म्हणजे सांगत होता कि त्याला किती गर्लफ्रेंड आहेस, म्हणजे आता कुणाचा नंबर आहे वगैरे. तुला आवडणार नाही म्हणून तुला सांगत नव्हतो आम्ही "

"अच्छा, म्हणजे दादुला खूप गर्लफ्रेंड आहेत. काय रे तुम्ही मोठे झालात आणि मी बालवाडी छोटा गट का रे अजून”

"म्हणजे , तुला काय म्हण्याचाय "- आकाश

"ए हे बघ आकाश, तुला एखादी मैत्रीण असेल हि , म्हणजे तशी खास किंवा जवळची पण असेल, more than friend वगैरे, पण आता हा विषय नव्हता. आणि यात माझ्यापासून

लपवण्यासारखे काय आहे. नसेल सांगायचे तर नको सांगू. मी जाते परत"

"इरा, आता म्हणालीस ना ग कि बालवाडी मध्ये नाहीये आणि अजून तशीच चिडतेस. मीच सांगतो काय झाले, आम्हाला अनुचे आई बाबा भेटले. समोर आले, मग बोलावे लागल"- आकाश

"नेमकी नको ती माणसे भेटतात तुला आणि ज्यांना भेटायला पाहिजेस ते मात्र ..."- इरा

"इरा, हा विषय आता इथेच बास. तस पण 'नमस्कार, कसे आहात?' इतकाच बोलणे झाले. बर तू इथे कशी आता"- आकाश

"अरे, विनिता मावशीने तुमच्यासाठी डबा दिला आहे. ते खावून घ्या आणि आराम करा जरा. मग परत येते मी, जमले तर आई बाबा पण येतील "

इरा गेली. निमिषला वाटले कि आकाश नि खरे सांगितले, पण किती शांत पणे आणि विषय हि बदलला, पण ते आता भेटायला नको होते. आता त्याच्या डोक्यात परत, अनु, ठरलेले आणि मोडलेले लग्न, आणि सगळेच दुष्ट चक्र. हा इरापासून काही सुद्धा लपवून ठेवत नाही, पण अनु बद्दल चे त्याचे गुपित मात्र त्याने लपवून ठेवले आहे आणि कुणालाच ते इराला सांगता येणार नाही. त्या भाबड्या पोरीला एक प्रकारे आपण फसवतो आहे का ? पण तिच्या आणि आपल्या सगळ्यांच्या हिताचे आणि सुखाचे आहे ते. निमिषचे खरे होते, अनु चे आई बाबा भेटले आणि आकाश भूतकाळात गेला म्हणजे ओढला गेला . त्याच्या आवडीचे पदार्थ असूनही, त्या चवी पेक्षा, आठवणीची चव कटू होती बहुतेक.

अनु, आकाश आणि निमिष वर्ग मित्र. म्हणजे अनु तशी त्यांची काही खास मैत्रीण नव्हती. पण मैत्रीण होती. तिला आकाश आवडत होता आणि तिला बरोबर माहित होते कि आकाश ला आपल्या बद्दल अगदी आपणहून प्रेम नाही जाणवले तरी त्याला कसे आपलेसे करायचे ते. तशी ती हुशार होती, महत्वाकांक्षी होती, आणि चांगली होती, सगळ्यांच्यात मिळून मिसळून. आकाशच्या घरी तिचे येणे - जाणे होते आणि आकाशाच्या आईची ती fan होती. तिला त्यांच्यासारखे डॉक्टर व्हायचे होते. आकाशच्या घरी पण ती छान मिसळलि होती. आकाशाचे आई बाबा, आजी आणि इराला पण ती आवडायची. पण आकाशच्या मनात काय होते ते मात्र तिला कळत नव्हते. तिने पण ठरवले कि आधी शिक्षण आणि मग बघू. आकाशाला डॉक्टर व्हायचे कि नाही हे पण तिला माहित नव्हते. खर तर आकाश-निमिष-इरा हे त्रिकुट होता आणि ते त्याचा चौकोन करायला तयार नव्हते, म्हणजे मुद्दामून नाही, पण त्यांचे गुळ पीठ छान जमले होते म्हणून अनुला घुसखोरी करता येत नव्हती. अनुच्या गप्पा असायच्या, पण आकशापेक्षा इरा सोबत किंवा आकाशाच्या आई सोबत

"अनु, तुला पण डॉक्टर च व्हायचे आहे न ग ?"- शाळेत जाणारी इरा, अनुला विचारात होती

"हो ,. आणि मला पण म्हणजे तुझा दादू पण डॉक्टर होणार वाटते "

"त्याचे तसे ठरले नाहीये अजून, पण माझे ठरलय , मी डॉक्टर होणार आणि अगदी आई सारखीच. दादू म्हणतो मला कि तू काय बाई होशील, हुशार आहेस "

"मग आहेसच कि तू हुशार, आकाश चे बरोबर आहे "

"खर सांगू का तुला अनु, आकाश जास्त हुशार आहे, त्याचे प्रेम आहे न खूप माझ्या वर, म्हणून त्याला वाटते कि आपली बहिण लई भारी. पण मला ना कधी कधी वाटते त्याच्या सारखे व्हावे . एकदम कुल आणि हुशार आणि मस्त एकदम. :). त्याचे राहू दे, तू डॉक्टर झालीस न कि आमच्या हॉस्पिटललाच ये, मग थोड्या वर्षांनी मी पण येयीन आणि मग मस्त बघ एकदम. रोज भेटू आपण."

"पक्का इरा, नक्की असच करू. आकाश आला तर माझा निरोप सांगशील न त्याला आणि निमिषला पण सांग. चल भेटू परत, बाय "

"हो मी सांगेन त्यांना तुझा निरोप, बाय "

आकाश नि रिसर्चला जायचे ठरवले, आई बाबान विशेष पसंत नव्हते, पण तेवढी मोकळीक होती त्यांच्या घरात. इराला मात्र आपला भाऊ डॉक्टरच व्हयला हवा होता म्हणजे त्यांना एकत्र practice करता आली असती. निमिषचा घराचा व्यवसाय होता आणि त्याला लहान पण पासून त्यात रस होता, म्हणून त्याने engg ला प्रवेश घेतला. अनु मात्र डॉक्टर च होणार होती आणि तिनी तीच वाट निवडली. पण कसे कुणास ठावूक हे ऋणानुबंध टिकले, मार्ग वेगवेगळे असूनही .

आकाश, पुण्यात येवून जावून असायचा. अनुनि मात्र घरी येणे-जाणे ठेवले होते आणि आकाशला पण ती अधून मधून भेटायची. तिला मनापसून आवडला होता तो आणि हळू हळू हे सगळ्यांच्या लक्षात येत होते. तिच्या आणि आकाशाच्या, आई वडिलांना पण. त्यांना सगळ्यांना हे मान्य होते, आता प्रश्न होता आकाशाचा. त्याला लगेच विचारण्यात अर्थ नव्हता , त्यामुळे कुणीच काही करू शकत नव्हते.

इरा पण बारावी नंतर मेडिकलला गेली. आणि बघता बघता आणि दोन वर्षे निघून गेली. अनुनि आकाशच्या आई ला जोइन केले. आता आकाशाला विचारावे असे सगळ्यांना वाटत होते, पण कसे? म्हणजे आकाशचे काही सांगता येत

नाही. त्याचे ठराविक मित्र मंडळ आहे, आणि कुणी मुलगी त्याच्या आयुष्यात नाही, पण अनुबद्दल तो असे काही व्यक्त झाला नाही, असे आकाशच्या आई ला वाटत होते. मग परत इराच मध्ये पडली.

" आई, मी विचारते ग त्याला, हळूच गप्पा मारताना"

"झाले, तू विचारणार म्हणजे, तो आणखी आम्हालाच ओरडेल. इतक्या लहान मुलीचे बघ काय चाललाय, तुमचे लक्षच नाहीये घरात, इरा बघा काय बोलतीय, एवढीशी आहे .... "

"ए आई त्याचे पुरे, आता मला बॉय फ्रेंड असेल अश्या वयात आहे मी, लहान थोडी न आहे. तू नको काळजी करू मी आणि घेते त्याला घोळात. आणि तसा हि त्याला जर दुसरे कुणी आवडत नसेल आणि समज अनु वर त्याचे प्रेम नसेल, तरी चांगली मुलगी आहे ती, त्यांच्या आवडी निवडी पण सारख्या आहेत आणि आपल्याला आवडते कि ती आणि मला पण पसंत आहे. हवे असेल तर फक्त साखर पुडा करू आता,"

"इरा, तुझी स्क्रिप्ट तयार आहे कि अगदी, आणि मुद्दे सूद. ठीक आहे मी बाबा आणि आजीशी बोलते, तो पर्यंत काही गडबड नको करू. आकाश हो म्हणला तर बराच होईल बाई. मुलगी पण चांगली आहे आणि मला हॉस्पिटल मध्ये पण घरचच माणूस होईल"

"हो न, आणि काही वर्षांनी मी पण असेनच कि, आपण सगळेच घराचे, मस्त. मम्मा, मला न अगदी तुझ्यासारखे व्हायचे आहे, लोक म्हणतील बघ, आई सारखीच आहे अगदी इरा म्हणून "

"इरा, आधी डॉक्टर तो हो मग पुढचे पुढे आणि झोपायला जा आता"

कसे काय माहित पण, इराने आकाशला पटवले. म्हणजे तसा तो अनुच्या प्रेमात वगैरे नव्हता, पण अनु चांगली मुलगी होती, तो तिला ओळखत होता आणि मुख्य म्हणजे घरच्यांना पसंत होती. पण त्याला लगेच लग्न करणे शक्य नव्हते. कमीत कमी वर्षभर तरी, पण तो हो म्हणाला.

इरा खूप खुशीत होती. साखरपुड्याची तयारी करायला तिने आईला खूप मदत केली होती. अनु सोबत आणि आकाश सोबत तिने खूप खरेदी पण केली होती. साखरपुडा छान झाला आणि नाते पक्के झाले. आकाश अधून मधून मुंबईहून पुण्यात येत असे. असाच कधी तो आला असताना, काही घटना अश्या घडत गेल्या,

"इरा, चल बाहेर जायचय, तू, मी, अनु आणि निमिष"

"ए तुम्ही जा न, मला नाही जमणार रे. तुमचे काय बाबा, आता तुम्ही सेट आहात. माझे अजून शिक्षणसुद्धा बाकी आहे. खरच नाही जमणार, खूप अभ्यास आहे "

"इरा, तुला विचारून ठरवले होता न, तेव्हा तर नाचत नाचत हो म्हणालीस. आता काय झालाय? तुला बरे वाटतय न?"

"हो रे, वाटतय आणि खर तर मला माझ्या फ्रेंड्स सोबत जायचंय, प्लीज. "

"ठीक आहे, हे बघ निमिषचा पण मेसेज आलाय, नाही जमणार म्हणून. काय यार तुम्ही लोक. इतक्या दिवसांनी आलोय मी आणि तुम्हाला वेळच नाहीये"

"दादू, हे बघ उद्याचा वेळ तुझ्यासाठी. म्हणशील तेवढा. पण आता जा तू. ती अनु वाट बघत असेल, म्हणजे प्यार भरा इंतजार ………। हे झार, लवकर जा आणि तिचा इंतजार खत्म कर"

"इरा, फालतू बडबड बंद कर. उद्या बघतो तुला "

आकाश गेला. इरानिच निमिषला पण बेत cancel करायला सांगितले होते. तिला असे वाटत होते कि दादांनी फक्त अनुला असा पण वेळ द्यावा. आणि तिने तसे आईला बोलून दाखवले आणि आईला लगेच पटले. ती इराला म्हणाली सुद्धा कि मीच आकशाला सांगणार होते. इतके दिवस ठीक होते, आणि तू पण आता मोठी झालीयेस कि तुला पण तुझे जग आहेच कि. आणि एक दिवशी तू पण जाशील कि या घरातून, मग काय करेल हा कि तुझ्या मागून याला पण पाठवयाचे. इरा फक्त हसली, तिला खर तर आकाशला खूप काही सांगायचे होते, आई जरी म्हणाली कि तुझे आता एक वेगळे जग आहे तरी, तरी आकशचे आणि तिचे असे एक वेगळे जग होताच कि. तिला वाटले, आई म्हणेल कि ग असे काही नाही अनुला जसा वेळ देईल तो तसा तुला पण देईल कि आणि आई अलीकडे एक दोन वेळा आपल्याला म्हणाली पण कि तू पण जाशील कि एक दिवस हे घर, सोडून म्हणजे लग्न झाल्यावर . हे काय आता नवीनच, पहिले शिक्षण आणि मग बाकी सगळे, अगदी हॉस्पिटलसुद्धा, असे म्हणणारे आई बाबा, हे काय एकदम. कदाचित दादूचे लग्न ठरल्यामुळे आम्ही मोठे झालोय असे वाटतय त्यांना :)

इरा, बाहेर जावून आली, जेवली आणि झोपायला गेली. आकाश आलेले कळले तिला, पण ती उठली नाही पण तिला काही अस्पष्ट आवाज ऐकू येत होते, आई आणि आकाशचे. खर तर आकाश इतक्या मोठ्या आवाजात काहीच बोलत नाही, आज काय झालय? काही नाही आईनि परत लग्नाची तारीख वगैरे बोलणी सुरु केली असतील म्हणून वैतागला असेल. सकाळी करते मी मूड ठीक एकदम त्याचा, आणि इरा झोपली

"आई, अनु सांगत होती ते खरय ?"- आकाश

"कशाबद्दल?"

"मी हॉस्पिटलमधल्या बदलांबद्दल बोलतोय आणि तू तिला इतके involve का करून घेतीयेस आतापासून "

"अरे आकाश, असे काय? ती आपलीच तर आहे आता आणि तू पण नाहीयेस. मला आणि बाबांना व्याप नाही झेपत आता

आणि आम्हाला बाकीचे कॅम्पस घ्यायला जावे लागते . ते आवडते आम्हाला "

"मान्य, ती आपली आहे, पण होणार आहे आणि विनिता मावशी आहे न, आणि आता एक दोन वर्षात इरा पण येयीलच कि हाताखाली. आणि तुझे काय असे वय झालाय. मला काही पटत नाहीये हे "

"हे बघ, आकाश, विनिता आहेच आणि मान्य कि ती पण घरच्या सारखीच आहे. आणि इरा चे काय रे, ती लहान आहे अजून आणि पुढे PG करणारे कि आणि काही, ते ठरले नाहीये, आणि लग्न होवून दुसरीकडे गेली म्हणजे किंवा कुठे तरी जाईल पहाडात, practice करायला. तिच्या रक्तातच आहे ते ! "

"आई, ठीक आहे, पण दोन वर्ष काय ते कळेलच न आणि लग्न झाले तर ती हॉस्पिटल मध्ये येवूच शकते कि इरा. शेवटी हॉस्पिटल आजोबांचे आहे, ते चालवायला आपले कुणी तरी हवच कि. मला अजून हि असे वाटतय कि अनु नवीन आहे, आणि तिचा स्वभाव चांगला आहे पण थोडा उतावळा आहे आणि महत्वाकांक्षीसुद्धा. तिच्यासाठी हे सगळे नवीन आणि अप्रूप आहे. अजून हि विचार कर आणि एक लक्षात ठेव, माझे आणि इराचे एकाच रक्त आहे , आम्ही पहाडात जावू नाही तर आणि कुठे, आणि ती जाईल तर मी पण जावू शकतो. बाबा किंवा आजी समोर प्लीज हे असे बोलू नको. असो मला काय वाटले ते सांगितले "

"आकाश, तू पराचा कावळा करतोयेस. असे काही नाहीये आणि तुझ्या बोलण्याचा मी विचार करेन आणि इराचे म्हणशील तर मला इतकाच म्हण्याचे आहे कि ती लहान आहे तशी अजून. मुले किती पण मोठी झाली तरी आई साठी लहानच असतात. आणि मुलींची एक वेगळीच काळजी असते आई वडिलांना. तुला नाही कळणार, कारण तू इराचा भाऊ आहेस, आई वडील नाहीस. जावू दे, तू जा आणि झोप आता. तुझे म्हणणे विचारात घेईन मी "

आकाश झोपायला गेला खरा, पण त्याला हे सगळे पटत नव्हते हे खरे. त्याला नेहमीच वर्तमानात जगायला आवडायचे. भूतकाळात तो शिरायचा नाही आणि भविष्य ची काळजी करत जगू नये असे त्याला वाटायचे. अनु त्याला चांगली वाटत होती, पण काही काही गोष्टी मात्र त्याला पटत नव्हत्या. असे वाटत होते कि एखादे गाणे छान आहे, म्हणजे सूर -ताल - लय अगदी सगळे छान आह, पण काही तरी हरवले त्यात. कदाचित भावच उमटत नाही आहेत त्या गाण्यात. अनुच आणि त्याचे नात हि असच होता का कदाचित ?

झरझर सगळा भूतकाळ त्याच्या समोरून सरकत गेला आणि तो वर्तमानात आला. अनुशी लग्न मोडल्याचा दु:ख तर अजिबात नव्हते त्याला आणि पश्चाताप तर अजिबातच नाही. इरासाठी, त्याच्या आयुष्यातला एक निखळ आणि निर्मल प्रेमासमोर आणि आनंदसमोर हे काहीच नव्हते. आजी असती तर तिला सारे कळले असते, आपल्या मनातले. पण असू दे इराला तिचे प्रेम मिळतंय आणि निमिष इराला नक्की जपेल. आपण निम्म्या जबाबदारीतून मुक्त झालो आता, असे वाटले त्याला आणि स्वताशीच हसला तो आणि नकळत त्याने त्याचे आवडते गाणे लावले

"मुस्कराहट सी खिली रहती है आँखों में कही
और पलको पे उजाले से झुके रहते हैं
होंठ कुछ कहते नहीं, कापते होठों पे मगर
कितने खामोश से अफसाने रुके रहते हैं-"

<u>भाग पाच</u>

गाणे तर एकीकडे सुरु होते, कानावर पडत होते पण आत शिरत नव्हते, कारण आठवणीचा कल्लोळ उठला होता. प्रवासामुळे असेल किंवा मानसिक थकव्यामुळे असेल, आकाशच डोळा लागला. आणि किती वेळ गेला काय माहित. इरा त्याला उठवत होती, अरे एकच दिवसात दोनदा हे स्वप्न. भारतात आल्यामुळे या स्वप्नाची फ्रिक्वेन्सी वाढली काय?,

"अरे ए, उठ ना, आवर .माझाच चुकले तू आणि निमिष अश्या दोन महान माणसांच्या जीवावर मी लग्न करायचा घाट घातलाय. झोपला तुम्ही दोघे पण निवांत. उठ, झोपून झोपून बघ कसा मंद झाला आहेस"

"बाप रे, इरा खरच तू आलीयेस "

"म्हणजे आकाश, मी येणारच होते "

"तसे नाही ग, मला वाटले स्वप्न आहे"

""स्वप्न?"

"हो, पण जावू दे ती एक मोठी स्टोरी आहे. मी आवरतो पटकन. तुझ्या त्या हिरोला आवरायला सांग"

"त्याचा क्लास घेवूनच तुला उठवायला आलीये मी, आवरत आलाय त्याचे. मी चहा टाकते पटकन, मग निघू आपण"

आकाश नि पटपट आवरले. किती तरी दिवसांनी, वर्षांनी इराच्या हातचा चहा प्यायला मिळाला. एक आठवडा इरा आणि एक आठवडा आकाश अशी त्यांची दुपारच्या चहाची वाटणी होती, आणि किती तरी वर्ष तशीच होती. चहा, साखर, दुध, पाणी तेच पण करणारा बदलला कि चहाचा स्वाद बदलतो, नात्यांचे पण तसाच काही, माणूस बदलला कि दृष्टीकोन बदलला.

"ऐका ना मुलानो, पहिले मेनू ठरवू, अर्धा तास लागेल फार तर आणि आई बाबांनी त्यांच्या सूचना दिल्या आहेत नेहमी प्रमाणे"

"म्हणजे ते येणार नाहीयेत इरा? मला भेटले पण नाहीयेत आल्यापासून "
"एक तर तुला येवून अजून एक दिवस पण होतोच आहे दादू, आणि तिकडे घरी खूप गडबड आहे रे. त्यांना काय झेपतच नाहीये दोघांना. म्हणजे कामाला माणसे आहेत तशी, पण इतके दिवस किंवा वर्षे त्यांना काही पाहावे लागत नव्हते आणि तुझ्या साखरपुड्या पर्यंत आजी होती, तसे त्यांना काही करावे लागत नव्हते. कसे असते न, माणूस असताना जी जाणीव होत नाही, ती जाणीव तो माणूस नसला कि प्रकर्षाने होते आणि त्या माणसाची उणीव कधीच भरून निघत नाही मग. माझाच बघ न, आजी गेली आणि नंतर तू तिकडे, खूप एकटे वाटायचे घरात. आई बाबा असतात पण तरी.... असो कदाचित हि जाणीव त्यांना पण झालीये आणि म्हणून मला म्हणाले कि आता आकाश आला आहे तर आमची निम्मी काळजी कमी झाली "
"खरच सांगीति आहेस इरा"
"म्हणजे काय आकाश, अरे त्यांचे खूप प्रेम आहे तुझ्यावर आणि तुलाहि ते माहितीये, पण आईसब्रेक करायला पाहिजे. ते भेटायला नाही आले, पण तू फोन पण नाही केलास. असू दे मेनू ठरवताना कर म्हणजे बोलणे पण होईल "
इरा गाडी पार्किंग मधून बाहेर काढायला गेली. आकाश तिच्याकडे बघतच राहिला, मोठी झालीये हि ! तो निमिषाला म्हणाला सुद्धा.
"अरे आमची हि छोटी इरा किती मोठी झालीये रे, एकदम जबाबदार माणसा सारखी, म्हणजे समजूतदार तर ती होतिच पण आता जे बोलली न, एकदम मोठी झालीये असे वाटतंय "
"अरे म्हणून तर लग्न होतंय न तिचे माझ्याशी :), भारी सिलेक्शन आहे माझे "
"कळले, चल "

इरा नि खरच फोन केला घरी, बाबा सोबत बोलली आणि आकाशकडे दिला फोन. तसे क्वचित कधी तरी त्याचा फोन होत असे आई बाबांशी, म्हणजे तोच करायचा, इराचा हट्ट म्हणून. आकाश नि कामाचे बोलणे केले आणि विचारले कि बाकी तयारी कशी सुरु आहे लग्नाची.

बाबा इतकाच म्हणले "तूच बघ कि एखादे दिवशी घरी येवून "आकाशला वाटले कि घरी ये म्हणाले, पण लगेच त्याला वाटले कि एखादे दिवशी असे म्हणाले :) , त्याचेच तर घर होते. कदाचित त्यांना घरी ये म्हणायचे होते. आकाशला जर बरे वाटले
"आता काय इराबाई?"
"आता, दागिने खरेदी आणि उद्या थोडी कपडे खरेदी आहे. उद्या आई आणि विनिता मावशी येणार आहे. निमिष आईनी काकुना आय मीन मझ्या सासू बाईना पण बोलवले आहे आणि तुम्ही दोघे ठीक १०. ३० ला उद्या तयार राहा.
"ओ ग्रुप लीडर, उद्याचे उद्या. आजचे आवरू आता. ए यार आकाश , तुझी बहिण लेडी हिटलर आहे यार"
"अरे मग आता cancel करू लग्न, करू का सांग?"- आकाश
"अरे तुम्ही दोघे बहिण भाऊ म्हणजे न, एकाला झाकावे आणि दुसऱ्याला काढावे "
इरा, आकाश आणि निमिष खरेदीला बाहेर पडले
"आकाशची चोइस मस्त आहे. माझ्यासाठी किती काय काय आणायचो तो. बाहेर गेला सेमिनारला किंवा कोन्फ़रसला कि माझ्याकडे नवीन वस्तू आलीच "
"बघ बाबा आकाश, हिला पटवायला मी इतके गिफ्ट्स दिले, पण कौतिक नाहीच आमच्या नशिबात"
"अरे, ह्याच्या गिफ्ट्स म्हणजे न आकाश, सगळ्या अतरंगी एकदम. म्हणजे मस्त असायच्या पण विअर्ड असायच्या "

आकाशला खरच परत आठवले, कि आपल्याला इरासाठी काही तरी घ्यायला नेहमीच किती आवडायचे. अगदी लहानपणी तिला कळत नव्हते, तेव्हा तिचे फ्रॉकसुद्धा माझ्याच आवडीचे असायचे. आई, इराला हे घे न अशी सारखी भुणभुण असायची आईच्या मागे आणि आई म्हणायची अरे स्वतासाठी पण हट्ट कर कि कधी तरी. खरेदी संपवून, जेवण करून निमिष आणि आकाश घरी आले आणि इरा तिच्या घरी परताली

आकाश हातात पुस्तक घेवून झोपायच्या तयारीत होता, पण मनात आठवणीचे पुस्तक उघडले होते. त्याला आठवले कि त्याने एकदा इरासाठी हिऱ्याचे कानातले घेतले होते. त्याच्या सुरवातीच्या कमाईतून. इराला तशी या सगळ्याची आवड कमीच, आपलीच हौस जास्त. पण आपण आणले असले कि इरा आवर्जून वापरायची. आकाशाला पुन्हा जुना संवाद आठवला. दुपारी अर्धी राहिलेली आठवण, जणू मध्यंतर संपल्याप्रमाणे पुन्हा सुरु झाली पुढच्या भागात
"आकाश, तू नाराज नको होवू. मी बोलेन या विषयावर बाबांशी पण आणि आजी सोबत पण आणि मग आपण ठरवू कि अनुला किती जबाबदारी द्यायची वगैरे. खर तर मुले आई सोबत बायकोच्या हकाक्साठी भांडतात आणि आम्ही देतोय आपणहून, तर तू "
"आई, तू हे काय नवीन काढले आहेस हक्क वगैरे. आपल्या घरात हि भाषा कधीच नव्हती. जे काही आहे ते आपले सगळ्यांचे आहे न. नशिबानी आणि कर्तृत्वानी या घरात पैसा कधीच कमी नव्हता आणि आपण कुणीच कोत्या मानाने वागलो नाही आहोत. तूच लहानपणी, आम्हाला कधी सुद्धा आमच्यात आणि घरात किंवा हॉस्पिटलमध्ये काम करणऱ्या

लोकांच्या मुलांमध्ये फरक करून दिला नाहीस, आणि आता काय हक्क वगैरे, आज हक्क म्हाली आहेस उद्या दुसरे काही"

"आकाश, ताणू नको. आणि अनुपण घरात येयील मग तिचा काही हक्क असेल कि नाही या वर."

"आहे न. मी कुठे नाही म्हणतोय, पण तिला तो हक्क मिळवू दे. ती येवू तर दे, इतकाच माझे म्हणणे आहे. खूप आधी पासून हे असे मला नाही ठीक वाटत. आपल्या घरात जे अहि आहे ते सगळ्यांचे, माझे, तुझे, बाबांचे आणि इराचे सुद्धा. आणि जे माझे हे ते अनुचे आहेच कि. पण म्हणून जे इराचे आहे ते तरी तिला देवू नकोस"

"आकाश, तुला काय म्हणायचे आहे?"

"हे बघ, मला हे बोलायाचा होतच तुझ्यासोबत. मी इथे नसताना काही तरी बदललय, म्हणजे माझ्या मागच्या भेटीत आणि आता. म्हणजे नक्की नाही माहित, पण काही तर बदल झाले आहेत असे मला वाटते "

"असे काही नाहीये. पण हो एक गोष्ट म्हणजे, आजी म्हणाली म्हणून मी आणि बाबाबी अनु ला आणि तिच्या घराच्यान, घरातली इतर बऱ्याच गोष्टींची कल्पना दिली. म्हणजे तसे आज्जीनि त्यांना सांगितले सगळे. आपली आर्थिक परिस्थिती असेल किंवा नातेवाईक आणि बाबाचे लहानपण, तुमचे लहानपण वगिरे तिचे असे म्हणणे आहे कि मुलीच्या लोकांना सगळे माहित हवे. आत्या तर तुझी बाहेरच आहे अमेरिकाला ती काय परत यायची नाही. तुझ्या लग्नालाच येते असे म्हणाली आहे तरी. आणि काका, त्यांना तर हे जग सोडूनच किती वर्षे झाली. त्यामुळे आता तसे तुझे बाबा आणि तू"

"आणि इरा आणि तू"

"हो"

"मग काय म्हणाले?"

"काही नाही, बरे झाले तुम्ही सांगितले असे म्हणाले. मुद्दाम अनु समोरच सांगितले सगळे "

"बरे झाले. पण माझा मुद्दा तो नाहीच आहे आई."

"अरे काही बदलले नाहीये इकडे, तुझे काही तरीच"

"मग इराची खोली का बदलली आहे? ती पण काही बोलली नाही मला. म्हणजे मेल मध्ये किंवा फोनवर, तू पण काही बोलली नाहीस."

"ते तू इरालाच विचार न. तीच म्हणाली कि हि खोली मी आणि दादू वापरायचो आणि हि तशी मोठी खोली आहेतर मग मी दुसरी खोली वापरेन. हि आपण रिनोवेट करू दादू आणि अनुसाठी. म्हणून ती आत दुसऱ्या खोलीत राहतीये."

"पण मला न विचारता का कारभार करता तुम्ही असले आणि इरा एक लहानच आहे, अक्कल कमी आहे तिला. पण आई तू तरी कमीत कमी आकशाला विचारू असे म्हण्याचास कि"

"अरे पण इराच म्हणाली कि दादूला काय विचारायचं, माझे अनुशी बोलणे झाले आहे "

"अनुशी बोलणे झाले पण. मला आज अनु काहीच नाही बोलली याबद्दल "

"अरे इतक्या दिवसांनी भेटलास, त्यामुळे बाकीच्या गप्पात राहून गेले असेल "

"तरीच ती, मला काही तरी होम डेकॉर वगैरे सांगत होती, पण हे नाही म्हणाली काही. का बरे ? न सांगण्या सारखे काय आहे ?"

"अरे असेल काही तरी तिचे आणि इराचे, कुणी सांगायचे ते. पण काय रे तू अनुसाठी काही सुद्धा आणत नाहीस. काही तरी घेवून दे तिला. बरे वाटते मुलीना आणि आज काल तर तसा ट्रेंड पण हे "

"हे तू बोलतियेस आई?"

"नाही, तुझ्या बहिणीचा निरोप आहे तुला. मला म्हणाली आई तूच सांग. मी सांगितले तर त्याला परत वाटेल हि काय लहान आहे हिला कळतंय."

"ग पण आई, मध्ये मध्ये मी आणत असतो कि काही तरी, दर वेळी काय. आणि नाही त्या सवयी नको आहेत मला. आणि तसा हि अनु ला काय कमी आहे. मी काही आणले कि हिचे गेस सुरु होतात, कुठून घेतले, किती ग्रैम चे आहे, कोणता ब्रान्ड, किती किंमत आणि .... अनु खूप ऐशो आरामात वाढली आहे, तिला गिफ्ट दिले तरी काही अप्रूप किंवा कौतुक नाहीये त्याचे, मग मला नाही आवडत "

"अरे असतो एखाद्याचा स्वभाव. आणि आपल्या घरात नेहमीच वेगळे वातावरण होते, पैसे असले तरी. म्हणून तुम्हा मुलांना हे जरा नवीन आहे. पण बाकी ती चांगली आहे "

"हो ग, म्हणून तर मी लग्नाला हो म्हणालो न. आणि खर आहे एखादी गोष्ट सोडायला हवी, बाकी दहा चांगल्या असतील तर. मी घेईन उद्या तिच्यासाठी काही तरी. पण खर सांगू इरानि आणि तिने हे रूम चे मला सांगायला हवे होते आणि तू प्लीज परत ते हक्क बिक्क नको बोलू. मला कसातरीच वाटते"

"ओके बेटा आणि तू झोप आता. उशीर झालाय "

आकाश नि ठरवले कि उद्या अनुला आणि इराला याबद्दल विचारायचे. सकाळी उठला, इरा मात्र तो उठायच्या आधीच निघून गेली होती. खर तर नेहमीपेक्षा ती लवकर का गेली? आणि आज तर सुट्टी आहे हिला आज काय काम निघाले इतके? पण कुणाला विचारणार, सगळेच बाहेर गेलेले दिसतात. तेवढ्यात फोन वाजला.

"हेलो आकाश"

"हा बोल निमिष"

"अरे इराचा निरोप आहे तुला, ती उद्या सकाळीच परत येयी, तिचे काही तरी काम आहे म्हणून मैत्रिणी सोबत बाहेर गेलीये. तिने आईला फोन करून सांगितले, तू झोपला होतास म्हणून तुला नाही उठवले म्हणाली"

"हे सगळे तुला कसे कळले?"
"अरे मला वाटेत भेटली, योगायोगाने. मग म्हणाली मित्राला निरोप सांग आणि म्हणाली कबाब मे हड्डी होवू नकोस. चल ठेवतो आता. जमले तर दुपारी चक्कर टाकतो"
"बर, पण ये शक्यतो. तुझ्याशी थोडे बोलायचे आहे निमिष "
"बर, बाय "

आकाशला काही कळत नव्हते कि इरा कुठे गेली आणि जवळ पास कुठे गेली असेल तर मी पण गेलो असतो कि. उद्या एकाच दिवस आहे मी हे माहित असून सुद्धा गेली. काल तर म्हणाली मला कि उद्याचा पूर्ण दिवस तुझ्या सोबत.

तेवढ्यात परत फोन वाजला
"हेलो, अनु बोलतिय "
"बोल ग "
"अरे, तुझे आवरले कि इकडेच ये न. मला पण आई नि आज ऑफ दिलाय हॉस्पिटल मधून. बाहेर जावून येवू , माझी किरकोळ कामे पण आहेत आणि आपल्याला पूर्ण दिवस मिळेल एकत्र "
"येतो मी. पण आई, इरा आणि आता तू पण कुणीच काही सांगत नाहीये मला. तुमचे तुम्ही काय ठरवताय काय माहित!! "
"अरे, माझा आणि इराचा प्लान होता आजच, तुला सरप्राईज करायचे. पण ती शहाणी स्वतच गायब आहे आता "
"म्हणजे, तुला पण माहित आहे कि ती घरी नाहीये ते."
"हो, अरे मगाशी आईना फोन केला न, तेव्ह्या त्या म्हणल्या कि इरा सकाळीच बाहेर गेलीय आणि उशीर झाला तर उद्याच येयील बहुधा. मग तू येतोस न? "
"हो येतो, तासाभरात. "

आकाशला इराचे नसणेच सरप्राईज होते; पण त्याला वाटले कि आता मोठी झालीये ती, स्वताचे पण आयुष्य आहेच कि तिला आणि तेवढी स्पेस तर द्यायली हवी तिला पण. म्हणून तो आवरून अनुला भेटायला गेला
"वाह, अनु छान दिसत आहेस कि एकदम आज."
"म्हणजे, तुला खरच सौंदर्य दृष्टी आहे म्हणायची ."
"अरे म्हणजे काय, इराला विचार माझी आवड चांगली आहे म्हणून तर तिचे सगळी खरेदी माझ्या सोबत असते. कपड्या पासून अगदी कानातल्या पर्यंत. ए तुझे पण इर्रिंग छान आहेत, हिऱ्याचे आहेत का ग ? पण मुंबईला डिझाईन जास्त पाहायला मिळतात. मला आठवते इराला पण मी असेच आणले होते एकदा हिऱ्याचे. तिला खूप आवडतात ते "
" हो, म्हणाली मला ती एकदा. आज बघ कसे डिच करून गेली आपल्याला "-अनुनी विषय बदलला

"असु दे ग. तुझी काय ती काम आटोपली कि आपण जरा खरेदी करू तुझ्यासाठी. काय घ्यायचे ते ठरव "
" वाह, आज काय एकदम मस्त मूड दिसतोय "
"हो आहे खरा"
गाडी चालवताना सहज विषय काढून आकाश नि अनुला विचारलाच रूम बद्दल .
"काय मग अनु, काय काय प्लानिंग रूम सजावटी बद्दल. इरा नि रूम खाली केलीये. खर तर तिचा फार जीव आहे त्या रूम वर. म्हणजे तिची घरातली फेवैरेट जागा आहे ती "
" हो अरे, म्हणजे ती काही बोलली का तुला ?"
"कशाबद्दल ?"
"अरे हेच रूम बद्द्ल "
"नाही, का ग ?"
"अरे काही नाही, म्हणजे तसे सांगण्यासारखे किंवा न सांगण्या सारखे काहीच नाहीये. काय झाले कि मध्ये मी आपल्या घरी आले होते न, तेव्हा मी आणि अनु गप्पा मारत होतो. तर सहज बोलणे झाले. आजी म्हणत होत्या कि आई-बाबा ची रूम आपण घेवू आणि आई बाबा दुसऱ्या बेडरूम मध्ये शिफ्ट होतील. मी म्हणाले कि मला वाटले कि हीच रूम आमची असेल; म्हणजे तुझी रूम तीच आपली नाही का ? कारण तशी ती रूम मोठी आहे आणि छान view पण आहे. मग इराच म्हणाली कि आवडली असेल हि रूम तर तुम्ही घ्या हि आणि ती शिफ्ट होईल दुसऱ्या रूम मध्ये. तसे पण तुमचे घर इतके मोठे आहे कि, बाकीच्या खोल्या बंदच असतात. मग इरा म्हणाली कि चेंज करावे लागेल इंटिरियर, तर मग मी लगेच रूम रिकामी करते काम सुरु करता येयील. अरे कसली उत्साही आहे ती, लगेच आई बाबाशी बोलून, माझ्या सोबत आली पण डेकोरेटर कडे आणि काम पण सुरु केले. मला म्हणाली दादूला सांगू नको"
"हं "
"अरे मला वाटले. इरा बोलली असेल तुला "
"नाही तिचे काही बोलणे नाही झाले माझ्याशी तसे. कारण काल मी तुला भेटायला आलो आणि सकाळपासून हीच गायब आहे. तसे मी विचारले तिला कि रुम का शिफ्ट केलीस तर मला म्हणाली गम्मत आहे नंतर सांगते. ती काय पण म्हणेल ग, कि तुम्ही हि रूम घ्या वगैरे , तुम्ही कशाला ऐकता ग तिचे"
"अरे पण आकाश, ती आपणहून म्हणाली आणि मला पण आवडली होती ती रूम आणि आई पण म्हणाल्या कि खोल्या जास्त आणि माणसे कमी. इराला जिथे हवे तिथे ती राहू शकते आणि तसाही २-३ वर्षांचा तर प्रश्न आहे. इरा कदाचित पीजी करायला बाहेर पण जाईल आणि इथे असली तरी तसे काय बिघडत नाही, इतके मोठे घर आहे. आणि आज न उद्या ती पण लग्न होवून जाईलच कि "

"बाप रे, केवढा पुढचा विचार आणि काय ग सारखे इराच्या लग्नाचे किंवा बाहेर जायचे हे काय काढलाय तुम्ही"
"तुम्ही म्हणजे?"
"तू आणि आई नि. ती पण असाच काही म्हणत होती "
"अरे म्हणजे काय इरा काय अशीच आयुष्यभर सोबत राहणार आहे काय आपल्या? मोठी झालीय ती आता "
"अरे पण इतकी पण मोठी नाहीये ती. आणि जर तिला लग्नच करायचे नसेल किंवा समजा तिच्या होणाऱ्या जोडीदाराकडे त्याचे घर नसेल तर, ते आपल्या घरात राहू शकतात. मला तर आवडेल बाबा. मी असाच मुलगा शोधतो तिच्यासाठी. आणि जर तर डॉक्टर असेल तर प्रश्नच नाही, हॉस्पिटलला पण मदतच होईल न "
"काही पण आकाश, असे कसे होईल? म्हणजे असे नसते कधी ."
"का असे झाले तर काय हरकत आहे. बरे घराचे राहू दे, पण डॉक्टर असेल तर बरे होईल न, म्हणजे आई बाबांना काळजी नकोच. तू, इरा आणि तो, म्हणजे आमची परंपरा सुरु राहील"
"हं, तशी आता आईना काळजी नाहीये, मी जोइन झाल्या पासून "
"ते आहेच ग. पण तू नवी आहेस न अजून आणि आई बाबा तसे अजून फिजिकली फिट आहेत काम करायला. खर तर मी डॉक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा होती, पण माझी इच्छा पण ऐकली त्यांनी. आणि इरा आहेच कि त्यांचे स्वप्न पूर्ण करायला. ती rank होल्डर आहे. हुशार, समंजस, आणि संवाद कौशल्यया गुणांवर, चांगली डॉक्टर होईल ती "
"नक्कीच. पण आजकाल खूप struggle आहे अरे. आपला सेट अप जुना आहे आणि आई बाबा नि खूप नाव करून ठेवलाय. म्हणून खूप शिकायला मिळतंय "
"अग, आई बाबा तरी खूप नंतर. खर तर आजी सांगते कि आजोबा आणि तिने जेव्हा दवाखाना सुरु केला न तेव्हा सुरवातीला खूप त्रास झाला. त्या काळी पण आजी डॉक्टर होती आणि नंतर माझा काका. तसा लवकर गेला तो पण मला थोडा थोडा आठवतोय. बाबाला तर डॉक्टर व्हायचे नव्हते, पण काका त्याचा रोल मोडेल म्हणून तो झाला डॉक्टर. आणि आई तर हुशार पण तिची परिस्थिती पण बेताची होती. आमच्या हॉस्पिटले मध्ये तिचा चुलत भाऊ होता admin ला. काकाचा मित्र तो. काकाला कळले कि आई खूप हुशार आहे आणि तिला डॉक्टर व्हायचे आहे. त्याला अगदी बहिणी सारखी ती म्हणून मग काका नि माझ्या आजी आजोबाना सांगितले आणि तिचा मेडिकल चा खर्च केला सगळा. मग हॉस्पिटल मध्ये ती जोइन झाली आणि बाबाचे आणि तिचे जमले . आणि मग काय, आपली सारखाच, शुभ मंगल सावधान. मग काही वर्षात काका गेला आणि त्या धक्क्याने आजोबा पण. जावू दे. तुला तर सगळे सांगितले न आजीनी परवा"
"हो रे, सांगितले. माहितीये मला सगळे आणि माझ्यासाठी ओके आहे सगळे त्यात काय."
"गुड. बर चल तुझ्यासाठी जर खरेदी करू "
अनु आणि आकाश नि बरीच खरेदी केली. अनु नि आठवणीने इरासाठी पण घेतले बघून आकाशाला बरे वाटले. सकाळपेक्षा त्याचा मूड बरा होता. पण काही वेळेच. जाता जाता अनु म्हणालीच
"अरे, तू उद्या आहेस न. मग येतोस का सकाळी, मी माझी वेळ सांभाळून तुला कळवते हवे तर "
"नाही, उद्या नको. मला इरा आणि निमिष दोघांना भेटायचे आहे. मला त्यांना पण वेळ दिला पाहिजे "
"अरे पण, ते काय असायचे कि नेहमी तुझ्या सोबत इतके दिवस लहान असल्या पासून. हवे तर आपण सगळे एकत्र जावू "
"नको, मला फक्त त्यांना भेटायचे आहे, तुला कसा भेटलो न तसाच आणि एकत्र असायचे म्हणशील तर आत आपणसुद्धा आहोतच कि इतर जन्मभर "
"अरे पण, आई म्हणत होत्या कि हॉस्पिटलची अजून जबाबदारी येयील तुझ्यावर मग तुला वेळ नाही मिळणार, म्हणून मग "
"असू दे. त्यातूनहि जमले तर थोडा वेळ आपण सगळे जावू बाहेर आणि हो या पुढे प्लीज मला जे काय असेल ते सांगा तुम्ही लोक. हे रूम चे जे काही आहे ते काय मला पटले नाहीये"
"ठीक आहे. मग सांग तूच, इराला कि आम्हाला ती रूम नकोय"
"मी असे म्हणालो नाहीये. मी फक्त इतकाच म्हणतोय कि मला पण सांगत चला इतकच. आणि पाहिले मी इराला झापणार आहे. फार मोठी झाल्या सारखी वागते ती आणि तुम्ही तिला खत पाणी घालताय. जावू दे. भेटू उद्या जमले तर"
" बाय"

आकाशला बाकी काही प्रोब्लेम नव्हता, पण अनु उगाच चिडली आणि म्हणाली कि सांग आम्हाला ती रूम नकोय. इरा पण हट्टी आहे, पण आईला आणि अनु ला कळायला हवे कि ती तिची रूम आहे.

आज्जीच्या रूमच्या शेजारची आणि वेगळी रूम हवी म्हणून गोंधळ घातला होता पोरीने लहानपणी. आणि मग तिला कधी कधी एकटे वाटायचे किंवा भीती वाटली तर मी जायचो त्या रूम मध्ये. मग हळू हळू शिफ्टच झालो मी पण तिथे. लहानपणीच्या किती आठवणी, खेळणी, पुस्तके सारे

काही जपून ठेवले होते त्या रूम मध्ये आपण. माझे लग्न ठरल्यावर इरा म्हणाली पण, कि आपली दोघांच्या मुलांसाठी आपण हि खोली राखून ठेवू नंतर, या खोली मधले बालपण जपायचे आहे मला. कसली आवडली होती मला तिची कल्पना. आणि अनुला वाटले हि खोली माझी. माझी नाही, इराची होती; किंवा आमच्या दोघांची होती ती. एक क्षणात ती द्यायला इरा तयार झाली. मला न विचारता, सांगता. तिचे त्या खोली बद्दलचे स्वप्न, मला नाही जपता आले. असे कसे होवू शकते? भावंडामध्ये सगळ्या गोष्टींची वाटणी नसते, हे तुला - हे मला अशी. ती खोली आमच्या दोघांची होती आणि म्हणूनच मला ती माझ्या एकट्याचा वाट्याला नको होती. जसे आपण आई बाबा, आजी आजोबा त्यांचे प्रेम आणि आठवणी नाही वाटून घेवू शकत, तसच हे पण. इराचे किती प्रेम आहे आपल्यावर आणि मन पण किती मोठे आहे.

आकाश घरी पोचला तरी या एका छोट्या गोष्टीनी त्याचे मन उदास होते आणि इरा नव्हती तर आणखीनच उदास होते. तो तिच्या नव्या रूम मध्ये राहत होता सध्या. हि पण रूम छान होती, तसे तर त्यांचे घरच छान होते. पण आकाश येणार म्हणून तिने त्याचं आवडीची फुले रूम मध्ये ठेवली होती. तो सहज रूम मध्ये पुस्तके उलटी-पालटी करत होता आणि त्याला औषधाची लिस्ट पडलेली दिसली, वर इराचे नाव होते. विनिता मावशीकडून औषधे घेतली हिने, काय झाले होते? मागच्या महिन्यात फोन वर एक दिवस आड बोलायची, आई पण काही नाही बोलली आणि इरापण आणि अनुपण. न राहवून त्याने विनिता मावशीला फोन केला

"काय ग कशी आहेस?"

"बरेच दिवसांनी आठवण झाली तुला. आता काय बायको येणार म्हणजे आम्हाला सुट्टी "

"असे नाही ग आणि काय ग तू स्वतचे क्लिनिक सुरु केलस का "

"हो रे. म्हणजे संध्याकाळी घरीच जरा. हॉस्पिटलमध्ये फक्त सकाळीच जाते मी. होत नाही आता मला तितकसे आणि किती दिवस कष्ट करायचे? नव्या लोकांना संधी नको द्यायला "

"म्हणजे? आणि मला कुणीच नाही बोलले हे. अरे काय चालले हे? आलाय पासुन नवीन नवीन काही तरी "

"अरे तसे काही नाही, मला जर कंटाळा आला आहे. तुझी आई तर मला सोडायलाच तयार नव्हती म्हणून सकाळी यायचे असे ठरलाय. अरे नोकरी करणाऱ्याला retirement असते, आम्हाला काय. म्हणून मीच ठरवलंय आणि अरे मी संध्यकाळी फक्त ठराविक लोकांना कन्सल्ट करते. ज्यांना बाहेर परवडत नाही त्यांना."

"आणि इराला पण का? काही औषधा ची यादी दिसली , म्हणून विचारतोय "

"अरे काही विशेष नाही. तिला जर ३-४ दिवस ताप होता म्हणून आली माझ्याकडे. मला म्हणाली घरचे डॉक्टर नकोत. औषधांचा आणि पथ्याचा मारा करतात. त्यापेक्षा तू बरी, डॉक्टर लांब असेल तर जरा बरे असते, नाही तर मला रूम च्या बाहेर पण पडता यायचे नाही. काही नाही रे, दगदग आणि जर बोर झाली असेल. तू नाहीस, आता आई असते तुझी; पण आता तुझ्या लग्नाची तारीख पण ठरेल मग तिची पण गडबड असते रे आणि हिला तरी कुठे वेळ असतो, अभ्यास, मित्र मैत्रिणी. तरी निमिष आहे इथेच म्हणून बरे आहे म्हणाली. अरे रूम बदलली, तर सवय नाहीये म्हणून जर झोप झाली नाही असे म्हणत होती. काळजीच काहीच नाही."

"पण तरी मला सांगायचं न तिने फोनवर. रोज काय भाजी खाल्ली ते सुद्धा सांगते आणि हे "

"अरे उगाच तुला काळजी म्हणून नसेल बोलली. इतकच. आता ओरडू नको तिला "

"नाही ग ! आणि ओरडायला भेटू तर दे "

आकशाला आल्यापासून अस्वस्थ वाटावे अश्याच घटना होत्या सगळ्या. निमिष पण बोलला नाही आपल्याला काहीच. निमिषला सांगतो या पोरीवर लक्ष ठेवायला अधून मधून आणि आईला पण सांगायला पाहिजे कि इतके दिवस मी होतो आणि आजी पण होती सो तशी गरज भासली नाही. म्हणजे आईचे पण लक्ष असायचे पण तिला रोज बारीक सारीक गोष्टी नाही बघायला लागायच्या. पण आता मी पण नाहीये इथे आणि माझे लग्न ठरलाय तर एवढे त्याच्याच मागे लागण्यासारखे काय आहे त्याच्या. इरा हुशार आहे, समंजस आहे म्हणून ठीक. पण तरी थोडे लक्ष नको का तिच्याकडे. ती मुलगी बडबड खूप करेल पण त्रास असेल कसला तर कुणाला कळायचा नाही अगदी आईला सुद्धा सांगणार नाही. या सगळ्या विचारातच आकाशला झोप लागली.

"दादू उठ, चहा केलाय मी. लवकर उठ "

"इरा, तू कधी आलीस आणि मला न सांगता का गेलीस काल तू ?"

"स्टोरी आहे मोठी. नंतर बोलू, तुझा लाडका निमिष पण येतोय आता इकडच. मी आवरते "

"इरा, एक मिनिट. मला खूप विचारायचे आहे तुला "

"अभी के अभी ? चहा पिताना नाही का चालणार ?"

"नाही. आताच "

"हे बघ, काल जाणे खरच गरजेचे होते आणि रूम बद्दल म्हणशील तर, मला वाटले ते मी केले. इतका अधिकार आहे मला या घरात. आता हा विषय नको , "

"आणि आजारी होतीस त्याचे काय?"

"त्याचे काय, औषध घेतले बरी झाले आणि तुला नाही सांगितले कारण उगाच कशाला तुला त्रास, तू इकडे आला असतास पळत"
"मग त्यात काय झाले, यायला नको गरज असेल तर "
'हो पण, गरज सगळ्यांना असेते न, आईला, बाबांना, अनुलासुद्धा; तेव्हा नाही तू येत हातातले काम टाकून "
"इरा, काही तरी काय. मी प्रत्येक खेपेस त्यांच्यासाठी पण आलोय ना. पण तुझ्या बाबतीत जेव्हा मला वाटेल माझी गरज आहे तेव्हा मी येणार. मग बाकीच्या लोकांना, अगदी तुला सुद्धा ती गरज नाही असे वाटले तरी. एक लक्षात ठेव इरा, मी फक्त भाऊ नाहीये तुझा. माझ्यापासून काही लपवायचे नाही कधीच. कसे सांगू मी तुला ?"
"अरे हो, कळले! नाही होणार आता असे. पण आवर निमिष येयील आणि अनु सुद्धा "
"तिला का बोलवले आहेस? असू दे . "
इरा आवरून खाली आली, अनु, निमिष आणि आकाश गप्पा मारत होते.
"इरा किती गोड दिसातीयेस"- अनु
"मस्का बाजी!! अरे नवऱ्याची बहिण, महत्वाची बाबा. काय म्हणा हा अनुवहिनी, तुम्ही हुशार खऱ्या"- निमिष
"गप रे निमिष, उगाच काय ?"- इरा
"इरा, एक विचारू का ग ? मी आणलेले ते कानातले तू घालत नाहीस का आता. अग, अनुला तसलेच आणायचं विचार आहे माझा मुंबईहून, म्हणून लक्षात आले. outdated आहेत ते आता म्हणून वापरत नाहीयेस का?"
"नाही रे, म्हणजे आहेत ते कुठे तरी असेच. लक्षात नाही आता. शोधून ठेवते "
"एक मिनिट इरा, ते किती महाग आहेत माहितीये न तुला आणि तू असे कुठे पण ठेवणारी नाहोयेस "- निमिष
"निमिष, तू यात पडू नको हा उगाच, मी आणि माझा भाऊ बघून घेवू काय असेल ते "- इरा
ते चौघे बाहेर पडले. या मुली काही तरी खरेदी करत होत्या आणि आकाश आणि निमिष कॉफी शॉप मध्ये बसून होते.
"आकाश, तुला एक सांगू. मला असे वाटतय कि ते कानातले अनुकडे आहेत. खरे तर माझ्या लक्षात नसते आले पण मध्ये एकदा, मी आणि इरा असाच बाहेर आलो होते आणि अनु भेटली, तर इरा तिला म्हणाली कि तुला छान दिसतात बघ हे इरिंग. मला तेव्हा इतके काही लक्षात नाही आले . मी इराला नंतर विचारला तर म्हणाली कि अरे परवा अनु आली होती तेव्हा गप्पा सुरु होत्या, गिफ्ट्स वगिरे. तेव्हा ती इराला म्हणाली कि तुझी कडे क्लासी असते सगळे , मस्त आणतेस तू. तर इरा तिला म्हणाली कि अग मला तर आवड पण नाहीये पण आधी आईची आणि नंतर आकाशची हौस. तुला काही हवे असले तर घे यातले. मग अनुला त्या earrings आवडल्या आणि इरानि देवून टाकल्या "
"मग मला का नाही सांगितले? म्हणजे मगाशी विषय निघाला तेव्हा पण आणि काल माझे अनुचे बोलणे झाले झाले तेव्हा पण अनुनि काहीच नाही सांगितले आणि अनुला काय कमी आहे रे? एकुलती एक आहे ती. मला माहितीये कि तिला पैशाचे काही नाही विशेष ."
"हो ते मात्र आहे, ती तशी नाहीये. पण अरे फारच आवडले असेल आणि इरानि दिले न आपणहून मग ?"
"अरे पण का? मी आणले होते न तिच्यसाठी. मी आईला पण हेच म्हणतोय कि जे इराचे आहे ते इराचे आहे आणि जे अनुचे ते अनुचे "
"आणि तू?"
"मी अनुच होणारा नवरा, सहजीवी आहे आणि इराचा भाऊ आणि बरच काही आणि विचारले नाहीयेस पण सांगतो. मी अनुवर कधीच अन्याय नाही केलाय इरामुळे किंवा तुझ्यामुळे. रूम किंवा कानातले किंवा हॉस्पिटल या मधले जे काही झालाय त्यात माझी काहीच हरकत नाहीये. फक्त हे सगळे माझ्यापासून लपवले याचा त्रास होतोय मला. आई नि लपवले आणि इरानि पण, आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे अनुनि. मला नाही आवडत लपवा छपवी आणि विषय निघाल्यावर पण तिने सांगू नये? एक सांगू, जेव्हा लोक जाणून बुजून एखादी गोष्ट करतात आणि जेव्हा त्यांना त्याचा गिल्ट वाटतो न तेव्हाच ती लपवतात. मला वाटले इराला तिची स्पेस हवीये, खर तर तीच माझ्या साठी स्पेस तयार करतीये आणि जपातीये आणि ते करताना ती मला ते कळू देत नाहीये. आणि अनु नि काही मागितले आणि इरा नि दिले तर कदाचित मला आवडणार नाही आणि मी आणि अनु मध्ये वाद होतील म्हणून मला टाळणे हे इराचे गिल्ट. हे रूम आणि इरिंग चे अनुनि कसे काय स्वीकारले, कदाचित या सगळ्यावर, घर, हॉस्पिटल आणि माझ्यावर तिचा जास्त हक्क आहे आता, हे दाखवताना ती अशी वागतिये पण ते कदाचित तिला पण पटत नसावे, म्हणून अनुचे गिल्ट. पण आईचे काय ? तिच्या वर तर इराच हक्क आहे न अनुपेक्षा, अगदी तिच्याच भाषेत बोलायचे तर. आणि बाबा न बरे चालतंय हे सगळे. गोष्टी छोट्या च आहेत; पण मला त्या वेगळ्या दिसत आहेत. आई बाबा न तर कसलच गिल्ट नाहीये. मग मला का नाही सांगत हे सगळे, त्यांना कसले गिल्ट आहे?

**भाग ६**

आकाशला भारतात येवून खरा तर एखादा दिवसच झाला होता. त्याला मात्र आपण किती तरी दिवस इथेच आहोत असे वाटत होते. क्षणभर हि पिच्छा न सोडणारे विचार

आणि भूतकाळ. त्याला वाटले कि आपण तिकडे दूर एकटे होते पण तरी मन इतके बेचैन नाही झाले कधी आणि आता आपल्या माणसांमध्ये आलोय तर!! पण असच असते बहुतेक. मी किती हि वरून दाखवले कि मी शांत आहे तरी खळबळ आहेच कि मनात. लहानपणी असे कधी सुद्धा वाटले नाही कि असे काही प्रश्न आपल्या समोर उभे राहतील, ज्यांची उत्तरे मिळून सुद्धा, न मिळाल्यासारखी आणि नवे प्रश्नच उभे करणारी. सगळ छान चालले होते कि, सुखवस्तू कुटुंब, उत्तम शिक्षण, सुशिक्षित आई वडील आणि एक गोड बहिण, आणि काय हवे. आणि अनुशी लग्न ठरले तेव्हा पण, एक सुशिक्षित, हसमुख आणि घरच्यांना आपलीशी वाटणारी आयुष्याची साथीदार. सारे काही अगदी "परफेक्ट". पण मला परफेक्ट असे कधीच काही नको होते, मला बस समाधानी आणि सगळ्यांना जोडून ठेवणारे आयुष्य हवे होते. मला कधी वळणाचे, घाटाचे रस्ते, मानवलेच नाहीत; मग आयुष्य तरी कसे मानवेल. त्याला वाटले आपण पाचवर्षा मध्ये एकदा जरी येवून गेलो असतो, तर मन मोकळे झाले असते. आत्ता म्हणजे असे आहे कि आभाळ भरून आलाय, आकाशाला काळ्या मेघांनी झाकून टाकलाय आणि पाऊस बरसावा असे वाटतय आणि तो तर तर काही मनावर घेत नाहीये.

मनानी थकलेला माणूस झोपेच्या आहारी जातो खरा, पण मन जागच राहते. आकाशाला लवकर जाग आली आणि आपले आवरून तो खाली आला. सकाळी एक चक्कर मारून यावी असा त्याचा विचार होता त्याला काय वाटले कुणास ठावूक पण त्याची पावले आपोआपच हॉस्पिटल कडे वळली. त्याच्या लक्षात आले कि निमिष आणि इराचे घर हे हॉस्पिटल पासून जवळ आहे, आणि त्याच्या आणि आपल्या आई बाबांना पण तसे काही दूर नाही.

"आकाश.... "

आपल्याला कोण हक मारताय असे त्याला वाटले आणि त्याने वळून पाहिले. अरे विनीता मावशी.

"काय रे, आकाश, ओळख लागतीये का माझी ?"

"काय ग मावशी, तुला विसरून कसे चालेल मला. खाल्ल्या दही-वड्यांना आणि औषधान तरी जगले पाहिजे मला. पण एक सांगू, मी गेलो न तेव्हा जेवढी तरुण होतीस त्या पेक्षा जास्त तरुण वाटत आहेस खरी "

"कंठ फुटला म्हणायचं तुला. तू पाठवलेला ipod वापरते बघ मी. हे बघ रोज सकाळी फिरायला येताना छान उपयोग होतो मला. आणि काय रे माझी खेचतोस काय तरुण दिसते म्हणून. कसा आहेस तू ? आता असे कर माझ्या बरोबर घरीच चल, सकाळचा नाश्ता सोबतच करू, काल चुकला आहेस तू"

"अग पण, निमिष आणि इरा माझी वाट बघतील आणि कदाचित आज आई पण भेटेल"

"म्हणजे, तू घरी गेलाच नाहीयेस ?"

"नाही. ग निमिष पण एकटाच आहे, आणी लग्न घरात माझी विश्रांती पण नसती झाली न म्हणून"

"हं, लक्षात येतेय रे माझ्या एक काम कर, तू त्यांना फोन करून माझ्या घरीच बोलव, नाही तर तू नाश्ता कर आणी मग जा त्यांच्या सोबत बाहेर"

"बर, मी कळवतो त्यांना. तसे मला तुझ्या सोबत पण खूप गप्पा मारायच्या आहेत "

आकाश मागच्या वेळी विनीतामावशी कडे आला होता तेव्हा अनु त्याच्या सोबत होती. मावशीने जेवायला बोलावले होते. खर तर तिने सगळ्यांना बोलावले होते, पण आई-बाबा नाही म्हणाले, म्हणजे त्यांना जमत नव्हते. मग इरा पण नाही म्हणाली, घरी आजी जवळ थांबते असे म्हणाली आणी नाही आली. विनीतामावशी खर तर आईची सहकारीच नव्हे, तर खूप जवळची मैत्रीण. तिला एक मुलगी होती, पण ती लहानपणीच दगावली. मावशीने अगदी स्वतच्या मुलांसारखे प्रेम केले आपल्यावर. खर तर तिची मुलगी असती तरी तिनी आपल्यावर तितकाच प्रेम केले असते, तिचा स्वभावच मायाळू. इरा वर तर विशेष जीव तिचा. मी परदेशी गेलो तेव्हा म्हणाली होती.

"आकाश, जायचे तर जा तुला, पण वर्ष भारत परत ये. मला, इराला आणी तुझ्या आई बाबा न पण तू हवा आहेस. तुझे मन शांत झाले कि ये. आणी फक्त इतकाच लक्षात ठेव कि माणूस परिस्थिती प्रमाणे वागतो. काही लोकांना थोडा जास्त स्वार्थ असतो, काही लोकांना कमी. पण म्हणून एकदम कुणालाच दोषी ठरवू नकोस. इराची काळजी मी आणी आई घेवूच. तू जा निवांत"

"ये रे आकाश"

आकाश भानावर आला

"हे काय, काका कुठे आहेत? "

"बाहेरगावी गेले आहेत, येतील २ दिवसात. मी गेले नाही. तुझी आई म्हणाली कि थांब, तेवढाच आधार"

"हो ते पण आहेच. तुझ्या इतके जवळच तिला कुणीच नाही"

"हो रे. पण खर सांगू इरा खूप समंजस आहे. तिने तुझ्या आईला खूप सावरलाय आणी बाबांना पण आणि हॉस्पिटल पण छान सांभाळते. कधी कधी तर तिचा कामाचा उरक आणी मन लावून काम करणे पहिले कि तुझ्या आजीची आणी काकाची आठवण येते मला. म्हणजे तुझे आई बाबा आणी मी असे एकत्र जितके करायचो न तितके हि एकटे करते जबाबदारिनी. सगळ्या सहकार्यांशी अगदी छान वागते. गर्व जसा नाहीच तिला. खर तर दुर्गम भागात जावून काम करायचे होते तिला पण नाही जावू शकली , पण आमचे कॅम्पस घायचे काम तिने सुरु ठेवलाय आणी वाढवले पण

आहे. पैसे, प्रसिद्धी, यश या सगळ्याचे काही वाटत नाही तिला"

"मावशी हे मी का तुला सांगायला पाहिजे कि रक्तातच आहे तिच्या ते. खर सांगू मी गेल्या ५ वर्षात तुम्हा सगळ्यांशी बोलत होतो; आई, बाबा आणि इरा माझ्या जाण्यामुळे अधिक जवळ येत असले तर बरच आहे, हा विचार करून परत यायचाही टाळत होतो पण इकडे खर काय घडले होते काय माहित."

"सुरवातीला त्रास झाला सगळ्यांनाच. तुझी आई तर, फारच अस्वस्थ होती. इरा, तिला नक्की काय झाले ते कळतच नव्हते न, तुझे आणि अनुचे असे काय बिनसले ते. तू तिला इतकाच सांगितलेस कि तुला परदेशी जायचं आणि तिला जायचे नाहीये, आणि त्यामुळे तुम्ही वेगळे होत आहात. तिला सुरवातीला पटतच नव्हते मग हळू हळू आम्ही तिला समजावले. तू पण तिच्याशी बोलतच होतास. मग हळू हळू ठीक झाले सगळे."

"हो मला माहितीये, ती लग्नासाठी पण तयार नव्हती. म्हणून निमिषनि पण तिला लवकर विचारले नाही, थांबला तो. मग मीच बोललो तिच्याशी. खर सांगू का, मी जेव्हा गेलो तेव्हा फार काही ठरवले न्हवते स्वत:बद्दल"

"मग, आता ठरवले कि नाही ? आई तुझी विचारेल कि नाही माहिती नाही, पण मीच विचारते तुला हक्काने."

"लग्नाबद्दल म्हणत असशील, तर खर सांगू का. पाच वर्ष पूर्वी काहीच ठरवले नव्हते. म्हणजे एक अनुभव कटू आला म्हणून ते नातच नाकारणे नाही पटत मला. मी ज्या वातावरणात, देशात वाढलो तिथे असलेले लग्न संस्थेचे आणि आयुष्याच्या जोडीदाराचे असलेले नाते मला माहितीय आणि मान्य सुद्धा आहे . आपल्या सुख दुखाच्या वाटेवर साथ देणारे कुणी तरी हवाच असते कि ग आपल्याला. मनमुराद एकटे जगायला पण एक पिंड लागतो आणि कदाचित माझा तो नव्हता . पहिले एक वर्ष असाच गेले, सेट होण्यात. मग हळू हळू मी रमलो अग. मी लग्न मुद्दामून टाळले नाही, पण फारसे कुणी आयष्यात डोकावले नाही आणि कुणी आले हि नाही तसे कि लग्न करावे "

"खरे आहे. आपण नाती लादून नाही घेवू शकत स्वतावर. आणि तुझी तयारी दिसली नाही म्हणून आई नि पण काही लक्ष नाही घातले तुझ्या "

"मावशी, पण आई नि कधी मोकळेपणाने मला विचारले सुद्धा नाही. मी एक दोन वेळा सुरवातीला म्हणालो सुद्धा कि तुम्ही कुणीतरी इकडे येवून जा. पण तेव्हा ते माझ्यावर थोडेसे चिडले होते. आईला तर असे वाटत होती कि तिला आणि अनुला जणू मी गुन्हेगार ठरवले आहे आणि हाच माझा अपराध आहे. मग त दरी वाढतच गेली, इच्छा नसताना. तरी इरा होती म्हणून एवढे तरी संबध राहिले नाही का "

"हो, पण इरा मुळेच हि दरी निर्माण झाली न आकाश ?"

"मावशी तू सुद्धा ?"

"नाही आकाश, मी सुद्धा असे म्हणू नकोस. जसा तू तशीच ती, माझ्याकडेच कधीच भेद भाव नव्हता. पण तुला असे नाही का वाटत कि थोडा पजेसिव आणि थोडा हळवा आहेस इरा बद्दल. म्हणजे अनु आणि तुझ्या आई च्या काही काही गोष्टी न पटण्यासारख्या होत्या. खर तर अनु ला इराची वाटणी नको होती, पण सुरवातीला असे नव्हते. तुझ्या आई सोबत सगळ्या गप्पा गोष्टी, बोलणी झाल्यावर तिच्या पण हे लक्षात आले कि, तुझ्या आई ला ती सहज तयार करू शकते, या गोष्टीसाठी. म्हणजे ते घर इराचे राहिलाच असते, तिला प्रेम हि मिळाले असते. पण खास करून हॉस्पिटलमध्ये अनुला, तिच्या वरचढ कुणी नको होते आणि इरा निष्णात डॉक्टर होणार हे आरश्याइतके स्वच्छ होते. तुझ्या आईला हि असे वाटले कि आपल्या या वारशाची हक्कदार अनुच. खर तर तू, पण तू नाकरलास म्हणून तुझी बायको. इराच्या बाबतीत तुझ्या आई बाबांनी सगळी कर्तव्ये पार पडलीच असती, पण कदाचित कुठे तरी हि मुलगी आहे, लग्न झाले कि काय माहित कुठे जाईल किंवा तिला दुर्गम भागात काम करायचे होते, तुमचा तो वारसा इरानि चालवावा असे आईला वाटत असेल कदाचित "

"तिला असे वाटत होते कि तिची तीव्र इच्छा होती तशी ?"

"आकाश, तुझ्या आईबद्दल तू असा विचार कसा करू शकतोस, इराची पण आई आहेच कि ती. पण मुला बद्दल कदाचित थोडी जास्त माया, किंवा मोह वाटत असेल तिला. मुलगा आपल्या जवळ राहावा म्हणून सुनेला असे अडकवून ठेवायचे होते तिला इतकाच "

"तुला पण असे वाटतय का ग कि माझे जर अतीच झाले ? आणि तू म्हणालीस न कि मी हळवा आहे, आहेच मी पण सगळ्यांच्या बाबतीत आहे न, खर सांग मावशी कळायला लागल्यापासून, कधी तरी तुला मुल नाही याची हौस मौज मारू दिली का ग मी? मग तुझ्या बाबतीत मी हळवा झालो तर चालते कि तुला आणि आईला. मग इरा तर बहिण आहे माझी आणि मी possessive नाही तिच्या बद्दल पण protective नक्कीच आहे बद्दल आणि अग सगळ्या गोष्टी मागे काही करणे असतात, परिस्थिती असते. आई बाबा तसे कायम व्यस्त होते, आजी कर्तृत्वान खरी, पण आम्हा मुलासाठी तिनी वेळ दिला. आईला हॉस्पिटल मधेच काम करायला आवडायचे, पण बाबा आणि आजी साठी तिला कॅम्पस आणि बाकी सामाजिक कार्यात भाग घायला लागायचा. इरा कुटुंबात आली आणि मला खूप आनंद झाला, इवलीशी छोटीशी इरा, तिच्या सोबत माझा वेळ मस्त जायचा. मला मित्र होते, पण तरी घरातला एकटेपणा मात्र इरा नीच दूर केला आणि मला हळू हळू आवडायला लागले तिची बारीक सारीक

जबाबदारी घायला. शाळेत सुद्धा मी तिच्या बालवाडीच्या वर्गात हळूच डोकावून यायचो आणि तिला सुद्धा प्रत्येक बाबतीत मी हवाच असायचो. आणि मग वयाच्या एका अश्या टप्प्यावर, जेव्हा मी धड मोठा पण नव्हतो आणि छोटा पण, अश्या काही गोष्टी घडल्या कि मला इरा बद्दल जास्तच काळजी आणि जबाबदरी वाटायला लागली मला. काही काही माणसांशी आपले ऋणानुबंध परमेश्वरानीच जोडून दिलेले असतात. सगळ्याच भावा-बहिणीचे नाते आमच्या सारखे असतील असे नाही; पण म्हणून आमचे नाते नाकारता कसे येयील. माझी फक्त इतकीच अपेक्षा होती कि इरा कोणत्याच बाबतीत डावलली जावू नये. माझ्या जोडीदाराने, माझ्या गुण दोष सकट आणि माझ्या बहिणीसह माझा स्वीकार करावा. समजा इराचे आई वडील हयात नसते तर, हीच जबाबदारी घेतली नसती का ग ?"

"पटतय मला आकाश. कदाचित पाच वर्षापूर्वी जे घडले ते चांगल्यासाठीच असेल आणि तेव्हा तुझे पण वय काय फार मोठे नव्हते. आम्ही मोठ्या लोकांनी जरा समजून घायला हवे होते. तुला २ वर्षात परत आणायला हवे होते आणि इराला पण या आधी लग्नाबद्दल विचारायाले हवे होते. नात्यामध्ये दुरावा येत राहतो कारण सगळेच आपल्या भूमिकेव ठाम राहतात. पण खर सांगू आकाश तुला, आम्हा मोठ्या माणसाना, पालकांना तुम्ही मुलांनी पण माफ करायला शिकले पाहिजे. आम्ही पण माणूसच आहोत. आम्हाला पण चुका करण्याची मुभा आहेच कि आणि आमच्या पिढीला, हि जी तू स्पेस नावाची concept आहे न, ती वयाच्या चाळीशी नंतर मिळाली आहे रे, त्यामुळे सुद्धा कदाचित आमचे असे झाले असेल कि आमच्या सुप्त इच्छा, महत्वाकांक्षा, त्या वयात उफाळून आल्या. ज्या गोष्टी तरुण असताना आम्ही नाकारू शकलो नाही त्याचा उद्रेक असेल बहुधा. आई बाबांना एक संधी दे आणि जर कधी चुकले असतील तर समजून घे इराचा जसा पालक आहेस न, तसाच त्यांचा हो. त्यांना त्याची गरज आहे आणि खर सांगू इरा हि जबादारी घेतीय, तिला काही अंशी मुक्त कर"

"मावशी...."

"हो आकाश, ऐक माझे, आमंत्रणाची वाट नको बघू. घरी जा. आणि किती पण अवघड वाटले तरी तसाच जा आणि राहा, पाच वर्ष पूर्वी सारखा. समज काही घडलेच नाही. तू नॉर्मल वागलास न कि सगळेच तसेच वागतील आणि पाहुणे आणि समाजाची तमा तू कधी पासून बाळगायला लागलास. लग्न मोडताना सुद्धा तू पर्वा केली नाही मग आता का ? का? आणि इरा साठी सुद्धा जा "

"तू म्हणतीयेस ते पटतंय मला. मी निमिष सोबत बोलतो, त्याचे आई बाबा पण यायचे आहेत राहायला आणि बरे झालो बोललो आपण. मला आता खूप मोकळे वाटतय म्हणजे आई भेटेल न आता त्याचा ताण खूप कमी झालाय बघ आणि नाश्ता पण मस्त झालाय "

"हो रे, मला पण बरे वाटले बघ तू आलास आणि एक विचार कर, जर कुणी चांगली मुलगी, मैत्रीण असेल आणि आवडत असेल तर नक्की विचार कर, म्हणजे लग्न सर्व काही आणि आयुष्य तेच असे मी मानत नाही. पण शक्य असेल आणि मना सारखे जोडीदार मिळाला तर हे नाते पण स्वीकार, त्यात हि मझा आहे यार "

"मावशी, तुझे शेवटचे वाक्य सांगून गेले हा कि तू अलीकडेच परत तुज आहे तुजपाशी पारायण केलेस "

"आता कसे, माझा मुलगा वाटतोस, बरोब्बर ओळखलस तू"

"चल मी पळतो आता "

आकाश मावशीच्या घरातून निघाला. असे वाटले कि भरलेले आभाळ मोकळे झालाय, आकाश निरभ्र झालाय आणि सर पडून घेल्याने मृदगंध दरवळतोय. मनाची ती प्रसन्नता घेवून आकाशनि पुढचे पाऊल टाकायचे ठरवले. बेल वाजली, दार उघडले, आई नि ... आई आणि निमिषाच्या घरात. आश्चर्याचा धक्काच होता, म्हणजे आई भेटली कि काय बोलायचे हे तो ठरवत होता आणि अनपेक्षितपणे तीच समोर.

"दादू, काय रे झाले का लाड करून घेवून. मावशीनी खूप कौतुकानी खायला घातले असेल "

"हो ग ", असे म्हणून आकाश आईकडे वळला, मावशीचे शब्द त्याच्या कानात घुमत होते

"आई, चहा करतेस. चहा पिवून, मी आवरतो मग लगेच बाहेर पडू"

"हो करते"- आई इतकच बोलली

"आई, मला पण आणि आले आणि चहाची पात घालून कर "- इरा

"पाहिलेस आकाश, तुझी बहिण आता मला चहा कसा करायचे ते सांगतीये आणि ते पण का, तुझ्यासाठी, तुला हवे तसा. मला आहे ठावूक ताई साहेब "- आई

"काय ग आई "

"बर, इरा, निमिष आणि आई तुम्ही तिघे इथे आहात तर मला काही तरी सांगायचे आहे तुम्हाला "

"काय?"- इरा, निमिष आणि आई, तिघेहि एकदम बोलले आणि तेही काळजीच्या सुरात. बाप रे आता काय सांगेल? मी इथे आले म्हणून हा परत तर जाणार नाही न निघून, पण आपणहून बोलला आणि इरा साठी आलाय तर ...आईच्या मनात भरभर प्रश्न येत गेले.

दादू आईशी बोलेल आपणहून असे वाटले नव्हते, पण नोर्मल वाटला मग वाढला पूर्वीची शांतता होती का ती ? असे

इराला वाटले, आणि निमिष त्याला खर तर काही सुचतच नव्हते.
आकाशनी पुढे बोलणे सुरु केले
"अरे मी काय न्यायाधीश आहे आणि शिक्षा सुनावणार आहे का?, असे चेहरे बनवायला. निमिष पण सॉरी मित्रा... "
"का रे ?"
" अरे काही नाही, मी उद्या सकाळी जायचे म्हणतोय "
"कुठे, अजून लग्नाला चांगले ८-१० दिवस आहेत कि आकाश आणि त्या साठी आलास न तू ?"- आई
"दादू ?"
"अरे पूर्ण ऐका तरी. आई मी उद्या सकाळी आवरून येतोत आपल्या घरी. दुपारी जेवयालो येतोय मी. मी तिकडे असेन तर मला जास्त मदत करता येयील आणि इराची पण धावपळ कमी होईल. आणि निमिषचे आई बाबा उद्या संध्यकाळ पर्यंत येत आहेत, म्हणजे त्याला पण कंपनी आहे आता ."
"आता काय बोलू मी, राहा म्हणालो तर, काकू कम सासूबाई चिडणार आणि होणारी बायको सुद्धा. आणि जा म्हणालो तर मित्र म्हणेल गरज सरो मित्र मरो"
"मला ठावूक आहे निमिष कि तुला त्रास होईल मी इथे न राहल्याने. म्हणजे इरा मला भेटायच्या निम्मित्ताने जास्त येवू शकणार नाही न"
"नको! तसे पण अति तिथे माती. लग्नाआधीच भांडण नको, तू आपला तिकडेच राहा "- निमिष
"ठरले तर मग. आई उद्या प्लीज गाडी पाठव सामान खूप आहे"
"हो पाठवेन, हवे असेल तर बाबा पण येतील"
इरा खुशीत होती. तिला आपल्या भावाचे खूप कौतुक वाटले. किती छान सांभाळून घेतले त्याने, आता आई पण आनंदात आहे. दाखवणार नाही ती, स्वभावाच नाही तिचा. मी हट्टाला पेटले म्हणून इथे तरी आली.
"चला, मुलानो पटपट बाहेर पडूयात. निमिष तुझ्या आई बाबा न पण डायरेक्ट दुकानातच बोलाव. उरकून टाकू खरेदी. आणि निमिष तू आणि तुझा मित्र दोघांनी आज आटपा काय ते"

संथ पाणी वाहते झाले होते, अर्थात आरश्याइतके स्वछ नक्कीच नाही. आई आकाशच्या निर्णयबद्दल काहीच बोलली नाही. आकाशाला खरेदी करायला सुचवून, एक प्रकारे त्याच्या येण्याचे स्वागत केलेच होते तिने, पण घरी येण्याबद्दल ती मौनच होती. पण येवू नको असे हि नाही म्हणाली.

इरा खुशीत होती, आई गप्प होती, निमिष थोडा confuse होता कि आकाशाला जमेल का तिथे राहायला आणि आकाश,...... सगळ्या भावना मिसळून गेल्या होत्या, घरची ओढ, इरासोबत त्या घरात राहण्यातली गम्मत, आई बाबा कसे स्वीकारतील आपले येणे, याचा थोडा तणाव, पण तरी त्याला छान वाटत होते. परीक्षे मध्ये पेपर चांगले गेले कि कसे निवांत वाटते, पण निकालाची हुरहूर राहतच न ते काही तरी सगळे काही छान होईल, असे मनात ठेवूनच सगळे बाहेर पडले. पाच वर्षे म्हणजे एक पिढी नि काळ पुढे सरकला. वाटेत हॉस्पिटल लागले, आई म्हणाली दोन मिनटात येते, मग इरा पण सोबत गेली. आकाश नि सहज पहिले बाहेर तर मोफत उपचार विभागाचे नामकरण झाले होते, इरानी आजी आणि काकाच्या नावाने हा विभाग परत पुनर्जीवित केला होता. काकाची एक हलकीशी स्मृती त्याचे डोळे पाणावून गेली आणि आजीच्या मायेन डोळ्या दाटून आले, इतके कि त्याला मिटून घ्यावे लागले. तो स्वताशी म्हणाला, इरा नि तुमची स्मृती अशी जपली आणि मी ... मी, तुमची स्मृती जपेन आयुष्यभर, माझ्या पद्धतीने.

**भाग सातवा**

आई आणि इरा हॉस्पिटलमधून अक्षरश: पाच मिनिटात आल्या आणि आकाशाची विचारांची मालिका थांबली. वातावरण हलके राहावे म्हणून असेल किंवा मुळातच स्वभाव म्हणून असेल पण इरानि गप्पा सुरु ठेवल्या होत्या. तसा हि निमिष गाडी चालवत असल्यामुळे तिला चिक्कार निवांत वेळ होता.
"५ वर्षात पण खूप बदल वाटतोय ग मला इकडे"- आकाश
"म्हणजे काय, अरे ५ वर्षे हा मोठा काल आहे. दोन वर्ष मध्ये generation gap जाणवते आज काल, हो किनई ग आई "-इरा नि आईला हि संभाषणात आणण्याचा प्रयत्न केला
'आजूबाजूला बदल होत असतातच आकाश, आपण स्वीकारतो कसे त्यावर आहे सगळे. मी एका छोट्या घरातून आणि छोट्या शहरातून आले होते आई बाबा सोबत. शहरात थोडे जास्त पैसे मिळतील आणि आम्हाला शिक्षण चांगले मिळेल या हेतूनी. या शहरात नवीन होते, किती हि हुशार असले तरी सुरवातीला बुजलेच मी. तुझ्या काकांनी आर्थिक मदत केली आणि तुझ्या बाबांनी खूप सांभाळून घेतले मला. तुझ्या बाबांनी आत्मविश्वास दिला मला या शहरात वावरायला. अर्थात त्या वेळा आजच्या इतके मोठे, वाढलेले आणि कॉस्मो नव्हते हे शहर. तुझ्या आजी नि तर माझा कायापालटच केला. एकच वाक्य म्हणाल्या त्या, शहरे आणि आजूबाजूची माणसे बदलत राहतात, आपण हि काळा प्रमाणे बदलायचे, पण आपली नैतिक तत्वे सांभाळून. ज्याच्याकडे ज्ञान, प्रामाणिकपणा आणि माणूस जोडायची कला आहे ना, तो पृथ्वीच्या पाठीवत कुठे हि राहू शकतो, सुखात. माझ्या आयुष्यात हे लोक आले नसते तर माझे आयुष्य नक्की वेगळे

असते कदाचित लौकिक अर्थाने सुखी असते, पण इतकी समृद्ध असते कि नाही कुणास ठावूक? आयुष्यात काही वेळा चुकले असेन मी सुद्धा, शेवटी माणूसच आहे. पण जगताना खूप निर्णय घेण्यामध्ये खूप मदत केली मला तुझ्या आजीने, बाबांनी आणि काकांनी. आज तुझा काका, अवि हवा होता. त्याला खूप आनंद झाला असता, तुम्हा दोन्ही भावंडांचे एकमेकांवर असलेले प्रेम बघून. त्याचे आणि तुझ्या बाबाचे पण असच होते अगदी. पण आता मला या शहरात राहायचा कंटाळा आलाय. कुठे तरी जवळ पास पण निवांत छोट्या गावात राहावे असे वाटतय"

"आई, अजून इतक्यात तरी अहि नाही ह. मला एकटे पडायला होईल."

"इरा, अग एकटे असायला काय झालाय, निमिष आहे कि हक्काचा आता. त्याला कटकट कर आता :) आणि आकाश पण आलाय कि परत आता, बरोबर आहे न आकाश आणि अग मी काय लगेच चाललीय का."

आज आकाशाला आई वेगळीच वाटत होती थोडी. त्याला वाटत पाच वर्षात शहरच काय, पण आई पण थोडी बदलली आहे असे त्याला वाटत होते. स्वत:बद्दल, आपल्या घरंच्याबद्दल आई इतकी मोकळेपणानि कधीच बोलली नाही. आजी, काका, ती आणि बाबा यांचे जुने फोटो खूप वेळा पहिले होते आम्ही. कधी कधी तिच्यासोबत सुद्धा. ती पाहताना रमायची, पण बोलली कधीच नाही, कधी आठवणी सांगितल्या नाहीत. आई खरच एकटी पडलीये का? कि विचार करून करून थकलीये ती कि आपले जे काही बोलणे झाले तेव्हा पाच वर्षांपूर्वी, त्यामुळे थोडी बदलली आहे. कदाचित आज मी तिला थोडे समजून घेवू शकतो, कदाचित काही गोष्टीसाठी माफ हि करू शकतो. तेव्हा मी पण पंचविशीतच होतो कि काही का असेना पण आता मी थोडे समजून घ्यायलाच हवे. मी आणि ते दूर झालो तरी, इरा त्यांना दुरावली नाही हेच विशेष. मलाहि तेच तर हवे होते. आता तर मला उलट, त्या दोघी एकमेकांच्या जास्त जवळ आल्या आहेत असा वाटतय . Two is a company and three is crowd and may be that third personwas me. आणि एक गोष्ट त्याच्या लक्षात आली कि आई नि त्याला परत येण्यासाठी सुचवले आहे बोलता बोलता. खरच मी यावर काहीच विचार नाही केला आहे अजून.

"दादू, तू कसा रे असाच आहेस, निम्म्या वेळा हरवलेला स्वत:मधेच. लक्ष दे न आमच्याकडे. तू मला काय घेवून देणार ते बोल. डॉलर मधले बजेट आहे न "

"घे ग तुला काय हवे ते, मी कधी नाही म्हणालोय का. पण मला असे सांगता नाही येणार काय ते. असे कर आई बाबांनी एखादा हट्ट पुरवला नसेल तर तो माझ्या कडून वसूल कर, म्हणजे सगळेच खुश "

"डन, मग माझे ठरलच आहे"

"हे बरे आहे, तुम्हा बहिण भावांचे. काय हो काकू, म्हणजे लग्ननंतर मी पण एखादा हट्ट नाही पुरवला तर चालेल नाही का, तिचा भाऊ आहेच कि, म्हणजे तेव्हा पण सगळेच खुश"

"असे नाही हा, चालायचे जावई बापू. माझ्या बहिणीची तक्रार येवून उपयोग नाही"

एकंदरीत सगळे हसत खेळत पार पडत होते. निमिषचे आई बाबा पण आले होते. खूप बरे वाटले त्यांना पण. ह्या सगळ्या मुलांना त्यांनी लहानाचे मोठे होताना पहिले होते आणि आकाश आणि इराचे विशेष कौतुक होते त्यांना. तसे ते आकाशाला म्हणाले सुद्धा. आमच्या माघारी, आता निमिषची काळजी नाही, तू आणि इरा आता मित्रच नाही तर नात्यांनी पण जोडले गेले, खर तर निमिषलाही त्याची भावंडे आहेत, पण त्यांचे नाते तुमच्या सारखे नक्कीच नाही. आमचीच मुले आहेत, म्हणजे वाईट कुणीच नाहीत, पण एकमेकासाठी इतका वेळ आणि त्याग करणे त्यांच्या स्वभावातच नाही. गरजेला धावून येतील हि, पण ते तर रक्ताच्या नात्याची ओढ म्हणून.

अजून एक दिवस तर गेला, रात्र सुरु झाली कि आकाशच्या स्वताशीच गप्पा सुरु. उद्या येतो असे आपण म्हणालो आहे खर पण, ... काय होईल, जमेल का आपल्याला? कधी कधी जास्त ओळखीच्या ठिकाणीच गुदमरायला होते कारण अपेक्षांचे ओझे पण तितकाच मोठे असते न ! सकाळी आकाशला थोडी उशीरच जाग आली. बाहेरच्या खोलीत हसण्याचे, गप्पाचे आवाज येत होते. बाबा इतक्या सकाळी कसे आले आहेत, आवाज नक्की त्यांचाच आणि आता इथे कशाला भास होतील, आकाश बाहेर आला, निमिष आणि बाबा गप्पा मारत होते. गेल्या वर्षात कधी तरी विडीओ chat वरच पहिले असेल.

"शुभ प्रभात, साले बाबू , चहा घेणार का ?"- निमिष

"शुभ प्रभात, चहा चालेल, पण आज मीच करतो आपल्या सगळ्यासाठी. बाबा तुम्ही इतक्या लवकर कसे ?, म्हणजे आई म्हणाली होती, तुम्ही याल असे. पण मला वाटले दुपारी याल" आकाशला वाटले, काय बोलतोय हे आपण, साधे तुम्ही कसे आहेत हे पण नाही विचारले. सुचत नाहीये म्हणून चहा करण्याचा बहाणा.

"अरे, लवकर आलो मुद्दामून. आईला म्हंटले, आकाशला थोडे लवकर घेवून, तसाच कार्यलय मध्ये जावून येतो. मग तसेच घरी जावू. खायला पाठवलाय आई नि. आज तुम्हा दोघासोबत नाश्ता. आकाश, थोडा वेगळा दिसायला लागला आहेस;

म्हणजे थोडा खराब झाला आहेस. अर्थात तुला प्रत्यक्ष बघून फार वर्षे झाली .पण बरे झाले आलास आणि घरी येतो म्हणालास हे तर उत्तम. तिथे गरज आहे तुझा. शेवटी इरा म्हणाली तेच खरे"

"काय म्हणाली इरा?, आणि तुम्ही खूप दिवसांनी पहातंय म्हणून खराब वाटतोय, पण असे काही नाहीये, सुरवातीला जर सेट होई पर्यंत गडबड होती, आता तसे निवांत आहे. पण हे इरा काय म्हणाली ?"

"काही नाही रे, तिनी मला प्रॉमिस केले होते कि तु नक्की येशील आणि खरे केले तिने. खर तर आम्हीच तू आलास त्या दिवशीच तुला घरी आणायला हवे होते. पण तू येशील कि नाहीस असे वाटले. मग इरानिच सुचवले इथे राहायचे "

"अरे, मी काही नाही येणार घरी बाबा. उलट मला वाटले कि इतके लोक घरात आणि त्यात मी इतक्या वर्षांनी आलो तर सगळ्यान अवघडल्यासारखे वाटेल. उलट बरच झाले कि, तुम्हाला, आईला, इराला, निमिषला निवांत भेटता आले, मला.

"मला माहितीये बेटा, सगळे एकदा पूर्ववत नाही शकणार. आपल्याला वेळ द्यायला हवा. काही गोष्टी सहवासाने सुद्धा बदलतात. मी पूर्वीच खर तर, माझे मत व्यक्त करायला हवे होते. पण गोष्टी अश्या घडल्या कि मी काही ठाम भूमिका घ्यायच्या मनस्थित नव्हतो. तू आणि अनू एकमेकांना अनुरूप होता असे मला वाटत होते आणि इराचे म्हणशील तर तिला आपल्या घरात तेच सगळे हक्क आणि अधिकार होते जे तुला पण होते. इराच्या बाबतीत मी पण जर हळवा आहे आणि जे घडत होते त्यातले तिला काहीच कळू नये म्हणून माझी धडपड सुरु होती. आणि म्हणूनच मला तुझा निर्णय पटला होता, पण मी ठामपणे तुझ्या पाठी शी उभा नाही राहू शकलो. निर्णयाची जबाबदारी टाळता यावी म्हणून अनेक महत्वाच्या क्षणी मौन होतो, आयुष्य भर. हेच चुकले माझे. अनु काही खलनायिका नव्हती पण अशी महत्वाकांक्षा असलेली माणसे, कधी कधी टोकाला जातात आणि केवळ स्वतचा विचार करतात. याचा मला अनुभव आहेच कि. जे झाले ते योग्य झाले चुकून जरी इराला जास्त काही कळले असते तर ती पोर पार खचून गेली असती. तिच्यामूळेच सारे घडले असे तिला वाटले असते. आणि खर सांगू, काही काही गोष्टी अश्या असतात कि ज्यांचे ओझे आपण आयुष्यभर बाळगतो. ती वेळ माझ्या मुलांवर न येवो असू दे, मी काय बोलत बसलो हे"

"असे काही नाही रे बाबा, उलट मला बर वाटले कि तू इतका मोकळा बोललास माझ्या सोबत. कदाचित इतका वेळ गेल्यामुळे आपण सगळेच आपल्या आपल्या पद्धतीने विचार करत होतो जे घडले त्याचा. काही गोष्टी घडतातच, बदलता नक्की नाही येत. पण जे होते ते चांगल्यासाठीच. कदाचित मी दूर होतो म्हणून तुम्ही तिघे थोडे जास्त जवळ आलात, तुम्ही मुलीची आणि मुली तुमची जबाबदारी निभावली. अजून थोडा वेळ गेला न कि सगळे छान होईल पहिल्या प्रमाणे किंवा त्यापेक्षा हि छान. कदाचित आपण सगळेच एकमेकांना गृहीत धरत जातो आणि गुंता वाढत जातो."

"खरे आहे आणि माझे पण जरा काही गोष्टीत दुर्लक्ष झाले खरे. पण तू मला त्याची जाणीव करून दिलीस. नाही तर, मी स्वताला आयुष्यात कधीच माफ करू शकलो नसतो. तुझ्या आजीला, आणि काकाला मी शब्द दिला होता कि त्यांच्या माघारी मी हे घर दुभंगू देणार नाही. आकाश, मला असे वाटतय कि तू आता परत यायचा विचार करावास आणि स्वताच्या पुढच्या आयुष्याचा पण. इरा नि तिचे एक पाऊल पुढे टाकल आहे. म्हणजे तिची जबाबदरी संपली असे वगैरे नाही. पण तरीही ... किती वाजता निघू यात आपण"

"आलोच , १०-१५ मिनिट लगेच. बाहेरची काम करून परत येवू, मला थोडे समान आवरावे लागेल, मग जावू, दुपारी आपल्या घरी. निमिष तू येतोस का आता आमच्या सोबत "

"नको रे, आज आई बाबा येतात न, त्यांना आणायला जातोय मी. आम्ही इथे २-३ दिवस राहू, आणि मग नंतर कार्यक्रम आमच्या जुन्या घरीच आहेत. कदाचित, मी फक्त झोपायलाच येयीन आणि कुणी आले तर येयिल. इराकडे पण एक किल्ली आहेच इथली, जर कधी लागले तर वापरा तुम्ही पण"

आकाश आणि बाबा बाहेर पडले. आज आकाशाल खूप छान वाटत होते, आई -बाबा दोघे पण भेटले. मनाची घालमेल थोडी कमी झालीये आता. दुपारी आकाश, त्याच्या घरी आला. वास्तूशी पण आपले एक नाते असते, आठवणी असतात. आकाशाला आठवत होते कि ४ एक वर्षाचा असेल तो, आई बाबा त्याला सोडून एक वर्षे, काका राहत होता तिकडे जाणार होते, वैद्यकीय सेवा दुर्गम भागात पोचावी म्हणून. आजोबांची ती एक अट होती. आजी सांगायची कि, आई बाबाची जर टाळाटाळ होतीये असे लक्षात आले आणि आजोबांनी सांगितले कि, मी आधी म्हणत होतो तेव्हा गेला नाही आणि आता, मुलगा लहान आहे, मग त्याची शाळा असेल हे आयुष्यभर सुरूच राहील. दवाखाना आणि आकाशला आम्ही सांभाळू वर्ष दीड वर्षे. तुम्ही जावून या. तशी आकाशाला आजी आजोबांची सवय होतीच आणि अधून मधून ते इकडे येणार किंवा आजी आजोबा तिकडे जाणार आकाशला घेवून असे ठरले. काका पण खूप लाड करायचा आपले, आपण तिकडे जायचो तेव्हा. साधारण १ वर्षे आणि ३ एक महिने झाले आणि आई बाबा आले. आणि त्यांच्या सोबत एक छोटी, गोड बाहुलीसुद्धा आली. माझी इरा, मला किती आनंद झाला होता न तेव्हा. घरात पण खूप दिवसांनी सगळे खुश होते. कारण त्या आधी, आजी आजोबा मधेच खूप शांत शांत असायचे. नंतर मोठा झाल्यावर कळले कि अवि काका हे जग सोडून गेला त्याचे हे दु:ख होते. किती लवकर जातो काळ, आणि आता काही दिवसात इराचे लग्न आहे.

आकाश घरात आला, घर सगळे तसाच होते, त्याची रूम पण. इरा ५ वर्ष पूर्वी दुसऱ्या रूममध्ये शिफ्ट झाली ती तिथेच राहिली, जणू तिने आपल्या साठी केलेला हा पहिला त्याग किंवा आपल्याला दिलेली भेट

"आई दादू आला ग "- इराच्या आवाजात कमालीचा आनंद ओसंडून वाहत होता. तिने आल्या बरोबर त्याचा आणि सामानाचा ताबा घेतला . घर एकंदरीत नॉर्मल वातावरण होते. आकाश येणार याची कल्पना असल्यामुळे असेल कदाचित. खूप दिवसांनी त्याला शांत झोप लागली, कसलीच स्वप्ने किंवा भास न होता. शेवटी आपले घर ते आपले घर, असे वाटलच त्याला.

लग्न घरातले दिवस भरभर जात होते, आकाश आल्यामुळे नूरच पालटला होता. सगळी सूत्रे त्याच्याकडे होती आणि आई बाबा थोडे निश्चिंत झाले. इराच्या हट्टामुळे हे घर परत एकत्र आले होते. इरा तिच्या मैत्रिणी सोबत बाहेर गेली होती, बाबा दवाखान्यात. बाकी सगळे पाहुणे इकडे तिकडे फिरायला गेले होते कारण आज तसा कोणताच कार्यक्रम नव्हता. आई आणि आकाश दोघेच होते.

"आकाश, तुला बरे वाटतय न रे इथे, म्हणजे राहायला ।"

"हो ग, आपल्या घर सारखे सुख नाही बघ जगात. माझे तर सगळे आयुष्याच या घरात गेलाय. मला छान वाटतय "

"एक विचारू ..."

"मी परत येण्याबद्दल काय ठरवलंय असाच न"

"हो"

"आता काहीच ठरवले नाहीये, येयीन हि कदाचित. पण जे काम हातात घेतली ते पूर्ण करून किंवा त्याची पुढची सोय लावून यायला हवे न. आणि इकडे परत येवून .... तसा काही प्रोब्लेम नाहीये. माझे काही जुने सहकारी होते, तुला आठवतील बघ, सानिका, सुमित, कुमार वगैरे, त्यांनी स्वतचा युनिट सुरु केलाय. मला पण बोलवत आहेत, रिसर्चच काम आहे, माझ्या आवडीचे"

"मग तू काय ठरवले आहेस ?"

"अजून काहीच नाही, पण विचार करेन इतकाच सांगतो"

"आकाश, जे झाले ते विसरून जा. सगळी कटुता, समज गैर समज मागे टाकले तरच आपण पुढे जावू शकतो "

"विसरेन कि नाही सांगता येत नाही, पण कटुता नक्कीच नाहीये ग आता. पण तुम्ही इराला काही नाही सांगितले आहे न, मागचे."

"नाही बाळा, तिला हे कधीच कळणार नाही. आमच्याकडून तरी. खर माहितीये, अगदी निमिष आणि त्याचा आई बाबा ना पण."

"पण इराला नाही सांगायचे कुणीच"

लग्नाला फक्त ३ च दिवस राहिले होते आता आणि आकाश अजून एखादा आठवडाच होता इथे. मनावरचे ओझे खूप कमी झाले होते, सगळ्यांच्याच. भविष्य काळात काय होते हे आपल्याला काळात नाही आणि भूतकाळ आपण डावलू शकत नाही हेच खरे आणि वर्तमानात काळात, भविष्याची हुरहूर आणि भूतकाळाची सावली असतेच कि सोबत.

अनु आली आपल्या आयुष्यात, पण बराच काही शिकवून गेली. तिच्या मुळे खूप गोष्टींचा उलगडा झाला मला, माझ्याच मनात असलेल्या प्रश्नाचा. व्यासांनी महाभारत लिहिले आहे असे कि आपल्या सगळ्यामध्ये त्याच्या प्रत्येक पात्रातले काही तरी गुण दोष आढळतोच. सगळेच कधी तरी अर्जुन असतात, कृष्ण मिळाला आपला , तर पेच सुटतो, मला तेव्हा मिळाला माझा कृष्ण आणि आता .... जर नाही मिळाला तर ...... असे आकाशला वाटले. कदाचित आई, बाबा, तो सगळेच आपापला कृष्ण शोधत होते आणि इरा .... ती कदाचित या सगळ्यात नव्हतीच मुळी ...।

## भाग आठवा

आकाश, आणि त्याचे मन त्याच्या नावा इतकच मोठे होते. म्हणूनच त्याला सगळ्या गोष्टींचा त्रास जास्त होत होता. आपल्या घरी राहायला आल्या पासून त्याला एकी कडे बरे पण वाटत होते आणि दुसरी कडे भूतकाळ सतत डोळ्या समोरून जात होता. किती छोटे छोटे प्रसंग, आणि त्याचे किती वेगवेगळे अर्थ प्रत्येकाच्या दृष्टीने. त्याला उगचाच तो दिवस आठवला. इरा आणि आजी, कंटाळा आला म्हणून आठवडा भर, आजीच्या बहिणीकडे, म्हणेज आमच्या मावशी आज्जीकडे गेल्या होत्या. तिला हि त्यांची सोबत हवीच होती. आकाश साधारण १४-१५ वर्षाचा असेल तेव्हाची गोष्ट. आई बाबा आणि तो असे तिघेच घरात होते. आई बाबा काही तरी बोलत होते, आकाश त्याच्या रूममध्ये अभ्यास करत बसला होता, एकदम त्याला इराचे नाव ऐकू आले आणि बाबाचा आवाज थोडा मोठा झाला, ते आई शी इतक्या मोठ्या आवाजात का बोलत आहेत असे त्याला वाटले, आई बाबांचे बोलणे असे ऐकू नये हे माहित असताना पण तो ऐकत होता.

"हे शक्य नाहीये, म्हणजे अधून मधून सुट्टीला जाणे इथ पर्यंत ठीक आहे आणि ती आपल्या मुलांना कधी पण भेटू शकते, पण इरासाठी म्हणत असशील तर शक्यच नाही. तू स्वताच जें ठरवले होतास ते कसे विसरू शकतेस आणि आई, आणि आकाशला तर अजिबात आवडणार पण नाही "- बाबा

"पण अरे मी कायमचे थोडी न म्हणतीये, १-२ वर्षाचा तर प्रश्न आहे. विनिताला पण गरज आहे बदलाची आणि इराला पण

तिथल्या मिलिटरी स्कूलमध्ये जायचे आहे. जवळच तर जायचे आहे"- आई

"नाही, नको. हा निर्णय माझ्यावर लादू नकोस प्लीज. विनीता काही गैरसमज करून घेणार नाही, मी बोलेन तिच्याशी, हवे तर आई पण बोलेल. इराचे काय ती लहानच आहे अजून, नाही ते हट्ट का ऐकतेस. मैत्रिण जाणार म्हणून मी पण जाते इतकाच गणित आहे तिचे " - बाबा

"पण ...."-आई

"मला वाटते, आपण इथच थाबु यात या विषयवर"- बाबा

आकशाला चैन पडलच नाही, विनीता मावशी, आई इरा काय चाललाय नक्की. मी विचारतोच. त्यांना नाही आवडले तरी चालेल.

"आई - बाबा, रागावू नका पण नक्की काय चाललाय? मला काहीसे कानावर पडत होते. इराचा विषय होता म्हणून मी विचारतोय ."

"आकाश तू यात पडू नको, तसे हि तुझ्या बाबांनी हा विषय थांबवला आहे"

"आई, पण मला कळलाच पाहिजे, कारण मला आवडणार नाही असे बाबा म्हणाले, म्हणजे जर हा विषय पुढे गेला असता तर माझ्या पर्यंत येणार होता , मला सांगा काय ते."

"तुझ्या बाबानच विचार"

"ठीक आहे आकाश, मी सांगतो तुला. तस हि कधी न कधी सगळे बोलायला हवच होते, फक्त इतक्या लवकर नको असे वाटत होते मला "

"असे काय आहे नक्की बाबा"

"ऐक, आकाश तुला तर माहितीये कि विनीताचा किती जीव आहे तुमच्या वर ते."

"हो, विनीता मावशी, सख्खी नसली तरी त्यापेक्षा जवळची आहे आपल्याला. आई इतकाच तिचे प्रेम आहे आमच्या वर. पण त्याचे काय आता "

"मावशी एक वर्ष भर पुण्याच्या बाहेर जायचे म्हणतीये, जवळच; म्हणजे सातारा इथे. तुला तर माहितीये तिचे सासर आहे ते आणि समीर काका तिकडे पण एक कारखाना सुरु करायचा म्हणतोय. तर ती म्हणत होती कि एक वर्ष भर आम्ही तिकडेच राहणार आहोत, ती पण तिथेच क्लिनिक सुरु करेल, एखाद्या वर्ष नंतर परत येतील. त्या दोघानपण बदलाची गरज आहे. पण ती तुम्हा दोघांना खूप मिस करेल असे म्हणत होती "

"त्यात काय मग, सातारा जवळच तर आहे, आम्ही सुट्टी दिवशी जाउ कि भेटायला तिला."

"अरे तेच तर आकाश, जवळ आहे म्हणूनच मी तुझ्या बाबाला म्हणत होते कि"- आई

"मी सांगतोय न त्याला, मला बोलू देत मग. विनीता म्हणाली कि दोघापैकी कुणी तरी एक जावू शकेल का तिच्या सोबत, शाळा वगैरे बघेल ती तिकडे"

"काय ? असे म्हणाली मावशी. पण खरच ती का जातीये तिकडे? समीर काका येवून जावून करू शकतोच कि. म्हणजे कळतंय मला कि तिला आम्ही सोबत असावासे वाटतय, पण कसे शक्य आहे ते आणि आई तू काय आई इराला पाठवणार होतीस का, कसे शक्य आहे, किती लहान आहे ती आणि मला नाही चालणार, मी बोलतो मावशी सोबत आणि इतकाच असेल न तर मी जातो"

"अरे आकाश, तुझी महत्वाची शाळेची वर्षे आहेत. इरा तशी लहान आहे अजून, एखादे वर्षे, अगदी नाही करमले तर २ महिन्यात परत येईल कि ती. आणि इराला पण मागे लागलीये मी जाते म्हणून, तिची मैत्रीण पण तिथे गेलीये न"

"नाही आई, शक्यच नाही. असे कसे तू म्हणू शकतेस. इराला सवय तरी आहे का ग, आपल्याला सोडून रहायची आणि आपल्याला तरी करमेल का ? मुळीच नाही, मी सांगून ठेवतोय आणि जायचे असेलच तर मीच जाईन. आणी मावशी सहज म्हणाली असेल तर तू इतके सिरीयासालि का घेतले आहेस. मावशी कधीच असे म्हणणार नाही. ती सहज बोलली असेल आणि तू मनावर घेतलेस. इराचे काय, लहान आहे ती, तिचे सगळाच काही ऐकायची गरज नाहीये हा विचार काढून तक डोक्यातून आणि मावशी पण नाही जाणार मी आताच बोलतो मावशीशी ..."

"आकाश, तू काही बोलणार नाहीयेस विनीतासोबत, फोन ठेव खाली आणि माझ्याशी पण असे का बोलतो आहेस? "

"काय चुकले माझे आई, तू मावशीला समजवायचे सोडून, मला आणि बाबाला समजावत आहेस "

"खरे म्हणतोय ग तो. मी बोलेन आकाश, विनीता सोबत. ती सहजच म्हणाली असेल"

"म्हणजे तुम्हा दोघांना असे वाटतंय कि मीच तयार झालाय इराला पाठवायला आणि तुम्हालाच काय ते विनीता बद्दल खात्री आणि इरा काय फक्त तुमची मुलगी आणि ह्याच बहिण आणि माझी कुणीच नाहीये का ?"

"आई, असे आम्ही म्हणलाय तरी का, तू उगाच विषय भलती कडे नेवू नकोस"

"आकाश, तू खूप बोलतोयेस. ठीक आहे हा विषय इथेच संपला. मी सांगेन विनीता ला काय असेल ते "- आई

"आई, तू एकटी का ? आपण सगळे बोलू न तिच्याशी. कदाचित ती जाण्याचा निर्णय बदलेल सुद्धा. पण इरा इथेच राहील आणि अगदी वाटले तर मी जातो मावशी सोबत"

"आकाश, तू कुठे हि जाणार नाहीयेस"- आई

"आई, इरा गेलेली चालेल आणि मी का नको"

"अरे कारण ९-१० वि महत्वाची वर्षे आहेत, म्हणून"- आई

"आकाश, इरा नाही जाणार बेटा. मी आतच विनीतशी बोलतो "- बाबा

बाबा आईचे काही न ऐकता मावशी सोबत फोन वर बोलले, पण त्यांच्या रूममध्ये जावून. ते आले आणि न राहवूनच मी विचारले

"काय म्हणाली मावशी ?"

"काही नाही रे आकाश, ती म्हणाली मी सहजच विचारले. बोलता बोलता विषय निघाला म्हणून. आणि तसा हि त्यांचे पण अजून नक्की नाही, आणि ती म्हणाली कि मला माहितीये कि हे असे अवघड आहे इराला किंवा तुला चल म्हणणे. सुट्टीला तिकडे किंवा आम्ही पुण्यात राहिलो तर अधून मधून मुले येत राहू देत. नेहमी येतात तशी. मला वाटते विनीताचे पण अजून काही जायचे नक्की नाही आहे आणि माझे तिचे बोलणे झालाय आता."

आकाश इतके ऐकून निघाला आणि तेवढ्यात आई अगदी हळू आवाजात जे पुटपुटली ते त्याला ऐकू गेले

"मी इराचे इतके करून पण तू मला आरोपीच्या पिंजऱ्या मध्ये उभे केलेस "

"असे काही नाहीये अग, मला महितोये कि इराचे तू मुली सारखच :- बाबा

"सारखाच म्हणजे मुलगीच आहे ती माझी "-

आकाश मागे वळला आणि इतकाच म्हणाला मी ऐकले आत मला सगळे पूर्ण सांगा. बाबा सांगायला तयार नव्हता, पण आई मात्र म्हणाली उगाच नंतर गैर समज नको, तो मोठा आहे आता. आकाश ऐकत होता पण त्याला खूप टेन्शन आले होते कि हे लोक काय सांगणार आहेत

आई सांगत होती आणि तो कानात प्राण आणून ऐकत होता

"आकाश, तुला इरा पहिल्यांदा या घरात आली ते आठवते "

"हो आई "

"मग ऐक, ती या घराची मुलगी आहे, पण तुझी सख्खी बहिण नाही ."

"म्हणजे ?"

"सांगते आकाश. एक दीड वर्षे आम्ही बाहेर होतो तेव्हाची गोष्ट. अवि काका पण बाहेरच होता आणि तो परत यायची शक्यता कमीच होता. अगदी निष्णात डॉक्टर होता तो. पण आम्ही इथली जबाबदारी घ्यायला समर्थ आहे हे कळले तसा तो या सगळ्या पाशातून मुक्त झाला आणि जिथे गरज आहे त्याच ठिकाणी सेवा करायची असे त्याने ठरवले. त्याला खर तर संसार, मुले या पाशात अडकायचे नव्हते. तुझा जन्म झाला न तेव्हाच मला म्हणाला, कि हा माझा पण मुलगाच आहे कि, बाप म्हणून जे काही प्रेम द्यायचे असेल ते याला देईन."

"आई, ते सगळे खरय, म्हणजे मला तसे माहित नाही, पण अवि काका मला आठवतोय. मी खूप लहान होतो तरी सुद्धा. पण हे सगळे तू आता का ?"

"ऐक आकाश. तुला आठवत एकदा तू जुने फोटो पाहून म्हणाला होतास कि इराचे डोळे आणि अवि काकाचे डोळे सारखे वाटतात, म्हणजे त्यातले भाव सारखे वाटतात. वाटणारच न कारण ... "

"कारण, म्हणजे तुला असे म्हणायचे आहे कि इरा अवि काकाची , आय मीन ती अवि काकाची मुलगी.................

"पण आई कसे शक्य आहे, तू आताच तर म्हणलीस कि काकाला हे सगळे नको होते, मग इरा ... आणि मला कसे नाही माहित आणि आज्जीला, आणि आजोबाना ?"

"सांगते सगळे सांगते. आजी आजोबाना माहित आहेच. तू लहान म्हणून तुला सांगितले नाही आणि तशी गरज पण वाटली नाही "

"हो आकाश, आम्हाला तुला सांगायची गरज वाटली नाही कारण इरा आपलीच आहे आणि तुमचे इतके प्रेम बघून तर आम्हाला खूप आनंद वाटतो"- बाबा

"पण मग इराचि आई ? तिला इरा नको होती"

"नाही नाही, तसे काहीच नाही दुर्दैवाने अवि काका आणि इराची आई दोघे पण या जगात राहिले नाहीत. इराच्या जन्म नंतर काही महिन्यातच ती गेली आणि अवि काकाला इराला सांभाळायला मदत म्हणून आम्ही त्याचेकडेच गेलो आणि इराचे लळा लागला आम्हाला. पण तरी अवि काका परत यायला तयार नव्हता आणि इराला पाठवायलासुद्धा. म्हणून थोडे दिवस आम्हीच राहलो आणि नंतर थोडे दिवस आजी आजोबा येणार असे ठरले होते"

"पण आई मला काही आठवत नाहीये कि, काका मला म्हणाला कि काकू आणलीये तुला किंवा बहिण आहे तुला "

"नाही राजा, तू लहान होतास आणि दुर्दैवाने तुझी काकू या घरात येवूच नाही शकली. कारण त्यांनी तिकडच लग्न केले आणि ते पण आजीचा आग्रह म्हणून. तुझी काकूसुद्धा काका सारखीच होती, तिला पण आपली रुग्ण सेवा दुर्गम भागात करायची होती, म्हणूनच ते दोघे कदाचित एकमेकांच्या प्रेमात पडले आजीच्या लक्षात आले एकदा, ती तिकडे असताना. आजी म्हणाली लग्न करा मग , तुमचे ध्येय एकाच आहे तर संसार त्याच्या आड येणार नाही. आधी काकाला पटले नाही. शेवटी लग्नाला एक मान्यता आहे ती फक्त प्रेमाला नाही. तरी हि काका लगेच तयार झाला नाही. पण काय माहित, एकदा फोन केला आणि म्हणाला आजी आजोबाना कि लग्न करेन, पण इकडेच, अगदी सध्या पद्धतीने. काय झाले काय माहित, पण त्याने ठरवले. नंतर आम्हाला म्हणाला कि त्याला जेव्हा जाणवले कि संसार आपल्या कामाच्या आड नाही येणार तेव्हा ठरवले. आजी आजोबा गेले तिकडे, काकाचे लग्न झाले. काका काकू इथे येणार आणि मग एक छोटी पार्टी करायचे असे ठरले खरे. एक दोन महिने असेच गेले. आपल्या काही जवळच्या नातेवाईक

मंडळीना आजोबांनी पत्राने कळवले लग्न झाले म्हणून. पण काकूचा हे घर बघायचा योग आला नाही. तिला लगेचच दिवस गेले आणि प्रवास करणे शक्य नव्हते. खर तर तिने सगळाच अचानक घडले रे. पण काका म्हणाला इतक्यात कुणाला सांगू नका, कारण तिची परिस्थिती नाजूक आहे. म्हणून मग मी आणि बाबा तिकडेच गेलो, तशी पण आजोबांची अट पूर्ण करायची होती. इराच्या जन्मानंतर जेमतेम २ महिने जगली ती. तू इकडे त्यामुळे आजी आजोबा दोघे एकदम येवू शकत नव्हते. एकेकटे येवून भेटून गेले."

"काकू गेली, पण मग काका ?"

"आम्ही तिथेच होतो आकाश. काका एके दिवशी जवळच्या गावातून येत असताना, त्याच्या कारचा भीषण अपघात झाला."- आईचा गळा दाटून आला आणि साहजिकच होते काका फक्त तिचा दीर नव्हता तर तिचा मित्र हितचिंतक आणि godfather होता.

"फार काही आशा नव्हती. तरी आमचे प्रयत्न सुरु होते. शुद्धीत आला, तेव्हा वाटले कि सुटलो, हा परत आला. "- बाबा

"हो रे आकाश, आम्ही दोघे पण तसे फार काही मोठे नव्हतो वयाने. एक आईविना छोटे बाळ आणि तुझा अवि काका असा मरणाच्या दारात. पण फार धीराचा तो. कदाचित आम्हाला शेवटचे भेटायचे याच इच्छाशक्तीने तो शुद्धीवर आला, काही तासच. मला आणि तुझ्या बाबाला बोलावून घेतले आणि म्हणाल संसारात पडलो हे ठीक होते, पण या पोरी साठी वाईट वाटते, आई पण गेली आणि आता मी. पण तुम्ही आहात, माझी हि आठवण तुम्ही जपा. मला माहितीये कि तुम्ही आई वडिलांचे प्रेम द्याया. आकाश मला काही सुचत नव्हते रे. अवि दादाला काय वाटले काय माहित, मला म्हणाला तू आई चे प्रेम देशील ग, पण आकाश हिला बहिणीचे प्रेम देईल का ग ? चुलत म्हणाले न कि उगाच महाभारत आठवते ग आणि कधी कधी वाटते तुम्ही किती पण केले तरी आई बापा विना पोर म्हणून तिला केवळ सह्रुभित मिळेल का ग लोककडून. तसे नको ग व्हायला. आणि पुढे जावून इराला पण असे नको वाटायला कि तुम्ही तिचे सक्खे आई वडील नाही आहात आणि आकाश चुलत भाऊ आहे. मला काय वाटले माहित नाही आकाश पण मी अवि दादाला म्हणाले कि माझीच मुलगी असेल हि. पण तुला चालेल का कि तुझी नाही तर माझी मुलगी म्हणून जिला जग ओळखेल, तुझे अस्तित्व हिरावून कसे घेवू आम्ही. तुझा काका मला म्हणाला कि शक्य असेल तर आम्ही अवीची म्हणून नाही तर आमची म्हणूच इराला इकडे आणावे त्याचे नाही, आमचे नाव लावून. नाही म्हण्याचे प्रश्नच नव्हता. म्हणजे आम्ही जरी तिला अविदादा चे नाव लावले असते तरी तेवढच प्रेम दिले असते. पण अवि दादाची इच्छा आम्ही पूर्ण केली "

"आई, बाबा ... हे इराला ?"

"तिला कसे माहित असेल, जर आम्ही तुला सुद्धा नाही सांगितले. पण आकाश हे तुला आता माहितीये तर"

"खरे सांगू आई, धक्का बसलाय. पण मला इराबद्दल जे वाटतंय ते तसाच आहे. कारण मला ती माझी बहिण आहे हेच सत्य माहितीये आणि मला तेच स्वीकारायचे. पण आई एक विचारू ?"

"विचार कि "

"मी विसरू शकेन कि इरा सख्खी नाहीये, पण तू कधी हे विसरू शकशील ?"

"आकाश, तू काय बोलतो आहेस हे. मी इराचे तितकाच केलेय जितके तुझे, किंवा त्या पेक्षा जास्त काळजी आहे मला तिची"

"हो आई, काळजी आहे माझ्यापेक्षा जास्त. पण मला असे वाटते कि काळजी जास्त आहे इराची जबाबदारी म्हणून. अवि काकाच्या ओझ्याखाली, पण प्रेमाचे काय? "

"आकाश, मला हे अजिबात आवडले नाहीये तुझे असे बोलणे. इरा बद्दल मला काहीच वाटत नाही असे का वाटतय तुला. खरे सांगू तुझ्या नंतर इरा आली आणि आम्ही भेद जोवू नये म्हणून तुझ्या नंतर इराचा विचार केला आणि नंतर कधी तुझ्या साठी भावंडाचा विचार सुद्धा नाही केला आणि तूं ... मला दुखावले आहेस तू आकाश "

"आई असे नाहीये, बाबा तू पण ऐक. मी असे नाही म्हणत आहे कि तुम्ही सावत्रपणा करताय. पण कधी कधी असे जाणवतंय. म्हणजे आई मला हक्काने ओरडते तशी इराला नाही. म्हणजे ती इराचे काही कमी करत नाही, पण त्या करण्यात कधी कधी असे वाटत कि आई टेन्शन मध्ये आहे. जणू चांगली आई होण्याचे बर्डन आहे तिच्यावर. आई च्या काही काही वागण्याचा संदर्भ आता लागतोय मला. ती त्या जबबदारी खाली आदर्श आई होते हि, पण तरी "आई" नाही वाटत. "

"आकाश, इरा तुला असे म्हणाली ?"- बाबा

"नाही बाबा. उलट तिला असे च वाटतय कि ती आईची आणि तुझी जास्त लाडकी आहे. बाबा आई सारखे तुला पण टेन्शन आहे का ?"

"माहित नाही आकाश, मी इतका विचार नाहीच करत, पण एक आहे कि तिला पहिले कि कधी कधी जीव गलबलतो, अवीची आठवण येते. आणि असे वाटते कि चुकून या भरात इरा ला सत्य समजणार तर नाही न "

"आई, बाबा, आपण हे इराला कधीच नाही सांगायचे. तसे हि अवि काका तिला आठवत पण नाहीये. तू खूप खुश आहे या आयुष्यात आणि तिला या घरात सगळे तेच मिळेल जे तिला मिळायला हवे "

"आकाश, तू पण हे विसरून जा आणि खरच मी इराला मुलगीच मानते, विश्वास ठेव " आई

आई बाबा आणि आकाश काही वेळ नुसते बसून होते. आकाश म्हणाला बाहेर जावून येतो, तो बाहेर पडला पण खूप अस्वस्थ वाटत होते त्याला, इरा अवि काकाची मुलगी. त्याला आणखीनच भरून आले, अवि काका त्याला आठवत होता आणि इराची आता खूप आठवण येत होती. कधी एकदा इरा भेटतीये असे त्याला झाले होते. पण त्याला एक वाक्य खटकले होते आईची "मुलगी मानते", मानते म्हणजे ? मानायचे म्हणजे ती मुलगीच आहे न तिची. आईचे वागणे वाईट नाहीये, पण तरी पण चुकून कधी आपल्याबद्दल जे वाटते ते इराबद्दल नंतर वाटेल का ? अर्थात आई नि इरासाठी खूप केलाय आणि करतीये ती आणि तिने सुद्धा अजून एका मुलाचा मोह टाळला आहेच कि. काही काळात नाहीये, उलट सुलट विचार . तो निमिष कडे गेला, पण निमिष हि भेटला नाही. त्याला काय वाटले काय माहित तो सरळ विनीता मावशी कडे गेला.

"अरे आकाश , या वेळी इथे ?"

"मावशी थोडा वेळ बसतो तुझ्याकडे ?"

"का रे बरे नाही वाटत आहे का ?

"नाही ग "

"मला माहितीये आकाश, तुझ्या आईचा आता फोन आला होता. तिला तुझी काळजी वाटतीय "

"मावशी, तुला सगळे माहितीये"

"हो, मला आधी पासूनच माहितीये. अवि दादा तर मला पण जवळचा होते आणि माझ्या साठी इरा आणि तू दोघे हि सख्खी भावंडेच आहात"

"मावशी, तू शिफ्ट होणार आहेस का ग खरच. नको न ग जावू"

"ठरले नाही रे राजा, पण नाही जाणणार हा काळजी नको करू . मी आहे "

"मावशी, आई इरा ला तुझ्या सोबत पाठवणार होती न"

"अरे असे काही नाही आणि मी सहज म्हणाले रे "

"पण, आई नि इराचे नाव का घेतले. का तुम्हा दोघींना पण ती आई विना पोर म्हणून कणव वाटतीय, प्रेम नाही"

"आकाश, असे काही नाहीये राजा. माझ्या तर मनात असे काही नाही"

"आणि आईच्या? "

"राजा, एक सांगू तिच्या पण मनात तसे काही नाही. तिचे इरा वर खूप प्रेम आहे, पण इरा अवीची मुलगी आहे हि ती नाही विसरू शकत आणि म्हणून जास्त जबाबदारीचे ओझे वाटते तिला कि कुणी असे म्हणून म्हणजे तुझे बाबा, आजी आजोबा यांनी कि ती कमी पडली किंवा असे काही. पण तुला सत्य स्वीकारणे सोपे आहे, तुला एकेच बहिण आहे, लहान पणापासून तुझे मन तिच्यावर बहिणीप्रमाणे प्रेम करतय. पण आपले मुल नसताना ते आपले म्हणून स्वीकारणे अवघड आहे. मी असे नाही म्हणत कि तुझ्या मनात ज्या शंका आहेत त्या चुकीच्या आहेत. तुझी आई माझी मैत्रीण आहे म्हणून मी सांगते कि ती इरावर प्रेम करेल, माया करेल आणि तिला तिचा हक्क पण देईल, पण त्याच वेळा हे पण सांगते कि कधी कधी ती हे नाही विसरू शकत कि तू तिचा मुलगा आहेस आणि इरा अविची मुलगी. हे सगळ खूप अवघड आहे बाळा, नात्यांचा हा गुंता, मनाचा गोंधळ."

"मावशी, काका म्हनला म्हणून आई नि त्याचे नाव नाही लावला का ग इराला ?"

"हो आकाश, तुझा काका खूप हुशार आणि दूरदर्शी होता, जरी तुझे आई बाबा इराला प्रेम देतील हे माहित असले तरी, इराला पण ते काका काकू आहेत हे कळेल तर ती त्यांच्याशी कशी वागेल असे हि वाटले त्याला. तुम्हा मुल पण कदाचित मोठे झाल्यावर कसे वागाल, एकमेकांशी कसे नाते संबध ठेवाल असे वाटले त्याला. ज्या कारणाने मुळात भांडणे होतील तेच अवि दादांनी टाळले. तू लहान आहेस अजून, पुढे दुनियादारी मध्ये काय काय अनुभव येतात अरे. सख्खे काय आणि चुलत काय"

"मावशी, मला कळतच नही ग, म्हणजे मला भीती वाटतीये कि मी कधी चुकून इराशी, तिला कळेल असे वागणार नाही न, मला स्वताची आणि तिची खूप काळजी वाटतीये "

"आकाश , मी एक सांगू. विचार नको करू. फक्त एक कर, इराचा भाऊ आणि मित्र आहेस न, मग तसाच राहा. जस्ट बी हर ब्रदर, लव हर."

"मावशी , किती सोपे केलेस ग तू हे :)"

आकाश नि ठरवले कि मी इराचा भाऊ, मित्र आणि …आणि मी आजपासून, अवि काका सुधा होईन . इरा आणि आजी परत आल्या, इरली काही कळले नाही आणि कळणार नाही याची काळजी सगळ्यांनी घेतली. एक दिवस मात्र, आकाश आजी जवळ खूप रडला, आजी ला त्याने सांगितले कि तो आयुष्यात इरा ला कधीच अंतर देणार नाही, तिचे सगळे त्याच मायेने करेन जे त्याने भाऊ म्हणून करायला हवे आणि तितकच लाड करेन जे अवि काकांनी केले असते. आजी त्याला इतकाच म्हणाली कि आकाश तू हे तर करच, पण तुझ्या आई ला समजून घे ती मनानी मोठी आहे पण शेवटी माणूस आहे, कधी कधी आपल्या मुलाचा मोह पडला तर, तिला समजून घे आणि जाणीव करून दे तिला लगेच समजेल. तिचे पण इरा वर खूप प्रेम आहे.

आकाश वर्तमानात आला आणि त्याला क्षणभर असे वाटले कि मधली सगळी वर्षे गळून पडली आहेत. खरी गोष्ट सगळ्यांनाच माहिती आहे, निमिषच्या घरीपण. कधी तरी नंतर चुकून समजलाच तर गैरसमज नकोत म्हणून हि

काळजी घेतली होती आई बाबा नि, पण हे चांगलाच झाले. हाच विचार करून आजीने अनु आणि तिच्या घरी सांगितले, पण तेव्हा मात्र आमचे अंदाज चुकले. अर्थात बराच झाले म्हणा, लग्ना आधीच काय होते ते स्पष्ट झाले होते
फोनच्या रिंग नि आकाश ची विचार शृंखला तुटली
"हेलो, मी निमिष बोलतोय"
"हा बोल रे, काय विशेष ? कुणासाठी फोन केला आहेस नक्की"
"अरे, काही नाही सहजच. खर तर तुझ्यासाठीच. तू लग्न झाल्यावर २-३ दिवसात खरच परत जाणारेस ?"
"बातमी पोचली का तुझ्यापर्यंत, हो जाणारे म्हणजे सध्यातरी जायला हवे, बघू मग काय ठरतंय ते"
"मला वाटतंय मित्रा कि आता परत ये, खरच. आम्हाला सगळ्यांना तू इथे हवा आहेस अरे कमीत कमी मी इराची काळजी घेतो कि नाही वॉच ठेवायला तरी ये "
" नक्की, विचार करेन. झाली का तयारी सगळी "
"सुरु आहे रे हळू हळू, तू बर आहेस न"
"हो"
"बर मग ठेवतो"
"चालेल"

निमिषनि जसे समजून घेतले तसे अनु का नाही समजून घेवू शकली. एकाच सत्यावर वर माणसे किती वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होतात, विचार करतात. अनुला कळले मात्र कि इरा चुलत बहिण आहे, तिचा दृष्टीकोनच बदलल. जे काही आहे ते आपलच आहे, तसाही तिला हॉस्पिटलमध्ये कुणी तिच्या पेक्षा वरचढ नकोच होते, अधिकाराने आणि कर्तृत्वाने सुद्धा आणि जेव्हा तिच्या लक्षात आले कि आईनी इराचे खूप मनापासून केले आहे, तिने आईला हेच पटवून दिले कि जे तुम्ही केले ते फारच काही तरी दिव्य आहे आणि जणू इरा वर उपकारच केले आहेत. त्याला त्याचे आणि अनुचे शेवटचे बोलणे आठवले
"आकाश, तुझे मला पटत नाहीये. तू खरच परदेशी जाणार आहेस "
"हो, १ वर्षभर तर जावे लागेल "
"पण, मग मी काय करू इथे ?"
"तू, हॉस्पिटल सांभाळ न, नाही तर चल माझ्यासोबत. एक वर्ष पण नाही, ६ महिन्याचा प्रश्न आहे"
"मला नाही जमणार, दोन्ही इथे तुला सोडून राहणे किंवा तुझ्यासोबत येणे"
"का ग ? तुला भीती वाटतीय का ?"
"कसली भीती ?"
"हेच कि तुझे इथले महत्व कमी होईल "
"म्हणजे ?"
"अनु, माझ्या सगळे लक्षात येतेय. इरा माझी सख्खी बहिण तर आहेच पण एक सांगतो हे सगळे तीचेच आहे. तुला काय माहित ग आमच्या घराबद्दल"
"मी असे काही कधीच म्हाले नाहीये "
"मी ऐकले आहे. तुझे आणि आईचे बोलणे आणि मगच बोलतोय. तू का आई ला हे पटवून देतीयेस कि इरा आज न उद्या या घरातुन लग्न होवून जाणार आहे आणि हि हक्काची भाषा नव्हती आमच्या मनात"
"हे बघ आकाश, मी काय इरा ला घराबाहेर काढा असे नाही म्हणाले, पण शेवटी जे काय मिळवले आहे ते तुझ्या आई बाबांनीच न. आणि इराबद्दल सगळी कर्तव्य करत आहेत कि ते. जर मला तुला, तुझे हक्क मिळावेसे वाटले तर काय चुकीचे आहे ? आणि समज तू डॉक्टर झाला असतास तर. आणि तसे हि इरा म्हणत्ये न कि ती हॉस्पिटल मध्ये काम करेल नाही तर बाहेर सुद्धा जाईल एखादे वेळेस. तू उगाच गैरसमज करून घेतला आहेस आणि तसे पण इरा अजून शिकतीये. आई वडील नसून सुद्धा तिला कुटुंब मिळाले आहे. तू उलट तुझ्या आईचे आभार मानायला हवे आहेस "
"अनु, जास्त बोलातीयेस. तुला काय माहित ग, अवि काका बद्दल आणि आमच्या घराबद्दल. हे जे तुला सासू ग्रेट वाटतीय न, ती आज डॉक्टर आहे कारण अवि काका होता, तो होता म्हणून तिचे माझ्या बाबाशी लग्न झाले आणि माझ्या आजी आजोबा नि उभे केलेला हा डोलारा अवि काकांनी नावा रुपाला आणला त्याच्या सुरवातीच्या काळात. आई बाबा जो पर्यंत सक्षम होत नाहीत तो पर्यंत सगळे सेट करून ठेवले त्याने इथे आणि मग कसलाही मोह न ठेवता तो निघून गेला. त्याने इराला पण आईकडे त्याच विश्वासाने दिले, स्वताचे नाव मागे ठेवण्याचा मोह पण ठेवला नाही ग त्याने. त्याला हेच नको होते, कि इरा कडे कुणी असे पाहावे. त्याला माझ्या आई बद्दल खात्री होती, पण आम्ही मुले मोठी झाल्यावर कशी वागू या विचाराने त्याने हा मोह टाळला आणि ऐक माझ्या आई ने जे केले ते फक्त कर्तव्य म्हणून नाही. इरा पण अवि काकाची मुलगी आहे, इराने नकळत दाखवून दिले, माझ्या प्रेम खातर तिने तू म्हणशील ते ऐकले, कसलाच मोह न ठेवता. रूम शिफ्ट केली, तुला जे जे आवडेल ते देवून टाकले. तिने तुला आपले मानले आणि तू ?"`
"आकाश, मला आरोपी करू नकोस. मी बाहेरची आहे म्हणून आरोपि. मग हेच प्रश्न तुझ्या आईला विचार कि जे मला विचारात आहेस. त्यांना का पटत होते मग माझे आणि इराचे काय, तिला जेव्हा कळेल तेव्हा ती मागेलच कि हक्क, बघू तेव्हा पण ती तुझ्या वर इतकाच प्रेम करते का आणि सोडून देईल का तिचा हक्क तुझ्यासाठी "
"अनु, तू असा इतका कडवट विचार करत असशील असे मला वाटत नव्हते. म्हणजे आपण सुखात राहावे, यशस्वी असे

प्रत्येकाला वाटते आणि तसे होईल इतके आहे आपल्याकडे, पैसा, बुद्धी आणि संधी सुद्धा. आणि स्पष्टच सांगतो, माझ्या आईला जेव्हा आरोपीच्या पिंजर्यात उभे करायचे हे माहितीये मला, तू सांगायची गरज नाहीये. हो एखादे वेळी तिला तुझे पटले पण असेल, पण इरा २ महीन्याची असल्यापासून सगळे केलेय तिने इराचे आणि इरासाठी स्वताच्या अजून एका मुलाचा मोह टाळला आहे तिने, कमीत कमी तो एक मोठा त्याग आहे तिच्या नावावर. ज्यासाठी मी तिला हजार वेळा माफ करेन, कळले. तू हे सगळे डोक्यातून काढून टाक. आपण एक वर्षभर बाहेर जावून येवू किमान सहा महिने, सगळे ठीक होईल मग"

"आकाश, एक मिनिट. एक तर माझे काही चुकले आहे असे मला नाही वाटत. अगदी वेळ आली तर इरा ला तिची वाटणी मिळेलच कि, तू का घाबरतोस आणि तिला कळेल न तेव्हा तीच मागेल बघ "

"अनु, आता शेवटचे ऐक, जे काही आहे ते तिच्या बाबाचे म्हणजे अवि काकाचेच आहे, उलट तो काही न घेत गेला. त्यांनीच माझ्या आई बाबाला, विशेषत: आईला दिलाय सगळे जे त्याचे आणि नंतर इराचे आहे . माझाच काही नाहीये त्यात, कळले. आणि एक इराला हे कुणी हि सांगणार नाहीये कधीच, आमच ठरले आहे तसे, सगळ्यांचे "

"तुमचे ठरलाय न, मी माहिये त्यात. लगेच असे नाही, पण कधी तरी इराला सत्य कळायलाच हवे. तिला पण कळू दे कि ते, तिला असे न सांगणे हा तिच्यावर आणि तिच्या आई वडिलांवर अन्याय आहे "

"अनु, तू न्याय आणि अन्यायाची भाषा नको करूस. हे तू तिला सांगणार नाहीयेस कधीच आणि जर तू हे करणार असशील, आणि तुझ्या डोक्यातून हे सारे जाणार नसेल तर...।"

"तर काय, आकाश, आणि मी तुला सांगतीय कि माझे काय इराशी वैर नाहीये, पण सत्याकडे का पाठ फिरवत आहात तुम्ही आणि एक तू कुठे हि जाणार नाहीयेस, आपण इथेच राहतोय, तुझे परदेशी जाणार तू डोक्यातून काढून टाक"

"इरा माझी बहिण आहे आणि हेच सत्य आहे, मी राहीन तेच सत्य स्वीकारून आयुष्यभर आणि ते पण आनंदात. आपण जातोय कमीत कमी ६ महिने तरी आणि मला वचन दे कि तू इराला कधीच काही सांगणार नाहीस"

"वचन वगैरे काय, कोणत्या जमान्यात जगता रे तुम्ही लोक, उद्या काय प्रसंग येतील काय माहित. कमीत कमी तिचे लग्न होईल तेव्हा तिच्या होणाऱ्या साथीदाराला तरी सांगणार न तुम्ही, मला सांगितले तसे, हे सत्य. मग तेव्हा तर तिला कळेलच कि, मग या वचनाचा काय उपयोग. लक्षात ठेव तिला जर कुणाकडून कळले किंवा तेव्हा कळले न तर तिला वाटेल तू तिचा विश्वासघात केलाय, आणि ती बघ तुझा राग राग करेल"

"अनु, तू काहीही उगाच माझ्या मनात भरवू नकोस, हे बघ तुला माझे म्हणणे मान्य आहे कि नाही तेवढे संग ते सांग"

"नाही मान्य. दोन्ही म्हणणे, इराला आज न उद्या सत्य सांगावे लागेलच आणि वेळ आली तर मीच सांगेन आणि दुसरे म्हणजे मला परदेशी नाही यायचे आहे."

"ठीक आहे तर मग हेच जर तुझे ठरले असेल तर आपण वेगळे होवूयात"

"आकाश, हे काय बोलतोयस तू ? पंधरा वीस दिवसावर वर लग्न आहे आपले आणि तू ,..."

"माझ्यासमोर तू दुसरा काही पर्याय ठेवला नाहीयेस"

"मी ठेवला नाहीये ?, आकाश तूच जागा हो, ज्या इरासाठी तू मला नाही म्हणतोयेस न, तीच एक दिवस तुझ्याकडे पाठ फिरवेल कि नाही बघ, खरे कळल्यावर. अरे सख्खी भावंडे जिथे आपापल्या संसारात अडकल्यावर, एकमेकांना नकळत पाठ फिरवतात तिथे बाकीच्यांचं काय ?"

"अनु, भविष्यात नशिबाने काय वाढून ठेवले आहे मला नाही माहित, पण आज काय करायचे तेच फक्त माझ्या हातात आहे आणि आता मला नाही वाटत कि आपण एकत्र राहू शकू. विचारातच फरक आहे. कदाचित तू तुझ्या जागी बरोबर असशील हि, पण मी नाही अश्या विचारांसोबत राहू शकत. "

"आकाश, मी तुला आणि मुख्य म्हणजे इराला कधीच माफ नाही करणार. तुम्ही काय स्वताला जागा वेगळे समजता का रे ? तुमचे ते प्रेम आणि आम्ही काय ? मी पण प्रेम केलेच तुझ्या वर पण, तुला कळलच नाही"

"अनु, आम्ही जगावेगळे नसू हि पण कदाचित, पण आमच्यात हे ऋणानुबंध नियतीनी जोडले आहेत, मला जेव्हा काही माहित नव्हते न तेव्हा पासूनच मी आणि इरा इतके जवळ आहोत, आमचे नाते आमच्या पुरते आहे आणि ते कुणी समजावून घेतले नाही तरी चालेल, पण कमीत कमी त्याचा आदर करावा इतकीच माझी अपेक्षा होती आणि प्रेमाचे म्हणशील तर तू केले असशील माझ्यावर प्रेम, मी नाकारत नाही. मी स्वीकारले पण होते. पण तू जर माझ्या इरा बद्दलच्या भवनाचा आदर केला असतास तर कदाचित मी तुझ्या प्रेमाचा स्वीकार. जावू दे, आपण हे जुळवू नाही शकत आता, मला माफ कर, आपण इथेच थांबू आणि एक कारण विचारले तर हेच माझ्या परदेशी जाण्याचे सांगू, जर माझ्यावर प्रेम केले असशील तर इतक ऐक माझे. प्लीज"

"ठीक आहे आकाश, तुझ्या घरी आणि माझ्या घरी पण तूच सांग. पण एक सांगू आयुष्य असे एका नात्यासाठी कधीच थांबू शकत नाही. माझे पण नाही आणि तुझे पण आणि इराचे पण. एकटे जगणे अवघड आहे, तू एकटा पडशील आज न उद्या"

"अनु, प्लीज . "

अनु निघून गेली, आकाश एकटाच मागे राहिला. आपण हे असे करायचे ठरवून आले नव्हतो. दोघानीच काही दिवस परदेशी राहणे, तिला आवडेल असे वाटले होते आणि त्यामुळे सगळे व्यवस्थित होईल असे वाटले होते, पण काही तरी भलतेच झाले. आता हे सगळ्यांना सांगयचे म्हणजे..... आणि इराला काय सांगू. तिला तर धक्काच बसेल. आई बाबा तरी समजावून घेतील का?
आकाश घरी आला तर, घरी आधीच बातमी लागली होती. अनुचा फोन येवून गेला होत.
"आकाश, आम्हाला तुझ्या सोबत बोलायचे आहे. इरा बेटा, तू थोडा वेळ विनीताकडे जा"
"आई, मला एकदा दादूशी बोलू दे न ग "
"बरे ठीक आहे, तू बोल त्याचाशी अन जा मग . "
"म थाबते न ग आई, प्लीज "
"इरा, तू अजून लहान आहेस बेटा "
"ठीक आहे आई. पण दादू काही चुकीचे करणार नाही ग, त्याचे ऐकून तरी घे "
"इरा, आम्ही शांतपणे बोलू"
"दादू, तू खरेच परदेशी जातोयेस का रे ? गरजेचे आहे का ? नंतर जा न ? लग्न करून काही दिवसांनी. नाही तर का ही वर्षांनी जा. अनु खूप गोड मुलगी आहे रे, ती आणि तू मस्त आहात आणि आईला पण ती किती आवडते न आणि मला पण"
"इरा, राजा तू काळजी नको करू. बघू काय होते ते आणि माझ्यावर विश्वास ठेव ग तू, जे काही होईल त्यात आपले सगळ्यांचे भले आहे "- आकाश
"माझा विश्वास आहे रे तुझ्यावर. तू चुकीचे काहीच करणार नाहीस. मी जाते, पण मी परत येयीन तेव्हा सगळे आनंदी झालेले असू दे. मला फोन करा. "
"इरा, निघ तू, मी फोने करते तुला "- आई
इरा गेली आणि आकाश अजूनच एकटाच पडला
"आकाश, हा काय वेडेपणा आहे "- आई
"वेडेपणा काय आहे त्यात? हे बघ मी काय असे ठरवून गेलो नव्हतो. पण तिचे बोलणच असे काही होते कि माझ्यासमोर दुसरा पर्याय नव्हता"
"आकाश, अरे फक्त काही दिवसांवर लग्न आहे आणि आता तू म्हणतोयेस कि, त्या लोकांचा तरी विचार कर." - बाबा
"बाबा, एक विचारू तुला. अनुवर विश्वास आहे आणि माझ्यावर नाही"
"असे नाहीये आकाश, पण तुमचे वयच असे काही आहे. माणूस टोकाचा विचार करतो एकदम. तू काय किंवा अनु काय. आम्ही मोठ्या माणसांनी मध्ये पडायला हवे न. इतके महत्वाचे निर्णय तुम्ही आपापले घेवून कसे चालेल."
"आई, एक वेळ मी परदेशी नाही जाणार : पण अनु नि इराला काही सांगायचे नाही असा शब्द तर दिलाच नाही पण उलट तिला सांगणे गरजेचे आहे हे मला पटवून देत होती . ती कधी तरी इरा ला सांगेल या दडपण खाली खाली मला आयुष्य भर जगायचे नाहीये. अनु वाईट नाहीये, पण महत्वकांक्षी तर नक्कीच आहे, तिला जे हवे आहे ते मिळवण्यासाठी ती या गोष्टीचा उपयोग जर आयुष्य भर करत राहील तर आमचे नाते फुलेल का? त्यातून केवळ आनंद मिळेल का आई? तूच सांग ?"
"अरे असे काही नाहीये, अरे या वयात असे वाटते, आपल्याला सगळे यश, पैसा, प्रसिद्धी, मान सगळे मिळावे म्हणून. हळू हळू आपण मोठे होते आणि बदल होतात. "- आई
" आई, मान्य आहे आहे कि माणूस वय वाढेल तसा, बदलतो पण तरी त्याचा मूळ स्वभाव नाही बदलत आणि मुख्य म्हणेज मी तिला म्हणताच नाहीये कि माझ्याइतके प्रेम तिने इरावर करावे. फक्त माझ्या भावनांचा आदर करावा. मला असे वाटले होते कि आम्ही थोडा काळ जर बाजूला राहू; तर आमचे नाते रुजेल आणि तिच्या मनातले हे सगळे जर बाजूला पडेल. पण तिला काही मान्यच नाहीये. बर इथेच राहायचे म्हंटले, तर तिच्या आजच्या बोलण्यावरून इराला कधी कधी तिच्या वागण्यातून काही तरी जाणवेल याची मला भीती वाटतीये. अनुची तेवढी क्षमता नाहीये, आई; पण आता प्रत्येक वेळी तूच तिला.... तुझी पण चूक आहे. तू का नाही तिला ठणकावून सांगितले. ती बोलली आणि तुला पटले. मला वाटतय कि विनीता मावशीसोबत तुझे यावरूनच वाद झाले आणि तिने हॉस्पिटलमध्ये लक्ष काढून घेतले आता मला लक्षात येतेय सारे. हे असे इराला रूम शिफ्ट करायला लावणे, इर्रीन्ग्स घेणे, हॉस्पिटल मध्ये आपले महत्व वाढवण्याचे प्रयत्न आणि आई तू हे सगळे ऐकलस. मी इथे नव्हतो, तू का इराला सांगितले नाही कि रूम बदलायची नाही आणि अनुला पण तेव्हाच समज दिली असतीस तर बरे झाले असते. तू माहित असून दुर्लक्ष केलेस. अनु बाहेरची आहे, पण तू, तू तर आमची आहेस न , मग? "
"आकाश, तू आई शी असे बोलू शकत नाहीस "- बाबा
"खरेय, आईशीच का? तुम्ही पण तर होता कि इथेच. तुम्ही तर कधीच कशात लक्ष घालत नाही. म्हणजे प्रश्नच नको, समजा जर आई चुकत असेल, तर तुम्ही तिला का नाही सांगितले. इराच्या जबाबदारीचे ओझे जितके आईवर आहे, तितके तुम्ही कधीच घेतले नाहीत. जबादारी नको, म्हणून निर्णय नको. आपण आणि आपले हॉस्पिटल बस. निर्णय सगळे आजी आणि आईकडे"

"आकाश, बस. खूप बोलला आहेस. आम्ही ऐकून घेतोय म्हणून. तू काय आम्हाला प्रश्न विचारणार का रे आता ? आई वडील आहोत आम्ही तुझे. "
"आणि विसरू नको आई, इराचे पण आहात "
"ते आम्ही नाही विसरलोय आकाश, मी हि नाही आणि तुझे बाबा पण नाही. तूच पूर्वग्रहाने बघतो आहेस आमच्याकडे. इराचे काय कमी केलेय किंवा करतोय रे आम्ही का तू एकट्यानेच मक्ता घेतला आहेस तिचा अनु घरात नवीन येणार होती म्हणून चार गोष्टी तिच्या मनासारख्या केल्या तर काय बिघडले आणि इरा सख्खी बहिण असती तर जशी वागली असती तशीच वागली म्हणून मी काही नाही बोलले."
"पण, अनु तशी वागत नव्हती न. तिने लगेच वागणे बदलल, ते नाही दिसले तुला "
"हो दिसले, पण मला इतके काही वाटले नाही त्यात. आणि तसाही मी आणि तुझे बाबा समर्थ आहोत इराची काळजी घ्यायला. तुला आणि अनुला यात पडायचे कारण नाही. आम्ही अवि दादांना वचन दिले होते, आमचे आम्ही बघून घेवू आणि आता आपण अनुकडे जातोय आणि सगळे सुरळीत करू. माफी मागा, दोघे एकमेकांची आणि मोठ्या मनानी एकत्र या परत."
"आई, ते शक्य नाही. ती किती कडवट विचार करते, ते कळत नाहीये का तुला? आणि मला नकोय हि अशी मुलगी आयुष्यात. ती इराला नक्की सांगेल एखादे दिवशी नाही तर मला तलवारीच्या टोकावर धरेल आयुष्यभर. भांडणेच होतील यातून, मनस्ताप होईल तिला पण आणि मला पण. कशाला हा अट्टाहास."
"आकाश, अरे कोणतीही मुलगी तुझ्या आयुष्यात आली तरी हे असे होणारच, तू असा किती काळ एकटाच राहणार आणि आज न उद्या इराला पण साथीदार मिळेलच कि तिचा, मग ?"
"तेव्हाचे तेव्हा बघू. मला समजून घेणारी अशी एखादी मुलगी असेल कि, तिच्याशीच लग्न करेन मी, पण आत अनुशी नाही. आता लगेच मला हा विचारच नकोय. प्लीज"
"आणि इराला काय सांगशील आकाश ?"- बाबा
"सांगेन जे सगळ्यांना सांगितलाय तेच. परदेशी जाण्यावरून मतभेद झाले म्हणून आणि अनुचे म्हणाला तर ती खूप प्रक्टिकल आहे, she will move on easily."
"इतके सोपे नाहीये आकाश. खेळ नाहीये हा. मनात आला मांडला आणि मनात आले मोडला. आम्ही इतके दिवस तुम्हाला मोकळीक दिली हेच चुकले, लगेच लग्न झाले असते तर बरे झाले असते. हि नसती भानगड"
"आई, इतके सगळे सांगतोय मी तुला अनुबद्दल आणि तरी पण... तू तरी मला समजावून घेशील असे वाटले होते आणि लग्ना आधीच झाले हे बरे झाले उलट. कधी कधी अशी नाती तुटतात हेच चांगले आहे. मी शेवटचे सांगतोय मी हे लग्न मोडलाय, मला काही नाही बोलायचे यावर"
"आकाश, आताताई पण करू नको, शांतपणे विचार कर. आम्ही जातोय अनुकडे आणि लग्न होईल त्याच तारखेला कळले. माझा शब्द अखेरचा आहे आणि इरा आमची जबादारी आहे, ते ओझे तू उचलू नकोस"
"आई, मग माझे पण ऐक, मी हे लग्न करणार नाही हा माझा पण शब्द आहे आणि आता खरच आता तुम्हीच इराची जबाबदारी पार पाडा. मी तसाही पुढच्या महिन्यात परदेशी जाणार होतो , ते नक्की आहे. "
"आकाश, तू तसा लहान आहेस अजून. पूर्ण आयुष्य आहे तुझ्यासमोर आणि हा काय वेडेपणा आहे. किती समजवायचे रे तुला. आज अवि दादा असता तर आणि इरा त्याचीच मुलगी असती तर, हे असे काय सगळे घडलच नसते. त्या पोरीच्या नशिबात काय आहे कुणास ठावूक, आई गेली, वडील गेले आणि आता तिच्यामुळे तू लग्न मोडतोयेस, त्या पोरीला जर चुकून कळले तर काय वाटेल तिला, याचा तरी विचार कर."
"आई एक तर, इराला मध्ये घेवून दोष तिच्या माथी मारू नको आणि तिला हे कधीच कळणार नाही तिच्याशी तुम्ही नका बोलू मी सांगेन काय असेल ते आणि अवि काका जगाला असते तर बरे झाले असते असे वाटायला लागलाय मला आता. त्याला जर कळले असते न कि तुम्हाला इतके ओझे वाटतय, तर जगाला असता बिचारा , आपल्या पोरीसाठी "
"आकाश, इतके वाईट आहोत का रे आम्ही, काय असे कमी केलाय रे आम्ही तिचे आणि तू काय असे करणार आहेस वेगळे. तुला नाहीच कळणार, आई बाप होणे किती अवघड आहे ते पण"
"ते पण काय, एका अनाथ मुलीचे हेच न. ऐक मग ती अनाथ कधीच नव्हती, हे जे सगळे आहे न तिचेच आहे हक्काचे, आपण सगळ्यांनी फक्त सांभाळले इतकाच आणि आता तुम्हीच तिची काळजी घ्या कारण मी वर्ष भर तरी नाहीये इथे."
इरा संध्याकाळी उशीरच आली, घरात सगळे सामसूम होती. ती आकाशाच्या रूममध्ये गेली.
"दादू, तुझे हे नक्की आहे, तू लग्न नाही करत आहेस "
"हो नक्की आहे आणि ऐक इरा पुढच्या महिन्यात मी जातोय एक वर्षासाठी "
"आणि मी ? एकटी राहू इथे "
"एकटी का बाळा, आई आहे बाबा आहेत, मावशी आहे, निमिष आहे. हा आता आजी नाहीये, पण हे सगळे आहेत कि आणि आपण तर टच मध्ये राहूच कि आणि सुट्टीत तू तिकडे ये आणि मी तरी. वर्षभर जाईल बघ पटकन"
"पण मला तुझे कारण नाही पटले, नक्की काय झालाय ?"

"तेच कारण आहे इरा, माझ्यावर विश्वास ठेव. हा विषय थांबवू आपण इथेच आणि मी जर वेळ निमिषकडे जावून येतो हा"
इराला खरे तर पटतच नव्हते, आई बाबा पण तेच सांगत आहेत. आईला आकाशचे वागणे पटले नव्हते आणि परदेशी जायचे तर तर अजिबातच. हि अशीच कटुता मनात राहिली आणि आकाश परदेशी गेला. एक वर्षे झाले तरी परत यायची चिन्हे नव्हती, इरा डॉक्टर झाली, हॉस्पिटलचे काम बघू लागली, पुढचे शिक्षण पण सुरु झाले, त्याला जाणवत होते कि आई बाबा आणि ती आता जास्त जवळ आले आहेत, त्याचा पासून दुरावलेले तीनही जीव एकमेकांना आधार देत जगात आहेत आणि म्हणून आकाशनि परदेशी राहणे वाढवले. पण यामध्ये त्याचे आणि आई बाबा मधले अंतर वाढतच राहिले. तो कडवट पणा अजून तसाच होता. चूक होती पण कुणाची, आणि माफ मागायची तर कुणी. या सगळ्या काळात हे कुटुंब जोडून ठेवले ते इरा नि. आई बाबा नि विचारले नाही तरी आकाशचे सागेल तपशील ती त्यांना सांगायची, त्यांचे सगळे आकाशाला सांगायची. निमिषनि मात्र आकाशाला वचन दिल्याप्रमाणे, इराला आणि आई बाबान हि लागेल ती मदत केली होती. हसत खेळत ठेवण्यात त्याचा खूप मोठा हात होता. जी इरा त्याला छोटीशी बाहुली वाटत होती, त्याच बाहुलीच्या प्रेमात तो पडला होता, अगदी सहज, नकळत आणि त्याला हा खरा भातुकलीचा डाव तिच्यासोबत मांडायचा होता, पण आकशा नि अनुचे असे झाल्यापासून त्याला जाणवत होते कि इरा हे सगळे टाळतिये. तिला मी आवडत असलो तरी, तिला ते मान्य होत नाहीये. आकाश सेटल होवू दे, मग मी विचार करेन असे तिने नकळत त्याला सांगितले होते. आत फक्त आकाशच होता जो तिला समजावू शकत होता आणि आकाशनीच तिला लग्नाला तयार केले आणि इथे आला तिच्या हट्टासाठी.

बघता बघता इराचे लग्न पार पडले, ते पण अगदी विनाविघ्न. इरा नि अगदी हुशारीने आकशकडून एक वचन घेतले कि तू पुढच्या ६ महिन्यात परत येशील आणि त्याला ते द्यावाच लागले. आकाशाचा जायचा दिवस येवून ठेपला. पण तो परत येणार असल्यामूळे सारेच खुश होते. इरा आणि निमिष दोघे त्याला सोडायला जाणार होते. आकाश परत येवून त्याच्या जुन्या सहकार्यांना जोइन करणार होता.
आकाश, इरा आणि निमिष तिघे विमान तळावर होते, आपापल्या विचारात. निमिष खुश होता, त्याचा मित्र परत येत होता आणि त्याचे प्रेम त्याला मिळाले होते. आकाश पण आनंदात होता, त्याच्या लाडक्या इराला तिचा जोडीदार मिळाला होता आणि तो पण निमिष, म्हणजे काळजीच मिटली आणि मुख्य म्हणजे इरा तितकीच जवळ राहणार होती त्याच्या आता आणि इरा, ती खुश होती कारण निमिष सोबत लग्न झाले म्हणून, या हि पेक्षा आकाश परत येणार म्हणून आणि त्या हि पेक्षा आई बाबा आणि आकाश एकत्र आले म्हणून.
"निमिष, मी येतोय लक्ष ठेवायला तुझ्यावर. इरा कुठाय रे ?"
"अरे ती फोन वर बोलतीये "
"खरे सांगू, खूप हलके वाटतय रे मला. आपल्या माणसात आल्यावर खूप बरे वाटतंय. ६ महिन्याच्या आतच मी येईन इथे. इरा मुळे मी आणि आई बाबा एकत्र आलोय आणि छान काय आहे माहितीये, आम्हा दोघांना समजून घेणारा तू आहेस तिच्या आयुष्यात"
"काळजी करू नको आकाश, इराला मी कधीच काही नाही सांगणार नाही"
"काय रे माझ्याबद्दल काय बोलताय तुम्ही "
"काही नाही, तू चिडलीस कि काय करायचे ते सांगतोय ग तुझ्या निमिषाला "
"असू दे. निघ तूं आता, वेळ झाली बघ आणि बोलूच आपण. ये परत लवकर मी खूप वाट बघतोये आणि मी रडायच्या आत पळ"
"इरा ... काळजी घे, मी येतोच आहे "
निरोप छोट्या काळासाठी असेल तरी तो घेणे जड जाताच नाही का
"इरा, तू रडतीयेस. अग तो येईल परत "- निमिष
"नाही रडत नाहीये मी. एक सांगू तुला, फक्त तुझ्या आणि माझ्यातच. आज मला खूप बरे वाटतय, आकाश परत येतोय, आई बाबा आणि तो आता परत एकत्र येतील आणि सगळे छान होईल. आज तो मनावरचे एक ओझे कमी करून गेला आहे आणि मी पण एक ओझे कमी केलाय. माझ्यामुळेच ५ वर्ष पूर्वी सगळे घडले. आई बाबा दुरावले त्याला आणि अनु पण गेली त्याच्या आयुष्यामधून "
"इरा, असे काही नाहीये, तुझा काय संबध"
"माझ्या काय संबध ते मलाही माहितीये आणि तुला हि न निमिष"
"म्हणजे? "
"मला सगळे कळले आहे, माझ्याबद्दल कि मी, म्हणजे माझे बाबा म्हणजे आकाशचे अवि काका आणि आकाश माझा... खर तर तो माझा सगळे काही आहे. भाऊ, मित्र आणि बराच काही ."
"इरा पण तुला हे सगळे कसे कळले आणि कधी आणि माहित असून हि तू कुणालाच का नाही ?"
" आकाश गेला खरा, पण १ वर्षे झाले आणि अनु अचानक भेटली, तिचे लग्नाचे परत बघत होते. मला राहवले नाही, मी तिला विचारले काय झाले ते. ती म्हणाली तुझ्या भावालाच विचार. मी खूप हट्टाला पेटले, जेव्हा मी तिला म्हणाले कि तुझ्यामुळे आकाश आम्हाला दुरावला तेव्हा तुला मला खरे

सांगावेच लागेल तेव्हा मात्र ती म्हणाली कि माझ्यामुळे... सगळे... माझा विश्वास बसे ना. मग विनीता मावशीला विश्वासात घेतले आणि तिच्यापाशी बोलले मी कारण मला आई बाबा, हो आई बाबच आहेत ते माझे, जन्म नाही दिला त्यांनी तरी त्यांना मला दुखवायचे नव्हते अजून आणि आकाशाला तर नाहीच नाही. मग मावशीला म्हंटले कि मला कळले आहे हे त्यांना सांगू नको. त्यांनी जे जीवापाड जपले. केवळ माझ्यासाठी. ते जपल्याचे समाधान आणि सुख मला हिरावून नाही घायचे आहे कधीच. काही गोष्टींच्या न कळलेल्या चांगलाय नाही का !. आणि खर सांगू , अरे ज्यांनी मला जन्म दिला ते मला आठवत हि नाहीयेत, मला आईचा स्पर्श आठवतो तो या आईचाच, बाबांचा आधार वाटला तर याचा बाबांचा आणि कुटुंब आकाशशिवाय कसे पूर्ण होईल माझे. हेच माझे कुटुंब आहे ते आयुष्यभर धडपडत राहिले. मला सत्य कळू नये म्हणून; कारण त्यातच हित होते माझे आणि त्यांचे पण आणि मला आता हि कसरत आयुष्यभर करायची आहे, प्रत्येक जण आयुष्यात आपले असे काही घेवून येतो आणि आपल्या माणसासाठी जर हे ओझे उचलावे लागले तर ते उचलण्याचा एक आनंद असतोच कि आणि आत माझी turn आहे न. मला यात मदत कर, जर कधी मी कमजोर पडले चुकले तर, तू माझा कान पकडून मला आठवण करून दे. मी खूप नशीबवान आहे कि इतके प्रेम करणारी माणसे माझ्या अवती भोवती आहेत आणि खरे सांगू आईचे प्रेम आहे रे माझ्यावर, नेहमीच होते. आकाशाला हि कळेल तिची बाजू एक दिवस. ती जर कधी चुकली असेल तर आम्ही तिला समजावून घ्यायला हवे, कारण आमच्या फार चुका पोटात घातल्या आहेत तिने."

"इरा, मी आहेच ग, पण तुझे कौतुक वाटते मला आणि तुला हे माहित असूनही ...."

"जे होते ते चांगल्यासाठीच. तुला एक गम्मत सांगू "

"काय ग ?"

हे माझे रहस्य माहित असलेली अजून एक व्यक्ती आहे, जी आकाश सोबत परत येणार आहे आणि हे आकाशाला पण माहिती नाहीये. तुला काय वाटले तू एकटाच आहेस का समजूतदार या जगात जोडीदार म्हणून"

"म्हणजे ?"

"म्हणेज काय ? आयुष्य सोपे आहे. त्रिकोणा पेक्षा चौकोन चांगला नाही का ? त्याच्यावर प्रेम करणारी अजून एक व्यक्ती आहे त्याच्या आयुष्यात "

इरा मनमोकळे हसली, आणि निमिषपण. काही दिवसापूर्वी ती आकाशाला घेवून पुण्याच्या प्रवासाला निघाली होती आणि आता याच जागी तिनी आकाश, निमिष, आई बाबा, विनीता मावशी आणि... जे त्यांच्या नात्याला समजून घेतील अश्या साऱ्यांना घेवून एक नवीन प्रवास सूर करत होती. एक गोष्ट त्यांची पण संपली पण थांबली नाही....

***

**शीतल जोशी**

**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**

**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

**चारोळ्या**

## चारोळ्या

मी बेभान उनाड वारा,
सारी गंध मिरवली होती तरी आज
तुझ्या मोकळ्या केसात
माझी वाट हरवली होती

***

दिसला वाटेत आज मला
एक चेहरा ओळखीचा
कधीकाळी माझा ह्दय
होता त्याच्या मालकीचा

***

**किरण प्रकाश बोरकर**

**रत्नागिरी – खेड**

**मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६**

## मराठी विचारधन

उदय पावणारा सूर्य ज्याप्रमाणे रात्रीच्या अंधाराचा नाश करतो, त्याचप्रमाणे आत्मज्ञानाने सर्व भ्रम नष्ट होतात...

***

**संग्रहित**

**लेख**

# *काही न जुळलेले गुण!!!*

आमचे काही न जुळलेले गुण, काही म्हणजे केवळ म्हणायला, खरे तर सगळेच गुण-अवगुण न जुळणारेच. गेली काही वर्षे एकत्र घालवल्यावर, आता जर कुठे सगुण-निर्गुणच्या जवळ आहोत आम्ही. म्हणजे फार काही विशेष नाही, न जुळलेल्या गुणांना आम्ही उभयतांनी संमती दिली आहे आणि सोयीस्कररित्या 'काना-डोळा' केला आहे. ऐकून न ऐकल्यासारखे आणि बघून न पाहिल्यासारखे. असेच काही दाखले..

**प्रवेश एक : वर्ष पहिले**

ती (मनात) : आज मस्त पुस्तक वाचणार, ही कादंबरी आज संपवायचीच आहे, तसेही उद्या सुट्टी आहे, आज रात्रीत वाचून होईल.

तो (मनात) : आज जर लवकर झोपावे, पहाटे लवकर उठून, कॅमेरा घेऊन बाहेर पडता येईल. तळजाई, पाषाण लेक असे कुठे तरी.

ती: हे काय, इतक्या लवकर आवरले आज तुझे, झोपायला रेडी एकदम :)

तो : अगं, उद्या जायचं न पहाटे,!!!! जायचं न फिरायला उद्या?

ती: अरे, पण पुस्तक वाचायचा प्लान होता माझा, नाही गेलो उद्या तर नाही का चालणार? परत जाऊ ना, अगदी पहाटेच बाहेर पडू मग.

तो: ठीक, फिर कभी. :)
प्रवेश तोच : वर्ष दुसरे, तिसरे, चौथे

तो : तू किती वेळ वाचणार अजून?

ती: हा काय प्रश्न आहे का? साहजिकच आहे, पुस्तक संपेपर्यंत.
तो: उजेडात झोप नाही लागत मला.

ती: ?, मी काय करू मग? मला वाचायचे आहे न? मी दुसऱ्या खोलीत जाऊन वाचते मग. अलीकडेच जर उजेडाचा त्रास व्हायला लागला आहे

तो: हे बघ. विषय भलतीकडे नकोय. आणि सकाळी लवकर उठायचे आहे न आपल्याला? मग लवकर झोपायला नको का!!!!

ती: हे कधी ठरलंय?

तो: अग, असे काय, मागच्या रविवारी बोललो की आपण की असे एखाद्या वीकएंडला जाऊ या प्रभातफेरी मारायला.

ती: बरोबर, मान्य, आपण बोललो, पण एखाद्या म्हणजे लगेच पुढच्या, हे कधी ठरले? मनानेच ठरवत नको जाऊस.

तो: तू अशक्य आहेस.

ती: हे बघ, जायचे की नाही हा इश्यू नाहीये, आमच्यात एकट्याने ठरवायची पद्धत नाहीये.

तो: आमच्यात पण, दिलेला शब्द मोडण्याची पद्धत नाहीये.

ती :तूपण अशक्य आहेस. मला वाचू दे आता, मूड लागलाय वाचायला मस्त

तो: मलापण माझा मूड स्पॉइल नाही करायचा आहे, गुड नाईट.

ती: आमच्यात गुड नाईट हसऱ्या चेहऱ्याने म्हणतात.

तो: आमच्यात हसरा चेहरा असाच असतो.

ती: आधी तर (लग्नाच्या) वेगळाच असायचा.

तो: आमच्यात नंतर (लग्नाच्या) असा करायची पद्धत नाहीये, पण सोबतच्या लोकांवर अवलंबून आहे ते.

ती: तुला खरे तर वाचायची आवड आहे, तरीपण तू असा का वागतोस न, "I dont know". जाऊ दे.

तो: हो, मीपण वाचतो. पण, मी एका वेळी एकच पुस्तक जवळ ठेवतो, ४-५ पुस्तके उशाशी ठेवण्यातले लॉजिक, परमेश्वरालाच ठाऊक. पुस्तक वाचणे छान आहे, पण ती पुस्तके छानपण तर ठेवायला पाहिजे न?

ती: मला लहानपणापासून अशीच सवय आहे, कधीपण मूड बदलू शकतो आणि मग पुस्तकही त्याप्रमाणे. मला पुस्तके नसली ४-५ जवळ, तर नाही चालत आणि हे माहीत असून, मग कशाला बोलायचे? काही लोकांना मोबाईल वाजला तरी न उचलण्याची सवय असते की रिप्लायसुद्धा करत नाही, जसे काही बाकीच कामाशिवायच रिंग करत असतात.

तो: कोणता विषय कुठे जातोय?

ती: जिकडे वळवला, तिकडेच वाहतोय..

तो आणि ती (मनात): इतका वेळ भांडण्यापेक्षा झोपलो असतो, तर निम्मेतरी वाचून झाले असते.

तात्पर्य : सकाळी उठायला उशीर, पुस्तक पूर्ण वाचणे आणि फिरायला जाणे दोन्हीचा पोपट!

प्रवेश तोचः जुने झाल्यावर ५ वर्षे व नंतर

तो: नवीन पुस्तक आणले आहेस काही वाचायला?

ती : नाही, जे हवय ते नाही मिळाले.

तो: जर मिळाले तर

ती ; बहार येईल

ती ; वाह, गिफ्ट माझ्यासाठी?

तो : म्हणजे काय आणि कुणासाठी?

ती: काय सांगता येत नाही आजकाल, खात्री केलेली बरी .......................आणि ती गिफ्ट आहे : टेबल लॅम्प, बुक शेल्फ आणि जे हवे आहे ते बुक :)
भांडण सुरू होण्यास स्कोपच नाही.

ती: मस्त आहे, एक नंबर. मला आठवतंय, तू मला दिलेले पहिले गिफ्ट 'पुस्तक संच- बोक्या सातबंडे'. त्याच दिवशी वाटले अरे हाच तो, याच्याबरोबर आयुष्य काढता येईल.

तो : आणि भांडतापण येईल ....मनसोक्त

ती : अशक्य आहेस तू!!!

तो : मग पुढचा रविवार पक्का न?

ती : येस, पक्का, अगदी तुझ्या पहाटे नको, माझ्या पहाटे जाऊ या. तू मागच्या वेळी काढलेले तिथले फोटो इतके मस्त आलेत की मला आवडेल प्रत्यक्ष पाहायला.

तात्पर्य: ही केवळ 'adjustment' नाही, हे मुरायला लागलेले प्रेम आहे बहुधा!!!! सवयींचीसुद्धा सवय होते, काही सवयी आवडतात, काही बदलतात, काही आवडत नाहीत आणि बदलतही नाहीत, कारण त्या केवळ सवयी नाही, तर व्यक्तिमत्वाचा एक भाग असतो अविभाज्य. आपल्याला तो काढून नाही टाकता येत, पण आपण एक तर तो दुर्लक्षित करू शकतो किंवा आपल्या पद्धतीने थोडा वळवू शकतो. खरे तर हेच संभाषण दोन भावंडातही होते, पण त्या निरागस वयात ते नात्यांच्या बांधत, मायेत विरघळून जाते. पण हेच तो आणि ती मध्ये मात्र नक्कीच भांडण होऊ शकते...:)
पण नाते बळकट व्हायचे, तर थोडी भांडणे हवीतच, नाही का? आणि त्याला भांडणच म्हणावे, उगाच मतभेद वगैरे नको, म्हणजे मन कसे मोकळे होते, आरश्यासारखे स्वच्छ.
म्हणजे मग कसे आपण निखळ प्रेम करायला आणि आनंद घ्यायला रिकामे :)
भांडणं सारखी प्रेमामध्ये सजा नाही
पण भांडणाशिवाय नात्यामध्ये काहीसुद्धा मजा नाही
भांडणाशिवाय, नात्यांच्या दोन टाकामध्ये
कुणीसुद्धा तिजा नाही
आणि म्हणूनच भांडणाशिवाय प्रेमामध्ये काहीसुद्धा मजा नाही
***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

## *मराठी विचारधन*

अगदी सरळमार्गी असणे हेही एक प्रकारचे पापच आहे. हे कालांतराने मनुष्याच्या दुर्बलतेचे कारण बनते
***

**स्वामी विवेकानंद**

लेख

# प्रिय पु ल काका ,

लहानपणी, मला रोज रात्री गोष्टी ऐकत झोपायची सवय होती, मग मी हळू हळू मोठी झाले, गोष्ट ऐकायची सवय मात्र कायम राहिली, पण तो जादू करणारा आवाज आता बदलला होता, तो होता तुमचा ... पुलकीत आवाज. माणूस लिखाणानी आणि आपल्या आवाजांनी कायम अमर आणि चिरंजीवी राहू शकतो हे तुम्हीच दाखवून दिले. आयुष्यात असे किती पण अवघड, उदास प्रसंग आले आणि असे वाटले कि आज तरी काय झोप लागणार नाही आणि वाचायचा मूड पण नाहीये तर तुमचे कोणतही कथाकथन किंवा एकपात्री निवडावे आणि ऐकावे, मन प्रसन्न होते आणि माणूस नावाच्या प्राण्यात पुन्हा एकदा प्रेमात पडते. तुमच्या काही काही लिखाणानी माझ्यावर फार सूक्ष्म संस्कार केले आहेत. तुम्हाला गम्मत सांगू, तुमचे चितळे मास्तर मला खरच भेटले होते, ज्यांनी मला शिकवले, आणि माझ्या बाबा न हि, ते पण कोणता हि विषय उत्कृष्ट शिकवू शकायचे, आणि तेव्हा पासून तुमची हि सगळी पात्रे, माणसे अगदी पूर्ण नाही तरी थोडी बहुत तरी सापडायला लागली. तुमच्यामुळे, माणसे वाचायचा छंद जडला. नाटके खरे तर बघायची असतात (तशी मी घरात कधी कधी ती करते सुद्धा , पण ती वाचायची आवड मला का लागली माहितीये, कारण तुमचे "तुज आहे तुजपाशी", माझ्या हातात पडले, आणि मी पुन्हा पुन्हा वाचून काढले. मी खूप नाटके पहिली किंवा वाचली त्या नंतर, पण का ठावूक या नाटकाशी माझे वेगळे नाते आहे, तीच पात्रे मला दरवेळी नवे काही तरी देवून जातात. काकाजी, आचार्य, उषा, सतीश गीता, श्याम जणू माझे कुटुंबातलेच आहेत. दर वेळी वाचताना, प्रत्येक मधला एक नवा विचार आणि भूमिका सापडते आणि जगण्याचा अर्थ हि.

तुमचा "नंदा प्रधान","बबडू" "तो", "भय्या नागपूरकर" माझ्या मनाला फार चटका लावून गेले. एक मात्र नक्की ह, "ती फुलराणी" मधील "तुला शिकवीन चांगलाच धडा" हे स्वगत, नाटकात काम करायची आवड असलेल्या प्रत्येकाला, लहान पाणी करून पाहावे असे वाटतच, आणि ती फुलराणी मात्र पक्की आपली मराठी वाटते बर का, भाषांतर असून हि. प्रवास वर्णन हे किती रंजक असू शकते ते पण तुम्हीच सांगितले, त्यामुळे एका नवा साहित्य प्रकार आवडला. बटाट्याचा चाळी मधले चितन, बरच काही विचार करायला लावून गेली. आणि मराठी वांग्मयाचा गाळीव इतिहास, उपहासत्मक विनोद किती सकस असू शकतो याचे उत्तम उदाहरण आहे. तुम्ही साहित्याची इतकी दालने खुली करून ठेवली आहेत न, कि कोणताही साहित्य प्रकार निवडावा आणि तुम्ही तो किती मनोरंजक पण काही हि गाजावाजा न करता एक विचार देवून ठेवणारा केला आहे. मी दर वर्षी तुमच्या बद्दल लिहित आलीये , पण शब्द आटले तरी तुमच्या बद्दलचे पेम आणि आदर कधीच कमी होणार नाही. अलौकिक प्रतिभा असूनही, पैश्याचा मागे न लागता, केवळ माणसांवर प्रेम करणारा आणि आपल्या साहित्यतून निरोगी मने तयार करणारा हा कलाकार. अर्थात तुमचा संसार तुमच्या पत्नीने इतका समर्थ पणे सांभाळला, म्हणून तुम्ही आम्हाला इतके भेटत गेलात.

तुमची पुस्तके आणि तुमचा आवाज हा माझ्या आयुष्यातला अविभाज्य भाग आहे, इयत्ता चौथी पासून ते आज पर्यंत तुमचे लिखाण माझ्यासाठी अजून तितकेच ताजे टवटवीत आहे आणि काही तरी देवून जाणारे आहे. कारण कदाचित माझ्या वयानुसार त्यातून मला नवीन काही तरी सापडेल असे काही तरी तुम्ही त्यात दडवले आहे. चौथीत असताना मला त्यातले किती कळले असेल ते गुळाचा गणपतीच जाणो. पण माझा "गटण्या" होण्याची सुरवात मात्र झाली हे नक्की बर का. आज काल, समोरच्याला कळणारे आणि भिडणारे असे लेखन बहुधा चांगल्या लेखनात मोडत नाही, सतत काही तरी माहितीपर, तात्विक असे तरी लिहिले जाते किंवा मग ज्याला विनोद म्हणावे कि नाही अश्या प्रकारचे विनोद, कार्यक्रमात आणि लिखाणात दिसतात, म्हणजे अगदीच निराशावादी चित्र नाहीये तसे, तुम्ही कौतिक करावे असे काही चित्रपट आणि नाटके येत आहेत अजून, आमची मराठी अजून तशी जिवंत आहे, पण नवीन पुस्तकांचे म्हणाला तर जर अवघड चित्र आहे. रंगून जावून वाचावे किंवा ज्यामुळे वाचनाचे आवड निर्माण व्हावी असे तुमच्या सारखे लिहायला कधी जमेल का हो आम्हाला ? मान्य आहे कि तुम्ही आणि तुमचे लिखाण हे कालातीत आहे, पण आमचे दुर्दैव कि आम्ही तुम्हाला प्रत्यक्षात भेटू नाही शकलो, पत्र व्यवहार करू नाही शकलो, असे कधीच नाही का होणार कि तुम्ही परत भेटाल ?. कसे झालाय माहितीये, पांडुरंग तोच आणि तिथेच असून पण वारकरी दर वर्षी नियमाने जातात कि त्याला भेटायला, तसे किती हि वेळा वाचले तरी तुमच्या लिखाणाची वारी करायची हे आमचे पण व्रत आहे, कारण हि ओढच जबरदस्त आहे. माझे ना जरा गटण्या सारखे आहे, किती हि लेखक वाचले न तरी "पु ल आणि ____" *smile emoticon*

मी ठरवले आहे आता कि आपल्याला मिळालेला हा आनंद, वाटायचा आपण, म्हणूनच, ज्यांना कुणाला पु ल न भेटायचे आहे, त्यांच्यासाठी, आमचे दरवाजे नेहमीच खुले

आहेत तुज आहे तुजपाशी असे म्हणताना तुम्ही आम्हाला काय दिले हे आम्हासच ठावूक आमच्यापाशी, आजू बाजूला पण हे सगळे होताच पण कोणत्या नजरेतून पाहायचे ते तुम्ही शिकवलत गुरु दक्षिणा काय देणार तुम्हाला आम्हाला 'बस इतकाच सांगू कि तुम्ही माणसांवर, साहित्येवर, कवितेवर, संगीता वर आणि आयुष्यावर भरभरून प्रेम केले तसच जमल तर करू आम्ही पण, तुमच्या इतके नाही जमणार कदाचित पण १०० पर्सेंट नाही तरी छोटे मासे होऊ कि आम्ही

- तुमची एक वाचक

***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

**कविता**

## रिमझिम

रिमझिम पडतो पाऊस,.,.
मनात रूजतो पाऊस,.,|| धृ ||

सखे साजणी ... वाट पाहिली
रिमझिम पावसात,.,.
प्रेमाची गाणी गाऊया राणी
भिजूया दोघे पावसात ||१||

तुझ्या आठवणीत चिंब होऊन
भिजतो मी सुखात
डोळ्यात माझ्या शोधतो तुला
तोच पुन्हा पाऊस ||२||

पाऊस माझा वैरी तुझा
का गेलीस विरहात ,.,.,.
कधीतरी तुझ्याशिवाय
रडतो पाऊस एकटाच ,.,.,||३||

***

**संदीप ढाकणे**
**जि.प.प्रा.शा.लिंगदरी ( औरंगाबाद )**
**ई पत्ता : sandeep.dhakne@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७५८८५१२४६७**

**लेख**

## स्वा सावरकर : मला आठवणारे !!!

( स्वा. सावरकर यांचा हल माहिती किंवा असे काही लिहिण्यापेक्षा, मला आठवतात ते सावरकर कसे आहेत हे व्यक्त करायचा आणि त्यांना आदरांजली वाहण्याचा हा लहानसा प्रयत्न. )

इयत्ता चौथी : शालेय वार्षिक कथाकथन स्पर्धा. विषय साहस कथा /शौर्य कथा. मी नेहेमी प्रमाणे परस्पर स्पर्धेत नाव देवून घरी आले. कोणती गोष्ट निवडावी असे काही विचार तेव्हा मनात हि नव्हते. घरी बरीच पुस्तके, त्यातच एक " वि दा सावरकर ", माझ्या त्या वयाला समजेल असेच चरित्र !!! आणि माझी गोष्ट ठरली, स्वा सावरकरांची जगप्रसिद्ध "समुद्र उडी ". मला आठवत आहे कि स्पर्धेतील बहुतांश कथा ह्या ऐतहासिक, पौराणिक अश्या आणि रणांगणावर घडलेल्या आणि माझी मात्र ! पण तरी हि ती एक अलौकिक सहस कथाच होती. खरं तर स्वातंत्र्यवीरांचे अवघा जीवनच जणू साहस कथांची मालिकाच

मग ते धाडस, विदेशी कपड्यांची होळी असो, सागरा प्राण तळमळला म्हणत, त्याच सागराशी दोन हात करत त्यात घेतलेली उडी असो, काळ्या पाण्याच्या शिक्षेला सामोरे जाणे असो अतिशय परखड पणे कर्म कान्डावर ओढलेले ताशेरे असोत किंवा दलित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे पतित पावन मंदिर आणि तसेच काही उपक्रम असोत, हे सारे धाडस, साहस, धैर्य स्वातंत्र्यवीरामध्ये आले तरी कुठून याचे खरच आश्चर्य वाटते आणि वाईट ह्याचे वाटते कि ह्याच तात्यारवाना स्वातंत्र्या नंतर हि, उपेक्षाच मिळाली, ते सहन करण्याचे देखील धैर्य कुठून आले ह्या स्थितप्रज्ञात.

माझ्या पिढीला स्वा सावरकर समजले ते केवळ पुस्तक मधूनच, आम्ही दुर्दैवी म्हणून आम्हाला त्यांचे दर्शन नाही झाले, जे काही दर्शन घडले ते पुस्तक रूपानेच, मग ती त्यांनी लिहिलेली असोत किंवा त्यांच्या बद्दल लिहली गेलेली असतील. पण हे सगळे आमच्या वैयक्तिक वाचनावरच अवलंबून. कारण रूढ अश्या शालेय अभ्यास क्रमातून आम्ही त्यांना काही ओळी पुरतेच मर्यादित ठेवले.

मी ज्या शाळेमध्ये ७-१० शिकले, सुदैवाने त्या संस्थेचे नाव होते "स्वा सावरकर प्रतिष्ठान", सुरवातीच्या काही काळात शाळेच्या प्रार्थनामध्ये जयोस्तुते होते. मला

अजून हि असे वाटते कि शालेय प्रार्थनाहि अशीच अशीच असली पाहिजे मातृ भूमीवर प्रेम करायला शिकवणारी, कोणत्याही जाती धर्माच्या पलीकडची प्रार्थना !!!!

सावरकर बद्दल लिहावे तितके थोडेच आहे. पण आज मला विशेष म्हणजे मला ते साहित्यिक म्हणून कसे भावले ते लिहावसे वाटते. याच शाळेत असताना, मी इयत्ता नववी मध्ये होते आणि शाळेनी एक वार्षिक कार्यक्रम केला होता' सावरकर दर्शन" नावाचा, सावरकर साहित्य वर आधरित, नाट्य प्रसंग, गाणी, कविता असा सर्व समावेशक. त्या काळात मला जे सावरकर भेटले, ते साहित्यिक म्हणून जास्त समजले असे मला वाटले आणि ते वय हि असे होते कि तेव्हा जे जे मनवर बिंबले जाईल ते आयुष्यभराची शिदोरी म्हणूनच!!!

माझ्या स्वत:च्या वाट्याला जी भूमिका आली होती, तो नाट्य प्रसंग "संगीत उत्तर क्रिया" या नाटकातील होता. अतिशय उत्तम भाषा, संवाद पाठ करायला अवघड पण अतिशय प्रभावी आणि मुख्य म्हणजे नाटकाचा मुख्य विषय. स्वत:चा नवरा आणि मुले पानिपत मध्ये गमवलेली एक, म्हंटले तर वेडी तर आणि म्हंटले तर शहाणी अशी एक स्त्री, माधव राव पेशव्यांना भेटायला येते आणि आपल्या कुटुंबीयसाठी उत्तर क्रियेची मागणी करते. पण तिच्या साठी हि जी काही उत्तर क्रिया आहे, हि काय आहे ते ती पेशव्यांना सांगते तो हा प्रसंग. त्या स्त्री ची भूमिका मी केली, अनुषंगाने सगळे नाटक वाचून काढले आणि त्या एका वेगळ्याच विचारांनी भारावून गेले. उत्तर क्रिया म्हणजे जे पानिपत उत्तर दिशेला आहे, ते परत जिंकून आणलास तरच ती माझ्या कुटुंबाची खरी उत्तर क्रिया, असे म्हणणारी ती स्त्री आणि ते नाटक. ह्या कार्यक्रमाच्या जवळ जवळ सर्वे तालमीला मी हजर असायचे आणि सावरकरांचे साहित्य उलगडत गेले. पारतंत्र्याच्या पार्श्व भूमीवर साहित्य काय भूमिका बजावू शकते , हे या सगळ्या साहित्यात दिसून आले. " असेच एक अजून प्रभावी नाटक म्हणजे "सन्यस्त खड्ग", एकंदरी देशाच्या तत्कालीन स्वातंत्र्य लढ्यासाठी हे नाटक विशेष प्रभाव टाकते आणि ते आज हि तितकेच कालातीत आहे, त्याग केलेली शस्त्रे नेमकी कधी हातात धरावी लागतात आणि तेच कसे अवश्य आहे, राष्ट्रासाठी, हे सांगणारे नाटक.

ने मजसी ने मध्ये, सुरवातीच्या ओळीमध्ये काहीसे हळवे वाटणारे शब्द जेव्हा त्याच सागरला त्याच्या परीसिमेची जाणीव करून देत म्हणतात "तरि आंग्लभूमी-भयभीता रे, अबला न माझिही माता रे, कथिल हें अगस्तिस आता। रे 'जो आचमनी एक पळीं तुज प्याला। सागरा, प्राण तळमळला", तेव्हा दिसतात ते कणखर सावरकर आणि त्यांचे ज्वलंत शब्द. हेच शब्द भेटतात "प्रभो शिवाजीराजा" या काव्यतून. एकीकडे सहा सोनेरी पाने सारखे पुस्तक, तर दुसरीकडे कमला सारखे काव्य, माझी जन्मठेप सारखे अंगावर काटा आणणारे आणि सत्य घटन वरचे पुस्तक, . हिंदू धर्म म्हणेज नक्की काय, राष्ट्र धर्म म्हणजे नक्की काय आणि धर्मातल्या नेमेक्या अंधश्रद्धावर आणि कर्म कांड या वरची परखड आणि बुद्धी प्रमाण्याला धरून केलेली टीका, हा हि त्यांच्या साहित्याचा एक भाग. पु ल, सावरकरांबद्दलच्या एका भाषणात म्हणतात कि सावरकरांनी सर्वच धर्मातील दांभिकते वर भाष्य केले आणि म्हणूनच कदाचित ते जर कमी लोकप्रिय ठरले. परखड सत्य पचवणे आणि विज्ञाननिष्ठ असणे हे आज हि आमच्या समाजाला कितपत मान्य होईल हि शंकाच आहे.

खर तर सावरकराइतका, राष्ट्र धर्म आणि माणुसकीचा धर्म हाच धर्म स्वीकारणारा नेता त्यांच्या आधी हि झाला नाही, पण तो या पुढे जर झाला तर कदाचित स्वा. सावरकराना धन्यताच वाटेल.

काही निबंध लेखनाच्या अनुषंगाने, माझे स्वा. सावरकरांचे विचार समजून घेण्यासाठी काही वाचन झाले आणि मला असे वाटले कि त्यांचे विचार समजून घेणे आणि ते रुजवणे हे कठीण तर आहेच, पण ते जर या राष्ट्रामध्ये आपण करू शकलो तर मग खरच या सारखे दुसरे काहीच नाही. सावरकरांची राष्ट्र, हिंदुत्व, धर्म, विज्ञान दृष्टीकोन, सामाजिक सुधारणा आणि सामाजिक रचना याबद्दलचे विचार आणि कार्य हे खूप व्यापक आणि सर्व समावेशक आहे. पण आपले दुर्दैव कि बुद्धी निष्ठ विचार स्वीकारणे आम्हाला जमत नाही आणि आम्ही त्यांना फारच छोट्या चौकटीत अडकवतो. सावरकरांचा खरा धर्म हा केवळ आणि केवळ राष्ट्रप्रेम आणि विज्ञान प्रेम हाच होता.

ह्या लिखाण्या मगच केवळ उद्देश त्यांची स्मृती जपणे हाच आहे, पण त्यांचे विचार काही अंश जरी आपल्यात झिरपले तरी सार्थक होईल. ब्रिटीश ज्यांना सर्वात जास्त घाबरले असा हा स्वातंत्र्य सेनानी.

ज्यांना ब्रिटीश सरकारांनी काळ्या पाण्याची शिक्षा दिली, पण त्यातून हि तावून सुलाखून, अग्निद्व्यापार करून सावरकर कोणत्या दुर्दम्य मनोबलावर बाहेर आले, ते तेच जाणो.

स्वा सावरकर, "भारत रत्न" हा किताब त्यांना नाही, पण मला वाटते कि ते त्यापेक्षा हि खूप उंची वर आहेत स्वातंत्र्यवीर म्हणून सन्मान देणे हीच खरी श्रद्धांजली असेल. सरकारनी त्यांचे स्मारक उभारावे किंवा त्यांची पुण्यतिथी किंवा ज्यांनी निम्मित काही कार्यक्रम करावेत अशी अपेक्षा नाही आमची. पण सावरकर आणि त्यांचे विचार, त्यांचे देशप्रेम हे येणाऱ्या पिढ्यापर्यंत पोचवावे, रुजवावे हिच माफक अपेक्षा आहे.

**स्वातंत्र्याचा सेनानी तू**
**सूर्याप्रमाणे प्रखर तू**
**शब्द प्रभू, ओजस्वी तू**
**प्रज्ञावंत , तेजस्वी तू**
**तुजसम केवळ एकाच तू**
***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

**लेख**

## *मंगेश पाडगावकर : जगणे शिकवणारा कवी*

३० डिसेंबर २०१५ रोजी कवी मंगेश पाडगावकर यांचे दुख:द निधन झाले. त्यांच्या कविता नेहमीच आपल्या मनात असतील आणि मंगेश पाडगावकर हि. अगदी लहानपणापासून मला कविता आवडायच्या, बालकवींची निर्झरास आणि औदुंबर तर मी पाठच केली होती. पण पहिल्यांदा कविता सोपी आणि जवळची वाटली जेव्हा "बोलगाणी" हातात पडले . सहज सोप्या वाटणारया कविता, परत परत वाचल्या आणि त्या मागे असणार विचार हि कळत गेला. सोपे आणि सहज वाटणारे लिखाण हे सगळ्यात अवघड. शब्दांना बोलके करणारी हि कविता मला भावली आणि पहिल्यांदा मला वाटले कि हे शब्द आपणही गुंफावे कि, बघू आपले शब्द बोलके होतात का.

माझे पहिले स्फूर्तीस्थान म्हणून कवी पाडगावकर यांना माझ्या मनात विशेष स्थान आहे. माझ्या कित्येक पहिल्या वहिल्या कवितांवर वाट त्यांच्या खास शैलीची छाप आहे. त्यांची उंची गाठणे हे अशक्यच आहे. पण तरी जेव्हा माझी बहिण मला म्हणते कि (कधी कधी वैतागून), बोलगाणी सारखी झालीये, किंवा नेहमी सारखीच झालीय (म्हणजे मंगेश पाडगावकर यांचा छाप जाणवतोय), तेव्हा थोडे बरच वाटते.

एक मात्र आहे, कि कविता वाचनाचे एक नव दालन आपल्यासाठी उघडे केले ते बापट, विंदा आणि पाडगावकर यांनी. पुस्तकातली कविता, माणसात आली आणि ओठांवर रुळली. कधी सांगा कसे जगायचे म्हणून जगणे शिकवून गेली, कधी प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम अस म्हणत प्रेम करायला तर कधी यात काही पाप नाही म्हणत, आनंद शोधायला शिकवून गेली.

श्रावणात घननिळा बरसला आणि वेंगुर्ल्याचा पाऊस माया करत कोसळला. भातुकलीच्या खेळामधला अर्धा राहिलेला डाव, डोळ्याच्या कडा ओलावून गेला आणि सांग सांग भोलानाथ मात्र लहानमुल होवून मिसळला.

खर तर पाडगावकरनि अनेक प्रकारचे काव्य लिहले, कधी लयबद्ध, तालबद्ध, कधी निसर्गकविता, कधी प्रेमकाव्य तर कधी विडंबन सुद्धा. सिद्धहस्त लेखणीचे ते राजे होते. वयाच्या १४व्या वर्षापासून अव्याहत मांडलेला हा शब्द खेळ ते आज स्वताच अर्ध्यावर टाकून निघून गेले.

मिश्किल हसू चेहऱ्यावर खेळवता खेळवता, जगण्यातल्या आनंद कसा घ्याव्या हे त्यांनी सोपे करून शिकवले. अवघड गोष्ट सोपी वाटावी असे सांगणे हीच तर उत्तम कवित्वाची निशाणी आहे नाही का !!!

त्यांनी बायबलचे भाषांतर केले, सूरदास आणि मीराबाई यांचे लेखन हि मराठीत आणले. काही महिन्या पूर्वीच त्यांनी अनुवादित केलेल्या "महाभारत" चे दोन खंड वाचण्याचा योग आला. एका कवीचे महाकाव्य, अजून एका महाकवीच्या वाणीतून म्हणजे दुग्ध शर्करा योगच.

खर तर किती कवितांबद्दल लिहू तितके थोडेच आहे. पण पाडगावकर हे नेहमीच मनाच्या जास्त जवळ राहतील पहिले स्फूर्तीस्थान म्हणून यात शंकाच नाही. त्यांचे सगळ्यात मोठे योगदान म्हणजे कविता सामान्य लोकांपर्यंत पोचवली. कवी संमेलन, काव्य वाचन हे त्यांनी साहित्यिक, प्रज्ञावान्य अश्या लोकांसाठी आहे हा विचार मोडून काढला. साधी सोपी सहज कविता त्यांनी जनात रुजवली आणि मनात तिचे एक आवड निर्माण केली.

रोजचेच शब्द किती छान, हळुवार रुंजी घालतात तर कधी दाहक बनतात आणि कधी हळवे पण करतात हे पाडगावकरांच्या कवितीत दिसते. खचितच एखाद्या कवीला इतकी लोकप्रियता मिळाली असेल, त्यांच्या पिढीत हि आणि आज हि. पाडगावकर नवल वलय होते पण कवी म्हणून त्यांचा दरारा नव्हता, त्याचे शब्द अगदी आपले वाटायचे आणि म्हणूनच तेही वाटत असावेत.

**तुम्ही लिहले म्हणून शब्द बोलके झाले**
**तुम्ही लिहिले म्हणून शब्द हि पिसापारी हलके झाले**
**कविता अगदी रोजची झाली,**
**धुणे वाळत घालतानाही**
**अन पसारा आवरताना हि**
**सांजवेळी पायरीवर हुरहूर लावून गेली**
**खरच "कविता", अगदी घरचीच झाली**
**प्रेम करायला शिकवून गेली**
**जगायला शिकवून गेली**
**बोजड शब्दांचे ओझे हलके करून**
**निसर्गाचे अध्यात्महि शिकवून गेली.**
**कविते मध्ये बोलता येते**
**कविते मध्ये गाता येते**
**कविते मध्ये प्रेमपत्र सुद्धा लिहिता येते**
**अहो इतकच, तुमचे ते तत्वज्ञान सुद्धा सांगता येते**
**हे देणे तुम्ही दिलत, आणी आम्हाला कायमचे ऋणी केलत**
**जगताना मृत्यूला घाबरायचे नसते**
**आयुष्याचे दान भरभरून घ्यायचे असते**
**शब्दांच्या या मोहात तुमच्या कवितेने अडकवले**
**तुमच्या माघारी, या काव्यालाच आम्ही मनात साठवले**
- एक वाचक

***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

**कविता**

## *खिडकीतला पाऊस आणि मी !!!!*

किती सारी वर्षे झाली, मी पावसाला कधी दारातून, कधी खिडकीतून, कधी अंगणात भेटत होते
आज मात्र गम्मत च झाली, मी खिडकीत होते, अन पाऊस माझ्या खिडकीतून डोकावत होता
मी त्याच्याकडे आणि तो माझ्याकडे,
हसत हसत बघत होता
माझ्या सारखाच तो सुद्धा आठवांच्या सरीमध्ये
जणू काही भिजत होता
त्याचे स्फटिकासारखे थेंब मी हातावर झेलत होते,
अन तो जणू माझ्या साठीच ते थेंब साठवत होता
सारे होते आजूबाजूला , पण तरी मी गर्दीमध्ये एकटीच होते
कारण आज चक्क पाऊसच माझ्या सवे बोलत होता
इतके दिवस मी पावसला घरातून पहायाचे
आज मात्र तो माझ्या कडे पाहत होता
माझ्या सारखाच तो सुद्धा आठवांच्या
सरीमध्ये जणू काही भिजत होता
खूप दुरून आलोय मी आज, बरसणार आहे मनसोक्त
मी म्हणाले पाहुण्यासारखा चार दिवस नाकी राहा
राहा कि आमचे मन भरे पर्यंत अगदी मनमुक्त
कशाला ग ? मी थांबलो जास्त वेळ, कि
मगसगळी कडे चिकचिक होणार, चिखल किती झालाय इथे
म्हणून तुझी ओली, भिजली चिडचिड होणार
अरे असे कसे, तू तर हवासाच कि, चिडचिड झाली तर होवू दे
पण थांबला नाहीस तर निर्झर आमचे कसे वाहणार
नदी कशी सागराला मिळणार, अन मग तू नसलास तर मेघदूताचे काय होणार
इंद्रधनुचे रंग कसे मनात भरणार
वसुधेचा हिरवा शालू, काय या वर्षी पेटीतच पडून राहणार
अन मोराचा पिसारा रे कसा फुलणार
बाकी सारे जाऊ दे, पण मला कविता तरी कशी सुचणार
गप्पा छान मारता मारता, पाऊस चक्क खूप वेळ थांबला
माझ्या गप्पिष्ट स्वभावाचा आज काही तरी फायदा झाला
किती तरी दिवसांनी मला पाऊस मित्र सारखा भेटत होता
मी त्याच्याकडे आणि तो माझ्याकडे, हसत हसत बघत होता
माझ्या सारखाच तो सुद्धा आठवांच्या सरीमध्ये
जणू काही भिजत होता
किती सारी वर्षे झाली, मी पावसाला कधी दारातून,
कधी खिडकीतून, कधी अंगणात भेटत होते
आज मात्र गम्मत च झाली, मी खिडकीत होते,
अन पाऊस माझ्या खिडकीतून डोकावत होता

***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

लेख

## मी शेतकरी

शेतकरी म्हणजे आपला बळीराजा. वरूणाची चातकासम वाट पाहणारा शेतकरी. असा तो बरसला की त्याच्या चेह-यावर आनंद पसरतो. पण वाट पाहूनही वरुण राजाचा रुसवा जेव्हा त्याला झेलावा लागतो तेव्हा मात्र शेतक-याचे डोळे आसवांनी भरून येतात. डोळ्यांदेखत पिकं जेव्हा पाण्याविना जळू लागतात तेव्हा त्याच्या मनाची होणारी घालमेल, उथल-पुथल शब्दांत व्यक्त करता येत नाही.

**मी शेतकरी...**
**माझी हिच नशिबाची कहाणी.**
**पडला वेळेवर पाऊस,**
**तर पिकत सोन.**
**नाहीतर डोळ्यात आसवांचे पाणी.**

सा-या विश्वाचे पोट भरणारा आपला शेतकरी मायबाप. त्याच्या नशिबी कधी-कधी दोन वेळच अन्न पण मिळत नाही. तुटपुंज्या पैशात कर्ज काढून तो आपले शेत पिकवतो. पण कधी शेतमालाला कमी भाव, तर कधी निसर्गाच्या चक्रात तो असा अडकतो की, हातातोंडाशी आलेल पिक पाण्याविना जळून तर जात वा अतिवृष्टी मुळे नेस्तनाबूत होत. काही वेळा कर्जाची परतफेड न झाल्याने त्रस्त शेतकरी निराशेमुळे आत्महत्या करतो. पण खरंच यावर काही ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. आपले पोट भरणारा शेतकरी आज हताश -निराश आहे. तो वाट पाहतोय कुणी मदतीचा हात सरसावून या संकटातून मार्ग दाखवेल का ?

आज शेतक-यांवर बिकट परिस्थिती ओढावली आहे. गरज आहे ठोस पाऊले उचलण्याची. पिकांना रास्त भाव मिळवून देण्याची आणि कर्जबाजारीपणाचा बोजा कमी करण्याची. निसर्गाच्या अवकृपेला सर्वस्वी मनुष्यच जबाबदार आहे. वाढत्या वसाहतीमूळे वृक्ष-तोड अमाप झाली. परिणामी पाऊस सरासरीहून कमी झाला. आता वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन करण्याची नितांत गरज आहे. तरच निसर्गाशी आपले नाते अबाधित राहील आणि आपला शेतकरी राजा खूश राहील.

**निसर्गाची अवकृपा,**
**काळीज चिरून जाते.**
**कधी सुकाळ, कधी दुष्काळ,**
**यात जीवनाची वाताहत होते.**
**कधी कर्जाने कंबरडे मोडले जाते,**
**डोळ्यांसमोर आशेचे स्वप्न चकनाचूर होते.**

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## कृष्ण सखा

अर्जुन झालाय माझा
म्हणून कृष्ण शोधतोय मी एक
एक सखा जो परखड असेल
जो खंबीर पणे उभा राहील
माझ्या संकटात माझ्या समवेत

माझा आनंद त्याच्या हास्यात उमटेल
आणि माझे दु:ख त्याच्या बासरीच्या सुरात उमटेल
त्याच्यात आणि माझ्यात अंतर असेल कैक मैलांचे
पण तरीही तो गाठेल हे अंतर प्रकाश वेगाने

मला नको आहे देवत्वाचा अंश असणारा कृष्ण
न मला त्याची पूजा करायची आहे, संकटे येवूच नयेत म्हणून
मला तो केवळ एक सुहृद म्हणून हवाय ,
ज्याचा मीही एक मित्र होवू शकेन
मला जो केवळ योग्य मार्ग दाखवेल आणि
कधी गरज पडलीच तर माझी मैत्री हि पारखेल

सापडेल का असा तो कृष्ण सखा
कि आहेच इथे कुठेतरी , दिसून न दिसल्या सारखा

कदाचित माझ्यातच कुठे तरी
केवळ मी मनापासून साद घालायची वाट पाहतोय
माझा कृष्ण सखा , माझ्याच मनातला

***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

कविता

## पाऊस कविता

तुझ्या जान्यानही गेल
तुझ्या येन्यानही गेल
पिक शेतातल उभ
जस सोन वाहून गेल

कस जगल र पावसा
जगाचा पोशिंदा
किती बार फिरवचिल
त्याच्या कष्टावर रंदा

नको होवु इतका कठोर
नको करु इतके वार
त्याला सोसत नाही
आता दुखांचा भार

यंदाही त्याच लेकरु बाळ
झोपवशिल का उपाशी
मग सांग का रे देवा तु
अनेकांना खेळवी तुपाषी
***

**अमोल अलगुडे**
**मोबाईल क्रमांक : ९९७५२३२६०२**

कविता

## मन सागरापरी खोल

मन सागरापरी खोल, त्याचा कोणा लागे थांग
मन भिरभिरे वाऱ्यावरी, त्याला धरू कसे सांग

मन मोकाट सुटता, त्याचा माग न लागता
त्याचे संगे धावू किती, न पाऊल थकता

मन सुटे सुटे झाले, अन डोहात दडले
किती शोधले तरी, न एक डोळा दिसले

मन हळुवार किती, थोडे शब्द तीर हे लागता
डोळ्यामध्ये मन उतरते, अश्रू हे दाटता

मन कणखर किती, सावटाची दाटे भीती
सावरे स्वतःला लगेच, अन सावरे प्रीतीची हि नाती

मन कधी किती गूढ, जणू कृष्ण माई संथ
मन सहिष्णू धर्माचे, त्याला कोण पुसे त्याचा पंथ

मन एकाकी कधी अन कधी सामावे सर्वांसी
रात्र काळोख दाटता, उजळे प्रकाश चंद्रासी

मन अवखळ कधी, अन कधी क्रोधात कोपता
मन प्रेमळ कधी , अन कधी निरव शांतता

न कळले हे मन , न माझे न तुझे
मन होता हे उदास, मानसी अश्रुंचे हे ओझे

कधी चंचल हे मन, अन कधी हर्षता आनंदे
कधी एकटे च रुसते अन कधी गाते तुझ्या संगे

कधी सापडेल का हे मन, माझ्या मुठीत या बंद
वाटे, नकोच सापडावे, मुक्त विहरू दे स्वच्छंद

जर कधी लागलच ठाव, या उनाड मनाचा
उरे काय अर्थ ह्या जगण्याचा

बरे आहे, हे असेच, काही कोडी न सुटतात
रिक्त ओंजळ हे माझी, न काही उरले उरात

मन कोणासी कळले, भले भले हि थकले
जंग जंग पछाडून, हाती काही न लागले

मनाबद्दल हे विचारपण, माझ्या मनातलेच बोल
मानसी बोलता स्वतःच्या, कळे मनाचे हे मोल

नको उत्तर शोधू या, या मनाच्या प्रश्नाचे
तेच असेल हे जगण्याचे ऋण, जे बाकी असेल फेडायचे
***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

कविता

## जीवनगाणे

जगायचं जगायचं म्हणजे काय करायचं,
उत्तर अगदी सोपे आहे, हसत हसत गाणं म्हणायचं

आपलेच सूर आपलेच ताल
आपलेच शब्द आपलीच चाल
कधी कधी सूर ही तालाबरोबर नाचतात
आपलेच शब्द आपल्याकडे बघून खुदकन हसतात

अशावेळी आपणही मनापासून हसावं
आपलं सुख आठवणींच्या कुपीत जपावं

कधी कधी मात्र सूर तालाची साथ सोडून जातात
आपल्याच चाली, आपलेच शब्द अनोळखी भासू लागतात

अशावेळी कधीच खचून नसत जायचं
कुपीत जपून ठेवलेलं सुख असतं प्यायचं

अशा संस्मरणीय ष्पिशतच अखेर पर्यंत सोबत करतात
किती ही अंधार असला तरी प्रकाशापर्यंत खेचून नेतात

आपली मैत्री सुद्धा असेल अश्याच एका कुपीत
संकटावर मात करण्याचे हेच अनमोल गुपित

अशाच एका बंधनात आपले सूर जुळतील
शादासोबत ताल सुद्धा एकमेकात गुंफतील

जीवनाच्या गाण्याची अशीच सुंदर कथा असते
मनापासून जगलं की कसलीच व्यथा नसते
***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

## मराठी विचारधन

आपले मन म्हणजे एक महान जादुगार व चित्रकार आहे, मन म्हणजे ब्रम्ह सृष्टीचे तत्व आहे.
***

**साने गुरुजी**

कविता

## जर मागे वळून पाहताना

जर मागे वळून पाहताना
थोडे अंतर्मुख होताना
चांगल्या वाईट , काही स्मृती
मनामध्ये जागताना

बालपणीचा काळ सुखाचा
हे बालपणी न गमले
अन भविष्याची स्वप्ने रेखताना
बालपण हि सरले

ममतेचे छत्र होते
अन सावरणारे कणखर हात होते
म्हणूनच , केवळ आनंदाचे झाड बहरले
अन दुःखाची झळ न पोहचली मजपाशी

स्वत्वाची झिंग जी चढली
अन यशाची व्याख्या हि कळली
तुटले बंद मायेचे , ममतेचे पाश हि तोडले
जगण्यची उन्मत्त धुंदी
ते सारे ऋण विसरली

मज वाटे मन माझे कणखर
म्हणुनी पाश हे तुटले
मज तमा काय कुणाची
माझे मी पण मीच घडवले

जे वाटे यश मिळाले
ते फोल आहे सारे
अन ज्याला मी म्हणतो तत्व माझे
त्याचे अस्तित्व नाही उरले

जगण्याची मध्यान झाली
अन जग मनाला आली
पण आता पाहता मागे
सारी वळणे मागेच उरली

वर उंच उंच जाताना
खाली सारेच लहान भासे
सारे आयुष्य पणाला लावून
टाकले नशिबाचे फासे

स्वत:साठी जगता जगता
थोडे विसरलो जगण्याचे भान
कितीही मिळाले सुख तरीही
सुकली नाही तहान

जीवन ज्यांनी देवू केले
अन जगण्यासही मज शिकवले
त्यांची साथ सोडून देताना
मज जराही न उमगले

कि मार्ग जरी हा सोपा
अन दिसतो हि राजसा मोठा
तरी सोबतीस नाही कुणी
अन सारा हिशोब झाला उलटा

जगण्याचे गणित मांडले
हेच काय उणे ते केले
बेरीज करता सारी
हाती काही न उरले

झाल्या काही चुका हि
आता वेळ हि निघून गेली
क्षमा मागायची तरीही
आता आस पास हि न दिसे कोणी

जर मागे वळून पाहताना
थोडे अंतर्मुख होताना
चांगल्या वाईट , काही स्मृती
मनामध्ये जागताना
***

**शीतल जोशी**
**ई पत्ता : josh.sheetal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२३२०८६२३**

## मराठी विचारधन

दुसऱ्याला हसणे फार सोपे असते पण दुसऱ्या करीता रडणे फार कठीण असते, त्याला अंत:करण असावे लागते.
***

**साने गुरुजी**

**लेख**

## वाचाल तर वाचाल

आजच्या धक्काधक्कीच्या व्यस्त आधुनिक जीवनात, इंटरनेट, वायफाय असे अत्याधुनिक साधन आली खरी पण पुस्तक वाचन संस्कृतीचा -हास झाला. इंटरनेटच्या माध्यमातुन असंख्य वेगवेगळ्या क्षेत्राशी निघडीत पुस्तक एक क्लिक वर वाचता येऊ लागली. याचा परिणाम असा झाला कि, छापील पुस्तक साहित्य विकत घेऊन वाचणा-यांची संख्या कमी-कमी होत गेली. त्यात प्रत्येकाच्या जीवनातला वाढता कामाचा व्याप, व्यस्त जीवन पद्धतीमुळे मनाचा ताणतणाव वाढतच गेला. मग पुस्तक मित्रांशी प्रत्येकांचा मित्रत्वाच नातं दुर-दुर होत गेलं.

**"पुस्तक म्हणजे आयुष्य मार्गदर्शक,**
**विचार प्रगल्भतेत वाढ करणारे ज्ञानाचे भांडार"**

याचा जणु सर्वांचा विसरच पडत गेला. शालेय पाठ्यपुस्तकांचा, दफ्तराचा वाढता बोजा यांमुळे मुलांना अवांतर वाचनाकरिता वेळ मिळेनासा झाला. आजची तरूणाई सोशल नेटवर्किंगच्या इतकी आहारी पडली की, पुस्तकवाचनच दुरापास्त होत गेले. पण आता वेळ आली आहे, हे सारं बदलुन पुस्तक मित्रांचे महत्व पटवुन देण्याची. पुस्तकाशी घट्ट मैत्री जोडण्याची तरच या वाचन संस्कृतीचा होणारा -हास थांबवता येईल. पुस्तकांच्या जगात एकदा डोकावुन तर पहा आपल्या ज्ञानार्जनाबरोबरच मनोरंजनही होईल. पुस्तकातील वेगवेगळ्या पात्रांचे, घटनांतील भाव, प्रेरणात्मक आशय मनातील नकारात्मक विचार दुर करून नवा उत्साह वाढवायला मदत करेल.

वाचनाचे फायदे आयुष्य जडणघडणीत, विचार सामर्थ्यात विशेष भर घालणारे, उज्वल भवितव्य घडविणारे असते. 'वाचाल तर वाचाल'या विचारांप्रमाणे प्रत्येकांनी वाचनाचे महत्व जाणायला हवे. पुस्तकांशी प्रत्येकाने असलेले मैत्रीचे घट्ट नाते अबाधित राखायला हवे तरच वाचन संस्कृतीचा होणारा -हास रोखला जाऊन, उद्याचे सोनेरी वैचारात्मक प्रगल्भात्मक भविष्य साकारले जाईल.
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

लेख

# सुशिक्षित बेरोजगार

आपण काय करता ? या प्रश्नाला उत्तर देताना आजची तरूणाई थोडावेळ स्तब्धच असते. खरं तर त्यांची यात काही चूक नसते कारण आज देशातलं सुशिक्षित बेरोजगारीच वाढत प्रमाण चिंताजनक आहे. उच्च पदविका, पदवीत्तर शिक्षण घेऊनही "नो वेकेंन्सी" चा बोर्ड पहाणं आता काही नवीन उरलं नाही. अतिशयमेहनतीन, कर्ज काढुन शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्यामुळे आजचा तरूणवर्ग निराशेने भरकटलेला आहे. खरं तर तरूणच देशाचे भविष्य असतात. त्यात ही बेरोजगाराची लाचारी खरंच मनाला यातना देणारी आहे. मग हा प्रश्न उरतोच की, का ? उच्चपदवी, पदवीत्तर शिक्षण घेऊनही नोकरीची हमी नाही. याला कारण काय ? याची कारणे बरीच असू शकतील. पण महत्वाचे कारण पारंपारिक शिक्षण पद्धती हे एक असू शकते. तांत्रिक शिक्षणाचा अभाव, फक्त थेरॉटिकली शिक्षण हे हि असू शकते.

याहून तांत्रिक शिक्षण घेणारी आयटीआयची(प्लबिंग, वेल्डिंग, सुतारकाम, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल) मुलं स्वत:च्या पायावर उभारू शकतात. ते हे प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योगधंदा, व्यवसाय सुरू करू शकतात आणि योग्य मिळकतही मिळवू शकतात. अश्या शिक्षणक्रमाची आज खरी गरज आहे. जे स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे सामर्थ्य नवतरूणांना देईल. आजकाल मुलांना फक्त पुस्तकी ज्ञान न देता,प्रायोगिक, तांत्रिक प्रशिक्षणही देण्याची खरी काळाची गरज आहे.

आज उच्चशिक्षण असूनही आपल्याला या पदाचा अनुभव नाही म्हणुन त्या नोकरीपासुन दूर केल जात. मग नवतरूणांना जर संधीच मिळणार नसेल तर त्यांना अनुभव येणार कसा ? हा ही मोठा प्रश्न उपस्थित होतो. त्यात प्रत्येक ठिकाणी वाढता भ्रष्टाचार, वशीलेबाजी यांमूळे हे संकट अजुनच चिघळले आहे. योग्य टॅलेटेंड तरूण, तरूणींना त्याचा नोकरीचा अधिकार मिळायलाच हवा. जर ते त्या पदासाठी पात्र असतील.

आजकाल जो तो फक्त स्पर्धा परीक्षा द्यायच्या मागे लागला आहे. हो यातही उत्तम करियर संधी नक्कीच आहे पण यातही नगण्यच मुलांना नोकरीची संधी उपलब्ध आहे. त्यात हमाल पदासाठी हजारो उच्च शिक्षित, एम फील, ग्रॅज्यूएट मुलांचे फॉर्म भरणे, या बेरोजगारीची वाढती भिषणता दर्शवित आहे. मग हा बेरोजगारीचा सर्वात मोठा प्रश्न सुटणार कसा ? हा अवाढाव्य प्रश्न समोर उभा आहे. याचही आणखी एक उत्तर म्हणजे स्वत:चा उद्योगधंदा, व्यवसाय सुरू करणे. पण यातही समस्या असंख्य आहेत. प्रथम उद्योगधंदा सुरू करायचा म्हटलं की, भांडवल आलं. ते आणायचं कुठून, जर कर्ज काढलं तर ते फेडायचं कसं ? हा ही प्रश्न उभा राहतो. समजा उद्योगधंदा उभारलाच तर त्यात यश मिळेल ही शाश्वती नाही आणि जर घाटा झाला तर ? या विक्राळ प्रश्नांच काहुर मनात माजतच.

मग या सुशिक्षीत बेरोजगारीवर उपाययोजना म्हणून प्रथम पारंपारिक शिक्षणाबरोबर, तांत्रिक प्रशिक्षणही देणं आज गरजेच आहे. त्याच बरोबर नवयुवकांकरिता उद्योगधंदा किंवा व्यवसायिकदृष्ट्या कमी व्याजदराचे कर्ज वा भांडवल उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नवतरूणांनामधील बेरोजगारपणाची नैराश्यता दुर करून, त्यांना पुढे पाऊल ठेवण्यासाठी योग्य संधीची, मदतीची आवश्यकता आहे तरच उद्याच उज्वल भारताचं स्वप्न साकार होईल.

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

# गुण खान्देशी मातीचा

घे रे जरासा उसना, गुण खान्देशी मातीचा
बघ आमुच्या मनात, गुण गोडीगुलाबिचा
गोडी साऱ्यांना वाटतो, इथे सण संक्रातीचा
अरे अतिरेकी तुझा, सोड धंदा आतंकाचा
बघ जरासा बोलून, बोल आमुच्या सोन्याचा
बोल सोन्याचा घेऊन, सण आला दस-याचा
बघ माझ्या खान्देशात, सण आला प्रकाशाचा
मना मनात जगला, सण दीप उत्सवाचा
झाला पहा प्रकाशित, कानाकोपरा देशाचा
कण कण धरतीचा, उजळला आकाशाचा
***

**सौ. मंगला रोकडे**
**मोबाईल क्रमांक : ९३७१९०२३०३**

पत्रलेखन

# प्रिय बाबास,

प्रिय बाबास,
शि.सा.नमस्कार !

बाबा, तु मला लहानपणीच कायमच सोडुन गेलास. तेव्हा मला काही कळ तही नव्हतं, की मी माझ्या आयुष्यतल काय गमावलय ? फक्त तो आईचा रडतानाचा चेहरा नजरेसमोर येतो अन् काळजात धडकीच भरते.

काही दिवसांतच समजू लागलं कि, बाबा या शब्दाचा अर्थ काय ?पण तेव्हा अर्थ उमगला पण तुच नव्हतास. डोळे घट्ट मिटुन मी जरी अश्रु गोठवण्याचा प्रयत्न करत राहायचो तरी डोळे वाहतच रहायचे. सतत वाटत रहायचं, बाबा तु एकदा तरी, कधीतरी भेटायला येशील ही वेडी आशा उरात कायम असायची. जेव्हा केव्हा मी शाळेतल्या स्नेहसंम्मेलनात भाग घ्यायचो, तेव्हा माझा उत्साह वाढवायला, शाबासकीची थाप द्यायला, काही चुकल की, हक्काने रागवायला समोर तु नसायसास.मग मात्र तुझी खुप आठवण यायची. अलगद भरून आलेल्या डोंळ्याकडे पाहुन आई म्हणायची,

"बाळा...बाबा तुझ्या जवळच आहेत, ते तुला पाहत आहेत."

आईच हे बोलणं ऐकुन जीवात जीव यायचा खरा पण आईच बाजूच्या कोप-यात ढसाढसा रडायची. मग मात्र जीवच गळायचा.आठवणीत तरमळायचा.

सांगायचे राहुनच गेलं, बाबा मी आता दहावीला आहे. आईही आता बरी आहे पण मला आणि आईला तुझी सतत आठवण येते.

एकदाच, भेटुन जा बाबा,
भेटुन जा.

तुझा लाडका,
आशिष (कल्पनात्मक पात्र नाव)
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

लेख

# सोसल तेवढच नेटवर्किंग

हल्ली सोशल नेटवर्किंगचा क्रेज दिवसें-दिवस वाढतच चाललं आहे. वाट्स अप, फेसबूक, ट्विटर, हाईक अजून बरचं काही. खरं तर हि सर्व माध्यमं एक उत्तम व्यासपीठ आहेत,आपले विचार, मत मांडण्याचे. पण जश्या नाण्याच्या दोन बाजू तश्याच या सोशल नेटवर्किंगच्याहि दोन बाजू आहेत. एक म्हणजे उत्तम व्यासपीठ देऊन, आपल्यातील अभिव्यक्तित्व, विचार जगापुढे बस्सं काहीच क्षणात पोहचविण्याच कार्य सोशल नेटवर्किंगने कित्येकांना स्वत:च सुंदर व्यासपीठ निर्माण करून दिलं आहे. कित्येकांना ज्या त्या क्षेत्रात अभिव्यक्ती स्वातंत्र्यांची संधी उपलब्ध करून दिली आहे. मग ते साहित्य, कला, क्रिडा,मनोंरजन व इतर कुठल्याही क्षेत्रांशी संबधीत असो ! वैचारिक दृष्टीकोन बदलुन, प्रत्येकाला व्यैयक्तिक वा सामाजिक विषयांवर मत मांडण्याचे व्यासपीठ या सोशल नेटवर्किंग मुळे सहज शक्य झाले आहे.

पण “अति तिथे माती” या विचारांप्रमाणे, जिथे अतिरेक आला तिथे नुकसानही आलच. "सोसल तेवढच नेटवर्किंग” या शिर्षकातच याचा अर्थ दडलेला आहे. अति प्रमाणात ऑनलाईन राहिल्याने कित्येकांच्या मनावर नैराश्याचं सावट निर्माण होऊ लागले आहे. त्याचा प्रभाव प्रत्येकाच्या आयुष्यावर पडताना दिसत आहे. जणु हे एक असं व्यसन सर्वांना जडत आहे जे मनाने कितीही ठाम ठरवूनही सुटता सुटेनासं झाल आहे. त्यांचबरोबर आपल्या जवळील नातलगांशी सुद्धा भेटण्यासाठी, त्याची हाल-हवा विचारण्याची फुरसतसुद्धा या नेटवर्किंगमुळे मिळेनासी झाली आहे. ते असच झालं की परके जवळ आले, पण नातलगचं दुरावत गेले.

तरूणाईच वाढत सेल्फी क्रेज तस वाईट मुळीच नाही पण यांमुळे इतर जे वैचारिक पोस्ट करणे, संदेशात्मक लेखन वाचणे हे कमी होऊन वाचन संस्कृतीचा -हास होत चालला आहे.

सोशल नेटवर्किंगद्वारे प्रत्येकाला अभिव्यक्त होण्याची खुप मोठी संधी मिळाली असुन याचा योग्य वापर सर्वांनीच करणे गरजेचे आहे. "सोसल तेवढच नेटवर्किंग" प्रमाणे सतत ऑनलाईन न राहता अधून-मधुन ब्रेक घेत नेटवर्किंगशी कनेक्ट राहणं प्रत्येकांन जमवायला शिकायला हवं. तरच सततच्या ऑनलाईनवर राहण्याने बिघडणारी मानसिकता,

मनाला आलेली नैराश्यता दुर होईल. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक होणार नाही ही काळजी आपणच घ्यायला हवी. चांगल्या उपक्रमाला प्रोत्साहन देऊन, पोस्टद्वारे एखादा समाजोपयोगी संदेश दुरवर पोहचवुन समाजकार्य करण्याची संधी प्रत्येकालाच या सोशल नेटवर्किंग माध्यमातुन करता येऊ शकते.

सोशल नेटवर्किंगच हे माध्यम खुप चांगल, भव्य,प्रेरणादायी असून प्रत्येकाला आपले मत अभिव्यक्त करू देणारे उत्तम व्यासपीठ आहे. पण आपले आरोग्य सांभाळुन आणि चांगल्या विचारांची देवाण-घेवाण करून, संदेशात्मक विचार मांडुनउत्तम सामाजिक कार्य आणि भवितव्य घडविले जाउ शकते. तेव्हा एक गोष्ट कायम स्मरणात ठेवा...सोसल तेवढच नेटवर्किंग...!!" करा, आपले मनोभाव,चांगले विचार व्यक्त करा.

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**पत्रलेखन**

## *प्रिय वरूणराजा*

मी एक दुष्काळग्रस्त शेतकरी. आयुष्यच हे शिवार, पेरण्यात घालवल. दिवस उजाडल्यापासून राब-राबणारे हे हात अखेर थकले. थकले तुझ्या रूसव्यापुढं, थकले नशिबापुढं, हतबल मनाला निराशेच्या काहुरानं असं घेरलं की, कित्येक शेतकरी मित्रांनी आपला प्राणच त्यागला. त्यात उरली-सुरली कसर कर्जाच्या डोंगराखाली हात अडकुन पुरी झाली. लेकरं उशाशी जेव्हा बारीक तोंड करून, उपाशी केविलवाण्या डोळ्यांने पाहतात ना तर काळीज एकतर फाटतं, नाहीतर कर्तव्यात कसर पडली म्हणून वेदनेच मळभ उराशी भरगच्च दाटतं. मोठ्या स्वप्नांन आम्ही शेतकरी कर्ज काढुन शिवार पेरतो, पण हे वरुणा, तू वेळीच नाही बरसला कि, पिकांप्रमाणे जीव पण जळतो.

**तुटते सगळीच आशा.**
**वरुणा, तुझी असते मीतभाषा.**
**तुझ्या चाहुलीची असते अभिलाषा,**
**पंचप्राण एकवटुन वाट पाहुनी,**
**तु नाही आलास कि होते,**
**आयुष्याची जीवघेणी दुर्दशा.**

पोटची पोर जेव्हा मोठी होते, तिच्या लग्नाची चिंता बापाच्या मनाला स्वस्थच बसू देत नाही.मन म्हणत असत, "यंदा पाऊस वेळेवर झाला, तर पिक जोमान येईल अन् माझ्या छकुलीच लगीन बी जोरात लाऊन देईन." या आशेतच जगणारा मी, एकाकी तुझ्या रूसव्याचा शिकार होतो अन् मग स्वप्नाची राखरांगोळी होते. मग मात्र कष्ट करणारे शरीर जरी नाही थकले तरी मन मात्र थकुनच जाते. वाटते आपल्या नशिबात फक्त आणि फक्त यातनाच का ? कधी तो सोन्याहून पिवळा दिवस उजाडेल कि असेच प्राण त्यागावे लागतील.

"यंदा तरी बळीराजाच राज्य येऊदे" म्हणणारे माझे मन, प्रत्येकदा दुर्देवी ठरते. हे वरूणा...तुला माझी आर्त हाक ऐकू येत असेल तर माझ एक गा-हांण ऐक, या वर्षी तरी वेळेवर ये, हि धरणीमाय, तो चातक, मी बळीराजा, धरतीवासी तुझी वाट बघत आहेत, यंदा तरी शिवार पिकानं डौलुदे, बळीराजाच राज्य येऊदे.

तुझा कृपाभिलाषी,
एक शेतकरी.

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

**लेख**

## *असचं मनातलं काही*

**बाप**:-

फक्त आईच मुलांवर जीव लावते असे नव्हे तर बाप वरून जरी दाखवत नसला तरी त्याच मन ही मुलांकरिता ओढ घेत असत. तितकीच माया मनात साठवून ठेवतं. फरक इतकाच की, आईच प्रेम दिसतं अन् बापाच प्रेम रागाने, शिस्तीने हृदयात,अंतरी झाकाळलेल असतं.

**आई**:-

प्रत्येक आईला आपलं मुल जणू काळजाच्या तुकड्याप्रमाणे असतं. प्राणाहुन प्रिय आपल्या मुलाला

पहिल्यांदा दुडूदुडू चालताना पाहता ना आईच मन आश्चर्यान भरून येत. तिच्या चेह-यांवर एक स्मित हास्य सुमधूर खुललेलं असत. आपल्या मुलाच्या मनात काय चाललय ? ते तिला लगेच कळत. जराही आपल्या बाळाला कुठ काही खरचटल वा लागलं तर आईचा जीव तळमळतो. तिच्या डोळ्यातुन चटकन् पाणी येतं.

प्रथम गुरू आई, मुलाचं पालनपोषण आणि संगोपण करते.आपल्या संस्काराची शिदोरी देत हाताच्या बोटाला धरून या दुनियादारीचा,आयुष्य जगण्याचा योग्य मार्ग दाखवते. स्वत: अन्नाचा त्याग करेल पण मुलाला उपाशी झोपु देणार नाही अशी आई.थोर तिची पुण्याई ! जिचे वर्णन करता शब्दही अपुरे पडतात. जननी जन्मभुमी स्वर्गापेक्षा महान आहे.

**हे वरुणा**:-

साद दे तु बळीराजाच्या हाकेला. तृष्णा भागव तहानलेल्या जीवाची. ती आर्त हाकेतली वेदना एकदाच समजून घे !

मान्सुन आगमनाने काही भागाला हल्का-सा तु दिलासा दिलाय. पण तुझ येण अविरत चालु राहूदे. नद्या, नाली, ओढे तुडूंब भरूदे. शेतकरी माय बापाच मन आनंदाने डौलुदे !
पिकांना उभारण्यां, तुझा मायेचा पाऊसरूपी वर्षाव असाच कायम !

हे वरुणा !! ऐकतोयस ना ?
साद दे !
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

## मराठी विचारधन

मेघ सारे पाणी देवून टाकतात, झाडे फळे देवून टाकतात, फुले सुगंध देवून टाकतात, नद्या ओलावा देवून टाकतात, सूर्य चंद्र प्रकाश देतात, जे आहे ते ते सर्वांनी मिळून उपभोग घेऊ.
***

**साने गुरुजी**

**लेख**

# स्त्री-भ्रूण हत्या

काळ बदलला, पण "स्त्री भ्रूण हत्या" अजूनही होतच आहेत. "स्त्री" आदिशक्ती आहे, तिचे प्रत्येक क्षेत्रात वर्चस्व आहे.तरीही, स्त्री-भ्रूण हत्या होतेच. "स्त्री" आहे म्हणून ही दुनिया आहे.

**निष्पाप गोजिरी कळी**,
**जन्मतः का खुडता** ?
**स्वप्न तिचे सोनेरी,जगण्याचे**
**या सुंदर आयुष्यी**,
**येण्याअधीच का मोडता** ?

"स्त्री"आदिशक्तीचे रूप. ना जानो? ती जीवनात किती भूमिका पार पाडते. कधी मायेची पाखर आई. तर कधी बहिणीचे अतूट रेशमी नाते. कधी गृहिणी. कधी नोकरी करून घर सांभाळणारी स्त्री. जिच्यामुळे ही दुनिया आहे. जिच्या प्रत्येक भूमिकेत जबाबदा-या असतात आणि सहनशीलता या गुणाच्या जोरावर ती उत्कृष्ट रीतीने प्रत्येक भूमिका पार पाडते. पण हे सर्व असूनपण आज स्त्री-भ्रूण हत्या होतात.

वंश परंपरासाठी मुलींची हत्या केली जाते. जी घराला घरपण देते. जी घरासाठी इतके काही करते मग का असे व्हावे? काळ बदलला, पण मूळ विषय स्त्रि-भ्रुण हत्या हा जिथेच्या तिथेच आहे.

आजची स्त्री कुठल्याही बाबतीत कमी नाही. तिने सर्व क्षेत्रात नाव कमावले आहे. तरीपण आजही स्त्रीभ्रूण हत्या होते ही खरोखरच दुर्देवी बाब आहे. प्रत्येक घरचा मान, सम्मान असते मुलगी. तिच्या प्रकाशाने घर उजळून जाते. कधी ती जीवनाला भक्कम साथ देते. कधी ती आयुष्यच बदलून जाते अश्या स्त्रीची हत्या. जगण्याचा अधिकार त्याना नाही का...?जगणे सुंदर आहे. तर मग का त्यांना या जगात येण्यापासून रोखले जाते आणि हत्या होते. स्त्री मुलाप्रमाणे आई-वडिलांना सांभाळू शकत नाही का...? नक्कीच सांभाळू शकते. जी इतक्या जबाबदा-या पार पाडते. ती ही जबाबदारीपण समर्थपणे पार पाडू शकते.

अंतराळवीर कल्पना चावला, साईना नेहवाल ही काही उदाहरणे ज्यांनी स्त्री असून देशाचे नाव रोशन केले.

पण ही उदाहरणे समोर असताना स्त्रीभ्रूण हत्या होते. ही एक खरच दुर्देवी बाब आहे.

**"स्त्रीभ्रुण हत्या"**

**स्त्री आदिशक्तीचे रूप,**
**मग का देता ?**
**हत्येचे स्वरुप.**
**जगण्याचा आधिकार,**
**स्त्रीला का नाही.**
**का तिच्या जगण्याला मनाई.**
**तिच्या येण्याने,**
**घराला घरपण येते,**
**मग तिला दुनियेत येण्याआधीच,**
**का मारले जाते ?**
***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४**

**कविता**

## तळे

वर्तुळामागून वर्तुळे
विचारांची वर्तुळे
मन माझे आहे जणू
खोल खोल खोल तळे

विचारांची असते गर्दी
पुढचा विचार देतो वर्दी
जुने विचार जाती तळाशी
नवे विचार, नव्या किर्दी

शांत शांत जलाशयात
कुणी फेकतो एक खडा
निर्मळ, स्वच्छ मनालाही
जातो तेव्हा मोठा तडा
***

**उद्धव भयवाळ**
**१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी**
**गादिया विहार रोड**
**शहानूरवाडी**
**औरंगाबाद४३१००५**
**ई पत्ता : ukbhaiwal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८८८८९२५४८**

**कविता**

## हिशोब नाही ठेवला

कोणी कधी छळले किती, हिशोब नाही ठेवला
मन माझे जळले किती, हिशोब नाही ठेवला

या इथे अन् त्या तिथे, नेम त्यांनी साधला
बाण उरी घुसले किती, हिशोब नाही ठेवला

जखमा जरी ओल्या उरी,हास्य नाही लोपले
तोंडामध्ये साखर अन् बर्फ शिरी ठेवला

विद्ध विद्ध झालो जरी,अंतरी रडलो जरी
आसवाचा थेंबही, नाही कुणा दावला

आता तर त्यांना मी, माफही केले पुरे
द्वेषाचा लेशही, नाही मनी ठेवला
***

**उद्धव भयवाळ**
**१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी**
**गादिया विहार रोड**
**शहानूरवाडी**
**औरंगाबाद४३१००५**
**ई पत्ता : ukbhaiwal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८८८८९२५४८८**

लेख

## हास्याच टॉनिक

जीवन खरंच संघर्षमयी प्रवास आहे. असा प्रवास जो सुख,दु:खाच्या वाटेवरून जातो. हा जीवनाचा लांबचा प्रवास कधी सुखकारक तर कधी वेदनादायक प्रसंगाबरोबर चालतच असतो. तोवर जोवर आपण अखेरचा श्वास घेत नाही. जीवन खरंच सुंदर आहे, हे जीवन जगून आनंदाने जीवन संघर्षाचा सामना करतच अनुभवता येत.

"जगी सर्व सुखी असा कोण आहे" नुसार प्रत्येक सजीव, मग तो गरिब असो वा श्रीमंत वा अजून कुणीही प्रत्येकाच्या जीवनात सुख, दु:खाच येण-जाण चालूच असत. पण मग अस असेल तर आपण जगण सोडतो का ? तर नाही उलट प्रत्येकानेच आनंदाने या दु:खाचा सामना करायला पाहिजे.

सुख आणि दु:खाची जीवनात ये-जा सारखी चालूच असते. सुखात माणुस खूप आनंदी, हर्षोल्लासाने भरलेला असतो. पण जेव्हा दु:खाचा डोंगर कोसळतो तेव्हा मनाला यातना तर होतातच पण मन आतल्या आत खायला उठत. मीच का ? माझ्याच नशीबी हे भोग का ? असे प्रश्नही मनाला पडायला लागतात. कधी-कधी मन इतक निराश होत की, जगण्यालाच काही अर्थ नाही असे नकारात्मक विचार मनात उठू लागतात. यावर खरंच काही उपाय आहे का ? जर आयुष्यत दु:ख आली, संकट आली तर त्याचा सामना करायचा कसा ? हा प्रश्न प्रत्येकाच्या मनाला पडत असेल.

"हास्याच टॉनिक" हे याच उत्तर असू शकतं. परिस्थिती कुठलीही असो, त्याचा धैर्यान, मन शांत ठेवुन, दु:खातही सुख मानुन आनंदाने त्यावर मात केली जाऊ शकते. सतत हसतमुख राहिल्यान खरंच दु:ख नियंत्रित होत का ? हा प्रश्न आपल्या मनाला पडला असेल तर हो काही अंशी, हासत राहिल्याने कोणत्याही प्रसंगी मग तो चांगला असो वा वाईट त्याच्याशी लढण्याचे,जुळविण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. हास्याने दु:ख जरी कमी होत नसले तरी मनावरचा होणारा आघात नक्कीच कमी होऊ शकतो.

हास्य एक अस टॉनिक आहे जे कठीण प्रसंगात, परिस्थितीतही मनाला शांत ठेवुन त्या परिस्थितीशी झुंजायच कस हे शिकवतं. फक्त अनुभवुनच "जीवन खरंच किती सुंदर आहे" हे आपण जाणु शकता. कुणाला रडविण्यापेक्षा , हसवणं खूप अवघड असत. हास्याच टॉनिक मन ताजतवान ठेवुन जणु जगण्याला नवसंजीवनीच देत असतं. मग हास्याच टॉनिक घ्या आणि या सुंदर जीवनाचा प्रवास सुखकर करा.

***

**धनंजय शंकर पाटील**
**ई पत्ता : dhananjaypatil142@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९६०६०७१४८**

कविता

## जीवनसाथी

सुखाचे सर्व सोबती
दु:खामध्ये कोण होणार भागी?
दु:खात फक्त सोबत असते
जीवनसाथीची
तोच असतो सुखात
नि दु:खात वाटेकरी
सात फेरे घेऊन
दिलेली असते त्याने कबुली
त्यालाच होतो खरा आनंद
वा दु:ख एखाद्या गोष्टीचे
नसतात खोटे त्याचे आविर्भाव
तोच पूर्ण करतो
आपले कर्तव्य
स्वत:चे प्राणही पणाला लावून
जपतो तो साथीदारास
जिवाची पर्वाही न करता
बाकी असतात नकली नाती
फक्त सुखात भाग घेणारी
दु:खात असतात
हजारो कोस दूर
"माहीत नाही" च्या
आविर्भावात

***

**सौ. निर्मला भयवाळ**
**१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी**
**गादिया विहार रोड**
**शहानूरवाडी**
**औरंगाबाद४३१००५**
**ई पत्ता : ukbhaiwal@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८८८८९२५४८८**

लेख

## प्रश्न

एक मोठा प्रश्न आहे मनाने पंगु असलेला समाज मोठ्या प्रमाणावर तयार झाला आहे. कोवळ्या मनावर कसे संस्कार करायचे देव धर्म विना ह्यांना माहिती नाही. देव धर्माशिवाय जगणारे व्यभिचारी वाटत. द्रिष्ट लागते मानणारी आई,आजी घरात आहेत. बदल अवघड आहे.आधी स्त्रिया बदलणे आवश्यक आहे. स्त्री हा समाज आकारते आजी.आई.ताई,मावशी,आत्या ह्यांच्या मांडीवर पहिले बाळकडू पाजल्या जाते.

ह्याची विचारसरणी सुधारित असेल तरच नव्याने हा समाज आकाराला जाणार आहे.ह्या जरुरीपेक्षा जास्त भावनिक आहे व्यावहारिकता नाही कळत ह्यांना. म्हणून पुरुषही व्यावहारिक नाही तितक्या प्रमाणात आपल्या काम करण्याच्या जागेवर व्यावहारिक असणे गरजेचे आहे भावनिक झाले की कामाशी प्रामाणिक नाही राहू शकत. बैमानी करतात. हे एका कारण आहे भ्रष्टाचार वाढण्याचे. एकमेकांशी वैर पण भावनिक अति असल्यामुळेच वाढते. मतभेद होणे हा नौकरीचा भाग आहे. आपले वयक्तिक विचार तिथे लागू होत नाही.

कामकाज नियम आणि व्यक्तिगत विचार एकत्र करून हा गोंधळ झाला आहे. सरकारी कार्यालयात एखादी स्त्री गेली म्हणाली माझ्या मुलाचे मधले नाव आणि आडनाव बदलायचे तर तिला तिथे कामा करणारा सरकारी कर्मचारी अस कुणीच केले नाही ह्या गावात आजवर तुम्ही कशाला बापाचे नाव काढता. हे चुकीचे आहे. कर्मचार्याने फक्त काय प्रक्रिया आहे ते सांगायला हवे.

कायद्याने लावता येते हि माहिती सुध्दा त्याच्यापर्यंत पोहचली नाही अशी सरकारी यंत्रणा आहे. घटनात्मक अधिकार असून स्त्रीला समक्षम स्वतंत्र नागरिक होऊन जगू शकत नाही कारण हे अडथळे पोलीस केस टाकताना कोर्टात सुध्दा जज हेच स्त्रिया जज असल्या तरीही म्हणतात “आपल्या कडे स्त्रीला सहन करावेच लागते.” मग तुम्ही जज कशाला झाला?? हा प्रश्न आहे दुसरे कुठले काम करायचे असते. आपण जे काम करतो त्याच्याशी प्रामाणिक नाही ही उदाहरणे आहेत. वकीलही तसेच.

***

**लक्ष्मी देसाई**
**ई पत्ता : laxmidesai5@hotmail.com**

कविता

## ती

ती गेल्यावर नुसता शांत बसतो
ती नसल्यावर खूप राग येतो
तिची वाट पाहण्यात किती वेळ जातो
तिच्यामुळे आमचा खोळंबा होतो

ती फोन करून सुद्धा येत नाही
तिला शेतकऱ्याची काळजी नाही
कधी येते, कधी जाते, कळतच नाही
तिच्याशिवाय तर काहीच होत नाही

ती आली कि, खूपच आनंद होतो
सर्वजण लगेच कामाला लागतो
अशी कशी 'वीज' दिली सरकारनं
सगळेच मोकळे होतात दुपारनं
***

**संतोष बोंगाळे**
**मु. पो . पिंपळखुंटे ता . माढा**
**जि . सोलापूर ४१३२०८**
**ई पत्ता : mr_bongale@rediffmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९२३९००८४०**

## मराठी विचारधन

सूर्याच्या किरणांनी ज्याप्रमाणे बर्फाच्या राशी वितळतात, त्याप्रमाणे अहंकाराच्या राशी प्रेमाच्या ओलाव्याने वितळतात.

***

स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, स्वतंत्र म्हणजे जबाबदारी.

***

हृदयात अपार सेवा भरली कि सर्व मित्रच दिसतात.

***

**साने गुरुजी**

कविता

## गुरगुर

खाऊन भाकरी मालकाची
राखण शेजाऱ्याची करतोस का?
जाब विचारता हक्काने
जनतेवर गुरगुरतो का?

फितूर गल्ली, फितूर सवंगडी
लाच त्यांची घेतोस का?
विकून स्वाभिमान तरी
मान तुझी ताट का?

अंधाराशी मैत्री करून
काजव्यांना छळतोस का?
सज्जनांच्या प्रकाशात
तोंड काळे लपवतोस का?

कुठे फेडशील पाप सारे
दिल्या मताला जागशील का?
माणूस बनून माणसासारखे
माणसाला तू वागवशील का?
***

**संतोष बोंगाळे**
**मु. पो . पिंपळखुंटे ता . माढा**
**जि . सोलापूर ४१३२०८**
**ई पत्ता : mr_bongale@rediffmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९२३९००८४०**

### मराठी विचारधन

कबुतराला गरुडाचे पंख लावता येतीलही, पण गगनाभरारीचे वेद रक्तातच असावं लागतं, कारण आकाशाची ओढ दत्तक घेता येत नाही.

***

गैरसमज हा कॅन्सर सारखा असतो, तिसऱ्या अवस्थेत पोहोचल्यावर तो आपलं स्वरूप प्रकट करतो.

***

**व. पु. काळे**

कविता

## आधार

श्रावणात घननिळा रुसला
शेतकरी शेत पेरून फसला

ढेकळ रानात जशीच्या तशी
देणी भागवायची आता कशी

वेड लावी जीवाला ही चिंता
कसा सोडवायचा तुजवीण गुंता

नजर लाऊन आभाळी पाहतो
रोज स्वप्नात बरसत येतो

"होता तेवढा गेला करपून ऊस
अजून येईना कसा पाऊस"

हा चावळत झोपेतून उठतो
असा घाव जिव्हारी बसतो

प्राण कंठात गोळा होई
पुन्हा पुराचा उपयोग नाही

येरे घना असा थेंब थेंब
उभा राहील मेलेला कोंब

करू नको अशी उपासमार
तूच साऱ्या जगाचा आधार
***

**संतोष बोंगाळे**
**मु. पो . पिंपळखुंटे ता . माढा**
**जि . सोलापूर ४१३२०८**
**ई पत्ता : mr_bongale@rediffmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९२३९००८४०**

### मराठी विचारधन

बोले तैसा चाले !! त्याची वंदावी पाउले !!

***

**संत तुकाराम महाराज**

**कविता**

## झुरणे नकोचं आता

झुरणे नकोचं आता
दूर दूर असे रे गप्प राहून

कांहीच न बोलता
सगळेच आहेत ओळखून .... ll

बघ जग घेईल शंका
तू काव्य धुंद लिहितेवेळी

'ती' हिचं अनामिका
वर्णन करतात तुझ्या ओळी ... ll

का काढतोस खोडी
रसिकांनी ज्याची दखलं घ्यावी

क्रोधात आहे थोडी
तरी तुझी का भुरळ मज पडावी ... ll

काय घेशील निर्णय
या शब्दांपलीकडे मनमुराद जगावे

का तुला असं वाटतंय
डोळ्यांत न हरवता, मुक्तच राहावे ... ll
***

**अनामिका ... एक मृगजळ**
**ई पत्ता : anamika.author@gmail.com**

## मराठी विचारधन

निरनिराळ्या लोकांच्या दृष्टीकोनातून आपण स्वत:ला पाहू शकलो, तर आपल्याला खूप नवे मित्र आपल्यातच मिळतील
***

**व. पु. काळे**

**कविता**

## आनंदवन

कुत्र्यामांजरांना माणसं
अंगाखांद्यावर खेळवतात
कुष्टरोग झाला तर मात्र
घरची माणसेच टाकून देतात

देव प्रेषित म्हणून पाठवितो बाबांना
अशा भावनाशून्य जगात
भूतदयेचं असं ज्वलंत उदाहरण
मिळणार नाही अवघ्या विश्वात

ऐषारामात जगण-या बाबांना
एकदा एक कुष्ठरोगी दिसतो
तोच बाबांच्या आयुष्यातला
टर्निंग पॉईंट ठरतो

अस्वस्थपणे फे-या मारणारे बाबा
निर्णय एक घेतात
"तू तिथे मी" म्हणणा-या साधनाताई
भक्कम  पाठिंबा देतात.

बुद्धयाच स्विकारलेल्या सतीच्या वाणाची
तात्काळ सुरूवात होते
ऐश्वर्य, सौख्य सारे नाकारून
ध्येयपथावर  पाऊल पुढे पडते

पतीपत्नीच्या अद्वैताचं हे एक
सुंदर उदाहरण ठरते
बाबांसह साधनाताईंच्या
साधनेस सुरुवात होते.

तमा नाही कष्टाची,
पैसानाही गाठीला
गणगोत मागे टाकून
स्वेच्छेने लागले कामाला

निर्भत्सना साहिली घरच्यांची
सरकापही नव्हते पाठीला
एकाकी सेवाव्रताचा किता
उभयतांनी गिरवला

कुष्ठरोग्यांमध्ये बाबांना
दिसे प्रत्यक्ष भगवान
त्यांच्या सहाय्यार्थ उभविले
आनंदवनाचे नंदनवन

कष्टाची परिसिमा होती
त्यातच विकास, प्रकाश जन्म घेती
त्यांच्या अंगिकृत कार्यात मदतीला
दोघांचे चिमुकले हात येती

विकास होत होता सर्वांचा
प्रकाशही लाभला सा-यांना
विकासने आनंदवनाचा विकास केला
प्रकाश लाभला हेमलकशाला

फक्त कुष्ठरोगीच नाही तर
अंध मुकबधीर अपंगानाही
लाभला आधार दोघांचाही
उजळती जीवने मुक्या जीवांचीही

फक्त पाहून डोळ्यांनी आपण
प्रशंसा तोंडानं करायची नाही
यथाशक्ती करु काही
हमी आपण देऊ ही
***

**सुनीता सुरेश महाबळ**
**ई पत्ता : mahabal.ss@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८३०८५५८९९५**

## मराठी विचारधन

आपल्या भावी पिढीची जबाबदारी आपल्या स्त्रीवर्गावर असल्यामुळे स्त्रियांना प्रथम सज्ञान करणे फार जरुरीचे आहे
***
गुरूपेक्षा शिष्याने अधिक काहीतरी केले पाहिजे.
***
शिक्षण हे साध्य नाही साधन आहे.
***
**कर्मवीर भाऊराव पाटील**

## सुविचार

(१)
विचारातच दडललेलं असतं
बीज प्रत्येक कृतीचं
पिक हवं उत्तम तर
बीज उत्तम हवं विचारांचं

(२)
जशी असेल दृष्टि
तर दिसेल सृष्टि
प्रसन्न रहा ना सदा
कशाला रहायचं कष्टी?

(३)
संकटं आली म्हणून
हातपाय नसतात गाळायचे
नेटाने प्रयत्न करून
ध्येयमंदिर असते गाठायचे

(४)
निसर्ग देतो भरभरून
दोन्ही हातांनी भरपूर घ्या
पण दातृत्वही त्याचं घेऊन
तुम्हीही जगाला काही द्या

(५)
गुलाबाच्या फुलाप्रमाणे
जीवनाचही असतं
दु:खाच्या काट्यांसकटच
ते स्विकारायचं असतं
***

**सुनीता सुरेश महाबळ**
**ई पत्ता : mahabal.ss@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८३०८५५८९९५**

## मराठी विचारधन

जो वेळेवर जय मिळवतो तो जगावर जय मिळवतो.
***
**संत गाडगे महाराज**

## " गुडबाय सचिन, तू आमचा अभिमान आहेस!"

क्रिकेटपंढरीचा पांडुरंग सचिन
आज निवृत्त होतोय
सचिनभक्तांच्या डोळ्यात
निरोपाचा अश्रु तरळतोय

लहानथोर सर्वांनाच यानं
वेड असं लावलं कि
क्रिकेटवेडे नसलेल्यांनाही
प्रेमात यानं पाडलं

आहे काय असं त्याच्यात?
कमालीचा साधेपणा
आणि कडवी झुंज देतानाचा
असामान्य कणखरपणा

बॅटही कधी हातात न घेतलेल्यांनीही
भरपूर तोंडसुख घेतलं
पण सचिननं तोंडानं नाही बॅटनं
त्यांना सडेतोड उत्तर दिल

अनेक विक्रम मोडीत काढलेला
विक्रमादित्य तो ठरला
कोणाशी स्पर्धा केली नाही त्याने
स्वतःच स्वतःचा समीक्षक बनला

कॅप्टनशीपचा काटेरी मुकुट मात्र
पेलला नाही त्याला
पण प्रत्यक्ष जीवनात मात्र
तो लहानथोरांचा हिरो झाला

असा हा सर्वांचा लाडका सचिन
निवृत्त होतोय आता
खूपखूप शुभेच्छांची शिदोरी
त्याला देऊया जाताजाता
***

**सुनीता सुरेश महाबळ**
**ई पत्ता : mahabal.ss@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८३०८५५८९९५**

**लेख**

## मन

**मन वादळी, मन संयमी**
**मन खोल दर्या, मन मुक्त पंखी,**
**मन कातर कातर, मन आभाळ आभाळ ..**
**मन कोवळ्या उन्हाचे, सुवर्ण पांघरूण,**
**मन भोवतीचे, स्वच्छंद आंगण**
**मन दारातल्या कडीचे, अलगद कोंदण..**
**मन विभोर सभोवताली, निखळ हास्य ,**
**मन एक अंतरातल्या, मनाचे रहस्य ..**
**मन माझे आणि तुझे, कसे क्षितीज पार**
**मन ओळखावे कसे, कोण आरपार ..**
**एका मनाच्या, गाभार्यात ,**
**असंख्य द्वार, असंख्य द्वार !**

या माझ्या वरील कवितेसारखीच असच काही आयुष्यावर बोलताना मनाची अवस्था प्रत्येकाची होत असणार आहे.. आयुष्य काय असत, अस एका वाक्यात सांगता येत नसत ते जगायचं असतं, हळू हळू अजाणतेपणे ते उलगडत जाते आणि अनुभवांची शिदोरी गाठीला पडली कि आयुष्यावर जरा कुठ बोलायला जमत नाही का !

कोणाचे आयुष्य भले अगदी, अल्प असो, कोणाचे मध्यम, कोणाचे साठी उलटलेले, कोणचे रौप्य शतक आणि बरेच जगलेले क्षण दिवस असतील त्यात, आपण आपल्या आयुष्यात काय केल, यापेक्षा दुसर्यांना किती सुख दुखः दिले याचा हिशोब मांडत येतो अथवा नाहीही... आपण आपल्यासाठी जगलेले आयुष्य तसे तर फारच कमी असते, आयुष्याच्या विविध टप्प्यावर आपण अनेक भूमिका वठवत असतो नाही का, अशा या भूमिक्कान्मधून आपल्याला आयुष्याचा नकळत कळत सहजपणे एकक वेगळाच पैलू दिसून येतो. दृष्टी तशी सृष्टी म्हणावे तसेच आपण आपल्या नजरेतून आयुष्याला पारखू शकतो

एखादी घटना आपण सकारात्मक घेऊन त्याचे आपल्या आयुष्याशी संबंध जोडू शकणे आणि ती कला अवगत होणे म्हणजेच आयुष्यावर मात मिळवणे होय.. आयुष्य हे देवाने दिलेली देणगी आहे, तिचा आपल्या जीवनात सकारत्मक उर्जा आणून काही सत्कार्य केल्यास या आयुष्याला खरा अर्थ प्राप्त होतो, सकाळ ते झोपेपर्यंत जेवणे, आवरणे, झोपणे या मुलभूत गरजा सोडल्यास आयुष्यात बर्याच अशा गोष्टी आहेत ज्या तुमच्या मनाला आनंद देतात,

जीवनाला नवा अर्थ प्राप्त करून देतात .. आयुष्य वेचणे काय हे आपल्या वृद्ध माता पित्यकडून आपल्या पेक्षा अनुभवाने वयस्क व्यक्तीकडून जमेल तेंव्हा शिकावे, कणाकणाने झीझताना सोसलेल्या यातनांचे क्षण विसरून आनंदाने जगणारी लोक पहिली कि आयुष्याची खरी गम्मत कळते ,ते असे नाहक वाया घालवण्यासाठी नसून काही उर्जात्मक काही आव्हान पेलून जीवनाला सामोरे जाणे होय.

लहान बालका पासून ते वृद्ध पर्यंत आयुष्यचे अनेक अर्थ किस्से कहाण्या असतील, ज्याने त्याने स्वताच्या आयुष्यात दुसर्याला दिलेल्या चार आनंदाच्या क्षणांची शिदोरी घेऊनच जगावे अर्थपूर्ण, अनामिक आनंद आणि एक समाधानी आयुष्य हे नेहमी आपल्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारे असते..

तुम्ही आम्ही आपण एक कठपुतलळे आहोत या विधात्याचे, तो चक्र फिरवतो आयुष्याची त्यानुसार आपली फेरी असते, त्यात आपले स्वताचे सप्तरंग भरून आपण या आयुष्याला सुन्दर बनवायचे.. नाही का !!! किती लिहिल्या ओळी तरी, रीतीच राहते भावभावनांची ओंजळी ..

**कुठूनतरी येत राहतात लाटा,**
**किनाऱ्याला कवेत घेण्यासाठी,**
**आणि, परतताना जातात ठेऊन,**
**काही शिंपल्यांच्या असंख्य जाती,**
**निर्जीव, चकचकीत,**
**कधी खरबरीत गारगोटी..**
**एक एक शिंपला वेचताना**
**जसा अंतरंगाचा भाव उलगडत जातो, तसच ,**
**एक एक ओळ, वाक्य आणि रचनेत**
**कसा अर्थ दडलेला असतो !!!**
**तसेच रहस्यमय असतं,**
**अगदी समुद्राच्या खोल तळासारखे खोल**
**तर कधी लाटेसारखे वर वर भासणारे,**
**अचानक वादळी अचानक शांत होणारे ,**
**अवघड गणितासारखे न उलगडणारे,**
**कधी सोप्पे अगदी सहज समजणारे ...**
**जगायचे ज्याने त्याने आनंदाने !!!!**
***

**वृषाली वजरीणकर**
**पुणे**
**ई पत्ता : vrushalivajrinkar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५८९०५६७**

## कविता

## खाज

दिवसभराचे सोसत चटके
अंगावरती आसूड फटके
ढेकूळ ढेकूळ उकळताना
दाबल्या दाण्यात हसू लटके

आभाळ झुलवी झुला कोरडा
आषाढ घाली पेरणीस मोढा
उंडरना-या वासरांच्याही
शेपटींचा मग पडतो गोंडा

झुलता श्रावण सोडतो लाज
बैलपोळ्याचा उतरता साज
जगण्यासाठी उधारी सारी
मरण मांडते वाढीव व्याज

सोसण्यालाही चढावी साज
पेलते माती कोणते राज ?
सरत्या सांजेच्या तळहातावर
उगवत्या सूर्याची सुटते खाज
***

**रावसाहेब जाधव**
**७०, महालक्ष्मी नगर,**
**चांदवड, जि. नाशिक ४२३१०१**
**ई पत्ता : rkjadhav96@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२२३२१५९६**

## मराठी विचारधन

संयम नसणारा बुध्दिमान मनुष्य आंधळ्या मशालजीप्रमाणे आहे, कारण मशालजी दुसऱ्यांना मार्ग दाखवतो, परंतु स्वतःला कधीच मार्ग सापडत नाही.
***

चंद्र आणि चंदनापेक्षाही सज्जनांचा सहवास अधिक शीतल असतो.
***

प्रेमम्हणजे मधुर सुवासाने दरवळणारे पुष्प आहे.
***

**कवी कालिदास**

घरगुती औषधोपचार

# घरगुती औषधोपचार

मी आज तुम्हाला काही घरगुती औषधोपचारांबाबत माहिती सांगणार आहे.

१) पहिलाच आजार असा आहे की 'अवघड जागचं दुखणं आणि जावई वैद्य ' म्हण आहे ना? तसं ! मुळव्याध (piles ) मध्ये मोडाचा त्रास होतो.त्यासाठी १ चमचा मोहोरी आणि २ चमचे दूध यांची बारीक पेस्ट करायची आणि ती दिवसातून ३-४ वेळा मोडावर लावायची, १५ - २० दिवसात पूर्ण बरे होतात.

२) पायात काटा गेला असल्यास, म्हणजे अगदी कुरूप झालं असलं तरी तंबाखू हातावर घेऊन मळायची, आणि रात्री झोपताना त्या जागेवर ठेऊन त्यावर कापडी पट्टी बांधायची. १-२ दिवसातच बरं होतं. गरजेप्रमाणे आणखी एखाददुसरा दिवस बांधली तरी काहीच अपाय नाही.

३). सतत उचकी लागत असली तर छातीच्या फासळ्या जिथे मिळतात , तिथे अंगठ्याने दाब देऊन दीर्घ श्वास घ्यायचा. उचकी थांबते.

४) कानात दडे बसत असतील तर विरुद्ध पायाने लंगडी घालून तो कान खाली करायचा. कानातील दडे सुटतात.

हे सर्व उपचार अगदी सोपे आणि बिन खर्चाचे आहेत, म्हणून कदाचित त्याच्या उपयोगितेबद्दल शंका वाटेल. पण सर्व उपाय अनुभवसिध्द आहेत.

**जखमेवर केल्या जाणा-या औषधोपचारांबद्दल माहिती करून घेणार आहोत.**

१) खोबरेल तेलात कापूर खलून लावावा, लवकर आराम पडतो.

२) तिळाच्या तेलाची पट्टी भाजलेल्या जागी लावावी.

३) अ◌ाले ठेचून गरम करून जखमेवर बांधावे.

४) धारदार वस्तूने जखम झाल्यास व रक्त वहात असल्यास चहापत्ती हातावर मळून जखमेवर लावावी,याने जखम चिघळत नाही, व लवकर आराम पडतो.

५) खरचटल्यास किंवा कातडी सोलवटल्यास झेंडूची पाने बारीक वाटून, त्याचा लेप जखमेवर बांधावा , लवकर आराम .... पडतो .

***

**सुनीता सुरेश महाबळ**
**ई पत्ता : mahabal.ss@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८३०८५५८९९५ / ९३७३०५११५०**

कविता

# मी होतो बाप

माझ्या हाती लेखणी
बापा हाती नांगर
बाप उकली ढेकूळ
माझे कागदी उत्तर

सरळ स-या बापाच्या
माझ्या पठीत ओळी
पोळी माझ्या ताटात
बाप चुरतो शिळी

गर्भात हात मातीच्या
बाप करतो लावणी
मुखवट्यात कागदाच्या
माझी अक्षर पेरणी

रंगांनी तरारलेली
फुले माझी विकतात
बाप पेरतो सुगंध
तरी त्याची सुकतात

बोराटीच्या उलग्यात
अडकून पडला साप
बाप होतो मुलगा
आणि मी होतो बाप

***

**रावसाहेब जाधव**
**७०, महालक्ष्मी नगर,**
**चांदवड, जि. नाशिक ४२३१०१**
**ई पत्ता : rkjadhav96@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२२३२१५९६**

कविता

## आता असणेही लांबत गेले

मी तेथेही जगलो होतो
आज इथेही उगलो आहे
तेव्हा अश्रूत भिजलो होतो
आता डावत सजलो आहे

ना एकटा तिथेही होतो
ना इथे नि:संग आहे
मी रंगलो तिथेही होतो
ना इथे बेरंग आहे

तेथे हाती रुमणे होते
ना इथेही सुटणे आहे
वळ तेथेही झाकले होते
हाड इथेही तुटले आहे

तसा जमलो तेथेही होतो
आज इथेही रमलो आहे
उसळत तेथेही होतो
ना इथेही होतो

फुलण्याचा फरक इतका
हा बहर कोमुलांत आहे
ते पेरणीतून उगले होते
इथे उगण्याला पेरत आहे

ते फेकले आगडोंब जगणे
इथे माथे कोंबाळलेले
स्वप्नांना स्वप्न इतके की
आता असणेही लांबत गेले
***

**रावसाहेब जाधव**
**७०, महालक्ष्मी नगर,**
**चांदवड, जि. नाशिक ४२३१०१**
**ई पत्ता : rkjadhav96@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२२३२१५९६**

कविता

## घाला दोन रेघा

माफ करा साहेबांनो
सांभाळा जी सुभा
थोडेतरी जगण्याची
असू द्या कि मुभा

कलमाला कायद्याच्या
जडलीया बाधा
पैशाविना प्रेतालाही
देतो कोण खांदा

नवसाचा देवालाही
आता घम नाही
चा-याविना गायसुध्दा
पान्हावत नाही

फायलीच्या तळाशीला
योजनेचा भुगा
तलाठ्याच्या ताकदीच्या
आभाळाला भेगा

दम नको भरू बाबा
घायकुती येऊ
खळ्यातली मोडू सुडी
वाटा तुला देऊ

गावकीच्या भावकीच्या
जाळताना बागा
किती तुम्ही जोगालेत
कानामंधी सांगा

नशिबाने उरावर
उरे एक बिघा
कागदात कुणब्याच्या
घाला दोन रेघा
***

**रावसाहेब जाधव**
**७०, महालक्ष्मी नगर,**
**चांदवड, जि. नाशिक ४२३१०१**
**ई पत्ता : rkjadhav96@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२२३२१५९६**

कविता

## माणसासाठी कणसात दाणा

खळ्यावरचे खळते जगणे
कागदावरच पडती राशी
माना फिरवती उखळी सांधे
नगरामधले गणित उपाशी

आशयाचे काळीज ओझे
शब्द कुणबी मळतो खांदा
सालभाराच्या सोसिके तोंडी
सण पोळ्याचा रसिक मांडा

हात हिकमती ओरबाडणारे
नागडी होते सुपीक माती
पंगत एकच खाणारांची
राबनारांच्या हजार जाती

मांडीवरच्या दुष्काळाच्या
हंबरणारे दुधाळ चेहरे
पट मांडता महागाईचा
बदली सोंगट्या आपली घरे

बुरखा ओढून निजती नगरे
माणुसकीने टाकल्या माना
माती मात्र जपते अजून
माणसासाठी कणसात दाणा
***

**रावसाहेब जाधव**
**७०, महालक्ष्मी नगर,**
**चांदवड, जि. नाशिक ४२३१०१**
**ई पत्ता : rkjadhav96@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२२३२१५९६**

## मराठी विचारधन

जो मनुष्य मनात उफाळलेल्या क्रोधाला वेगवान रथाला रोवाल्याप्रमाणे त्वरित आवर घालतो, त्यालाच मी खरा सारथी समजतो. क्रोधभ्रष्ट होऊन त्याप्रमाणे चालणारा केवळ लगाम हातात ठेवणाराच समाजाला जातो.
***

**गौतम बुद्ध**

कविता

## मापन कोणी करण्यापूर्वी

हजर जणांच्या हजार टाळ्या
मंचावरल्या अस्तित्वाला
हुकुमत तुझी क्षणभराची
तू बा राजा तमाशातला

फड हा सरता वगनाट्याचा
राजा न तू माणूस उरशी
कुठे शोधशील अस्तित्वाला
अहंतेची हि नाजूक उशी

सोंगटी तू सोंगांमधली
नकोस टाळू माणूस खुळ्या
पोट कोणाचे भरले येथे
टाळ्यांवरती भाजून पोळ्या

असण्यामधले हसणे उसने
हसत जगावे नसण्यापूर्वी
माप स्वत:चे स्वत:च घ्यावे
मापन कोणी करण्यापूर्वी
***

**रावसाहेब जाधव**
**७०, महालक्ष्मी नगर,**
**चांदवड, जि. नाशिक ४२३१०१**
**ई पत्ता : rkjadhav96@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२२३२१५९६**

## मराठी विचारधन

अत्तर लावताना लावणाऱ्याच्याही हाताला लागते, सुखाचेही तसेच आहे, दुसऱ्याला सुख देताना ते आपल्यालाही मिळते.
***

मौन म्हणजे परीस आहे, ज्याला त्याचा स्पर्श होईल त्याचे जीवन सुवर्णमय होऊन जाते.
***

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन**

कविता

## टोकदार झेंडा

गावाकडे जाणारी चाकोरीची वाट
आता तलवारीसारखी चमकते आहे
नवीन फुटणा-या झाडांच्या फांद्या
बंबुकीसारख्या छातीवर रोखल्या आहेत
उगवलेलं लुसलुशीत कोवळे गवत
डोळ्यांना खिळ्यानं सारखे टोचत आहे
पाणवण्यावरच्या रहाटाचा गण्याऐवजी
रडण्याचा भास होतो आहे
ओंजळीतल्या पाण्याचा आता
वेगळाच रंग दिसतो आहे
वेशीबाहेराच्या धडग्यांवर
आसवांची ओल आली आहे
देवळातली घंटा शेवटच्या
तिस-या घंटेचा आवाज देती आहे
लांब दिसणारा गावाकडचा झेंडा
आता टोकदार होत चाललाय
पळणा-या माणसांची उमटणारी पाऊले
हळू हळू लाल होत आहेत
मी भरून घेतो माझा गाव
माझ्या खिशात सुरक्षित
अडगळीतील जुने पंचांग
उलटत जातो वर्षानुवर्षे मागे
जिथे खुणेने पेरले आहे
सुखी समाधानाचे वर्ष
तेथे ओततो गावाला
पुन्हा देवळात म्हटली जाईल
काकड आरती
माणसांची व माणुसकीच्या नात्यांची
***

**प्रा. बाळासाहेब बाबुराव हिरे**
**वेद कॉलनी, कोरमगाव रोड,**
**येवला, ता. येवला, जि. नाशिक**
**ई पत्ता : ctyeola@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१५००७९३ / ९४२३५२५८९४**

कविता

## सोन्याचा रंग

देवा तुम्ही आता लोकांना पावू लागले
कोटी कोटी दान तुमच्या झोळीतून वाहू लागले

इथे माणसांचे केव्हाही ऋतू बदलतात
आज दोन वेळची मिळत नाही रोटी
उद्या लांबलचक गाडीत फिरतो दादा
कामधंदा नाही पण घरी आणतो रोज पेटी
शेबडं पोरगं बारमध्ये रोज नोटा उडवत
आम्ही पापी आमचं डोकं असं का चालत नाही
बायकोच्या साडीला रोज नवे ढिगळ
नवी घेण्याची आमची हालत नाही
बिडीसाठीसाठी तुझ्यापुढची चिल्लर पळवणारी फुंकणी
तुझ्या देवळाला सोन्याचा रंग लावू लागले
कोटी कोटी तुमच्या झोळीतून वाहू लागले

तो देवालामागाच्या ताराबाईचा गुणा
भजनकरी मागच्या वर्षी मेला आहे
त्याच्या दहा बोटात अंगठ्या गळ्यात नाडा
लाखोत खेळतो त्याचा घोड्याचा तबेला आहे
पळवायचा नाही माणसं उडवायचा घोडा आहे
यु पी मधून आणतो सरकारी तोडा आहे
तुझ्या निवडीवर तगडी झालेली माणसे
गल्ली सोडून आता दिल्लीत राहू लागले
कोटी कोटी जान तुमच्या झोळीतून वाहू लागले

तो भाई रोज देवळात येतो गंध ओढतो
आणि तुला सोन्याचा सलाम करतो
पेपरमध्ये वाढदिवसाचा फोटो छापतो
हप्ता न देणा-यांचे हातपाय कलाम करतो
गावातल्या मुलींना भर रस्त्यात रोखतो
***

**प्रा. बाळासाहेब बाबुराव हिरे**
**वेद कॉलनी, कोरमगाव रोड,**
**येवला, ता. येवला, जि. नाशिक**
**ई पत्ता : ctyeola@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१५००७९३ / ९४२३५२५८९४**

कविता

## एकदा ती ती दिसली होती

एकदा ती ती दिसली होती, तशी पुन्हा दिसलीत नाही
खळी पाडुनी हसली होती, तशी पुन्हा हसलीच नाही

वाळूत स्वप्नांचे मनोरे बांधीत मज सोबती
किनाऱ्यावर बसली होती, तशी पुन्हा बसलीच नाही

बोलता बोलता तिला स्पर्श मी केला जरासा
लटके तेव्हा रुसली होती, तशी पुन्हा रुसलीच नाही

सरीवर सारी पावसाच्या झेलल्या अंगावरी
मजसवे ती भिजली तशी, सर पुन्हा बरसलीच नाही

त्या भेटीच्या आठवणीने मन माझे होते व्याकूळ
तिला न काही आठवे, खंत तिला कसलीच नाही
***

**प्रकाश पाटील**
**१३-बी, भाग्योदय अपार्टमेंट,**
**गोखिवरे, वसई (पूर्व)**
**जिल्हा : पालघर ४०१२०८**
**ई पत्ता : pprakashvasai@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८९०५६०९९९**

कविता

## दुष्काळाची आग

कशी लागली दुष्काळाची आग
खुडण्याआधी करपली द्राक्षबाग

तहानलेलं पोर करी रडारड
एका हंड्यासाठी आईची धडपड

व्याकूळ जीवाचा जंगलात फेरा
एक थेंब मिळेना पाणवठाच कोरा

रुसली हिरवाई दिसे पाचोळा
डोंगरात गावात उरे एक टोळा

शेतकरी भरतोय जनावरांची तळी
उजाडण्याआधी बांधे कसायाच्या गळी

वेशीला कुलूप उडून गेले लोकं
मरणासाठी सोडून गेले म्हतारी डोकं

वेशीवरच मारुती शनी लागला भासू
राख झाल्या गावासाठी गाळू लागला आसू

दोन घोटासाठी रडे तहानलेला कान्हा
पाणी शोधते आई नाही फुटे पान्हा

सगळीकडे पेटले दुष्काळाचे रान
एका झाडावरही दिसेना एक हिरवे पान

कुठे हरवली आता ढेकळावरची साय
काळ्या आईला का म्हणावे माय ?

थेंबाथेंबासाठी बादली घेते गती
पाण्यासाठी बाया विहिरीत जाता सती

नदी नाल्यांची कोरडी झाली ओठ
दडला पाऊस भरेना त्यांचेही पोट

कर्जापायी शेतकरी आत्महत्येचा पाऊस
वा-यावरती लेकरं करतो मरणाची हौस
***

**प्रा. बाळासाहेब बाबुराव हिरे**
**वेद कॉलनी, कोरमगाव रोड,**
**येवला, ता. येवला, जि. नाशिक**
**ई पत्ता : ctyeola@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९४२१५००७९३ / ९४२३५२५८९४**

## मराठी विचारधन

जो पर्यंत तुम्ही मनावर चांगला ताबा मिळवू शकत नाही, तोपर्यंत तुमचे राग द्रेष नष्ट होत नाही आणि तुमच्या इंद्रीयांवरही तुम्ही ताबा मिळवू शकत नाही.
***

**विनोबा भावे**

कविता

## तुला आठवेल

तुला आठवेल
सुख दु:खात
तुला विचारणारा
एक मित्र होता
तुझ्या गुणदोषांसह
तुला स्वीकारणारा
एक मित्र होता

तुला आठवेल
तू दिसली नाहीस
कि बैचेन होणारा
एक मित्र होता
तू हसली नाहीस
कि दु:खात बुडणारा
एक मित्र होता

तुला आठवेल
तू खुश रहावीस
म्हणून काहीही करणारा
एक मित्र होता
तू नेहमी जिंकावीस
म्हणून स्वत: हरणारा
एक मित्र होता

तुला आठवेल
तुला सुख:दुखात
सैदव स्मरणारा
एक मित्र होतो
तू झिडकारून गेलीस
तरी तुझ्यावर
मनापासून प्रेम करणारा
एक मित्र होता
***

**प्रकाश पाटील**
**१३-बी, भाग्योदय अपार्टमेंट,**
**गोखिवरे, वसई (पूर्व)**
**जिल्हा : पालघर ४०१२०८**
**ई पत्ता : pprakashvasai@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८९०५६०९९९**

कविता

## अनमोल पाणी

पाणी वाचवा ......पाणी वाचवा
पुढच्या भविष्याकरता पाणी वाचवा
अनमोल पाणी जपून वापरा
नाहीतर संपेल जीवनधारा .....II धृ II

पाणी वाचवा.....पाणी वाचवा ...
पाण्याला नाही कोणतीच नाती
पाण्याला नाही कोणताच धर्म
पाणी योग्यरीतीने वापरुन
जाणून घेवू त्याचे कर्म ....II१II

पाणी वाचवा ....पाणी वाचवा ...
थेंबथेंब पाण्याच्या वापरात
करू नका तुम्ही कसर
प्रत्येकांनीच करुया पाण्याची
काटकसर आता काटकसर .....II२II .

पाणी वाचवा ....पाणी वाचवा ...
पैशासारखेच मोजूनी वापरू पाणी
बचतीचा मंत्र जपू ध्यानी
जलसंपत्तीची करूनी बचत
तेव्हाच होईल दुष्काळावर मात .....II३II

पाणी वाचवा ....पाणी वाचवा ...
पाणी अडवा अन् पाणी साचवा
मोलाचे मानवी जीवन वाचवा
पाण्याविना मानव राहू शकणार नाही
म्हणूनच तूम्ही हो पाणी साचवा .II४II

पाणी वाचवा ....पाणी वाचवा ...
पाणी असले जरी घरोघरी
थेंब थेंब वाचवूया परोपरी
चला तर मग करूया पाण्याची बचत
तेव्हाच होईल दुष्काळावर मात .II५II
***

**सौ.अनुराधा कृष्णा धामोडे**
**मु.सुर्या वसाहत वाणगांव**
**पो.वाणगांव ता.डहाणू जि.पालघर**
**मोबाईल क्रमांक : ९१४५४७६४८५/**
**९७६४२९९४८०**

कविता

## बहिणी

पणती उद्बत्ती अन् मेणबत्ती
आहोत आम्ही तिघी बहिणी
रोज भल्या पहाटेच्या आठवणीत
राहते मी मोठ्या तयारीत
जाळूनिया माझी वात
तेलही गरम होतसे आत
मी मात्र राहूनी शितल
देतसे उजेड मंद मंद
देवाचरणी सदा मिनमिनती
मी आहे इवलीशी पणती ........
धूर सोडूनी सुगंध पसरत
दरवळते सा या परिसरात
स्वत: मात्र होते जळूनी खाक
उरते फक्त काडी अन् राख
गायब होते अशी अचानक
तासापूरती माझी झकपक
सावकाश सावकाश जळत जाती
मी आहे सुगंधित उद्बत्ती........
इतरांसाठी मन माझे जळवून
प्रकाश सा यांना देउन जाते
चिटपाखरू अवती भवती
अचानक मला येवूनी भेटती
आसवे माझी ओघळून जाती
मंद मंद ती थिजूनी जाती
अशी आहे माझी ख्याती
मी आहे सुंदर मेणबत्ती........
वाट चालूनी तेजांची
झळ सोसूनी भावनांची
राख करीतसे जीवनाची
ओढ आसमंत विलीनाची
गोष्ट आम्हा तिघी बहिणींची .........
***

**सौ.अनुराधा कृष्णा धामोडे**
**मु.सुर्या वसाहत वाणगांव**
**पो.वाणगांव ता.डहाणू जि.पालघर**
**मोबाईल क्रमांक : ९१४५५४७६४८५/**
**९७६४२९९४८०**

कथा

## डोळस माया

बराच वेळ होऊन गेला होता रियाला पार्क मध्ये येऊन, कंटाळून तिने चार वेळा फोन केला होता आणि दोन वेळा कोफीही घेतली होती, मन अतिशय उत्कटतेने सागरची वाट पाहत होता पण आता निराशाच वाढत चालली होती, भेटल्याशिवाय न सांगता जाण तिला रुचत नव्हता म्हणण्यापेक्षा ते यापूर्वी कधी अस घडलच नव्हता, थंडीमुळे कुठे जावे तेही एकटीच, अवघडून गेली होती रिया, न काही निरोप न मेसेज न कॉल ला उत्तर. सागर ..सागर अरे काय हे असा कसा विसरलास ,मनाशी पुटपुटत रीयाचे एकीकडे गाणे एकणे चालू होते तर फेर्या घालत मेसेज करणे .. इतक्यात पार्क मधील छोट्या मुलीचा धक्का लागून तिच्या हातातला फोन खाली पडला .. तशी ती छोटी sorry म्हणून पळून गेलीही, पण रियाची झाली न पंचाईत .. हाताने चाचपडतच ती तिचा फोन खाली वाकून शोधू लागली आणि तिच्या डोळ्यासमोर तिची आणि सागरची पहिली भेट आठवली कस, सगळ कस तरळून गेल नजरेसमोरून...

**तूझ्या अंगणी माझ्या अंगणी .. चाफा एकच दरवळतो....**
**सुगंधाचा गंध कसा, मन मोहरून जातो ..**
**प्रीतफुले म्हणू याला ,कि गीत त्यावर करू**
**कि गंधभरल्या स्मृतीत त्याला, अलवार निहारु...**

नजर? तीच तर नव्हती तिला. दृष्टिहीन रिया.. डोळस मुलींपेक्षा, अतिशय मनकवडी, बोलकी, चुणचुणीत, एखाद्याच्या नजरेला चुकूनही कळणार नाही कि तिला दृष्टी नाहीय अस तीच वागणं, कायम डोळ्यावर गोगल ग्लासेस, हातात पर्स, नेहमीचेच हास्य, प्रसन्ना चेहरा, देवाने सगळ काही दिलय मला असच जणू तृप्त भाव चेहऱ्यावर, जणू वाटाव आपण डोळस कि हि रिया..?

छोटस व्यवसायच प्रशिक्षण घेऊन स्वताच्या पायावर उभी राहण्याचा प्रयत्न करणारी स्वाभिमानी रिया प्रामाणिक आणि तेवढीच कष्टाळू, कॉम्पुटर शिकण्याची जिद्दभारी आणि याच हौसेपायी गाठ पडली ती सागरशी... सागर अतिशय हुशार जिद्दी, गरिबीतून दिवस काढत जीवनात यशस्वी होणाच्या मार्गाचे धडे घेणारा देणारा, उमद्या मनाचा दिलाचा तरुण, सागर दादा.. लाडका, लहानांचा, थोरांचा, मदतीला कधी नाही न म्हणणारा, धावत पळत सदैव हा झीर असायची स्वारी, सार्या सोसायटीत त्याची दुचाकी हिंडायची ती मुलांना चक्कर मारून आणायलाच .. काका काकू, आजी

आजोबा सगळे कसे फिदा होते त्याच्या या स्वभावर, आता कुठे जरा मार्गाला लागला पोर तोवर सागरच्या आईला मुलासाठी मुलगी आणायचं जणू सर्वांनीच विडा उचलला होता,जो तो त्याचा आईशी बोलायचं ते सागरच्या लग्नाबाबतच, आई काळजी करायच्या, सातची तब्बेत अशी तोळा मासा झालेली, याचा पुढे कसा होणार या विचारांनी त्यांना घेरलेले असायचे. स्वत:कडे लक्ष दयाला वेळ नसणाऱ्या पोराला सुंदर अशी गुणी मुलगी त्यांना हवी होती, तसा प्रयत्नही चालू होत .. आणि इकडे सागर ...सागरचे रियाकडे कामानिमित्त येणे वाढत चालले होते, रिया अतिशय मन लावून शिकत, गृहण करीत चालली होती, पूर्णपणे कामाची जबाबदारी तिने आता चांगलीच पेलली होती. सागराच्या साथीने तिला फारच मदत झाली होती.. काही अडचण असो तो कायम तिच्यासाठी हजार असायचा.. सागरच्या आवाज आणि बोलण्याच्या ढगीने तिला सागरच्या स्वभावाची आणि व्यक्तिमत्वाची पूर्ण ओळख झाली होती. सागरची नजर रियाच्या नजरेला भिडण्याचा प्रश्नच नव्हता, पण सागर तिच्या सुंदर निर्मळ विचारात ,तिच्या बोलक्या आणि मनमोकळ्या स्वभावात गुंतत चालाल होता.,

कळत नकळत मैत्रीचे बंध जुळत होते, सागरचे आता कामाव्यातीरीक्तही रीयाशी भेटणे बोलणे सुरु झाले होते.. रियाला याची जाणीव होत होती तसे तिने त्याला तिच्या कमतरतेची अंध असण्याची जाणीव करून दिली होती, त्याच्या भविष्याचा विचार बोलून दाखवला होता पण व्यर्थ, सागरला रीयाशि असलेल्या तिच्याप्रती असलेल्या भावना कळत होत्या फक्त ती त्याला न्याय देऊ शकत नव्हती .. काय आणि कुठे कसे बंध जुळत जातात हे प्रारप्ब्धलाच ठाऊक..

**त्या तृप्त धारा, त्या तृप्त लहरी**
**त्या गुंजनाचा,तो साक्षी वारा ..**
**त्या मिलनाचा,तो हा किनारा**

त्या आठवांचा, खेळ हा सारा,असाच काही गुणगुणत रिया तल्लीन होत रहायची... इकडे शोभा ताईचा रक्तदाब वाढत चालला होता. एकुलत्या मुलाचा रीयाशी सहवास आणि तिची ओढ कानावर आलीच होती, मन सैरवर झाले होते, कोणाला काय समजावे त्यापेक्षा सागरला त्यांनी खुपदा समजावले होते, ज्याच्या आयुष्यात जीवनसाथी म्हणून एक दृष्टिहीन अंध मुलगी येणार आणि तिचेच याला करावे लागणार या विचाराने शोभाताईना चैन पडत नव्हती, अतिशय कष्टातून मुलाला वाढवून, मोठे केले, त्याच्या आयुष्यात एखादी परी, फुलांच्या डोलीत बसून हळुवार प्रवेश करेल आणि सारे जीवन त्याला सुखात ठेवेल या आशेवरच त्यांनी मुलीही पाहायला सुरुवात केली होती.. आणि या बातमीने त्या पार निराश झाल्या होत्या.. मध्यंतरी त्यांना काही त्रासही झाला होता. सर्व तपासण्या केल्या गेल्या आणि सक्तीची विश्रांती लागू केली गेली.. कसला फोर्मही त्या भरून आल्या होत्या एका संस्थेत नुकत्याच ...

इकडे सागर रिया अजूनही या निर्णयापर्यंत पोहचले नव्हते कि आपण आपला संसार मांडावा, कुठतरी रियाचेच मन मांनत नव्हते,.. सागरचे रियावर पूर्णपणे मन जडले होते हे आता सागरालाही चांगलेच ठावूक होते, त्याने तिच्या दृष्टी नसण्याचा कधीही उल्लेख केला नव्हता कि व अडचण जाणवू दिली नव्हती.. किंबहुना त्याला ते तसे कधी वाटलेच नव्हते इतका तो समरसून गेला होता एकरूप झाला होता तिच्या विचारांशी मनाशी.. हृदयाची स्पंदने फक्त आणि फक्त तिच्यासाठीच तर धडधाडत होती.. आईची काळजी, म्हणणे मान्य होते, तिचे प्रेमही... आई ती आईच मुलाच्या भविष्याचा विचार योग्यच होता.. तसा तो आईला समजावण्यात थोडाफार यशस्वी झाला होता...

कोणत्याही अपेक्षेवेना मिळालेला निर्मळ प्रेम का नको होते रियाला.. अडथळा होता फक्त दृष्टीचा, त्याचे मन तर तिने जाणीलेच होते आणि त्याचे रूपही डोळ्यात साठवले होते, अगदी तसाच तर होता तिच्या स्वप्नातला तिचा जीवनसाथी.. .. नकळत गुंतणे काय ते तिला सागरमुळेच तर कळले होते, न स्पर्श न मिठी, एक अनामिक ओढ जणू होती गुंफण्याची .. नाकारता येत नाहीत प्रारब्धाचे बंध.. कुठे आणि कशा जुळणाऱ्या त्या रेशमी धाग्यांच्या, मुलायम स्पर्शाने, रोमरोमात उठणारे तरंग, ते प्रारब्धच होते कि आणखी काही, असाच काहीसा संभ्रमित मन दोलायमान अवस्थेत होत. या मधेच बरेच दिवस झाले या भेटीचा हा योग आला होता.... त्याच भेटीसाठी आतुरलेली रिया आज वाट पाहत उभी होती कित्तेक तास.. खात्री होती त्याच्या येण्याची, तशी हुरहूर वाढे मनाची.. बराच वेळ ती त्या विचारातून बाहेर आली ती फोनच्या आवाजानेच.. तिनी फोन उचलला. तसा सौम्य थरथर स्वर सागरचा ऐकू आला. रिया, मी येतोय.. तू थांब तिकडेच. सोबत माझ्या न्यायचंय तुला ... अशा दृष्टी नसलेल्या आपल्या मैत्रिणीची काळजी होती सागराला, तिच्या प्रत्येक विचार आचारशी एकरूप झाला होता तो, तिचा आधार बनू पाहत होता तो जणू.. आणि आता.. आता तर.. आईच तिच्या जीवनप्रवासातील तीचा प्रकाश बनून आल्या होत्या ..

सागर घाईनेच पोहचला तो रियाच्या पुढ्यात निशब्द असा... डोळे थकलेले, भिजलेले, चेहरा आक्रसलेला, रडवेला, चिंतीत कि आणखी काही.. काहीच तर दिसत नव्हते रियाला, मग कसे जाणवले तिला तिच्या मनचक्षुने हे हेरले आणि तिनी सागराला बोलते केले.. सागर.. काय झाला, उशीर झाला तर ठीक आहे रे, काळजी करू नकोस मी बरीय... चल बसू निवांत... आता सागराला हुंदका आवरला नाही.. क्षणातच तिच्या गळ्यात पडून तो हमसू लागला ..

रिया... आई माझी आई आपाल्याला सोडून गेली.. अचानक मला ती तिचा सर्वस्व देऊन गेलीय ग.. हो तिनी नेत्र दान केलय.. तेही फक्त तुझ्यासाठी.. रिया तिनी तुला दृष्टी देऊ केलीय ग माझ्या रियाला ते आता लगेच द्यावेत अशी तिची इच्छा तिनी पूर्वीच लिहून ठेवली होती.. रिया आज मला जाणवत आहे कि स्वताच्या मुलासाठी अख्खे आयुष्य झटणारी आई जातानाही मुलाच्या सुखी, आयुष्यासाठीच... आई हि आईच माझीही आणि दुसर्यासाठीही.. चल तुला यावेच लागेल, तिच्या नजरेतून हे जग तिच्या लाडक्या लेकासाठी पाहावेच लागेल.. याच कारणासाठी मी तिकडे सगळ सोडून आलोय.. तिची नेत्रदानाची इच्छा पूर्ण व्हावी म्हणून, सर्व सोपस्कार पार पडलेत, आता.. आता फक्त.. आणि रियाने त्याला कुरवाळले, स्तब्ध रिया गहिवरली.. काय बोलावे कळेना आणि तिनी स्वताला सागराल सावरले याची भेट दोन तीन वेळा काही कारणाने शोभा ताईशी झाली होती तशी ती त्यांना आवडलीच होती आणि तिलाही त्या..... फक्त अडसर होता दृष्टीचा ... तोही आता दूर केला तो आईनीच ..

अकस्मात मृत्यू कि चाहूल माहित नाही पण त्यांनी जाण्यापूर्वीच जाता जाता नेत्र दान करून जो काही निर्णय घेतला होता तो सार्यांचे डोळे पाणावून गेला... मनात असते तर त्यांनी त्या दिवशी डॉक्टरांकडे तो फोर्म भरला नसता. पण त्यांचे हृदय मन त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते, रियाची व्यथा डोळ्यांनी पहिली होती आणि सागरचे भवितव्य हि..त्या तच समाधान आहे हे त्यांच्या आत्म्याला चांगलेच कळले होते आण .. इतक्या जाणीवपूर्वक त्यांनी हे नेत्रदान सर्व स्रेष्ठ दान केल हो ...

रिया सागर सोबत त्या विचारातच पोहचली. आईचे अंतिम दर्शन घेतले, जणू तिला आशीर्वादाचा भास झाला आणि तिच्या नजरेत जणू आईचे स्वप्न दिसले.. ती तयार झाली.. सागरच्या डोळ्यात एक अनिमिष अशी लकाकी आली . आई तू दूर नाहीस माझ्याच जवळ माझ्याच सोबत आहेस सदैव तुझ्या प्रकाशाने हे जग पाहणाऱ्या रियाच्या रुपात !!!!

सार्यांचे डोळे भरून आले. शोभाताईच्या या निर्णय या समजूतदार नेत्र दानाच्या विचाराने आज एक मुलगी त्यांची दृष्टी घेऊन जग पाहणार होती, एक सासू आपल्या होणार्या सुनेची नुसतीच मार्गदर्शक नसून पूर्णत्व सर्वस बनली होती त्यांच्या लाडक्या सागराची रिया आज सर्वार्थाने पत्नी बनली होती अन शोभा ताई एक आदर्श सासू ..!!!

**नेत्र दान सर्वश्रेष्ठ दान !!! ..**

***

**वृषाली वजरीणकर**
**पुणे**
**ई पत्ता : vrushalivajrinkar@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८९७५८९०५६७**

**कथा**

## अधूरी एक कहानी

"माझ सुद्धा प्रेम आहे तुझ्यावर" हे शब्द कुणालच्या कानावर पडले अन् काळजात विरघळून गेले. कधीच न विसरण्यासाठी. कुणाल याच दिवसाची वाट पाहत होता. कारण त्याच ऋतुजावर मनापासून प्रेम होत. लाजरा-बुजरा असणारा कुणाल शब्दाने कधी व्यक्त झालाच नाही.

ऋतूचा स्वभाव थोडा अवखळ, सतत बडबड,मनात काहीही न ठेवणारी, नेहमी हसरा चेहरा, कुणालाही सहज आवडेल असा सुंदर चेहरा. अशा या सुंदर चेहऱ्याच्या प्रेमात कुणाल पडला. साऱ्या गोष्टी नजरेच्याच भाषेने समजून घेताना ऋतुला थोडा समंजसपणा दाखवावा लागला. कुणालचा शांत स्वभावच तिला आवडला. कधीतरी एकमेकाकडे पाहणे, नजर मिळवणे, नजर चुकवणे, एखादी स्माईल देणे हळूहळू साऱ्या गोष्टी सुरू झाल्या.

प्रेमाच्या खेळाला रंग चढू लागला. जीव एकमेकामध्ये गुंतू लागला. कुणालने धाडसाने ऋतूला विचारलच.... मग काय अजूनही ऋतूचे शब्द त्याच्या कानात घंटानाद करतायत..
"माझ सुद्धा तुझ्यावर प्रेम आहे."

आता पुढे काय... आयुष्याची स्वप्ने सजवायची, दिल्या घेतल्या वचनाची पूर्तता करायची, प्रेमाच्या पहिल्या पावसात चिंब भिजायच. अबोल वाटणारा कुणाल आता हळूहळू बोलू लागला, आणि ऋतू मात्र कुणालचा प्रत्येक शब्द कानात साठवायला लागली. कधी इकडच्या कधी तिकडच्या

गप्पा, एकमेंकाच्या स्वभावाची ओळख होऊ लागली.

कुणालचा देवावर विश्वास, श्रद्धा तर ऋतूचा मात्र प्रयत्नवादावर विश्वास. देवदर्शन कराव तर एक पर्यटन म्हणून असे तिचे विचार देवाकडे काही मागायच नाही, कारण देव काही देणार नाही. देव देतो फक्त भीती, अन् त्या भीतीतून निर्माण होते मग श्रद्धा त्यानंतर अंधश्रद्धा.

त्यापेक्षा पावसात मस्त भिजाव, प्रेमाची गाणी म्हणावी, आनंदाने नाचाव, बागडाव अशी तिची इच्छा. दोघेही समजूतदार एकमेंकाच्या विचाराचा आधार करत एकमेकाना सुखी ठेवण्याचा दोघाचांही प्रयत्न. सारे दिवस आनंदात चालले होते. उदया दोघेही आपआपल्या घरी सांगून लग्नाची परवानगी घेणार होते. कुणालची इच्छा होती की आज आपण भद्रा मारोतीच्या दर्शनाला जाऊया.

ऋतूच्या मनात नव्हत पण ती कुणालसाठी तयार झाली. कुणालच्या बाईकवर हळूवार प्रवास करत दोघेही खुल्ताबादच्या दिशेने निघाले.

सुखी संसाराची स्वप्ने पाहत खुल्ताबाद केंव्हा आले कळलेच नाही. दोघांनीही भद्रा मारोतीचे दर्शन घेऊन नारळ फोडून प्रसाद पर्स मध्ये ठेवला अन् परतीच्या प्रवासाला सुरूवात केली. दहा-पंधरा मिनिटे होत नाहीत तोच पाऊस सुरू झाला.

कुणालने गाडी एका हॉटेलजवळ लावून गरमागरम चहा मागितला. पाऊस काही थांबायला तयार नव्हता. ऋतुजाने पावसात भिजत जाण्याची इच्छा व्यक्त केली. कुणालच्या मनात नव्हत पण ऋतू साठी तो तयार झाला. बाईक औरंगाबादच्या दिशेने निघाली, पहिल्या प्रेमाच्या पहिल्या पावसात दोघेही चिंब भिजले. पावसाने आता चांगलाच जोर पकडला होता. कुणालने वळणावरती गाडीची स्पीड कमी केली. पण समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकने कुणालला काही कळायच्या आतच एक जोरदार धडक दिली...

तशी पावसाच्या पाण्याने निसरडया झालेल्या वाटेवरून बाईक घसरत गेली, ऋतू दूरवर फेकली गेली, पर्समध्ये असलेल्या प्रसादासहित... अन् कुणाल बाईकसोबत घसरत जाऊन बाईक मध्येच अडकला होता... दोघेही शेवटच्या घटका मोजत होते.

कुणालच्या डोळयात साठलेला पाऊस ऋतुजा पाहत होती, तर ऋतुजाच्या हातातून विखूरलेल्या प्रसादाकडे कुणाल पाहत होता.... कुणालच्या मनात मी देवदर्शनाचा हट्ट उगाच धरला तर ऋतुजाच्या मनात अजूनही पाऊस सलत होता...

***

**संदीप ढाकणे**
**जि.प.प्रा.शा.लिंगदरी ( औरंगाबाद )**
**ई पत्ता : sandeep.dhakne@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ७५८८५१२४६७**

**कविता**

## पत्र

ख्याली खुशाली सांगते पत्र
दोन मनाचा संवाद सेतू पत्र
आपलाच असे संवाद, ते पत्र
मनांतल्या भावनानाचे रूप जणू पत्र

दूर असो कुणी किती ही
त्याला जवळ आणते पत्र
अस्फुट अव्यक्त भावनां व्यक्त
करते तुमचे आमचे एक पत्र

नव्या जमान्यात असलो जरी आता
लिहिण्या साठी अजूनही खुणावते हे पत्र
उतरवा मनातले प्रपात सारे
मन मोकळे कळेल हे एक पत्र

***

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**ई पत्ता : arunvdeshpande@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०१७७३४२**

## मराठी विचारधन

कधी कधी आयुष्य तुमच्या डोक्यावर जोरदार प्रहार करेल तरीही जगण्यातील आशा सोडू नका.

***

**ऐ. पी. जे. अब्दुल कलाम**

कथा

## पिंपळावरची हडळ

रस्त्याच्या कडेला असलेल्या त्या शंभर वर्षे जुन्या पिंपळाच्या झाडावर नजर जाताच धडकी भरायची. आजुबाजुला ना कुणाचे घर, ना झोपडे. त्या पिंपळाच्या झाडाखालून जायला लोकं घाबरत. रात्री तर ते पिंपळाचं झाड़ अक्राळ विक्राळ राक्षसासारखं वाटायचं. त्या पिंपळाच्या ढोलीत असलेलं घुबड़ रात्री अपरात्री चित्कारायचं तेव्हा कुणाला कापरं भरलं नाही तर नवल! त्या पिंपळाखालून जायची भीति वाटायचं आणखी एक महत्वाचं कारण म्हणजे त्या झाडावर हडळ असल्याची गावभर चर्चा होती. खूप वर्षांपूर्वी म्हणे तारा नावाची बाई मुलाला जन्म देऊन लगेच मरण पावली होती. तिचा जीव त्या मुलात अडकलेला होता. त्यामुळे ती हडळ बनून त्या पिंपळावर रहात होती, असं गावातील लोक म्हणत. रात्री पिंपळावर कर्कश आवाजात तिचे अंगाई गीत ऐकू यायचे. तिचा मुलगा कोण, ती तारा कुणाची मुलगी किंवा कुणाची पत्नी होती हे मात्र गावातील कोणालाच ठाऊक नव्हतं.

त्या काळात एस.टी.शिवाय दळण वळणाचे अन्य साधन नव्हते. माहेरी गेलेली कांता घरी येण्यासाठी रात्री साडे नहुच्या एस.टी.ने निघाली खरी, पण वाटेत एस.टी.चा टायर पंक्चर झाला. जवळपास कुणी पंक्चर काढणारा नसल्यामुळे जवळ जवळ तासाभराने एस.टी.सुरु झाली.
...आणि आता रात्रीचे बारा-सव्वा बारा वाजले असतील. कांता पिंपळाखालून चालली होती. लांबुन तिने पिंपळाचे झाड़ पाहिले तेव्हाच तिच्या अंगावर शहारे आले होते. पटापट पाय उचलून कधी एकदाचे हे झाड पार करून पुढे निघुन जाते असे तिला झाले होते. चालता चालताच तिचा पाय पिंपळाच्या लांबवर पसरलेल्या एका मुळात अडकला आणि ती पडता पडता वाचली.त्याचवेळी अचानक वाऱ्याचे घोंगावणे वाढले, आणि ढोलीतले घुबड़ ओरडू लागले. कांताच्या ऊरात धड़की भरली. लहान मुलाच्या रडण्याचा देखील आवाज येऊ लागला. त्याच वेळी बेसुर आवाजात कुणीतरी हसलं. मागून कुणाच्या तरी पावलांचा आवाज येऊ लागला. आणि धावता धावताच कांता खाली कोसळली.

दुसऱ्या दिवशी कांताला पिंपळावरची हडळ झुंबल्याची बातमी गावभर पसरली. "भुत-बित काही नाही, तिच्या मनाचा भ्रम आहे" असे मी सर्वांना समजावण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. उलट "हा आलाय मोठा शहाणा" म्हणत साऱ्यांनी मलाच वेडयात काढलं. दोन दिवस ती वेडयासारखी आचरट विचरट चाळे करत होती, मधेच मोठ्याने ओरडायची, जोरा जोरात हसायची, केस मोकळे सोडून धावायची.

या सगळ्या प्रकारात तिचा नवरा हैराण झाला होता. काय करावे काय नाही, त्याला काही सुचत नव्हते. मी कांताला भेटायला गेलो. मी माझ्या पद्धतीने तिला गोंजारून गोंजारून गप्प करायचा प्रयत्न करत असतांनाच बाजूच्या गल्लीतला मोतीराम काका आला.
"हिच्या अंगात ताराचं भूत आहे, हिला तू काय समजवतोयस?" म्हणून त्याने मधेच तोंड खुपसले.
"काका, अहो भूत बीत काही नाहीय, ती घाबरलीय, रात्रीच्या वेळी पिंपळाखालून येतांना!" मोतीराम काकांच्या वयाचा आदर करत मी सोम्य स्वरात म्हटलं.
"ती हडळ अशी जाणार नाही ... तू एखाद्या मांत्रिकाला बोलाव !" म्हणून काकाने माझ्याकडे तुच्छतेने पहात कांताच्या नवऱ्याला सल्ला दिला. त्याने निमुटपणे मान हलवली.
"ठीक आहे, माझ्या ओळखीचा एक मांत्रिक आहे, मी आज संध्याकाळी त्याला बोलावतो " मी कांताच्या नवऱ्याला धीर देत म्हणालो.
"फार उपकार होतील ... " कांताच्या नवऱ्याने मला हात जोडले. मीही त्याला नमस्कार केला व निघालो.

संध्याकाळी मांत्रिकाला घेऊन मी कांताच्या घरी पोहोचलो. मांत्रिकाने आल्या आल्या त्याच्या जवळच्या कमंडलू मधले अभिर-गुलाल मिश्रीत पवित्र पाणी घराभोवती शिंपडले, ताराला घट्ट पकडून तिचा नवरा उभा होता, आणि ती त्याच्या पकडीतून सुटण्यासाठी आरडा ओरडा करत होती. मांत्रिक तिच्या जवळ आला आणि त्याने तिच्याही अंगावर पाणी शिंपडले तशी ती चटका लागल्या सारखी किंचाळली.
"बोल ! कोण आहे तू !" तो ओरडला.
"हुं !! , मी तारा आहे !" कांता गुरगुरू लागली.
तिचे अस्ताव्यास्त केस आणि असे गुरगुरणे खूप भीतीदायक वाटत होते. पुन्हा मांत्रिकाने पाणी शिंपडले. पुन्हा ती किंचाळू लागली. बऱ्याच प्रयत्नांनी तिला शांत करण्यात मांत्रिकाला यश आलं . कांता निपचित पडली. कांताच्या नवऱ्याने मांत्रिकाच्या पायावर लोटांगणच घातले. मी मांत्रिकाला सोडायला निघालो तेव्हा त्याने माझ्याकडेही कृतज्ञतेने पहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी प्रशांत बरोबर कांताच्या घरी गेलो. तिचा नवराही तिच्या बाजूलाच बसला होता. मी

कांताला काय घडले होते ते विचारले. त्याचवेळी मोतीराम काकाही टपकला. कांताने पूर्ण हकीकत कथन केली.
कांताचे कथाकथन संपले होते, पण ती आताही थोडी थरथरत होती.
"कांता, भ्यायचे कारण नाही. तुला काही भुताने झपाटले वगैरे नव्हते." मी तिला धर द्यायचा प्रयत्न करत होतो. तेवढ्यात मोतीराम काका माझ्यावर खेकसले, "भुताने झपाटले नव्हते, मग मांत्रिकाने भूत कसे उतरवले?"
"काका, तो मांत्रिक नव्हताच मुळी !" मी थोडा रागातच म्हणालो.
"मांत्रिक नव्हता, मग कोण होता?" काकाने तेवढ्याच रागात विचारलं, तेव्हा माझ्या बाजूला बसलेल्या प्रशांतकडे बोट दाखवत मी म्हणालो, "काका नीट बघा याला , कालचा मांत्रिक हाच होता, माझा मित्र प्रशांत! हा मांत्रिक वगैरे काही नाही. फक्त मांत्रिकाचे कपडे घालून त्याने मांत्रिकाची नक्कल केली होती. कांताच्या मनातली भुताची भीती घालवण्यासाठी मांत्रिकाचा आधार घ्यायला लागला. बाकी काही नाही !"

मोतीराम काकाने प्रशांतला नीट न्याहाळले. प्रशांतच कालचा मांत्रिक होता याची त्याला खात्री पटली. "पण मग कांताला आलेला लहान मुलाच्या रडण्याचा आवाज, हडळीच्या हसण्याचा आवाज... " मोतीराम काकाने शंका काढली.
"काका, मी अंधश्रद्धा निर्मुलन समितीचा कार्यकर्ता आहे " काकांना मधेच थांबवत प्रशांत म्हणाला.. "आणि आम्हाला आता तोच शोध घ्यायचा आहे. हे सगळं कोण करतेय त्याचा पर्दाफाश करायचा आहे. या कामात आम्हाला तुमचीही मदत लागेल .. "

मोतीराम काकाने जवळ येऊन माझी व प्रशांतची पाठ थोपटली. "पोरानो लागा कामाला ! मी तुमच्या सोबत आहे. याच्या मागे कोण आहे त्याला आपण नक्कीच शोधून काढू.. . " मोतीराम काकाच्या डोळ्यात आम्ही आशेचा मोती चमकताना पाहत होतो....
***

**प्रकाश पाटील**
**१३-बी, भाग्योदय अपार्टमेंट,**
**गोखिवरे, वसई (पूर्व)**
**जिल्हा : पालघर ४०१२०८**
**ई पत्ता : pprakashvasai@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८९०५६०९९९**

**कविता**

## शबरीची बोरे

आला तिज उद्वेग संसाराचा
पाहुनी भोग निष्पाप त्या प्राण्यांचा

सोडिले घरदार गेली ती रानात
केली पशुपक्षी अन् प्राण्यांची संगत

निजध्यास लागे तिजला रामदर्शनाचा
रामदर्शनात निमग्न तिची काय वाचा

नित्य उगलीतसे चंदन जपे रामनामावळी
पूजेसाठी नित्य जमवी रानफुले ती शबरी

बारा वर्षांचे तप फळाला आज आले
श्रीरामप्रभू शबरीच्या धामा दर्शनास आले

खावयास रामासाठी गोळा केली होती बोरे
आंबट असतील तर म्हणुनी उष्टावूनी पहिले

लक्ष्मणाने उष्टी म्हणुनी टाकुनी ती दिधली
परी ममतेने भरलेली ती बोरे रामाप्रभूने सेविली

अंगी लागता ते श्रीरामनामयुक्त गंध
श्रीराम प्रभू झाले शबरीवर प्रसन्न

वरप्रसाद देवूनी उद्धार केला शबरीचा
अशी हि शबरीच्या भक्तीची गाथा
श्रीरामप्रभूची कीर्ती काय वर्णावी येथे आता
***

**अमृता पांगे**
**ई पत्ता : pange.amruta@gmail.com**

## मराठी विचारधन

दोन धर्मामध्ये कधीच संघर्ष होत नाही, सर्व धर्माचा अधर्माबरोबर संघर्ष होत असतो.
***

**विनोबा भावे**

**लेख**

# मन हे आपुले

नेहमीच मी तुमच्याशी माझ्या मनातलं मांडतो मनातलं बोलतो पण आज मी तुमच्याशी जरा वेगळं बोलणार कारण आज माझ्या मनातलं नाही तर मना विषयी बोलणार आहे. आपल्या नाजूक मनाविषयी. कधी भावूक होणारं मन तर कधी आनंदी मन. कधी हताश झालेलं मन तर कधी उत्साही मन. अनेक आठवणी जपणारं मन. अनेक विचार निर्माण करणारं मन. क्षणात इकडे तर क्षणात तिकडे असं निसर्गात सहजतेनं वावरणारं आपलं मन. ह्या आपल्या मनावर व्यक्त होताना मी माझी ही कविता शेयर करतोय:

मन हे आपुले..

मन हे आपुले मन हे आपुले
जाई कधी कुठे हे ना कळे..

हे मन आपुले चंचल
नसे त्याला क्षणभर थारा
सोसाट्यानं वाहत राही
जसा निसर्गात हा वारा
स्तब्ध राहते कधीकधी
तर कधी झपाट्याने पळे
मन हे आपुले मन हे आपुले
जाई कधी कुठे हे ना कळे..

लावूनी पंख स्वतःला
ते आसमंतात उडे
झाडां सोबत झुलताना
कधी सागरात बुडे
जाई सरळ कधीकधी
तर कधी अचानक वळे
मन हे आपुले मन हे आपुले
जाई कधी कुठे हे ना कळे..

अशा ह्या मनाला जपणं फार गरजेचं असतं कारण मन नाराज असेल तर आयुष्याचं सारं गणित चुकतं. सर्वत्र नैराश्य पसरतं. कायम मनावर ताण असतो. आपलं स्वास्थ्य बिघडतं आणि मग हळूहळू तो येऊ लागतो.

तो येतो तेव्हा ...

आयुष्यात हरलो होतो.थकलो होतो.नैराश्य पदरी पडले होते.पार खचून गेलो होतो.अन् अखेर तो आलाच.. अगोदर कधीकधी यायचा मग हळूहळू रोज येऊ लागला आणि आता तर कायमचा मुक्कामाला आला.कायम माझ्या सोबत असायचा. मी लोकांच्या गर्दीत असायचो तरीही तो काही माझी पाठ सोडायचा नाही.मी कामात असायचो तर तो तिथेही असायचा. सगळी कडे तो डोकावू लागला. मग मात्र लोकं ही विचारू लागली पण माझ्याकडे उत्तर नसायचे. तो मला लोकां पासून तोडायचा. त्याच्या मुळे मित्र दुरावले पण त्याचं स्थान मात्र अधिक भक्कम झालं.

तो जितका नको नकोसा वाटायचा तितकाच तो माझ्या जवळ यायचा.सगळं खूप विलक्षण होतं. मला वाटायचे की तो फक्त माझ्याच सोबत आहे मग हळूहळू समजत गेलं की तो तर अनेकांसोबत आहे. सगळेच त्याच्या मुळे त्रासलेले. खरंतर आपलं आयुष्यच असं झालं आहे की तो कोणाच्याही जीवनात डोकावू शकतो.तो सर्वां सोबत वावरत असतो. आपल्या लक्षात येईस तोवर खूप उशीर झालेला असतो.आपण खचून जातो. आपण काही करायचे ठरवले की तो आपल्याला मागे खेचत राहतो. त्याच्यामुळेच नैराश्य येते आणि ते चक्र सुरू होतं. एक भरारी घेऊ पाहणाऱ्या आयुष्याचा अस्त होतो. सगळं त्याच्या मुळेच.

असा असतो हा प्रत्येकाच्या आयुष्यात कधी टप्प्या टप्प्याने तर कधी कायमचाच येणारा 'एकटेपणा'. हा एकटेपणा जर टाळायचा असेल तर मानसिक स्वास्थ्य जपणं फार महत्त्वाचं. मन प्रसन्न असलं की सगळं काही सुरळीत होतं.

मन करा रे प्रसन्न..!

पुरे झाहले दुःख आता
वेदना कुरवाळू तरी किती..?
नको आसवे डोळ्यांत आता
कशाला उद्याची भीती..?

कशाला चिंता कालची..?
गेला दिवस जुना झाला..
घेऊन आता नवी चेतना
नवा दिवस पुन्हा आला..

हे कटू विचार सारे
मनास आपुल्या करती सुन्न..
झटकून सारी दुःख आता
मन करा रे प्रसन्न..!
***

**निनाद वाघ**
**ई पत्ता : ninad27392@gmail.com**
**ब्लॉग : http://shabdatmandatomi.blogspot.in**

**लेख**

## राहून गेलेली गोष्ट

नेहमी प्रमाणे आज देखील मी ८:१६ च्या बस साठी धावलो. गरमीचे दिवस. घामाच्या धारा वाहत होत्या.

"अहो ३७ नंबर गेली का? " मी शेजारच्या माणसाला विचारलं."नाही अजून" एखाद्या खेळाडूला मेडल मिळाले की जितका आनंद होतो, त्याहून अधिक आनंद मला, आपली बस चूकली नाही, हे ऐकून झाला.

बस आली. मी त्यात चढलो. आज बसायला जागा मिळाली. माझ्या बाजूला एक आजोबा बसले होते. अगदी साधी वेषभूषा.डोळ्यांवर चष्मा. खांद्यावर कापडी पिशवी आणि हातात काही सुंदर चित्र होती.

मला राहावले नाही म्हणून मी सहज त्यांना म्हटले, "आजोबा ही चित्र कुठून आणली ? अप्रतिम आहेत!"
हे ऐकून त्यांना खूप आनंद झाला. मला म्हणाले, " बाळा ही मी स्वतः काढली आहेत."
मला आश्चर्याचा धक्का बसला.
"वाह ! तुम्ही चित्रकार आहात ? "
"नाही रे. हौस म्हणून काढतो."
हे सांगत असताना त्यांच्या चेहऱ्यावर एक खंत दिसली.
"काय झाले आजोबा ? "
"काही नाही रे! लहानपणापासून आवड होती. जगातील प्रसिद्ध चित्रकार व्हायचे स्वप्नं पाहिले होते. परंतु चित्रकाराचे उत्पन्न फार कमी. घरच्या लोकांना ते पसंत नव्हते. त्यांचा विरोध होता. म्हणून इच्छा नसताना देखील इंजिनियर झालो. चांगली नोकरी मिळाली. पुढे लग्न झाले. संसार सुरू झाला. आयुष्याच्या चित्रात रंग भरताना माझी आवड मात्र मागे राहिली. पैसे आले. चांगले आयुष्य मिळाले परंतु आनंद नाही मिळाला. आज मुलं परदेशी आहेत. सुखी आहेत. पत्नी चे निधन झाले. आज आयुष्याच्या ह्या टप्प्यावर काय मिळालं ह्या पेक्षा माझं स्वप्न अपूर्ण राहिले ह्या गोष्टीचे दुःख जास्त आहे. मनात खंत उरते रे. तुझे काही स्वप्न आहे का? जर असेल तर एक गोष्ट लक्षात ठेव बाळा, स्वतःचे स्वप्न पूर्ण कर. जे आहे ते ह्या जन्मात. एखादी राहून गेलेली गोष्ट पुढच्या जन्मी करीन हे आपल्या अपयशाचे केलेले समर्थन आहे . लक्षात ठेव!"

त्यांच्या डोळ्यात पाणी होते. चष्म्या मागून येणारा तो अश्रू चा थेंब हृदयाला चटका लावणारा होता.

बस थांबली. ते उतरले . मी थक्क होऊन पाहत राहिलो···
***

**निनाद वाघ**
**ई पत्ता : ninad27392@gmail.com**
**ब्लॉग : http://shabdatmandatomi.blogspot.in**

**कविता**

## कातरवेळ

गडद केशरी आभाळ
अथांग सागर पसरलेला
किनाऱ्यावर येती लाटा
अन् सूर्य क्षितिजावर बसलेला

पाहताना हे अद्भुत दृश्य
वाटते आयुष्य व्हावे स्तब्ध
नेत्र ही पाणावतात
मन होते निशब्द

बघता बघता निसर्गाचा
सुरू होतो एक सुंदर खेळ
पाहता पाहता डोळ्यांसमोर
सरते ती कातरवेळ..
***

**निनाद वाघ**
**ई पत्ता : ninad27392@gmail.com**
**ब्लॉग : http://shabdatmandatomi.blogspot.in**

कविता

# शेतकरी

केली सपाट जमीन जणू चमके आयना
किती करू मशागत वर पाऊस दिसंना

कर्ज काढलया दाण्या कसं सावकारी फेडू?
हसू मुखावर खोटं येई मनामधी रडू
ढग पावसाळी गेला कुण्या गावाला पाहुणा?

नदी,विहिरी,झ-यांचा खोल सुकलया घसा
काय वाटाड्याला देऊ रिता कणगीचा पसा
किती सांगाव्या कुणाला सले आतल्या वेदना

पक्षी निवांत बसले नाही आवाज गळ्यात
आले फिरून रानात को-या उन्हाच्या तळ्यात
झाला कासावीस जीव पाणी कुठंच मिळंना

येरे येरे आता बाबा नको पाठ तू दाखवू
तुझ्याविना शेतामंधी मोती कसं रं पिकवू
काय देऊ यंदा खाया माझ्या भुकेल्या जीवांना

डोळं लावून वाटंला पोरं बसली दारात
कसं पाठवू शाळंत नाही दमडी खिशात
आज आणील दप्तार शब्द दिला खोटा त्यांना

पीक येऊ दे चांगलं तुला निवद करीन
कर्ज सावकारी फेडू.. पोरां पुस्तक घेईन
सुन्यासुन्या गळा तिच्या एक करीन दागिना
***

**श्री. मनिष मालुसरे**
**९४९,आनंद नगर,**
**शिवसेना शाखे जवळ,**
**श्री साई समर्थ क्लासेस,**
**कोपरी, ठाणे पूर्व ४००६०३**
**ई पत्ता : manishmalusare005@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८६७९३५५९३**

कथा

# भातुकलीचा खेळ

किती दिवसांनी मी आज गावाला जात होतो. किती बर झाले असतील दिवस? १० वर्ष सहज, कदाचित जास्तसुद्धा असतील. मुंबईला आल्यापासुन वेळच मिळाला नव्हता. १० वी गावाला झाल्यावर जो मी मुंबईला गेलो तो आज उगवत होतो. गाव तसाच होता. बदललेलाच नव्हता. बदलण्यासारख त्या गावी काही नव्हतच म्हणा. नाही म्हणायला काही मोठी माणस म्हातारी झाली होती आणि काहि म्हातारी गचकली होती. काही घरांची डागडुजी झाली होती तर काही ओसाड झाली होती. महाद्याचा बाप मशेरी लावत बाहेर बसला होता. मला पहाताच तसाच मशेरीच्या हातानी आणि तोंडानीच बाहेर आला.
"कधी इलास ? आता ?? "
माझ्या हातात बॅग, मळलेला आणि दमलेला चेहरा, गावात काय बदललय हे जाणुन घेणारी नजर, सर्व सांगत होत की मी आत्ताच आलोय. मी फ़क्त हासलो. तस त्याला सुद्धा माझ्या उत्तराची अपेक्षा नव्हतीच. मी तसाच काकाच्या घरात शिरलो.
"काका" हाक मारली.
झोपलेल्या काकांनी कुस बदलली. "आलास ? बस " माझ स्वागत संपल. काकुनीच विचारपुस केली, चहा पाणी दिलं.
जेवणाला आवकाश होता. जरा गावात फ़ेर फ़टका मारला. बर वाटल. जेवण काय असेल याचाच विचार करत घरी आलो, मटणाची सागुती आणि भात. वा ! गावच्या मटणाची आणि काकुच्या स्वयंपाकाची चवच काही और होती. जेवण झाल्यावर मस्त झोप लागली. जाग आली ती संध्याकाळीच. आकाशात थोडे ढग होतेच. संधीप्रकाश पडला होता. अस आकाश तांबड झाल की आमचा गाव फ़ारच छान दिसे. तांबड्या मुरमाचे रस्ते, घरांची कौल तांबडी, आणि त्यावर हा तांबडा रंग. मला अशा वेळी बाहेर फ़िरायला खुप आवडायचं.
मी काकुला "बाहेर जातो ग !" अस सांगुन रस्त्यावर आलो. लांब लांब पावल टाकत चाललो होतो. माझ्याच धुंदीत होतो मी. किती वेळ चाललो काय माहित. गावाच्या बाहेर आलो होतो. सुर्य अस्ताला जात होता. गावाला सुर्यास्त झाला की लगेच काळोख होतो. थोड्याच वेळात काळोख झाला. आणि मी भानावर आलो ...कुठे होतो मी ? आधी मी आहे कुठे याचा अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. आतापर्यंत मंबईच्या दिव्यांना सरावलेल्या डोळयांना हळु हळु या अंधाराची सवय झाली.

मी सभोवार नजर फ़िरवली आणि मी कुठे आहे याचा मला हळु हळु अंदाज आला. वडाखवाडी केव्हाच ओलांडुन मी पुढे अलो होतो. भिमाच खाचर सुद्धा मागे पडल होत मग

आता मी नक्की कुठे आहे ? आणि अचानक मला लक्षात आल मी नानाच्या टेकाडावर होतो. नानाचा वाडा इथुन जवळच होता. आता वाडा असेल का ? नाना जिता असेल का? नानाची मुलगी काय बर नाव तीच ? हं अक्षता, किती दिवसांनी आठवल नाव. अक्षताचा रंग फ़टफ़टीत गोरा, डोळे घारे आणि बटबटीत, नाव चपटच, दात पुढे. पण अक्षता स्वतः व नाना तीला फ़ार सुंदर समजत होते. नानाची बायको कधीच मेली होती. नानानी दूसर लग्न केल नाही. मुलीला सांभाळल. मुलगी तशी अभ्यासात हुशारच होती.

नाना शेती सांभाळायचा व गावात पुजा पाठ करायचा. त्याला लिहिता वाचता येतच नव्हत. मंत्र खरच किती येत होते ते त्याला व त्या एका ईश्वरालाच माहिती. पण त्याला लोक बोलवायचे. तांदुळ व थोडे पैसे द्यायचे. नाही म्हणायला सार्वजनिक पुजेला नाना बरीच कमाई करायचेत. नाना मला घरी बोलावून बोलावून थकला. मी कधीच त्याच्या घरी गेलो नव्हतो. आता इतक्या रात्री त्याच्या घरी जायच का ? नाना तर कधीच झोपला असेल. गेलो त्याच्या घरी तर तो मला ओळखेल का ? अक्षता इथे असेल का लग्न होऊन कुठे सासरी गेली असेल ? हा विचार करतो न करतो तर समोरुन रस्त्यावरुन कोणीतरी येताना दिसल. खर तर या रात्री कोणीही झपाझप पावल टाकत येईल पण मला उगाचच समोरुन येणाऱ्या आकृतीला बघुन या व्यक्तीला काही घाई नाही अस वाटल. जवळ आल्यावर लक्षात आल की ती एक बाई आहे. आणखीन जवळ आल्यावर पाहिल की, रंग गोरा होता. या अंधारात सुद्धा चांदण्याच्या प्रकाशात तीचा रंग गोरा आहे हे कळत होत. डोक्यावरुन घेतलेल्या पदरानी तीच तोंड झाकलेल होत. तरीसुद्धा ती एक १७-१८ वर्षांची युवती आहे अस वाटत होत अथवा जाणवतत.

जस जशी ती व्यक्ती जवळून जात होती तसतसा वातावरणात गारवा जाणवू लागला होता. थंड हवेची झुळूक अंगावर रोमांच उभे करून गेली आणि ओठातून आपोआपच हाक बाहेर आली.. "अक्षता...." त्या व्यक्तीचे पाऊलेही जागीच थबकली. तिने माझ्याकडे बघितलं अस वाटत होत जणू तिची नजर मलाच शोधत होती काहीतरी आपलेपणा जाणवला त्या हवेत. इतक्यात कशाचीतरी चाहूल लागताच नजर बिथरली. बघता बघता ती व्यक्ती दिसेनासी झाली. कोण होती ती? अक्षता?? की अजून कोणी? पण अक्षता असती तर अशी न बोलता गेली नसती. मनामध्ये हजारो विचारांनी थैमान घातले मी कसा आणि कधी घरी आलो माझे मलाच कळले नाही. दिवस उजाडला तरी मनामध्ये एक अस्वस्थता सारखी भेडसावत होती. ती बोलकी नजर अजूनही तशीच समोर दिसत होती. पुन्हा वाड्यावर जाव म्हटल पण पाय जड पडले होते अंगावर शहारा येत होता.तशी अक्षता मला नवीन नव्हती पण आजही ती वाड्यावर असेल अशी कल्पनाही करवत नव्हती. अक्षता दिसायला छान अभ्यासातहि हुशार आणि स्वभावाने तशी अल्लडच पण मनाने फार प्रेमळ ..अगदि तिच्या माइ सारखी ...तिचीच काय आमची सगळ्यांचीच माइ होती ती. मी , महादया आणि अक्षता बालपणीचे पक्के मित्र होतो. महादया अभ्यासात साधारण पण फार खेळकर होता. सर्वांमध्ये लगेच मिसळण्याचा त्याचा स्वभाव होता. त्यामुळे कुणाशीही त्याची सहज गट्टी जमे. माझा स्वभाव तसा थोडा भित्रा पण अभ्यासु होता. कुणासोबत मिसळुन जाण मला जरा अवघडल्या सारख होइ. पण आम्ही तिघात मात्र मी खुप रमुन जात असे. शाळेत असताना माझ्यात आणि अक्षता मध्ये नेहमी स्पर्धा असायची. त्यामुळे नानाहि अक्षता ला आमच्या मध्ये खेळायला अभ्यास करायला येउ देत. बालपणीची ती मैत्री इतकी घट्ट झाली होती की आम्हाला एकमेकांवाचून दिवस घालवण आमच्यासाठी अशक्य होत. विशेषत: मी आणि अक्षता. महादयाचे वडील फार कडक आणि सडेतोड होते. त्यांच्या रागीट स्वभावामुळेगावात त्यांचं कुणाशीच पटत नसे. पण महादयाच मात्र अगदी उलट होत. एकदा महादयाच्या वडिलांचं आणि नानांच काही कारणावरून वाद झाले. मग तेव्हाप्पासून महाद्याच आमच्यात येण फार कमी झाल. काकांनी महादयाला सक्त ताकीत दिली होती आमच्यात न खेळण्याची. त्या दिवसांनंतर मग आम्ही तिघे फक्त शाळेतले सोबती होतो शाळा सुटल्यानंतर महादया सरळ घरी जाई. मग मी आणि अक्षता दोघेच खेळायला असायचो. आम्ही दोघात इतक रमून जायचो की वेळ कसा आणि कुठे निघून जायचा कळायच देखील नाही. खूप धम्माल करायचो आम्ही. चिंचा बोर तोडणे नदीकाठी हुंदडण आम्हाला खूप आवडायचे सगळ्यात आवडत म्हणजे आमच एक ठरलेलं झाड होत नदीकाठी तिथे बसून नदीमध्ये खडे फेकण आणि त्याचा झालेला आवाज त्या शांततेत एकण ..तास न तास आम्ही तिकडे बसून असायचो. त्याच झाडाखाली आम्ही भातुकलीचा खेळ पण खेळत. मी फूल तोडून आणायचो अक्षता छान घर सजवी. चिंचा बोर आणून त्याच जेवण बनवायच आणि नदीकाठी बसून ते खायचो. ह्या खेळातच आमच इतक मन रामायच की घरी जावसच वाटत नसे. अक्षता मला नेहमी म्हणे,

"आपण असाच कायम राहायचं का? एका घरात?"

मी ही "हो" म्हणून देई त्या वयात काय कळते ना घर संसार काय असत ते.

हळू हळू आमच्यात एक वेगळंच नात निर्माण झालं. रोज शाळेनंतर चा एकमेकांसाठी वेळ देण जास्त आवडू

लागल. नानांना शिक्षण घेण खूप आवडत असे पोरीला त्या काळातही मैट्रिक करण्याच स्वप्न होत. पण एका आजाराने नानांना जखडल आणि पोरीची चिंता त्याला खाऊ लागली. पण पोरीचाही हट्ट होता की शेवटपर्यंत नानांची सेवा करायची. नानांची सेवा करण्यात मीही अक्षताला साथ दिली. पोरीने खूप सेवा केली त्यांची पण त्यांना हे सगळं बघवत नव्हतं. कोवळ्या हातांना इतकं काम बघून त्यांचा उर दाटून येई शेवटी त्यांनी निर्णय घेतला की अक्षताला माई कडे पाठवायचं माई म्हणजे अक्षताची मावशी. तिला सगळे माई म्हणत खूप प्रेमळ... म्हणतात ना .... माय मरो आणि मावशी जागो अगदी तशीच. पण हो माईचा नवरा तितकाच कपटी होता. माई अक्षताच्या घरी नेहमी येत असत. त्या येत तेव्हा आमची खूप धम्माल असे खूप खाऊ आणत त्या आमच्यासाठी . अक्षता इतकाच जीव त्या मला आणि महाद्याला लावीत . आमचा भातुकलीचा खेळ बघून त्या मला आणि अक्षताला नेहमी सांगत असत,

“बाळांनो , तुम्ही खरे सवंगडी आहात पण दुनिया लई वाईट आहे रे पोरांनो , जरा जपून रहा "

त्या वेळी माईच्या बोलण्याचा अर्थ आमच्या पांगळ्या शब्दाना कळत नव्हता पण दहावी नंतर जेव्हा गाव सोडलं तेव्हा हळूहळू त्याचा अर्थ उलगडत गेला. आज नाही म्हंटल तरी बारा वर्षे गेली ह्या सगळ्या गोष्टीना पण आज हि तो जिवंतपणा इथे जाणवला. नंतर जशी अक्षता माई कडे गेली तस खूप पोरक झाल्यासारख वाटू लागल. कसातरी दहावी पास झालो आणि पुढच्या शिक्षणासाठी गाव सोडलं .

आज त्या एका नजरेने सगळ्या भूतकाळाला समोर आणून उभ केल. कोण असेल ती व्यक्ती विचार करून करून डोक अगदी सुन्न पडल होत. कशातच लक्ष लागेना विचारव तर कुणाला ते कळेना. मग ठरवलं कि संध्याकाळी काकांसोबत फेरफटका मारायला जाव शेतात आणि चौकशी करावी. संध्याकाळचा शेतातला फेरफटका म्हणजे काकाचं सगळ्यात आवडता वेळ असे काही काम असाल कि आम्ही असच त्या वेळी काकांसोबत जाऊन पूर्ण करून घेत. काका फार व्यवहारी पण मनाने खूप चांगले. काका-काकू गावात आदर्श जोडपे म्हणून ओळखले जाई. व्यवहाराच्या दृष्टीने का असेना पण काका सगळ्यांना मदत करीत असे. मनाने फार प्रेमळ होते काका.

काका निघाले मी काकांना म्हटलं “काका , थांबा आज मी हि येतो सोबत"

काकांनी माझ्याकडे बघितले आणि एक स्मित हास्य देत म्हणाले " चल बाळ "

काकांच्या त्या नजरेतून आणि हास्यातून स्पष्ट कळत होत कि ते जाणून आहेत माझ्या मनात काहितरी चलबिचल आहे ते. खूप वेळ चालत गेलो माझ्या डोक्यात सतत तोच विचार चालू होता काकांसोबत होतो तरी मन मात्र भलतीकडेच होत काका मध्येच थांबले "आदी बाळ काय झालं कसला विचार करतोस आला तेव्हापासून तुझं लक्ष कुठेतरी दुसरीकडेच आहे"

मी फक्त म्हटलं "उ नाही काका अस नाही कांही "

काकांना काय आणि कस विचारव हिम्मतच होईना . पण काकाना माझ्या मनातली घालमेल मात्र कळत होती.

"आदी मोकळेपणाने विचार बाळा जास्त विचार केलेला चांगला नसतो. काही शंका असेल तर मनमोकळेपणाने विचार"

मला माहित होत कि हीच चांगली वेळ आहे काकांशी बोलायला पण जीभ काही वळेना शेवटी थरथरत्या ओठांनी हिम्मत केली.

"काका , अक्षता गावात परत आली का ?"

काकां मध्येच थांबले दोन मिनिट मला न्याहाळत म्हटले" हो.........। "

काकांचे ते उत्तर एकून अंगात जणू बिजली संचारली. पुढे काका काय बोलले काही माहित नाही. जर ती अक्षता होती तर बोलली का नसेल. अक्षता गावात परत आली हेच मला स्वप्नवत असल्या सारख होत. पण ती माईकडुन परत का आली असेल. माईच्या नवऱ्याने घरातून हाकलून दिलं नसेल ना. नाही नाही कदाचित नाना बरे झाले असतील ..देवाचे शत:श आभार.

आम्ही घरी आलो काकू ने मस्त जेवण बनविल होत. पण आज त्या जेवणाकडेही लक्ष लागेना. राहून राहून अक्षता डोळ्यापुढे येऊ लागली आता माझी खात्री झाली होती कि हो न हो ती अक्षता च होती . चांदण्यारातीची किरकिर मनात असंख्य विचार काय करावे कळेना वाड्यावर जाव पण नाना ना आवडल नाही तर किवा अक्षता आता आपल्याशी बोलेल कि नाही याची भिती. असंख्य विचारात सारखा कूस बदलत होतो. तितक्यात कुणीतरी हळूच डोक्यावर हात ठेवला. खूप माया होती त्या स्पर्शात.

"आदी किती विचार करतोस. काय चाललय मनात जरा सांगशील का "

वळून बघितलं तर काका बसले होते उशाशी . मी ताडकन उठलो,

“काका तुम्ही अजून झोपला नाहीत ?"
काका म्हणाले " आदी अरे तू आला त्या दिवसापासून बघतोय तुला कुठेतरी हरवलेला दिसतोस तू आताही माघास पासून बघतोय तुला सारखा कूस बदलतोस तू. काय चाललय मनात बोल तरी "

काकाचं ते प्रेमाचं बोलण ऐकून वाटलं काकांना विचारावं "काका काही नाही त्या दिवशी रात्री फेरफटका मारत होतो. कधिकुणास ठाऊक पण नानाच्या वाडयाजवळ पोहचलो तिकडे अचानक कुणीतरी समोर आलं म्हणजे ती एक बाई छे छे बाई कसली एक मुलगी होती. तिच्याबद्दलच विचार करतोय ."

पुढे काही बोलणार तितक्यात काकाच म्हणाले " अरे ती अक्षता असेल पोरा. नाना गेल्या नंतर ती वाड्यावरच राहते.”
मध्येच काकाचं बोलण तोडून मी ओरडलो "काय sssssss नाना गेले ? कधी आणि कसे? मला का नाही कळवलं ?"

काकाना माहित होत कि शाळेत असताना नाना आणि अक्षता मला तितकेच जवळचे होते. माझ्या प्रश्नांना उत्तर देत ते म्हणाले "आदी अरे आताच तीन वर्ष झाली पोरा. आजारपणाने फार त्रस्त झाले होते ते. हो पण जाण्याआधी तुझी आठवण काढली होती बर त्यांनी” माझ्या डोळ्यात अश्रूंच्या धारा वाहू लागल्या नानाचीएक एक गोष्ट एका सारखी समोर येऊ लागली . नानांनी पुन्हा माझ्या डोक त्यांच्या मांडीवर ठेऊन कुरवाळत मला समजावलं.
"आदी अरे प्रत्येक माणूस जगात येतो तो जाण्यासाठी. मधला काळ असतो तो जगायचा . नानाचं आयुष्य तितकच होत बाळ . झाल्यागेल्याला विसरून पुढे चालायचं असत आयुष्यात"

मी रडत रडतच कधी झोपी गेलो कळलंच नाही. सकाळी उठलो एव्हाना काका शेतात गेले होते. मी पटापट सगळ आवरलं. नानांची बातमी एकली आणि पाय आता राहवेना एकदा वाड्यावर जाण्याचा निश्चय केला . काकू ला बाहेर जातो सांगून तडक वाडयाच्या दिशेने निघालो. जसजसा वाडा जवळ येत होता तसतसे हृदयाचे ठोके वाढत होते. मनात एक भिती होती ती अक्षता बद्दल. वाड्यावर पोहचलो आणि बघतो तर काय दरवाजा उघडाच होता. वाडा नेहमीप्रमाणे एकदम टापटीप आवरलेला
" अक्षता … अक्षता sss " हाक मारून पण हुंकार नाही.
सगळा वाडा शोधला पण वाडयात कुणी नव्हत . पण आज ठरवलंच होत कि अक्षता ला भेटायचं. तिथेच वाट बघत बसलो. वाड्यावर येऊनही मनातल्या विचारांच काहूर काही कमी होईना. नाना गेल्यानंतर कसे दिवस काढले असतील अक्षता ने आणि माई च काय माई ने अक्षताला ह्या भल्या मोठ्या वाडयात एकट तरी कस राहू दिलं असेल. माई पणssss छे छे असा विचार कसा करू शकतो मी. नाही नाही माई तर अक्षताची दुसरी माय होती. वाट बघून बघून संध्याकाळ झाली पण कुणीही इकडे आले नाही. अक्षता मला बघून पुन्हा माई कडे तर निघून गेली नसेल ना. त्या दिवशी निराशेने घरी परतलो. घरात शिरताच काकांनी विचारले,
“बाळ , आलास वाडयावर जाउन. भेटलास अक्षताला"
मी खोटंच काकांना सांगितलं " नाही नाही काका मी असच जरा फिरायला होतो "

काकू समोर बोलण मला जरा अवघडल्या सारख झालं. त्याही रात्री काकांनी मला आपुलकीने विचारलं पण आज मात्र मी काकांना काही न सांगताच झोपी गेलो . चार दिवस झाले मी सारखा वाडयावर जाऊ लागलो पण रोज प्रमाणे तिथे कुणीही नसे मग माझी पक्की खात्री झाली कि अक्षता परत माई कडे गेली असेल. मनाला सारख बोचत होत कि अक्षता ला आपली किती कमी भासली असेल नाना नसताना तिने कसं सांभाळलं असेल स्वताला . एव्हाना सुट्ट्या संपत आल्या होत्या. पण मन अक्षताच्या विचारातून काही बाहेर येईना. शेवटचे दोन दिवस बाकी होते परतीचे पण मनाला वाटत होत कि इथेच राहावं कायमच. पण आताच कुठे स्थायीक झालो होतो. शहरात अशी चांगल्या पगाराची नोकरी मिळणेही जरा कठीण. त्यामुळे जड अंतकरणाने परतीचा प्रवास करावा लागणार हे निश्चित होत. वाईट वाटत होत ते अक्षताला न भेटण्याच. रोजप्रमाणे दुपारच जेवण आटोपुन जरा वामकुक्षी साठी पहूडलेलो होतो काकू आपली विवीध फुलांच्या माळा करत होती त्या फुलांच्या माळा बघून अचानक मला आमचा भातुकलीचा खेळ आठवला. ते अक्षताने फुलांनी सजवलेलं नदीकाठच घर आणि पाण्यात दगड फेकल्यानंतर चा तो आवाज. मी तडक उठलो.
"आदी अरे कुठे निघालास अरे चप्पल तर घाल."
काकुच्या प्रश्नाला उत्तर देण्याच देखील भान नव्हत. तसाच अनवाणी पायाने लगबग चालत नदीकाठि जाउ लागलो. जसजशी नदी जवळ येत होती तसतसा हवेत तोच गारवा जाणवु लागला. इतक्या वर्षानंतर आजहि अस वाटत होत कि तोच जिवंतपणा तिथे आहे. खुप प्रसन्न आणि आनंददायी वाटत होत. ती पायवाट आजहि तशिच्या तशी हिरवळिने भरलेली होति. एक क्षण वाटल इतक काहि घडुन गेल तरि कसा टिकला असेल हा जिवंतपणा ह्या मातित? जसजशी नदिजवळ येत होती एक ओढ लागली होती. जसा त्या फुलांच्या झाडाजवळ पोहचलो तस तोच पाण्यात मारलेल्या

खड्यांचा आवाज कानी पडला. तोच मधुर आवाज. मग नदीकाठच्या त्या झाडाजवळ पोहचलो तर काय अगदि नेहमी सारखा भातुकलीचा खेळ अजुन जिवंत होता तिथे . तोच संसार आजहि तिथे होता. हे सगळ बघुन खुप आश्चर्य वाटल. कुणी मांडला असेल हा खेळ?

तेवढ्यात एक आवाज कानी आला " आदि आलास .ये ...मला पुर्ण विश्वास होतास तु परत येशिल. बघ आजही आपल घर मी असच ठेवलय. कमी होती ति फक्त तुझी "
मी निशब्द पणे एकत होतो.
"खुप वाट बघायला लावलीस आदि तु पण आता आलस तर थांब मला आणि या घराला तुझी गरज आहे " हा तर अक्षताचा आवाज होता म्हणजे अक्षता वाड्यावर नसुन इथे वाट बघत होती .
"अक्षता ,,तु ......तु इथे कशी. अग तुला भेटायला मी वाड्यावर गेलो होतो तुझी खुप वाट बघितली पण तिकडे तर कुणी नव्हत "

माझ बोलण पुर्ण होण्याआधीच ती मला येउन बिलगली . तिने मिठीत मला घट्ट आवळुन घेतल आणि रडायला लागली .
" आदि किती रे वाट बघायला लावलीस. का मला सोडुन गेलास तु ? " मला समजेना तिला कस समजावु .

मीही तिला बाहुपाशात घेतल. "अक्षता तु शांत हो आधी. बघ आता मी आलोय ना सगळ ठिक होइल बघ "
ति मिठी इतकि सुखद होती कि सोडुच नये अस वाटत होत. थोड्यावेळाने मग आम्ही पुन्हा नेहमी सारख पाण्यात खडे मारत सुख.दुख वाटायला लागलो. एव्हाना खुप बडबड करणारि अक्षता आज एकदम शांत होती. मीच मग आज बोलायला सुरुवात केली
"अक्षता नानांबद्दल कळल मला खुप वाइट वाटल ग. पण माइ च काय तु तर तिच्याकडे होतीस मग इकडे कशी ? "
अक्षता पुन्हा हुंदके देउन रडु लागली. "आदि सगळ जग मला सोडुन गेल रे ..जसा तु सोडुन गेला होतास . "
हे एकताच पायाखालची जमिन सरकली माझ्या ...... माइ पण ....... कशी जगली असेल माझी अक्षता एकटी. मायेच छत्र तर लहानपणीच हरवल आणि आता माइ पण. त्या संध्याकाळि आयुष्याभराच्या खुप गप्पा मारल्या आम्ही. रात्री तिला वाड्यावर सोडुन मी घरि परतलो.

नानांच्या आजारपणातच त्यांचा मृत्यु झाला. नंतर अक्षता बरेच दिवस माइकडे होति. माइ आम्हाला खुप चांगल्या प्रकारे ओळखी. कदाचीत माइ ने आमच भविष्य आधिच बघितल होत. लहानपणीच्या आमच्या पांगुळ्या खेळात तिला आमच भविष्य दिसल होत. अक्षता ने जे काहि सांगितल त्यावरुन हे नक्की की मी जितका तिचा विचार करत होतो छे ची विचार कसला तो प्रेमच ते ..त्याहीप्रेक्षा जास्त प्रेम ती माझ्यावर करी. तिने जीवंत ठेवलेल्या त्या भातुकलीच्या खेळातुन ते स्पष्ट कळत होत आणि ति मिठी..... ती मिठी तर मला जणू स्वर्गातच घेऊन गेली. इतक्या वर्षात घडलेल्या सर्व गोष्टी तिने मला सांगितल्या. नानांच आजारपण जस वाढल तशी घरात येणारि मिळकत बंद झाली. अक्षताचा सांभाळ करण्यासाठी नानांना अशा परिस्थीतित वाडा गहाण ठेवावा लागला. अर्थात तो वाडा त्यानी माझ्या काकांकडेच गहाण ठेवला होता. काकांशिवाय विश्वासाच माणुस गावामध्ये दुसर कुणी नव्हत. नानांना अक्षताचे कष्ट आणि हाल बघवत नव्हते. म्हणुन त्यानी काही पैसे माइ ला दिले आणि तिला माइ सोबत पाठवण्याचा निर्णय घेतला. अक्षता च्या आइने तिच्या लग्नासाठी काहि दागिने जपुन ठेवले होते तेहि त्यानी माइ ला दिले . माइला त्यानी सांगितल की हे दागिने फक्त अक्षताच्या होणाऱ्या नवऱ्याला द्यायचे आहेत. त्यात त्यानी जावयासाठी चिठ्ठी हि ठेवली होती. लेकिची खुप काळजी म्हणुन मनातल्या काहि गोष्टी कदाचित त्या चिठ्ठी असतील. माइ ला माहित होते कि आपला दुष्ट नवरा हे दागिने विकुन देइल म्हणुन माइने ते काकांच्या हवाली केले आणि विनंतीपूर्वक सांगितले की अक्षताच्या नशिबात जो कोणी असेल ते दागिने त्याला द्या काकांना सगळ्या गोष्टी ठाऊक म्हणून त्यांनीही संमती दिली. अक्षताच्या डोक्यावर हात ठेऊन वचनही दिलं,
"बाळ, बाबांची काळजी करू नको वाडयाच्या बदल्यात एक गडीही ठेवतो त्यांचा सांभाळ करायला. तू निश्चिंत रहा."

अक्षता आणि माई जड अंतकरणाने निघून गेल्या. माईच्या घरी अक्षताच मन रमत नव्हतं. तिथेही ती आमचा नदीकाठचा भातुकलीचा खेळ मांडी आणि माझी वाट बघत बसे. माईला कळून चुकल होत की अक्षता माझ्यावर खूप प्रेम करायला लागली होती. पण मी परत येणार की नाही हे तिलाही माहीत नव्हते . माईखूप समजूतदार होती तिला अक्षताच्या मनाविरुद्ध तीच लग्न करायचं नव्हतं. जोपर्यंत ती स्वताहून म्हणणार नाही तोपर्यंत तिने तिच्या लग्नाचा विचार मनातून काढून टाकला. पुढे काही वर्षात नाना गेले. अक्षता पोरकी झाली. नाना गेल्यानंतर माईच्या नवऱ्याने खूप त्रास द्यायला सुरुवात केली. अतिशय दुष्टमाणूस होता तो. कसा काय माईच्या नशिबात आला देव जाणे. अक्षताच्या लग्नासाठी माईचा नवरा हात धुवून मागे लागला होता . त्यावेळी श्रीमंत लोक अगदी लख्ख म्हातारेही पैशाच्या जोरावर तरुण सुंदर मुलींना त्यांचा हव्यास भागवण्यासाठी

लग्न करून घरी आणत. माई यासाठीच लग्नाला खंबीरपणे विरोध करत होती तिला तिचा नवरा कसा आहे ह्याची पूर्ण कल्पना होती. इतके वर्ष का उगाच संसार केला होता त्या माऊलीने. काही दिवस असेच गेले आणि अचानक देवाचा कोप झाला आणि माईला लखव्याने जखडले. ती खाटीला खिळली. अक्षताने तिचि पण खूप सेवा केली. पण शेवटी त्या दोघीही हरल्या. माईच्या नवऱ्याने एका सावकाराबरोबर तिच लग्न ठरवलं. लग्नाच्या दिवसापर्यंत दोघींनीही खूप विरोध केला पण माई लुळी-पांगळी झालेली त्यात अक्षता एकटी शेवटी त्या नराधमाच्या कू-कर्माला त्या बळी पडल्या. लग्नाचा दिवस उजाडला. माईने कसतरी करून काकांना कळवल. काका दागिने घेऊन आले आणि सावकाराच्या हवाली केले

"सावकार , हे अक्षतच्या वडिलांची ठेव आहे त्याची शेवटची इच्छा होती की हे सगळं तिच्या नवऱ्याच्या हाती सोपवाव. त्यात एक चिठ्ठीही आहे.

"दुखत वातावरणात अक्षताच लग्न झालं. ती सासरी गेली.

लग्नाच्या पहिल्या रात्री नववधू खूप खुश असते पण अक्षता ...... जणू साऱ्या आयुष्याचे अश्रुच तिने त्या मंगलप्रसंगी गाळले. तिला कळेना की सावकाराला आदि बद्दल कसं सांगावं. तो जसा खोलीत आला अक्षता अजूनच घाबरली अगदी घामेघूम झाली. सावकार तिच्याजवळ येऊन बसला जसा त्याने हातात हात घेतला अक्षताने तो झटकला. सावकार हसला आणि म्हणाला,

"अक्षता घाबरू नकोस मी तुझ्यावर नवऱ्याचा हक्क दाखवणार नाहीये. उलट तुला जिथे राहायचे आहे तिथे नेईन. तू शांतपणे झोप. उद्या सकाळी पाच वाजता आपल्याला निघायचे आहे."

अक्षताला कळेना की सावकाराने पैसे देऊन आपल्याला विकत घेतलं आणि ..... तो गोड बोलून फसवत तर नसेल ना. पण तिला त्याच एकण्यापलीकडे दूसरा पर्याय नव्हता .

पहाट झाली तशी ती तयारच होती. सावकार तिला वाढ्यावर घेऊन आला.

"अक्षता तुला इथेच रहायचं होत ना मग तू रहा अगदी आनंदाने. हा नानांचा वाडा आहे आजपासून तू तो सांभाळ. हे लग्नएक बळजबरीच नात होत. आज मी तुला ह्या बंधांनातून मुक्त करतोय. काळजी घे. कधी माझी गरज भासली तर नक्की कळव मला"

तसाच सावकार काकांकडे गेला आणि ते दागिने आणि चिठ्ठी काकांच्या हवाली करून निघून गेला. अक्षता ला कळेना काय चाललय पण जे होत होत ते नक्कीच सुखद होत सावकाराबरोबर संसार करण्यापेक्षा माझ्या आठवणींसोबत नानांच्या वाडयात राहणं तिने पसंत केल. नानांची देवावर खूप श्रद्धा होती कदाचित त्याचच फळ होत हे. किती यातना झाल्या असतील अक्षताला जिथे आदि बरोबर संसाराचे स्वप्न बघितले होते तिथे तिला वडिलांच्या वयाच्या माणसाबरोबर लग्न करावं लागलं होत. किती हृदयद्रावक प्रसंग होता तो तिच्यासाठी. मला स्वताचाच फार राग येत होता.

आता सुट्टी संपत आली होती. अक्षताला नदीकाठी भेटायला गेलो . तिलाही माहीत होत की मी जाणार आजही तिने मला घट्ट मिठीत घेतलं आणि पुन्हा रडायला लागली

"अक्षता आजवर तू खूप सोसल. तुझ्याप्रेमाला तोड नाहीये ग . मी स्वताला खूप नशीबवान समजतो. तू चल माझ्याबरोबर शहरात. आपण लग्न करून सुखाने संसार करू. आता माझा पगारही चांगला आहे"

ती म्हणाली, "आदि मी वाडा सोडून कुठेही जाऊ शकत नाही . नानांनी वाडा गहाण ठेवला होता खर पण पैसे फेडायला ते जगलेच कुठे " तिचे हुंदकेचालूच होते.

"अक्षता रडू नकोस तू एकटी नाहीस ग आता" मी ही कुरवाळत तिला शांत करण्याचा प्रयत्न करू लागलो.

"आदि अरे नाना जगलेच नाही त्याची परतफेड म्हणून गडीच्या एवजी वाडयाची देखरेख ठेवायचं काम मला दिलय. फुलांच्या माळा बनवून येणाऱ्या पैशात मी पोटभरते. आज काकांचे थोर उपकार आहेत माझ्यावर . तुझ्याबरोबर येण म्हणजे काकांना दगा दिल्यासारख होईल . "

तिचे शब्द एकून माझेही डोळे डबडबले, "तू काकांची चिंता करू नकोस . बघ ते नक्की तयार होतील . "

मी तिला पुन्हा वाडयावर सोडून घरी गेलो . निर्णय घ्यायला आज फक्त एकाच रात्र माझ्याकडे होती. . मी संध्याकाळी पुन्हा काकांबरोबर शेतात फेरफटका मारायला निघालो शेतातल्या नेहमीच्या कट्टयावर आम्ही जाऊन बसलो. काका फार व्यवहारी. पैशाची परतफेड न झाल्याने अक्षताला देखरेखीसाठी तिथे ठेवलं. त्यामुळे ते तिला माझ्यासोबत येण्याची परवानगी देतील की नाही याची जरा भीती होती. मनात खूप घालमेल होती पण काहीतरी निर्णय घ्यावा लागणारच होता. शेवटी हिम्मत करून मी काकांशी बोलायचं ठरवलं,

"काका, मी आणि अक्षता एकमेकांवाचून नाही राहू शकत. आम्हाला लग्न करायचं आहे. "

"आदि मला माहीत आहे " त्यांचं प्रतिउत्तर एकूनमी स्तब्धच झालो.

"काका तुम्हाला कसं ठाऊक ? अक्षताने सांगितलं का ? "

“नाही पोरा ती खूप गुणी आहे रे . दुख: कष्ट सहन केले तिने पण तोंडातून एक ब्रही नाही काढला कधी” “

मग काकांना कळले तरी कुठून ? हे सगळं त्यांना आधीपासूनच माहीत होत म्हणजे ते आता परवानगी देतील अशी खात्री झाली. मनात आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या. तितक्यात काका म्हणाले,
“हे बघ आदि, तुला माहीत आहेच की आजारपणात नानांनी वाडा माझ्याकडे गहाण ठेवला होता. पण नियतीने त्यांना बार केलाच नाही. मी माणुसकीच्या नात्याने बरेच पैसे खर्च केले पोरा त्यांच्या आजारपणात. आता वाडा सांभाळण्यासाठी गडी माणूस ठेवण्या इतकं सौख्य माझ्याकडेही नाही. मीही आता म्हातारा होत आहे. कुणाचा आधार नसताना म्हातारपणी निदान स्वतासाठी थोडा पैसा असावा असा वाटत. तुझ्या आणि अक्षताच्या लग्नाला माझा नकार नाही पण आता तुझा निर्णय तुझ्याच हातात आहे बघ:”

हे एकून मी जरा सुखावलो . आता परवानगी साठी विशेष कसरत करायला लागणार नव्हती पण यावरून हे स्पष्ट होत की ते अक्षताला वाडा सोडून माझ्यासोबत यायला तयार होणार नव्हते. मी आत्ताच तर नोकरीत स्थिरावलो होतो. पगारही चांगला होता . त्यात शहरात राहणं आवडायला लागलं होत ते सगळं सोडून गावात राहणं म्हणजे शिक्षणाला तिलांजली देण्यासारख होत. त्यांनी बोलणं पुढे चालूच ठेवलं,
“आदि म्हणतात लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात तसा तुमचं आहे बघ . तुमच्या आयुष्यात नाना तुम्हाला देव रूपात भेटलेत म्हणून आज इतक्या वर्षांनंतरही तुम्ही एकमेकांसमोर उभे आहात “

मला कळत नव्हतं की मधेच नानांचा उल्लेख कसा आला पण मी काही विचारण्या आधीच काकांनी माझ्या हातात एक डबादिला “आदि हे घे , ही तुझी अमानत”
कसलातरी डबा होता तो. मी तो उघडला त्यात नववधूचे दागिने होते आणि सोबत एक चिठ्ठी ही होती. मी ती चिठ्ठी उघडून वाचू लागलो.
“आदि कसा आहेस तू , मजेत ना! मजेतच रहा. अरे असा आश्चर्य चकित होऊ नकोस. मला पूर्ण खात्री होती की तू परत येशील. पोरा तुला आणि अक्षताला मी केव्हाच ओळखलं होत बालपणीच्या संसारातच तुमचं प्रेम कळत होत . मला कळून चुकल होत की माझ्या अक्षताला तुझ्याशिवाय चांगला वर शोधुनही सापडणार नाही. तिचाही जीव तुझ्यातच गुंतला आहे. पैसा काय पोरा आज आहे उद्या नाही. पण मनाची श्रीमंती हेच सगळ्यात मोठं वैभव असत बघ. खूप सेवा केलीस तू माझी अगदी एखादया पोटच्या पोरासारखी. आणि माझ्या पोरीलाही आधार दिलास. आजपर्यंत तुझ्या प्रेमाच्या बळावरच ती जागली बघ. तुम्ही दोघांनी एकमेकांना फार जीव लावलाय आणि पुढच्या आयुष्यातही असाच सोबत राहा. मला माहीत होत की माझे हात तुम्हाला आशिर्वाद द्यायला राहणार नाही . माझ्या हातून काहीतरी कर्तव्य पार पडण्या इतकं माझ नशीब पण नाही बघ. अक्षताच्या आईने हे दागिने तिच्यासाठी सांभाळून ठेवले होते. आज ते तुला देतोय . भातुकलीचा खेळ जसा मांडत होतात तसाच सुखाचा संसार मांडा. हीच माझी शेवटची इच्छा आहे . माझे आशिर्वाद सदैव तुमच्या पाठीशी आहेत.
तुझाच नाना

एव्हाना माझ्या डोळ्यातून अश्रुच्या धारा वाहू लागल्या होत्या . मला कळून चुकल की नानांचा किती विश्वास आणि प्रेम होत माझ्यावर. एवढयात काकांचे शब्द कानावर आले,
“आदि नानांनी ही ठेव आणि हे पत्र त्यांच्या जावयासाठी दिले होते बघ उद्या माझा ही भरवसा काय म्हणून आज तुझे तुला सुपूर्द केले“

आम्ही घरी परतलो. हात पाय धुवून जेवायला बसलो. घरात एकदम शांतता होती. कुणीच कुणाशी बोलत नव्हतं. जेवण एकदम शांततेतच पार पडलं. रोजप्रमाणे मी अंथरूण टाकली. आज काकांच्या मनाच ओझं जणू हलक झालं होत. ते अगदी शांत झोपी गेले.

आज शेवटच्या रात्री एक एक धागा माझ्यापुढे उलगडला. सगळ्या प्रश्नांची अचूक उत्तरे मला मिळाली. अक्षताच्या लग्नांनंतर काकांनी नानांची दिलेली ठेव सावकाराला दिली. त्याने ती चिठ्ठी वाचली आणि त्याला ही गोष्ट कळून चुकलीकी अक्षता कुणा आदीवर प्रेम करते. सावकार तसा चांगला माणूस म्हणावा की आमच्या प्रेमाची दोरी बळकट म्हणावी पण मोठ्या मनाने त्याने सगळं समजून घेतलं. सावकाराने काकांना ती ठेव परत केली आणि अक्षताला वाडयावर ठेवण्याची विनंती केली. त्यांनी सगळी हकीकत काकांना सांगितली. आज तो सावकार म्हणजे देवदूतच म्हणावा.

आजची रात्र फार शांत आणि हलकी वाटत होती. सगळे दडपण सगळी ओझी दूर झाली होती. आज मी माझा निर्णय पक्का केला होता ही रात्र म्हणजे माझ आयुष्य पालटवणारी सकाळ घेऊन येणार होती. मी अगदी शांत झोपी गेलो.

सकाळ कधी झाली कळलेच नाही. रोजप्रमाणे कोडे उलगडणारी सकाळ आज फार प्रसन्न वाटत होती सकाळी सकाळी पक्षांची किलबिल सुरू होती. मी सामानाची जमवाजमव केली आणि बॅग भरून बाहेर ठेवली. काकुने आज माझ्या आवडीची न्याहारी बनवली होती. मी न्याहारी केली. काका नेहमीप्रमाणे अंगणातल्या खाटेवर बसून होते. पण आज त्यांचं न्याहारीच ताट तसच होत एव्हाना चहा देखील थंड झाला होता. काकांचा चेहरा आज फार उदास वाटत होता. डोळेही पाणावलेले होते. कदाचित मी जाणार हे त्यांना अपेक्षित नसावं. पण मी माझ्या निर्णयावर मात्र ठाम होतो. काकांशी न बोलताच मी काकूंना सांगून तसाच निघालो,

“काकू , आग गाडीला अजून बराच वेळ आहे मी जरा एक काम निस्तारून येतो”

वळून काकांकडे बघितलं तर काकांची नजर तशीच शून्यात काहीतरी शोधत होती. लगबगीने मी नदीकाठी पोहचलो... नेहमीप्रमाणे अक्षता तिथेच होती.

“आदि आज तुला जायचय ना? तू खरच मला सोडून जाणार हा विचारच मला मरणास्पद वाटतोय“ पुन्हा रडत रडत तिने मला मिठी मारली. आज मात्र मला तिचे अश्रु थांबवायचे नव्हते. तिला मनमोकळ रडू द्यायचं होत . जशी ती शांत झाली मी तिला बाहुपाशातून बाजूला केल .

“अक्षता झालं रडून शांत हो वेडाबई. “

“आदि तुला नाही कळायच रे हे दुख:” पुन्हा हुंदका देत ती म्हणाली.

नानांची ठेव तिच्या हातात देत मी म्हणालो, “अक्षता हे घे नानांनी ही ठेव त्यांच्या जावयासाठी ठेवली होती. बघ जरा उघडून”

तिनेही ते उघडून बघितलं त्यात ते पत्र तिच्या नजरेस पडलं. तिने ते वाचायला घेतलं. पत्र वाचतांना माझ्या डोळ्यात जसे अश्रु होते तसेच तिच्याही डोळ्यात आले. पण क्षणीक का असेना ते आनंदाश्रू होते. नानांनी खरच तिच्या प्रेमाला तेव्हाच ओळखलं होत. आज ते असते तर तिचा आदि तिच्याजवळ असता. पत्र संपताच ती भानावर आली,

“आदि आता याचा काय उपयोग हे दागिने हा संसार आता माझ्या उपयोगाचा नाहीये . आज तू जाशील ..तो कधीही परत न येण्यासाठी ... पण मी ..मी मात्र पुन्हा ......”

तिच वाक्य पूर्ण होण्याआधीच मी तिला मिठीत घेतलं , “अक्षता आगा वेडी आहेस का तू पुन्हा असा बोलू नकोस तू एकटी नाहीस यापुढे मी आहे तुझ्या सोबत आयुष्यभरासाठी.”

ती वाडा सोडू शकत नाही हे तिला माहीत होत ,

”अरे पण मी वाडा सोडून जाऊ शकत नाही वाडा काकांकडे गहाण आहे.”

“तू त्याचा विचार करू नकोस चल माझ्याबरोबर” मी तिला सरळ मंदिरात घेऊन गेलो. सर्व दागिने घालून सात फेऱ्यांनी तिला बंधनात अडकवल. तसाच तिला घेऊन काकांकडे आलो.

“काका काकू ..बघा कोण आलाय ..तुमची सून आलीये “

काकू एकदम खुश झाली तिने अक्षताच आणि माझ स्वागत केल. आम्ही दोघांचे आशिर्वाद घेतले. पण काका अजून शांतच त्यांना कळेना मे असका केलं, “आदि अरे तू ....”

त्यांचं बोलणं मधेच थांबवून मी म्हणालो ,

“काका मला बोलायचं आहे तुमच्याशी . आज मी हरलो ..माझ्या प्रेमाचाविजय झाला . शहरात राहून पैसा कामावण्याची खूप स्वप्न होती पण नानाच्या त्या एका पत्राने माझे विचार ..विचार काय माझे आयुष्यच बदलले. आज मी ठरवलय की इथेच राहायचं अक्षतासोबत आणि तुमची भरभरून सेवा करायची. नानांचे शेवटी हाल झाले मरताना त्यांच्याजवळ आम्ही नव्हतो पण तसे हाल तुमचे होऊ देणार नाही. मिळेल ते काम करेल. दोघांच्या पोटापुरत कामावेल पण तुम्हा सगळ्यांना सोडून नाही जाणार कुठे.

काकांच्या आनंदाला पारावार उरला नाही ते खूप खुश झाले . मला जवळ घेत म्हणाले ,

“आदि बाल खूप गुणी आहेस तू खाल्या मिठाला जागलास. तू तुझे स्वप्न सोडून आमची सेवा करणार ह्या पेक्षा आमच मोठ भाग्य काय असेल . पण ..पण ती बॅग..ती बॅग का भरलीस मग तू ?”

मी हसत उत्तरलो, ” काका ती बॅग मी परत जाण्यासाठि नाही भरली तर अक्षता सोबत वाडयावर जाण्यासाठि भरली. नानांची शेवटची आठवण आहे ती आमच्याकडे तुमची सेवा करत करत त्या आठवणीलाही जपायला नको का” सगळं वातावरण अगदी आनंदमय झालं आता काकाही फार थकलेले होते म्हणून त्यांनी मला त्यांची शेती पाहाण्याची इच्छा दाखवली मी ही ते मान्य करून अक्षताला घेऊन वाडयावर गेलो.

आज वाडयाबद्दल एक वेगळीच आपुलकी वाटली. वाडयात पाय ठेवताच अस वाटत होत जसं एक समाधानी आशिर्वाद कुणीतरी देत आहे. नानाच असतील ते... स्वर्गातूनही आमचा सुखी झालेला संसार ते न्याहाळत असतील. नक्कीच......... अक्षताचा तर आनंद गगनात मावत नव्हता. आज तिचा एकटेपणा संपुष्टात आला पूर्वीची अक्षता आज पुन्हा तिच्यात दिसत होती. बालपणी मांडलेला भातुकलीचा खेळ आज खऱ्या अर्थाने संसारात मांडला तिने ..अगदी तसाच.... .

खऱ्या अर्थाने आज मला प्रेमाचा अर्थ आणि त्याची प्रचिती कळाली होती. साता समुद्रापालीकडच जग मी अनुभवलं. माझी अक्षता मला परत मिळाली. काका काकुंच प्रेम मिळालं. शहरात राहून कदाचित मी पैसा कमावला असता पण हे सगळं नक्कीच नाही. आज स्वताला आणि नानांना एक वचन दिलं.. अक्षताची आणि तिच्या प्रेमाची साथ कधीच सोडणार नाही .....अगदी सातजन्ममी फक्त तिचाच होवून राहीन.....फक्त आणि फक्त तिचाच आदि.

***

**कविता महाजन**

**कविता**

## निरोप

संस्कार सावलीत तुमच्या
आम्ही सारे घडलो
आशीर्वाद घेउनी तुमचे
आम्ही पुढे निघालो

गुरुजनांच्या ज्ञानदानाने
घडलो आम्ही खरोखरी
यश संपादून आता
लौकिक वाढवू परोपरी

द्या निरोप आम्हाला
मन जड जाहले
हात फिरता पाठीवरुनी
डोळे ओले जाहले

***

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**ई पत्ता : arunvdeshpande@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०१७७३४२**

**कथा**

## हॉस्टेल

संध्याकाळी हॉस्टेल मधल्या रुममध्ये नम्रता हॉरर कादंबरी वाचत बसली होती. वाचता वाचता वेळ कसा गेला कळले नाही अंधारून आले होते. तिने लाईट लावला व ती पुन्हा वाचत बसली. अजून एखादा तास उलटला असेल. तिला कुणीतरी रडतंय असं वाटलं. तिने आवाज नीट ऐकण्याचा प्रयत्न केला. पण आवाज बंद झाला होता. तिने पुन्हा पुस्तकात डोके खुपसले. त्या शांततेत तिला डोअर बेलचा आवाज इतका कर्णकर्कश वाटला की ती दचकलीच! तिने भीतभीतच दरवाजा उघडला. समोर नीता उभी होती. "काय गं नीता, किती घाबरवलंस ? " तिने चिडून नीताला विचारले.

"नाही गं, वरून कुणाचा तरी रडण्याचा आवाज आला, मी घाबरले म्हणून तुझ्याकडे आले!"

"अगं आवाज मी पण ऐकला, पण नंतर बंद झाला ... " ती असे म्हणतांनाच पुन्हा रडण्याचा आवाज आला. कुणी तरी दबक्या आवाजात हुंदके देत होते. दोघीही स्तब्धतेत आवाज ऐकू लागल्या.

"एक काम करू या, आपण वर जाऊन बघू या कोण आहे ते .. " नम्रताने मनाची तयारी केली. पण नीता खूप घाबरलेली होती.

"वेड्यासारखं काही पण नको करूस, नम्रता .. तुला माहित आहे ना त्या योगिताचा आत्मा वर फिरतोय ते! "

"नीता, ती अफवा असू शकते, भासही असू शकतो.. "

"नम्रता, मला नाही खात्री करायची.. "

"पण मी आज करणार आहे .. आर या पार!" नम्रताचा निश्चय पक्का होता. "तू येतेस कि मी जाऊ ?" तिने नीताला प्रश्न केला.

"मी नाही येणार, नम्रता! प्लीज तू पण नको जाऊस , मला एकटीला इथेही भीती वाटेल.. " नीता रडवेली झाली होती.

"गप्प गं, काही नाही होत. मी वर जातेय "असं म्हणत नम्रता तिला तिथेच सोडून रूम मधून वरच्या मजल्यावर जाण्यासाठी बाहेर पडली.

एकदा सुषमा बरोबर बोलता बोलता सोनमच्या विषय निघाला तेव्हा नम्रताने सुषमाला विचारले,

" सुषमा, तू का इतका द्वेष करतेस सोनमचा?"

"नम्रता, तिच्यामुळेच मी माझी जिवलग मैत्रीण योगिता गमावली आहे.. "

"अरे हो, तू मला योगिता बद्दल सांगणार होतीस ना, सांग ना प्लीज... "

नम्रताच्या विनंती वरुन सुषमाने सांगण्यास सुरुवात केली.

"योगिता तेव्हा कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला होती. दोन वर्षांपूर्वी विक्रम उर्फ़ विक्कीवर तिचे प्रेम जडले होते. पण काही दिवसांपासून तो तिला टाळू लागला होता...अणि एफ. वाय.ला नुकताच प्रवेश घेतलेल्या सोनम सोबत तो तिला नेहमी दिसत होता. एक दिवस तिने त्याला त्याबाबतीत स्पष्ट विचारले. पण त्याने उड़वा उडवीची उत्तरे दिली. वर तिलाच सुनावले, "मी कोणाबरोबर बोलायचे, कोणाबरोबर फिरायचे हे तू मला शिकवु नकोस..आणि यापुढे मला भेटायचा प्रयत्न करू नकोस.."

योगिता पूर्णपणे कोलमडली. ती तिथून तड़क हॉस्टेल मधल्या रुमवर गेली. एकांतात हमसाहमशी रडली. दोन दिवस ती कॉलेजमधे दिसली नाही म्हणून मी तिच्या रुमवर गेले. तिने दरवाजा लावून मला सर्व हकीकत सांगितली व ती रडू लागली. मी तिचे सांत्वन करीत तिला गप्प केले आणि "अभ्यासात लक्ष दे, उद्यापासून कॉलेजला ये" म्हणून समजावले.

दुसऱ्या दिवशी ती कॉलेजला आली. शेवटचे लेक्चर संपले तेव्हा कॉलेज बाहेर पडली तर नेमका त्याचवेळी सोनमच्या हातात हात घालून विक्की समोरून येतांना दिसला. तिला ते सहन नाही झाले. ती रुमवर रडत राहिली. तिच्या बाजूच्या रुम मेट्सनी तिला समजावले. पण तिने विक्की पासून दूर होणे फारच मनावर घेतले होते. रात्रभर ती रडत होती.... आणि पहाटे तीनच्या सुमारास तिने हॉस्टेलच्या टेरेसवरून उड़ी मारली. दुसऱ्या दिवशी मी कॉलेज मधे आले तेव्हा मला कळले. मी हॉस्टेलच्या दिशेने धाव ठोकली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या तिच्या मृतदेहावर सफ़ेद कापड टाकलेले... बघ्यांचा गराडा ... त्यांना आवर घालणारे पोलिस..... हे सारं पाहून मी सुन्न झाले. त्यानंतर अजूनही रात्री हॉस्टेलवर अधे मध्ये तिच्या रडण्याचा आवाज येतो. कुणा कुणाला रात्री-अपरात्री ती हॉस्टेलच्या passage मध्ये दिसते. त्यामुळे तेव्हापासून रात्रीच्या वेळेला हॉस्टेलच्या परिसरात कुणी एकटे फिरत नाही."

"ओह. खूप वाईट झाले, पण मला ती हॉस्टेल मध्ये दिसते हे मात्र पटत नाही." नम्रता स्पष्टच म्हणाली.

"मलाही आधी नाही पटायचे. पण आता हॉस्टेल मधे राहाणारे म्हणतात, तर विश्वास ठेवला पाहिजे बाय्.. निघते मी"

"बाय्.." म्हणत नम्रता हॉस्टेलच्या दिशेला वळली...

त्यानंतर दोन तिन दिवसांनीच नम्रताला सुषमाच्या बोलण्यात काहीतरी तथ्य आहे असं वाटू लागलं होतं. वरच्या मजल्यावर रात्री कुणीतरी रडल्यासारखे आवाज यायचे. तिने एक दोनदा वर जायचा विचार केला, पण तिची हिम्मत नाही झाली. पण आज तिने विचार केला होता. काही झालं तरी आज वर जायचंच...

....आणि आज नम्रता वर जाण्यासाठी जिन्याच्या पायऱ्या चढत होती. नीता घाबरून खालीच थांबली होती. वरुन थांबून थांबून हूंदक्यांचा आवाज येत होता. ती दोन चार पायऱ्या चढली असेल तोच पाठून कुणीतरी तिला खेचले. तिच्या छातीत धस्स झाले. दचकून तिने मागे मान फिरवली तर ती नीता होती. "नीता, तू ना! किती घाबरवलंस आता पण!" ती वैतागून पण दबक्या आवाजात पुटपुटली.

"मग मी काय करू..? मला एकटीला अजून भीती वाटत होती.." निताही तितक्याच दबक्या आवाजात म्हणाली.

"ओके. ठीक आहे..काही बोलू नकोस..माझ्या बरोबर चल." म्हणत नम्रता वर चालू लागली. निताही तिच्या बरोबर चालु लागली. शेवटच्या मजल्यावर पोहोचल्यावर त्यांना टेरेसवर मोठा आवाज झाल्यासारखा वाटला. दोघीही दबक्या पावलांनी वर चढत होत्या. नीता घाबरत होती. नम्रता तिला पाठीवर हात ठेऊन धीर देत होती. पण तीही थोड़ी घाबरली होतीच. आता त्या टेरेसच्या दरवाजा जवळ पोहोचल्या होत्या. टेरेसच्या दरवाजाला असलेले कुलुप तोडले गेले होते. दरवाजा उघडाच होता. दरवाजातून त्यांनी काळोखात पाठमोरी पाहिली सफेद चूड़ीदार मधील एक स्त्री.. हळू हळू चालत ती पुढे जात होती. नीता जागेवरच धप्पकन् बसली. तिची बोबडीच वळली. योगिता आता त्यांच्या समोर पुन्हा टेरेसवरुन उडी मारणार होती. ती स्त्री उड़ी मारण्यासाठी टेरेसच्या कठडयाच्या दिशेने चालली होती. ती कठड्याजवळ पोहोचली. तोच नम्रताने हिम्मत केली. धावत जावून तिने तिला पकडले. अंग झटकून त्या स्त्रीने मागे मान फिरवली आणि नम्रता चक्रावून पहात राहिली....ती नीलम होती..

"सोड मला..सोsssड..मला योगिता बोलावतेय..." म्हणत ती उडी मारण्याचा प्रयत्न करत होती. पण नम्रताची पकड मजबूत होती. नीलम असहाय्य पणे हमसाहमशी रडू लागली...

"कुल..कुल...नीलम..तू आधी खाली चल पाहू" म्हणत नम्रताने तिला जबरदस्तीने मागे ओढले. टेरेसच्या दरवाजाजवळ असलेली नीता आता जरा सावध झाली होती. पण अजून ती संभ्रमातच होती. निलमला घेऊन नम्रता खाली उतरत होती...आणि नीता गोंधळून त्यांच्या मागून उतरत होती...

"का वाचवलंस मला....मला जगण्याचा काही अधिकार नाही..." नीलम हुंदके देत होती.

"मला नीट सांग.....काय प्रकार आहे...?" तिच्या खांद्यावर सहानुभूतीने हात ठेवत नम्रताने विचारले.

"योगिता आणि विक्कीचे प्रेम होते याची मला जरासुद्धा कल्पना नव्हती. विक्कीबरोबर माझे नाते जुळल्याचे

योगिताला माहीत पडल्यावर विक्कीने तिला उडवून लावले. ती विक्कीच्या प्रेमात इतकी आकंठ बुडाली होती की विक्कीने केलेली प्रतारणा ती सहन करू शकली नाही म्हणून तिने टेरेसवरुन जीव दिला. तिच्या आणि विक्कीच्या संबधाबाबत तिच्या आत्महत्येनंतरच मला कळलं. तिच्या मृत्युला कारणीभूत असलेल्या विक्कीशी असलेले संबंध मी त्याच दिवसापासून तोडले. पण माझं मन मला खाऊ लागलं. मला तिचा मृत्यु आठवून रडू येऊ लागलं. मला रात्री अपरात्री तिचे भास होऊन मी दचकून उठू लागली. कधी कधी ती मला passage मधे दिसू लागली. टेरेसवर बोलावु लागली...आजही ती मला दिसली..मला टेरेसवर बोलावत होती..मी तिच्या मागे मागे टेरेसवर गेली.." असे म्हणता म्हणता तिने रुमच्या बाहेर पाहिले.

"ती बघ..ती बघ ..योगिता मला बोलावतेय..." म्हणत ती बेडवरुन उठली. रुमबाहेर निघायचा प्रयत्न करू लागली. नम्रताने तिला गदागदा हलवले.

"शांत हो नीलम, शांत हो..कोणी नाहीय तिथे..कळलं?" नम्रताने तिच्या पाठीवरून सहनुभूतीने हात फिरवला.

"हे बघ नीलम,जे काही घडलं त्यात तुझा काही दोष नव्हता..तू मनाला जास्त लावून घेतल्याने असं होतयं..दिवसरात्र तू तोच तोच विचार करत बसल्याने तुला आजुबाजुला योगिताच दिसतेय..."

नीलम आता भानावर आली होती. तीने नम्रताला मिठी मारली आणि ती पुन्हा जोराजोरात रडू लागली. आता तिने कोंडलेल्या आसवांना वाट मोकळी करुन दिली होती. तिच्या आसवांनी नम्रताची पाठ ओली होऊ लागली होती. एव्हाना सुषमा तिथे कधी पोहोचली होती ते त्यांना कळलेच नाही.

"नीलम, मला समजलंय सगळं.. तुझा यात काही दोष नाही.." असं म्हणत सुषमाही तिची समजूत काढू लागली••••

***

**प्रकाश पाटील**
**१३-बी, भाग्योदय अपार्टमेंट,**
**गोखिवरे, वसई (पूर्व)**
**जिल्हा : पालघर ४०१२०८**
**ई पत्ता : pprakashvasai@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८९०५६०९९९**

## मराठी विचारधन

परीश्रमातच मनुष्याची माणुसकी आहे.

***

**विनोबा भावे**

**कविता**

## कवितेचा जन्म

मनातल्या मनात कवी
जन्मकळेचा अनुभव घेतो
सांडतात शब्दरंग आणि
कवितेचा जन्म होतो
    ती प्रसववेदना
    कवी शब्दात मांडतो
    शब्दाच्या या शृंगाराने
    कवी कवितेशीच भांडतो
कोण म्हणत कविता
खट्याळ झाली
काहीच्या ती सखी
गाण्यात आली
    शृंगारीक कवीतेला
    घेतात डोक्यावर
    तालासुरतच ती रहाते
    ढोलकीच्या ठेक्यावर
विद्रोहाच्या कवितेन
मन उठतं पेटून
अन्यायाची चीड मग
मनात येते दाटून
    सौंदर्याच भान घेऊन
    टिपतात निसर्गगाणी
    बालगिताच्या बाहुल्या या
    नाचतात मग अनवानी
पावसाच्या कवितेच
तर बाई नवलच मोठ
सुकलेली झाडवेली
होतो हिरवागार देठ
    मनामनात पांघरते
    काव्य मखमली शाली
    नका करु मस्करी
    आता नाही कोणी वाली

***

**शाहीर प्रमोद जगताप**
**रा.गोखळी, ता.फलटण, जि.सातारा**
**ई पत्ता : psjagtap55@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ८५५४८५७२५२**

कविता

## मानवतेची पंढरी

विठू नामे, पंढरपुरी जमला,
दिंड्या पताका, वैष्णवांचा मेळा ॥ धृ ॥

पायी प्रवास, संतांच्या संगती
मानवतेची भक्ती, पंढरपूर क्षेत्री
विठ्ठल नामातून, विठू दर्शन
मानवतेची सफल फलश्रुती
सर्व संतांचे भक्तीपीठ, महायोगीपीठ
श्रीक्षेत्र पंढरी सकळा ॥ १ ॥

भक्तीचा पताका, सारे भेदभाव दूर करण्या
पंढरी मेला सजाती
कीर्तनाचे अंगी ज्ञानदीप लावूनी,
ज्ञानप्रकाश नित्य तेजाळती
सदाचाराची जीवनापताका खांद्यावरी
नवसमाज निर्मितीला ॥ २ ॥

अस्वच्छतेने रोगराई, बेशिस्तीमुळे येते
जगण्यात अवकळा
पावित्र जपू आधुनिकतेची कस धरू
परिवर्तनाचा महामेळा
प्रबोधनातून दूर-दूर, अंधश्रद्धा,
धक्का न लावता श्रध्देला ॥ ३ ॥

विठू नामाची व्यापकता
विश्वमानव राष्ट्रीय एकात्मता
मानवतेची पताका सांप्रदायात
संत महंतही डांगोरा पिटता
मानावा मानवात नसे भेद म्हणुनी
समतेची गळाभेट सकळा ॥ ४ ॥
***

**नागनाथ विठ्ठलराव गायकवाड**
**२१, भैरुवस्ती, लिमयेवाडी, वांगी रोड ,**
**सोलापूर**
**मोबाईल क्रमांक : ९८५०२८०८३६**

कविता

## भिजव तहानलेले रान रे !

युगेनयूगे उभा विटेवरी, बा विठ्ठला
करतोय जीवनाची वारी रे
कंबरेवरचा हात सोडून
भिजव तहानलेले रान रे ॥ धृ ॥

देवा तुझी अशी कशी आटली रे माया
कर्ज काढून पेरलेली
गेली कि वाया
उपास तापासाने झिजली माझी काया रे
जित्राबाला बघून तरी
तुज द्या येवू दे रे ॥ १ ॥

भल्या पहाटे उठुनी आकाशाकडे पाहतो
करपलेली पिके पाहुन मनातच झुरतो
चांगले दिस येण्यास
पाऊसच लागतोय रे
बळीराजास वा-यावर सोडूनी
दडी मारू नको रे ॥ २ ॥

पावसा तू गायब झाल्याने
मोडलं पोशिंद्याच कंबरडं
पैशापायीच खाऊ घातला नाही
साहेबाला कोंबडं
म्हणून साहेबाने मारला
कर्ज फाईलवरी शेरा तांबडा रे
शेतकऱ्यांच्या घरात शिमगा, सगळे भाजून
खाती पोळी रे ॥ ३ ॥
***

**नागनाथ विठ्ठलराव गायकवाड**
**२१, भैरुवस्ती, लिमयेवाडी, वांगी रोड ,**
**सोलापूर**
**मोबाईल क्रमांक : ९८५०२८०८३६**

**कविता**

# शेती पिकवा कि राव

शेती पिकली नाय म्हणुनी, कशाला धास्तीने मारताय राव
रोजगार हमी, ग्रामीण रोजगार हमीने, जोडले प्रत्येक गाव

असू दे किती हि मोठे, कर्जाचे डोंगर अवती भोवती
पोट भरण्या पुरते तरी, तुला रोजगार रोजच मिलती
असंख्य खेडे मिळूनी, होतोय भारत देश मोठ्ठ गाव

नको जीवाला घोर, संसाराला कृषि-पूरक धंद्यांचा हातभार
फळ प्रकिया कुक्कुट पालन, शेळीपालन,
घे दुध-दुभतीचे जनावर
कृषक-राज तु, हातावर हात बांधून,
आभाळाकडे डोळे नको राव

दगडाला फुटतोय पाझर, निसर्ग कधी तरी पाझरतो
वेळी अवेळी पडता पाऊस, थेट समुद्राला जावून मिसळतो
पाणी अडवा पाणी जिरवा, मंत्र जपुनी कर जलसाठा
हिरवं आपुले गाव

जंगल झाडे वने तोडूनी, मानवाने ओढवून घेतले हे संकट
पाण्याविना आज परिस्थिती, झाला आहे फारच बिकट
पर्यावरण संतोल, भरपूर वीज,
पाऊस-पाण्यासाठी झाडे आता लावं

फळबाग-विस्तार योजनेच्या तंत्रज्ञाने, शेतीचा विकास करू
जमिनीचे आरोग्य, उत्तम राखण्या,
माती पाणी परीक्षण अवश्य करू
सेंदीय खाते, जीवाणू-गांडूळखते वापराची,
नित्य ध्यास धरा राव

सेंद्रिय खताने, हरितगृहाने,
योग्य निर्देशांक गुण नियंत्रण पिकांचे
निर्यातक्षम पिके, परदेसी बाजारपेठ,
गौरव होईल, भारत भू चे
कीटक नाशके, रासायनिक खते,
विषांचा डोस, देवू नका राव

अपूर पाणलोट, गतिमान पाणलोट,
शेतमळे, विहिरभरण, राष्ट्रीय
पायलोट विकासाने वाढते, भू-गर्भात जलसाठा,
नको पाणी देवू मोकाट राव

बागेत असेल स्वच्छ प्रकाश,
जमिनीत नित्य उबदार वाफसा
डाळिंब तेल्या, भुरी रोगाचा प्रसार लागण होईल कैसा
दाटीवाटीने जीव गुदमरतो, स्वच्छ प्रकाश,
मोकळा श्वास घेवू द्या
कि राव

रोहयो फळबाग, राष्ट्रीय फळबाग योजना,
कमी श्रमात बाग धनाचे
फळे, फुले , भाजीपाला, अन्नसुरक्षा, कीडनियंत्रण,
भरघोस उत्पादना हरितगुहाचे
प्रयोगशील शेती, अधिक उत्पादनाने,
कृषिभूषण बहुमान मिळते राव
***

**नागनाथ विठ्ठलराव गायकवाड**
**२१, भैरुवस्ती, लिमयेवाडी, वांगी रोड ,**
**सोलापूर**
**मोबाईल क्रमांक : ९८५०२८०८३६**

**कविता**

# जीवनाची वारी

युगेनयूगे उभा विटेवरी
विठ्ठला पांडुरंगा
कधी बदलणार आठराविश्व
दारिद्र्य हो श्रीरंगा
गेले नक्षत्र कोरडे
जीवनाला लागलाय घोर
जनावरं बाजार दावली
गळ्याला लावून दोर
नकोसे झाले जगणे
उपाशी पोटाला भाकर दे श्रीरंगा
उजनी आटली, कोयना कोरडी
मुके तुक्याचे अभंग
मृग अन् आषाढ मेघांनी केलाय रे बेरंग
वांझोटी कूस धरणीची उजवण्या
बरस रे पांडुरंगा
गेली करपून पिकं, पाण्याला पाणी दे
वाचू दे जीव रे

सा-या जगाची पोटं
आहे पावसाच्या पाण्यावरी रे
वात्सल्याचा झरा तुझा
पाझरू दे रे पांडुरंगा
खचणार नाही, चालतो मी
जीवनातल्या वारीला
तीळ तीळ जीव तुटतो
पाणी पाहिजे रे जगायला
पावसाविना फाटका बळीराजा
हा भिकार जन्म श्रीरंगा
हाक माझी ऐकुनी
तुजला का नाही पान्हा फुटला
अबोल वेदना पाहून
येवू दे रे गहिवर गगनाला
विश्व तराया पुन्हा पुन्हा
अवतार घ्या हो पांडुरंगा
शालू पाचूचा मखमाली
रंगेबिरंगी फुलांचे बुट्टे
फेसाळत खळाळत गाज निझराचे
येवू दे झरी वाटे
नव्या जोमाने निसर्ग डुलू दे
देवा श्रीहरी पांडुरंगा
***

**नागनाथ विठ्ठलराव गायकवाड**
**२१, भैरुवस्ती, लिमयेवाडी, वांगी रोड, सोलापूर**
**मोबाईल क्रमांक : ९८५०२८०८३६**

## मराठी विचारधन

कष्ट आणि सेवा यातच खरा आनंद आहे, जे दुसऱ्यासाठी झटतात, त्यांनाच खऱ्या आनंदाचा आस्वाद घेता येतो.

***

जाती संस्थेचे निर्मुलन करा, जातीभेद, धर्मभेद यांना काहीही अर्थ नाही.

***

**सुभाषचंद्र बोस**

**कविता**

## सुखी जीवनाचा मार्ग

सुखी जीवनाचा मार्ग, सत्य हाच धर्म, योग्य कर्म असावा
मेंदुवरती ताबा, पंचशिलाचा, धर्म माणुसकीचा असावा

क्षण सौख्याचा, मोहाचा, सकारात्मकतेने खुलत जाते
चरित्र संपन्न जो कुणी, त्याला आदराचे स्थान मिळते
विवेकाची दुष्टी ज्याला, त्यास सगळीकडे सुख दिसावा

सत्य शांती सुखाचा मार्ग, बुध्दाच्या धाम्माकडे वळते
करुणा शील प्रज्ञा, मानवतेचे गुणगान, माणुसकी जपते
चेताविता भावना माणुसकीची, अंत:दीप भाव मनात फुलावा

जे शुद्र गणले, संविधानामुळेच लोकशाहीत राजे झाले
शाहू, फुले, आंबेडकरांच्या क्रांतीने, गळ्यातले मडके गेले
गळ्यात टाय, अंगावर सुट, पायात बूट, चांगले वस्त्र असावा

नैराश्येचा अंधार दूर करण्या,
मनातला दिवा लावलं पाहिजे
भंगलेल्या स्वप्नाला, आसुसल्या मनाला,
माणुसकीने झेलले पाहिजे
दोनहात दोनपायपेक्षा, माणुसकीचे डोस्क,
त्याखाली ओलमन असावा

अरे वेड्या मना, दाहीदिशा प्रवास,
वायुवेगे धावशी किती
काहीही असो आपली स्थिती,
धम्मामुळे मनाला मिळेल तृप्ती
बुध्दाचा तू मार्ग धार,
अन:करणाच्या शुद्धतेने स्वयं अंत:दीप व्हावा
***

**नागनाथ विठ्ठलराव गायकवाड**
**२१, भैरुवस्ती, लिमयेवाडी, वांगी रोड, सोलापूर**
**मोबाईल क्रमांक : ९८५०२८०८३६**

**कविता**

## पांडुरंगा मज ओढ लागली

ओढ लागली, ओढ लागाली,
तुझ्या भेटीची ओढ लागली
नाद तुझ्या चरणस्पर्श, मुखदर्शनचा,
पांडुरंगा मज ओढ लागली

कष्टकरी, कामकरी, शेतकरी,
सारेच तुझे प्रिय वारकरी
दुमदुमली पंढरीनगरी,
नामघोष विठ्ठल विठ्ठल जय श्री हरी
तुझिया मनमोहक रूपाच्या ओढीने,
पायवाट चालू लागली
ओढ लागली, ओढ लागाली ॥ १ ॥

ज्ञानियाचा ज्ञानराजा,चैतन्याचा महामेरू,
भगवंत कल्याणकारी
परमशांतीचा पंढरीराजा,
ज्ञानतृप्तीचे स्थान भू-वैकुंठ नगरी
माऊलीच्या ओढीने, उन वारा पावसात,
दिंडी बघा चालू लागली
ओढ लागली, ओढ लागाली ॥ २ ॥

भगवंताचे स्थान, भू-वैकुंठ धाम,
पांडुरंगास भेटाया येती वारकरी
ज्ञानियांचा मेळा, वारकरी संप्रदाय,
ज्ञानपीठ सकळा पंढरी पंढरी
पवित्र भूमी, सावल्या विठूची,
संतांना भेटीची आस लागली
ओढ लागली, ओढ लागाली ॥ ३ ॥

***

**नागनाथ विठ्ठलराव गायकवाड**
**२१, भैरुवस्ती, लिमयेवाडी, वांगी रोड , सोलापूर**
**मोबाईल क्रमांक : ९८५०२८०८३६**

**कथा**

## रंगीला प्रवास

साधारणत: सकाळी सहा सव्वा सहाची वेळ असेल. मी परीक्षेनिमित्त औरंगाबादहून ट्रेनने मुंबईला निघालो होतो. तिकीट रिझर्वेशन केले होते. सगळ्यात खालचा बर्थ खिडकी जवळ मला मिळालेला होता. माझ्या समोर बरोबर एक २०-२२ वर्षाची तरुणी बसली होती. दिसायला अतिशय सुंदर व नाकावर चष्मा होता. मी परीक्षा असल्या कारणामुळे पुस्तक वाचण्यात दंग होतो पण हळूच माझा कटाक्ष त्या तरुणीवर गेला व आमची नजरानजर झाली. दोघेही लाजून दुसरीकडे बघत होतो. असे एक दोनदा नव्हे तर १०-१५ वेळेस झाले पण बोलायची कुणाला हिम्मत होत नव्हती. ती पण एकटीच होती. मी पण एकता होतो. अचानक गाडीमध्ये वेफार्सवाला, चहावाला आला. मला भूक लागल्यासारखे झाले होते. मी वेफर्स घेतले व वेफर्स खाता खाता तिला विचारले, वेफर्स घेणार का ? ती नको म्हणाली, मी फोर्स केला तेव्हा तिने दोन तीन वेफर्स घेतले. मी विचारले कुठे चाललात ? ती म्हणाली, मुंबईला, परीक्षा आहे. मग तिने मला विचारले तुम्ही कुठे चाललात ? मी पण म्हणालो मुंबईला परीक्षा आहे. ती म्हणाली, तुमची आणि माझी एकच परीक्षा आहे वाटतं. काय योगायोग आहे, मग आमच्या बोलण्याचा विषय मिळाला. मग दोघांचेही गप्पा सरू झाले. दोघांचीही BSN Junior telecom officer ची परीक्षा होती. मग मी तिला विचारले, graduation कुठून झाले? ती म्हणाली, PES Engineering Collage Aurangabad मग तिने मला प्रश्न विचारला, तुमचे graduation कोठून झाले ? मग मी म्हणालो, SES College of Engineering Dhule. ती म्हणाली वा ! छान ! मी आणखी वेफर्स घेण्याची विनंती केली. ती म्हणाली, No Thanks. मग आमचा प्रवास सुरु झाला. एक दुस-या बद्दल आमच्या गप्पाला विषय मिळाला. मग तिने विचारले नाव काय ? मी म्हटले 'सुशिल' तुमचे ? ती म्हणाली 'स्मिता' असे वाटू लागलं गप्पा सुरूच ठेवाव्या. मुंबई लवकर येऊच नये. अभ्यास गेला उडत. असं करता करता मामाड जंक्शन आले. गाडी इंजिन बदलण्यासाठी मामाडला २०-३० मिनिटे थांबते. २०-३० मिनिटे होऊन गेल्यावर गाडी सुरु झाली. मग मी म्हणालो, अभ्यास झाला का ? ती म्हणाली, झाला फक्त revision बाकी आहे. म्हटलं परीक्षा परीक्षा केंद्र कोठे आले ?, ती म्हणाली, Thakur Engineering College अंधेरी. म्हटलं माझं पण तेच सेंटर आहे. ती म्हणाली अहो, कांदिवली हं, अंधेरी नव्हे. Sorry Sorry. म्हटलं ठीक आहे. मी तिला पुस्तक वाचण्यास दिलं. ती म्हणाली, Thank You हं.

मग ती पुस्तक वाचण्यात तल्लीन झाली. तिची चष्म्यातून पडणारी नजर मला भावली. तिरक्या कटाक्षाने ती पुस्तक वाचत व हळूच माझ्यावर कटाक्ष टाकत, मला तिचे कटाक्ष भावला. मग तिला एक गणित समाजात नव्हते, ती म्हणाली Please एवढं गणित सांगता कसं आहे तर ? मी म्हणालो ठीक आहे Try करतो. ती म्हणाली, ती म्हणाली, माझ्या शेजारी बसून सांगा, म्हणजे मला सोपं वाटेल. मी म्हणालो ठीक आहे. मग मी तिची शेजारी बसलो. तिचा स्पर्श मला सुसासारखा वाटत होता. मधीच तिची केसाची बट माझ्या गालाला स्पर्श करून गेली. त्याचक्षणी माझ्या शरीरावर रोमांच उठला व गुदगुल्या झाल्या. तिचा तो आखळपणा मला जाम आवडला. ती प्रश्न गंभीर होऊन विचारत होती, मी उत्तर मजेशीर देत होतो, ती म्हणाली तुम्ही भेटलात म्हणून माझी Revision झाली बरंका नाहीतर झाली नसती ? म्हटलं ठीक आहे. असं करता करता नाशिक जवळ आले. मी म्हटलं, थंडी फार वाटते ( तेव्हा साधारणतः नोहेंबर-डिसेंबरचा महिना असेल ) म्हटलं गरमा-गरम चहा घेऊ या. ती म्हणाली ठीक आहे. मग मी म्हटलो कॉफि घेऊयात. ती म्हटली ठीक आहे. मग मी दोन गरमागरम कडक कॉफीची ओर्डर दिली. चहावाल्याने दोन कॉफी बनवले. आम्ही घोट घोट कॉफीचा आस्वाद घेत होतो. कॉफी घेतल्यावर शरीरात गरमी आली. मनात म्हटलं, 'स्मिताला मिठी मारली तर गरमी दूर होईल'. तिनेही मनात काहीतरी विचार केला., व स्मित हास्य दिलं. म्हटलं दोघांच्याही मनात एकाच आले असेल. तर तिचे काळे भोर लांब लचक केस, गोरा रंग, अंगावर गुलाबी रंगाची ओढणी, गुलाबी रंगाचाच ड्रेस यात ती गुलाबी वाटत होती. दोघेही आम्ही शिक्षणानी इंगीनियर असल्यामुळे आमचे विचार मॅच होत होते. असं करता करता माम्ही First Year च्या विषयापासून ते Final Year च्या विषयापर्यंत गप्पा मारत होतो. दोघांना हि Maths विषय अवघड वाटत होता. Second Year ला Electromagnetic Engineering होता, तोही दोघांना अवघड वाटत होता. मग आम्ही दोन्ही विषयाच्या formula वर लक्ष केंद्रित करत होतो. असं करता करता आमच्या आमच्या दोन्ही विषयाच्या अभ्यासाची तयारी पूर्ण झाली होती. अशातच इगतपुरी आली. आमक ५० % Revison झाली होती. माझ्यामुळे तिचा व तिच्यामुळे माझा अभ्यास होत होता. दोघेही सम वयस्क असल्याकारणांनी आमची कुंडली जुळली होती व गणिते हि मॅच होत होती. अशातच ठाणे आले. कल्याण केव्हा येऊन गेले हे दोघांनाही कळले नाही. आम्हाला दोघांनाही दादरला उतरायचे होते. ठाण्यानंतरचा STOP म्हणजे दादर होय. दोघांना एक दुसऱ्याचा आधार होतो. दोघेही पहिल्यांदाच मुंबईला आलो होतो. माझ्याकडे GATE चे पुस्तक होते तर तिच्याकडे B.S.N.L.J.T.O. चे पुस्तक होते. दोघांनीही एक दुसऱ्याचे पुस्तक CHANGE करून अभ्यास केला होता व दोघांच्याही मनातील भीती कमी होऊन एक दुसऱ्याबद्दल आदर, सहानुभूती निर्माण झाली होती.

पुढे दोघेही दादरला उतरलो व लोकलने कांदिवलीला उतरलो. दुपारी ३.०० ते ६.०० पेपर होता. आमी एक तास पूर्वी म्हणजे २.०० वाजता कांदिवली EXAM CENTER ला पोहोचलो व दोघांनी हि एक दुसऱ्याला Best Luck देऊन परीक्षा भवनामध्ये प्रवेश मिळविला. म्हटलं निकालाच काहीही असो आपला प्रवास सार्थक झाला व खऱ्या अर्थाने रंगीला प्रवास ठरला.

***

**प्रा. संदिप रामदासराव मोकळे**
**मु. पो. वदिगोद्री, जायकवाडी वसाहत,**
**ता. अंबड, जि. जालना – ४३१२०५**
**ई पत्ता : sandipmokle81@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९९२२२२४०८३ / ९४२३४५९८२०**

**कविता**

## *खंत*

कुणी साथ सोडोनी निघुनी जाता .
खंत का वाटावी हो मनास आता

समजुतीच्या फंदात नको पडणे
कुणी समजुन घेईनासे झाले आता

भावना झाल्या इथे आता प्रदूषित
मोकळेपणात परकेपणा आता

मनाचे बांध ते कोरडेठप्प आता
व्यर्थ डागडुजी नको करणे आता
***

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**ई पत्ता : arunvdeshpande@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०१७७३४२**

कविता

## कधीकधी वाटतं

कधीकधी वाटतं
आपल्याला जगताच आलं नाही
मनातलं त्या वेळी तिला
कधी सांगताच आलं नाही

आयुष्याच्या संध्याकाळी
मागे फिरून पाहताना
तेव्हा त्या वेळी
तिच्या मागून वाहताना

तिच्या मनाच्या डोहात
कधी साचताच आलं नाही
मनातलं त्या वेळी तिला
कधी सांगताच आलं नाही

तिने माळलेल्या गुलाबाच्या पाकळ्या
मी अजूनही पुस्तकामध्ये जपलेल्या
माझ्या हट्टा पायी त्या बिचाऱ्या
अनेक वर्षे कैदेमध्ये जगलेल्या

तरी सुद्धा गंधाला शब्दांच्या प्रेमात
कधी पडताच आलं नाही
मनातलं त्या वेळी तिला
कधी सांगताच आलं नाही

अव्यक्त भावनांना तेव्हा
शब्दच नव्हते मिळत
नजरेची भाषा माझ्या
तिला मुळीच नव्हती कळत

कधीकधी वाटतं
नको ते मिळालं सारं
पण हवं ते मागताच आलं नाही
मनातलं त्या वेळी तिला
कधी सांगताच आलं नाही
***

**किरण प्रकाश बोरकर**
**रत्नागिरी – खेड**
**मोबाईल क्रमांक : ८७९३८४२१३६**

कविता

## बाहुली कित्ती छानसी

आईची असे लाडकी
म्हणते ती सारखी
परी ग माझी गोड ही
बाहुली कित्ती छानसी

दादू भारी लाड करी
काही तरी आणतो तो
कामावरून जेव्हा
रोज येतो तो घरी

पिंक पिंक ड्रेस माझा
बाबांना आवडे भारी
पाहून मला म्हणती
बाहुली कित्ती छानसी

आजीच्या गावी जाता
गळ्यात तिच्या पडते
आजीच्या डोळ्यातली
माया सारी ती दिसते

फिरायला जाते मी ही
असतात आबा सोबत
त्यांचे मित्र विचारतात
बाहुली कोण छानसी ?
***

**अरुण वि.देशपांडे**
**पुणे**
**ई पत्ता : arunvdeshpande@gmail.com**
**मोबाईल क्रमांक : ९८५०१७७३४२**

## मराठी विचारधन

तुमच्याकडे वेळ फार कमी आहे, तेव्हा कोणा दुसऱ्याचे आयुष्य जगणं सोडून द्या.
***

**ऐ. पी. जे. अब्दुल कलाम**

कविता

## धाडशी पंकजाताई

जनतेची साथ
भगवानबाबाचा आशीर्वाद
आमुच्या मुंडे साहेबांना मिळाला
यशस्वीपणाचा पर्वत त्यांनी सर केला
अचानक काळाने घातला घाला
दूर केले दैवाने बापापासून लेकीला
दुखः झाले सा-या महाराष्ट्राला
आई तुमचा आधार गेला
पंकूताई तुमचा पिता पण जिल्हाचा नाथ गेला
बाबा बाबा म्हणून तू हंबरडा फोडला
नशिबाने असा कसा घात केला
सारा महाराष्ट्र दु:खाने होरपळला
साहेबांची कन्या तू रणरागिणी
नाव तुझे पंकजाताई
डोळे पुसत बीड जिल्हाला म्हणाली
मी होईन दीन दुबळ्यांची बाप अन् आई
पूर आला होता तुझ्या अश्रुंला
तरी दु:ख सावरून आधार दिला जनतेला
बीड जिल्हाची शान अन् करा सन्मान तू ताई
तुझ्यात दिसली मला धाडशी लक्ष्मीबाई
सिहांसारखे काळीज केले
खरी वारस मुलगीच असते हे तू सिद्ध केले
संघर्ष यात्रा तू काढली
धन्य ते माता पिता
ज्यांना अशी कन्या लाभली
पंकूताई आमच्यासारखी एखादी असती
रडली असती, खचली असती
ताई तुझी सहनशिलता फार महान होती
तूच जिंकणार, साखरसम्राज्ञी होणार खात्री होती
स्वर्गातही आनंद होत असेल मुंडे साहेबांना
म्हणत असतील जनतेने साथ दिली माझ्या लेकीला
स्वप्नातही तुझ्या येत असतील बाबा
म्हणत असतील
शाबास माझ्या लाडक्या पंकजा
बीड जिल्हाची कन्या आहेस तू बाई
जनतेचे प्रेम कधी विसरू नको ताई
आजही अश्रू येतात डोळ्याला
साहेबांच्या आठवणीने कासावीस करतात जिल्हाला
ताई मी कोटी कोटी प्रणाम करते
तुझ्या साहसाला...
तुझ्या साहसाला...

***

शेख नजमा मैनुद्दीन
मु.पो. घानोरा, ता. आष्टी,
जि. बीड-४१४२०२
ई पत्ता : nadim939@gmail.com
मोबाईल क्रमांक : ९४२१३४९२२३

लेख

## आठवणीतल्या कविता

वर्ष संपत असताना कायम मनाला हुरहू लागून राहते आणि सरत्या वर्षात आपण काय कमावलं आणि काय गमावलं याचा लेखाजोखा मनात उभा राहू लागतो. ही हुरहूर जुन्या आठवणींना उजाळा देणारी असते आणि त्या आठवणी एका वर्षातल्या थोड्याच असतात... बघता बघता आठवणींचा हा फेर शेवटी आपल्याला आपल्या बालपणातच घेऊन जातो. हा सगळा शेवटी 'नॉस्टाल्जिया'चा खेळ असतो. अशाच खेळाच्या मोहात पडलेल्या चार माणसांना एकाएकी बालपणी शिकलेल्या आणि पुढे तुकड्या तुकड्यांनी स्मरणात राहिलेल्या कविता आठवू लागतात आणि त्या कवितांचे मग त्यांना पिसेच जडून जाते!

'उठा उठा चिऊताई, सारीकडे उजाडले,
डोळे तरी मिटलेले अजूनही...'

ही शालेय जीवनातील कविता त्या चारचौघांपैकी सर्वांनाच मुखोद्गत असते. पण 'आजीच्या घरचे घड्याळ कसले आहे चमत्कारिक...' ही कविता संपूर्णपणे पाठ असणारे शोधूनही सापडत नाहीत. यातूनच त्या चौघांना जुन्या कवितांचा धांडोळा घेण्याचा छंद जडतो. अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या कुणा आजोबाला आपल्या नातवाला नेमक्या त्याच काळात 'पडुं आजारी, मौज हीच वाटे भारी...' ही कविता हवी असते आणि योगायोगानं तो याच चौघांपैकी एकाकडे त्या कवितेसाठी संपर्क साधतो. त्यातूनच अशाच अनेक कवितांचा शोध सुरू होतो. या चौघांमध्ये एक जण दिवसभर पैशाच्या व्यवहारात गुंतून पडलेले, तरी कवितांवर प्रेम करणारे स्टेट बँकेतील अधिकारी पद्माकर महाजन असतात, तर दुसरे कायम पुस्तकांच्या विश्वात दडून राहणारे कीर्ती महाविद्यालयाचे ग्रंथपाल दिनकर बरवे असतात. त्याच कॉलेजातील (आता दिवंगत) प्रा. रमेश तेंडुलकर हे तर स्वत:च लेखक आणि उत्तम कवीही. हे तिघेही साक्षेपी

संपादक राम पटवर्धन यांना साथीला घेतात आणि त्यातून अशा असंख्य कविता जमा होतात.

कीर्ती कॉलेजमधीलच एक व्यासंगी प्राध्यापक एकनाथ साखळकर मग या कवितांची निगराणी करण्याचं काम हातात घेतात आणि त्यातूनच 'आठवणीतल्या कविता' अशी ग्रंथमालिकाच साकार होते. या जुन्या कविता कोण विकत घेणार, असा प्रश्न त्यातल्याच काहींना पडतोही. पण साखळकर माघार घ्यायला तयार नसतात आणि बघता बघता या मालिकेसाठी तुफानी बुकिंग सुरू होते आणि आपल्या कामाला यश आल्याची भावना या सर्वांच्या मनात दाटून येते.

आज या घटनेला बरोब्बर दोन दशकं लोटली आहेत. तरीही या कामाचं महत्त्व तसूभरही कमी झालेलं नाही. त्याचं एक कारण या कवितांच्या अवीट गोडीत जसं आहे, त्याचबरोबर या सर्वांनी या कविता जमा करण्यासाठी घेतलेल्या अपरंपार मेहनतीतही आहे.

या खंडातील कोणताही एक हातात घेऊन, मधूनच उघडला तरी आठवणींचा खजिनाच हाती येत राहतो. कधी ' या बाइ या, बघा बघा कशि माझि बसलि बया' ही 'शहाणी बाहुली' नावाची दत्त कवींची कविता सामोरी येते, तर कधी वा. भा. पाठक यांची

खबरदार जर टाच मारुनी जाल पुढें, चिंधड्या -उडविन राइ राइ एवढ्या

या ओळी नजरेसमोर येतात आणि शिवाजी महाराज आणि त्यांचे जिवाला जीव देणारे सवंगडी दिसू लागतात. कधी बी कवींची 'गाइ पाण्यावर काय म्हणुनि आल्या? कां गंगायमुनाहि या मिळाल्या' अशा हृदयाला हात घालणाऱ्या ओळींनी सुरू होणारी 'माझी कन्या' ही कविता भेटीला येते. तर मध्येच

आई म्हणोनि कोणी आईस हाक मारी
ती हाक येई कानीं मज होय शोककारी

या कवी यशवंतांच्या पंक्ती डोळ्यांत पाणी आणतात. पहिल्याच खंडातली पहिली कविता ही सर्वांच्याच ओळखीची असते आणि 'थोर तुझे उपकार॥ आई थोर तुझे उपकार॥' या ओळी तर सर्वांनाच ठाऊक असतात. पण या अजरामर कवितेचे कवी भास्कर दामोदर पाळंदे आहेत, हेही आपल्याला माहीत होऊन जाते आणि या कवीला वंदन करावेसे वाटते.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे 'बहु असोत सुंदर संपन्न की महा. प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' हे गीत येथे अचानक सामोरे येते, तर कधी

अजुनि चालतोचिं वाट! माळ हा सरेना!
विश्रांतिस्थळ केंव्हां यायचें ते कळेना!

या ए. पां. रेंदाळकर यांच्या ओळी अवघ्या जीवनाचा अर्थ उलगडून दाखवू लागतात. भूतकाळातल्या अनेक स्मृती जागवण्याचं काम तर या कविता करतातच पण त्याचबरोबर त्या घटनांचा नव्यानं अर्थ लावण्याचं कामही या कविता करत जातात. त्यामुळेच तर या कविता आणि त्यांचे ‘आठवणीतल्या कविता’ हे खंड यांचं मोल खऱ्या अर्थानं अनमोल आहे.

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## गोट्या

सुमारे १५ वर्षांपूर्वी टीव्हीवर 'गोट्या' नावाची मालिका सुरू झाली आणि त्या काळातली लहान मुलंच नव्हे तर मोठी माणसंही एका वेगळ्याच विश्वात दंग होऊन गेली. तो आठवणींचा हिंदोळा होता. खरं तर ती मालिका सुरू झाली, त्या काळातल्या लहान मुलांना, त्या मालिकेतलं विश्व हे पूर्णपणे अनोखं होतं. अगदी अस्सल मराठमोळं असूनही! त्याला कारणच वेगळं होतं. टीव्हीच्या असंख्य मालिका घराघरांत जाऊन पोहोचल्यानंतर त्या मुलांचं भावविश्व बदलून गेलं होतं आणि त्यामुळेच त्यांना १९४०-५०च्या दशकातल्या त्या मराठमोळ्या वातावरणात काहीच सुचेनासं झालं होतं. पण त्या मुलांच्या आई-वडलांनाच नव्हे तर आजी-आजोबांनाही मात्र ती मालिका पाहावीशी वाटत राहिली याचं प्रमुख कारण म्हणजे टीव्हीचा जन्म होण्यापूर्वीचं ते विश्व त्यांचं होतं आणि तितक्याच अस्सलपणे ते लेखनातून उतरलं होतं. ते यश १९४०च्या दशकातले प्रख्यात बालसाहित्यकार ना. धों. ताम्हनकर यांचं होतं. त्या म्हणजे १९४०च्या दशकात टीव्ही सोडाच रेडिओही दुर्मिळ असतानाच्या काळात माणसं आपला वेळ हा वाचनातच घालवत असणार, हे नव्यानं सांगण्याची गरज नाही. तरुण-तरुणींसाठी आणि प्रौढांसाठीही त्या काळात विविध प्रकारचं वाङ्मय सहजतेनं उपलब्ध होत असतानाच्या त्या काळात लहान मुलांसाठी फारसं काही वाचायला उपलब्ध नसे. ती गरज भा. ल. तथा

काका पालवणकर यांनी 'खेळगडी' नावाचं मासिक सुरू करून मोठ्या प्रमाणात भरून काढली. प्रामुख्यानं शाळकरी मुलांसाठी असलेलं ते मासिक अल्पावधीतच लोकप्रिय होऊन गेलं आणि त्याच मासिकातून 'गोट्या' नियमितपणे वाचकांच्या भेटीला येऊ लागला. ताम्हनकरांनी गोट्याची व्यक्तिरेखा इतक्या अकृत्रिम शैलीत साकार केली होती की बघता बघता तो तुमच्या आमच्या घरातलाच एक होऊन गेला. खरं तर तो कोणाच्याच घरातला नसतो. एकुलती एक मुलगी असलेल्या एका कुटुंबाला हा मुलगा अवमानित जिणं जगत असताना सापडतो आणि ते दादा-वहिनी गोट्याला घरी आणण्याचा निर्णय घेतात. सुमाला तर भाऊ मिळतोच पण त्याचबरोबर महाराष्ट्रातील तमाम मुलामुलींना आपल्या हक्काचा असा एक सवंगडी खेळायला मिळतो.

गोट्या हा चतूर तर असतोच, त्याचबरोबर विनयशीलही. नाना प्रकारचे खेळ आणि बौद्धिक करामती त्याला अवगत असतात. त्यामुळेच तो केवळ दादा-वहिनी आणि सुमा यांचं त्रिकोणी कुटुंब चौकोनी करून सोडतो, असं नाही तर तुमच्या आमच्या घरातही आनंदाचं निधान घेऊन येतो. ताम्हनकरांचा या लेखनामागचा हेतू अगदी स्पष्ट आहे. पुढे या मालिकेचे पुस्तक रूपानं तीन भागांत प्रकाशन झाले, तेव्हा दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेत त्यांनी तो उघड केला आहे. ‘बालजनांशी हसून खेळून त्यांच्या मनोविकासाला मदत करणारा एखादा सवंगडी त्यांना मिळवून द्यावा, ही मनातली इच्छा गोट्याच्या रूपाने मूर्त स्वरूपास गेली...’ असे त्यांनी लिहिले आहे. काय करतो हा गोट्या नेमकं? तो शाळेत एक हुषार विद्यार्थी म्हणून गणला तर जात असतोच पण त्याचवेळी तो गुरूजनांना अडचणीत आणणाऱ्या, शिक्षकवर्गाला त्रास देणाऱ्या विद्यार्थ्यांची खोडकी जिरवण्याचं कामही मोठ्या कौशल्यानं करत असतो. हे करताना तो लहानपणी शाळेत मुलं ज्या युक्त्या-प्रयुक्त्या, योजतात, त्याच योजत जातो. प्रसंगी तो दांगडधिंगाही घालतो पण ते सारं करतानाचा त्याचा हेतू स्पष्ट असतो. त्याचवेळी तो घरातल्या सुमावर मनापासून माया करत असतो. सुमा आणि तिच्या मैत्रिणींची कोणी छेड काढत असेल, तर तो त्या मवाल्यांना चांगलाच इंगाही दाखवतो. दिवाळीत तो आकाशकंदिल तर करणारच पण त्याचवेळी सुट्टीत काही थोडंफार काम करून मिळणारा अल्पस्वल्प मोबदला हा गरीब विद्यार्थ्यांच्या कामी लावणार!’ मग असा हा सत्शील गोट्या तुमच्या आमच्या मनावर गारूड घालून न जाता तरच नवल...

आज गोट्या तुमच्या आमच्या भेटीला आला, त्यास जवळपास सात दशकं लोटली आहेत. तरीही गेल्या पिढीबरोबरच आजच्या सुजाण विद्यार्थीवर्गालाही तो हवाहवासा वाटतो, यापेक्षा ताम्हनकरांच्या लेखनाचं आणखी यश ते काय सांगायचं?

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## *मनस्वी लेखक - डॉ.मुणगेकर*

भालचंद्र मुणगेकर हे नाव गेल्या काही वर्षांत केवळ मराठी वर्तुळापुरतंच मर्यादित राहिलेलं नाही. मुणगेकर हे ३५ वर्षापासून समाजकारणात आहेत आणि आंबेडकरी विचारांवर अतूट निष्ठा ठेवून ते विविध सामाजिक, राजकीय आणि आर्थिक चळवळींमध्ये हिरिरीनं भाग घेत आले आहेत. या ३५ वर्षांच्या काळातील मुणगेकरांचा प्रवास हा थक्क करून सोडणारा आहे. मुणगेकर रिझर्व्ह बँकेत अधिकारी होते. ती नोकरी सोडून ते पुढे मुंबई विद्यापीठात प्राध्यापक झाले. पुढे त्याच विद्यापीठाचे कुलगुरू झाले आणि डॉ. मनमोहन सिंग यांच्या हाती देशाची सूत्रं आल्यावर त्यांनी समाजाच्या सर्वात शेवटच्या पायरीवर असलेल्या माणसाशी बांधिलकी असलेल्या मुणगेकरांना संपूर्ण देशाच्या नियोजन आयोगाचं सदस्यत्व बहाल केलं. आता मुणगेकर हे समाजातील एक महनीय व्यक्तिमत्त्व बनलं आहे आणि ते काही त्यांच्या या राजकीय धर्तीच्या निवड-नेमणुकांमुळे बिलकूलच नाही. तर एका पाठोपाठ एक अशी महत्त्वाची पदं चालत आल्यानंतर त्यांचा वापर मुणगेकरांनी हा समाजातील दुर्बल-वंचित आणि शोषित घटकांना काही ना काही मिळवून देण्यासाठीच केला म्हणून मुणगेकर हे नाव आज महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात अग्रभागी राहिलं आहे.

पण त्यामुळेच मुणगेकरांची जडण-घडण नेमकी कशी झाली आणि नेमक्या कोणत्या मुशीतून हे व्यक्तिमत्त्व जन्मास आलं, याबद्दलही अनेकांच्या मनात कमालीचं कुतुहल निर्माण होणं, हे स्वाभाविकच म्हणायला हवं. 'मी असा घडलो' या आत्मचरित्रातून मुणगेकरांनी ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रयत्न केला आहे, असं म्हणण्याचं कारण एवढंच की मुणगेकरांनी हे आत्मचरित्र त्यांचं शालेय जीवन संपतं, त्या टप्प्यावर आणून सोडून दिलं आहे! शाळेची पायरी ओलांडून बाहेर पडल्यावरच मुणगेकर चळवळीत उतरले आणि त्यांच्या जीवनाला एक नवेच वळण लागलं. त्यामुळे त्यानंतरच्या पुढच्या ३५ वर्षांची त्यांची जीवनकहाणी ही कदाचित अधिक रंगतदार, उत्कंठावर्धक

आणि त्यामुळेच अधिक वाचनीय होऊ शकली असती. पण मुणगेकरांनी तो मोह टाळून आपलं कोकणातलं बालपण आणि पुढे मुंबईतलं शालेय जीवन एवढ्यापुरतीच ही कहाणी मर्यादित ठेवण्याचा निर्णय घेतला. पण त्यामुळेच नेमक्या कोणत्या संस्कारातून हे मुणगेकर नावाचं रसायन जन्माला आलं, त्याची अत्यंत रसाळ आणि मनोवेधक कहाणी आपल्यापुढे साकार झाली आहे.

अर्थात, मुणगेकरांसाठी हा 'बालपणीचा काळ सुखाचा' बिलकूलच नव्हता. उलट कोकणातलं अठराविश्वे दारिद्र्य आणि मुंबईत आल्यावर या ना नातेवाईकाच्या वळचणीला राहून काढावे लागलेले दिवस, यातून मुणगेकरांची जिद्द आणि दुर्दम्य इच्छाशक्तीच सामोरी येत जाते आणि थक्क व्हायला होतं. मुणगेकर सांगतात : कोकणातल्या त्या खडतर काळात लाभलेला खराखुरा मित्र आणि गुरू होता आबा. आबाचे व्यक्तिगत जीवन हे माझे सर्वात मोठे प्रेरणास्थान आहे. त्याने आम्हा भावंडांसाठी केलेले अपार कष्ट, ते करताना त्यातील आम्हाला जाणवणारदेखील नाही इतका सहजपणा, आमच्या मोठ्या कुटुंबासाठी त्याचा सतत वाटणारा आधार... या त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंकडे पाहिलं की त्याला हे कसं अवगत झाले, याचे मला नेहमीच आश्चर्य वाटत आले आहे.

आबा म्हणजे अर्थातच मुणगेकरांचे वडील. कोकणात मुणगेकरांनी अवघी ८-१० वर्षं काढली. पण त्या काळात हा आबाच त्यांच्या जीवनाचं सर्वस्व होता. त्याच्याविषयीची अपरंपार कृतज्ञता अत्यंत प्रांजळपणानं व्यक्त करतानाच, मुणगेकरांनी आपली आई, आजी आणि विशेषत: चार वर्षांनी लहान असलेली बहीण यांचीही व्यक्तिमत्त्वे अत्यंत रसरशीतपणे उभी केली आहेत. त्या सर्वांच्या वागण्याबोलण्यातून मिळालेलं संचित घेऊनच मुणगेकर मुंबईत आले आणि परळच्या नवभारत विद्यालयात दाखल झाले. तेव्हापासून त्यांच्या जीवनाला एक वेगळंच वळण लागलं. हे घडलं ते तेथील शिक्षकांमुळे. शरद चित्रे, बा. बा. ठाकूर आणि श्रीमती लीला ठाकूर या तीन शिक्षकांचा यासंदर्भात मुणगेकरांनी खास उल्लेख केला आहे.

मुणगेकरांचं मुंबईत येणं, मिळेल त्या परिस्थितीशी जुळवून या महानगरीत पाय रोवणं आणि पुढे भेटलेल्या या आणि अन्य शिक्षकांनी दाखवलेल्या स्वप्नांच्या शिदोरीवर पुढची वाटचाल करणं, हे सारं मुळातूनच वाचायला हवं. आठवणींचा हा प्रवास मुणगेकरांबरोबर आपल्याला कधी थेट कोकणात, तर कधी परळच्या नवभारत विद्यालयात घेऊन जातो आणि मन हेलावून जातं. या साऱ्या प्रवासात मुणगेकरांना आणखी एका महामानवाची साथ असते. ते महामानव म्हणजे अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर. मुणगेकरांच्या जीवनावर असलेला त्यांचा प्रभाव या छोट्या आत्मकथेतही पानोपानी जाणवत राहतो आणि त्याचवेळी मुणगेकरांच्या आगामी जीवनप्रवासाची दिशाही सूचित करत जातो...

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## सर्वोत्तम - रवींद्र पिंगे

ललित लेखन हा साहित्यातील बहुधा सर्वात सोपा आणि तितकाच अवघड प्रकार असावा. कोणीही उठावं आणि कोणत्याही विषयावर लिहावं आणि त्यास ललित लेखन असं लेबल चिकटवावं, असं गेली अनेक वर्षं सुरू आहे. तरीही कसदार ललित लेखकांची परंपरा मराठीत मोठी आहे. याच परंपरेतील एक भारदस्त नाव रवींद्र पिंगे असं आहे. पिंग्यांचं गेल्याच वर्षी निधन झालं. त्यापूर्वीची सलग तीन-चार दशकं ते लिहीत होते. हे काम सोपं नाही.

इतका प्रदीर्घ काळ सातत्यानं वाचकांना मोहून टाकणारं लिखाण करणं, ही एक तपश्चर्याच आहे. त्याचं कारण म्हणजे कथा-कविता-कादंबरी अशा कोणत्याही राजमान्य साहित्यप्रकाराऐवजी पिंगे हे केवळ ललित लेखनच करत राहिले आणि त्यातून त्यांनी स्वत:चा असा विशिष्ट वाचकवर्ग तयार केला. पण पिंगे हे केवळ लेखकच नव्हते. तर ते एक साहित्यकर्मी होते. अनेक साहित्यिक उपक्रमांशी त्यांचा निकटचा संबंध होता आणि अनेकांना लिहितं करण्यातही त्यांचा मोठा वाटा होता. पिंग्यांनी नोकरी केली ती आकाशवाणीत. त्यानिमित्तानं त्यांचा अनेक मोठमोठ्या व्यक्तिमत्त्वांशी संबंध आला. शिवाय, पिंग्यांना प्रवासाची आवड होती आणि चांगलंचुंगलं खाण्याचीही. वाचन हा तर त्यांचा केवळ छंद नव्हे, तर त्यांच्या जीवनाचाच एक अविभाज्य घटक होता. त्यातून त्यांचं आयुष्य कमालीचं समृद्ध होत गेलं. हेच अनुभव पिंगे शब्दबद्ध करत गेले आणि त्यातून एक मोठा लेखक निर्माण झाला.

पिंग्यांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची शैली. आजकाल शैलीदार लेखन अभावानंच बघायला मिळत असताना पिंग्यांचं लेखन एक वेगळाच आनंद देऊन जातो. त्यामुळेच त्यांचं विविध विषयांवरील निवडक लेखन

एकत्रितपणे हाती येणं, हा मोठाच योग आहे. 'सर्वोत्तम रवींद्र पिंगे' या शीर्षकाखाली हाती आलेलं त्यांचं लेखन हा पिंग्यांच्या चाहत्यांसाठी एक मोठाच ठेवा ठरू शकतो. पिंग्यांचं लेखन वाचताना नेहमी असं जाणवत राहतं की हा लेखक आपलं बोट धरून आपल्याला कुठे तरी फिरायला घेऊन जात आहे. हे पुस्तक हातात घेतल्यावरही तोच अनुभव येतो. कधी पिंगे आपल्याला त्यांच्या 'उपळे' या कोकणातल्या गावात घेऊन जातात, तर कधी मर्ढेकरांच्या रामदासी गावाला. कधी ते आपल्याला कुमार गंधर्वांचं शांत, तृप्त जग दाखवतात, तर कधी आरती प्रभू, पु. ल. देशपांडे, बा. भ. बोरकर यांच्या साहित्यविश्वात फेरफटका मारायला घेऊन जातात. पिंगे यांचं वाचन अफाट होतं आणि ते केवळ मराठीपुरतं मर्यादित नव्हतं. त्यामुळेच ते आपल्याला हेमिंग्वे, पर्ल बक, विन्स्टन चर्चिल यांचीही ओळख करून देतात.

पिंगे हे एक मनस्वी आणि भाऊक प्रकृतीचे लेखक होते. त्यामुळेच 'माझे बाबा आणि मी', 'घडले तेच पसंत' अशा काही लेखांमधून ते स्वत:विषयी बोलत राहतात. हे सारंच लेखन कमालीचं आनंददायी आहे. अनेकदा शैलीच्या मोहात पडून ते शब्दबंबाळ झालं असलं, तरीही!

या पुस्तकाला ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांची प्रस्तावना आहे. त्यात त्यांनी पिंगे यांचं अगदी अचूक वर्णन केलं आहे. पाडगावकर म्हणतात : 'वयाची ऐंशी वर्षं पूर्ण झाली, तरी पिंगे यांचा प्रत्यक्ष आणि लेखनाचा असे दोन्ही प्रवास उमेदीच्या वयातल्या उत्साहानेच सुरू आहेत. ते तसेच सुरू राहणार आहेत कारण तो त्यांच्या अंतरीचा झरा आहे आणि अंतरीचा झरा देवाचे देणे असते. कधीही न आटणारा.' पिंगे यांच्या लेखनामुळे तो झरा, आजही त्यांच्या निधनानंतर न आटता वाहत आहे.

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## *ग्रंथ गीता*

श्रीज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायात गीतेची थोरवी सांगतांना ज्ञानेश्वर महाराजांना गीतेबद्दल किती सांगू आणि काय काय सांगू असे झाले आहे. ज्ञानोबा सांगतात, एवं वेदाचें मूळसूत्र सर्वाधिकारैकपवित्र श्रीकृष्णें गीताशास्त्र प्रकट केलें सर्वाधिकाराने संपन्न, पवित्र आणि वेदांचे सूत्ररूपाने असलेले मूळ असे हे गीताशास्त्र भगवान श्रीकृष्णाने प्रकट केले. येथ गीता मूळ वेदां ऐसें पां केवी आले बोधा गीता हे वेदाचे मूळ असे कसे समजले? त्याबद्दलची प्रसिद्ध उपपत्ती ज्ञानोबा पुढे सांगतात. तरी जयाचां निश्वासीं जन्म झालें वेदराशी तो सत्यप्रतिज्ञ पैंजेसीं बोलिला स्वमुखें म्हणौनि वेदां मूळभूत गीता म्हणों हें होय उचित ज्याच्या नि:श्वासात वेदराशी जन्मल्या, तो सत्यसंकल्प भगवान स्वत:च आपल्या मुखाने हे गीताशास्त्र बोलला म्हणूनच गीता ही वेदांना मूलभूत आहे, असे जे म्हटले ते खरेच आहे.

याबद्दल आणखीही एक उपपत्ती आहे. जसा वृक्ष हा बीजामध्ये सूक्ष्मरूपाने असतो तसेच कांडत्रयात्मक वेद हे गीतेत आहेत. तरी काडत्रयात्मकु शब्दराशि अशेखु गीतेमाजीं असे रुंखु बीजीं जैसा म्हणून वेदांचे बीज गीता आहे. एवढेच नव्हे तर ते सहजपणे दिसत आहे. म्हणौनि वेदांचे बीज श्रीगीता होय हें मज गमे आणि सहज दिसतही आहे अलंकार आणि रत्नांनी जसे सर्व शरीर शोभून दिसते तसेच वेदांची ही तिन्ही कांडे गीतेत ठळकपणे, सहजपणे दिसून येतात. असे सांगूनच माऊली थांबत नाहीत, तर त्यापुढील २१ ओव्यांमधून गीतेच्या १८ अध्यायात वेद कुठे आणि कसा आला आहे त्याचे निरुपण केले आहे. त्यानंतर माऊली सांगतात, वेदाने स्त्रीसह बहुजन समेजाला आपल्या ज्ञानाच्या लाभापासून वंचित केले. दूर ठेवले. त्यामुळे तो कृपण ठरला. आपल्या या दोषाचे परिमार्जन करण्यासाठी, सर्वांना त्याचा लाभ घेता यावा यासाठी वेद गीतारूपाने श्रमू लागला, राबू लागला.

तरी मज पाहतां तें मागील उणें फेडावया गीतापणें वेदु वेठला भलतेणें सेव्य होआवया आपल्या मागच्या दोषाला भिऊन वेद गीतेच्या पोटात शिरला, कुशीत शिरला. गीता ही सर्वांनाच मोक्षदायिनी असल्यामुळे वेद आता मात्र उत्तम कीर्ती पावला आहे. म्हणून वेदाचे नीट सेवन करण्याजोगे रूप म्हणजे गीता असे ज्ञानोबा सांगतात. यालागीं मागिली कुटी भ्याला वेदु गीतेचां पोटीं रिगाला आतां गोमटी कीर्ति पातला आपण मराठीतून हा ग्रंथ निर्मिला, त्याबद्दल अतिशय नम्रपणे ज्ञानोबा परी गीता ईश्वरू भोला ले व्यासोक्तिकुसुममाला तरी माझिया दूर्वादला ना न म्हणे कीं गीता हा भोळा ईश्वर आहे. तो व्यासवचनांची फुलमाळा धारण करीत असला तरी माझ्या दूर्वांकुरालाही 'नाही' निश्चितच म्हणणार नाही, असा विश्वास प्रकट करतात.

तत्पूर्वी अकराव्या अध्यायाच्या प्रारंभी गीतेची थोरवी बापु ग्रंथु गीता जो वेदीं प्रतिपाद्य देवता तो श्रीकृष्णु वक्ता जिये ग्रंथीं तेथिंचें गौरव कैसें वानावें जे शंभूचिये मती नागवे तें आतां नमस्कारिजे जीवें भावें हेचिं भलें गीता हा ग्रंथ किती

श्रेष्ठ! वेदांची मुख्य देवता भगवान श्रीकृष्ण हा ज्या ग्रंथात वक्ता आहे, त्याच्या थोरवीचे भगवान शंभुमहादेवाच्या बुद्धीलाही आकलन होत नाही, ती कशी वर्णावी? तेव्हा अशा या श्रेष्ठ गीता ग्रंथाला मन:पूर्वक नमस्कार करावा हेच योग्य, अशा शब्दांत ज्ञानोबा सांगतात. आपणही सर्वांना मोक्षदायिनी अशा ह्या श्रेष्ठ गीता ग्रंथाला मन:पूर्वक नमस्कार करूया.

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## *प्रवासी पक्षी -कुसुमाग्रज*

गेली सहा दशकं मराठी माणसावर मोहिनी घालणाऱ्या एकाच प्रतिभाशाली साहित्यिकाचे नाव घ्यायला सांगितले. तर वि. वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज या नावाशिवाय पर्याय राहत नाही! 'गर्जा जयजयकार क्रांतीचा, गर्जा जयजयकार!' ही त्यांची कविता 1940च्या दशकात स्वातंत्र्य आंदोलनात फासावर लटकणाऱ्या क्रांतिविरांचे हौतात्म्य अजरामर करून गेली. पण क्रांतीची कविता गाणारा हा कवी प्रेमाचं गाणंही तितक्याच मनस्वीपणे गात होता. 'सरणावरी आज आमची पेटतात प्रेते, उठतील त्या ज्वालांमधुनी भावी क्रांतीचे नेते...' असं जुलमी ब्रिटिश सरकारला सुनावणारा हा कवी त्याचवेळी आपल्या प्रियतमेला 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात!' असंही सांगत होता. 'आगगाडी आणि जमीन' यासारख्या कवितांतून भांडवलदारी अर्थव्यवस्थेत होत असलेल्या शोषणाचं चित्रण करणारा हा कवी त्याच वेळी 'पृथ्वीचे प्रेमगीत'ही शब्दबद्ध करत होता. कुसुमाग्रजांच्या याच प्रतिभेनं मोहित होऊन वि. स. खांडेकर यांच्यासारख्या त्या काळातल्या ज्येष्ठ साहित्यिकानं पुढाकार घेऊन त्यांचा 'विशाखा' हा कवितासंग्रह प्रकाशित केला आणि कुसुमाग्रज हे नाव साहित्यविश्वातलं एक मानाचं पान बनलं.

कुसुमाग्रजांनी जवळपास सहा दशकं कविता लिहिल्या. पण कविता याच एका साहित्य प्रकारापुरतं त्यांनी आपलं लेखन मर्यादित ठेवलं नाही. कथा, कादंबरी, नाटक आणि त्याचबरोबर ललितलेखन अशा साहित्याच्या विविध प्रांतात त्यांनी मुक्तपणे संचार केला. नटसम्राट आणि ययाती, देवयानीसारखी नाटकं, ऑथेल्लो आणि मॅकबेथ या शेक्सपीअरच्या गाजलेल्या कलाकृतींचे अनुवाद आणि कल्पनेच्या तीरावरसारखी कादंबरी ही त्यांच्या लेखनातील काही मोजकीच उदाहरणं. 'मराठी माती', 'किनारा', 'स्वगत', 'छंदोमयी', 'मुक्तायन', 'पाथेय' हे त्यांचे काही गाजलेले कवितासंग्रह. या कवितासंग्रहांपैकी छंदोमयी, मुक्तायन आणि पाथेय या तीन संग्रहातील निवडक कवितांचा 'प्रवासी पक्षी' या नावानं प्रसिद्ध झालेला संग्रह हा कुसुमाग्रजांच्या अलीकडल्या काळातल्या कविता आपल्यापुढे आणतो.

स्वातंत्र्य मिळून जवळपास चार दशकं उलटल्यानंतरच्या काळातील या कविता आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळात हा कवी आंदोलनाच्या, देशप्रेमाच्या आणि तळागाळातल्या माणसावर होणाऱ्या अन्यायाविरोधात पेटून उठणाऱ्या कविता लिहीत होता. त्यातून तत्कालिक सामाजिक परिस्थितीचं दर्शन जसं घडत होतं, त्याचबरोबर कवीची आशावादी वृत्तीही त्यातून प्रगट होत होती. स्वातंत्र्यानंतरच्या चार दशकांनी परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला आहे. राजवट बदलली पण सर्वसामान्य माणसाची व्यथा-वेदना मात्र कायमच राहिली. भ्रष्टाचार फोफावला आणि त्यामुळे सामान्य माणसाचे जिणे अधिकच कठीण होऊन गेले. त्याबद्दलची चीड या कवितांमधून पानोपानी दिसून येते. मग वैतागलेला माणूस हा अध्यात्माकडे वळू पाहतो, तर ते क्षेत्रही भ्रष्टाचारानं तितकंच ग्रासलेलं. इथले साधू कुसुमाग्रजांना कसे दिसतात?

यांच्या लंगोटीला, झालर मोत्यांची,
चिलीम सोन्याची, त्याच्यापाशी

कवीचा हा रोखठोक बाणा वाचकांना अर्थातच भिडतो. त्यामुळे माणूस पुन्हा प्रस्थापित राजकीय नेत्यांकडेच वळतो. तर तेथेही जातिभेद आणि गैरव्यवहार यांचा बुजबुजाट झालेला. जातिभेद नष्ट करण्यासाठी जे नेते झगडले, त्यांच्यावर आता एकेका जातीनं मालकी प्रस्थापित केलेली बघून कवी व्यथित होतो. ही 'अखेर कमाई' नावाची छोटेखानी कविता मुळातूनच वाचायला हवी.

मध्यरात्र उलटल्यावर शहरातील पाच पुतळे
एका चौथऱ्यावर बसले आणि टिपं गाळू लागले.
ज्योतिबा म्हणाले, शेवटी मी झालो माळ्यांचा.
शिवाजीराजे म्हणाले, मी फक्त मराठ्यांचा.
आंबेडकर म्हणाले, मी फक्त बौद्धांचा.
टिळक उद्गारले, मी तर फक्त चित्पावन ब्राह्मणांचा.
गांधींनी गळ्यातील गहिवर आवरला
आणि ते म्हणाले, तरी तुम्ही भाग्यवान.
एकेक जातजमात तरी तुमच्या पाठीशी आहे.

माझ्या पाठीशी मात्र फक्त
सरकारी कचे-यातील भिंती!

अगदी मोजक्या शब्दांतून अचूक आशय व्यक्त करणारी ही कवीची शैली, त्याचवेळी सामाजिक परिस्थितीबद्दलचं त्याचं नेमकं भान हे या कवितांचं वैशिष्ट्य. अर्थात कुसुमाग्रजांच्या लेखनातून ही सारी वैशिष्टयं यापूर्वीच सामोरी आली होती. प्रा. शंकर वैद्य यांच्या नेटक्या संपादनातून ‘प्रवासी पक्षी’ हा आपल्याला कुसुमाग्रजांच्या लेखनाचा आणि वैचारिक प्रवासाचा नेमका वानोळा देऊन जातो.

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## रानातल्या कविता- ना. धों. महानोर

महानोर हे आपल्या अद्भूत अशा शेतीमुळे आणि ‘पाणी अडवा, पाणी जिरवा’ कार्यक्रमामुळे साहित्यबाह्य विश्वातही ख्यातकीर्त आहेत. महानोरांनी कविता केल्या, अजिंठ्याच्या पायथ्याशी राहणे झाल्यामुळे याच विस्मयकारी लेण्यांच्या परिसरात घडलेल्या एका खऱ्याखुऱ्या प्रेमकहाणीला कादंबरीरूप दिलं, शिवाय साहित्याचे अन्य बाजही त्यांनी तितक्याच लीलया हाताळले... तरी शेतीत रमणारं त्यांचं मन त्यातून बाहेर येऊ शकलं नाही.

या शेतानं लळा लावला असा असा की,
सुखदु:खाला परस्परांशी हसलो- रडलो.
आता तर हा जीवच अवघा, असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो.

महानोरांचा अवघा जीवच जेव्हा त्या शेतातल्या हिरव्या बोलीचा शब्द होऊन गेला, तेव्हा त्यातून व्यक्त होणाऱ्या जाणीवा आणि संवेदना या किती तरल असतील, हे सांगण्याचीही गरज नाही. त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे या छोटेखानी संग्रहातील ६४ कविता या मुळातून वाचल्याशिवाय त्यातील भावभावना आणि गोडवा हा थेट आपल्यापर्यंत पोहोचणे कठीणच आहे.

महानोरांच्या या कविता रानातल्या आहेत आणि रानातलं सौंदर्य जसं त्या आपल्याला उलगडून दाखवत जातात, तसंच रानातली दु:खही आपल्या कानावर घालत जातात. रानात वावरताना सतत महानोर सभोवतालच्या निसर्गाकडे अत्यंत जिव्हाळ्यानं बघताना दिसतात. त्यामुळेच

पाहता ऋतुगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे

या ओळींचा दाखला देऊन प्रख्यात समीक्षक वा. ल. कुलकर्णी म्हणतात : 'हा कवी खरोखरच जागोजाग झाडाझुडपांशी, पाटबंधाऱ्यांशी, गुरावासरांशी, पाखरांशी, मेघांशी खेळ मांडून गातो आहे. त्याला खरोखरच शब्दगंधाने बाहूत घेतले आहे...`

महानोरांनी १९६० ते ६६ या काळात या कविता लिहिल्या. मराठवाड्यातल्या दूरच्या भागात, अजिंठ्याच्या पायथ्याशी बसून महानोर निसर्गाची विविध रूपं पाहत होते आणि त्यातून नाना प्रकारच्या प्रतिमा त्यांच्या भोवती सतत भिरभिरत होत्या. अनेकदा त्या स्त्री देहाच्याच होत्या. त्यातूनच 'ज्वार उभार गर्भार` अशी लख्ख प्रतिमा महानोर उभी करून गेले.

फुलात न्हाली पहाट ओली, क्षितिजावरती चंद झुले
नभात भिजल्या केशरियाचे रंग फुलांवर ओघळले...

या अवघ्या दोन ओळीतून महानोर पुढे काय घडत जाणार आहे, ते आपल्याला सांगून जातात आणि घडतही नेमकं तसंच जातं.

आज तिने कुठल्या सजणाला दूर नभातून बोलविले
भरात येऊनी नग्न शरीरी उघड्यावरती भोग दिले

आणखी एका कवितेत ते लिहून जातात :

- अश्शी लखाखली बोर अंगभर चंदकोर
उसमळ्याच्या गर्दीत थोडे सांडले केशर

पण रानातल्या शृंगाराची इतकी आरस्पानी वर्णनं करणाऱ्या महानोरांनी याच रानातलं दु:खही तितक्याच थेटपणे शब्दबद्ध केलं आहे.

नांगरून पडलेली जमीन सर्वत्र. नुसताच शुकशुकाट
एखादेच चुकार वासरू कुठेतरी. उद्ध्वस्त घाट.

या अवघ्या दोन ओळींतून महानोरांनी पावसाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्याच्या मनातला आवाज आपल्यापर्यंत पोहोचवला आहे.

ग्रासली झाडे दिशांनी नग्नदेही
कोरड्या डोळ्यात आता थेंब नाही

या शब्दांचा अर्थ कळून घेण्यासाठी महानोरांप्रमाणेच शेतात राहायला हवं. महानोरांनी सारी प्रबोधनं टाळून पळसखेड्यातील शेतातच गेली पाच सहा दशकं राहणं पसंत केलं. आमदार नामदार झालेला, 'जैत रे जैत'सारख्या सिनेमाची गाणी लिहिणारा, शरद पवार-लता मंगेशकर-जब्बार पटेल यांच्यासारख्यांचा मित्र असलेला माणूस हा सहजासहजी मुंबई-पुण्यात वास्तव्याला येऊ शकला असता. पण महानोरांनी ते केलं नाही. कारण त्यांना साद घालत होते 'पक्षांचे लक्ष थवे' आणि त्यातूनच 'गगनाला पंख नवे' फुटल्याचा साक्षात्कार त्यांना होत होता.

अख्खा संग्रह वाचून झाल्यावर महानोर आपल्याला सांगतात :

जन्मापासूनचे दु:ख जन्मभर असे
जन्मभर राहो, मला त्याचे न फारसे

त्याचं कारण महानोरांच्या शब्दांत

'....तेव्हा माझे रान-
रानातली झाडे मला फुले अंथरूण!
***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

## मराठी विचारधन

ज्याचे मन निरंतर असते, त्याला देव देखील नमस्कार करतो...
***

**संग्रहित**

**लेख**

# प्रकाशवाटा -डॉ. प्रकाश आमटे




बाबा आमटे आणि त्यांचं 'आनंदवन' जगाच्या नकाशावर जाऊन जवळपास दोन दशकं उलटली, तरी त्यांचे चिरंजीव प्रकाश आणि स्नुषा मंदाकिनी त्याच परिसरातल्या 'भामरागड' परिसरातल्या निबीड अरण्यात नेमकं काय करत आहेत, याचा फारसा कुणाला पत्ता नव्हता. बाबाचं आनंदवनातलं काम मोठं आहेच पण आनंदवन हे विदर्भातील एका प्रमुख रस्त्यावरचं गाव होतं. बिजली, सडक, पानी अशा पायाभूत सुविधा तिथं सहजासहजी उपलब्ध होत्या. साहजिकच येणाऱ्या जाणाऱ्यांची तिथं वर्दळ असे आणि त्यामुळेच समाजातील एका अत्यंत उपेक्षित घटकासाठी आपलं आयुष्य उधळून देणाऱ्या बाबांच्या वाटेनं प्रसिद्धीचा झोतही तितक्याच सहजतेनं आला.

यापैकी कोणतीच गोष्ट या भामरागडच्या जंगलात उपलब्ध नव्हती. मुळात तिथं जाऊन पोहोचणं, हाच शहरवासीयांसाठी एक अनुभव ठरे. मग तिथं राहणं, तर मनातही येणं अशक्य. निबीड अरण्य, आपली स्वत:ची अनवट भाषा बोलणारे माडिया गोंड जातीचे आदिवासी आणि सोबतीला असंख्य वन्य प्राणी. किर्र जंगलामुळे संध्याकाळी चार-साडेचारपासूनच अंधारून येई आणि सहा वाजले की काळोखाचं साम्राज्य सुरू होई. वीज-टेलिफोन वगैरे गोष्टी केवळ कल्पनेतल्या. पण १९७३ मध्ये बाबांनी तिथं लोकबिरादरी प्रकल्प सुरू केला आणि २५ वर्षांच्या प्रकाशनं तिथं जाऊन राहण्याचा निर्णय घेतला.

अनवट वाटेनं जाऊन कुष्टरोग्यांसाठी आपलं आयुष्य पणास लावण्यापेक्षाही ही कसोटी मोठी होती कारण इथं थेट जिवाशीच गाठ होती. हेमलकसा -जिथं मुक्काम ठोकण्याचा निर्णय प्रकाशनं घेतला होता, त्या परिसरातल्या आदिवासींसाठी प्रकाश आणि त्याचे काही मोजकेच सहकारी हे उपग्रहावरचेच पाहुणे होते. शिवाय, कोणत्याही क्षणी आजूबाजूच्या परिसरातनं कोणतं जनावर अंगावर चाल करून येईल, ते सांगता येणं कठीण होतं. बरं यापैकी सुदैवानं काहीच घडलं नाही, तरी पायाखालचे साप वा आजूबाजचे मलेरियापासून कोणत्याही रोगाचा दंश करावयास उत्सुक असलेले डास...

तरीही प्रकाशनं तिथं जाऊन राहायचा निर्णय घेतला. सुदैवानं त्याच्या डॉक्टर पत्नी मंदाकिनी याही त्याच्याबरोबर होत्या. तिथपासून सुरू होऊन गतवर्षी मिळालेल्या 'रॅमन मॅगसेसे' पुरस्कारांपर्यंतच्या प्रवासाची कहाणी म्हणजे 'प्रकाशवाटा'. या दाम्पत्यानं हेमलकसा आणि भामरागड परिसरातल्या लोकांनाच आपलसं करून घेतलं असं नाही, तर त्या परिसरातल्या प्राणीमात्रांशीही आगळाच ऋणानुबंध साधला... हे सारं करताना सामोरं येत गेली ती सरकारी अनास्था आणि प्रशासनातील कोरडेपणा. पण या दाम्पत्यानं त्या सर्व प्रसंगांशी केलेला सामना हा छोट्या छोट्या प्रसंगातून पुढे येत जातो आणि आमटे कुटुंबियांचं मोठेपण हे अधोरेखित होत जातं.

पण त्याचवेळी ही कहाणी आमटे कुटुंब कशा पद्धतीनं जीवन जगत होतं, तेही आपल्यापुढे उभं राहत जातं. बाबा हे महामानव होते पण त्यामुळेच त्यांच्या घरच्यांनाही एका वेगळ्या जीवनशैलीला सामोरं जावं लागतं. त्याची अनेक उदाहरणं या पुस्तकात आहेत. प्रकाश आणि त्याचा मोठा भाऊ नागपूरला वैद्यकीय शिक्षण घेत असताना हॉटेलात डोसा खायला गेले. खरं तर यात गैर काय? पण हे कळल्यावर बाबा काहीच बोलले नाहीत. पण साधनाताईंनी मात्र 'बाबांच्या नावाला बट्टा लावू नका!' एवढेच उद्गार काढले. या दोहो बंधूंना नेमक्या कोणत्या ताणतणावांतून जावं लागलं असेल, त्याची कल्पना येण्यास एवढं एक उदाहरण पुरेसं आहे. प्रकाशच्या लेखनातून उभी राहणारी विकासची व्यक्तिरेखा तर बरंच काही म्हणजे पुस्तकात नसलेल्या गोष्टीही सांगून जाते. विकासला इंजिनिअर व्हायचं होतं. त्याला नीटनेटकेपणाची, इस्त्रीच्या कपड्यांची आवड कशी होती आणि ते सारं या महामानवाच्या घरात कसं शक्य झालं नाही. पण प्रकाश लगेचच सांगून जातात की आमच्या दोघांचीही उद्दिष्टे स्वभावात फरक असला, तरी बाबांच्या प्रभावामुळे सारखीच राहिली. इथे वाचकाला महात्मा गांधींच्या घरातील ताणतणावांची आठवण येत राहते.

अर्थात, त्यामुळे आमटे कुटुंबियांच्या मोठेपणाला बाधा येत नाही. या कुटुंबानं समाजासाठी आपलं आयुष्य उधळून दिलं हे तर खरंच आहे आणि त्यांच्या त्यागातूनच आनंदवन, हेमलकसा, भामरागड परिसरात प्रकाशाच्या वाटा निर्माण झाल्या. या वाटेवरून चालण्यासाठी मग अवघ्या महाराष्ट्रातून तरुण तेथे गेले. त्यातूनच उभा राहिलेला लोकबिरादरी प्रकल्प आज आपल्यापुढे आदर्श म्हणून उभा आहे.

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## *श्यामची आई - साने गुरुजी*



साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तक पहिल्यांदा प्रकाशित झाले, ते १९३५ साली. याचा अर्थ पुढच्या वर्षी हे पुस्तक प्रकाशित होऊन ७५ वर्षे होतील. याचाच अर्थ सन २०१० हे 'श्यामची आई' या पुस्तकाचे 'अमृत महोत्सवी' वर्ष आहे. सलग पंच्च्याहत्तर वर्षे एखादे पुस्तक लोकांच्या मनात रुतून बसणे, एवढेच नव्हे तर त्याच्या लाखाहून अधिक प्रती विकल्या गेल्यावरही, त्याची मागणी कायम राहणे, असे भाग्य एखाद्या पुस्तकाला क्वचितच लाभते.

असे काय आहे या पुस्तकात?

खरे तर हे पुस्तक आज मराठी माणसांच्या घराघरांत आहे. पुस्तक नसले, तरी त्याची कहाणी ही जवळपास प्रत्येक मराठी माणसाला ठाऊक आहे. ज्या कोणी ते वाचलेले नसेल, त्यांनी आचार्य अत्रे यांनी त्या पुस्तकाच्या प्रेमात पडून काढलेला 'श्यामची आई' हा चित्रपट तरी पाहिलेला असतो आणि त्यातील श्यामच्या आईची वनमालाबाईंनी उभी केलेली भूमिका आणि माधव वझे यांनी जिवंत केलेला श्याम हा त्यांच्या डोळ्यासमोर कायम उभा राहिलेला असतो.

'श्यामची आई' हा साने गुरुजींच्या बालपणीच्या आठवणींचा एक सोहळा आहे. अर्थात, याचा अर्थ गुरुजींच्या साऱ्याच आठवणी सुखद आहेत, असे मुळीच नाही. उलट गुरुजींचे बालपण किती खडतर अवस्थेत गेले, त्याचीच एका अर्थाने ही 'कथामाला' आहे. पण गुरुजींच्या मनात त्या आठवणी सांगताना, त्याबद्दलची खंत बिलकूलच नाही. उलट त्या खडतर काळातही आईने लहानग्या श्यामवर केवळ प्रेमाचाच वर्षाव केला, असे नाही तर उलट कोणत्याही खडतर प्रसंगातून आपले चारित्र्य आणि शील अभंग राखून बाहेर कसे पडावयाचे याचेच त्यास शिक्षण दिले. 'श्यामची आई' ही एका अर्थाने एक संस्कार शाळाच होती. शाळा कसली, ते खऱ्या अर्थाने गुरुजींचे 'माझे विद्यापीठ'च होते.

स्वातंत्र्य आंदोलनात तुरुंगवासात गुरुजींनी या आठवणी जागवल्या. खुद्द गुरुजी लिहितात : 'दिवसा काम करावे आणि रात्री जगन्माता, भारतमाता व जन्मदात्री माता यांच्या विचारात रंगावे,' असे तेथे चालले होते. गुरुजींच्या तुरुंगातील अनेक मित्रांना या रात्री आवडल्या. ज्यांना गुरुजी आपले लिखाण वाचून दाखवीत, त्यांच्या डोळ्यात अश्रू येत आणि त्यांच्याबरोबर गुरुजींच्या डोळ्यातूनही घळघळा पाणी वाहत असे. अश्रू हा गुरुजींच्या साऱ्याच साहित्याचा एक अविभाज्य घटक आहे. कोणी त्यामुळे गुरुजींच्या साहित्याची संभावना रडके वा पळपुटे साहित्य अशा शब्दांत भलेही करोत त्यामुळे त्या साहित्याची महती कमी होणारी नाही. आचार्य अत्रे यांच्यासारख्या अत्यंत आक्रमक प्रकृतीच्या माणसालाही ती समजू शकली होती त्यामुळेच त्यांनी या आठवणींवर अत्यंत भावूक आणि मनाला हात घालणारा असा चित्रपट तर काढलाच, शिवाय 'मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र' असा डोळ्यात पाणी आणणारा लेख लिहून या पुस्तकाचे अजरामर स्थान मराठी वाचकांच्या लक्षात आणून दिले.

दररोज रात्री आश्रमातील आपल्या सहकाऱ्यांना श्याम आईच्या या आठवणी सांगतो, असा फॉर्म गुरुजींनी या आठवणी शब्दांकित करताना निवडला आहे. एकूण ४२ रात्रींचा हा प्रवास आहे. कोकणातले दापोली परिसरातले श्यामचे घर, तेथील गरिबीचे पण अत्यंत प्रेमळ असे वातावरण, श्यामवर त्याच्या आईइतकेच प्रेम करणारे पण प्रसंगी वज्राहूनही कठोर होणारे त्याचे वडील, दुर्वांची आजी अशी अनेक पात्रे गुरुजींनी आपल्या भावमधूर शैलीत जिवंत करून सांगितली आहेत. आई अर्थातच श्यामला मनापासून जीव लावणारी पण तीही शिस्तीचे धडे देताना वडलांइतकीच कठोर होणारी... कधी श्यामला आपल्या आईच्या या शिस्तीचा वा तिच्या कठोरपणाचा रागही येतो. पण पुढच्याच क्षणी आईच त्याला ते समजावून सांगते. हे सारेच कसे मनाचा ठाव घेणारे आहे. पुस्तकातील अनेक प्रसंग, उपकहाण्या, सुभाषितवजा वाक्ये किमान गेल्या पिढीतील लोकांच्या तरी मनात कायमचे घर करून बसली आहेत.

खरे तर आज ज्या प्रकारे आपल्याला जीवन जगावे लागत आहे आणि ते करताना जी नवी जीवनमूल्ये समाजात रूढ होऊ पाहत आहेत, त्यांच्याशी संपूर्ण विसंगत अशी जीवनशैली आणि जीवनमूल्ये या पुस्तकात आहेत. तरीही गेली सात दशके या पुस्तकाची महती कायम आहे. त्यामुळे त्याबद्दल आणखी काहीही सांगण्याची गरज नाही.
आहे.

***

**संग्रहित**
**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## *अंतू बर्वा [पु. ल. देशपांडे]*



रत्नागिरीच्या त्या मधल्या आळीत लोकोत्तर पुरूष रहातात.देवाने ही माणसांची एक निराळीच घडण केली आहे. त्यांच्यात रत्नागिरीच्या लाल चिऱ्याचे, नारळ-फणसांचे,खाजऱ्या अळवाचे आणि फट म्हणताच प्राण कंठाशी आणणाऱ्या ओल्या सुपारीचे गुण अगदी एकवटून आहेत. रत्नागिरीच्या शितातच ही भुतावळ लपली आहे की पाण्यातच प्राणवायु नि प्राणवायूच्या जोडीला आणखी कसला वायु मिसळला आहे ते त्या रत्नांग्रीच्या विश्र्वेश्र्वरालाच ठाऊक.

अंतू बरवा ह्याच मातीत उगवला आणि पिकला. वास्तविक अंतू बरव्याला कुणी अंतू असे एकेरी म्हणावे असे त्याचे वय नव्हे. मी बाराचौदा वर्षांपूर्वी त्यांना प्रथम पाहिले त्या वेळीच त्यांच्या दाढीचे खुंट आणि छातीवरचे केस पिकलेले होते. दातांचा बराचसा अण्णू गोगट्या झाला होता. अण्णू गोगट्या होणे म्हणजे 'पडणे' हा अंतूने मराठी भाषेला बहाल केलेला वाक्प्रचार आहे. रत्नांग्रीचा अण्णू गोगटे वकील कित्येक वर्षे ओळीने मुन्शिपाल्टीच्या निवडणूकीत पडत आला आहे. तेव्हापासून विहिरीत पोहरा पडला तरी पोहऱ्याचा

"'अण्णू' झाला काय रे?" म्हणून अंतू ओरडतो.

समोरासमोर अंतूला कोणी अंतू म्हणत नाही. परंतु उल्लेख मात्र सहसा एकेरी. किंबहुना, कोकणातली मंडळी एकूणच एकवचनी. पण अंतूला संबोधन 'अंतूशेट' हे आहे. ह्या चित्पावनाला ही वैश्यवृत्तीची उपाधी फार प्राचीन काळी चिकटली. अंतूच्या हातून ते पाप घडले होते. पहिल्या महायुध्दाच्या वेळी अंतूने बंदरावर कसले तरी दुकान काढले होते. ते केव्हाच बुडाले. परंतु 'अंतूशेट'व्हायला ते कारण पुरेसे होते. त्यानंतर अंतूने पोटापाण्याचा काही उद्योग केल्याचे कोणाच्या स्मरणात नाही. दोन वेळच्या भाताची त्याची कुठेतरी सोय आहे. थोडीशी जमीन आहे. नारळीची पाचपंचवीस, पोफळीची दहापंधरा आणि रातांबीची काही अशी झाडे आहेत. दोनपाच हापूस आंब्याची आहेत. कुठे फणस, चिंच उभी आहे. वाडवडिलार्जीत घराच्या वाटणीत एक पडवी आणि खोली आली आहे. विहीरीवर वहिवाटीचा हक्क आहे. ह्या सगळ्या आधारावर अंतूशेट उभे आहेत.

त्यांची आणि माझी पहिली भेट बापू हेगिष्ट्याच्या दुकानात झाली. मी सिगरेट घ्यायला गेलो होतो आणि 'केसरी'च्या मागून अर्धा जस्ती काड्यांचा चष्मा कपाळावर घेत अंतूशेटनी तडक प्रश्न केला होता, "

"वकीलसाहेबांचे जावई ना ?"

"हो!"

"झटक्यात ओळखलेंच मी! बसा! बापू, जावयबापूंना चहा मागवा"

एकदम इतक्या सलगीत आलेला म्हातारा कोण हे मला कळेना. पण अंतूशेटनीच खुलासा केला. "तुमचे सासरे दोस्त हो आमचे. सांगा त्यांना अंतू बरवा विचारीत होता म्हणून."

"ठीक आहे !"

"केव्हा आलात पुण्याहून ?"

"परवाच आलो."

"बरोबर. दिवाळसण असेल. मागा चांगली फोर्ड गाडी! काय?"

"तुमचे दोस्त आहेत ना, तुम्हीच सांगा."

"वा! पुण्याचे तुम्ही. बोलण्यात ऐकणार काय आम्हाला! मग मुक्काम आहे की आपली फ्लाईंग व्हिजीट ?"

"दोनतीन दिवसांनी जाईन !"

"उत्तम ! थोडक्यात गोडी असते. त्या सड्यावरच्या कपोसकर वकिलाच्या जावयासारखं नका करू. त्यानं सहा महिने तळ ठोकला. शेवटी कपोसकर वकिलान् एक दिवस खळं सारवायास लावलं त्यास ! जास्त दिवस जावई राहिला की तो दशमग्रह होतो. कसं ?"

"बरोबर आहे !"

"बापूशेट, ओळखलंत की नाही ? आमच्या वकिलांचे जावई ! आम्ही दोघेही त्यांचेच पक्षकार हो !"
हेगिष्ट्यांनी नमस्कार केला.

"चहा घेता ?"

"नको हो, उकडतंय फार !" मी म्हणालो.

"अहो, रत्नांग्रीस उकडायचंच. गोठ्यात निजणाऱ्यान् बैलाच्या मुताची घाण येते म्हणून भागेल काय ?" शेवटला

'काय?' वरच्या पट्टीत उडवीत अंतूशेट म्हणाले, "रत्नांग्रीस थंड हवा असती तर शिमला म्हणाले नसते काय आमच्या गावाला ? पण उकाड्याचा तुमच्या सड्यावर अधिक त्रास ! दुपारच्या वेळी मारा सायकलीवर टांग नि थेट या आमच्या पोफळीच्या बागेत झोपायला. पोफळीची बाग म्हणजे एअरकंडिशन हो !" मनमुराद हसत अंतूशेट म्हणाले. वर आणि "आमचा कंट्री विनोद हो जावयबापू" हेही ठेवून दिले.

"बापूशेट, पाहुणे लेखक आहेत हो. आमच्या आबा शेट्यासारखी नाटकं लिहिली आहेत. फार बोलू नका. नाहीतर तुमच्यावर लिहीतील एखादा फर्मास फार्स !"

अंतूशेट बर्‍यांपर्यंत माझी कीर्ती पोहोचल्याचे ऐकून झालेला आनंद बापूशेट हेगिष्ट्याच्या प्रश्नाने मावळला. मला नीट न्याहाळीत बापूशेट म्हणाले, "काय करतात ?"

"करतात काय म्हंजे ? खुळे की काय तुम्ही हेगिष्टे ? ती रद्दी काढा. दहा ठिकाणी फोटोखाली नाव छापलेलं आढळेल तुम्हाला. सिनेमात असतात."

"म्हणता काय ?" हेगिष्टे माझ्याकडे 'अजि म्यां ब्रह्म पाहिलें' असा चेहरा करून पाहत म्हणाले.

"काय हो जावयबापू, एक विचारू काय ?" मिस्किल प्रश्नाची नांदी चेहऱ्यावर दिसत होती.

"विचारा की ----"

"एक सिनेमा काढला की काय मिळतं हो तुम्हाला ?"
मी काही कोकणात प्रथमच आलो नव्हतो; त्यामुळे ह्या प्रश्नाला मी सरावलो होतो.

"ते सिनेमा-सिनेमावर अवलंबून आहे."

"नाही, पण आम्ही वाचलंय की एक लाख दीड लाख मिळतात ..."

"मराठी सिनेमात एवढे कुठले ?"

"समजा ! पण पाच पूज्यं नसली तरी तीन पूज्यं पडत असतीलच ..."

"पडतात... कधीकधी बुडतात ही !"

"अहो, ते चालायचंच ! धंदा म्हटला की चढणं नि बुडणं आलं. आणखी एक विचारू काय ? ...म्हणजे रागावणार नसलात तर..."

"छे, रागवायचं काय ?"

"सिनेमातल्या नट्यांबद्दल आम्ही हे जे काही वाचतो ते खरं असतं की आपलं गंगाधर बाष्ट्याच्या अस्सल बेळगावी लोण्यासारखं पीठ मिसळलेलं ?"

"हे जे काही म्हणजे ?" मी उगीचच वेड पांघरले.

"वस्ताद हो जावयबापू ! कोर्टात नाव साक्षीदार म्हणून नाव काढाल ! अहो, हे जे काही म्हणजे तर्जनीनासिकान्याय यातला प्रकार म्हणतात ते..."

हा तर्जनीनासिकान्याय माझ्या ध्यानात आला नाही. शेवटी अंतूशेतनी आपली तर्जनी नाकपुडीला लावीत साभिनय खुलासा केला. तेवढ्यात हेगिष्ट्यांनी मागवलेला चहा आला. "घ्या" अंतूशेटनी माझ्या हातात कप दिला आणि त्या चहावाल्या पोराला "रत्नांग्रीच्या समस्त म्हयशी तूर्तास गाभण काय रे, झंप्या ?" असे म्हणून जाता जाता चहाच्या रंगावर शेरा मारला आणि बशीत चहा ओतून फुर्र फुर्र फुंकायला सुरवात केली. वास्तवीक त्या पोऱ्याला चहात दूध कमी आहे हे त्यांना सरळ सांगता आले असते. पण अंतूशेटचेच काय, त्यांच्या साऱ्या आळीचे बोलणे तिरके.

अंतूशेटचा आणि माझा परिचय आता जुना झाला. गेल्या दहाबारा वर्षांत मी जितक्या वेळा रत्नागिरीला गेलो तितक्या वेळा मी त्यांना भेटलो. त्यांच्या अड्ड्यात त्यांनी मला जमवूनही घेतले. एकदोनदा गंजिफा शिकवायचा प्रयत्नही केला. आणि त्या साठीच्या आसपास उभ्या असलेल्या वृद्धांच्या अड्ड्यात मग अंतूशेट आणि त्यांचे सांगाती यांचे जीवनविषयक अचाट तत्वज्ञान मी खूप ऐकले. त्यांची विशिष्ट परिभाषा तिथे मला कळली. खांद्यावर पैरणी, कमरेला पंचा, पायात करकरती वहाण,एका हातात दंडा नि दुसऱ्या हातात फणस घेऊन , "रे गोविंदभट, टाकतोस काय दोन डाव ?" किंवा "परांजप्या, जागा आहेस की झाला तुझा अजगर ?" अश्या आरोळ्या मारीत पत्त्यांतले भिडू गोळा करणाऱ्या त्या मंडळीत मीही भटकलो. पत्त्यांचा डाव फारसा रंगला नाही की पाने टाकून, "जावयबापू, म्हणा एखादा मालकंस. गडबोल्या,कूट थोडा तबला पाव्हण्याबरोबर. खातूशेट, उघडा तुमचा खोका." असल्या फर्माईशीनंतर मी आवाजही साफ करून घेत असे.

"नरड्यात मज्जा आहे हो तुमच्या !" ही दाद इथेच मिळे. वर्षा-दोन-वर्षांतून एखादी फेरी रत्नागिरीला घडे. दर फेरीत मात्र एखादा मेंबर गळाल्याचे कळे.

"दामूकाका दिसले नाहीत कुठे अंतूशेट !"
"कोण ? दामू नेना ? तो चैनीत आहे ! वरती रंभा त्याच्या टकलावर तेल थापते आणि उर्वशी पंख्यान् वारा घालते म्हणतात."
"म्हणजे ?"
"अहो, म्हंजे वाघाचे पंजे ! दामू नेन्याची रत्नांग्रीहून झाली बदली !" असे म्हणून अंतूशेटनी आकाशाकडे बोट दाखवले.
"अरे अरे अरे ! कळलं नाही मला."
"अहो, कळणार कसं ? दामू नेना चचला म्हणून रेडिओत का बातमी सांगणार आहेत ? केसरीत आला होता गृह्यसंस्कार झापून. मनमिळाऊ, प्रेमळ व धर्मपरायण होते असा ! छापणारे काय, द्याल ते छापतील. दामू नेना कसला प्रेमळ ? ताटीवर आडवा पडला होता तरी कपाळावरची आठी तशीच ! एके रात्री उकडतांय घरात म्हणून खळ्यात झोपला तो तिथेच संपलेला आढळला पहाटे ! पुण्यवान माणूस. गतवर्षी आषाढीच्या दिवशी गेला वैकुंठालोकी. रत्नांग्रीत दोन पालख्या निघाल्या आषाढीला --- एक विठोबाची नि दुसरी दामू नेन्याची. आषाढात तो गेला आणि विजयादशमीला आमच्या दत्तू परांजप्यान् सीमोल्लंघन केलेनीत. अवघ्या देहाचं सोनं झालं. इजा झाला, बिजा झाला, आता तिजाची वाट पाहतोय !" मिष्किलपणाने खांदा उडवीत अंतूशेट म्हणाले.
पाच फुटांच्या आतबाहेरची उंची, तांबूस गोरा वर्ण, तोंडावर बारीक वांगाचे ठिपके, घारे मिचमिचे डोळे, वयोमानाप्रमाणे वाढत चाललेल्या सुरकुत्या, डोक्यावर तेलाच्या कडा उमटलेली टोपी, अंगात अंगरखा, कमरेला गुडघाभर पंचा, पायांत कोकणी वहाणा, दातांची अर्धी पंगत उठून गेलेली, त्यामुळे मोकळ्या हिरड्यांना जीभ लावीत बोलायची खोड आणि ह्या साजासकट वजन सुमारे शंभर पौंड. ह्या सगळ्या जराजीर्ण होत चाललेल्या गोष्टींत एक गोष्ट ताजी म्हणजे सानुनासिक परंतु सुस्पष्ट आवाज आणि डोक्यावर पिढ्यान् पिढ्या थापलेल्या खोबरेल तेलाने दिलेली वंशपरंपरागत तैलबुद्धी ! अंतूशेटच नाही, तर त्या आळीतले त्या वयाचे सारेच नमुने कमीअधिक फरकाने एकाच वळणाचे किंवा आडवळणाचे. भाषेला फुरश्यासारखी पायात गिरकी घेऊन चावायची सवयच झालेली. कुणाचे बरे झाल्याचे सुख नाहीच; वाईट झाल्याचे दुःख नाही. जन्माचे सोयर नाही, मरणाचे सुतक नाही. गाण्याची रुची नाही, तिटकाराही नाही; खाण्यात चवीपेक्षा उदरभरण हाच स्वच्छ हेतू ! आयुष्याची सारवट गाडी वंगण नाही म्हणून कुरकुरली नाही, आहे म्हणून वेगाने पळली नाही. चाल मात्र कोकणी वाटेसारखी सदा नागमोडीची. नशिबात अश्वत्थाम्याघरच्या पिठाच्या दुधाची वाटी ! त्याच्या घरी दुधाचे पीठ झाले. इथे देवाने नारळीचा कल्पवृक्ष दिलेला. पण त्यातल्या खोब~याहून करवंटीची सलगी अधिक !

उन्हाळ्यात कुठली तरी मुंबईची दुय्यम नाटक कंपनी झापाच्या थेटरात 'एकच प्याला' घेऊन आली होती. संच जेमतेमच होता. पहिला अंक संपला. बाहेर सोड्याच्या बाटल्यांचे चीत्कार सुरू झाले. किटसनच्या प्रकाशात अंतूशेटची मूर्ती दिसली. अंतूशेट फरक्यापवाल्या मॅनेजरशी चर्चा करत होते.
"कशी काय गर्दी ?"
"ठीक आहे !"
"प्लान तर मोकळाच दिसतोय. सोडता काय अर्ध्या तिकिटात ?"
"छे ! छे !"
"अहो, छे छे म्हणून झिटकता काय पाल झाडल्यासारखे ? पहिला अंक ऐकला मी हितूनच. सिंधूच्या पार्ट्यात काय दम दिसत नाही तुमच्या. 'लागे हृदयीं हुरहुर' म्हणजे अगदीच पिचकवणी म्हटलंनीत. बालगंधर्वाचं ऐकलं होतंत काय ?" नेहेमीप्रमाणे शेवटला 'काय' उडवीत अंतूशेट म्हणाले.
मॅनेजरही जरा उखडले. "आग्रह नाही आमचा तुम्ही नाटक बघायला चला असा."
"गावात आग्रहाचे बोर्ड तर टांगले आहेत --- आणि काल घरोघर जाहिरातीची अक्षतदेखील घेऊन हिंडत होते तुमचे ब्यांडवाले! अहो, एवीतेवी रिकाम्या खुर्चीला नाटक दाखवायचं --- चार आण्यात जमवा."
"चार आण्यात बघायला काय डोंबा~याचा खेळ आहे काय ?"
"अहो तो बरा ! आधी खेळ तो दाखवतो आणि मग थाळी फिरवतो. तुम्ही तसं करा. पुढलं 'कशि या त्यजूं पदाला' जमलं फक्कड तर थाळीत चार आणे आणखी टाकीन." बाजूची मंडळी हसली आणि मॅनेजर उखडला. तेवढ्यात अंतूशेटची नजर माझ्याकडे वळली. "नमस्कार हो जावयबापू..."
"नमस्कार !"
"काय जमलाय काय 'एकच प्याला' ? "
"ठीक आहे !"
"फुकट पासात की काय तुम्ही ? बाकी तुम्हीही त्यांतलेच. एक न्हावी दुस~या न्हाव्याच्या दाढीचे पैसे घेत नाही म्हणतात."
"'नाही हो. हे पहा तिकीट आहे."
"'मग 'ठीक आहे' म्हणून मुळमुळीतसं उत्तर दिलंत ? दमड्या मोजल्या आहेत ना तुम्ही ? तो सिंधूचा पार्टी तर एकदम कंडम वाटला मला."

"अहो, सिंधूचा पार्टी कसला ? बाई आहे ती काम करणारी."
"सांगताय काय ? कसला तो आवाज नि कसलं ते दिसणं ? मनात आणील तर कडेवर घेईल सुधाकराला. सिंधू कसली ? सिंधूदुर्ग आहे मालवणचा नुसता."
"पाहिलंत वाटतं नाटक ?"
"उगीच जरा. त्या कोपऱ्यातली दोन झापं बाजूला करून पाहिलं घटकाभर... छ्याः ! ह्यांच्यापेक्षा दशावतारी बरे."
काही कारण नसताना आपल्या मताची एक पिंक टाकून अंतूशेट निघून गेले. बाकी अशा दिवसरात्र 'पिंका' टाकीतच त्यांचे आयुष्य गेले. अंतूशेटची माझी आता इतक्या वर्षांची ओळख, परंतु त्यांच्या कौटुंबिक परिस्थितीविषयी मला फारसे कधीच कळले नाही. त्यांच्याच अड्ड्यातल्या अण्णा साऱ्यांनी एकदाच फक्त काही माहिती पुरवली होती. कधीतरी त्यांच्या बोलण्यातून अंतूशेटच्या मुलाची उल्लेख आला.
"'म्हणजे ? अतूशेटना मुलगा आहे ?"
"आहे ? म्हणजे काय ? चांगला कलेक्टर आहे !"
"'कलेक्टर ?"
"भायखळ्याच्या स्टेशनावर तिकिटं गोळा करतो." चेहऱ्यावरची सुरकुती हलू न देता अण्णा म्हणाले.
"मग वडलांना मदत करीत नाही की काय ?"
"अहो, करतो कधी कधी. त्यालाही त्याचा संसार आहे. त्यातून बीबीशीआयला जायपीचा डबा जोडलेला ..."
ह्या अड्ड्यातले हे विशेष शब्द गोळा केले तर एक स्वतंत्र कोश तयार होईल. बी बी सी आयला जी आय पीचा डबा जोडणे म्हणजे आंतरजातीय विवाह हे लक्षात यायला मला उशीर लागला.
"काय लक्षात आलं ना ? तेव्हा अंतूशेटच्या स्नानसंधेची पंचाईत होते. मुलाच्या घरी थोडी इतर आन्हिकंही चालतात म्हणे. आमच्या अंतूशेटचं जमायचं कसं? एकदा सगळा अपमान गिळून नातवाचा चेहरा पाहण्यास गेला होता. गणित चुकल्यासारखा परतला. दसरा-दिवाळीला अंतू बर्व्याला मिळतं आपलं मनिऑर्डरीतून पितृप्रेमाचं पोस्त ! पाचदहा रुपयांचं ! तेवढ्यात फिरतो मिशीला कोकम लावून तूप म्हणून सांगत ! आणि उगीचच खुर्दा खुळखुळवतो चार दिवस खिशात हात घालून."
"अहो, तिकिट-कलेक्टरला पगार तो काय असणार ?"
"पगार बेताचाच, पण चवल्यापावल्यांची आचमनं चालतात म्हणतात. खरंखोटं देव जाणे. आणि चालायचंच ! घेतले तर घेऊ देत .. काय ? अहो, आठ आणे खाल्ले की चौकडीचा मुगूट घालून रत्नागिरीच्या डिस्ट्रिक्ट जेलात घालतात आणि एक लाख खाल्ले की गांधी टोपी घालून पाठवतात असेंब्लीत ! लोकनियुक्त प्रतिनिधी !"

राजकारण हा तर अंतूशेटच्या अड्ड्यातला लाडका विषय ! प्रत्येक राजकीय पुढाऱ्यावर आणि तत्वप्रणालीवर मौलिक विचार ! कोकणात दुष्काळ पडला होता. तसा तिथे नेहमीच दुष्काळ. पण हा दुष्काळ अंतूशेटच्या भाषेत सांगायचे म्हणजे 'फ्यामिन आक्टान्वये पास झालेला'! दुष्काळी भागातून नेहरूंचा दौरा चालला होता. गावात धामधूम होती. कोणीतरी संध्याकाळी अंतूशेटना विचारले, "काय अंतूशेट? भाषणास दिसला नाही !" "कुणाच्या न्हेरूच्या ? छ्याट् ! अरे, दुष्काळ पडला हितं .. तर भाषणं कसली देतोस ! तांदूळ दे.! हे म्हणजे भाट्याच्या खाडीत बुडणाऱ्या दालद्याला विश्वेश्वराच्या घाटीवर उभं राहून कुराण वाचून दाखवण्यापैकी आहे. तो तिथे बोंबलतोय आणि हा हितं ... ह्याचा त्यास उपयोग नाही आणि त्याचा ह्यास ! तुम्ही आपले खुळे. आला न्हेरू चालले बघायास ! आणि रत्नांग्रीत दाखवलनीत काय त्यास ? बाळ गंगाधर टिळक जन्मले ती खोली आणि खाट ? गंगाधरपंत टिळकास काय स्वप्नात द्रष्टांत झाला होता काय रे ... तुझ्या बायकोच्या पोटी लोकमान्य जन्मास येणार म्हणून ? कुणाची तरी खाट दाखवली नि दिलं ठोकून त्याच्यावर टिळकानं पहिलं ट्यां केलं म्हणून ! पुरावा काय ? का टिळकाच्या आयशीचं बाळंतपण केलेली सुईण होती साक्षीस ? टिळकाचं सोड ! शंभर वर्षं झाली त्याच्या जन्मास. तू जन्मास आलास ती खोली तुझ्या मातोश्रीस तरी सांगता येईल काय ? म्हातारीस विचारून ये घरी जाऊन आणि मग सांग मला टिळकाच्या आणि न्हेरूच्या गोष्टी."

मला नेहमी प्रश्न पडे, की ह्या मंडळीची आदराची स्थानं कोणती ? गावात पंडित आला की त्याला 'पढिक' म्हणून उडव. "बाजारात जाऊन पैशाचं लिंबू आणायास सांग. स्तंभाजवळच्या लायब्ररीत जाईल आणि तिथे मागेल लिंबू !" कुणाचा मुलगा प्रोफेसर झाला हे ऐकल्यावर अंतूशेट चटकन म्हणाले, "सर्कशीत काय हो? पूर्वी एक छत्रे प्रोफेसर होता." कुणी नवे दुकान काढले तर "दिवाळ्याचा अर्ज आत्ताच मागवून ठेव म्हणावं !" हा आशिर्वाद.

जीवनाच्या कुठल्या तत्वज्ञानाचा अर्क ही मंडळी प्याली आहेत देव जाणे. त्यांतली निम्म्याहून अधिक माणसे मनिऑर्डरीवर जगतात आणि त्यातले पैसे वाचवून दावे लढवतात. प्रत्येकाची तारीख पडलेली. विशाल सागरतीर आहे, नारळीची बने आहेत, पोफळीच्या बागा आहेत, सारे काही आहे; पण त्या उदात्ततेला दारिद्र्य विलक्षण छेद देऊन जाते आणि मग उरते एक भयाण विनोदाचे अभेद्य कवच ! कशावरून तरी गांधींच्या गोष्टी निघाल्या. अंतूशेटनी आपले भाष्य सुरू केले. "अहो, कसला गांधी ? जगभर गेला, पण रत्नांग्रीस फारसा आला नाही. पक्का तो ! त्यास नेमकं

ठाऊक --- इथं त्याच्या पंचाचं कौतुक नाही नि दांडीचं नाही. आम्ही सगळेच पंचेवाले नि त्याच्याहीपेक्षा उघडे ! सुताबितात तथ्य नाही हो ! आमचा शंभूशेट जन्मभर जानव्याचं सूत काढीत आला ! ब्रिटिश सरकार सोडा पण रत्नांग्रीचा गिलिगन कलेक्टरदेखील घाबरला नाही ! तिसरं शस्त्र म्हणजे उपासाचं ! इथे निम्मं कोकण उपाशी ! नेहमी तुपाशी खाणाऱ्यास उपाशी माणसाचं कौतुक. आम्हांस कसलं ? नाही, माणूस असेल मोठा... पण आमच्या हिशेबी त्याच्या मोठेपणाची नोंद करायची कुठल्या खात्यावर ? आणि स्वराज्याचा म्हणाल तर संबंध गांधीशीही नाही, टिळकांशीही नाही नि सावरकांशीही नाही."

"म्हणजे स्वराज्य काय आकाशातून पडलं ?"

"ते कुठून पडलं ते तुम्ही तपासा ! पण इंग्रज गेला कंटाळून. अहो, लुटण्यासारखं काय शिल्लक होतं ? धंदा बुडीत खाती जायला लागला --- फुकलंनीत दिवाळं ! कुंभार मडकी घेऊन गेला, तुम्ही फुंका उकिरडा ! हे सगळं चक्रनेमिक्रमेण होतं. सत्ता इंग्रजाची नाही, न्हेरूची नाही आणि जनतेची नाही. सत्ता आहे विश्वेश्वराची !"

"मग तुमचा विश्वेश्वर इंग्रजाच्या ताब्यात कसा गेला ?"

"खुळे की काय तुम्ही ! विश्वेश्वर घट्ट आहे राजिवड्यावर ! अहो, एक खेळ करून दाखवला त्यानं."

"दीडशे वर्षांच्या गुलामीचा कसला खेळ ?"

"'अहो दीडशे वर्षं तुमची ! ब्रह्मदेवाच्या रिष्टवाचातला काटा सेकंदान् देखील सरकत नाही हजार वर्षं ओलांडल्याशिवाय!"

कोकणातल्या त्या मधल्या आळीतल्या ओसरीवर, भोवती माडाच्या काळ्या आकृती हलताना कंदिलाच्या प्रकाशात ती थकलेली सुकलेली तोंडे हे तत्वज्ञान सांगू लागली की काळीज हादरते. "अहो, समाजवादाच्या गफ्फा आहेत हो गफ्फा ! अहो, एक आंब्याचं पानदेखील नसतं हो दुसऱ्यासारखं. ब्रह्मदेवाच्या दरबारी प्रत्येक भांडं निराळं. सगळ्या माणसांची नशिबं सारखी होतील कशी '? घटकाभर धरा, तुमचा आला समाजवाद ! तो आमचा रत्नांग्रीचा गावगांधी शिट्ट्या फुंकून फुंकून सांगतो तशी आली कोकण रेल्वे नि गेली पांडू गुरवाच्या परसातून -- म्हणून काय थोट्या पांडबाच्या खांद्याला हाताचे खुंट फुटणार काय ? आणि हात नाहीत म्हणजे मग कसेल त्याची जमीन नि दिसेल त्याची थैली ह्या तुमच्या राज्यात थोटा पांडू कसणार कसा आणि काय ? तो तसाच राहायचा ! स्वराज्य आलं म्हणून हरी साठ्याचा तिरळा डोळा सरळ झाला नाही नि महादेव गडबोल्याचं धोंद आत नाही गेलं ! हे डावंउजवं राहायचंच समाजात ! अहो, रामराज्यातदेखील मारूतीचं शेपूट उपटून रामानं आपल्या पाठीस नाही जोडलं -- हा नरच राहिला नि तो वानरच राहिला."

अश्या वेळी अंतूशेटच्या जिभेवर लक्ष्मी नाचते.

"बरोबर आहे !"

"उगीच तोंडदेखलं बरोबर आहे म्हणू नका त्या श्यामराव मुरकुट्यासारखं ! चुकत असेल तर कान उपटा ! तुम्ही माझ्याहून लहान खरे, पण शिक्षणान् थोर आहात."

अंतूशेटच्या असल्या भाषणात केवळ तिरका विनोद नसतो. त्यांचे कुठेतरी काहीतरी जळत असते. गेल्या चारपाच वर्षांत रत्नागिरीला फार वेळा जाताच आले नाही. आता तिथे वीज आली, कॉलेज आले, डांबरी रस्ते आले, मी दोनतीन वर्षांपूर्वी गेलो तेव्हा अंतूशेटना म्हणालो,

"अंतूशेट, रत्नागिरी झकपक झाली हो तुमची ! विजेचे दिवे आले. तुमच्या घरी आली की नाही वीज ?"

"छे हो, काळोख आहे तो बरा आहे. ! उद्या झकपक प्रकाश पडला तर बघायचं काय ? दळिद्रच ना ? अहो, पोपडे उडालेल्या भिंती नि गळकी कौलं बघायला वीज हो कशाला? आमचं दळिद्र काळोखात दडलेलं बरं !"

अंतूशेट मनमुराद हसले. या खेपेला दातांचा जवळजवळ संपूर्ण अण्णू गोगट्या झालेला दिसला. शिवाय अड्ड्यातली आणखीही एकदोन मंडळी 'निजधामाला' गेल्याचे कळले. कधी नाही ती एक कारुण्याची नि गोडव्याची झाक अंतूशेटच्या बोलण्यात मला आढळली. अड्ड्यातल्या रिकाम्या जागा त्यांच्या मनात कुठेतरी घर करून जात असाव्या. जोगळेकरांचा मुलगा दिल्लीस बदलला हो वरच्या जागेवर." अंतूशेट आपण होऊन सांगत होते. म्हाताऱ्याला काशीविश्वेश्वर, हरिद्वार-हृषिकेश घडवून आणलंनीत. मावंदं घातलं जोरदार शंभू जोगळेकरान् ! गंगेच्या पाण्याचा लहानसा गडू शिलबंद करून आठवणीन् घेऊन आला माझ्यासाठी ! पुढच्या खेपेला याल तेव्हा त्याचं शिल फोडून गडू आमच्या तोंडात उपडा झालेला दिसेल हो जावयबापू." पहिल्या भेटीतले संबोधन अजून कायम होते. त्यानंतर गेल्याच वर्षी पुन्हा रत्नागिरीला जाण्याचा योग आला. अंतूशेटच्या घरचा गंगाजलाचा गडू सुदैवाने सीलबंदच होता.

"वा वा ! कांग्रेचुलेशन हो जावयबापू ! कळलं आम्हांला. जाऊन या हो. एक रिक्वेष्ट आहे. आता इंग्लिश बोललं पाहिजे तुमच्याशी."

"कसली रिक्वेस्ट ?"

"तेवढा कोहिनूर हिरा पाहून या. माझी आपली उगीचच तेवढी इच्छा राहिली हो ! पिंडाला कावळा नाही शिवला तर कोहिनूर कोहिनूर म्हणा. शिवेल ! परत आल्यावर सांगा कसा दिसतो. लंडन, प्यारिस सगळं बघून या." मला उगीचच त्यांच्या पाया


पडावे असे वाटले. मी रस्त्यातच त्यांना वाकून नमस्कार केला. "आयुष्यमान् व्हा ! श्रद्धाळू आहात, म्हणून यश आहे हो तुम्हाला."
मी निरोप घेतला आणि चार पावले टाकली असतील, लगेच हाक ऐकू आली.
"ओ जावयबापू --- !"
"काय अंतूशेट ?"
"जाताय ते एकटेच की सपत्नीक ?"
"आम्ही दोघेही जातोय."
"हे चांगलं केलंत ! उगीचच एक किडा आला डोक्यात. म्हटलं, परदेशी विद्या शिकायला निघाला आहात --- देवयानीची कथी आठवली. काय ? आमच्या मुलीलाही आशिर्वाद सांगा हो ! तुमचं भाग्य तिच्यामुळं आहे. तुम्हांला म्हणून सांगतो. मनात ठेवा हो. कुठे बोलू नका. चाळीस वर्षांपूर्वी आमची ही गेली. दारचा हापूस तेव्हापासून ह्या घटकेपर्यंत मोहरला नाही. शेकड्यांनी आंबा घेतलाय एके काळी त्या आंब्याचा. पण भाग्य कुठल्या वाटेनं जातं बघा. असो. सुखरूप या. इथून प्रयाण केव्हा ?"
"उद्या सकाळच्या एस.टी.नं जाणार !"
"डायरेक्ट मुंबई की काय ?"
"हे चांगलं केलंत ! एकदा तो प्रवास घडला की त्या चिकाटीवर माणसांनी पृथ्वीप्रदक्षिणा करून यावं. परवा वरच्या आळीतला तात्या जोग जाऊन आला --- अजून हाडांचा हिशेब जमवतोय. सातआठ हाडं हरवली म्हणतो त्या यष्टीत." अंतूशेट सगळे तोंड उघडून हसत होते. आता त्या तोंडात एकच दात लुकलुकत होता.
पहाटे पाच वाजता एस.टी. स्टँडवर अंतूशेटची "जावयबापू" ही खणखणीत हाक ऐकू आली. मी चकितच झालो. अंतूशेटनी वैद्याच्या पुडीसारखी एक पुडी माझ्या हाती दिलीय.
"तुमचा विश्वास नाही, ठाऊक आहे मला. पण एवढी पुडी असू द्या तुमच्या खिशात. विश्वेश्वराचा अंगारा आहे. विमानातून जाणार म्हणून कळलं वकीलसाहेबांकडून. एवढी पुडी जड नाही खिशाला."
एस.टी. सुटली आणि अंतूशेटनी आमच्या कुटुंबीयांबरोबर सदरा वर करून आपले म्हातारे मिचमिचे डोळे पुसले. तेवढ्या अंधुक प्रकाशात त्यांचे ते खपाटीला गेलेले पोट चटकन माझ्या डोळ्यावर उगीचच आघात करून गेले. कोकणातल्या फणसासारखीच तिथली माणसेदेखील --- खूप पिकल्याशिवाय गोडवा येत नाही त्यांच्यात
***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## पानिपत-विश्वास पाटील




मराठी माणसाला इतिहासात रमायला नेहमीच आवडतं. त्यातही तो इतिहास आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाच्या कहाण्या सांगणारा असला, तर बघायलाच नको! वर्तमानातील कठोर वास्तवापासून दोन क्षण का होईना दूर जाता येणं, हा त्यातील बहुधा सर्वात मोठा लाभ असावा. त्यामुळेच कायम गतकालात, इतिहासात रमणाऱ्या व्यक्तीची पलायनवादी अशा शब्दात अनेकदा हेटाळणीही केली जाते. तरीही 'पूर्व दिव्य ज्यांचे, त्यांना रम्य भावी काल!' या पंक्तीवर भरवसा ठेवून असेल कदाचित, मराठी माणूस हा इतिहास आणि पुराणकथांमध्येच रममाण झालेला आढळतो. त्यातही मराठी माणसाचा सर्वात आवडता काल म्हणजे सतराव्या शतकात छत्रपती शिवरायांपासून सुरू होणारा आणि पुढे एकोणीसाव्या शतकात पेशवाईच्या अखेरीस येऊन थांबणारा, हे आता सर्वश्रुत झालं आहे. त्यामुळेच मराठीतील अनेक कादंबऱ्या आणि नाटकं ही याच कालातील गौरवशाली घटनांवर आधारित आहेत.

त्यात पुन्हा छत्रपतींनी उभं केलेलं राज्य पेशव्यांनी बुडवलं, या प्रचलित समजाची झालर या साऱ्या कालखंडास असल्यानं तर या दोनशे वर्षांच्या इतिहासाच्या दंतकथा कधी बनून गेल्या आणि त्यातून अनेक गैरसमजांचे देव्हारे कसे उभे राहिले, हे कोणाच्या लक्षातही आलं नाही.तरीही मराठी मनाचं या साऱ्या कालखंडाविषयीचं आकर्षण कमी झालेलं नाही.

पेशवाईच्या शे-सव्वाशे वर्षांच्या कालखंडात अनेक गौरवशाली घटना घडल्या. अटकेपार मराठी झेंडा

फडकवण्याची घटना जशी त्याच काळातील, त्याचबरोबर पानिपतच्या युद्धात पदरी आलेला मानहानीकारक पराभवही त्याच काळातील. पानिपतवर मराठ्यांच्या पदरी आलेल्या पराभवास आज जवळपास सव्वा-दोनशे वर्षं लोटली आहेत. तरीही ती जखम कुरवाळण्यात आणि तो पराभव नेमका कोणामुळे नशिबी आला, याविषयीचं चर्वितचर्वण करण्यातच मराठी माणूस धन्यता मानतो.

अर्थात, एखादा संवेदनक्षम आणि इतिहासाचं थेट घटनास्थळी जाऊन अध्ययन करणाची इच्छा असलेला सृजनशील लेखक या साऱ्याकडे अगदी वेगळ्याच दृष्टीकोनातून बघू शकतो आणि त्यातून अद्वितीय स्वरूपाची कलाकृती उभी राहू शकते. विश्वास पाटील यांची 'पानिपत' कादंबरी हे अशाच चिंतनशील लेखनाचं दुर्मिळ उदाहरण आहे. पाटील हे महाराष्ट्र सरकारच्या सेवेतील एक ज्येष्ट सनदी अधिकारी. असा माणूस हा खरं तर फायली आणि जीआर यांच्या गुंत्यातच अडकून पडायला हवा. पण पाटीलबुवांनी त्या गुंत्यातून बाहेर पडून अध्ययन आणि अभ्यास यास वाहून घेतलं. शिवाय त्यांच्या लेखणीला मराठी मातीचा एक अस्सल रंग होताच. त्यामुळेच १९८८ मध्ये ही कादंबरी प्रसिद्ध होऊन दोन दशकं उलटून गेल्यावरही तिच्या आवृत्त्यामागून आवृत्या प्रसिद्ध होत राहिल्या.

इसवी सन १७६१ मध्ये झालेल्या पानिपतच्या या लढाईकडे बघण्याचा एक संपूर्ण नवाच दृष्टीकोन विश्वास पाटील यांनी आपल्या या कादंबरीतून मराठी मनाला दिला आहे. दोनशे वर्षं मराठी मनावर असलेला ठसा पुसून टाकण्याचं काम सोपं नव्हतं... पण थेट पानिपतच्या रणभूमीवर दिवसच्या दिवस काढल्यानंतर पाटलांच्या हाती अनेक नवे तपशील आले होते आणि त्यातून अनेक जुन्या संदर्भांचं वेगळंच विश्लेषण सामोरं येत होतं. बहुतेक इतिहासकालीन कादंबऱ्या वा नाटकं गतकालाचा गौरव करणाऱ्या असतात. पानिपत अशा सर्व साहित्यापेक्षा वेगळी ठरते, याचं कारण पाटील हे सतत भूत-वर्तमान आणि भविष्य यांचं भान ठेवून या महासंग्रामाकडे पाहत राहिले आणि त्यातूनच मराठी लष्कर, त्याबरोबर गरज नसताना पुण्याहून गेलेले आणि पुढे अत्यंत अडचणीचे ठरलेले कुटुंबकबिले व बाजारबुणगे यांची हजारो मैलांची दौड आणि त्यांना पाठीशी घालत सदाशिवराव भाऊंच्या नेतृत्वाखाली झालेली लढाई यांचं अत्यंत प्रत्ययकारी तसंच वास्तवदर्शी चित्रण उभं राहिलं.

राजकारणातले डावपेच, खलबतं, सत्तेच्या लालचेतून वा आपलंच वर्चस्व कायम राहावं म्हणून मराठी सरदारांनी केलेल्या दगाबाजीचं दर्शन जसं या कादंबरीतून घडतं, त्याचबरोबर अनेक मराठी सरदारांनी प्राणांची बाजी लावून दिलेली झुंजही आपल्यापुढे साकारत जाते. सदाशिवराव भाऊ, विश्वासराव, महादजी शिंदे, मल्हारबा होळकर, मस्तानीपुत्र समशेर, इब्राहिमखान गारदी अशा मराठी छावणीतील धुरंधरांच्या व्यक्तिरेखा पाटलांनी जितक्या तडफेनं उभ्या केल्या आहेत, तितक्याच ताकदीनं अहमदशहा अब्दाली, नजीब, अयोध्येचा नवाब सुजाउद्दौला, भरतपूरचा राजा सुरजमल जाट असे या संग्रामातील अन्य तालेवार खेळाडूही त्यांनी मैदानात उतरवले आहेत.

या साऱ्या चित्रणातून केवळ पानिपतची लढाईच आपल्यापुढे जिवंत होते, असं नाही तर अठराव्या शतकातील तो सारा कालखंड, त्या काळातील समाजजीवन, चालीरीती आणि जाती-जमातींमधील गुणदोषांसह डोळ्यापुढे उभा राहतो. त्यामुळेच विश्वास पाटील यांची ही कादंबरी गेली दोन दशकं मनात घर करून राहिली आहे.

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## *संस्कार शिदोरी*

"तुम्ही संस्कृत श्लोक, सुभाषिते, सुविचार यांची पेरणी निबंधात केली, तर परीक्षक चांगले गुण देतात," असं आमच्या शिक्षकांचं सांगणं असायचं. त्यामुळे अशा वह्यांचा संग्रह बहुतेक विद्यार्थ्यांकडे असायचा. त्याचा वापर प्रत्येकाने आपल्या लेखनात किंवा जीवनात कसा केला हे ज्याचं त्याला ठाऊक. एक मात्र नक्की की, आमच्या पिढीला चांगल्या संस्कारांचा लाभ त्यामुळे मिळत गेला. असे संस्कारवर्ग कुठल्याही फीशिवाय घेणारी माणसंही त्यावेळी होती. 'मोठे बाप्पा' हे त्यापैकी एक.

रोज रात्री जेवणं आटोपून आम्ही सगळी मुलं ठोंबरेंच्या अंगणात जमत असू. आठ-आठ दिवस न संपणाऱ्या गोष्टींची मेजवानी तिथे आम्हाला मिळायची. रात्री साडेआठचा भोंगा नगरभर ऐकू यायचा. भोंगा वाजायला सुरुवात झाली की, तो संपायच्या आत गोष्टीला तिथेच पूर्णविराम देऊन आम्ही सगळी मुलं समोरच्याच मोठे बाप्पांच्या अंगणात ठोंबरेंच्या अंगणाकडे पाठ करून बसत असू. धर्मविषयक गोष्टी सांगण्याचं कंत्राट मोठे बाप्पांकडे असायचं. त्यानंतर प्रत्येकाने उठून बायबलमधलं एखादं तरी

सुवचन बोलून दाखवायचं. कधी कधी स्तोत्रं-गाणी पाठ म्हणून दाखवावी लागत. गैरहजेरीचा बहाणा अजिबात चालत नसे. 'आपल्या प्रत्येकाच्या नावाचा एक शुभ्र देवदूत असतो. आपण पाप केलं तर त्याच्या शुभ्र कपड्यांवर काळा डाग पडतो. न्यायाच्या दिवशी सर्वांसमोर आपल्या देवदूताला उभं केलं जाणार आहे, तेव्हा देवदूत स्वच्छ असेल अशी काळजी घ्या.' मोठे बाप्पा म्हणायचे. 'देवदूताचे कपडे डागाळले तर अमूक एक धुलाई पावडर किंवा एखाद्या चांगल्या लाँड्रीची सोय त्यावेळी नव्हती का? असा आजच्या मुलांकडून विचारला जाऊ शकणारा प्रश्ान् आमच्या मनातही कधी आला नाही. देवदूताच्या मलीन होण्याची भीती मनात बसली ती आजतागायत.

शब्दकोडी सोडवण्याचा एक फार छान खेळ त्यावेळी मोठी मुलं खेळायची. एखाद्या शब्दाची अक्षरसंख्या सांगायची. उदाहरणार्थ, एक तीन अक्षरी शब्द आहे. पहिलं अन् शेवटलं अक्षर घेतलं की, एक खाण्याचा पदार्थ असा अर्थ होतो. पहिलं अन् दुसरं अक्षर घेतलं तर वजन असा अर्थ निघतो. दुसरं अन् तिसरं घेतलं तर मग्न आणि तिन्ही अक्षरं घेतली तर मुलाचं नाव होतं. -तो शब्द कोणता? बरं, ही सगळी कोंडी तोंडीच चालत. कठीण शब्दांची आणि जास्त अक्षरसंख्या असलेली, जास्त अर्थ निघतील अशी कोडी घालण्याची चुरसच लागायची. शाळेत इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अशी कोडी घालून मराठी शब्दांचा त्यांचा संग्रह वाढवण्याच्या माझ्या प्रयोगात मुलांनाही मौज वाटायची. पुढच्या वेळी असे शब्द पुस्तकातून शोधून, माझ्या मदतीने आणखी अर्थ जमवत वर्गात फळ्यावर हा खेळ ती आवडीने खेळत. महिन्यातला शेवटचा माझा तास हा अशा खेळांसाठीच मी ठेवला होता. शब्दांशी खेळण्यातली गंमत कळू लागल्यावर याच विद्यार्थ्यांकडून गोष्ट, कविता जे वाटेल ते मराठीतून चार-पाच वाक्यात लिहिण्याच्या प्रयोगाला तर पुढे असा प्रतिसाद मिळाला की, काही अमराठी मुलांनी चक्क कविता लिहून दाखवल्या!

माझ्या विषयात वर्गात मुलं छान रमत; पण बडोद्याहून आलेल्या एका गुजराती मुलाच्या चेहऱ्यावर मराठी भाषा शिकण्याचा कायम कंटाळा स्पष्ट दिसायचा. एक दिवस त्याने मला विचारलं, "ये सबका रोकडा कितना मिलेगा?"

"म्हणजे?" मी अचंबित. गोंधळलेली. नंतर लक्षात आलं, 'या सगळ्या गोष्टी परीक्षेत किती गुण मिळवून देणार आहेत?' असं त्याला विचारायचंय. त्याला मराठी भाषेतील सौंदर्यस्थळं आणि संदर्भ-स्पष्टीकरणं यांच्याशी काडीमात्र कर्तव्य नव्हतं. त्याने केलेला सवाल त्याच्या दृष्टीने रोकडा होता!

केजीतल्या एकाला आपल्या शेजारी बसलेल्या मुलाच्या टिफिनमधलं क्रीम बिस्किट हवं होतं. दुसरा मुलगा नुसता 'नाही देत' म्हणून गप्प बसला नाही, तर आपल्या नकाराला त्याने पुस्ती जोडत म्हटलं, "तेरा बाप भी तो कमाता होगा, बोल उसको लाने को." हे ज्या कुणाचे संस्कार त्याच्या तोंडून बोलले गेले त्यामुळे मी अस्वस्थ झाले. एक तीळ सात भावांनी वाटून खाल्ल्याची कथा त्या छोट्याच्या आधीच्या पिढीपर्यंत पोहोचलीच नव्हती! कुठे गहाळ झाल्या त्या सगळ्या त्यागाच्या, औदार्याच्या कथा? किती बदललाय माणूस!

... कृष्णामाईचा पान्हा सुकून गेला आहे
आणि प्रतिबिंब पाहायला म्हणून जावे
तर गंगच्या पाण्यात गाळ साचला आहे.
आता कुठे शोधावा मी माझा चेहरा
साने गुरुजींच्या कथामालेतला?
... माणूस नावाच्या माझा पत्ता
आज मी शोधते आहे
हरवले आहे माझे बरेच काही
गेल्या काही वर्षांत...
***

**संग्रहित**
**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## पु.ल. : एक साठवण



विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील सर्वाधिक लोकप्रिय मराठी साहित्यिक कोण, या प्रश्नाचं उत्तर वाचता न येऊ शकणारा मराठी माणूसही क्षणाचा विलंब न लावता देऊ शकेल! त्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या या लोकप्रिय वेब साइटच्या वाचकांना खरं तर ते सांगण्याचीही गरज नाही. त्याचं कारण तो लेखक हा रूढार्थानं लेखक वा साहित्यिक नव्हता, तर मराठी मनावर १९५० पासून जवळपास पुढची पाच दशकं सलग राज्य करणारा एक मनस्वी कलावंत होता. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे असं नाव घेऊन जन्माला आलेले हे गृहस्थ तुमच्या आमच्या घरातले 'पुलं' कधी होऊन गेले, तेच तुम्हा आम्हाला कधी कळलं नाही. त्याचं कारण त्याच्या सहजसुलभ लेखनात जसं होतं, त्याचबरोबर त्यांच्या निर्विष विनोदात होतं आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे त्यांच्या लेखनात तुमच्या आमच्या रोजच्या दैनंदिन जीवनात घडणाऱ्या अगदी सर्वसामान्य वाटणाऱ्या अशा घटनांमधील विसंगतीवर अगदी अचूक बोट ठेवलेलं असे. ही विसंगती आपल्याला खळाळून हसायला तर लावेच शिवाय हास्य ओसरल्यावर त्याबाबत गंभीरपणे विचार करायलाही प्रवृत्त करे. त्यामुळेच त्यांचं साहित्य हे मराठी मनाच्या आनंदाचा ठेवा बनून गेलं आहे.

पुलंनी नाना प्रकारचे साहित्यप्रकार अगदी लीलया हाताळले. नाटक असो की प्रवासवर्णन आणि व्यक्तिचित्रण असो की विडंबन... त्यांची भाषणे, त्यांनी लिहिलेली पत्रे सारे सारे मराठी रसिकांच्या मनावर आजही प्रभाव गाजवत आहेत.

'अपूर्वाई' आणि 'पूर्वरंग' ही त्यांची दोन प्रवासवर्णनं पूर्व आणि पश्चिम जगतात आपल्याला एक अनोखी अशी सैर घडवून आणतात. मराठी माणूस जेव्हा साधा पासपोर्ट काढायला घाबरत असे (प्रत्यक्षात विदेशवारीला जाण्याची तर बातच सोडा!), त्या काळात पुलंनी उभी केलेली ही प्रवासचित्रे म्हणजे मराठी वाचकासाठी एका अद्भूत अशा दुनियेचं दर्शन होतं आणि तेही सटीप! पुलं ज्या एका चष्म्यातून कधी तटस्थपणे, कधी अलिप्तपणे, तर कधी तिथं घडणाऱ्या घटनांमध्ये पूर्णपणे रंगून जाऊन पूर्व आणि पश्चिमेकडील जग आपल्यापुढे उभं करीत होते, तसं क्वचितच कुणी आजवर केलं असेल.

पुलंनी अनेक नाटकं लिहिली आणि अनेक एकपात्री प्रयोगांनी आपल्याला खिळवून ठेवलं. पण 'तुझं आहे तुजपाशी' आणि 'बटाट्याची चाळ' हे दोन 'खेळ' त्यात बाजी मारून जातात, यात शंकाच नाही. 'बटाट्याची चाळ' शेवटाला आपलं मनोगत व्यक्त करते, तेव्हा समोर तुडुंब भरलेल्या प्रेक्षागाराच्या डोळ्यात आलेले अश्रू कसेबसे थोपवलेले असत. पुलंनी हे 'चिंतन' लिहिलं, त्यास आता चार दशकं उलटली. तरीही आज चाळींच्या छाताडावर मॉल्स उभे राहत असताना, ते बटाट्याच्या चाळीचं चिंतन तितकंच लागू ठरतं, हे महत्त्वाचं. पुलंना आयुष्यात अनेक 'व्यक्ती आणि वल्ली' भेटल्या. सगळ्याच काही त्यांनी शब्दरूपानं अजरामर करून ठेवल्या असतील, असं नाही. पण नंदा प्रधान, नाथा कामत, चितळे मास्तर, हरितात्या अशा अनेकांना 'व्यक्ती आणि वल्ली' या संग्रहातून त्यांनी अमर करून सोडलं आहे.

पुलं १९७९ मध्ये साठ वर्षांचे झाले. साहजिकच त्यांचे सत्कार, षष्ट्यब्दीपूर्तीचे कार्यक्रम वगैरे ओघानं आलंच. पण त्या निमित्तानं जयवंत दळवी यांनी तोपावेतो पुलंनी लिहिलेल्या शब्दभांडारातून आपल्या आवडीचं साहित्य बाहेर काढण्याचं महाकठिण काम हाती घेतलं. हे काम महाकठिण होतं, ते अशा अर्थानं की निवडण्यापेक्षा वगळण्याचं कामच अधिक महत्त्वाचं होतं! पण त्यातूनही पुलंच्या लेखनाची, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि मुख्य म्हणजे कलावंत पुलंच्या सादरीकरण शैलीची सारी अंगे प्रगट करणारं साहित्य निवडण्यात दळवी यशस्वी झाले. त्यातूनच 'पु.ल. : एक साठवण' हा ग्रंथ सिद्ध झाला.

आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे या ग्रंथात पुलंच्या तोपावेतो कोठेही प्रसिद्ध न झालेल्या साहित्याने व्यापलेला जवळपास एक तृतीयांश भाग. तो भाग पुलंच्या गाजलेल्या भाषणांचा होता. त्यांनी सुहृदांना लिहिलेल्या पत्रांचा होता आणि त्यातून त्यांचं व्यक्तिमत्त्व हे अधिक थेटपणे सामोरं येत गेलं. त्यामुळेच पुलंच्या साहित्याचा आणि व्यक्तिमत्त्वाचा 'वानोळा' देणारं हे पुस्तक एकदा तरी हातात घ्यायलाच हवं

***

**संग्रहित**

**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

## *मराठी विचारधन*

जशी रत्ने बाहेरून चमक दाखवितात, तशी पुस्तके हि आतून अंत:करण उजळतात....

***

**संग्रहित**

लेख

## तुझी छकुली

भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी
अर्ध्यावरती डाव मोडिला अधूरी एक कहाणी

आज आई हे गाण गात होती...... पण का ? कारण तिची राणी जी काही दिवसानी या जगात पावुल ठेवणार होती एक सुन्दर विश्व पाहणार होती एका मुलीच्या रुपात, तिला ती कायमची गमावणार होती म्हणून. हो आजच आईला कळल की तिच्या गर्भाशयात वाढतय ते तिचच दुसर रूप पण तरीही ती आज उदास होती. याच कारण माहितीय का तुम्हाला? हो, हेच खर आहे आज आई - बाबानी ठरवल मला अबोर्ट करण्याच का तर मी एक मुलगी आहे म्हणून. खुप रडू येत होत मला, वाटत होत की आईच्या कुशीत शिरून ढसाढसा रडाव. पण आत्ता तर ते कधीच शक्य नाही होणार. कारण या जगात पावुल ठेवाण्या आधीच माझ अस्तित्व संपलेल असेल. वाटत होत आईला सांगाव "अग आई मला पण जगायच आहे" अगदी तुझ्यासारखच, पण कस सांगू मी तिला? कारण तिची राणी आयुष्य जगण्या आधीच काळ पड्द्याआड़ जाणार होती.

का माझ्या आई - बाबानी मला मारून टाकण्याचा निर्णय घेतला? का तर मी त्यांचा वंश पुढे चालवू शकत नाही फ़क्त एवढ्यासाठीच? का तर मी त्यांचा मुलगा नाही म्हणून? का तर मला पोसन्याची त्यांची ऐपत नाही म्हणून? का तर मी त्यांच्या डोक्यावरच फ़क्त एक ओझ म्हणून? किती सारे प्रश्न पडले मला पण उत्तर काही केल्या सापडले नाही. आज प्रत्येकाला मला आई, बायको, बहिण तर गर्लफ्रेंड सुद्धा म्हणून स्वीकारण शक्य आहे पण मुलगी म्हणून नको...... अस का??? आज एवढा मोठा निर्णय घेताना माझे आई - बाबा हे कसे विसरले की त्यांचही अस्तित्व एक स्त्री मुळेच आहे. जिने त्याना जन्म दिला, वाढवल, चांगले संस्कार दिले आणि या जगात सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. मग तोच अधिकार ते मला का मिळवून देऊ शकत नाहीत? या विचाराने वाटल बाप्पाशी खुप भान्डाव, त्याच्यावर रागवाव की जर हे असच होणार होत तर त्याने माझ अस्तित्व तरी का निर्माण केल? का? फ़क्त प्रश्न आणि प्रश्नच होते.

आज पिढ्यांपिढ्या असच चालत आल आहे. नेहमीच स्त्रीला दुय्यम दर्जा दिला जातो का तर ती पुरूषाप्रमाणे बलवान नाही, कठोर नाही तर तिला नेहमीच एक नाजुक, सहनशील आणि अबला मानल जात. जी जन्माला आल्यापासून कधी मुलगी, कधी बहिण, कधी बायको तर कधी आई या रुपात सगळ्याच गोष्टी तटस्थपणे सहन करत असते अगदी न डगमगता मग ती स्त्री अबला कशी? आपला वंश पुढे चालावा म्हणून नेहमीच एक मुलाला प्राधान्य दिल जात आणि तेवढच दुर्लक्ष्य प्रत्येक मुलीकडे केल जात. जी मुलगीच एखाद्या घराच्या वंशजाला जन्म देण्यास कारणीभुत असते. किती विचित्र आहे ना पण हीच सत्य परिस्थिति आहे ज्याच अप्रूप आत्ता कुणालाच वाटेनास झाल आहे.

प्रत्येक स्त्रीच हेच कर्तव्य आहे की जन्माला आल्यापासून ते मरणाच्या शेवटच्या श्वासापर्यंत तिने फ़क्त इतरांसाठीच जगायच, जगायच आणि जगायच बस्स. "चुल आणि मूल एवढीच भूमिका तिची" यापलीकड्च विश्व कधी तिला जगताच नाही आल. तिच्या इच्छा, आकांक्षांचा कधी कुणी विचारच केला नाही. सगळ्यानाच याचा विसर पडलाय की तिला सुद्धा या जगात मानाने जगायच आहे, स्वताहाची एक वेगळी ओळख निर्माण करायची आहे. पण ते शक्य आहे का? देऊ शकतो का आपला समाज प्रत्येक स्त्रीला स्वताहाची ओळख? हो नक्कीच, फ़क्त गरज आहे ते प्रत्यक्षात उतरवण्याची. अगदी सोप्प आहे, जर प्रत्येकाने तिच्याकडे आदराने पाहिल आणि तिला योग्य तो सन्मान दिला तर..... पण हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा प्रत्येक पुरुषाच्या मनात ही भावना रुजेल की आपणही एक भाऊ, एक पति, एक मित्र आणि एक चांगला बॉयफ्रेंड म्हणून तिच्यासाठी (स्त्री साठी) काही तरी देण लागतो.

आजच्या स्त्रीमध्ये देखिल पुरुषांप्रमाने कर्तुत्व करून दाखवण्याची कुवत आहे आणि म्हनुनच सर्व क्षेत्रांमध्ये स्त्रियांचा हिरहिरीने पुढाकार असतो. त्यांच्या याच कुवतीला गरज आहे ती फ़क्त तुमच्या साथीची. आज जर मुलींच हे घटत प्रमाण थांबवायाच असेल तर सर्वच आई - वडिलानी सुजाणपणे निर्णय घेतले पाहिजेत. अशी आशा बाळगते की सगळे या गोष्टीचा गाम्भिर्याने विचार करतील आणि यापुढे कोणतेच आई - बाबा माझ्या आई - बाबांसारखे आपल्या मुलीला अबोर्ट करणार नाहीत. जाता जाता आईला फ़क्त एक निरोप द्यायचा आहे.

मला दूर करू नकोस आई
तुझ्याविना माझे अस्तित्वच नाही
कारण मला जगायच आहे
हे सुंदरस जग पहायच आहे
तुझ बोट धरून चालायच आहे
बाबांकडे हट्ट धरून रागवायाच आहे
आजीच्या छान गोष्टी ऐकायच्या आहेत

आजोबांच्या मिश्या ओढायच्या आहेत
दादा बरोबर खेळायाच आहे
ताईची खोड काढून पलायच आहे
असच हसायच, बागडायच आहे
शिकून खुप मोठ व्हायच आहे
होइन मी तुझी शान
वाटेल तुला माझा अभिमान
वाढेन मी तुझ्या छत्रछायेत छान
देशील ना ग मला जीवनदान
कारण मला जगायच आहे
जगायच आहे
हे सुंदरस जग पहायच आहे

ऐकतेयस ना ग आई ????

तुझी छकुली
***

**संग्रहित**
**साभार : http://apalemarathijagat.blogspot.in**

**लेख**

## वृक्ष-एक सन्यस्त जीवन

सुरेख लालकेशरी फुलांनी डवरलेला वृक्ष... निळ्याशार आकाशातल रुपेरि चांदन... खळखळणा-या लाटांचा विशाल सागर आणी पहाटे-पहाटे रात्रिच्या अंधाराला उजळविणा-या सुर्याच्या उबदार किरण शलाका.... अहाहा किती सुरेख... सा-या सृष्टीतच जणु अबोल संगित भरलेल आहे. अश्या काहिश्या विचाराच्या तंद्रितच माझ लक्ष रस्त्यापलिकडल्या पटांगणा शेजारच्या गुलमोहराकडे गेल. हिरवाकंच गुलमोहर शांत उभा होता.त्यावर डवरलेली केशरि फुल,जणु सृष्टिन भगवा झेंडाच हाती धरलाय, अचानक गुलमोहर मला आनंदी भासला. आपलासा वाटला. तसा गुलमोहर मला नविन नव्हता. आजवर कितीतरि रुप मी त्याची बघितली होती.

माझ्या बालपणीचे दिवस मला आठवतात.. आम्ही भावंड, मित्र-मैत्रिनी नेहमिच गुलमोहरा खाली खेळायचो, गुलमोहराची पान, फूल छान फुलदाणित सजवायचो. झाडाच्या गर्द गार सावलित भातुकली मांडायचो, बाहुलिच लग्न करायच म्हनजे हमखास मजा यायची ती या गुलमोहराच्या बारिक पानांचा खेळ करायची, बाहुलिच लग्न म्हनजे अक्षता याच पानांच्या करायचो. गम्मत म्हणजे ओंजळ भरभरुन एकमेकांवर ही पानरुपी अक्षत लुटायला फार मजा यायची. गुलमोहराच्या फुलांचा पांढरा भाग किती आवडिने आम्ही खायचो, गाभुळलेल्या चिंचेसारखी ती चव... खातांना डोळे पक्के मिटुन, आम्ही यथेच्छ त्या फुलांवर ताव मारायचो. त्याचे शब्दात वर्णन करणे कठिण आहे.

गुलमोहराच्या लांबचलांब शेंगा असतात. मला आठवत त्या शेंगा जणू लटकत्या तलवारिच मला भासायच्या.आजही तसच वाटत जणु, शिवरायांनी मावळ्यांना दिलेली ती भेटच असावी. ती शेंग घेवुन मी ज्या आवेशात झाशीची राणी बनायची, तो आवेश या गुलमोहरानेच मला प्रदान केलेला असायचा. मग कंबरेतल्या ओडनिला शेंग खोचुन सर्व सवंगड्यांवर हुकूम करण्यात एक वेगळीच मजा यायची.पाठीवर बाहुली बांधुन तासनतास झाशिची राणी लक्ष्मीबाई बनुन राहन मला फार आवडायच." मैं मेरि झाशी नहीं दुंगी" म्हनत सर्वच जण मग भाषणे दयायचो.. तलवार बाजी तर हमखास असायची.

याच शेंगामधे बिया असतात, या एक- एक बिया म्हणजे आम्हा मुलांसाठी एक-एक सोण्याची मोहरच जशी. या बियांपासुन कितितरी खेळ आम्ही खेळायचो. कधी खळगे करुन बिया लपवायचो साथीदाराने नेमकी बियांची संख्या ओळखली तर बिया तिच्या नाहीतर तेवढ्याच बिया वसुल करायच्या, रिंगनात बिया टाकुन तोही खेळ फार रंगायचा, याच बिया नंतर पावसाळ्यात आम्ही मुल जमिनित खोचायचो. असा हा गुलमोहर कळत न कळत लहानाचे मोठे करत गेला.. नव नवे संस्कार घडवत गेला.

आजच्या वेबसाईट युगात, मुलांना गुलमोहराच हे रुप उलगडन अशक्य आहे. गुलमोहराच सालस रुप मन:पटलावर उमटत असतांनाच, हा गुलमोहर ही मला पारखा वाटला नाही. फुलांनी डवरलेला हा गुलमोहर ही, मला तसाच भासला जसा तो बालपणीचा गुलमोहर... सृष्टीचा जगतगुरू... कधी वाटतो हा की जनु फुलावा प्रेयसिच्या

मनातला प्रितीचा गुलमोहर.. .हवाहवासा... कधी निर्मोही, निरगर्वी योगी भासतो.

आसपासच्या या सिमेंट काँक्रिटच्या जंगलात तो एकटा तर नसेल पडला? पण आजही तसाच आनंदी आणी तसाच लेकुरवाळा. आपण मानव आपल्या मनात दुःखाच साम्राज्य साठवत असतो. प्रत्येकजण कुठल्यातरि चिंतेन ग्रासलेला असतो. कधितरि निमित्यान सारे एकत्र येतो,नाहीतर आपली मन मात्र एकमेकांपासुन दुरच असतात. भौतिक झगमगाहाटात आपन ऊजळुन निघतो.. पण प्रेमानि, सामंजस्यानी बांधलेल्या घरातल घरपन मात्र हरवुन गेलल दिसत. गुलमोहराचे तसे नाही, त्याच्या प्रत्येक घटकात किती सामंजस्य आहे, पान, फुल, बिया, खोड, फांद्यामुळं..... प्रत्येक घटक स्वतंत्र आहे. पण प्रत्येक जन प्रत्येकाला पुरक आहे. प्रत्येक जन आपआपली कामे बिनबोभाट करीत असतात. आपल्याला दिसतो तो एक गुलमोहर, फुलांनी बहरलेला, उन्हात शितल सावली देणारा... प्रेमाची, आनंदाची, कर्तव्याची, सहकार्याची, एकतेची शिकवण नकळत देवुन जाणारा हा गुलमोहर.... जगतोय हा वृक्ष- एक सन्यस्त जीवन.

***

**अंजली देशमुख घंटेवार**
**मोबाईल क्रमांक : ९१५६६४२१४७**

## मराठी विचारधन

“आकाशात जेव्हा उपग्रह सोडतात तेव्हा गुरुत्वाकर्षणाच्या बाहेर पिटाळून लावे पर्यंत संघर्ष असतो, त्याने गती घेतली कि उरलेला प्रवास आपोआपच होतो, असंच माणसाचं आहे. समाजात एक विशिष्ट उंची गाठे पर्यंत सगळा संघर्ष असतो. पण एकदा अपेक्षित उंचीवर पोहोचलात कि आयुष्यातल्या अनेक समस्या ती उंचीच सोडवते.

***

**व. पु, काळे**

**कविता**

## शब्दांपलिकडली भाषा

शब्दांविन शब्दांची
शब्दांपलिकडली भाषा
इश्वराचे गोड गुपित
की, निसर्गाची रुपरेषा

प्रभातकाळी आलाप खगांचा
जागविते भुपाळी
त्या स्वराने जागृत होतो
हृदयातिल वनमाळी

हर्षोल्हासित फुलपाखरांना
सुमनांचा मोद
संगतिने मिळुनी गाती
प्रितीचा वेद

तालासुरात सरिता
सागरास भेटण्या जाई
अबोल या मिलनास आसमंत
नजर खिळवुनी पाही

चराचरातुन अव्यक्त भावना
भरभरुनी वाहे
गुपित त्याचे, ताल तयाचा
अपुल्या हृदयी राहे

शब्दांविन ही शब्दांची
शब्दांपलिकडली भाषा
इश्वराचे गोड गुपित
की, निसर्गाची रुपरेषा?

***

**अंजली देशमुख घंटेवार**
**मोबाईल क्रमांक : ९१५६६४२१४७**

कला

## चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

## चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३३८४२९३६



कला


# चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात



कला

# चित्रकलेच्या जगात


**किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड**
**मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६**



कला

# चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९१३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात

**किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड**
**मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६**



कला

## चित्रकलेच्या जगात


**किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड**
**मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६**



कला

# चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२१३६



**कला**

# चित्रकलेच्या जगात

**किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड**
**मोबाईल क्रमांक : ८७९१३८४२९३६**



**कला**

## चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात


किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

# चित्रकलेच्या जगात

किरण प्रकाश बोरकर, रत्नागिरी – खेड
मोबाईल क्रमांक : ८७९३८४२९३६



कला

## चित्रकलेच्या जगात

वीणा अजित माच्छी, घोलवड, डहाणू
मोबाईल क्रमांक : ९४२३९२२२२३



# नेटभारीचा हा ई दिवाळी अंक कसा वाटला, आवर्जून प्रतिक्रिया द्या...

## तुमच्या पत्रांची वाट पाहतोय...

***netbhaari@gmail.com***

***ediwali.netbhaari@gmail.com***

नेटभारी